**RASHTRASANT TUKDOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY**

**AS PER NEP NEW SYLLABUS**

**1st TO 6th SEMESTER-MAJOR-1,2,3,4 FOR UG STUDENTS**

# Sociological Analysis

# समाजशास्त्रीय विश्लेषण

## MODULE FOR SOCIOLOGY STUDENTS

**CREAT FROM STUDENTS AND FOR STUDENTS**

## STUDY MATERIAL




**AUTHOR**
**DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR**
**DEPARTMENT OF SOCIOLOGY**
**LATE.VASANTRAO KOLHATKAR ARTS COLLEGE,ROHANA**
**TAH.ARVI DIST.WARDHA(M.S.)**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या NEP च्या नव्या अभ्यासक्रमानुसार

# 1st To 6th SEMESTER-MAJOR-1,2,3,4

## 1ST SEMESTER समाजशास्त्रीय संकल्पनांचा परिचय

## INTRODUCTION OF SOCIOLOGICAL CONCEPTS

## 2ND SEMESTER सामाजिक प्रक्रियांचा परिचय

## INTRODUCTION OF SOCIAL PROCESSES

## 3RD SEMESTER समाजशास्त्रीय विचारांचे अधिष्ठान

## FOUNDATION OF SOCIOLOGICAL THOUGHT

## 4TH SEMESTER भारतातील समाजशास्त्रीय परंपरा

## INDIAN SOCIOLOGICAL TRADITION

## 5TH SEMESTER भारतीय समाज संरचनात्मक आव्हाने

## INDIAN SOCIETY:THE STRUCTURAL ISSUES

## 6TH SEMESTER भारतातील सद्यकालीन सामाजिक समस्या

## CURRENT SOCIAL PROBLEMS IN INDIA

## STUDY MATERIAL

## MODULE FOR SOCIOLOGY STUDENTS

CREAT FROM STUDENTS AND FOR STUDENTS

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २०२१ च्या नव्या अभ्यासक्रमानुसार

## B.A.FIREST YEAR -1st SEMESTER Major-1

# समाजशास्त्रीय संकल्पनांचा परिचय

# INTRODUCTION Of SOCIOLOGICAL CONCEPTS






*SOCIOLOGY AS A SCIENCE

*RELATIONSHIP WITH OTHER SOCIAL SCIENCE *GROUPS

*DEVELOPMENT OF HUMAN SOCIETIES

*SOCIALIZATION

AUTHOR -DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR
DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE. VASANTRAO KOLHATKAR ART'S COLLEGE, ROHANA
TAH.ARVI DIST.WARDHA (M.S.)

**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur**
**B.A.First Year:Semester-I**
**Sociology: Introduction of Sociological Concepts**

1. **Understanding Sociology:**

A) Sociology:Its meaning,definition and characteristics as a science.

B) Relationship of Sociology with other social sciences:Anthropology,History,Political Science and Economics.

2) **Basic Concepts in Sociology:**

A) Groups,reference groups,association,institution,community and society.

B) Development of human societies:Pre-modern societies (hunting and gathering societies Pastoral and agrarian societies.) Modern industrial Society: Its characteristics-industrialism, Capitalism,urbanism,liberal democracy.

C) Society and Individual:A mutual relationship.

3) **Socialization:**

A) Meaning,processes and importance of socialization.

B) Agencies of socialization:Family,education,religion,peer group and mass media.

C) Mead's concepts of 'I' ,'Me' and Socialization.

4) **Social structure:**

A) Elements of social structure.

B) Functions and dysfunctions of social Structure.

C) Socio-cultural processes:Cooperation,conflict,accommodation,assimilation and competition.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## बी.ए. भाग १ सेमीस्टर प्रथम

# समाजशास्त्र परिचय

==================================================

**प्रश्न क्र. १ :- समाजशास्त्राच्या व्याख्या लिहून एक विज्ञान म्हणून समाजशास्त्राची वैशिष्टये लिहा?**

उत्तर :- समाजशास्त्र हे इंग्रजी भाषेतील Sociology या शब्दाचे मराठी भाषांतर होय. लॅटिन भाषेतील 'Socius' आणि ग्रीक भाषेतील 'Logos' चा दोन शब्दामधून डेलळेश्रेसू हा शब्द निर्माण झाला आहे. सोशियस या शब्दाचा मुळ अर्थ सोबती अथवा सवंगडी असा आहे. लोगस या शब्दामुळ अर्थ शब्द विचार संवाद असा असला तरीही कालांतराने कोणत्याही शास्त्राच्या नावातील शेवटच्या भागात प्रत्यक्ष म्हणून त्याचा वापर करण्याचा प्रघात सुरु केला. आज समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र असा सोशिऑलॉजी या शब्दाचा अर्थ रुढ झाला. 'समाजशास्त्र' ही संज्ञा सर्वप्रथम 'प्रत्यक्षानुसारी तत्वज्ञान' (Positive Philosophy) या ग्रंथात 'ऑगस्ट कॉम्त' या फ्रेंच विचारवंताने उपयोगात आणली म्हणून कॉम्त हेच समाजशास्त्राचे जनक आहेत असे म्हटले जाते.

**व्याख्या :-**

**१. मॅक आयव्हर व पेज यांच्या मते :-**

''समाजशास्त्र हे सामाजिक संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.'' शिक्षक, विद्यार्थी, मालक नोकर, बहीण, दुकानदार, ग्राहक, पती -पत्नी ही सर्व सामाजिक संबंधाची उदाहरणे आहेत. म्हणून सामाजिक संबंध हाच समाजशास्त्रीय अभ्यासाचा केंद्रबिंदू असल्याचे मॅक आयव्हरने म्हटले आहे.

**२. फेअर चाईल्ड यांच्या मते :-**

''मानव व मानवनिर्मित वातावरण यांच्यामधील संबंधाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.''

**३. गिन्सबर्ग यांच्या मते :-**

''व्यक्तींमधील आंतरक्रियांचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.''

**४. हॅरि जॉन्सन यांच्या मते :-**

''सामाजिक समूहामधील परस्परसंबंधाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता व्यक्ती-व्यक्तीमधील परस्परसंबंधाचे वैज्ञज्ञनिक पध्दतीने अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.

**एक विज्ञान किंवा शास्त्र म्हणून समाजशास्त्राची वैशिष्टये**

२० व्या शतकात जसजसा समाजशास्त्राचा विकास झाला तसतसे समाजशास्त्र हे एक विज्ञान वा शास्त्र आहे याबाबत अभ्यासकांमधील मतभिन्नता संपुष्टात आली.

**१. सामाजिक शास्त्र :-**

समाजशास्त्र हे सामाजिक शास्त्र असल्यामुळे समाजशास्त्राचे अभ्यासविषय भिन्न आहे. समाजशास्त्रात समाजातील संबंधाचे अध्ययन केले जाते म्हणून समाजशास्त्र नैसर्गिक किंवा भौतिकशास्त्र नाही.

**२. अनुभवप्रामाण्यवादी शास्त्र :-**

सामाजिक संबंध किंवा घटनांचे तात्विक स्वरुपाचे किंवा कल्पनांवर आधारीत असणारे विवेचन समाजशास्त्रात केले जात नाही. मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण याद्वारे प्राप्त माहिती बुध्दीच्या कसोटीवर तपासून पाहिल्यानंतर जे प्रमाणित होते ते अनुभवसिध्द मानल्या जाते.

**३. सैध्दांतिक शास्त्र :-**

समाजशास्त्र हे सामाजिक संबंध, समूह, समस्या आदींचे केवळ वर्णन करणारे शास्त्र नाही तर समाजशास्त्रात सामाजिक समस्यांबाबत केवळ शास्त्रीय किंवा सैध्दांतिक स्वरुपाची चर्चा केली जाते म्हणून समाजशास्त्र हे शुध्द सैध्दांतिक शास्त्र आहे.

**४. संचयी स्वरुपाचे शास्त्र :-**

सगळी शास्त्रे वा विज्ञाने ही संचयी स्वरुपाची आहेत कारण शास्त्रात 'सत्य' काय आहे हे शोधून काढण्याची प्रक्रिया अखंडपणे सुरु असते. त्यामुळे शास्त्रामध्ये नवीन माहितीची, सिध्दांताची व संकल्पनांची भर पडत असते. कालविसंगत झालेल्या सिध्दांताची पूनर्मांडणी केली जाते. समाजशास्त्रात संघटित ज्ञानाचा संचय वाढत असल्यामुळे ते संचयी स्वरुपाचे शास्त्र आहे.

**५. नैतिक दृष्टया तटस्थ शास्त्र :-**

कोणत्याही विषयाचे अध्ययन करतांना त्या शास्त्राच्या अभ्यासकाची भूमिका तटस्थ असते म्हणजेच अध्ययन करतांना चांगले, वाईट, प्रेम, आपूलकी, जिव्हाळा, राग, द्वेष यासारख्या भावनांच्या आहारी न जाता जात, वैश्यावृत्ती, आत्महत्या या समस्यांचे अध्ययन नैतिकदृष्टया तटस्थ पध्दतीने केले जाते.

**६. वर्णनात्मक शास्त्र :-**

समाजशास्त्रात सामाजिक समूह, संस्था, सामाजिक संबंध इत्यादी अभ्यासविषयाशी संबंधित बाबींचे विश्लेषणात्मक वर्णन केले जाते.

**७. अमूर्त शास्त्र :-**

आई-मुलगा, मालक-नोकर, शिक्षक-विद्यार्थी यासारख्या सामाजिक संबंधाचे स्वरुप निरीक्षणाच्या सहाय्याने व बुध्दीद्वारे समजून घ्यावे लागते म्हणून समाजशास्त्र अमूर्त स्वरुपाचा अभ्यासविषय असणारे शास्त्र ठरते.

**८. व्यावहारिक किंवा उपयोजित शास्त्र :-**

गुन्हेगारी, बेकारी, कुटुंब विघटन, पती-पत्नी मधील ताण-तणाव यासारख्या अनेक समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी समाजशास्त्रातील संघटित ज्ञानाचा उपयोग होत असल्यामुळे समाजशास्त्र हे उपयोजित शास्त्र आहे.

**९. मानवतावादी अभिमुखता असणारे शास्त्र :-**

मानवतावाद ही एक विचारप्रणाली किंवा विचारसरणी आहे. जात, धर्म, वंश, घराणे या आधारावर व्यक्तीचे मूल्यमापन न करता एक मानव म्हणून त्याचा विचार करणे म्हणजे मानवतावाद होय. अशा प्रकारे समाजशास्त्राची वैशिष्टये आहेत.

**प्रश्न क्र. २ :- समाजशास्त्राचा अन्य सामाजिक शास्त्राशी संबंध स्पष्ट करा.**

उत्तर :- सर्व सामाजिक शास्त्रांमध्ये मानवी जीवनाचा अभ्यास केला जातो. अर्थशास्त्रात मानवाचा आर्थिक दृष्टिकोनातून, राज्यशास्त्रात राजकीय, मानसशास्त्रात मानसिक, इतिहासात ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास के जातो. हे अध्ययन करतांना प्रत्येक शास्त्राचा अन्य शास्त्राशी जवळीकतेचा

संबंध येतो म्हणून समाजशास्त्राचा अभ्यास करतांना इतर शास्त्राशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**१. समाजशास्त्र व मानवशास्त्र :-**

व्यक्ती-व्यक्ती मधील परस्पर संबंधाचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय. तर शारीरिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया मानवाचा उदय आणि विकास यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय. त्यामुळे मानवशास्त्राच्या शारीरिक मानवशास्त्र, पूरातत्वशास्त्र, मनुष्यजाती विज्ञान, सांस्कृतिक मानवशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र इत्यादी शाखा निर्माण झाल्या आहेत. सामाजिक मानवशास्त्र व समाजशास्त्र या दोन्ही शास्त्रांचा संबंध मानवी समाजाच्या अभ्यासाशी निगडीत असल्यामुळे हि दोन्ही शास्त्र आपल्या जवळील ज्ञानाची देवाणघेवाण करीत असतात. आदिवासी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास मानवशास्त्रात केला जातो तर सामाजिक मानवशास्त्राची ही समाजाशास्त्र एक शाखा आहे. याच कारणामुळे या दोन्ही शास्त्राचा अभ्यास विषय समान स्वरुपाचा आहे असे म्हटल्या जाते. त्यामुळे ही दोन्ही शास्त्रे परस्परांना प्रभावित करतात. अभ्यासविषय, अभ्यासपध्दती, दृष्टिकोन याबाबतीत भिन्नता असल्यामुळे ही दोन्ही शास्त्रे स्वतंत्र आहेत हे देखील स्पष्ट होते.

**२. समाजशास्त्र व इतिहास :-**

भुतकाळात घडून गेलेल्या घटनांचे निश्चित अशा कालानुक्रमे अध्ययन इतिहासात केले जाते. घडलेलया घटनांची कारणमीमांसा करुन त्या आधारे भविष्यकाळात काय घडण्याची शक्यता आहे यासंबंधीचे भाकितही इतिहासाचा तज्ञ अभ्यासक करतो. आधुनिक काळात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बाबींच्या इतिहासाचेही महत्व वाढले आहे. परंतु सिध्दांताची निर्मिती व मांडणी करण्यावर इतिहासात विशेष भर दिला जात नाही. समाजशास्त्रात मात्र समाजजीवनासंबंधी सर्वसामान्य नियम वा सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न केला जातो. गतकालीन सामाजिक जीवनासंबंधीची माहिती समाजशास्त्राला इतिहासाकडून मिळते तर सामाजिक जीवन संस्था दिी संबंधीची माहिती इतिहासाला समाजशास्त्राकडून मिळते असे असले तरी इतिहासात मुर्त घटनांचे तर समाजशास्त्रात अमुर्त बाबींचे अध्ययन केले जाते. म्हणूनच समाजशास्त्र हे वर्तमानकालीन इतिहास आहे तर इतिहास हे भूतकालीन समाजशास्त्र आहे.

**३. समाजशास्त्र व राज्यशास्त्र :-**

राज्य आणि शासनसंस्था यांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला राज्यशास्त्र असे म्हणतात, राज्याचे मूर्त रुप असणाऱ्या शासनसंस्थेच्या आज्ञा व कायदे यांचे पालन सर्व नागरिकांना करावेच लागते. त्याचबरोबर कुटुंब, धर्म, समुदाय यांच्या आज्ञांचे पालन नागरिक करीत असतात असे राज्यशास्त्रात अलीकडे मांडले जाऊ लागले आहे. राजकीय चळवळी शासनसंस्थेला निर्णय बदलविण्यास भाग पाडतात हे वास्तव मान्य झाले आहे. बालविवाह, सतीप्रथा, घटस्फोट, संपत्ती,

अधिकार अशा कायद्यांचा स्त्रियांच्या जीवनावर व्यापक परिणाम होतो. याचा अर्थ सामाजिक बाबी कायद्याला प्रभावित करतात. त्याप्रमाणे कायदे देखील
बदल घडवितात म्हणून ही दोन्ही शास्त्रे एकमेकांना पूरक असे आहेत. राजकीय संस्कृती, सामाजिकरण, सहभाग, परिवर्तन, अतिसत्ता या संकल्पना राज्यशास्त्रात निर्माण झाल्या आहेत. असे असले तरी समाजशास्त्राचा अभ्यासविषय राज्यशास्त्रापेक्षा व्यापक आहे.

४. **समाजशास्त्र व अर्थशास्त्र :-**

मानवाच्या आर्थिक प्रयत्नांचा, वर्तनाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला अर्थशास्त्र असे म्हणतात. आर्थिक घडामोडींचा समाजजीवनावर परिणाम होतो. दारिद्र्याच्या स्थितीचे अध्ययन सामाजिक व आर्थिक दोन्ही दृष्टीने महत्वपूर्ण आहे. भांडवलशाही की समाजवादी अशा अर्थव्यवस्थेची ओळख करुन घेतल्याशिवाय समाजाचे अध्ययन पूर्ण होऊ शकत नाही. समाजशास्त्रात मानवाच्या परस्परसंबंधाचा सविस्तर अभ्यास केला जातो. सामाजिक विचार, मूल्ये यांचा आर्थिक क्षेत्रावर परिणाम होतो. प्रामुख्याने अविकसित आणि विकसनशील देशांमधील आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात सामाजिक बाबी महत्वाच्या असतात हे आज सर्वत्र मान्य केले जात आहे. याचा अर्थ आर्थिक नियोजन निर्धारित करतांना अर्थतज्ज्ञांना आर्थिक जीवनाच्या सामाजिक बाजूकडे दुर्लक्ष करता येत नाही. थोडक्यात आर्थिक बार्बीची माहिती समाजशास्त्राला अर्थशास्त्राकडून प्राप्त होते तर सामाजिक बाबींची माहिती अर्थशास्त्राला समाजशास्त्राकडून प्राप्त होते. अशाप्रकारे सर्व सामाजिक शास्त्रे ही एकमेकांना प्रभावित करतात.

## युनिट क्र. २ समाजशास्त्रातील मूलभुत संकल्पना
## (इरीळल उेपलशर्ष्ीं ळप डेलळेश्रेसू)

**प्रश्न क्र. १ :- समूहाच्या व्याख्या लिहून समूहाची वैशिष्टये लिहा?**

उत्तर :- समूह अथवा गट करुन राहणे हा मानवी स्वभाव आहे. एकमेकांच्या समीप असणाऱ्या वस्तूंचा समुह होतो. परंतू दोन किंवा जास्त व्यक्ती बसस्थानक व रेल्वे स्टेशनवर उभ्या आहेत म्हणून त्या व्यक्तींचा गट निर्माण झाला आहे असे म्हणता येत नाही कारण त्यांच्यात स्थायी स्वरुपाचे सामाजिक संबंध प्रस्थापित होत नाहीत. सामाजिक संबंध हाच गटाचा आत्मा आहे. व्यक्तींमध्ये आंतरक्रिया झाल्याशिवाय सामाजिक गट निर्माण होऊ शकत नाही हे स्पष्ट होते.

**व्याख्या :-**

१. मॅक आयव्हर व पेज यांच्या मते :-

''परस्परांशी सामाजिक संबंधांनी बध्द झालेल्या व्यक्तींच्या कोणत्याही समुदायाला सामाजिक गट असे म्हणतात.''

२. जॉन क्यूबसचा मते :-

''समूह म्हणजे पारस्परिक आदान-प्रदान करणाऱ्या व्यक्तींचा समुच्चय होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता समूह बनण्यासाठी किमान दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती आवश्यक असतात. त्यांच्यात आंतरक्रिया व्हाव्या लागतात. यावरुन समान उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी एकत्रित येवून समाज कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सामाजिक गट बनतो असे म्हणता येईल.

**समूहाची किंवा गटाची वैशिष्टये**

**१. समान उद्दिष्ट :-**

नाटकाची आवड असणाऱ्या व्यक्ती समान हेतूने नाटयमंडळ स्थापन करतात आणि त्याची पूर्तता झाली की त्या गटाचे अस्तित्व संपते. उदा. महिला मंडळ, गणेशोत्सव मंडळ, शहरी मंडळ इत्यादी.

**२. गटाचे स्वतंत्र अस्तित्व :-**

प्रत्येक सामाजिक गटाचे अस्तित्व स्वतंत्र असते. आपला गट निर्माण झाला आहे याची जाणीव गटातील सभासदांना असते. उदा. बी.ए. भाग १, २, ३, गटातील विद्यार्थी

**३. सामाजिक गटांची संरचना :-**

कुटुंब या गटात आई, वडील, बहिण, भाऊ तर महाविद्यालय या गटात प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी ही स्थाने आहेत. याचा अर्थ प्रत्येक सामाजिक गटाची संरचना स्वतंत्र असते.

**४. गटातील सभासदांची भूमिका :-**

भूमिका याचा अर्थ गटातील स्थानाशी संबंधित असणाऱ्या जबाबदाऱ्या व कार्य पूर्ण करणे होय. उदा. कुटुंब या गटातील वडील या स्थानाशी संबंधित असणाऱ्या सभासदाला अर्थार्जन करणे व कुटुंबाच्या कल्याणासाठी निर्णय घेणे ही भूमिका घ्यावी लागते.

**५. गटाची प्रमाणके :-**

पिता-पुत्र, माता-पुत्र, बहीण-भाऊ यांच्यामधील परस्परसंबंधाबाबत रुढी, प्रथा निर्माण झाल्या आहेत. या स्वरुपातील मापदंडांना प्रमाणके असे म्हणतात.

**प्रश्न क्र.२ :- प्राथमिक गटाच्या व्याख्या लिहून त्यांची वैशिष्टये व महत्व लिहा.**

उत्तर :- प्रा.सी.एच. कुले यांनी त्यांच्या १९०९ मध्ये प्रकाशित झालेल्या ''सामाजिक व संघटन' या पुस्तकात प्राथमिक समुहाच्या आवश्यक म्हणजे भौतिक सानिध्य, मर्यादित संख्या व संबंधाचे सातत्य हया आहेत.

**व्याख्या :-**

१. चार्ल्स कुले यांच्या मते :-

''ज्या गटातील सभासदांचे परस्परसंबंध समोरासमोरचे व घनिष्ट असतात ते गट प्राथमिक गट होत. व्यक्तीचे वर्णन व व्यक्तीजीवनाचे आदर्श निर्माण करण्यात हे गट आधारभूत असतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता प्राथमिक गटातील सभासदांत आम्हीची भावना असते. त्यांचे परस्परसंबंध अनौपचारिक व भावनामुक्त असतात.

**प्राथमिक गटाची वैशिष्टये :-**

**१. उत्स्फूर्त संबंध :-**

हे संबंध व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असतात. आई वडिलांशी संबंध तोडून टाकणे हे आपल्या स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असते. प्राथमिक संबंधामध्ये सहजता किंवा अकृत्रिमता असते म्हणूनच प्राथमिक गट हेतुपूर्वक निर्माण केलेले नसतात.

**२. सर्वसमावेशक स्वरुपाचे संबंध :-**

आपल्या मुलाने कोणते शिक्षण घ्यावे? कोणता व्यवसाय करावा? यासारख्या प्रश्नामध्ये आई-वडिलांना आस्था असते. प्राथमिक संबंध हे निमित्तमात्र व मर्यादित नसतात.

**३. सभासदाचे गटातील स्थान :-**

कुटुंबात आई वडिलांच्या मृत्युमुळे निर्माण झालेली पोकळी कोणीच भरुन काढू शकत नाही. याचा अर्थ गटातील संबंधी व्यक्तीची उणीव भरुन काढणे शक्य नसते.

**४. व्यक्तिगत संबंध :-**

आईची स्वतःच्या मुलांसाठी कोणतीही गोष्ट करण्याची तयारी असते. प्राथमिक गटाचे सदस्य परस्परांसाठी काही गोष्टींचा त्याग करावयास तयार असतात कारण त्यांचे संबंध अवैयक्तिक नसून व्यक्तीगत स्वरुपाचे असतात.

**५. उद्दिष्टांमधील अभिन्नता :-**

कुटुंबात आपल्या मुलाने १२ वीत चांगल्या गुणाने पास व्हावे याकरिता सर्व कुटुंब प्रयत्न करीत असते. त्याकरिता त्यांच्यात आम्हीची भावना निर्माण झाल्यामुळे हे सर्व सदस्य कुटुंबाच्या हेतू पूर्तीसाठी प्रयत्न करतात.

**६. अनौपचारीक स्वरुपाचे नियंत्रण :-**

या गटातील सभासदांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदे, नियम इत्यादी मुद्दाम निर्माण केलेल्या औपचारीक नियंत्रणाची गरज नसते.

**७. प्राथमिक संबंध साधनस्वरुप असतात :-**

दुकानदार-ग्राहक हे साधनस्वरुप संबंध असल्यामुळे गरज संपली की हे संबंध संपतात. या उलट प्राथमिक गटातील संबंध कधीच संपत नाहीत. कारण ते संबंध स्वार्थाने निर्माण झालेले नसल्यामुळे ते साध्यस्वरुप असतात.

## प्राथमिक गटाचे महत्व

**१. व्यक्तिमत्वाची जडणघडण :-**

बालकांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करण्यामध्ये कुटुंबाचा वाटा महत्त्वपुर्ण असते. भाषा, रितीरिवाज, आदर्श, संस्कृती इत्यादीद्वारे व्यक्तिमत्वाची जडणघडण करण्यामध्ये कुटुंबाच्या वाटा महत्वपूर्ण असतात.

**२. मानसिक सुरक्षितता :-**

आपल्या घरात आपण सुरक्षित आहोत अशी भावना कुटुंब, मित्रमंडळ, शेजारी असते. कोणाच्याही मनात भयाची भावना नसल्यामुळे मानसिक सुरक्षितता प्राप्त होते.

**३. प्राथमिक शाळा :-**

भावी आयुष्यात आपल्याला कोणती भूमिका करावयाची आहे. व्यक्तीला समाजात कसे वागावे याचे धडे देणारी शाळा म्हणजे प्राथमिक समूह होय. सहकार्य, प्रेम, सहानुभूती, तडजोड या सर्वांची ओळख बालकाला प्राथमिक गटातच होते.

**४. सामाजिक नियंत्रण :-**

कुटुंब, शेजारी, मित्रमंडळ यासारख्या प्राथमिक गटातील सदस्यांना परस्परांबद्दल प्रेम, आपुलकी, जिव्हाळा वाटत असतो. आई, वडील यांच्याप्रमाणेच शेजारी म्हणून राहणारे काका वा काकू आपल्याला काय म्हणतील? अशी भिती मुलाच्या मनात वाईट वर्तन करताना असल्यामुळे अनौपचारिक पध्दतीने नियंत्रण घडून येते.

**प्रश्न क्र. ३ :- दुय्यम गटाची वैशिष्टये लिहून प्राथमिक आणि दुय्यम समूहातील फरक स्पष्ट करा?**

उत्तर :- ज्या गटातील सभासदांचे परस्पर संबंध समोरासमोरचे किंवा प्राथमिक स्वरुपाचे नाहीत असे गट म्हणजे दुय्यम गट होत. शाळा, महाविद्यालये, श्रमिक संघटना, मोठया आकाराचे शहर, राजकीय पक्ष ही दुय्यम गटाची उदाहरणे आहेत.

## दुय्यम गटाची वैशिष्टये

**१. हेतुपूर्वक निर्मिती :-**

रिकामा वेळ कसा घालवायचा उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी महिला भजन मंडळ किंवा क्लब यासारख्या दुय्यम गटाची निर्मिती केली जाते. उदा. शेतकरी संघटना, नाटयमंडळ, रोटरी क्लब, ग्राहक संघ, विद्यार्थी मंडळ इत्यादी.

**२. विशाल आकार :-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद मध्ये सर्व विद्यार्थ्यांचा समावेश होतो पण ते एकमेकांना ओळखत देखील नाहीत कारण त्यांचा आकार विशाल स्वरुपाचा असतो.

**३. मर्यादित परस्पर संबंध :-**

कामगार संघटनेच्या सदस्याची मुले कोणते शिक्षण घेणार? कोणाशी विवाह करणार या प्रश्नामध्ये अन्य सभासदांना रस नसतो. वेतन, कामाची स्थिती, मालक-मजूर संबंध या गोष्टीपूरतेच सभासदांचे परस्परसंबंध मर्यादित असतात.

**४. साधन स्वरुपाचे परस्परसंबंध :-**

आपल्या हेतूची पूर्तता दुय्यम गटात होत नसेल तर व्यक्ती या गटाचे सभासदत्व सोडून देतात. हया गटातील सभासदांचे परस्परसंबंध औपचारीक व व्यवहारी स्वरुपाचे असतात.

**५. औपचारिक स्वरुपाचे संबंध :-**

महाविद्यालय या दुय्यम गटात प्राचार्य सेवानिवृत्त होतात, त्याची जागा दुसरी व्यक्ती घेते. या गटात प्रेम, जिव्हाळा, आत्मीयता नसल्यामुळे कामापूरता मामा याप्रमाणे रिक्त स्थानाची उणीव दुसऱ्या सदस्याला भरुन काढता येते.

**६. मर्यादित कर्तव्यभावना व हेतूची विविधता :-**

दुय्यम गटातील सभासदांचे परस्परसंबंध मर्यादित स्वरुपाचे असतात. विद्यार्थी संघटनेमध्ये येणारे विद्यार्थी, नेता, प्रसिध्दी, राजकीय पक्ष यासारख्या विविध हेतूंनी सभासद होत असतात. त्यामुळे प्रत्येकाचा स्वार्थ वेगवेगळा असू शकतो.

**७. औपचारिक नियंत्रण :-**

दुय्यम गटातील सभासदांचे परस्परसंबंध मर्यादित, कृत्रिम, औपचारिक व व्यक्तीगत स्वरुपाचे असल्याने सभासदांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुद्दाम तयार केलेले नियम, कायदे इत्यादी औपचारिक साधनांचा उपयोग केला जातो.

## दुय्यम गटाचे महत्व

१) व्यक्तीमत्वाची जडणघडण २) विविध गरजांची पूर्ती ३) सामाजिक नियंत्रण ४) सामाजिक परिवर्तनास सहाय्यक

# प्राथमिक आणि दुय्यम समूहातील फरक

आधुनिक समाजात व्यक्ती व समाज या दोहांच्या दृष्टीने प्राथमिक व दुय्यम समूह महत्वपूर्ण आहेत.

**१. अर्थ :-**

कुटुंब, मित्रसमूह व शेजारी ही प्राथमिक समूहाची उदाहरणे असून सदस्यांचे संबंध प्रत्यक्ष स्वरुपाचे असतात. त्यामुळे त्यांच्यात आत्मीयता निर्माण होते. राजकीय पक्ष, रोटरी क्लब, शेतकरी संघटना ही दुय्यम समूहाची उदाहरणे असून सदस्यांचे संबंध प्रत्यक्ष स्वरुपाचे नसतात त्यामुळे त्यांच्यात आत्मीयता निर्माण होत नाही.

**२. आकार :-**

प्राथमिक समूहाची सदस्यसंख्या जास्तीत जास्त वीस-पंचवीस पर्यंत मर्यादित असते. याउलट दुय्यम समूहाची सदस्यसंख्या शेकडो, हजारो किंवा लाखांमध्ये असू शकते.

**३. निर्मिती :-**

प्राथमिक संबंध हे उत्स्फूर्तपणे निर्माण होतात. याउलट दुय्यम समूहातील संबंध हे मुद्दाम व जाणीवपूर्वक निर्माण केले जातात.

**४. संबंध :-**

प्राथमिक गटातील सदस्यांचे परस्पर संबंध सर्वसमावेशक स्वरुपाचे असतात. याउलट दुय्यम गटातील सदस्यांचे परस्परसंबंध हे मर्यादित स्वरुपाचे असतात.

**५. सदस्याचे स्थान :-**

प्राथमिक गटातील सदस्याचा मृत्यू किंवा अन्य कारणामुळे स्थान रिक्त झाल्यास अन्य कोणताही सदस्य ते स्थान भरुन काढू शकत नाही. तर दुय्यम गटात स्थान रिक्त झाले की त्याची जागा अन्य सदस्य घेतो.

**६. कर्तव्यभावना :-**

प्राथमिक गटातील सदस्य एकमेकांकरिता त्याग करावयास तयार असतात त्यामुळे त्यांच्या कर्तव्याला मर्यादा नसते. यउलट दुय्यम गटातील सदस्यांचे कर्तव्य मर्यादित असते.

**७. व्यक्तिगत व अव्यक्तिगत संबंध :-**

प्राथमिक गटातील संबंध व्यक्तिगत स्वरुपाचे असतात. याउलट दुय्यम गटातील संबंध गरजेपूरते म्हणजेच अव्यक्तिगत स्वरुपाचे असतात.

**८. साध्य-साधन स्वरुपाचे संबंध :-**

एकमेकांच्या साध्याकरिता कुटुंबातील सदस्यांचे संबंध असतात. याउलट दुय्यम गटातील संबंध गरजेपूरते किंवा साधन स्वरुपाचे असतात.

**९. गटाच्या सदस्यत्वाचे स्वरुप :-**

प्राथमिक गटातील सदस्य आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग या दृष्टिने त्याकडे पाहतो तर दुय्यम गटाचे सदस्यत्व ऐच्छिक स्वरुपाचे असून गरजा पूर्ती होत नसेल तर सदस्यत्वाचा त्याग करतो.

**१०. नियंत्रणाचे स्वरुप :-**

प्राथमिक गटातील सदस्य परस्परांच्या वागण्याचे सहजपणे नियंत्रण करतात. यासाठी ते वेळप्रसंगी अबोला, राग, व्यक्तिगत जिव्हाळा, प्रेम यासारख्या साधनांचा उपयोग करतात. याउलट दुय्यम गआत सदस्यांचे वर्तन नियंत्रीत करण्यासाठी नियम, कायदे, कोर्ट, पोलीस यासारख्या साधनांचा उपयोग केल्या जातो.

आधुनिक काळात दुय्यम गट देखील आपल्या सदस्यांमध्ये सहकार्याची व आपूलकीची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. म्हणून व्यक्ती व समाज या दोहोंच्याही दृष्टीने दुय्यम गटाला महत्व प्राप्त झाले आहे.

**प्रश्न क्र ४ :- संदर्भ समूह संकल्पनेच्या व्याख्या लिहून त्याचे प्रकार व महत्व स्पष्ट करा?**

उत्तर :- संदर्भ समूहाची संकल्पना सर्वप्रथम एच.एच.हाईमेन यांनी १९४२ मध्ये मांडली. त्यांच्या मते व्यक्ती इतरांच्या वर्तनाला आधारभूत मानून त्याचे अनुकरण करतात. म्हणजे व्यक्ती आपल्या वर्तनाकरिता दुसऱ्यांच्या वर्तनाचा आधार किंवा संदर्भ घेतात. 'अमेरिकन सोल्जर' या ग्रंथात मर्टनने संदर्भ समूहाची संकल्पना सविस्तरपणे मांडल्यामुळे या संकल्पनेच्या विकासाचे श्रेय रॉबर्ट मर्टनला दिले जाते.

**व्याख्या :-**

**१. मर्टनच्या मते :-**

''संदर्भ समूह म्हणजे असे समूह की ज्याला व्यक्ती किंवा गट आपल्या स्वतःच्या मूल्यांकनाचे आधार मानतात.''

**२. वॉलेसच्या मते :-**

''एखादी व्यक्ती स्वतःचे मूल्यांकन करण्यासाठी ज्या समूहाचा संदर्भ घेते त्यास संदर्भ समूह असे म्हणतात.

वरील व्याख्या लक्षात घेता व्यक्ती ज्या समूहाचा सदस्य असते त्या समूहास ती आपला समूह मानून सक्रिय सहभाग घेते. अशा समूहाला सदस्यता समूह असे म्हणतात. परंतू व्यक्ती दुसऱ्या कोणत्या तरी समूहाशी आपला संबंध काल्पनिक स्तरांवर प्रस्थापित करते व त्यानुसार वर्तन करण्याचा प्रयत्न करते. अशा समूहाला संदर्भ समूह असे म्हणतात.

संदर्भ समूहाचे प्रकार

**१. सकारात्मक आणि नकारात्मक संदर्भ समूह :-**

मर्टनच्या मते ज्या समूहाच्या मूल्यांचा आपल्या वर्तनाचे मूल्यमापन करण्यासाठी मानदंड म्हणून वापर केला जातो त्याला सकारात्मक संदर्भ समूह असे म्हणतात. याउलट एखादी व्यक्ती कशाचा विरोध करावा म्हणून समूहाचा वापर करते त्याला नकारात्मक संदर्भ समूह असे म्हणतात.

**२. आकांक्षित संदर्भ समूह :-**

ज्या समूहाचा सदस्य म्हणून आपल्याला मान्यता मिळावी अशी व्यक्तीची इच्छा असते त्याला आकांक्षित संदर्भ समूह असे म्हणतात. आकांक्षित संदर्भ समूह हा वास्तव किंवा कल्पित अशा दोन्ही प्रकारचा असू शकतो.

**३. बहूल संदर्भ समूह :-**

कधी कधी व्यक्तीच्या समोर संदर्भासाठी कोणत्या समूहाची निवड करावी असा प्रश्न निर्माण होतो तेव्हा त्याला परस्पर विरोधी संदर्भ समूह म्हणतात. तर जो संदर्भ समूह व्यक्तीच्या जीवनात निरंतरपणे कार्यरत असतो त्याला निरंतर संपर्क साधणारा संदर्भ समूह असे म्हणतात.

## संदर्भ समूह संकल्पनेचे महत्व

भारतीय समाजशास्त्रज्ञ एम.एन. श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना मांडतांना संदर्भ समूहाची भारतातील उदाहरणे नमूद केली. मांसाहार टाळणे म्हणजे शाकाहारी होणे, दारु न पिणे, तुळशीची माळ गळयात घालणे तसेच उच्च मानल्या जाणाऱ्या जातींच्या वर्तन व्यवहारांचे अनुकरण कनिष्ठ जातीने करणे यालाच संदर्भ समूह म्हणतात. एखाद्या व्यक्तीचे संदर्भ समूह कोणते? याची कल्पना आली की तिच्या वर्तनाची योग्य मीमांसा करणे सोपे होते. थोडक्यात समूहांच्या मूल्याचे आत्मसातीकरण करुन स्वतःच्या वर्तनात बदल घडून आणतात. व्यक्तीच्या वर्तनातील असे बदल समजून घेण्यासाठी संदर्भ समूह ही संकल्पना उपयुक्त ठरते.

**प्रश्न क्र. ५ :- समिती किंवा मंडळाच्या व्याख्या लिहून समितीची वैशिष्टये व आवश्यक तत्वे लिहा?**

उत्तर :- शहरी समुदायात मध्यम वर्गात मोडणाऱ्या काही कुटुंबातील महिलांसमोर दुपारी रिकामा असणारा वेळ कसा घालवावा? ही समस्या असते. अशाप्रकारचे समान उद्दिष्ट असणाऱ्या काही महिला एकत्र येतात. विचारनियमानंतर त्यांचे 'भजनी मंडळ' किंवा 'महिला मंडळ' निर्माण होते.

**व्याख्या :-**

**१. मॅक आयव्हर व पेज यांच्या मते :-**

''एक किंवा त्यापेक्षा अधिक सामायिक हेतूंच्या पूर्ततेसाठी संघटित असलेला व्यक्तींचा गट म्हणजे समिती होय.''

**२. गिन्सबर्ग यांच्या मते :-**

''एका निश्चित उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी काही व्यक्ती एकत्र येऊन जी संघटना बनवितात, तिला समिती असे म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता समिती हा समान उद्देशाने प्रेरित झालेल्या व्यक्तींचा समूह आहे. संगीत, नाटय, क्रिडा यासारख्या एका विशिष्ट क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व संघटना म्हणजे समिती होय.

## समितीची वैशिष्टये

**१. निश्चित उद्देश :-**

प्रत्येक समिती विशिष्ट हेतू पूर्ण करण्यासाठी निर्माण करण्यात येते व त्याकरिताच व्यक्ती समितीची सदस्य होते.

**२. ऐच्छिक सभासदत्व :-**

एखाद्या समितीचे सभासदत्व स्वीकारणे अथवा नाकारणे हे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असते.

**३. अस्थायी स्वरुप :-**

ज्या उद्देशाने समिती निर्माण करण्यात येते तो उद्देश पूर्ण झाला की समितीचे अस्तित्व संपुष्टात येते. काही समित्या दिर्घकाळ अस्तित्वात राहतात.

**४. औपचारिक संघटना :-**

समिती हा संघटित व औपचारिक स्वरुपाचा गट आहे. संघटनेचा अध्यक्ष, सचिव, प्रमुख व सदस्य यासंबंधीचे नियम निश्चित स्वरुपात ठरलेले असतात. नियमांच्या आधारे समिती नियंत्रित असल्यामुळे मंडळातील सदस्यांचे संबंध औपचारिक असतात.

**५. स्वतंत्र नाव व प्रतीके :-**

प्रत्येक समितीचे स्वतंत्र नाव असते. उदा. काँग्रेस, भा.ज.पा. पक्ष इत्यादीप्रमाणे स्वतंत्र प्रतीक असते.

## समिती किंवा मंडळाची आवश्यक तत्वे

१. व्यक्तींचा समूह :- विशिष्टय ध्येयाच्या पूर्तीसाठी काही व्यक्ती एकत्र येवून मंडळाची स्थापना करतात.

२. सहकार्याची भावना :- समान उद्देश व ध्येय असणाऱ्या व्यक्तींमध्ये सहकार्याची भावना असते.

३. सामान्य उद्देश/ध्येय :- मंडळ निर्माण होण्यासाठी व्यक्तीचे काही उद्देश किंवा ध्येय असणे आवश्यक आहे.

४. संघटन :- संघटनेच्या माध्यमातून निश्चित उद्देश प्राप्त करण्यासाठी योजना आखली जाते. संघटनेमुळेच मंडळाचे अस्तित्व टिकून राहते.

अशाप्रकारे मंडळ विसर्जित करता येत असल्यामुळे तो काही व्यक्तींना अस्थायी असा समूह आहे. समिती समाजाचे अंग असले तरी समाज त्यापेक्षा मोठा आहे.

**प्रश्न क्र. ६ :- सामाजिक संस्थेच्या व्याख्या लिहून संस्थेची वैशिष्टये प्रकार्ये किंवा महत्व लिहा?**

उत्तर :- सर्वच समाजामध्ये विवाह, कुटुंब, धर्म, राज्य यासारख्या अनेक सामाजिक संस्था आहेत. त्या व्यक्ती व समाजाच्या काही विशिष्ट गरजांची पूर्ती करण्यामधून काळानुसार उत्क्रांत (विकसित) झाल्या आहेत. ''सामाजिक संस्थांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र'' अशी व्याख्या देखील केली जाते. व्यक्ती व समाज या दोहांच्या गरजा परस्पर संलग्नित आहेत. उदा. कामवासनेची पूर्ती ही व्यक्तीची शारीरिक गरज आहे. प्रजोत्पादन ही समाजाची गरज आहे. म्हणजे व्यक्तीच्या अस्तित्व विषयक गरजा या पर्यायाने समाजाच्या अस्तित्व विषयक गरजा ठरतात.

**व्याख्या :-**

१. ऑगबर्न व निमकॉफ यांच्या मते :-

''मानवाच्या मुलभूत गरजांच्या पूर्तीसाठी असलेल्या संघटित व प्रस्थापित मार्गांना सामाजिक संस्था म्हणतात.

२. किंजले डेव्हिस यांच्या मते :-

''एक किंवा अधिक कार्याच्या भोवती रचल्या गेलेल्या व एकजीव झालेल्या लोकरुढी, लोकनीती व कायदा यांचा संच म्हणजे सामाजिक संस्था होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता सर्व समाज सदस्यांच्या काही गरजा असतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी समाजात रुढ झालेल्या वर्णननियमांच्या चाकोरीला सामाजिक संस्था असे म्हणतात.

सामाजिक संस्थेची वैशिष्टये

१. सार्वत्रिकता :- आदिवासी, ग्रामीण, नागरी, विकसनशील, विकसित अशा प्रकारच्या सर्वच समाजांमध्ये सामाजिक संस्था असून संस्थेचे अस्तित्व असणारा एकही समाज नाही.

२. सुनिश्चित उद्देश :- कुटुंब, धर्म, राज्य, शिक्षण अशा सर्वच सामाजिक संस्थांची निर्मिती हेतूंची पूर्तता करण्यासाठी झालेली आहे.

३. उत्क्रांत स्वरुप :- संस्था अचानक वा एकदम निर्माण होत नसून तिचा प्रारंभ जनदिनी, लोकरुढी व लोकनिती मध्ये होतो म्हणून संस्था विकसित होतात.

४. स्थिरता :- कुटुंब, विवाह, धर्म, राज्य यासारख्या सामाजिक संस्था हजारो वर्षापासून सुरु आहेत. त्यांच्यात बदल घडून येण्यासाठी दिर्घ कालावधी लागल्यामुळे त्या स्थिर असतात.

५. प्रतिकात्मक लक्षणे :- राश्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राज्यमुद्रा ही राज्यसंस्थेची तर देवदेवतांच्या मुर्ती, स्वस्तिक, क्रॉस, देऊळ, मशीद, चर्च ही धर्मसंरचनेची प्रतीके आहेत.

**संस्थेची प्रकार्ये व महत्व :-**

१. मानवाच्या व समाजाच्या गरजांची पूर्ती :- प्रत्येक सामाजिक संस्था गरजांच्या पूर्तीसाठी निर्माण होते.

२ संस्कृतीचे हस्तांतरण :- कुटुंब, विवाह, धर्म, राज्य हया सामाजिक संस्था एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला संस्कृतीचे हस्तांतरण करीत असतात.

३. सामाजिक नियंत्रण :- व्यक्तीचे वर्तन कसे असावे हे स्पष्ट करणारी प्रमाणके संस्थामध्ये असल्यामुळे सामाजिक नियंत्रणाचे महत्वपूर्ण कार्य होते.

४. मार्गदर्शन :- गरजांच्या पूर्तीसाठी संस्था मार्गदर्शन करीत असतात.

५. कर्तव्याची निश्चिती :- सर्व सामाजिक संस्था त्यांच्याशी संबंधित व्यक्तीची कर्तव्य निश्चित करतात.

संस्थात्मक, सामाजिक संबंधाचे स्वरुप दिर्घकाळ टिकणारे असले तरी ते अपरिवर्तनीय असे नसते.

**प्रश्न क्र. ७ :- समुदायाच्या व्याख्या लिहून मुलभूत तत्वे किंवा वैशिष्टये लिहा.**

उत्तर :- समुदाय ही संकल्पना आकारावर आधारित नसून समान जीवनाच्या कल्पनेवर आधारित आहे. एका निश्चित भूप्रदेशावर कायमचे वास्तव्य असणाऱ्या लोकांचा गट म्हणजे समुदाय होय. सर्व समावेशक स्वरुपांचे हितसंबंध असणारा प्रादेशिक गट म्हणजे समुदाय होय असे म्हणता येते. अन्न पदार्थ व शिकारीसाठी भटकणारी टोळी समुह ३५ हजार वर्षापूर्वी अस्तित्वात आले. औद्योगिक क्रांतीनंतर शहरी समुह विकसित झाले.

व्याख्या :-

१. किंग्जले डेव्हिस यांच्या मते :-

''समुदाय हा व्यक्तींच्या सामाजिक जीवनाच्या सर्व बाजू व्यापणारा लहानात लहान असा प्रादेशिक गट आहे.''

२. बोगार्डस यांच्या मते :-

''एका विशिष्ट भूप्रदेशात थोडयाफार प्रमाणात आपलेपणाच्या भावनेने राहणाऱ्या सामाजिक समूहास समुदाय असे म्हणतात.

वरील व्याख्या लक्षात घेता समुदाय हा लहान व मोठा असा प्रादेशिक गट असतो, दुसरे म्हणजे व्यक्ती समुदायामध्ये आपले संपूर्ण सामाजिक जीवन जगू शकते. आणि समुदायातील सदस्यांचे परस्परांशी विशिष्ट प्रकारचे हितसंबंध नसतात.

**समुदायाची मूलभूत तत्वे किंवा वैशिष्टये**

१. विशिष्ट नाव :- समुदायाच्या नावामागे भौगोलिक, सामाजिक, ऐतिहासिक असे वेगवेगळे संदर्भ असतात. उदा. नागपूरचा समुदाय, राजपूत, भिन्न, नागरी समुदाय इ.

२. निश्चित भूप्रदेश :- प्रत्येक समुदाय हा कोणत्या तरी विशिष्ट भूप्रदेशावर पसरलेला असतो. त्यामुळे त्यांच्यात आम्हीची भावना निर्माण होते. उदा. ग्रामीण, नागरी, आदिवासी समुदाय इत्यादी.

३. समुदाय भावना :- ग्रामीण समुदायातील व्यक्तींना आपल्या खेडयाबद्दल वाटणारे प्रेम हे त्या समुदायाची आत्मीय भावना ठरते. ग्रामीण समुदायात यात्रा, उत्सव, भंडारा प्रसंगी समुदायातील सभासदांची कार्यभावना दिसून येते. स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व्यक्ती इतर समुदायावर अवलंबून असतात. त्याला अवलंबन भावना म्हणतात.

४. स्वयंपूर्णता :- आधुनिक काळात मुंबईसारख्या विशाल समुदायाला देखील सर्व दृष्टीने स्वयंपूर्णता मिळविणे शक्य होत नाही. मात्र आदिवासी समुदाय अद्यापही बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण आहेत.

५. सामान्य जीवन :- एका विशिष्टय भुप्रदेशात राहत असल्यामुळे त्यांच्या चालीरिती, परंपरा, लोकरुढी आदिमध्ये समानता असल्यामुळे जीवन जगण्याची पध्दती एकसारखी असते.

६. सामान्य नियम :- प्रत्येक समुदायाचे नियम अलिखित स्वरुपात असले तरी बहुतांश लोक त्यांचे पालन करतात. कारण त्यांच्या मागे लोकमताचा दबाव असतो.

७. स्थायित्व :- विशिष्ट भूप्रदेशात वर्षानुवर्षापासून लोक राहत असल्यामुळे त्यांच्यात आपलेपणाची भावना निर्माण झाल्यामुळे ते आपला परिसर सोडून अन्यत्र जात नाहीत.

नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव व्यक्तीची राहणी, विचारसरणी, कृती इत्यादींवर पडतो. ग्रामीण समुदाय लहान असल्यामुळे ते परस्परांना प्रथम नावाने ओळखतात तर नागरी समुदायातील व्यक्ती चैनीच्या वस्तु खरेदी करुन स्वतःचा मोठेपणा दुसऱ्याला दाखविण्याचा सतत प्रयत्न करीत असतात.

**प्रश्न क्र. ८ :- समाजाची व्याख्या लिहून समाजाची वैशिष्टये लिहा?**

**(०९)**

उत्तर :- मानवप्राणी हा इतर सजीव प्राण्यांपेक्षा कितीतरी बाबतीत श्रेष्ठ आहे. भाषा, संस्कृती, मूल्ये, धर्मभावना इत्यादी घटकांबाबत अन्य सजीव प्राण्यांच्या तुलनेत मानवाची श्रेष्ठता स्पष्ट होते. समाजशास्त्रीय दृष्टया समाज ही एक अमूर्त स्वरुपाची संकल्पना आहे. समाज ही संज्ञा व्यक्तींच्या, समुच्चमाला उद्देशून असते, त्याला उद्देशून समाज ही संज्ञा वापरली जाते.

व्याख्या :-

१. मॅक आयव्हर व पेज यांच्या मते :-

''सामाजिक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय''.

२. जे.एफ. गिलिन यांच्या मते :-

''ज्यांचे हेतू सामाजिक आहेत, जे एका प्रदेशात एकत्रित राहतात, ज्यांची जीवनपध्दती समान असून ज्यांच्यात एकत्वाची जाणीव आहे या सर्वांमुळे आपण इतरांपासून वेगळे आहोत असे मानवाच्या व्यक्तींचा मोठयात मोठा व तुलनात्मकदृष्टया कायम स्वरुपाचा गट म्हणजे समाज होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता सामाजिक संबंधाच्या चाकोरीला समाज म्हणावे की, सामाजिक संबंधाच्या नियमांनी (चाकोरीने) बांधल्या गेलेल्या जनसमूहाला समाज म्हणावे, अशा प्रकारच्या दोन विचारप्रणाली समाजशास्त्रज्ञांमध्ये आहेत. सामाजिक संबंधाच्या चाकोरीलाच किंवा व्यवस्थेलाच समाज असे संबोधणे योग्य ठरते, हीच विचारप्रणाली समाजशास्त्रात मान्य झाली आहे म्हणूनच समाज ही संकल्पना अमूर्त स्वरुपाची आहे असे समाजशास्त्रात म्हटले जाते. समाजाचे स्वरुप एकाच वेळेस स्थित्यात्मक व गत्यात्मक अशा दोन्ही प्रकारचे असते. समाजाच्या या दोन्ही स्वरुपांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

**समाजाची प्रमुख वैशिष्टये**

**१. निश्चित भूप्रदेश :-** प्रत्येक व्यक्ती कोणत्याही एका ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत भटकू लागली तर समाजच निर्माण होऊ शकत नाही म्हणून समाज हा विशिष्ट भूप्रदेशावर वस्ती करुन राहणाऱ्या लोकांचा समूह आहे.

२. प्रजोत्पादन :- मृत्यूच्या प्रक्रियेमुळे समाजातील व्यक्तींची संख्या कमी होत असते. स्त्री पुरुषांच्या लैंगिक संबंधावर नियंत्रण ठेवून प्रजोत्पादन कार्ये सतत सुरु ठेवण्यासाठीच विवाह व कुटुंब या सामाजिक संस्था समाजात निर्माण झालेल्या आहेत.

३. संस्कृती :- प्रत्येक समाजाची स्वतःची संस्कृती असते. व्यक्तींच्या विभिन्न व सर्वच गरजा पूर्ण करण्याची क्षमता संस्कृती मध्ये असणे आवश्यक आहे. म्हणून संस्कृती ही सर्वसमावेशक असते.

४. सामान्य जीवनपध्दती :- व्यक्तीची जीवन जगण्याची पध्दती म्हणजे संस्कृती होय. विश्वास प्रमाणके मूल्ये समाजानुसार वेगवेगळे असतात. कुटुंब, विवाह, शिक्षण यांचे स्वरुपही समाजानुसार भिन्न असते.

५. आत्मनिर्भरता :- ग्रामीण व नागरी समाजात परस्परावलंबन दिसून येत असले तरी गरजांच्या पूर्तीसाठी एका समाजाला दुसऱ्या समाजावर अवलंबून राहावे लागत नाही म्हणून समाज आत्मनिर्भर असतो.

६. भाषेची निर्मिती :- व्यक्तींमधील सामाजिक संबंध निर्माण होण्याच्या प्रक्रियेत भाषेचा मोठा वाटा आहे. भाषेची निर्मिती हे मानवी समाजाचे वैशिष्टये आहे.

७. स्वतंत्रता :- हॅरी जॉन्सन यांच्या मते, १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारतीय समाज राजकीय दृष्टीने स्वतंत्र नव्हता परंतू सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया भारतीय व ब्रिटीश समाज स्वतंत्र होते.

८. परस्परावलंबन :- व्यक्ती गरजापूर्तीसाठी एकमेकांवर अवलंबून असल्यामुळे संबंधात दृढता निर्माण होते.

९. समानता व विविधता :- आपण सर्व एक आहोत या जाणीवेतून समानता तर शारीरिक, बौध्दीक, आर्थिक स्थितीनुसार विविधता आढळून येते. अशाप्रकारे समाजाची वैशिष्टये आहेत.

प्रश्न क्र. ९ :- पूर्व आधुनिक समाजाच्या विकासातील शिकार, पशुपालक आणि कृषक समाजाचे वर्णन करा?

उत्तर :- मानव प्राणी उत्क्रांत झाल्यानंतर टोळी अवस्थेतील समाजापासून औद्योगिक क्रांती होण्यापर्यंतचा समाज म्हणजे पूर्व आधुनिक समाज होय. टोळी अवस्थेत असतांना प्रारंभीच्या काळात कुटुंब, विवाह, धर्म यासारख्या पायाभूत संस्था नव्हत्या. पूर्व-आधूनिक समाजाच्या विकासातील काही अवस्था पुढीलप्रमाणे,

१. शिकार आणि कंदमुळे गोळा करणारा समाज :-

ही समाज विकासाची प्रारंभिक असून तो कंदफळावर आपली गुजराण करीत असे. प्रादिम मानवाजवळ त्याच्या दोन हाताशिवाय अन्य कोणतेही अवजार वा हत्यार नव्हते. आदिम मानवाला संपूर्ण वर्षभर कंदफळांवर गुजराण करणे अशक्य झाल्यामुळे तो शिकार करण्याकडे वळला असावा. शिकार करण्याच्या क्रियेतूनच पारधी, फासेपारधी यासारख्या जमाती निर्माण झाल्या. मानवशास्त्रीय सर्वेक्षणानुसार देशाच्या विभिन्न प्रदेशामधील जंगलाच्या मध्यवर्ती भागात राहणारे आदिवासी लोक व जमाती हे आजही कंदमुळे गोळा करणे व शिकार करणे या समाजविकासाच्या पहिल्या अवस्थेतच त्याचे जीवन जगत आहेत.दक्षिण भारतातील कादर, मलपंतरम, पनियन, जेनू कुरबास, इरुला, चेंदू, मध्यप्रदेशातील बेंगा, ओरिसामधील जुआंग व खोंड अंदमान आणि निकोबार बेटामध्ये जाराव, शॉमपेन, ओंगे व सेंटोलियम या जमाती कंदमुळे गोळा करुन त्यावर आपली गुजराण करीत आहेत. या समुदायाचा आकार लहान असून कुटुंब हीच एकमेव प्राथमिक संस्था होती. या काळात व्यक्तींना पोट भरण्यासाठी भटकावे लागत असे तसेच त्यावेळी लिंगभेद हाच श्रमविभाजनाचा आधार होता.

**२. पशुपालक समाज :-**

यापूर्वीच्या अवस्थेत शिकार किंवा कंदमुळे न मिळाल्यास उपासमार सहन करण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय नव्हता. सगळेच पशू हिंस्त्र नसल्यामुळे काही प्राण्यांना मानवाने पाळीव करण्यास सुरुवात केली. त्यापासून दुध, मांस आणि कातडी प्राप्त केली. यामुळे शिकारी व कंदफळे गोळा करणारा समाज पशुपाल बनला. यामुळे लिंगभेद, वय या आधारावर श्रमविभाजन झाले. या अवस्थेत मालमत्ताविषयक विचार आणि वस्तुविनिमयासारखे देवाणघेवाणीवर आधारीत आर्थिक व्यवहार अगदी बल्यावस्थेत होते. कुटुंब, विवाह, धर्म या संस्थाचा उदय झाला. पिढयानुपिढया शेळया, मेंढया, बकऱ्या, याक, उंट, गायी, म्हशी, बदके यासारख्या प्राण्याचे कळप बाळगणारे आदिवासी भारतात आहेत. उत्तर पूर्व भारतात गुज्जर, बाकेखाल, गड्डी, भेटिया, किन्नर, पश्चिम भारतात आहेर, रैका,

रेबरी, चरण, भारवाड तर दक्षिण भारतात गोल्ला, कुरुमा, धनगर, तोडा, कुरुबा या पशुपालक जमाती आहेत.

**३. कृषक समाज :-**

पुरातत्व इतिहास तज्ञांच्या मते शिकारी अवस्थेत पुरुष शिकारीसाठी बाहेर पडल्यानंतर फावल्या वेळात काही रोपटयांची लागवड महिलांनीच केली असावी या अवस्थेत पेरणीची कामे 'टोकण' काठीने जमिनीत छिद्रे करुन केली जात असल्यामुळे स्थानांतरित शेत प्रचलित झाली. आसाम, नागालँड, अरुणाचल प्रदेश, मिझोराम या भागातील २० पेक्षाही अधिक आदिवासी जमाती अद्यापही स्थानांतरित शेती करीत आहेत. त्यानंतर स्थानांतरित शेतीऐवजी स्थायी शेतीकडे लोक वळल्यामुळे उत्पादनात वाढ होवून भटके जीवन संपुष्टात आले. कुटुंब, विवाह, धर्म, शिक्षण, राज्य या संस्थांचा विकास विभिन्न व्यवसाय उदयास आले. वस्तूविनिमयाचे रुपांतर मुद्रा विनिमयात होऊन मालमत्ता, संपत्ती विषयक विचार, परंपरा, नियम व कायदे विकसित झाले. लोकसंख्यावाढीची गती पूर्वीपेक्षा अधिक वाढली. सरळ व साधी संरचना असणाऱ्या समाजाचे जटिल वा गुंतागुंतीच्या समाज संरचनेत रुपांतर होण्यास प्रारंभ झाला.

पूर्व आधुनिक समाजाची वैशिष्टये :-

१. पूर्व आधूनिक समाजाला पारंपारिक समाज म्हटले जाते.
२. वंश, जात, लिंग यावर आधारित दर्जाला महत्व आले.
३. शिक्षण व्यवस्था खुली नव्हती.
४. धर्माचे प्राबल्य होते.
५. शेतीच उपजिविकेच साधन
६. फक्त जीवनावश्यक गरजा पूर्ण होत होत्या.

प्रश्न क्र. १० :- आधुनिक औद्योगिक समाजाची व्याख्या लिहून ठळक वैशिष्टये लिहा?

उत्तर :- मध्ययुगाच्या अंतिम पर्वात राजा श्रेष्ठ की धर्म श्रेष्ठ या संघर्षातून राजाने धर्मसत्तेचे वर्चस्व झुगारुन लावले. तर युरोपात राजाच्या निरंकुश सत्तेविरुध्द प्रजेचे लढे उभे राहिले. शेवटी निरंकुश राजेशाहीचे अस्तित्वच जवळपास संपुष्टात आले आणि लोकशाहीचे युग सुरु झाले. अमेरिकेतील स्वातंत्र्य युध्द आणि फ्रेंच राज्यक्रांती या दोन महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात महत्व प्राप्त झाले. हे बदल दर्शविण्यासाठी आधुनिक समाज या संज्ञेचा उपयोग करण्यात आला.

व्याख्यार :-

''विविध वस्तूंच्या उत्पादनासाठी यंत्राचा वापर विनिमयावर आधारित परस्परसंबंध वर्गीय विभेदन, धर्मनिरपेक्षता, नोकरशाहीची मजबूत संघटना, मोठया प्रमाणावर शिक्षीत व प्रशिक्षीत कुशल

कामगारांची व विषयतज्ञांची आवश्यकता अशा वैशिष्याने युक्त असणारा समाज म्हणजे औद्योगिक समाज होय.

२० व्या शतकात औद्योगिकरणाची प्रक्रिया जगव्यापी झाली आहे. औद्योगिकीकरणापासून दूर राहणारा म्हणजे आपल्या देशात कारखानेच नको असे म्हणणारा आज एकही देशनाही. औद्योगिकीकरणाने कृषक समाजाचे रुपांतर औद्योगिक समाजात झाले. २१ व्या शतकानंतर मानवी समाजाने आधुनिक औद्योगिक समाजाची अवस्था पार करुन त्यापुढच्या अवस्थेमध्ये म्हणजे उत्तर औद्योगिक समाजाच्या अवस्थेमध्ये प्रवेश केलेला आहे.

आधुनिक औद्योगिक समाजाची ठळक वैशिष्टये :-

१. **औद्योगिकीकरण :-**

औद्योगिकीकरण म्हणजे उद्योगधंदे स्थापन करणे होय. वीज, पोलाद, सिमेंट, खनिज, तेल व नैसर्गिक वायू आदि पायाभूत उद्योगांवरच अन्य उद्योगधंद्याची वाढ अवलंबून असते. त्यामुळे उद्योग व्यवसायांच्या निर्मितीला व विकासाला गती प्राप्त होते. अत्याधनिक तंत्रज्ञान, कच्चा माल, भांडवल, कुशल संघटक व प्रशिक्षित मनुष्यबळ या सर्व घटकांची औद्योगिकीकरणासाठी आवश्यकता असते. त्यामुळे शेतीवरचा भार कमी होऊन देशाचा आर्थिक विकास साधला जातो.

२. **सर्वांसाठी खुली असणारी शिक्षण व्यवस्था :-**

बालक मंदिर, शाळा, महाविद्यालये, कौशल्याचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, वस्तुंचे उत्पादन आणि विक्री करण्यासाठी शिक्षित, प्रशिक्षित, कुशल व तज्ञ अशा मनुष्यबळाची निर्मिती करतात. त्यामुळे मोठया आकाराची आणि सर्वांसाठी खुली असणारी शिक्षण व्यवस्था औद्योगिक समाजाचे महत्वाचे वैशिष्टय ठरते.

३. **धर्मनिरपेक्ष स्वरुप :-**

मध्ययुगात धर्मसंस्था आणि राजयसंस्था यांच्यात घनिष्ठ संबंध होते. मात्र औद्योगिक क्रांतीच्या काळात राजाने धर्मसत्तेची बंधने झुगारुन दिल्यामुळे धर्मसत्तेच्या वर्चस्वातून राज्य, शासनकर्ता वर्ग आणि सर्वसामान्य प्रजा या सर्वांची सुटका झाली. राजकीय आणि सार्वजनिक जीवनात धर्माचे वर्चस्व आणि महत्व कमी होणे म्हणजे धर्मनिरपेक्षीकरण होणे होय.

४. **विशाल आकाराची नोकरशाही :-**

औद्यागिकपूर्व समाजव्यवस्थाच नोकरशाही होती परंतू ती सुसंघटीत व विशाल आकाराची नव्हती. देशाच्या राजधानीपासून देशाच्या सरहद्दीमधील शेवटच्या गावापर्यंत सर्व ठिकाणचा राज्यकारभार सांभाळणारी संघटित आणि विशाल आकाराची नोकरशाही यंत्रणा ही औद्योगिक समाजाची देणगी होय असे मानले जाते.

५. **बाजारपेठा आणि वित्तीय संस्थांचे जाळे :-**

प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची बाजारपेठ ही औद्योगिक समाजाची देणगी आहे. आज दुधाकरिता आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. याचा अर्थ कच्चा मालाचा पुरवठा करणारे व कारखानदार तसेच उत्पादक व ग्राहक यांच्यात विनिमयाची संघटित व्यवस्था निर्माण होणे ही औद्योगिक समाजाची गरज असते.

६. भांडवलवाद व भांडवलशाही अर्थव्यवस्था :-

२१ व्या शतकात उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण या प्रक्रियांमुळे उद्योग व्यवसायात यापूर्वी कधीही नव्हती अशी स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उद्योग व्यवसायांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा व यंत्रसामुग्रीचा स्वीकार करणे अपरिहार्य झाले आहे. त्यासाठी फार मोठया प्रमाणावर भांडवलाच्या गरजेतून व्यापारी व बहुराष्ट्रीय कंपन्या निर्माण झाल्या आहेत. यांची आर्थिक उलाढाल एखाद्या देशाच्या अर्थसंकल्पापेक्षाही मोठी असल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे साम्राज्यच निर्माण झाले आहे.

७. नागरीकरण आणि नागरीवाद :-

औद्योगिकरण व नागरिकीकरणामुळे उद्योगधंदे निर्माण झाले की शहरेही निर्माण होतात. त्यामुळे देशाची राजधानी असेल्या दिल्लीपासून अनेक शहरांपर्यंत झोपडपट्टया, अनाधिकृत कॉल किंवा लेआउट्स, पाणी पुरवठयाच्या समस्या, अरुंद रस्ते, वाहतुकीची कोंडी यासारख्या विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. बिगर कृषी व्यवसाय, सामाजिक गतिशीलता, पर्यावरण ही नागरी समुदायाची वैशिष्टये असून गुन्हे, आत्महत्या, मादक द्रव्य व अंमली पदार्थांचे सेवन, मारामाऱ्या, हिंसक कृती यामुळे नवक्लृप्ती, अपगमनवाद, कर्मकांडवाद हे मर्टनचे विचलित प्रकार शहरात आढळून येतात.

८. उदारमतवादी लोकशाही :-

स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय हे आधूनिक जीवनाचे आधारस्तंभ असून या तत्वाचा आग्रह धरणारी विचारसरणी म्हणजे उदारमतवादी लोकशाही होय. काही देशामध्ये असणाऱ्या हुकुमशाही राजवटींना उलथवून पाडण्याचे कार्य उदारमतवादी लोकशाही विचारप्रणालीने प्रभावित झालेल्या लोकांनीच केले आहे.

९. व्यक्तिवाद :-

व्यक्तीवादामुळे आज विकसित, विकसनशील, अविकसित अवस्थेत असणाऱ्या देशामध्ये घटस्फोट, मद्यपान व अंमली पदार्थांचे सेवन यासारख्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार किंवा मनास येईल तसे वागणे नसून समाजातील अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा यांच्या बंधनातून मुक्त वर्तन म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य होय. याचा अर्थ व्यक्तिस्वातंत्र्याच्या अतिरेकातून व्यक्तिवादी विचारांची निर्मिती होते.

प्रश्न क्र. ११ :- समाज आणि व्यक्ती यांच्यात संबंध निर्माण करणारे घटक लिहून समाज उत्पत्तीचा सामाजिक करार व सेंद्रिय सिध्दांताचे विश्लेषण करा?

उत्तर :- व्यक्तीशिवाय समाज निर्माण होणे शक्य नाही. एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी असेल्या सर्व संबंधांना सामाजिक संबंध असे म्हटले जाते. प्रत्येक व्यक्तीचे सामाजिक संबंध हे तिचे कुटुंब सदस्य, आप्तजन, सगेसोयरे, मित्र वर्ग, जातिबांधव, शेजारी, निवासस्थान असणारा समुदाय यांच्यापूरते मर्यादित असले तरीही ते एकमेकांशी जोडले गलेले असतात. समाज आणि व्यक्ती यांना परस्परांशी जोडणारे तीन प्रमुख घटक आहेत.

१. संस्कृती :- समाजाशिवाय संस्कृती व संस्कृतीशिवाय समाज यांची कल्पना करता येत नाही. व्यक्तीच्या गरजा कशा पूर्ण कराव्या याचे मार्गदर्शन संस्कृती करित असल्यामुळे समाज आणि व्यक्ती यांना जोडणारा संस्कृती हा पहिला घटक आहे.

२. समाजीकरण :- एका जैविक गोळयाचे सामाजिक गोळयात रुपांतर करण्याच्या प्रक्रियेला सामाजीकरण म्हणतात. सामाजिकरणाच्या माध्यमातून मुलांवर संस्कार केल्यानंतरच व्यक्ती समाजात राहण्यायोग्य होतात. म्हणून सामाजीकरण हा व्यक्ती व समाज यांना जोडणारा दुसरा घटक आहे.

३. सामाजिक नियंत्रण :-

व्यक्ती जर स्वैराचाराने वागू लागल्या तर त्यांच्यात परस्परसंबंध निर्माण होणार नाहीत. प्रथा, परंपरा, लोकाचार, लोकनीती, नियम, कायदे या नियंत्रणाच्या साधनाद्वारे व्यक्तीचे वर्तन नियंत्रित केले जाते. म्हणून व्यक्ती आणि समाज यांना जोडणारा हा तिसरा घटक आहे.

## सामाजिक कराराचा सिध्दांत

या सिध्दांताची मांडणी थॉमस हॉब्ज, जॉन लॉक आणि जॉन जॅक्स रुसो या तीन विचारवंतांनी केली आहे. या तीनही विचारवंतांनी 'सामाजिक कराराचा सिध्दांत' असेच नाव आपल्या सिध्दांताला दिले असले तरीही प्रत्येकाने मांडलेल्या सिध्दांताचा आशय मात्र वेगवेगळा असून समाज निर्माण होण्यापूर्वीच्या अवस्थेला 'निसर्गावस्था' संबोधले आहे.

१. हॉब्जच्या मते :- मनुष्य हा स्वार्थी व दृष्ट आहे. निसर्गावस्थेत अत्यंत असुरक्षित वातावरण असल्यामुळे वाढ झालास तो सोडविण्याची कोणतीही यंत्रणा नव्हती म्हणून 'अ' आणि 'ब' यांनी एकमेकांशी करार केला त्यातून समाज आणि राज्य निर्माण झले असे हॉब्जचे म्हणणे आहे.

२. लॉक च्या मते :- मनुष्य हा 'सामाजिक व नैतिक प्राणी आहे. राज्य अस्तित्वात येण्यापूर्वीची अवस्था म्हणजे निसर्गावस्था होय. शांतता व सुव्यवस्था निर्माण करणारी आणि टिकवणारी कोण्तीही सत्ता निसवर्गावस्थेत नसल्यामुळे काही अडचणी निर्माण झाल्या. १) नैसर्गिक कायद्यांचा सर्वांसठी समान असा अर्थ लावणारी सत्ता नव्हती. २) न्यायनिवाडे देणाऱ्या यंत्रणेचा अभाव होता. ३) कायदे आणि न्याय निवाडे अंमलात आणणारी सत्ता नव्हती. या अडचणी दूर करण्यासाठी सर्व व्यक्तींनी सर्व व्यक्तींशी करार केल्यामुळे राज्याची निर्मिती झाली असे लॉक म्हणतो.

३. रुसोच्या मते :- मनुष्य स्वभावतः निष्पाप, निरागस आणि भोळा आहे. निसर्गावस्थेतील माणूस हा शांतताप्रेमी, सरळमार्गी व स्वतंत्र होता. निसर्गावस्था ही कुटुंब व खाजगी मालमत्ता विरहित अवस्था होती. काळानुसार लोकसंख्येत वाढ होत गेली. गरीब, श्रीमंत भेद निर्माण होऊन विषमता आली. त्यामुळे

निसर्गावस्था फार काळ टिकू शकली नाही. सुरक्षितता प्राप्त करण्यासाठी व्यक्ती स्वखुशीने करार करावयास तयार झाले. त्यातून जी सामूहिक संस्था निर्माण झाली तिला 'राजकीय समाज' असे रुसो संबोधितो.

**टिकात्मक परिक्षण**

१. समाज व राज्याचा उदय होण्यापूर्वी निसर्गावस्था होती याबाबत तिन्ही विचारवंतांनी ऐतिहासीक पूरावा दिला नाही.

२. करार झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी समाज व राज्य निर्माण झाले हे बुध्दिला पटत नाही.

३. समाज कराराच्या माध्यमातून मुद्दाम निर्माण करण्यात आला असे नसून उत्क्रांतीतून उदय झाला असे टिकाकारांना वाटते.

४. व्यक्ती आणि समाज परस्परपूरक असल्यामुळे करारातून समाज निर्मिती झाली ही वस्तुस्थितीत नाही.

५. व्यक्ती व समाज यांचे वेगळे अस्तित्व असेल तेव्हाच हा सिध्दांत लागू होतो पण व्यक्तीशिवाय समाजाचे आणि समाजाशिवाय व्यक्तीचे अस्तित्व नाही.

## सेंद्रिय सिध्दांत

प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी सर्वप्रथम सेंद्रीय विचारांचा पुरस्कार केला. हर्बट स्पेन्सरने ज्याप्रमाणे शरीराचे विविध घटक व अवयव आहेत आणि त्या प्रत्येक अवयवाचे कार्य असते त्याचप्रमाणे समाजव्यवस्थेच्या विविध घटकांचेही कार्य वेगवेगळे आहे. समाजव्यवस्थेचे सर्व घटक परस्पर संबंधित व अंतरनिर्भर आहेत. ''मानवी समाज आणि मानवी शरीर यांच्यात केलेली तुलना म्हणजे समाजाचा सेंद्रीय सिध्दांत होय.'' असे प्रा. आर.एन. मुखर्जी यांनी म्हटले आहे. स्पेन्सरने ''सजीवांच्या उत्क्रांतीचा नियम समाजाला लागू पडतो'' असे सांगून समाज आणि शरीर यांच्यात आठ प्रकारचे साम्य स्पष्ट केले.

१. शरीर आणि समाज हे दोन्ही घटक सजीव असून त्यांचा हळूहळू विकास होतो.

२. सुरुवातीला शरीर आणि समाज या दोहोंचाही आकार लहान असतो. दोहोंच्याही आकारनमानात जसजशी वाढ होते तसतशी त्यांच्या संरचनेतील जटिलतेमध्येही वाढ होत गेली.

३. समाज व शरीर या दोहोंमध्येही संरचनेच्या विकासासोबत प्रत्येक भागाचे किंवा अंगाचे कार्य वेगवेगळे होत जाते.

४. त्यामुळे संरचनेतील विविध घटकामध्ये अंतःसंबंध व अंतनिर्भरता आढळून येते.

५. शरीराच्या प्रत्येक अवयवाच्या कार्यातून त्याचे अस्तित्व टिकून राहते तर समाजातील विविध वर्ग आवश्यक वस्तूंचे उत्पादन करुन व्यापाराद्वारे लोकांना वितरण करतात. यामुळे समाजाचे अस्तित्व टिकून राहते.

६. शरीरावर मेंदूचे नियंत्रण असते तर समाजावर सरकार नियंत्रण ठेवते.

७. शरीराशिवाय पेशींना वेगळे अस्तित्व असते तसेच समाजाशिवाय व्यक्तीला वेगळे अस्तित्व राहत नाही.

८. ज्याप्रमाणे शरीरात रोग निर्माण झाल्यास त्या परिणाम शरीरावर होतो. त्याप्रमाणे समाजव्यवस्थेत दोष निर्माण झाल्यास त्याचा प्रभाव संपूर्ण समाजव्यव्सथेवर पडून समाजव्यवस्था दुबळी होते.

समाज व शरीर यांच्यातील भेद

१. शरीराचे वेगवेगळे अवयव शरीरापासून वेगळे करता येत नाहीत. परंतू समाजाशिवाय प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व असते.

२. शरीराचा विकास हा नैसर्गिकरित्या होत असतो. समाजाच्या विकासात व्यक्तींचे योगदान महत्वपूर्ण असते.

३. शरीरातील अवयव हे शरीराकरिता आहेत. परंतु व्यक्ती समाजासाठी नाही तर समाज व्यक्तीकिरता आहे.

टिकात्मक परीक्षण

१. शरीर ही मूर्त तर समाज ही अमूर्त संकल्पना असून त्यांची तुलना करणे योग्य ठरत नाही.

२. हर्बट स्पेन्सरची समाज व शरीर ही तुलना संयुक्तीक नसून मन भावना, इच्छ पेशींमध्ये नसून व्यक्ती आपले स्वतंत्र अस्तित्व दाखू शकते पण पेशी तसे दाखवू शकत नाही.

३. समाजाशिवाय व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व नाही, हे स्पेन्सरने केलेले विधान संयुक्तीक नाही. शरीरातील पेशी, अवयव यांना शरीराशिवाय स्वतंत्र अस्तित्व दाखवू शकते पण पेशी तसे दाखवू शकत नाही.

३. समाजाशिवाय व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व नाही हे स्पेन्सरने केलेले विधान संयुक्तीक नाही. शरीरातील पेशी, अवयव यांना शरीराशिवाय स्वतंत्र अस्तित्व असू शकत नाही.

४. समाजाशिवाय व्यक्तीचे अस्तित्व असू शकते हा विचारच स्पेन्सरने दृष्टिआड केला असे टीकाकारांचे म्हणणे आहे. असे असले तरी स्पेन्सरने वेगळा दृष्टिकोन मांडला हे मान्य करावे लागते.

## युनिट क्र. ३ सामाजीकरण (डेलळरश्रळूरींळेप)

**प्रश्न क्र. १ :– सामाजीकरणाच्या व्याख्या लिहून त्याचे महत्व स्पष्ट करा?**

उत्तर :– सामाजीकरण ही जैविक प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रुपांतर घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. जन्मजातच माणसाला जिवंत राहण्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. मानव हा संस्कारामुळे म्हणजेच सामाजीकरणामुळे मानव म्हणून जगू शकतो. मानवामध्ये शिकण्याची व भाषा बोलण्याची क्षमता असल्यामुळे मानव प्राण्यास सामाजिक प्राणी बनविण्याची जी प्रक्रिया आहे तिलाच सामाजीकरण असे म्हणतात.

व्याख्या :–

१. गिलिन आणि गिलिन यांच्या मते :–

‘‘सामाजीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे व्यक्ती गटाचा एक क्रियाशील सभासद बनते व गटाशी स्वतःचा समन्वय स्थापन करते.’’

२. हैरि जॉन्सन यांच्या मते :–

‘‘ज्या प्रक्रियेद्वारे व्यक्ती समाजात असतांना आपली सामाजिक भूमिका योग्य प्रकारे पार पाडावयास शिकते, त्या प्रक्रियेला सामाजीकरण असे म्हणतात.’’

वरील व्याख्या लक्षात घेता पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

१. सामाजीकरण ही निरंतर म्हणजे सतत चालणारी अशी एक प्रक्रिया आहे.

२. सामाजिकरण ही शिकण्याची प्रक्रिया असून त्यात व्यक्ती शारीरिक, मानसिक, बौध्दिक आणि सामाजिक कौशल्यांचे संपादन करते.

३. सामाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारा सजीव प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रुपांत घडून येते. त्याला मानवत्व प्राप्त होते.

४. सामाजीकरणामुळे व्यक्तीत भूमिका वाढविण्याची क्षमता निर्माण होते.

५. सामाजीकरणामुळे ‘स्व’ च्या तसेच तिच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

६. समाजाचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी संस्कृतीचे संक्रमण करणारी प्रक्रिया आहे.

सामाजीकरणाचे महत्व

१. संस्कृतीचे संक्रमण :- आत्मा, परमात्मा, जन्म, मृत्यू, पूनर्जन्म, वानप्रस्थाश्रम, रीती, लोकरुढी, लोकनीती, श्रध्दा, अभिवृत्ती, ज्ञान, कौशल्ये हे ज्ञान, विश्वास हे मागच्या पिढीकडूनच पुढच्या पिढीला सामाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे हस्तांतरीत केले जातात.

२. समाजव्यवस्थेचे सातत्य आणि स्थैर्य टिकवून ठेवणे :-

सामाजीकरणात व्यक्तींना आपआपल्या भूमिका योग्य रितीने पार पाडण्याचे शिक्षण दिले जाते. त्यासाठी प्रेरितही केले जाते. त्यामुळे समाज व्यवहार, सुरळित राहू शकतात. म्हणून सामाजीकरण हे दोन पिढयांना जोडणारा दुवा आहे असे म्हटले जाते.

३. समाजाचा क्रियाशील सभासद बनण्याची पात्रता व्यक्तीमध्ये निर्माण करणे :-

प्रेम, जिव्हाळा, सहकार्य, आत्मीयता, त्याग यासारख्या गुणांमुळे व्यक्तीच्या जीवनाला स्थैर्य लाभते. सामाजिकरणामुळे इतर व्यक्ती आपल्याकडून नेमक्या कोणत्या अपेक्षा ठेवतात हे व्यक्तीला कळते आणि त्यानुसार आपली भूमिका वठविणे शक्य होते.

४. सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन :-

कायदे, पोलीस यंत्रणा यांचा वापर करुन ठेवलेले नियंत्रण हे फारसे प्रभावी ठरु शकत नाही. याउलट मनापासून स्वीकारणाऱ्या बंधनामुळे येणारे नियंत्रण हे अधिक प्रभावी असते.

५. व्यक्तिमत्वाचा विकास करणे :-

सामाजीकरणाच्या माध्यमातून 'स्व' चा विकास घडून येतो. सामाजीकरण आणि व्यक्तिमत्वाचा विकास या दोन स्वतंत्र गोष्टी नसून एकाच प्रक्रियेची ती दोन अंगे आहेत.

६. मानवाला मानवत्व प्राप्त करुन देणारी प्रक्रिया :- रेन्हरंड सिंग यांना लांडग्याच्या कळपात सापडलेल्या मुलीचे वर्तन लांडग्याप्रमाणेच असल्याचे दिसून आले. चालणे, बोलणे, खाणेपिणे हया गोष्टी सिंग यांनी बिंबविल्यानंतर तिने आत्मसात केल्या यावरुन सामाजिकरण ही मानवाला मानवत्व प्रापत करुन देणारी प्रक्रिया आहे.

**प्रश्न क्र. २ :- सामाजीकरणाची माध्यमे किंवा साधने लिहा?**

उत्तर :- १) कुटुंब :- जन्मानंतर मूल त्यांच्या विभिन्न गरजांच्या पूर्तीसाठी पूर्णपणे धडे देण्याचे कार्य आई, वडील, मोठी भावंडे, शेजारी पाजारी यांच्याकडून सुरु असते. बक्षीस आणि शिक्षा यांच्या माध्यमातून मुलाला शिस्त लावण्याचा प्रयत्न कुटुंबाद्वारे केला जातो. 'मुलगा' किंवा 'मुलगी' आपआपल्या लिंगसापेक्ष भूमिकांचे प्रारंभीचे धडे कुटुंबातच घेतात. घरातच मूल आपल्या आई वडिलांची भाषा शिकते. कौटुंबिक जीवनात व्यक्तीचे नीट सामाजीकरण झाले नाही तर त्याच्या व्यक्तिमत्वात गंभीर उणीवा राहू शकतात. कष्ट करणाऱ्या गरीब कुटुंबात आज्ञापालन शिकविले जाते. मध्यम वर्गात प्रश्न सोडविण्याचे कौशल्य निर्माण केले जाते तर श्रीमंत कुटुंबात नोकरांकडून कामे करुन

घेण्याचे कौशल्य शिकविले जाते. धर्म, शिक्षण, राजकारण यासंबंधी आईवडिलांच्या दृष्टिकोणाचा प्रभाव मुलांवर पडतो. भुमिका, शिक्षणाची ओळख कुटुंबाद्वारेच होत असल्यामुळे कुटुंब सामाजीकरणाचे महत्वपूर्ण माध्यम ठरते.

२) शाळा किंवा शिक्षण :- कागद-पेन्सिल, पाटी-पुस्तके, फळा, वर्गखोली, शिक्षक, अंगणवाडया, पाळणाघरे, बालमंदिरे, प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि शिक्षण संस्था ही सर्व औपचारिक शिक्षणाची साधने आहेत. डॉक्टर, इंजिनियर, वकिल इत्यादी कौशल्य शिक्षणातून प्राप्त होत असल्यामुळे कुटुंबांना मुलांच्या सामाजीकरणाबाबत शाळांकडून फार मोठया अपेक्षा वाढल्या आहेत. वर्तनाशी संबंधित नियमांचे पालन केल्यावर शिक्षकांकडून मिळणाऱ्या शाबासकीमुळे बालकांमध्ये विशिष्ट गुण दृढ होत जातात. तसेच नियमबाहय वर्तन केल्यावर शिक्षकांकडून मिळणाऱ्या शिक्षेमुळे नियमबाहय वर्तन टाळण्याची प्रवृत्तीही मुलांमध्ये विकसित होऊ लागते.

३. धर्म :- भारतात १८ व्या शतकापर्यंत अस्पृश्यता आणि उच्च-कनिष्ठतेच्या तत्वावर आधारीत असणारी जातीव्यवस्था, वारसा हक्काचे नियम, पूनर्विवाह करण्याचा अधिकार कुटुंबात स्त्रियांचे स्थान आणि भूमिका, शिक्षणाचा अधिकार आदी मानवी जीवनाशी संबंधीत बाबी धर्मविचारानुसार निर्धारित झाल्या होत्या. फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीमुळे धर्माचे महत्व कमी झाले. परंतू आजही जन्म, विवाह, मृत्यु यासंबंधीच्या विधी व संस्काराचे पालन सर्वच धर्माद्वारे केले जाते. संकट काळात व्यक्तीचे मनोधैर्य वाढविणे आणि सामाजिक नियंत्रण ठेवणे यामुळे धर्म हे आजही सामाजीकरणाचे महत्वपूर्ण साधन आहे.

४. समवयस्कांचा समूह किंवा मित्रसमूह :- व्यक्तीमधील नेतृत्व गुणांचा विकास मित्रमंडळात होतो. सामान्यपणे लिंगभेदानुसार तरुण व तरुणींचे मित्रसमूह वेगवेगळे असतात. महाविद्यालय, वस्तीगृह, मैदानी क्रिडा व खेळ, अंमली पदार्थ व दारु असे उपसंस्कृती असलेल्या गटानुसार व्यक्तीवर परिणाम होतो. या वयात मित्रसमूहाचा प्रभाव एवढा असतो की व्यक्ती आई-वडिलांचे देखील ऐकत नाहीत. मित्रसमूहामुळे व्यक्ती चारचौघांसारखे वागावयास शिकते. मित्रसमूहात नेता, अनुयायी, मध्यस्थ इ. भूमिका कराव्या लागतात. त्यामुळे व्यक्तीमत्वाच्या अस्तित्वाची जाणीव निर्माण होते.

५. जनसंपर्क माध्यमे :- वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, पुस्तके, रेडिओ, दुरदर्शन, फेसबुक, खिट्ट, मोबाईलवरील ॲप यंचा प्रभाव सर्व लोकांवर पडतो. त्यामुळे लोकांचे विचार, मते, भावभावना, अभिवृत्ती, मूल्ये, ज्ञान इत्यादी गोष्टींमध्ये भर टाकण्याचे वा त्यांच्या मते बदल घडवून आणण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. लोकांच्या सामाजिक व राजकीय सहभागात वृध्दी घडवून आणण्याची क्षमता असल्यामुळे विशेषतः लोकशाही व्यवस्थेत त्यांना महत्व प्राप्त झाले आहे.

**प्रश्न क्र. ३ :- 'स्व' संकल्पनेची निर्मिती आणि विकासाबाबत जी.एच. मीडचा सिध्दांत लिहा?**

उत्तर :- 'स्व' संकल्पनेच्या सिध्दांतात सी.एच.कुले, जी.एच. मीड, सिग्मंड फ्राईड, एरिकसन या मानस व समाजशास्त्रज्ञांनी मांडणी केली आहे. कूलेचा सिध्दांत 'प्रतिबिंबित स्व' या नावाने तर सिग्मंड फ्राईड

यांचा 'स्व' विषयक सिध्दांत या नावाने प्रसिध्द आहे. जॉर्ज हर्बर्ट मीड चा सिध्दांत 'सामान्यीकृत इतर' या नावानेही प्रसिध्द आहे. सामाजिक आंतरक्रियातूनच 'स्व' ची किंवा 'मी' ची निर्मिती होऊन त्याचे स्वरुप ठरते असे मीडने प्रतिपादन केले आहे.

मीडचे 'ख' व 'चश' विषयक विश्लेषण

आपण कोण आहोत? हे व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तींच्या प्रतिक्रियांमुळे कळते. 'स्व' हा स्वतःहून कळणारा विषय असतो. मीडच्या मते व्यक्तीचे मन ज्या प्रक्रियेतून उदयाला येते त्याच प्रक्रियेचा 'स्व' हा एक भाग आहे. 'चश' हा 'स्व' चा सामाजिक घटक आहे. तो इतरांच्या दृष्टिकोनांनी व अभिवृत्तींनी बनलेला असतो. 'ख' आणि 'चश' यांच्यात सतत चालणाऱ्या आंतरक्रियांवर मीडने आपल्या विवेचनात भर दिला आहे. 'ख' हा व्यक्तीचा वर्तमानकालीन प्रत्यक्ष कृतीचा जनक असतो. ही कृती करतांना व्यक्तीवर 'चश' चा प्रभाव पडत असतो. आई-वडील, बहिण-भाऊ व कुटुंबातील अन्य सदस्यांबरोबर त्याच्या 'चश' ची वाढ होत जाते. शेवटी 'ख' काही काळानंतर लहान मुलाच्या 'स्व' मधील 'ख' चे वर्तन समाजाच्या प्रस्थापित नियमानुसार नियंत्रित होऊ लागते. अर्थात ते पूर्णपणे कधीच नियंत्रित होत नाही असे मीडचे मत होते. 'चश' हा 'स्व' चा भाग असून मीडने त्याला 'सामान्यीकृत इतर' अशी संज्ञा वापरली आहे.

सुरुवातीला मुल आईच्या नंतर वडिल, बहिण-भाऊ , आजी-आजोबा, काका-मामा तद्नंतर शेजारी, मित्र, शिक्षक यांच्या दृष्टिकोनातून आपण कोण व कसे आहोत याचा विचार करते म्हणजे समूहातील इतरांच्या दृष्टिकांनांनी मिळून बनलेल्या एका सर्व सामान्य दृष्टिकोनातून व्यक्ती स्वतःचा विचार करावयास शिकते. यालाच मीडने सामान्यीकृत इतर असे म्हटले आहे. इतरांच्या प्रतिक्रियांना 'स्व' च्या विकासात महत्व असून 'स्व' संकल्पनेच्या 'चश' च्या जडण घडणीत इतर महत्वाच्या व्यक्तींचा मोठा वाटा असतो.

## 'स्व' च्या विकासाच्या तीन अवस्था

**१. अनुकरणात्मक वर्तनाची अवस्था :-**

ही अवस्था साधारणतः जन्मानंतर दुसऱ्या वर्षात सुरु होते. या काळात मूल घरातील इतर व्यक्तीच्या वर्तनाचे अनुकरण करु लागते.

**२. क्रीडा अवस्था :-**

वयाच्या तिसऱ्या वर्षाच्या सुमारास ही अवस्था सुरु होते. या काळात मुलाला खेळण्यात आई, वडील, मोठी भावंडे आदींच्या भूमिका करावयास आवडते. यामुळे मुले आपल्या वर्तनाचे मूल्यमापन इतरांच्या दृष्टिकोनातून करावयास शिकते. अर्थात हे खेळ कमी गुंतागुंतीचे असतात.

**३. खेळांची अवस्था :-**

मुलांचा सामाजिक अनुभव जसजसा वाढत जातो तशी तिसरी 'खेळांची अवस्था' उदयाला येते. या अवस्थेत समूहातील किंवा समाजातील सर्वांच्या सामान्य दृष्टिकोनातून व्यक्ती स्वतःचा विचार करावयास शिकते. त्यातूनच व्यक्तीचा परिपक्तव 'चश' तयार होतो. अशाप्रकारे मीडच्या मते 'स्व' चे स्वरुप सामाजीकरणामुळे जवळ-जवळ पूर्णतः ठरत असल्याने व्यक्ती आणि समाज यांच्यात सुसंवाद असतो.

## युनिट क्र. ४ - सामाजिक संरचना

**प्रश्न क्र. १ - सामाजिक संरचनेच्या व्याख्या लिहून संरचनेची घटक तत्वे लिहा?**

उत्तर :- इमाईल दुरखिम, कॉम्त या समाजशास्त्रज्ञांच्या विचारांमध्ये संरचनात्मक प्रकार्यवाद या सिध्दांचे मूळ असल्याचे दिसते. अलीकडच्या काळातील प्रामुख्याने रॉबर्ट मर्टन व टालकट पारसन्स या समाजशास्त्रज्ञांनी संरचनात्मक प्रकार्यवादाचा सिध्दांत विकसित केला आहे. या सिध्दांताला 'सामाजिक व्यवस्था सिध्दांत', 'संतुलन सिध्दांत, प्रकार्यवाद अशा नावाने देखील संबोधिले जाते. थोडक्यात सामाजिक संरचना ही संकल्पना संरचनात्मक प्रकार्यवाद या समाजशास्त्रीय सैध्दांतिक दृष्टिकोनाशी निगडीत आहे.

**व्याख्या :-**

१. विल्यम डॉबिनर यांच्या मते :-

''सुव्यवस्थित, स्थिर व पुन्हा-पुन्हा निर्माण होणाऱ्या परस्पर संबंधांनी सामाजिक संरचना निर्माण होते.

२. हॅरि जॉन्सन यांच्या मते :-

''कोणत्याही वस्तूची रचना म्हणजे त्या वस्तूतील घटकांचे एकमेकांशी असलेले स्थिर स्वरुपाचे परस्पर संबंध होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता,

१. संरचना ही विभिन्न घटकांची मिळून बनलेली असते.
२. संरचना निर्माण करणारे सर्व घटक विशिष्ट क्रमाने एकमेकांशी जोडले गेलेले असतात.
३. संरचनेच्या क्रमबध्द घटकांमध्ये स्थिर स्वरुपाचे परस्पर संबंध असतात.
४. संरचनेच्या प्रत्येक घटकाचे एक विशिष्ट असे कार्य असते याला समाजशास्त्रीय भाषेत प्रकार्य असे म्हणतात.

या सर्व गोष्टींचा अभ्यास करणे म्हणजे त्या संरचनेचा अभ्यास करणे होय.

### सामाजिक संरचनेचे घटक किंवा संरचनात्मक पैलू

**१. भूमिका किंवा दर्जा :-**

समूहातील आपले स्थान व दर्जा यांना अनुसरुन असणारे कार्य ज्या रितीने व्यक्ती पार पाडते त्यास भूमिका असे म्हणतात. अधिकार किंवा हक्क यांचा संबंध दर्जाशी आहे तर कर्तव्याचा संबंध भूमिकेशी आहे. कुटुंब या समूहात गृहिणीला सर्व कुटुंब सदस्यांसाठी भोजन तयार करणे, आजारी असणाऱ्या कुटुंब सदस्यांची सेवासुश्रूषा करणे, बालकांचे संगोपन करणे, कुटुंबाच्या संपत्तीचे रक्षण करणे इत्यादी भूमिका कराव्या लागतात. संरचना अशा विविध भूमिका मिळून बनते. म्हणून भूमिका हे संरचनेचे एक घटक तत्व ठरते.

२. समूह व उपसमूह :-

किमान दोन किंवा त्यापेक्षा अधिक संख्येतील व्यक्तींच्या आंतरक्रियांमधून समूह निर्माण होतो. समूह म्हणजे परस्परसंबंधित असलेल्या विविध दर्जाचे व भूमिकांचे संघटन होय. समाजासारखा आकाराने मोठा असणारा समूह हा कुटुंब, जाती, खेडे, नगर, महानगर यासारख्या अनेक उपसमूहांमध्ये विभाजित असतो. कुटुंब या गटातील आई, वडील, बहिण, भाऊ या स्थानाचे परस्परसंबंध महाविद्यालय या गटातील प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी या स्थानांच्या परस्परसंबंधापेक्षा भिन्न असतात. म्हणून कुटुंबाची संरचना महाविद्यालयाच्या संरचनेपेक्षा भिन्न असल्यामुळे प्रत्येक सामाजिक गटाची संरचना स्वतंत्र असते. याच अर्थाने समूह-उपसमूह हे समाजसंरचनेचे एक घटकतत्व आहे.

३. सामाजिक प्रमाणके किंवा नियमने :-

ज्या समाजात प्रमाणके नाहीत असा एकही समाज नाही. ''जेथे प्रमाणके नाही तेथे समाजदेखील नाही'' असे रॉबर्ट बिरस्टिडने म्हटले आहे. व्यक्तीच्या बहुतांश वर्तनक्रिया प्रमाणकानुसार होत असतात. त्यामुळे मानवी जीवनाच्या धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच अंगाशी निगडित प्रमाणे असणे स्वाभाविक ठरते. दर्जा व भूमिकांचे निर्धारण हे प्रमाणकांनी केले जाते. एकाच व्यक्तीला तिच्या कुटुंबात पती, तिा, पुत्र, भाऊ , काका, मामा या सर्व भूमिका कराव्या लागतात. कोणत्या परिस्थितीत कोणत्या भूमिकेला व्यक्तीने प्राधान्य द्यावे या संबंधीचे मार्गदर्शन प्रमाणके करतात. यामुळे भूमिका संघर्ष निर्माण होत नाही. म्हणून प्रमाणके समाजसंरचनेचा एक महत्वाचा घटक आहे.

४. सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये :-

व्यक्तीचे वर्तन चांगले की वाईट हे निश्‍चित करणारे दंडक किंवा मानक असा मूल्ये हया संज्ञेचा अर्थ आहे. सर्वकालीन व सर्व प्रकारच्या समाजामध्ये सामाजिक मूल्ये आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये आधुनिक काळातील सर्व समाजामध्ये आहेत. असे असले तरीही समाजा समाजानुसार काही मूल्ये भिन्न किंवा वेगवेगळी असतात. उदा. हिंदूसाठी 'विवाह' हे मूल्य व संस्कार आहे तर विवाह हा करार आहे अशी ख्रिश्चन व इस्लामधर्मीय समाजाची धारणा आहे. प्रत्येक समाजातील प्रमाणके ही त्या समाजातील मूल्यांच्या आधारे निश्‍चित होत असतात. सोप्या शब्दात, प्रमाणकांना मूल्यांचा आधार असतो. व्यक्तीचे सामाजिक वर्तनव्यवहार समजून घ्यावयाचे असतील तर मूल्यांचे अध्ययन करणे आवश्यक ठरते. म्हणून मूल्ये हे सामाजिक संरचनेचे एक घटक तत्व ठरते.

प्रश्न क्र. २ :– सामाजिक संरचनेची प्रकार्ये व अपकार्य यांच्या व्याख्या लिहून त्याचे महत्व स्पष्ट करा.

उत्तर :– सजीव प्राण्याची शरीर संरचना टिकवून ठेवण्यामध्ये किंवा कार्यक्षमतेने कार्यरत ठेवण्यामध्ये जठर, पचन संस्था, श्वसन संस्था, हृदय आदी शरीरव्यवस्था निर्माण करणाऱ्या घटकतत्वाचे योगदान असते. तसेच समाज संरचनेचे आहे. प्रकार्य ही संज्ञाच मुळात जीवशास्त्रात सजीवांच्या शरीररचनेचे अध्ययन करण्यामधून निर्माण झाली आहे. स्पेन्सर यांनी प्रकार्य या संज्ञेचा समाजशास्त्रात उपयोग केला. परंतु प्रकार्य या संज्ञेचा समाजशास्त्रीय आशय विकसित करण्यामध्ये दुरर्खिम यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

व्याख्या :– प्रकार्य

१. रॉबर्ट मर्टन च्या मते :–

''प्रकार्य म्हणजे असे निरिक्षित परिणाम की जे विशिष्ट व्यवस्थेच्या समायोजनासाठी योगदान देतात.''

२. विल्यम स्कॉटच्या मते :–

''समाज व्यवस्थेत अस्तित्वात असणाऱ्या एखाद्या घटकाचे इतर घटकांसाठी जे परिणाम असतात त्यांना प्रकार्ये असे म्हणतात.''

प्रकार्याचे प्रकार

१. प्रकट प्रकार्ये :–

संरचनेची जी प्रकार्ये अपेक्षित आणि मान्यता प्राप्त असतात त्यांना प्रकट प्रकार्ये असे म्हणतात. जाती व्यवस्थेमुळे संपूर्ण समाज संघटितपणे शेकडो वर्षे टिकून राहिला म्हणून भारतीय समाजाच्या दृष्टिने हे जातीव्यवस्थेचे प्रकट प्रकार्ये होय.

२. अप्रकट प्रकार्ये :–

संरचनेच्या घटकाचे जी कार्ये मान्यताप्राप्त नसतात त्यांना प्रकट प्रकार्य असे म्हणतात. विवाहामुळे जातीव्यवस्था आजही टिकून आहे. हे जातीव्यवस्थेचे अप्रकट प्रकार्ये आहे.

व्याख्या :– अपकार्य

१. हॅरि जॉन्सच्या मते :–

''समाजव्यवस्थेच्या गरजा भागविण्याच्या कार्यात कोणतीही संरचना अडथळा आणीत असेल तर ते संरचनेचे अपकार्य होय.''

२. रॉबर्ट मर्टनच्या मते :–

''अपकार्ये म्हणजे असे परिणाम की जे व्यवस्थेची समायोजन क्षमता कमी करतात.''

भारतीय समाजात जाती व्यवस्थेमुळे अनेक कनिष्ठ जाती समूहांना निम्न दर्जा मिळून हीन जीवन जगावे लागते हे जाती व्यवस्थेचे अपकार्य होय.

## सामाजिक संरचनेच्या प्रकार्य आणि अपकार्य या संकल्पनाचे महत्व

संपूर्ण समाजाचे अथवा कुटुंब, विवाह, धर्म, समूह यासारख्या समाज व्यवस्थेच्या कोणत्याही एका घटकाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यासाठी प्रकार्य आणि अपकार्य हया संकल्पना आणि प्रकार्यवादी दृष्टिकोन उपयुक्त आहे. कुटुंब, समूह, समाज कसा संरचित होतो? कुटुंबाचे अन्य घटकांशी कोणते वा कसे संबंध आहेत? त्यांचे अस्तित्व कसे टिकून राहते? यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे समाजशास्त्राच्या अभ्यासकाला या दृष्टिकोनाच्या आधारे मिळविता येतात. या दृष्टिकोनात समाजव्यवस्थेत स्व संतुलनाची प्रवृत्ती असते असे मानले जाते. त्यामुळे हा दृष्टिकोन 'जैसे थे' वादी आहे. परिवर्तनाला विरोध करणारा आहे असा आक्षेप घेतला जातो. तरीही समाज व्यवस्थेच्या विभिन्न अंगाचे संपूर्ण समाजव्यवस्थेशी असणारे संबंध स्पष्ट करण्यावर भर देणारा हा दृष्टिकोन उपयुक्त आहे, असे या दृष्टिकोनाच्या समर्थकांना वाटते.

**प्रश्न क्र. ३ :- सामाजिक आंतरक्रिया व प्रक्रिया यांच्या व्याख्या लिहून सामाजिक प्रक्रियेचे घटक लिहा?**

उत्तर :- सामाजिक गट किंवा समूह हा समाजशास्त्राच्या अध्ययनविषयाचा एक भाग आहे, तसेच आंतरक्रिया आणि आंतरकियांच्या सातत्यातून निर्माण होणाऱ्या प्रक्रिया हा देखील समाजशास्त्राच्या अध्ययन विषयाचा तितकाच महत्वपूर्ण भाग आहे.

**व्याख्या :- आंतरक्रिया**

१. ग्रीन च्या मते :-

''जेव्हा व्यक्ती किंवा समूह हे त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आणि समस्या सोडविण्याच्या हेतूने परस्परांना प्रभावित करतात तेव्हा त्याला आंतरक्रिया असे म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता आंतरक्रिया हा क्रियेचा स्वाभाविक परिणाम आहे असे मानले जाते. याचा अर्थ समोरच्या व्यक्तीच्या वर्तनामुळे आपले वर्तन प्रभावित होत असते असा होतो. सामाजिक आंतरक्रिया फलद्रूप होण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक असतात.

१. संपर्क :- संपर्काशिवाय आंतरक्रियेची कल्पनाच करता येत नाही. संपर्क हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वा दोनपैकी कोणत्याही प्रकारचा असू शकतो. त्यासाठी फोन, इंटरनेट, मेल यासारख्या आधूनिक साधनांचा उपयोग देखील केलेला असू शकतो.

२. आदान-प्रदान :- दोन पक्षात विचार, भावना व कृतींची देवाण-घेवाण असावी लागते त्यासाठी भाषा, संकेत, चिन्हे, प्रतीके, वाणी आदींचा अवलंब केला जातो. काही वेळा आंतरक्रिया मुद्दाम किंवा उद्दिष्टांची पूर्ती होण्यासाठी केल्या जातात. एरवी त्या उत्स्फूर्तपणे होत असतात.

**व्याख्या :- प्रक्रिया**

कुटुंब, शेजारी, शाळा आदी समूहाच्या सदस्यांमध्ये असंख्य आंतरक्रिया पुन्हा पुन्हा होतच राहातात. दीर्घकाळ पुनरावृत्ती झाली की त्याच आंतरक्रियांना सामाजिक प्रक्रिया असे म्हणताात.

**१. मॉरिस गिन्सबर्ग च्या मते :-**

''व्यक्ती आणि समूह यांच्यात होणाऱ्या सहकार्य, संघर्ष, सामाजिक विभेदीकरण, ऐक्य, विकास, घट आणि विनाश यासारख्या विविध आंतरक्रियांना सामाजिक प्रक्रिया म्हणतात.''

परस्पर संबंधित घटनांची जी परंपरा एखादा विशिष्ट परिणाम घडविते तिला प्रक्रिया असे संबोधिल्या जाते. हा सामाजिक प्रक्रिया या संज्ञेचा मुख्य आशय आहे. सामाजिक प्रक्रियेची चार घटक तत्वे मानली जातात. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**सामाजिक प्रक्रियेचे घटक**

१. घटनांचा निश्चित क्रम :- सामाजिक प्रक्रियेत सातत्याबरोबरच एक विशिष्टक्रम असावा लागतो.

२. सामाजिक प्रयिा घडून येण्यासाठी घटनांमध्ये सातत्य असले पाहीजे. जर घटनांचे सातत्य नसेल तर
त्यास सामाजिक प्रक्रिया म्हणता येणार नाही.

३. परस्परसंबधित घटना :- घटना परस्पर संबंधित असतील तरच सामाजिक प्रक्रिया घडून येते.

४. विशिष्ट परिणाम :- सामाजिक प्रयिसाठीच्या घटना हया काही विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी
केल्या जातात. त्यामधून विशिष्ट परिणाम अपेक्षित असतो.

**प्रश्न क्र. ४ :- सहकार्याच्या व्याख्या लिहून सहकार्याचे प्रकार व महत्व लिहा?**

उत्तर :- मानवाच्या जैविक, मानसिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा सर्वच गरजांच्या यथायोग्यपणे पूर्ती होण्यासाठी त्यांच्यात परस्पर सहकार्याची नितांत गरज असते. सहाय्य किंवा मदत असा सहकार्याचा अर्थ नसून समान उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी संयुक्तरित्या काम करणे असा सहकार्याचा अर्थ आहे.

**व्याख्या :-**

१. डेव्हिड ड्रेसलरच्या मते :- ''समान उद्दिष्ट प्राप्तीसाठी दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रितपणे काम करतात. त्या आंतरक्रियेच्या प्रकाराला सहकार्य म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता १) सहकार्यासाठी कमीत कमी दोन व्यक्तींची गरज असते २) हे दोन्ही घटक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकत्र येतात. ३) सहकार्य ही सहयोगी प्रक्रिया आहे. ४) समाजात सहकार्य प्रक्रियेचे आधिक्य असते. ५) लोकशाही शासनप्रणालीचे सहकार्य हे आधारभूत तत्व आहे.

**सहकार्याचे प्रकार**

मॅक आयव्हरच्या नुसार :-

१. प्रत्यक्ष सहकार्य :- कुटुंब, नातेवाईकांचा गट, मित्रसमूह, क्रिडा समूहात प्रत्यक्ष सहकार्य हा प्रकार असतो.

२. अप्रत्यक्ष सहकार्य :- मोठया राजकीय, आर्थिक, धार्मिक संघटनांमध्ये अप्रत्यक्ष सहकार्य हा प्रकार असतो.

ऑगबर्नच्या नुसार :-

१. सामान्य सहकार्य :- शेतीकाम, सार्वजनिक उत्सव व सणसमारंभात सामान्य सहकार्य हा प्रकार आढळतो.

२. मित्रवन सहकार्य :- कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता केलेले सहकार्य असा मित्रवत सहकार्याचा अर्थ आहे. कुटुंब, मित्रगट, नातेवाईकांचा गट, धार्मिक गटामध्ये मित्रवत सहकार्य हा प्रकार आहे.

३. सहाय्यतामुलक सहकार्य :- दुष्काळ, भुकंप, महापूर व अन्य संकंटाच्या प्रसंगी केलेली मदत हे सहाय्यतामूलक सहकार्याचे उदाहरण आहे.

**ग्रीन च्या नुसार :-**

१. प्राथमिक सहकार्य :- कुटुंब, शेजार, सवंगडी इत्यादी.

२. द्वितीयक सहकार्य :- कार्यालये, कारखाना, राजकीय पक्ष इत्यादी

३. तृतीयक सहकार्य :- जेव्हा दोन घटकांत सहकार्य करणे हे आपत्कालीन परिस्थितीमुळे आवश्यक ठरते तेव्हा त्या सहकार्याला तृतीयक सहकार्य असे ग्रीनने संबोधिले आहे.

**सहकार्याचे महत्व :-** लहान मुलाला कुटुंबातच सहकार्य करण्याचे धडे दिले जातात. यालाच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास संपन्न होत असतो. मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच राजकीय अशा सर्वच क्षेत्रात सहकार्य ही मूलभूत प्रक्रिया दिसून येते. थोडक्यात समाजव्यवस्था ही सहकार्यावर निर्भर असते. म्हणूनच सहकार्य हे मानवी जीवनातील शाश्वत व सार्वत्रिक स्वरुपाचे तथ्य आहे असे रॉबर्ट पार्कने म्हटले आहे.

**प्रश्न क्र. ५ :- संघर्षाच्या व्याख्या लिहून संघर्षाची कारणे व प्रकार्य आणि अपकार्य लिहा?**

उत्तर :- संघर्षामध्ये विवेकापेक्षा भावनेचा प्रभाव अधिक असतो. विवेक वा बुध्दीवादापेक्षा भावना अधिक प्रबळ असतात. मार्क्सच्या मते, दोन वर्गामधील संघर्ष हाच प्रारंभापासून आजपर्यंतच्या मानवजातीचा इतिहास आहे. समाज व्यवस्थेत 'आहे रे' आणि 'नाही रे' असे दोन वर्ग असून त्यांच्यात सतत संघर्ष सुरु असतो. संघर्ष ही विघटनकारी प्रक्रिया आहे असेच मार्क्स मानतो परंतू सिमेल, डऱ्हेनडार्फ आणि कोझर यांनी मात्र संघर्षाला एकात्मता निर्माण करणारी प्रक्रिया असे म्हटले आहे. थोडक्यात मार्क्स संघर्षाच्या नकारात्मक पैलूवर भर देतो तर २० व्या शतकातील मार्क्सचे अनुयायी संघर्षाच्या सकारात्मक पैलूवर अधिक भर देतात.

व्याख्यार :-

१. हंट आणि हॉर्टनच्या मते :-

''प्रतिस्पर्ध्यांना दुबळे करुन आपले इप्सित साध्य करणच्या प्रक्रियेला संघर्ष म्हणतात.''

२. ऑगबर्न व निमकॉफच्या मते :-

''जेव्हा दोन पक्ष परस्परांविरुध्द झगडतात तेव्हा त्या वर्तनास संघर्ष असे म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता,

१. संघर्ष ही असहयोगात्मक प्रक्रिया आहे.
२. संघर्षात गुंतलेले दोन पक्ष परस्परांविरुध्द झगडतात.
३. ते एकमेकास बलपूर्वक रोखतात.
४. संघर्षात शारीरिक आणि मानसिक यापैकी एक अथवा दोन्ही प्रकारची हिंसा अभिप्रेत असते.
५. संघर्षात शेवटी एका पक्षाचा विजय आणि दुसऱ्या पक्षाचा पराभव होतो.

## संघर्षाची कारणे

संघर्ष हा समाजाचा स्थायीभाव आहे असे मार्क्स म्हणतो. जीवनाच्या अस्तित्वासाठी संघर्ष आवश्यक आहे असे डार्विन म्हणतो. मानवामधील हिंसेची जन्मापासून असणारी प्रवृत्ती हेच संघर्षाचे मुख्य कारण आहे असे फ्राईडने म्हटले आहे.

**१. व्यक्तिगत विषमता :-**

माणसा-माणसामध्ये असणारी शारीरिक, मानसिक, बौध्दिक विषमता स्वाभाविक वा नैसर्गिक आहे आणि तीच संघर्षाचे प्रमुख कारण ठरते.

**२. सांस्कृतिक विषमता :-**

सर्व समाजाची संस्कृती समान नसल्यामुळे समूह व समाज यांच्या सांस्कृतिक भिन्नतेतूनही संघर्ष निर्माण होतात.

**३. हितसंबंधांमधील संघर्ष :-**

विभिन्न व्यक्ती, समूह यांचे हितसंबंध वेगवेगळे असतात. अधिकाधिक नफा मिळविणे हा व्यापारी, उद्योगपती यांचा मुख्य हितसंबंध आहे तर रास्त किंमतीत वस्तू मिळणे हा ग्राहकांचा हितसंबंध आहे.

**४. सामाजिक परिवर्तन :-**

रुढीवादी वा स्थितीप्रिय व्यक्ती व समूहांचा सामाजिक परिवर्तनास विरोध असतो. म्हणून असंतुलित सामाजिक परिवर्तन हे देखील संघर्षाचे कारण असते.

## संघर्षाची प्रकार्ये

१. संघर्षातून अंतःसमूहात ऐक्यभाव वाढीस लागतो.
२. संघर्षातून समाजाचा विकास घडतो.

३. संघर्षाच्या प्रक्रियेत दुसऱ्या पक्षावर विजय मिळविण्यासाठी दोन्ही पक्षांना तयारी करावी लागते. त्यामुळे नवीन शोधांना चालना मिळते.

४. संघर्षाच्या प्रक्रियेत दोन्ही पक्ष परस्परांच्या जवळ येतात.

५. संघर्षामुळे समस्यांची सोडवणूक करण्यास मदत होते.

**संघर्षाची अपकार्ये**

१. संघर्षामुळे दोन्ही पक्षांची हानी होते.

२. संघर्ष विकासात अडथळा आणतो. संघर्षामुळे घलेला विकास काही क्षणात नष्ट होतो.

३. संघर्षामुळे लोकांच्या मनात ताणतणाव वाढून भयाची भावना निर्माण होते.

४. संघर्षातून समस्यची तीव्रता आणि त्यांची संख्या वाढते. संघर्षातून उद्‌भवणाऱ्या परिस्थितीत काही
समस्या नव्याने समोर येतात.

५. संघर्षात जेता ठरणारा पक्ष शोषक बनतो. इतकेच नव्हे तर विषमता दृढ होते.

प्रश्न क्र. ६ :- समायोजनाच्या व्याख्या लिहून समायोजनाचे प्रकार पध्दती लिहा?

उत्तर :- समाजयोन म्हणजे जुळवून घेणे होय असे जुळवून घेतांना नवे मार्ग स्वीकारावे लागतात. परिस्थितीशी तडजोड करावी लागते. वेतनवाढीसाठी कामगार संप करतात. कामगार युनियन आणि मालक यांच्यामध्ये वाटाघाटी होतात. या वाटाघाटीत कोणत्या तरी बिंदूकडे दोन्ही पक्षांचे एकमत होते. कामगार संप मागे घेतात आणि मालक वेतन वाढवितात. म्हणजे कामगार आणि मालक यांच्यात समायोजन झाले असते. थोडक्यात जेव्हा संघर्षात असलेल्या व्यक्ती वा समूहांमध्ये वैरभावना संपविण्यावर एकमत होते तेव्हा त्याला समायोजन असे म्हणतात.

**व्याख्या :-**

१. ऑगबर्न आणि निमकॉफच्या मते :-

''समायोजन म्हणजे परस्परांबाबत प्रतिकूल असणाऱ्या व्यक्ती आणि समूहाने परस्परांशी केलेली तडजोड होय?

२. हंट आणि हार्टनच्या मते :-

''समायोजन प्रक्रियेत संघर्ष करणाऱ्या व्यक्ती किंवा समूहांमध्ये तात्कालिक करार विकसित होतो.''

वरील व्याख्या लक्षात येता,

१. समायोजन ही प्राचीन आणि सार्वत्रिक प्रक्रिया आहे.
२. समायोजन दोन अवस्थांमधून घडते. एक प्रक्रिया आणि दुसरी स्थायी अवस्था.
३. समायोजन ही जाणीवपूर्वक घडवून आणलेली प्रक्रिया असते.
४. समायोजनात प्रेम व द्वेष यांचे संमीश्रण असते.

५. संघर्षातून सहकार्याकडे जातांना समायोजन हा मधला टप्पा असतो.

## समायोजनाचे प्रकार

१. समान पक्षातील समायोजन :- संघर्षात गुतलेले दोन्ही पक्ष संघर्षाचा त्याग करुन परस्परांशी समायोजन करतात. उदा.युध्द करणाऱ्या दोन देशामधील समायोजन टिकावू असते.

२. असमान पक्षातील समायोजन :- शक्ती, सत्ता, संपत्ती व्यक्त असमानता आहे अशा घटकांमध्ये संघर्ष होतो. या दोन असमान पक्षांपैकी कमजोर पक्ष हतबल होतो तेव्हा समायोजन केले जाते.

३. औपचारिक किंवा अनौपचारिक समायोजन :- आप्तसंबंधी समूहातील समायोजन हे अनौपचारिक असते तर लिखीत संमतीपत्रे, करारनामे, तह यांचा समावेश औपचारिक समायोजनात होते.

## समायोजनाच्या पध्दती

गिलीन आणि गिलिन यांनी समायोजनाच्या सात पध्दती स्पष्ट केल्या आहेत.

१. बलप्रयोग :- समायोजन प्रक्रियेत एक पक्ष दुसऱ्या पक्षावर शारीरिक शक्ती, शस्त्रास्त्रांची भिती, धनशक्ती इत्यादी मार्गाने दबाव आणून समायोजन साधल्या जाते.

२. तडजोड :- तडजोडीत सामान्यपणे दोनपैकी एका पक्षाा दुसऱ्या पक्षापेक्षा जास्त लाभ होतो. परंतु ही तडजोड दुसऱ्या पक्षाच्या सुध्दा हिताची असते.

३. मध्यस्थ :- दोन पक्षांमधील संघर्ष संपला पाहिजे त्याकरिता तिसरा पक्ष मध्यस्थाची भूमिका वठवितो. उद्योगपती व कामगार यांच्यामधील भांडणे तिसऱ्या पक्षामार्फत म्हणजे मध्यस्थांद्वारे मिटविली जातात.

४. सहिष्णुता :- समायोजन साधण्यासाठी सहनशीलतेचा वापर केला जातो. दुसऱ्याने केलेल्या नुकसानाकडे किंवा त्याने दिलेल्या त्रासाकडे तटस्थपणे राग व द्वेषाची भावना न बाळगता सहिष्णूतेच्या माध्यमातून समायोजन साधले जाते.

५. विचारामध्ये बदल करणे :- वेगवेगळया धर्म, पंथ, विचारसरणीमुळे संघर्ष उद्‌भवू शकतो. अशा वेळेस दुर्बल पक्ष दुसऱ्या पक्षाच्या विचारसरणीचा स्वीकार करतो म्हणजे त्याचे मतपरिवर्तन केले जाते.

६. उदात्तीकरण :- स्पर्धा करणारे पक्ष एखाद्या कार्यक्रमाचा समानरुपाने स्वीकार करुन दोन्ही पक्षांमध्ये असलेला संशय दूर करतात. तेव्हा उदात्तीकरणातून समायोजन साधले जाते.

७. तार्किक प्रशासन :- व्यक्ती किंवा समूह आपआपल्या कृतींचे तार्किकरितीने समर्थन करुन समायोजन साधतात. याशिवाय करार, मुदतीचा तह या देखील समायोजनाच्या पध्दती आहेत.

महत्व :- समयोजन प्रक्रियेत सहभागी झालेल्या पक्षांना मुलांमध्ये बदल केल्यामुळे परिवर्तनाचा प्रत्यय येवून भुतकाळ आणि वर्तमानकाळ यात समरसता स्थापित केली जाते.

**प्रश्न क्र. ७ :- संमीलन किंवा समावेशनच्या व्याख्या लिहून वैशिष्टये, फरक व महत्व लिहा?**

उत्तर :- जेव्हा एकाच ठिकाणी राहणारे दोन किंवा दोनपेक्षा अधिक संस्थेतील सांस्कृतिक समूहातऐक्होऊन त्याचा एक सांस्कृतिक समूह निर्माण होतो. तेव्हा त्याला संमीलनाची प्रक्रिया असे म्हटले जाते. सात्मीकरणासाठी प्रत्यक्ष संपर्काची गरज असते. त्यांच्यात असलेला संपर्क दीर्घकालीन असावा. समान भाषा नसली तरी प्रभावी समूहाची भाषा दूसरा समूह आत्मसात करतो. रॉबर्टपार्क ने सात्मीकरणास 'संस्कृती मिलाफ' म्हटले आहे.

**व्याख्या :-**

१. अँडरसन आणि पार्कर च्या मते :-

''ज्या सामाजिक प्रक्रियेत व्यक्ती किंवा समूह समान भावना आणि उद्दिष्टात सहभागी होण्यासाठी एकत्र येतात तेव्हा त्याला सात्मीकरण असे म्हणतात.''

२. ऑगबर्न आणि निमकॉफ च्या मते :-

''संमीलन ही अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे एकेकाळी वेगवेगळया असणाऱ्या व्यक्ती आणि समूह हे एकसारखे बनतात आणि त्यांच्या दृष्टिकोनात समानता येते.''

वरील व्याख्या लक्षात घेता सात्मीकरण द्विमार्गी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून वेगवेगळया संस्कृतीचे एकीभवन होते. या संदर्भात निग्रोचे अमेरिकेतील संस्कृतीशी झालेल्या एकीभवनाचा निर्देश करता येईल.

## संमीलन प्रक्रियेची वैशिष्टये

१. स्वाभाविक प्रक्रिया :- एकाच भूप्रदेशावर आणि एकमेकांच्या सतत संपर्कात राहील्यानंतर दोन्ही समूह एकमेकांच्या जीवनपध्दतीतील काही भागाचा सहजपणे स्वीकार करतात. ही प्रक्रिया मुद्दाम घडवून आणली जात नाही तर त सहजपणे घडून येते.

२. मंद प्रक्रिया :- दोन वेगवेगळया समुहात समायोजनाची प्रक्रिया दिर्घकाळ सुरु राहिल्यास त्यातून संमीलनाच्या प्रक्रिया चालना मिळते परंतु ही मंद प्रक्रिया आहे.

३. द्विमार्गी प्रक्रिया :- संमीलनात सामील असलेले दोन्ही पक्ष एकमकांच्या सांस्कृतिक गोष्टींची देवाणघेवाण करतात म्हणून संमीलन द्विमार्गी प्रक्रिया आहे.

४. सांस्कृतिक मिलाफ :- दोन वेगवेगळी संस्कृती असणारे समूह जेव्हा एकमेकांचीसंस्कृती स्वीकारतात तेव्हा त्यांचा सांस्कृतिक मिलाफ घडून येतो.

५. संघटनात्मक प्रक्रिया :- सांस्कृतिक भेद नष्ट करुन त्यांच्यात एकता निर्माण करणे हे या प्रक्रियेचे मुख्य कार्य असल्यामुळे संमीलन ही संघटनात्मक प्रक्रिया आहे.

## संमीलन आणि समायोजन यातील फरक

१. गती :-समायोजन हे अचानक व त्वरीत घडून येते तर संमीलन ही मंद व सतत चालणारी प्रक्रिया आहे.

२. स्वरुप :- आपण दुसऱ्याच्या संस्कृतीचा स्वीकार करीत आहोत अशी जाणीव ते स्वीकारणाऱ्यांना नसते म्हणून संमीलन हे जाणीवपूर्वक निर्माण करता येत नाही. याउलट समायोजन ही जाणीवपूर्वक घडून येणारी प्रक्रिया आहे.

**संमीलनाच्या प्रक्रियेचे महत्व**

समूहा-समूहातील भेदभाव बाजूला सारुन त्यांच्यात सामंजस्य निर्माण करणारी संमीलन ही चांगली व स्थायी पध्दती आहे. भाषा, सणवार, रितीरिवाज आदी असंख्य बाबतीत भिन्नता असूनही संमीलनाच्या प्रक्रियेने भारतीय समाजात एकता निर्माण करण्याला प्रोत्साहित केले आहे. त्यामुळे एकाच भुप्रदेशात आजुबाजूला राहणारे व भिन्न जीवनपध्दती असणारे समूह हे कालांतराने एकरुप होतात. म्हणून संमीलन स्थायीन स्वरुपाचे आहे.

**प्रश्न क्र.८ :- स्पर्धेच्या व्याख्या लिहून वैशिष्टये, प्रकार व महत्व लिहा?**

उत्तर :- स्पर्धा ही कोणत्याही समाजात अविरतपणे चालत असलेली प्रक्रिया आहे. या सृष्टीमध्ये जगण्यासाठी सतत संघर्ष (झगडा) चाललेला असतो. या झगडयामध्ये जे यशस्वी होतात ते टिकतात, जे अयशस्वी होतात ते नाश पावतात, असा सिध्दांत चार्लस डार्विन या निसर्ग तत्वनेत्याने मांडला. याचाच अर्थ निसर्गामध्ये सुध्दा स्पर्धा असते. यानंतर रिकॉर्डो आणि ॲडम स्मिथ यांनी आर्थिक क्षेत्रातील स्पर्धेच्या तत्वाचे विंचन केले. तथापि, समाजशास्त्रीय क्षेत्रामध्ये स्पर्धेच्या प्रक्रियेचे सामाजिक विश्लेषण कार्ल मॅनहिम यांनी केले.

व्याख्या :-

१. बोगार्डस यांच्या मते :- ''मागणीप्रमाणे पुरवठा होण्याइतपत जी गोष्ट उपलब्ध नसते, ती गोष्ट प्राप्त करण्याच्या चढाओढीला स्पर्धा असे म्हणतात.''

२. समाजशास्त्र कोषानुसार :- ''मर्यादित वस्तूंचा ताबा मिळविण्यासाठी होणाऱ्या झगडयाला स्पर्धा असे म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता

१. स्पर्धेत दोन किंवा अधिक व्यक्ती सामील झालेले असतात.
२. स्पर्धेच्या नियमांचे पालन सर्वांनाच करावे लागते.
३. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पक्षांचे हेतू वेगवेगळे असतात.
४. स्पर्धा ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

**स्पर्धेची वैशिष्टये**

१. सार्वत्रिक प्रक्रिया :- स्पर्धा ही सार्वत्रिक स्वरुपाची म्हणजे विश्वव्यापी प्रक्रिया आहे.

२. चढाओढ :- मर्यादित प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या वस्तू प्राप्त करण्यासाठी दोन पक्षांमध्ये चढाओढ सुरु असते.

३. अमर्यादित व्याप्ती :- मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये स्पर्धेची प्रक्रिया सुरु असते. म्हणून या स्पर्धेची व्याप्ती अमर्यादित आहे.

४. नियमांचे बंधन :- प्रत्येक क्षेत्रातील स्पर्धेचे काही नियम आहेत. ज्याचे पालन सहभागी होणाऱ्या दोन्ही पक्षांना करावेच लागते.

५. चेतन आणि अचेतन प्रक्रिया :- ज्यांना स्पर्धेची जाणीव नसते त्यांच्याकरीता स्पर्धा ही अचेतन प्रक्रिया असून त्यांना जाणीव असते त्यांच्यसाठी स्पर्धा चेतन प्रक्रिया ठरते.

**स्पर्धेचे प्रकार**

१) आर्थिक स्पर्धा २) सांस्कृतिक स्पर्धा ३) सामाजिक स्पर्धा ४) वांशिक स्पर्धा ५) राजकीय स्पर्धा ६) शुध्द स्पर्धा व मर्यादित स्पर्धा ७) वैयक्तिक व अवैयक्तिक स्पर्धा ८) पूर्व स्पर्धा आणि सापेक्ष स्पर्धा ९) अनिर्बंध स्पर्धा इ.

**स्पर्धेचे महत्व**

१. व्यक्ती पेक्षित दर्जा मिळवू शकते.

२. स्पर्धेमुळे कर्तृत्वप्रेरणा, कार्यक्षमता, उत्पादनाचा दर्जा इत्यादीत सुधारणा होते.

३. स्पर्धेमुळे भौतिक/बौध्दिक प्रगती होते. स्पर्धेमुळेच नवीन उत्पादने बाजारात येतात. शोधन व विकास क्षेत्रात प्रगती होते.

४. स्पर्धेमुळे व्यक्तिगत तसेच सामाजिक विकास होतो. उदा. शरीरसौष्ठत्व स्पर्धा, सुदृढ बालक स्पर्धा, पीकस्पर्धा, व्यसनमुक्त गाव स्पर्धा, साक्षर गाव स्पर्धा इत्यादी म्हणून स्पर्धा हया समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहेत.

**देवमन श्रीकृष्ण उंबरकर**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
स्व. वसंतराव कोल्हटकर कला
महाविद्यालय, रोहणा
ता. आर्वी, जि. वर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २०२१ च्या नव्या अभ्यासक्रमानुसार

# B.A.FIRST YEAR - 2nd SEMESTER Major-1

# सामाजिक प्रक्रियांचा परिचय

# INTRODUCTION OF SOCIAL PROCESSES



*CULTURE AND SOCIETY

*SOCIAL DEVIATION AND SOCIAL CONTROL

*SOCIAL STRATIFICATION AND SOCIAL MOBILITY

*MAJOR PERSPECTIVES IN SOCIOLOGY

AUTHOR
DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR
DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE. VASANTRAO KOLHATKAR ART'S COLLEGE, ROHANA
TAH.ARVI DIST.WARDHA (M.S.)

**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur**
**B.A.First Year: Semester-II Major-1**
**Introduction of Social Processes**

**1. Culture and Society:**

A) Meaning,Definition and Characteristics of Culture.
B) Elements of Culture:Cognitive Elements,Beliefs,Values and Norms,and Signs.
C) Culture and Ways of Individual Behaviour and Personality.

**2) Social Deviance and Social Control:**

A) Social Deviance and Conformity:Meaning and Definition,Causes of and Measures to Check Deviant Behivour.Factors Promoting Conformity.
B) Anomie and Social Deviation,Social Structure and Social Deviation.
C) Social Control:Meaning,Definition and Means-Formal and Informal Means.

**3) Social Stratification and Social Mobility:**

A) Social Defferentiation and Social Stratification.
B) Meaning,Definition and Forms of Social Stratification.
C) Functions and Dysfunctions of Social Stratification.
D) Social Mobility:Meaning,Definition and Types of Social Mobility.

4) **Major Perspectives in Sociology:**

A) Structural-Functional Perspective.
B) Conflict Perspective.
C) Feminist Perspective.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

बी.ए. भाग १ सेमीस्टर द्वितीय

**समाजशास्त्र : विषय आणि संकल्पना**

## युनिट क्र. १ : संस्कृती आणि समाज (Culture and Society)

### प्रश्न क्र. १ :— संस्कृतीच्या व्याख्या लिहून संस्कृतीची वैशिष्टये लिहा ?

उत्तर :— **प्रस्तावना** :— संस्कृतीशिवाय आपण मानव समाजाची कल्पनाच करु शकत नाही. मानवाने आपल्या बुध्दिमत्तेचा उपयोग करुन स्वत:ची वैशिष्टये पूर्ण अशी संस्कृती निर्माण केली. संस्कृतीचा अभ्यास केवळ समाजशास्त्र करते असेही नाही. इतिहास, मानवशास्त्र, तत्वज्ञान यासारख्या अनेक सामाजिक शास्त्रांमध्ये संस्कृतीचे अध्ययन केले जाते. सकाळी उठल्यापासून तर पुन्हा रात्री झोपेपर्यंत प्रत्येक व्यक्ती ज्या विविध क्रिया करते, त्या सर्वांवर समाजाच्या संस्कृतीचा प्रभाव असतो. म्हणून मानवाची जीवन जगण्याची पध्दती म्हणजे संस्कृती होय.

**व्याख्या :—**

१. **मॅलिनोव्हस्की** यांच्या मते, ‘‘ज्यांच्याद्वारे मानव आपली उद्दिष्टये साध्य करतो, ती
मानव निर्मित साधने व माध्यमे म्हणजे संस्कृती होय.’’

२. **डॉ. इरावती कर्वे** यांया मते :— ‘‘मनुष्य समाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरुप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टि म्हणजे संस्कृती होय.’’

वरील व्याख्या लक्षात घेता भौतिक व अभौतिक अशा दोन्ही संस्कृतीचा / गोष्टींचा समावेश संस्कृतीमध्ये होतो.

### संस्कृतीची वैशिष्टये

**१. संस्कृती ही मानवनिर्मित आहे** :— मानवाकडे मानवेत्तर प्राण्याकडे नसणारी बौध्दिक क्षमता असल्यामुळे मानवाने साहित्य, यंत्रे, दागदागिने, घरे यासारख्या भौतिक वस्तू प्रमाणेच रुढी, प्रथा, परंपरा यासारख्या अभौतिक गोष्टींचीही निर्मिती केली म्हणून संस्कृती ही मानवनिर्मित आहे.

**२. हेतुपूर्वक निर्मिती** :— मानवाच्या गरजा भागविण्यासाठीच मानवाने घरे, पोषाख या प्रमाणेच रुढी, प्रथा, परंपरांची हेतुपूर्वक निर्मिती केली.

**३. संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व** :— रामायण, महाभारत, भरतनाटयम, कथकली यासारख्या सांस्कृतीक गोष्टी व्यक्तीच्या मृत्यूनंतर देखील नष्ट होत नसल्यामुळे संस्कृती स्वतंत्र असते.

४. **सामूहिक मालकी** :– संस्कृती ही समाजातील कोणत्याही एका व्यक्तीच्या अथवा गटाच्या मालकीची नाही, संस्कृतीचे पालन सर्व लोक करीत असल्याने संस्कृतीवर समाजातील सर्व लोकांची सामूहिक मालकी असते.

५. **संस्कृती शिकावी लागते** :– कोणत्याही समाजाच्या संस्कृतीची ओळख नवजात शिशुला नसते. सांस्कृतिक गुण हे आनुवंशिक नसल्याने कुटुंबातील व कुटुंबाबाहेरील लोकांशी कसे वागावे हया गोष्टी मुलांना शिकाव्या लागतात.

६. **संस्कृतीत हस्तांतरण – क्षमता आहे** :– प्रत्येक समाजात सांस्कृतीक गोष्टींचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो. व्यक्ती बोलण्याद्वारे, लिखाणाद्वारे व अनुकरणाच्या प्रक्रियेद्वारे सांस्कृतीक गोष्टी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण करीत असते.

७. **संस्कृती संचयशील असते** :– मागील पिढीकडून प्राप्त झालेल्या सांस्कृतिक वारश्यात नवीन पिढी भर टाकत असते. उखळ, मुसळ, पाटे, वरवंटे, खलबत्ते नष्ट होत असून त्याची जागा आत मिक्सर, ग्राईंडर ने घेतली.

८. **संस्कृती प्रतिकात्मक आहे** :– मंगळसूत्र, स्वस्तिक, नारळ, राष्ट्रध्वज, क्रूसचे चिन्ह, कवडया या वस्तूंना प्रतिकात्मक अर्थ प्राप्त णला आहे. भाषेवरच संस्कृतिचा विकास अवलंबून असतो. भाषा हे कोणत्याही संस्कृतीचे एक मूलभूत वैशिष्टय आहे.

९. **संस्कृती परिवर्तनशील आहे** :– स्त्रियांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून उत्तर भारतात घुंघट प्रथा अस्तित्वात आली. आज स्त्रीया सुरक्षित असल्यामुळे घुंघट घेण्याची प्रथा हळूहळू लोप पावत आहे. प्रत्येक समाजातील भाषा, रुढी, श्रध्दा, कला व मूल्ये यात परिवर्तन होत असल्यामुळे संस्कृती परिवर्तनशील आहे.

१०. **संस्कृतीचे प्रसरण होते** :– भारतीय लोकांनी पाश्चिमात्य लोकांची वेशभूषा व केशभूषा, पोषाख पध्दती जेवताना काटे व चमचे यांचा उपयोग करण्याची पध्दती, उदारमतवादी विचारसरणी, भारताच्या दक्षिण भागातील इडली, दोसा, अलंकार याचा स्विकार केल्यामुळे संस्कृती प्रसरणशील असते.

११. **संस्कृती अमूर्त आहे** :– ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणके आणि संकेत किंवा चिन्हे ही संस्कृतीची चारही घटक तत्वे प्रत्यक्ष डोळयांनी पाहता येत नसल्यामुळे हॅरि जॉन्सन यांच्या मते संस्कृती अमूर्त आहे.

१२. **प्रत्येक समाजाची संस्कृती वेगवेगळी असते** :– समाजपरत्वे भाषा, कला, शासान, धर्म, शासन, कुटुंब आणि विवाहाचे प्रकार वेगवेगळे आहेत. त्यामुळे विभिन्न समाजाच्या संस्कृतीमध्ये सांस्कृतिक साधर्म्य आणि सांस्कृतिक वैधर्म्य आढळून येते.

१३. **संस्कृती समाज सदस्यांना त्यांच्या गरजा भागवून समाधानी ठेवते** :— सामाजिक, आर्थिक, मानसिक, उदरनिर्वाह विषयक गरजा भागविण्याच्या क्षमता संस्कृती मध्ये असल्यामुळे सुखी, समाधानी व आनंदी जीवन जगता येते.

१४. **संस्कृती ही एकात्मता निर्माण करणारी यंत्रणा होय** :— पूर्व औद्योगिक समाजात एकात्मता जास्त असून औद्योगिक समाजात कमी प्रमाणात एकात्मता दिसते. त्यामुळे एकात्मतेशिवाय समाज टिकू शकत नाही.

**प्रश्न क्र. २ :— संस्कृतीचे महत्व आणि प्रकार्ये लिहा ?**

उत्तर :— काळाच्या ओघात विभिन्न गरजा पूर्ण करण्याच्या संदर्भात रुढी, प्रथा, परंपरा, नियम, कायदे अस्तित्वात आले. परिणामी समाजाची संस्कृती समृध्द झाली. अमेरिका, जर्मनी, जपान, रशिया या देशांमधील समाजात नवीन नवीन शोध लागून ते प्रगत अवस्थेत पोहचलेले समाज झाले आहेत. २१ व्या शतकात दूरदर्शन, रेडिओ, वृत्तपत्रे व ग्रंथ इत्यादी माध्यमातून सांस्कृतिक गोष्टींचा प्रसार होत आहे. संस्कृती शिवाय समाज असूच शकत नाही तसेच समाजापासून संस्कृतीही वेगळी करता येत नाही. समाजा प्रमाणेच व्यक्तींच्या व्यक्तिमत्व निर्मिती आणि विकासामध्ये संस्कृतीचे महत्वपूर्ण योगदान असते.

**संस्कृतीची प्रकार्ये**

१. **एक सामाजिक प्राणी म्हणून मानवाची जडण घडण** :— तहान, भूक, झोप, मल, मूत्र विसर्जनाच्या क्रिया शिशू प्राण्याप्रमाणे करीत असतो. परंतु वाढत्या वयानुसार त्या केव्हा कोठे कराव्या, त्याचप्रमाणे बोलणे, चालणे, वागणे, आचार, विचार यासारख्या लहान गोष्टी संस्कृतीच्या माध्यमातून मूल शिकत असते म्हणून मानवाची जडणघडण हे संस्कृतीचे प्रकार्ये आहे..

२. **सामाजीकरण** :— सांस्कृतिक वारशामुळे प्रत्येक गोष्ट पुन्हा नव्याने शिकण्याची वेळ आजच्या पिढीतील मानवावर येत नाही. सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून समाज सदस्य आपआपल्या समाजाची संस्कृती आत्मसात करीत असल्यामुळे व्यक्ती आणि समाज यांच्यात अतूट नातेसबंध प्रस्थापित होतो.

३. **व्यक्तिमत्वाचा विकास** :— कोणत्याही व्यक्तीला व्यक्तिमत्व जन्मत: प्राप्त होत नसल्यामुळे समाजाच्या संस्कृतीद्वारे मिळवावे लागते. म्हणूनच व्यक्तिमत्व म्हणजे 'व्यक्तीने समाजाच्या संस्कृतीचा आत्मसात केलेला भाग होय. असे म्हटले जाते. श्रध्दा, रुढी, परंपरा, मूल्ये इत्यादी गोष्टी मुलांच्या मनात लहानपणापासून रुजविल्यामुळे व्यक्तिमत्वनिर्मिती आणि विकासाच्या दृष्टीने संस्कृतीचे स्थान महत्वपूर्ण आहे.

४. **सामाजिक नियंत्रण** :— सर्व व्यक्ती सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारे संस्कृती आत्मसात करीत असतात. आपण संस्कृती विरोधी वर्तन केल्यास लोक आपल्यावर टिका करतील या भितीमुळे संस्कृतीद्वारे सामाजिक नियंत्रण ठेवले जाते.

५. **जीवनाचा आराखडा** :— व्यापक अर्थाने संस्कृती म्हणजे जीवन जगण्याची पध्दती होय. व्यक्तीचे आपल्या जीवनात ध्येय कोणते असावे? तिने जीवन कसे व्यतीत करावे? याचा आराखडा संस्कृतीद्वारे निश्चित केल्यामुळे जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या विभिन्न संस्कारांचा अंतर्भाव संस्कृतीमध्ये केला जातो.

६. **सामाजिक प्रगती** :— योगविद्या, कथकली, भरतनाटयम, शास्त्रीय संगीत हा सर्व भारतीयांच्या मागच्या पिढीने नवीन पिढीसाठी ठेवलेला सांस्कृतिक ठेवा आहे. ज्या समाजाची संस्कृती अप्रगत असते तो समाज देखील विकासाच्या प्रारंभिक अवस्थेतून फारसा बाहेर आलेला नसतो. याउलट ज्या समाजाची संस्कृती प्रगत व प्रगल्भ असते तो समाज विकासाच्या दिशेने अग्रेसर होत असतो.

७. **संस्कृतीमुळे सुसंवाद साधता येतो** :— भाषा आणि प्रतिकांमुळे बहुसंख्य आंतरक्रिया शक्य होतात. विविध प्रसंगात इतर व्यक्ती नेमक्या कशा वागतील यांचा अंदाज बांधल्यामुळे सुसंवाद साधला जातो. संस्कृतीची ही कार्ये म्हणजे व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने संस्कृतीचे असलेले महत्व होय.

**प्रश्न क्र. ३ :— संस्कृतीचे घटक लिहा?**

उत्तर :— रसायनशास्त्रात हायड्रोजन ;भ्२द्ध आणि ऑक्सिजन ;व्२द्ध ही दोन पाण्याची घटक तत्वे आहेत असे म्हटले जाते. समाज आणि संस्कृतीचे अध्ययन करताना समाज शास्त्राचे अभ्यासक याच पध्दतीचा अवलंब करतात. संस्कृती ही अमूर्त असल्यामुळे तिच्या घटक तत्वांचा शोध घेतला की संस्कृतीची निर्मिती कशी होते याचा उलगडा होतो म्हणून घटकतत्वाचे अध्ययन आवश्यक ठरते. हॅरि जॉन्सन यांनी त्यांच्या ग्रंथात संस्कृतीच्या पुढील चार घटकांचे स्पष्टीकरण केले आहे.

१. **ज्ञान/बोधात्मक घटक** :— घनदाट जंगलात राहणाऱ्या आदिवासींना वनौषधींचे जेवढे ज्ञान आहे तेवढे अन्य कोणालाही नाही. टेबल, खुर्ची, अन्नपदार्थ, अलंकार यासारखी कोणतीही भौतिक वस्तू कशी निर्माण करावी याचे ज्ञान प्रत्येक मागची पिढी पुढच्या पिढीला देत असते. अभौतिक ज्ञानामध्ये आत्मा, परमात्मा, ब्रम्हांड या तर भौतिक ज्ञानामध्ये जमीन, डोंगर—दऱ्या, नद्या, हवामान, वृक्ष, पशुपक्षी, आकाश, चंद्र, सुर्य, तारे, अवजारे, हत्यारे इत्यादी ज्ञानाचा समावेश होतो. सृष्टीसंबंधीच्या ज्ञानामध्ये आचार, विचार, परंपरा, विश्वास या तर समाजाच्या विचारप्रणाली मध्ये समाजवाद, लोकशाही, उदारमतवाद, फॅसिस्टवाद यांचा समावेश होतो.

२. **श्रध्दा किंवा विश्वास** :— प्रत्येक व्यक्तीचा मृत्यू होत असला तरीही व्यक्तीच्या शरीरातून बाहेर पडणारा आत्मा हा अमर असतो. हा आत्मा पुन्हा नवीन देह धारण करुन जन्मास येतो. या संबंधीचे विश्वास प्रचलित असल्यामुळे भारतीय संस्कृतीचे स्वरुप आध्यात्मिक झाले आहे. भारतीय व्यक्ती नातेवाईकांच्या मृत्युनंतर त्यांच्या अस्थीचे विसर्जन गंगा किंवा अन्य कोणत्याही पवित्र नदीच्या पाण्यात करतात कारण गंगाजल हे पवित्र होय. असा विश्वास लोकांच्या मनामध्ये असल्यामुळे संस्कृतीचे घटकतत्व म्हणून विश्वासाचा विचार करणे योग्य ठरते असे हॅरि जॉन्सन म्हणतात.

३. **प्रमाणके/नियमने किंवा मूल्ये** :— पती—पत्नी, मालक—नोकर, शिक्षक—विद्यार्थी यासारख्या विभिन्न दर्जाशी संबंधित व्यक्तींनी परस्परांशी कोणत्या प्रकारचे सामाजिक संबंध ठेवावेत हे प्रमाणकांद्वारे निश्चित झालेले असते. हिंदूसाठी गोमांस भक्षण वर्ज्य आहे. पतीने स्वतःच्या पत्नीला मारझोड करु नये कारण या प्रमाणकाला समानतेच्या मूल्यांचा आधार आहे. लोकनीती, लोकरिती, प्रथा, परंपरा, नियम व कायदे यांचा समावेश सामाजिक नियनामध्ये होतो. कोणकोणत्या गरजा भागवाव्यात व कशा भागवाव्या हे संस्कृतीद्वारेच ठरत असते. कोणत्याही समाजात लोकांकडून नियमनांचे अगदी १०० टक्के पालन होतेच असे नाही. या परिस्थितीला अनुसरुन समाजशास्त्रज्ञ 'आदर्श आणि वास्तव' नियमने असा भेद करतात. याचा अर्थ प्रमाणकांची व मूल्यांची ओळख करुन घेतल्याशिवाय त्या समाजाच्या संस्कृतीचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही.

४. **चिन्हे/संकेत** :— चौकावर वाहनांची रहदारी नियंत्रित करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे लाल, पिवळा व हिरवा रंगाचे दिवे म्हणजे संकेत होय. रेल्वे मार्गावर लाल रंगाचे बावटे, डिटीनोटर्सचा आवाज यावरुन रेल्वेमार्गावर धोका आहे ही वास्तवता रेल्वे इंजिन चालविणारा चालक ओळखू शकतो. भाषेचा वापर करुन व्यक्ती आपले विचार, भावना, कल्पना, श्रध्दा, विश्वास कोणते आहेत हे व्यक्त करु शकते. एकही शब्द न उच्चारता केवळ डोळे मोठे केले की आईला काय म्हणावयाचे आहे? हे लहान मुलाला बरोबर समजते. याशिवाय राष्ट्रध्वज, सैनिकी गणवेश, राष्ट्रमुद्रा, मंदिरे, मशिदी, गुरुद्वारे ही सर्व प्रतीके होत.

**प्रश्न क्र. ४ :— संस्कृतीचे प्रकार लिहून भौतिक व अभौतिक संस्कृतीतील फरक लिहा?**

उत्तर :— डॉ. इरावती कर्वे, हरस्कोव्हिटस, क्युबर, पिडिंग्टन, ऑगबर्न यांनी संस्कृतीमध्ये टायलर, सोरोकिन, मॅक आयव्हर, हॅरि जॉन्सन यांनी संस्कृतीच्या केवळ अभौतिक अंगाला महत्व दिले आहे. टेलिव्हिजन ही वस्तू नष्ट झाली तरीही

त्यासंबंधीचे ज्ञान हे प्रत्यक्ष भौतिक वस्तूपेक्षाही अधिक महत्वाचे असते असे या विचारवंताचे म्हणणे आहे. ऑगबर्न यांनी संस्कृतीचे भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती असे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१. भौतिक संस्कृती** :— टाचणी पासून अंतरिक्ष यानापर्यंत ज्या—ज्या गोष्टी मानवाने निर्माण केलेल्या आहेत, त्या सर्वांचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये होतो. वेरुळ व अजिंठा येथील लेण्या, आग्राचा ताजमहाल, दक्षिण भारतातील शिल्पकलाकृतीचे उत्तम नमूने असणारी देवदेवतांची मंदिरे, उत्तर भारतीय संस्कृतीचे अभिन्न अंग आहेत. इजिप्तचे नाव घेताच आपल्या डोळयासमोर दिसणारे पिरॅमिड्स हा इजिप्तच्या संस्कृतीचा भाग आहे. मिक्सर, गॅस, वॉशिंग मशीन यासारख्या वस्तूंची निर्मिती ही मानवी जीवनावर परिणाम करणारी एक महत्वपूर्ण शक्ती आहे हे सर्वांनाच मान्य करावे लागते. मुंबईतील भौतिक वातावरण हे मुंबईत स्थलांतरित झालेल्या व्यक्तीच्या जीवनास नवीन वळण देणारे ठरते. म्हणजेच विविध यंत्रे, कपडेलत्ते, दागदागिने, नृत्याचे प्रकार, साहित्य, कला यासारख्या सर्व भौतिक वस्तूंच्या विश्वाला संस्कृतीचे एक अंग समजणे योग्य ठरते.

**२. अभौतिक संस्कृती** :— मंगळसूत्र ही भौतिक वस्तू आहे. परंतु मंगळसूत्र हे केव्हा वापरावे? कोणी वापरावे व कोणी का वापरु नये? यासंबंधी समाज मान्य पध्दती भारतीय समाजात निर्माण झाली म्हणूनच मंगळसूत्र हा अलंकार भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. कारण मंगळसूत्र सौभाग्याचे प्रतीक आहे, असा विश्वास प्रत्येक विवाहीत हिंदू स्त्रीच्या मनात आहे. म्हणूनच केवळ काळया रंगाच्या पोतीचा उपयोग करुन तयार केलेले मंगळसूत्र देखील गरीब परिस्थितीतील स्त्रियांसाठी सर्वात महत्वाचा व मौल्यवान असा अलंकार असतो. भारतीयांनी डायनिंग टेबल व खुर्च्या, सुट—बूट, पॅन्ट शर्ट याबरोबरच स्त्री शिक्षण, विवाहवयात वाढ, विधवा विवाहाला मान्यता यासारख्या गोष्टी स्वीकारल्या तरीही विवाह हा संस्कार आहे या तत्वाचे पालन आजही करीत असल्यामुळे व्यक्ती भौतिक वस्तूंबाबातचे बदल मान्य करतात परंतू अभौतिक संस्कृतीत मात्र बदल करण्यास समाज तयार नसतो. म्हणजे भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती या दोहोंमध्ये अभौतिक संस्कृती ही सापेक्षत: अधिक महत्वाची आहे.

**भौतिक आणि अभौतिक संस्कृतीमधील फरक :—**

१. भौतिक संस्कृती साधनस्वरुप असून अभौतिक संस्कृती साध्यस्वरुप असते.

२. भौतिक संस्कृतीमध्ये अंतर्भूत असणाऱ्या गोष्टींची तुलना करता येते पण अभौतिक संस्कृतीची नाही.

३. भौतिक संस्कृती ही प्रगतीशिल असते तर अभौतिक संस्कृतीबाबत असे निश्चितपणे सांगता येत नाही.

४. अभौतिक संस्कृतीपेक्षा भौतिक संस्कृती अधिक परिवर्तनशील असते.

५. भौतिक संस्कृतीचा स्वीकार लवकर केल्या जातो. त्यामानाने अभौतिक संस्कृती स्वीकारण्यास समाज तयार नसतो.

६. व्यक्ती भौतिक संस्कृतीचा उपभोग घेतात तर अभौतिक संस्कृती जपतात.

७. कुटुंब, विवाह, धर्म, शिक्षण, अर्थ, राज्य या संस्थांच्या द्वारे असंख्य लोक अभौतिक

संस्कृतीचे संपादन करीत असतात.

**सांस्कृतिक पश्चायन :—**

आॅगबर्न व निमकॉफ यांनी आपल्या सोशल चेंज ;वबपंस बींदहमद्ध या ग्रंथात सांस्कृतिक पश्चायनाचा सिध्दांत मांडला आहे. त्यामध्ये ''संस्कृतीचा भौतिक भाग वेगाने परिवर्तन होवून त्याच्याशी निगडित असलेल्या संस्कृतीचा अभौतिक भाग मागे रेंगाळणे म्हणजे सांस्कृतिक पश्चायन होय असे आॅगबर्नने स्पष्ट केले आहे. भारतात वाहतुकीच्या साधनांमध्ये झपाटयाने बदल झाले. बैलगाडी, टांगा, रिक्षा यांची जागा आता स्वयंचलित वाहनांनी घेतली आहे तरीही आज मोटार, ॲटो यासारखे वाहन घेतले तरिही त्याची पूजाअर्चा केली जाते म्हणजेच संस्कृतीचे अभौतिक अंग मागेच रेंगाळत राहिले आहे.

**प्रश्न क्र. ५ :— सांस्कृतिक सापेक्षतावादाचा अर्थ लिहून टिकात्मक परिक्षण करा?**

उत्तर :— योग्य—अयोग्यतेच्या, नीती—अनीतीच्या, चांगले—वाईटपणाच्या कल्पना हया संस्कृती सापेक्ष असतात असा सांस्कृतिक सापेक्षवादाचा अर्थ आहे. एखाद्या समाजात जी नियमने व मूल्ये असतात त्यापेक्षा अगदी वेगळी अशी नियमने व मूल्ये दुसऱ्या समाजात असू शकतात. म्हणजे नैतिक आणि अनैतिक या विषयीच्या कल्पना त्या—त्या समाजापुरत्याच मर्यादित असतात. हिंदू समाजात काळे वस्त्र परिधान करणे अशुभ मानले जाते तर मुस्लिम समाजात शुभ मानले जाते. याचा अर्थ एकाच वर्तनाच्या बाबतीत वेगवेगळया संस्कृतीची नियमने आणि मूल्ये वेगवेगळी असू शकतात. जगामधील सर्वच्या सर्व समाजांना लागू होतील अशी नियमने, मूल्ये व नितीकल्पना सापडणे अवघड आहे.

**टिकात्मक परिक्षण :—**

भारतीय संस्कृतीत लग्नापूर्वी संतती झालेल्या मुलीचे लग्न जमणे अत्यंत अवघड आहे. तर बोन्टेक या आदिवासी जमातीत अशा मुलीचे लग्न होणे फारच सोपे

आहे. अशाप्रकारे एका समाजातील वर्तनपध्दती किंवा वर्तनप्रकार, नियमने, मूल्ये, नितीकल्पना दुसऱ्या समाजाला लागू होतीलच असे नाही असा सांस्कृतिक सापेक्षतावादाचा अर्थ आहे. व्यक्तीच्या वर्तन पध्दतीचे मूल्यांकन त्या—त्या समाजाच्या संस्कृतीच्या संदर्भातच केले पाहिजे असे सांस्कृतिक सापेक्षतावादाची संकल्पना मांडणाऱ्या समाजशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

**प्रश्न क्र. ६ :— स्वसमूह केंद्रितता किंवा स्वसमूह श्रेष्ठतावाद संकल्पनेच्या व्याख्या लिहून कारणे, परिणाम व टिकात्मक परिक्षण लिहा?**

उत्तर :— स्वसमूहकेंद्रितता ही संकल्पना सर्वप्रथम विल्यम जी. सम्नेर यांनी त्यांच्या श्थ्वसांूलेश या ग्रंथात १९०६ मध्ये मांडली. आपल्या समूहाला केंद्रस्थानी मानून आपला समूह वा संस्कृती हीच श्रेष्ठ आहे आणि अन्य सर्व समूह व त्यांच्या संस्कृती कनिष्ठ आहेत असे मानण्याची प्रवृत्ती म्हणजे स्वसमूहकेंद्रियता होय.

**<u>व्याख्या</u> :—**

१. विल्यम पी. स्कॉटच्या मते, ''आपलीच संस्कृती वा समूह मूलत:च श्रेष्ठ आहे अशी

त्या विषयीची अभिवृत्ती म्हणजे स्वसमूहकेंद्रितता होय.''

२. विल्यम जी सम्नेरच्या मते :— ''स्वत:च्या समूहाला केंद्रस्थानी मानून इतरांचा दर्जा आपल्या समूहाच्या संदर्भात निश्चित करण्याचा दृष्टिकोन म्हणजे स्वसमूहकेंदितता होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता, १) आपला समाज व संस्कृती श्रेष्ठ आहे असे मानण्याची प्रवृत्ती म्हणजे स्वसमूह केंद्रितता होय. २) स्वसमूह केंद्रितता ही मानवी प्रवृत्ती आहे. ३) यात स्व—संस्कृतीला केंद्रस्थानी मानले जाते. ४) इतर संस्कृतीच्या मूल्यमापनाचा आधार स्वसंस्कृती असते. ५) स्वसमूह श्रेष्ठ असून इतर समूहाला कनिष्ठ मानले जाते.

**स्वसमूह केंद्रिततेची कारणे :—**

**१. <u>सवय</u>** :— आपले अन्न, संगीत, आपले कौटुंबिक व सामाजिक जीवन इत्यादी गोष्टींची अनेक वर्षापासून सवय होते. सवयीमुळे आपली संस्कृती श्रेष्ठ आहे असे आपणास वाटते.

**२. <u>ज्ञानाचा अभाव</u>** :— काही आदिवासी जमातीत 'वधुमूल्य' घेण्याची प्रथा आहे. त्याचे कारण पैशाचा मोह किंवा लोभ नसून मुलीची सुरक्षितता हे आहे. यासंबंधीच्या ज्ञानाचा अभाव असेल तर वधुमूल्य घेण्याचे वर्तन हीन दर्जाचे आहे असे ठरवून आपण मोकळे होतो.

**३. जोपासना** :— काही समाजांमध्ये स्वसमूहकेंद्रिततेची भावना जाणीवपूर्वक जोपासली जाते. आपलीच संस्कृती श्रेष्ठ आहे असे संस्कार सातत्याने केले जातात. यातूनच समाजात स्वसमूह श्रेष्ठतावादाची भावना बळावते.

**४. व्यक्तिगत उणिवा** :— ज्या व्यक्तींजवळ विचार करण्याची पात्रता कमी प्रमाणात असते ते अधिक स्वसमूहकेंद्रिततावादी असतात. कारण अशा व्यक्तींच्या दृश्टीने कोणतीही गोष्ट ही एक तर चांगली असते नाही तर वाईट असतेच.

### स्वसमूहकेंद्रिततेचे परिणाम

१. स्वसमूह श्रेश्ठता वादामुळे समाजसंघटनास, स्थैर्यास मदत होते. याउलट समूहा—समूहात संघर्ष व कटुता निर्माण होऊन संपूर्ण समाजाचे ऐक्य धोक्यात येण्याची शक्यता असते.

२. ही भावना असल्याशिवाय कोणताही समूह टिकून राहणे कठीण आहे. त्या भावनेमुळे समूह रक्षणासाठी त्याग करण्याची भावना/प्रेरणा निर्माण होते. त्या भावनेशिवाय राष्ट्रीय जाणिवेची निर्मिती जवळजवळ अशक्य आहे.

३. ‘जैसे थे’ वादीप्रवृत्ती वाढून परिवर्तनाला विरोध करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते.

४. संयमित स्वसमूह श्रेष्ठतावाद पोषक असला तरी त्याने मर्यादा सोडली की घातक ठरतो. त्यामुळे राष्ट्रा—राष्ट्रात युध्द घडून येऊ शकतात.

**टीकात्मक परिक्षण :—**

स्वसमूह श्रेष्ठतावाद अटळ असून त्यापासून अलिप्त राहणे कोणत्याही समाजाला शक्य नाही असे असले तरीही या भावनेपोटी इतरांशी गैरव्यवहार करणे, इतरांना दुय्यम वा हीन लेखणे मात्र विचाराअंती टाळू शकतो. त्याकरिता वस्तुनिष्ठ वृत्तीने सामोरे जाण्यासाठी परिपक्वतेची गरज असते.

**प्रश्न क्र. ७ :— व्यक्तीमत्वाच्या व्याख्या लिहून संस्कृतीचा व्यक्तीमत्वावरील प्रभाव आणि संस्कृती व व्यक्तीमत्व यांच्या परस्पर संबंधाचे स्वरुप स्पष्ट करा?** ;छंजनतमए ैवबपमजल ंदक बनसजनतमद्ध

उत्तर :— सी. क्लुकोहन आणि एच.ए.मरे यांनी संपादित केलेल्या नेचर सोसायटी अँण्ड कल्चर ;छंजनतमए ैवबपमजल ंदक बनसजनतमद्ध या पुस्तकात व्यक्तीमत्वाबाबत असे म्हटले आहे की, प्रत्येक माणूस हा काही बाबतीत इतर सर्वांसारखा असतो, पण काही बाबतीत तो इतर कोणाही सारखा नसतो. प्रत्येक व्यक्तीच्या अस्तित्वाचे हे जे अद्वितीयत्व आहे हेच तिच्या व्यक्तीत्वाचे सार होय.

व्यक्तिमत्व म्हणजे विविध गुणविशेषांचा विशिष्ट रितीने संघटित झालेला समुच्चय होय.

**व्याख्या :—**

१. **पार्क आणि बर्जेस यांच्या मते :—**

''समूहातील व्यक्तींच्या भूमिकेचे स्वरुप ठरविणाऱ्या वैशिष्टयांचे संकलन व संघटन म्हणजे व्यक्तीमत्व होय.''

२. **गार्डन ऑलपोर्ट यांच्या मते :—**

''व्यक्ती—व्यक्तींमधील सर्व शारीरिक आणि सामाजिक गुणांचा प्रत्ययात्मक किंवा गतिमान अनुभव घेणे यास व्यक्तिमत्व म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता, १) व्यक्तिमत्व हे व्यक्तिगत गुणांचे संघटन होय. २) व्यक्तिमत्वामुळे प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व समजते. ३) व्यक्तीचे व्यक्तिमत्व हे तिच्या वर्तनक्रिया विचार, हावभाव व्यक्त करण्याच्या पध्दती, भाषा व सवयी यातून व्यक्त होते. ४) व्यक्तिमत्वाची निर्मिती व विकास ही एक प्रक्रिया आहे. ५) मनुष्यप्राण्यावर जे संस्कार होतात, त्यातून जे रंगरुपाला येते ते म्हणजेच व्यक्तिमत्व होय. ६) शास्त्रीय दृष्टिकोणातून व्यक्तिमत्वाचा विचार चार बाजूंनी केला जातो. त्या म्हणजे शारीरिक बाजू, मानसिक बाजू, सामाजिक बाजू आणि सांस्कृतिक बाजू होय.

**संस्कृतीचा व्यक्तिमत्वावरील प्रभाव :—**

व्यक्तिमत्वाची जडण—घडण ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. व्यक्तिमत्वाच्या घडणीतून आनुवंशिकता आणि सामाजिक—सांस्कृतिक वातावरण परस्परांपासून पृथक्करणे अशक्य आहे. समाजाच्या संस्कृतीची काही ठळक वैशिष्टये ही त्या समाज सदस्यांच्या आचार—विचारातूनच व्यक्त होत असतात. म्हणून संस्कृतीची व्यक्तिनिष्ठ बाजू म्हणजे व्यक्तीमत्व होय असे म्हटले जाते. प्रत्येक समाजाची संस्कृती व्यक्तिमत्वाला वळण लावण्याचे कार्य करते. मुलाच्या व्यक्तिमत्व घडणीत आई—वडील, घरामधील व शाळेतील वातावरण, मित्रमंडळ आणि अन्य सामाजिक घटकांचा प्रभाव असतो. एस्किमो लोकांची संस्कृती व औद्योगिक समाजाची संस्कृती यात संस्कृतीनुसार भिन्नता दिसून येते. त्याप्रमाणेच केंद्र कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांच्या व्यक्तिमत्वात सहनशीलता, आज्ञापालन, प्रेम, त्याग, सहकार्य या गुणांचे अस्तित्व अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येते. कारण संस्कृतीनुसार व्यक्तिमत्वाची घडण होते. डोबुअन संस्कृतीच्या विशिष्ट रचनेमुळे डोबुअन माणसांच्या व्यक्तिमत्वात शत्रुत्व, मत्सर, फसवेगिरी इ. गुणवैशिष्टये दिसून येतात. झूनी संस्कृतीमुळे सुरक्षितता, शांतपणा व सहकार्य हे गुण तर क्वाकिउल्ल

संस्कृतीत भयग्रस्त, चिंतायुक्त, वैफल्यग्रस्त आणि स्पर्धाशील असे व्यक्तिमत्व तयार होते.

**संस्कृती आणि व्यक्तिमत्व यांच्या परस्पर संबंधाचे स्वरुप :—**

रुथ बेनेडिक्ट, एल्फ लिटन, मार्गारेट मीड यांनी व्यक्तीमत्व ही केवळ संस्कृतीची निर्मिती आहे असे कोठेही म्हटले नाही कारण एकाच संस्कृतीतील व्यक्तीमत्वे एकसारखी नसतात. त्यामुळे **'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती'** याचा अनुभव येतो. व्यक्तीमत्व घडविण्यात आनुवंशिकता, परिस्थिती आणि सामाजिक अनुभव यांचे योगदान असते. असे असले तरी समान संस्कृती असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत काही प्रमाणात सारखेपणा दिसून येतो. याला अनुसरुन स्पायरो यांनी ''व्यक्तीमत्वाचा विकास आणि संस्कृतीचे संपादन या दोन भिन्न प्रक्रिया न सून ती एकच शिक्षण प्रक्रिया आहे'' असे म्हटले आहे तर ''संस्कृती हा व्यक्तीमत्वाचा सामुहिक पैलू आहे असे हार्टन आणि हंट यांनीही म्हटले असून ते योग्यच आहे.

# युनिट क्र. २

## सामाजिक विचलन आणि सामाजिक नियंत्रण

## (Social Deviation and Social Control)

**प्रश्न क्र. १ :— सामाजिक विचलनाच्या व्याख्या लिहून त्याची कारणे व उपाय लिहा.**

उत्तर :— स्तुती, पारितोषिके, शिक्षा, शिक्षण, बंधने इत्यादी मार्गाचा अवलंब करुन लोकांद्वारे सामाजिक नियमनांचे अनुसरण केले जाईल अशी दक्षता प्रत्येकच समाज घेत असतो. सामाजिक नियमनांची माहिती व जाणीव असतांनाही व्यक्तीकडून त्या प्रमाणकाचे होणारे उल्लंघन म्हणजे सामाजिक विचलन होय. चोरी करणे, दहशतवादी कृत्ये करुन निष्पाप लोकांना ठार मारणे, लाचलुचपत स्वीकारणे, महिलांवर अत्याचार करणे ही सर्व सामाजिक विचलनाची उदाहरणे आहेत.

**व्याख्या** :—

१. **शेपर्ड आणि ब्रुटनच्या मते,**

''समूहाचे किंवा समाजाचे नियम मोडून होणारे वर्तन म्हणजे सामाजिक विचलन होय.''

२. **एलिस व लिपेट्सच्या मते,**

''समाजाने संमत केलेल्या प्रमाणकांपेक्षा वेगळे आचरण म्हणजे विचलीत वर्तन होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता १) व्यक्तीकडून नियमनांचा भंग करणारे वर्तन घडले असेल तर त्याला विचलनात्मक वर्तन असे म्हणतात २) नियमनानुसार निश्चित होणाऱ्या चौकटीपेक्षा विचलनात्मक वर्तनाची दिशा वेगळी असते. ३) नियमनांची जाणीव असून देखील त्याचा मुद्दाम भंग केला जातो तेव्हा ते विचलन ठरते असे जॉन्सन म्हणतात.

**सामाजिक विचलनाची कारणे**

विचलनात्मक वर्तन हा व्यक्तीच्या व्यक्तीमत्वामधील जैविक, मानसिक, आर्थिक, सामाजिक घटकांचा असा संयुक्तिक दबाव आहे की जो व्यक्तीला सामाजिक नियमनांचे उल्लंघन करावयास भाग पाडतो. हे विधान मान्य केले तरीही त्यामुळे विचलनात्मक वर्तनाचे सुयोग्य स्पष्टीकरण मिळत नाही असे समाजशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. विचलनात्मक वर्तनासाठी जबाबदार असणारी सामाजिक कारणे पुढीलप्रमाणे,

१. **अज्ञान** :— नियमनांच्या अस्तित्वासंबंधी अज्ञान असल्यामुळे त्यांचे आपल्याकडून पध्दतशीरपणे उल्लंघन झाले आहे हे लक्षात येताच आपण घाबरुन जातो. कुत्रा, मांजर, कोंबडी, बकरी, गाय यासारख्या मुक्या प्राण्यांना आपल्या वाहनाच्या

अपघातामुळे इजा झाल्यास फारशी गंभीर दखल न घेतल्यामुळे त्याचे परिणाम फारसे गंभीर नसतात.

२. **काही प्राप्त करण्याची आकांक्षा** :— अमेरिकेत श्रीमंत, मध्यम व कनिष्ठ अशा सर्वच वर्गातील मुलांना लहानपणापासूनच भौतिक संपत्ती प्राप्त करणे हेच त्यांच्या जीवनाचे साध्य होय असे शिकविले जाते. भारतात श्रीमंत आणि मध्यम वर्गातील मुले समाजमान्य मार्गांनी भौतिक संपत्ती मिळविण्यासाठी आपली योग्यता परिश्रमपूर्वक वाढवितात. याउलट कनिष्ठ वर्गातील मुलांना अशी संधी न मिळाल्यामुळे लुटमार, घरफोडी, जुगार, मद्यपान, अंमली पदार्थांचे सेवन यामध्येच सुरक्षित वाटू लागण्याची शक्यता असते.

३. **नामनिर्देश** :— गुन्हेगार शिक्षा भोगून तुरुंगातून परत आला तरीही तो गुन्हेगारच आहे असे मानण्याची अनेक लोकांची प्रवृत्ती असते. परिणामी तुरुंगातून शिक्षा भोगून परत आलेली व्यक्ती पुन्हा गुन्हेगारी कृत्ये करण्याकडे वळण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे नामनिर्देश हे विचलीत वर्तनाचे कारण ठरते.

४. **दोषपूर्ण सामाजीकरण** :— सामाजिक नियमांचे पालन करण्याचे संस्कार व्यक्तीवर सामाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे केले जातात. परंतु आई—वडीलांचाच ज्या नियमावर विश्वास नाही त्याचे पालन मुले सुध्दा करत नसल्यामुळे विपथगमन घडून येते.

५. **कमकुवत पुरस्कार आणि दंडव्यवस्था** :— सामाजिक नियमांचे पालन केल्यानंतर पुरस्कार व उल्लंघन केल्यानंतर दंड देण्याची व्यवस्था कमकुवत असेल तर निपथगामी वर्तन घडते.

६. **संयुक्तीकरण** :— परिक्षेत गैरमार्गाचा अवलंब करणारा विद्यार्थी मी फार आजारी होतो, घरातील परिस्थिती गरीबीची आहे, आई कॅन्सरपीडीत आहे याद्वारे स्वत:च्या वर्तनाचे समर्थन करतो त्यामुळे निपथगामी वर्तन घडून येते.

७. **कमकुवत अंमलबजावणी** :— पोलीस उपस्थित असताना देखील काही चित्रपट— गृहांसमोर सिनेमा तिकीटांचा काळा बाजार सुरु असतो. कायदे जटिल असल्याने एखाद्या व्यक्तीने त्याचा भंग केला आहे हे सिध्द करणे कठीण असल्यामुळे विपथगामी वर्तन घडते.

८. **नियमांची अस्पष्टता** :— प्रथा, लोकाचार, लोकनीती ही लिखीत नसल्यामुळे मुलांच्या विवाह प्रसंगी हुंडा घेण्याची रुढी आहे म्हणून हुंडा घेतला असे सांगतात त्यामुळे विपथगामी वर्तन घडून येते.

९. **भ्रष्ट अंमलबजावणी** :— परिक्षेत गैरमार्गाचा अवलंब करुन कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे किंवा भ्रष्ट अंमलबजावणी मुळे विपथगामी वर्तन धडून येते.

१०. **नियमनांचा भंग उघडकीस न येणे** :— विपथगामी वर्तन उघडकीस न आल्यामुळे व्यक्ती पुन्हा पुन्हा विपथगामी वर्तन करु लागते.

११. **गुन्हा पिडीतांचे साध्य** :— लैंगिक स्वरुपाचे गुन्हे, भ्रष्टाचाराचे गुन्हे करतांना गुन्हेगारांना साथ दिल्यामुळे विपथगामी वर्तन घडून येतात.

१२. **विपथगमनाचे समर्थन** :— दहशतवादी कृत्य करतांना मृत्यु पावणारे लोक धर्मरक्षणासाठी लढून मृत्यु पावले, शहीद झाले असे समर्थन दिल्यामुळे दहशतवाद्यांच्या कारवायांचा नायनाट करणे कठीण होत आहे.

**विचलनात्मक वर्तनावरील उपाय :—**

१. **गुन्हयाच्या प्रकारानुसार उपाययोजना** :— बालगुन्हेगारी, प्रौढ गुन्हेगारी, दहशतवाद, भ्रष्टाचार, पांढरपेशा वर्गाचे गुन्हे यासारख्या गुन्हयाचे स्वरुप वेगवेगळे असल्यामुळे उपायांमध्ये फरक असणे स्वाभाविक ठरते.

२. **प्रतिबंधात्मक उपाय** :— बालन्यायालये, बालगुन्हेगारी सुधार संस्था स्थापन करणे, बालकामगार बंदी आणि सक्तीच्या व मोफत शिक्षणाची व्यवस्था करणे, भग्न कुटुंबाची संख्या कमी करणे या सर्व गोष्टींचा समावेश बालगुन्हेगारीवरील प्रतिबंधात्मक उपाययोजनेत होतो. याचा अर्थ गुन्हयांनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे स्वरुपही भिन्न आहे.

३. **उपचारात्मक उपाय** :— १) विचलनात्मक वर्तन करणाऱ्या व्यक्तीमध्ये सुधारणा घडून येण्यासाठी तिला भावनात्मक आधार दिला पाहिजे. २) गुन्हा पिढीत व्यक्तीशी कठोर स्वरुपातील व्यवहार करु नये. ३) गुन्हा पिढीत व्यक्तीला जास्त स्वातंत्र्य दिल्यास ती अधिक विचलीत वर्तन करु शकते. तर विरोध केल्यास तीव्र प्रतिक्रिया देऊ शकते. ४) गुन्हा पिढीत व्यक्ती योग्य वर्तन करीत असेल तर पारितोषिक द्यावे त्यामुळे प्रोत्साहन मिळते. गुन्हयानुसार उपायांचे स्वरुप भिन्न असणे स्वाभाविक ठरते.

**प्रश्न क्र. २ :— सामाजिक अनुचलनाच्या व्याख्या लिहून अनुचलनाची कारणे किंवा सामाजिक अनुचलनाला प्रोत्साहित करणारे घटक लिहा?**

उत्तर :— **१) सामाजिकरण** :— सामाजिकरण होत असतांना व्यक्तींवर कुटुंबात जे संस्कार होतात त्यामुळे व्यक्तीमध्ये सामाजिक प्रमाणकांचे पालन करण्याची वृत्ती निर्माण होते. संस्काराचा प्रभाव जेवढा जास्त तेवढे अनुचलनात्मक वर्तन घडते.

२) **पृथक्करण किंवा रोधन** :— कुटुंबात मुलांच्या आईची भूमिका, घरात गृहिणीची भूमिका, शाळेत शिक्षीकेची भूमिका अशा भुमिकांमुळे भूमिका संघर्ष निर्माण होतो. अशावेळी कोणती भूमिका महत्वाची हे पृथक्करणाने ठरविले जाते. त्यामुळे भूमिका संघर्षाचे रोधन केल्यामुळे अनुचलनात्मक वर्तन घडून येते.

३) **नियमनांचा क्रम निर्धारित करणे** :— प्रत्येक व्यक्तीला पती, वडील, काका, मामा, भाऊ यासारखा भूमिका कराव्या लागत असल्या तरी भूमिका करतांना त्यांचा क्रम निर्धारित केल्यामुळे अनुचलनात्मक वर्तन घडून येते.

४) **सामाजिक नियंत्रण** :— अनुचलनात्मक वर्तनासाठी प्रथा, परंपरा, लोकरुढी, लोकनीती याप्रकारच्या अनौपचारीक तर पोलीस यंत्रणा, शासन यंत्रणा व न्याय यंत्रणा सारख्या औपचारिक नियंत्रणाची व्यवस्था सर्वत्र निर्माण झाली आहे.

५) **विचारप्रणाली** :— समाजातील प्रमाणके व मूल्यांच्या माध्यमातून विचारप्रणालीची निर्मिती होते. नियमनांवरील विश्वास वाढून अनुरुप वर्तन घडून येते.

६) **सुप्त हितसंबंध** :— मुलाच्या लग्नात मिळणारा हुंडा हे वरपित्याचे एक सुप्त हित आहे. त्यामुळे त्याचे पालन करण्याची वृत्ती सर्वच व्यक्तींमध्ये निर्माण होईल असा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सुप्त हितसंबंध हे अनुचलनात्मक वर्तनाचे कारण आहे.

**प्रश्न क्र. ३ :— प्रमाणकशून्यता आणि सामाजिक विचलन यांच्यातील संबंध स्पष्ट करा?**

उत्तर :— **१) प्रमाणकशून्यता आणि सामाजिक विचलन यांच्यातील संबंध** :— प्रमाणक शुन्यतेची संकल्पना सर्वप्रथम मॅक आयव्हरने मांडली तरीही त्यांच्या विश्लेषणाचे श्रेय एमिल दुर्खिम यांनाच द्यावे लागते. 'आत्महत्या' या सामाजिक वर्तनप्रकाराचे आकलन करुन घेण्यासाठी दुर्खिमने प्रमाणकशुन्यता या संकल्पनेचा उपयोग केला. गटाचा सदस्य म्हणून व्यक्ती त्या गटाशी जितक्या जास्त प्रमाणात तादात्म्य झालेली असते. तितक्या प्रमाणात त्या व्यक्तीकडून आत्महत्या घडण्याची शक्ता कमी होते. याचा अर्थ व्यक्तीचे गटापासून होणारे विलगीकरण जास्त असल्यास अशा व्यक्तीकडून आत्महत्या घडण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे आत्महत्येसारखी घटना वैयक्तिक स्वरुपाची असूनही दुर्खिम यांनी आत्महत्या ही सामाजिक घटना मानली. व्यक्तीच्या गरजापूर्तीसाठी तिला मनास येईल तसे वागण्याची अनुमती समाज देऊ शकत नाही. कारण तसे केल्यास समाजव्यवस्था टिकणार नाही. म्हणून व्यक्तीवर्तनावर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था सगळयाच समाजात निर्माण होते. तंत्र—विज्ञानात्मक परिवर्तन, प्रगती वा अवनतीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत नियमांची पर्वा न करता व्यक्ती जे वर्तन करते त्यावेळी जी नियमहिनतेची स्थिती

निर्माण होते त्या स्थितीला प्रमाणकशुन्यता असे दुर्खिमने संबोधिले आहे. याचा अर्थ प्रमाणकावरील विश्वास नष्ट होण्याची स्थिती म्हणजे प्रमाणक शुन्यता होय. त्यामुळे अशावेळी प्रमाणकशुन्यतेच्या स्थितीमुळे सामाजिक विचलन घडून येते असा सिध्दांत दुर्खिमने मांडला आहे. आधुनिक – औद्योगिक समाज साधा नसून त्याची रचना गुंतागुंतीची आहे. अशावेळी सांस्कृतिक नियमने व्यक्ती वर्तनाला योग्य अशी दिशा देण्यास असमर्थ ठरतात. यामुळे व्यक्तीला असुरक्षिततेचा अनुभव येतो. त्यांच्यात एकाकीपणाची भावना निर्माण होते. अशा स्थितीलाच नियमहिनता अथवा प्रमाणकशुन्यता असे म्हटले आहे. आदिवासी समाजात यांत्रिक एकता तर औद्योगिक आधुनिक समाजात जैविक एकता आढळून येते. जसे हात, पाय, पोट, नाक, तोंड यांची स्वतंत्र कार्य म्हणून विशेषीकरण आढळते. त्यांच्यात परस्परावलंबन भावना आढळते. यांत्रिक ऐक्यभाव असणाऱ्या समाजात विचलनाचे प्रमाण कमी तर जैविक एकता असणाऱ्या समाजात जास्त विचलन आढळून येते. म्हणून प्रमाणकशुन्यतेची व नियमनहिनतेची स्थिती विचलित वर्तनाचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत आहे.

**प्रश्न क्र. ४ :– सामाजिक संरचना आणि सामाजिक विचलन यांच्यातील संबंध स्पष्ट करा?**

उत्तर :– आपल्या अधिकतम गरजांची पूर्ती व्हावी म्हणून आपला स्वार्थ साधण्यासाठी सामाजिक नियमनांचे उल्लंघन करण्याचे प्रयत्न काही व्यक्तींकडून होत असतात. असे दुर्खिमने गृहित धरलेले मर्टनला मात्र मान्य नाही म्हणून मर्टनने सामाजिक व सांस्कृतिक संरचनेच्या कार्यपध्दतीतून निर्माण होणारा विचलित वर्तन व्यवहार समजून घेण्यासाठी प्रमाणकशून्यतेच्या संकल्पनेचा उपयोग करण्याचे निश्चित केले. मर्टनच्या मतानुसार, समाजात जीवन कसे जगावे याविषयी संस्कृतीने निर्धारित केलेले मार्ग आणि प्रत्यक्ष सामाजिक वास्तवता यात तफावत असेल तर प्रमाणकशून्यतेची स्थिती निर्माण होऊन विचलनात्मक वर्तन घडून येते. याचा अर्थ नोकरी करुन पैसा मिळवावा अशी इच्छा असते. पण नोकरी तर मिळत नाही अशा परिस्थितीत चोरी करणे, लूटमार करणे, लबाडी वा फसवणूक करणे अशा पर्यायी मार्गाचा अवलंब व्यक्ती करतात. म्हणून मर्टनच्या मते काही सामाजिक संरचना समाजातील व्यक्तींवर निश्चितपणे असा दबाव आणतात की ज्यामुळे त्यांच्याकडून अनुचलनात्मक वर्तनाऐवजी नियमनांचा भंग होईल असे वर्तन घडून येते. समाजाच्या संरचनेचे दोन महत्वाचे पैलू आहेत ते म्हणजे,

१. **सांस्कृतिक साध्ये किंवा उद्दिष्टये** :– प्रतिष्ठा, धन, यश, सत्ता, मोक्षप्राप्ती, स्वर्गप्राप्ती यांचा संस्कृतीने निर्धारित केलेली उद्दिष्टये म्हणून विचार करता येईल. या

साध्यांना सांस्कृतिक साध्ये असे संबोधले जाते. ही सांस्कृतिक साध्ये ज्या साधनांचा अवलंब करुन प्राप्त केली जाते त्यांना संस्थागत साधने असे म्हणतात.

२. **संस्थागत साधने** :— काही सामाजिक संरचनेत सांस्कृतिक साध्यांच्या पूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या संस्थागत साधनाच्या अभावामुळे व्यक्ती वेगळया मार्गाचा अवलंब करु शकते. निवडणूकीत उमेदवारी प्राप्त होण्यासाठी नियमांचे उल्लंघन करणे उचित आहे असे वाटल्यामूळे चोरी करणे, भ्रष्टाचार, फसवणूक, सत्ताधारक नेत्यांशी लागून चालन करणे, त्याची मर्जी संपादन करणे यासारखी नियमनहिनता व्यक्तीच्या वर्तनक्रियांचा एक भाग बनते. अशाप्रकारे व्यक्ती किंवा समूहाच्या नियमनहिनतेच्या वर्तनक्रियेचे कारण सामाजिक व सांस्कृतिक संरचनेत अंतर्भूत असते. सांस्कृतिक साध्ये आणि त्यांची पूर्ती करण्याचे समाजमान्य मार्ग या दोहोंमधील विसंगती हे विचलनात्मक वर्तनाचे कारण होय असे मर्टनने आपल्या प्रमाणकशुन्यतेच्या सिध्दान्तात प्रतिपादित केले आहे. जेव्हा साध्य व त्याच्या पूर्तीसाठीची साधने यांच्यात विसंगती निर्माण होते तेव्हा प्रमाणशून्यतेची स्थिती निर्माण होते असे मर्टन म्हणतो.

**प्रश्न क्र. ५ :— वैयक्तिक विपथगामी किंवा विचलनात्मक वर्तनाचे प्रकार लिहा?**

उत्तर :— मर्टनने सांगितलेले विपथगामी वर्तनाचे पुढील चार प्रकार सर्व समाजांमध्ये आढळून येतात.

**१) नवक्लृप्ती** :— सांस्कृतिक साध्याला जास्त महत्व देणे आणि संस्थागत साधनांना दुय्यम लेखणे यामधून निर्माण होणारा विचलित वर्तनाचा प्रकार म्हणजे नवक्लृप्ती होय. गरिबीमुळे चांगले उत्पन्न मिळेल अशी संधी व्यक्तीला मिळत नाही. मग पैसा प्राप्तीसाठी तस्करी, फसवणूक, शस्त्रांचा चोरटा व्यापार या मार्गाचा अवलंब केला जातो. भ्रष्टाचार हा पैसे मिळविण्याचा मार्ग देखील नवक्लृप्ती या सदरात मोडणारा आहे. काही मुली याच कारणामुळे वेश्या व्यवसायाकडे वळतात. नवक्लृप्ती हा मार्ग सर्वच आधुनिक समाजात मोठया प्रमाणावर दिसून येतो.

**२) कर्मकांडवाद** :— सांस्कृतिक साध्यापेक्षा संस्थागत साधनांना जास्त महत्व देण्यामधून निर्माण होणारा विचलित वर्तनाचा प्रकार म्हणजे कर्मकांडवाद होय. अपघातात गंभीरपणे जखमी झालेल्या व्यक्तीवर त्वरीत औषधोपचार करण्याची गरज असताना नियमानुसार अपघात कसा झाला? कोठे झाला? यासंबंधीची औपचारिकता पूर्ण करण्याला महत्व देणारा डॉक्टर कर्मकांडवादी ठरतो. नियम ही उद्दिष्टये साध्य करण्याची साधने आहेत ही गोष्ट ते विसरतात.

**३) पलायनवाद किंवा अपगमन** :— समाजमान्य साध्य व साधने कोणती? याची जाणीव व्यक्तीला असते. परंतू त्याचा अवलंब केल्यास अपयश येईल म्हणून ते

पलायनवादी वर्तनाचा आश्रय घेतात. या वर्तनप्रकाराला अपगमन असे म्हणतात. याचा अर्थ त्यांचा साध्य आणि साधनावरचा पूर्ण विश्वास उडालेला असतो. सतत मद्यपान करणे, जुगार खेळणे, लॉटरीचे तिकीट घेणे, आत्महत्या करणे ही सर्व पलायनवादाची उदाहरणे होत.

**४) बंडखोरी** :— सांस्कृतिक साध्य आणि संस्थागत साधने या दोन्ही गोष्टी व्यक्तीला समाजहिताच्या दृष्टीने अमान्य असतात. त्यामुळे व्यक्ती या दोहोंना महत्व न देता यांच्या विरुध्द विद्रोह करतात. या वर्तनास बंडखोरीचे वर्तन आणि वर्तन करणाऱ्या व्यक्तींना बंडखोर असे म्हणतात. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, मार्टिन ल्यूथर किंग यांचे वर्तन बंडखोरीचे होते. पुढे कालांतराने 'क्रांतिकारक' म्हणून ओळखल्या जातात.

**टिका** :— मर्टनचा सिध्दांत अनेक विचलनात्मक वर्तनप्रकार समजून घेण्यास उपयुक्त आहे यात शंका नाही. व्यक्तीबाहय अशा कारणांमुळे विचलन घडून येते असे हा सिध्दांत मानतो. त्यामुळे कोणत्याही समाजाला या व्यक्तीबाहय घटकांवर नियंत्रण ठेऊन विचलनाचे प्रमाण कमी करणे वा आटोक्यात आणणे शक्य आहे, हे या सिध्दांताचे योगदान आहे. परंतु विचलनात्मक वर्तनाचे पूर्ण वा समाधानकारक असे स्पष्टीकरण या सिध्दांताने मिळत नाही.

**प्रश्न क्र. ६ :— सामाजिक नियंत्रणाच्या व्याख्या लिहून नियंत्रणाची साधने लिहा?**

उत्तर :— स्मॉल व बिन्सेट यांनी सर्वप्रथम सामाजिक नियंत्रण या संकल्पनेचा उपयोग केला. त्यानंतर समाज आपल्या सदस्यांना ज्या साधनांद्वारे नियंत्रित करतो अशा ३५ साधनांचे विवेचन करणारा एडवर्ड रॉस यांचा शैवबपंस ब्वदजतवसश हा महत्वपूर्ण ग्रंथ ठरला. समाजाचे अस्तित्व, ऐक्यभाव आणि सुव्यवस्था टिकवून ठेवण्याची एक पध्दती प्रत्येक समाजात निर्माण होते. या पध्दतीलाच 'सामाजिक नियंत्रण' असे म्हणतात. प्रत्येक समाजात व्यक्तीचे व्यक्तींवर, व्यक्ती व समूह यांचे परस्परांवर आणि समूहाचे समूहांवर नियंत्रण असते.

**व्याख्या** :—

१. **मॅक आयव्हर व पेजच्या मते** :— ''सामाजिक नियंत्रण म्हणजे समाज व्यवस्थेत ऐक्यभाव निर्माण करणारी व सुव्यवस्था टिकवून ठेवणारी पध्दती होय.''

२. **एडवर्ड रॉस च्या मते** :— ''सामाजिक नियंत्रण म्हणजे अशा साधनांची व्यवस्था की ज्यांच्या माध्यमातून समाज आपल्या सदस्यांना स्वीकृत वर्तन प्रतिमानांचे अनुकरण करण्यास शिकवितो.''

वरील व्याख्या लक्षात घेता, १) समाज सदस्यांनी स्वत:च्या इच्छेनुसार स्वैराचारी वागू नये. कारण समाजाच्या हिताची जाणीव ठेवावी हा उद्देश असतो. २)

समाजात प्रमाणके आणि मूल्येदेखील मान्यता पावलेली असतात. त्याद्वारे नियंत्रण ठेवले जाते. ३) सामाजिक नियंत्रणाच्या प्रभावामुळे व्यक्ती नियमने व मूल्याप्रमाणे वर्तन करतात. ४) सामाजिक नियंत्रणाच्या संकल्पनेत वर्चस्व अंतर्भूत आहे. चोरी करु नये तसेच मानवहत्या करु नये ही नियमने समाजकल्याणाच्या हेतूनेच व्यक्तीच्या वर्तनावर वर्चस्व प्रस्थापित करतात.

**सामाजिक नियंत्रणाची साधने :—**

पुरस्कार आणि शिक्षा ही दोन सामाजिक नियंत्रणाची अत्यंत व्यापक अशी साधने आहेत असे डॉ. भांडारकर आणि वैद्य यांनी म्हटले आहे. सामाजिकरणाची प्रक्रिया हेच सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन आहे असे काही समाजशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

**औपचारिक साधने**

१) **सामाजिक अनुज्ञा** :— समाजिक अनुज्ञा म्हणजे व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करण्यासाठी इतर व्यक्तींकडून दिली जाणारी पारितोषिके किंवा शिक्षा होय. अनुज्ञांचे सकारात्मक अनुज्ञा आणि नकारात्मक अनुज्ञा असे दोन प्रकार पडतात. चेहऱ्यावर समाधान दाखविणे, स्मतहास्य करणे, स्तुती करणे, वस्तुरुपात पुरस्कार देणे ही पारितोषिके म्हणजे सकारात्मक अनुज्ञा होय. तर चेहऱ्यावर नाराजी दाखविणे, टिका करणे, उपहास करणे, माफी मागावयास सांगणे, इतरांच्या सहवासापासून वंचित करणे, कैदेत ठेवणे, मृत्युदंड देणे या सर्व नकारात्मक अनुज्ञा होत. या सर्वांचा उपयोग नियमनानुसार व्यक्तीचे वर्तन घडून यावे यासाठी केला जातो.

२) **कायदा** :— मोठया आकाराच्या व गुंतागुंतीची रचना असणाऱ्या समाजात केवळ अनौपचारिक नियंत्रण अपूरे ठरु लागते. अशा समाजात कायदा हेच औपचारिक नियंत्रणाचे सर्वात जास्त प्रभावी असे माध्यम आहे.

**व्याख्या** :— **मॅक आयव्हर व पेज** यांच्या मते :— ''राज्याच्या विधीमंडळाने मान्य केलेल्या, न्यायालयाने अर्थ लावलेल्या व विशिष्ट परिस्थितीमध्ये लागू केल्या जाणाऱ्या नियमांचा समुच्चय म्हणजे कायदे होत.''

वरील व्याख्या लक्षात घेता १) कायदे हे मुद्दाम व हेतुपूर्वक तयार करण्यात आलेले असतात. २) वाहतुकीसंबंधीचे कायदे हे केवळ वाहन चालविण्याच्या कृतीचे नियंत्रण करतात म्हणजे प्रत्येक कायदा हा व्यक्तीच्या विशिष्ट कृतीचे नियंत्रण करण्यासाठी असतो. ३) कायदेमंडळ कायद्यांची निर्मिती करते तर न्यायमंडळ शिक्षा देण्याचे कार्य करते. ४) प्रथा, लोकाचार व लोकनीती यांच्यापेक्षा कायद्यामध्ये लवकर बदल धडवून आणणे शक्य असते. ५) कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतात. ६)

समाजात बदल घडवून आणण्याचे कायदा हे एक साधन आहे. परिवर्तनाप्रमाणेच सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे कायदा एक साधन आहे.

**अनौपचारिक साधने**

**१) प्रथा** :— प्रथांची निर्मिती सतत सुरु असते. आधुनिक काळात महानगरांमधील विवाह समारंभात विवाहानंतर पार्टी किंवा बफे देण्याची प्रथा निर्माण झाली आहे. समाज जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी विविध अंगाशी प्रथांचा संबंध असतो. प्रथांना 'रुढी किंवा चालीरिती' या नावाने देखील संबोधिले जाते.

**व्याख्या :—**

**१) प्रा. गिन्सबर्ग यांच्या मते** :— ''विशिष्ट कार्य करण्याच्या ज्या पध्दती समाजाने मान्य केल्या आहेत, त्यांना प्रथा असे म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता, समूहाने किंवा समाजाने मान्यता दिलेल्या कोणत्याही वर्तनप्रकारास प्रथा असे म्हणतात. जसे आपत्यप्राप्तीचा आनंद व्यक्त करण्यासाठी पेढे किंवा बर्फी वाटण्याची प्रथा आहे. प्रथांचा उगम होण्याचे कोणतेही एक निश्चित कारण नाही, तर अनेक कारणे जबाबदार आहेत. समाजसदस्यांनी प्रथांचे पालन करावे, यासाठी त्यांचेवर बाहय दडपण आणण्याची गरज पडत नाही. कारण प्रथानुरुप वर्तनक्रिया न करणाऱ्या सदस्यांना कुटुंब सदस्य, आप्तस्वकीय, मित्रसमूह, शेजारीपाजारी आदींकडून निंदानालस्ती किंवा हेटाळणीला तोंड द्यावे लागते. त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून प्रथांना महत्व प्राप्त होते.

**२) परंपरा** :— सामाजिक जीवनात विविध गरजांची पूर्ती करताना मानवाला अनेक समस्यांना वा अडचणींना सामोरे जावे लागते यासाठी त्याला काही नियम बनवावे लागले. समाजाचा घटक असणाऱ्या व्यक्तीने इतरांशी कोणत्या पध्दतीने वागावे, कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, कोणते नितीनियम पाळावेत याचे मार्गदर्शन परंपरा करतात.

**व्याख्या** :—

१. **मॅरिस गिन्सबर्ग यांच्या मते** :— ''प्रत्येक समाजातील जीवन पध्दतीला उपयुक्त असलेल्या चालीरीतींना परंपरा असे म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता, मुहूर्त ठरविण्यापासून माप ओलांडण्यापर्यंत विवाहासंबंधी अनेक परंपरा आहेत.एकामागे एक अशा क्रमाने अनेक गोष्टींची मालिका असा भाव व्यक्त करण्यासाठी परंपरा या संज्ञेचा उपयोग केला जातो. त्यामुळे समाज, संस्कृती व समूहाचे सातत्य कायम राहते. पोषाखाच्या पध्दती, भाषा, गाणी व संगीत, कला इत्यादींशी संबंधित परंपरा सर्वच समाजामध्ये सहजतेने बदलत असल्याचे दिसून येते. परंतु आचारविचार विषयक मूलगामी स्वरुपाचे नियम, देवदेवतांविषयक श्रध्दा व

प्रार्थना, नीतीविषयक मूल्ये यासंबंधीच्या परंपरांमध्ये फारसे बदल होत नाहीत. त्यामुळे संस्कृतीच्या वारशाचे जतन करणाऱ्या परंपरांच्या अभ्यासाला समाजशास्त्रात महत्व प्राप्त होणे स्वाभाविक ठरते.

**३. <u>लोकाचार अथवा लोकरुढी</u>** :— लोकाचार ही संज्ञा सर्वप्रथम समनेरने वापरली. व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील वागणुकीसंबंधीच्या रुढ व सर्वमान्य पध्दती म्हणजे लोकाचार होय. व्यक्तींच्या ज्या कृतींना सामूहिक स्वरुप प्राप्त होते किंवा समाजाचा पाठिंबा मिळतो, त्यांना आपोआपच लोकाचाराचे स्वरुप प्राप्त होते. पांढऱ्या रंगाच्या द्रव पदार्थास आपण दूध म्हणतो कारण तो एक लोकाचार आहे व फार पूर्वीपासून त्यास दूध असे म्हणण्याची पध्दती सुरु आहे एवढेच.

**<u>व्याख्या</u> :—**

१. **<u>समनेरच्या</u>** मते, ''समाजमान्य असे वागणुकीचे प्रकार म्हणजे लोकाचार होय.''

२. **<u>हार्टन आणि हंट</u>** च्या मते, ''एखाद्या समूहाच्या रुढ, सर्वमान्य आणि सवयप्रधान रीती म्हणजे लोकाचार होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता १) लोकाचारांना समाजाची मान्यता मिळालेली असते. २) समाजात निरनिराळया प्रसंगी कसे वागावे हे लोकाचारांद्वारे ठरविले जाते. ३) समाजातील अनेक लोक लोकाचारांचे पालन करतात. यामुळे समान वर्तन करणाऱ्या व्यक्तींना परस्परांशी जुळवून घेणे सोयीचे होते. ४) प्रथा सक्तीच्या स्वरुपात असतात तर प्रथांपेक्षा लोकाचार हे अधिक सामान्य स्वरुपाचे असतात.

**४. <u>लोकनीती</u>** :— लोकाचाराचे रुपांतर लोकनीतीत होते. लोकाचार हे जेव्हा जास्त बंधनकारक होतात, तेव्हा त्यांना लोकनीती असे म्हटले जाते. कुटुंबाच्या अंतर्गत रक्तसंबंधित नातेसंबंध असणाऱ्या स्त्री—पुरुषांनी व्यभिचार करु नये ही बाब समाजात अगदी प्रारंभी लोकाचाराच्या स्वरुपात अस्तित्वात आली. कालांतराने त्याचे रुपांतर लोकनीतीमध्ये झाले.

**<u>व्याख्या</u>** :—

**१. <u>समनेरच्या</u>** मते :— ''लोकांच्या ज्या सवयी लोककल्याणाला पोषक आहेत आणि त्यानुसार लोकांचे वर्तन होते तेव्हा त्यांना लोकनीती म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता १) लोकनीतीमुळे लोकांच्या वर्तनात समानता निर्माण होते. २) लोकनीतीनुसार निश्चित झालेल्या पध्दतीनेच लोक कृती करतात. ३) लोकनीतीमुळे प्रत्येक समाजाचे वेगळेपण देखील स्पष्ट होते. ४) हिंदू धर्मामध्ये गोमांस भक्षण करत नाहीत तर अन्य समाजात मात्र केले जाते.

**५. <u>धर्म</u>** :— जगाचे नियंत्रण करणारी एक अलौकिक शक्ती आहे. ती डोळयांना दिसत नाही, परंतु ती मानवापेक्षा अनेक पटीने श्रेष्ठ आहे, या अलौकिक शक्तीवरील

विश्वासाच्या भावनेतून धर्माचा उदय झाला. 'पवित्र—अपवित्रतेच्या भावनेत जगातील सर्व धर्मांचे सार समाविष्ट आहे' असे धर्माचा अर्थ स्पष्ट करताना समाजशास्त्रात म्हटले आहे.

**व्याख्या** :—

१) **फ्रेजर** या विचारवंताच्या मते :— ''धर्म म्हणजे मनुष्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्या शक्तीवरील विश्वास होय.''

२) दरखिम यांच्या मते :— ''धर्म म्हणजे व्यक्तीच्या मनातील श्रध्दा व आचारविधी यांचे संकलन होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता, १) जन्म—मृत्यू, चांगले—वाईट किंवा पाप—पुण्य इत्यादी गोष्टींचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न प्रत्येक धर्मात केला जातो. त्यामुळे धर्म मानवी मनावर नियंत्रण ठेवतो. २) प्रेम, दया, क्षमा, शांती, अहिंसा या गुणांचा व्यक्तीमध्ये विकास होतो. ३) व्यक्तीला नैराश्यातून बाहेर काढण्याचे कार्य धर्म करतो. यामुळे व्यक्तीच्या मानसिक सामर्थ्यात वाढ होते. ४) धर्माच्या संस्काराच्या प्रभावामुळे व्यक्तीमध्ये अयोग्य वा वाईट कृती न करण्याची प्रवृत्ती विकसित होते. त्यामुळे मानवतावादाचा विकास होतो. याचा अर्थ धर्म व्यक्तीला समाजोपयोगी कार्य करण्याची प्रेरणा देतो.

६. **सामाजिक मूल्ये** :— बहुतांश समाजसदस्यांचे वर्तन मूल्यांनुसार होत असतात. जातिनिष्ठ या मूल्याच्या प्रभावामुळे बहुतांश पालक आपल्या पाल्याचा विवाह जातीच्या अंतर्गत करणे पसंत करतात. दया, सत्य, करुणा, निटनेटकेपणा यासारखी काही मूल्ये सर्व समाजांमध्ये आहेत. परंतू समाजपरत्वे त्यात भिन्नता आढळते. हिंदू समाजात विवाह हा पवित्र संस्कार तर ख्रिश्चन व मुस्लीम धर्मीय समूहात विवाह करार आहे.

व्याख्या :—

१. **हॅरि जॉन्सन** च्या मते :— ''मूल्ये म्हणजे असा मापदंड की ज्याच्या आधारे आपण वेगवेगळया वस्तूंमध्ये तुलना करतो. काही चांगल्या तर काही वाईट समजतो.''

२. **डॉ. राधाकमल मुखर्जीच्या** मते :— ''मूल्ये ही समाजाद्वारा मान्यताप्राप्त उद्दिष्टये होत.''

वरील व्याख्या लक्षात घेता, भारतीय समाजात प्रामुख्याने स्त्रियांचे विवाहबाहय आणि विवाहपूर्व संबंध अयोग्य किंवा निषिध्द होय असे मानले जाते. म्हणून 'पातिव्रत्य' या मूल्याद्वारे भारतीय समाजातील स्त्रियांचे लैंगिक वर्तन नियंत्रित होते. आधुनिक काळात स्त्री—पुरुष असा भेदभाव करण्याच्या पुरुषी वर्तनावर स्वातंत्र्य व समता या मूल्यांमुळे बंधन वा नियंत्रण आले आहे. याचा अर्थ प्रत्येक समाजातील

मूल्ये त्या त्या समाजातील सदस्यांचे वर्तन कमी—अधिक प्रमाणात नियंत्रित करण्याचे कार्य करतात.

७. **प्रमाणके** :— व्यक्तीने आपल्या भूमिकेला अनुसरुन वर्तन करावे, यासाठीच प्रत्येक समाजात विविध नियम, प्रथा, परंपरा, लोकाचार व रीतीरिवाज निर्माण झालेले असतात. या सर्व नियमांना प्रमाणके म्हणतात. सामाजिक प्रमाणकांचा हेतू व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवून त्यांना परस्परांशी विशिष्ट प्रकारे वर्तन करावयास लावणे हाच असतो.

**व्याख्या :—**

१. **हॅरि जॉन्सन** यांच्या मते :— ''वर्तनावर नियंत्रण ठेवणारा व मनात बाळगलेला अमूर्त आदर्श म्हणजे प्रमाणक होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता १) सामाजिक प्रमाणके व्यक्तीच्या दैनंदिन आचरणातून व्यक्त होतात. २) प्रमाणके हे सामाजिक नियम होत. ३) सामाजिक प्रमाणकांचा संबंध समाजहिताशी असतो. ३) जेथे प्रमाणके नाहीत तेथे समाज देखील नाही. ४) सर्वच प्रमाणकांचे स्वरुप सारखे नसते. ५) संस्कृती म्हणजे प्रमाणकांची एक व्यवस्थाच असते.

**प्रश्न क्र. ७ :— सामाजिक नियंत्रणाचे प्रकार लिहून नियंत्रणाची आवश्यकता स्पष्ट करा?**

उत्तर :— **१) सकारात्मक आणि नकारात्मक नियंत्रण** :—

कौतुक करणे, स्तुती करणे, समाधान व्यक्त करणे, वस्तुरुपात पुरस्कार देणे अशा व्यक्तींना प्रतिष्ठा देणे, त्यांचा मानसन्मान करणे या सर्वांचा समावेश पारितोषिकामध्ये होतो. किंबॉल यंगने या प्रकाराला सकारात्मक नियंत्रण असे म्हटले आहे. वाईट वर्तनाबद्दल एखाद्यावर टीका करणे, उपहास करणे, टिंगल टवाळी करणे, माफी मागावयास लावणे, काही काळासाठी भुकेले ठेवणे, बहिष्कार टाकणे, पैशाच्या रुपाने दंड करणे, तुरुंगात ठेवणे इत्यादींचा समावेश शिक्षेमध्ये होतो. किंबॉल यंगने या प्रकाराला नकारात्मक नियंत्रण असे म्हटले आहे.

२. **प्रत्यक्ष नियंत्रण आणि अप्रत्यक्ष नियंत्रण** :—

प्राथमिक समूहात व्यक्तीचे संबंध घनिष्ठ, जवळचे व प्रत्यक्ष म्हणजे समोरासमोरचे असतात. टीका, उपहास, अबोला यासारख्या नकारात्मक साधनांचा वापर करुन संबंधित व्यक्तीला योग्य वर्तन करावयास भाग पाडले जाते, असा प्रत्यक्ष नियंत्रण या प्रकाराचा अर्थ आहे. मोठया आकाराच्या समूहांमध्ये व्यक्तींमधील परस्पर

संबंध हे औपचारिक, तुटक व करार प्रधान स्वरुपाचे असतात. नियम मोडणाऱ्याला औपचारिक शिक्षा देखील होते, अशा नियंत्रणाला अप्रत्यक्ष नियंत्रण असे म्हणतात.

३. **संघटित आणि असंघटित नियंत्रण** :—

जेव्हा एखाद्या खास यंत्रणेमार्फत सामाजिक नियंत्रण साधनांची अंमलबजावणी होते तेव्हा ते संघटित नियंत्रण होय. शासन यंत्रणा, पोलीस, न्यायालये यांच्यामार्फत जे नियंत्रण साधले जाते ते संघटित नियंत्रण होय. प्रथा, परंपरा, लोकनीती, सामाजिक संकेत या गोष्टींद्वारे होणारे व्यक्ती व समूहाचे नियंत्रण हे असंघटित नियंत्रण होय.

४. **औपचारिक आणि अनौपचारिक नियंत्रण** :—

प्रत्येक महाविद्यालय आपल्या कार्याची व्यवस्था करण्यासाठी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी इत्यादींच्या वर्तनाशी संबंधित असे अनेक नियम तयार करते. महाविद्यालयाने निर्माण केलेल्या नियमनांद्वारे होणारे नियंत्रण हे औपचारिक नियंत्रण होय. राज्यसंस्था कायदे व प्रशासकीय उपाययोजनांद्वारे नागरिकांच्या वर्तनाचे औपचारिक नियंत्रण करीत असते. १) औपचारिक नियंत्रण हे जाणीवपूर्वक केले जाते. २) औपचाररिक नियंत्रणाची अंमलबजावणी करण्यासाठी विशिष्ट यंत्रणा मुद्दाम निर्माण केली जाते. ३) औपचारिक नियंत्रण हे स्थायी स्वरुपाचे असते. ४) कायदा हे औपचारिक नियंत्रणाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. ५) औपचारिक नियंत्रण व्यक्तीनिरपेक्ष असते.

पती—पत्नी, पिता—पुत्र, शिक्षक—विद्यार्थी यांच्या परस्पर संबंधावर रुढी, परंपरा, लोकाचार या सामाजिक नियमनांमुळे त्यांचे परस्पर संबंध नियंत्रित असतात, या नियंत्रणास अनौपचारिक नियंत्रण असे म्हणतात. कुटुंबातील नियंत्रण हे अनौपचारिक नियंत्रणाचे सर्वात प्रभावी माध्यम होय. १) अनौपचारिक नियंत्रण हे जाणीवपूर्वक केलेले नसते. २) अनौपचारिक नियंत्रणाची अंमलबजावणी करणारी वेगळी यंत्रणा असते. ३) अनौपचारिक नियंत्रण हे प्रत्यक्ष स्वरुपाचे असते. ४) अनौपचारिक नियंत्रणात दूरगामी स्वरुपाचे बदल घडवून आणण्याची शक्ती असते. ५) अनौपचारिक नियंत्रण हे व्यक्तिसापेक्ष असते. ६) मर्यादित आकार व सरळ साधे जीवन असणाऱ्या समाजात प्रामुख्याने याच नियंत्रणाचे महत्व असते.

**सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता**

१. **समाजात अनुरुपता घडवून आणणे** :— समाज सदस्यांमध्ये आचार, विचार, उद्देश, धर्म, वंश, जाती याबाबत विविधता असते. समाजसदस्यांच्या वर्तनात भिन्नता वाढत गेल्यास त्याचा परिणाम गोंधळात होईल. तसे होवू नये म्हणून नियंत्रण आवश्यक ठरते.

२. **समाजात ऐक्य निर्माण करणे** :– नियंत्रणाद्वारे समाजात एकरुपता निर्माण होते.

३. **समाजाचे अस्तित्व टिकवून ठेवणे** :– सातत्य टिकवून ठेवण्यासाठी देखील सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता आहे.

४. **सामाजिक व मानसिक सुरक्षितता** :– कायदा, धर्म, लोकाचार, प्रथा यासारखी सामाजिक नियंत्रणाची साधनेच नसतील तर व्यक्तींना सामाजिक सुरक्षितता प्राप्त होणार नाही.

५. **सहकार्याची जाणीव** :– सदस्यांच्या स्वच्छंदी व स्वैराचारी वागण्यातून सहकार्याची भावना निर्माण होणे शक्य नसल्यामुळे नियंत्रित वागण्याच्या पध्दतीतून सदस्यांमध्ये सहकार्याची जाणीव निर्माण होते.

६. **सामाजिक शिस्त** :– लोकाचार, प्रथा, कायदे यासारख्या सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचा पगडा व्यक्तीच्या मनावर सतत असल्यामुळे सदस्यांकडून शिस्तपूर्व वर्तनक्रिया घडतात.

७. **सामाजिक कर्तव्याची जाणीव** :– सामाजिक नियंत्रणामुळे समाजसदस्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव होते. यामुळे सामाजिक जीवनात सुरळीतपणा निर्माण होतो.

## युनिट क्र. ३ : सामाजिक स्तरीकरण आणि सामाजिक गतिशीलता
## (Social Stratification and Social Mobility)

**प्रश्न क्र. १ :— सामाजिक स्तरीकरणाच्या व्याख्या लिहून स्तरीकरणाची वैशिष्टये लिहा?**

उत्तर :— जगातील कोणताही समाज हा स्तर वा वर्गविरहित नाही. प्राचीन, आधुनिक अशा सर्वच काळांमधील समाजात स्तरीकरण दिसून येत असल्याने ती सार्वत्रिक बाब आहे. समाजातील व्यक्तींचे हक्क आणि अधिकार, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या, सत्ता आणि प्रभाव, मिळकत आणि संपत्ती यांचे विषम वाटप हाच सामाजिक स्तरीकरणाचा मूलाधार आहे.

**व्याख्या** :—

१. **पी. गिल्बर्ट** यांच्या मते, ''ज्यांचे परस्परसंबंध श्रेष्ठत्व व कनिष्ठत्वाच्या कल्पनेवर आधारलेले अशा कायम स्वरुपाच्या गटामध्ये जे विभाजन झालेले असते, त्याला सामाजिक स्तरीकरण असे म्हणतात.''

२. **थिओडोर कॅपलोच्या** मते, ''समाजव्यवस्थेच्या सदस्यांची विषम दर्जा असलेल्या स्तरात झालेली रचना म्हणजे स्तरीकरण होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता, १) सामाजिक व आर्थिक विषमता हा सामाजिक स्तरीकरणाचा मुख्य आधार आहे. २) समाजव्यवस्थेतील स्थाने आणि भूमिकांचे असमान वितरण होते. ३) त्यामुळे विभिन्न दर्जाचे अनेक स्तर समाजात अस्तित्वात येतात. त्यांची जी रचना तयार होते तिला स्तरीकरण असे म्हणतात. ४) ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केली जाते. ५) विवाह, कुटुंब, धर्म यांच्याद्वारे स्तरीकरण व्यवस्थेचे सातत्य टिकवून ठेवले जाते.

**सामाजिक स्तरीकरणाची वैशिष्टये**

१. **प्राचीनता व सार्वत्रिकता** :— सामाजिक स्तरीकरण हे समाजइतकेच प्राचीन आहे. समाज विकासाच्या टोळी व्यवस्थेत देखील श्रेष्ठ व कनिष्ठतेवर आधारीत गट निर्माण झाले होते. आफ्रिका खंडातील अप्रगत समाज व युरोप खंडातील प्रगत समाजात देखील स्तरीकरण असल्यामुळे ते सार्वत्रिक आहे.

२. **सतत सुरु असलेली प्रक्रिया** :— स्तरीकरण केवळ वर्तमान कालीन अवस्था नाही तर त्यात सतत परिवर्तन सुरु असते. पूर्वी धर्म महत्वाचा होता तर आज तंत्रज्ञान महत्वाचे आहे त्यामुळे स्तरीकरणाचे आधार बदलले की स्तरीकरणाच्या स्वरुपातही बदल घडून येतो.

३. **स्वाभाविकता** :— सोरोकिनच्या मते, ‘‘स्तरीकरण हे मानवी समाजाचे स्वाभाविक व आवश्यक अंग आहे.’’ यामुळे समताविषयक विचार कितीही प्रबळपणे मांडण्यात आले तरी स्तरीकरण संपुष्टात येणे शक्य नाही.

४. **सामाजिकता** :— स्तरीकरण हे लिंगभेद आणि शारीरिक लक्षणांवर आधारलेले असले तरीही त्याचे स्वरुप सामाजिक असते. कारण समाज सदस्यांचे स्थान, दर्जा, भूमिका या सर्वांना मिळणारी प्रतिष्ठा व मानसन्मान हया सर्वच बाबी मूल्ये व प्रमाणकानुसार निश्चित होतात.

५. **स्तरीकरणाचे आधार** :— धर्म, शौर्य, संपत्ती, बुध्दिमत्ता, वंश, लिंग,राजकीय सत्ता यासारखे घटक स्तरीकरणाचे आधार असतात. भारतीय समाजात वेदकाळात वर्णव्यवस्था, स्मृतिकाळात जातीव्यवस्था व औद्योगीकरणानंतरच्या काळात वर्गव्यवस्था हे स्तरीकरणाचे प्रकार दिसून येतात.

६. **तुलनात्मक स्थैर्य** :— औद्योगिकरणानंतर भारतीय समाजात वर्गव्यवस्था निर्माण झाली असली तरीही जातीव्यवस्था देखील अद्याप कायम आहे.

७. **पिरॅमिड सादृश्यता** :— वर्गव्यवस्था हया स्तरीकरणाच्या प्रकारात उच्च वर्ग हा संख्यात्मक दृष्टया लहान असतो तर कनिष्ठ वर्ग आकाराने मोठा असतो. जातीव्यवस्थेमध्ये देखील हिच स्थिती पहायला मिळते.

८. **सत्तेबाबत विषमता** :— वरच्या स्तरातील लोकांना अधिकार, सत्ता, प्रतिष्ठा व संधी जास्त प्रमाणात प्राप्त होतात तर खालच्या स्तरातील लोक त्यापासून वंचित असतात.

९. **वर्गजाणीव** :— स्तरीकरणातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीला आपल्या गटाबाबत जाणीव असते. त्याप्रमाणेच भारतीय समाजात स्त्री आणि पुरुष असे दोन स्तर आहेत.

१०. **स्तरीकरण अचानकपणे निर्माण होत नाही** :— शिकार व अन्न पदार्थ गोळा करणे, पशुपालन, कृषी, औद्योगिक या अवस्थांमध्ये जसजसा समाजाचा विकास होऊ लागला तसतशी सामाजिक स्तरांची संख्या वाढत गेली. स्तरीकरणात परिवर्तन होत असल्यामुळे भारतीय समाजात जातिव्यवस्थेचे स्वरुप पूर्वीएवढे ताठर राहिले नाही.

११. **स्तरीकरण विशेष लक्षण** :— स्तरीकरण व्यवस्था नसणारा एकही समाज आजपर्यंत निर्माण झाला नाही. रशिया, चीन या देशांना देखील स्तरीकरण टाळता न आल्यामुळे स्तरीकरण हे सर्व समाजाचे एक विशेष लक्षण ठरते.

**प्रश्न क्र. २ :— सामाजिक स्तरीकरणाचे आधार किंवा निकष लिहा?**

उत्तर :— पाश्चिमात्य समाजात धर्म, वंश, संपत्ती, सत्ता व अधिसत्ता, व्यवसायामधील यश, लिंगभेद यासारख्या निकषांवर स्तर निर्माण झाले आहेत. आधुनिक भारतीय समाजात देखील जात, वर्ग, शिक्षण, व्यवसाय, सत्ता, लिंगभेद, प्रतिष्ठा या निकषांवर स्तर निर्माण झाले आहेत. यावरुन सामाजिक स्तरीकरण ही मानव निर्मित व्यवस्था आहे हे स्पष्ट होते. स्तरीकरणाचे आधार पुढीलप्रमाणे,

१. **मिळकत आणि संपत्ती** :— जमीन, गुरेढोरे, बंगले, वाहने, दागदागिने, शेअर्स, बचतपत्रे, ठेवी या सर्वांचा समावेश संपत्तीमध्ये होतो. उच्च, मध्यम व कनिष्ठ असे तीन स्तर असले तरीही त्यात उपस्तर आढळतात. उच्च मध्यम वर्ग, मध्यम वर्ग, कनिष्ठ मध्यम वर्ग असे स्तर आढळतात. मार्क्सच्या मते समाजात 'आहे रे' आणि 'नाही रे' असे दोन वर्ग असतात. धर्म, वंश, जात, शिक्षण यासारखे आधार देखील संपत्तीएवढेच महत्वाचे आहेत. मार्क्सने मात्र आर्थिक घटकालाच महत्व दिले आहे.

२. **सत्ता :— मॅस वेबरच्या मते** :— ''इतरांचा विरोध असतांनाही आपल्या इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी घडवून आणण्याची व्यक्तीची वा समूहाची क्षमता म्हणजे सत्ता होय.'' सत्ता केंद्रित झालेली असते. भारतात विभिन्न पक्षातील नेते, प्रशासकीय अधिकारी, मोठे उद्योगपती, व्यापारी, बडे जमीनदार, धर्म व त्याचे प्रमुख या मोजक्या लोकांकडेच सत्ता एकवटलेली आहे. संपत्तीमुळे सत्ता प्राप्त करणे सोपे असते. तसेच सत्ता मिळाली की संपत्तीही आपलीशी करता येते. म्हणूनच सत्ता आणि संपत्ती यांच्यात साहचार्य असते हे कोणीही नाकारु शकत नाही. त्यामुळे 'सत्ताधारी' आणि 'सत्ताविहीन' असे दोन स्तर निर्माण होतात. सामान्यपणे कोणत्याही समाजात मूठभर लोकांच्या हातात सत्ता केंद्रित झालेली दिसून येते.

३. **प्रतिष्ठा** :— टिशलेर, व्हायटन आणि हंटर यांच्या मते, ''एखाद्या व्यक्ती किंवा समूहाला इतर सदस्यांकडून जो मानसन्मान वा आदर प्राप्त होतो त्याला प्रतिष्ठा असे म्हणतात.'' उद्योगपती, प्रभावी राजकारणी, बडे बागायतदार, मोठे व्यापारी हे त्यांच्याकडील संपत्ती व सत्तेमुळे समाजात प्रतिष्ठित म्हणून गणले जातात. डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ, प्राध्यापक आदिंना व्यवसायामुळे प्रतिष्ठा प्राप्त होते. प्रतिष्ठेचे दोन प्रकार असून पहिल्याला 'प्रशंसा' तर दुसऱ्याला दर्जानुसार जो मानसन्मान प्राप्त होतो तो होय याचा अर्थ अर्पित आणि अर्जित या दोन्ही निकषानुसार समाजात प्रतिष्ठा प्राप्त होत असते.

**प्रश्न क्र. ३ :— सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार लिहा?**

उत्तर :— स्तरीकरणाचे दोन ठळक प्रकार पाडले जातात. अ) मुक्त स्तरीकरण ब) बंद स्तरीकरण, इस्टेट पध्दती, गुलाम पध्दती, जाती पध्दती हे बंद स्तरीकरणाचे उदाहरण आहे तर वर्गपध्दती हे मुक्त स्तरीकरणाचे उदाहरण आहे.

**१) मुक्त स्तरीकरण :—**

आधुनिक शिक्षण पध्दतीतून डॉक्टर, वकील, इंजिनिअर, शास्त्रज्ञ वा संशोधक यासारखी स्थान व दर्जे आधूनिक समाजात निर्माण झाले. वय व लिंगभेद, जन्म किंवा वंश यासारख्या पारंपरिक घटकांपेक्षा विशेषित ज्ञान हा घटक आधुनिक समाजात श्रमविभाजनाचा मुख्य आधार ठरला. अन्य कोणत्याही प्रकारापेक्षा व्यक्ती व समाजहिताच्या दृष्टीने वर्गव्यवस्था हा स्तरीकरणाचा प्रकार अधिक योग्य आहे.

**उपप्रश्न :— वर्गव्यवस्थेच्या व्याख्या लिहून वैशिष्टये, गुण, दोष किंवा प्रकार्ये व अपकार्य लिहा?**

उत्तर :— कार्ल मार्क्स व एंजल्स या दोन विचारवंतांनी त्यांच्या १८४८ मधील ‘कम्युनिस्ट जाहीरनामा’ या ग्रंथात वर्ग या संकल्पनेसंबंधीचे विचार मांडले. मार्क्सने वर्ग या संकल्पनेची चर्चा करतांना केवळ आर्थिक घटकालाच महत्व दिले. त्याच्या मते उत्पादन साधनांवर मालकी हक्क असणारा भांडवलदार वर्ग आणि उत्पादन साधनांवर मालकी नसणारा दुसरा वर्ग म्हणजे कामगार वर्ग होय. भांडवलदारांचा हितसंबंध अधिकाधिक नफा प्राप्त करणे हा आहे. तर कामगारांचा हितसंबंध जास्तीत जास्त वेतन प्राप्त करणे हा आहे. परस्पर विरोधी हितसंबंध असल्यामुळे या दोन वर्गामध्ये नेहमी संघर्ष सुरु असतो. या मार्क्सच्या विचारामुळेच सामाजिक वर्ग या संकल्पनेला फार महत्व प्राप्त झाले. एकाच वर्गातील लोकांचे विवाह, धार्मिक सणवार, समारंभ किंवा पार्टी यासारख्या प्रसंगाच्या निमित्ताने एकमेकांकडे जास्त जाणे येणे असते. थोडक्यात व्यक्तीच्या सामाजिक संबंधाचे वर्तुळ हे त्या व्यक्तीच्या वर्गानुसार निश्चित होत असते. कारण आपण एका विशिष्ट वर्गाचे सभासद आहोत अशी वर्ग जाणीव लोकांमध्ये असते.

**व्याख्या** :—

१. **ऑगबर्न आणि निमकॉफ यांच्या मते** :—

‘‘एखाद्या विशिष्ट समाजात ज्यांचा सामाजिक दर्जा समान असतो, अशा व्यक्तींचा समूह म्हणजे सामाजिक वर्ग होय.’’

२. **गिन्सबर्ग यांच्या मते** :—

‘‘ज्यांचा दर्जा समाज आहे तसेच ज्यांच्या मनात वर्गजाणीव निर्माण झालेली आहे, अशा व्यक्तींच्या समूदायाला सामाजिक वर्ग असे म्हणतात.’’

वरील व्याख्या लक्षात घेता वर्गजाणीव ही व्यक्तीच्या मनातील भावना आहे. त्यामुळे एकाच वर्गाचे लोक एकत्र येतात, तसेच दोन वर्गातील लोकांमध्ये दुरावा निर्माण होतो. यावरुन श्रेष्ठ—कनिष्ठतेच्या कल्पनेवर आधारित सामाजिक स्तर असणाऱ्या वर्गाची रचना म्हणजे वर्गव्यवस्था होय.

**वर्गव्यवस्थेची वैशिष्टये :—**

१. **संपादित गुणांना महत्व** :— वर्गव्यवस्थेत व्यक्तीचा दर्जा तिच्या जन्माच्या आधारे निश्चित न होता संपत्ती, शिक्षण, व्यवसाय, जीवनसंधी इत्यादी घटकांच्या आधारे निश्चित होतो. म्हणून वर्गव्यवस्थेत संपादित गुणांना महत्व प्राप्त होते.

२. **व्यक्तिस्वातंत्र्य** :— वर्गव्यवस्थेत व्यक्तीला व्यवसाय स्वातंत्र्य असते. त्या बरोबरच ज्ञान, कौशल्य इत्यादी संपादित गुणांच्या आधारे कनिष्ठ वर्गातून उच्च वर्गात प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असते.

३. **जन्माचा आधार नाही** :— वर्गव्यवस्थेत व्यक्ती कोणत्या कुटुंबात जन्माला आणि यावरुन तिचा दर्जा ठरत नाही. स्वत: मधील गुणांच्या आधारे व्यक्तीला आपला दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करता येतो.

४. **वर्गाची सोपान परंपरा** :— ज्यांचा सामाजिक दर्जा समान आहे त्यांचा एकाच वर्गात समावेश होतो. त्यांचा श्रेष्ठ, कनिष्ठ असा क्रम निश्चित झालेला असतो.

५. **निधर्मी स्वरुप** :— वर्ग व्यवस्थेचे स्वरुप निधर्मी आहे. कारण जातीव्यवस्थेसारखा वर्ग व्यवस्थेला धर्माचा आधार नाही.

६. **मुक्त स्तरीकरण व्यवस्था** :— कनिष्ठ वर्गात जन्मलेली व्यक्ती स्वकर्तृत्वावर आपले वर्गस्थान बदलवू शकते कारण त्यावर कोणतेही कायदेशीर अथवा धार्मिक निर्बंध नसतात.

७. **सामाजिक संबंधाचे वर्तुळ मर्यादित** :— विवाह व अन्य समारंभ प्रसंगी शक्यतोवर आपल्याच वर्गातील लोकांना बोलावितात. त्यामुळे व्यक्तीचे जीवन आपल्या वर्गापुरतेच मर्यादित राहते.

८. **वर्गजाणीव** :— एकाच वर्गातील लोकांना 'आपण सर्व एक आहोत' ही जाणीव असते. या जाणिवेलाच वर्गभावना असे म्हणतात. ती सतत जागृत ठेवण्यात येते.

**वर्गव्यवस्थेचे गुण किंवा प्रकार्य**

१. **मुक्त स्तरीकरण व्यवस्था** :— स्वत:च्या कर्तृत्वाने कनिष्ठ वर्गातील व्यक्ती वरिष्ठ वर्गात प्रवेश करु शकते. एखादा छोटासा व्यापारी कौशल्याच्या बळावर कारखानदार बनू शकतो.

२. **समान संधीचे तत्व** :— वर्गव्यवस्थेत व्यक्तीला अधिक संधी उपलबध असतात.

३. **व्यवसाय स्वातंत्र्य** :— प्रत्येक व्यक्तीला स्वत:चा विकास करण्यासाठी व्यवसाय करण्याचे बंधन वर्गव्यवस्थेत नसते.

४. **धर्माचा आधार नाही** :— जातीव्यवस्थेला धर्माचा आधार असतो. परंतु वर्गव्यवस्थेला कोणत्याही धर्माचा आधार नाही.

५. **सामाजिक संबंधाबाबत स्वातंत्र्य** :— जातीव्यवस्थेच्या तुलनेत वर्गव्यवस्थेतील लोकांना विवाहसंबंध, सामाजिक संपर्क याबाबत कडक स्वरुपाची बंधने नसतात.

**वर्गव्यवस्थेचे दोष किंवा अपकार्य**

१. वर्गव्यवस्थेतील तीव्र स्वरुपाची स्पर्धा ही व्यक्ती व समाज या दोहोंसाठी हानिकारक ठरते.
२. वर्गव्यवस्थेत व्यक्तीला आर्थिक सुरक्षिततेची हमी नसते.
३. स्तरीकरणाचा वर्गव्यवस्था हा आदर्श प्रकार आहे असे म्हणता येत नाही.

**२) बंद स्तरीकरण :—**

औद्योगिक क्रांती होण्यापूर्वीच्या कालखंडात सर्वच समाजामध्ये जन्म, वंश, जात, लिंगभेद यावर आधारित बंद स्तरीकरणाचा प्रकार अस्तित्वात होता. म्हणजे स्वकर्तृत्व वा गुणवत्तेच्या आधारे खालच्या स्तरातून वरच्या स्तरात प्रवेश करण्याची संधी व्यक्तीला नसते. अशा समाजामध्ये काळानुसार परितर्वन घडून येते. परंतु त्या सामाजिक परिवर्तनाची गती फारच मंद असते. गुलाम पध्दती, इस्टेट पध्दती व जाती व्यवस्था ही बंद स्तरीकरणाची उदाहरणे आहेत.

१. **गुलाम पध्दती** :— प्राचीन काळात युध्दामध्ये पराभूत झालेल्या आणि जिवंतपणी विजयी पक्षाच्या हाती लागलेल्या सर्वांच्या नशिबी गुलामगिरी ही हमखास येत असे. इसवी सन पूर्व काळातील ग्रीक नगरराज्यांमध्ये गुलाम बाळगण्याची पध्दती होती त्या काळात गुलाम हे आपल्या मालकाच्या शेतावर राबून मालकाला घरबसल्या उत्पन्न मिळवून देत असत. मालक देईल ते खाणे आणि ठेवेल तसे राहणे हेच त्या काळात गुलामांच्या जीवन पध्दतीचे सार होते. पुढे काळाच्या ओघात गुलामांचा व्यापारही सुरु झाला. अमेरिकेत समाजसुधारकांनी प्रयत्न करुन गुलाम बाळगण्याच्या विरोधात सरकारकडून कायदे करवून घेतले. १८ व्या शतकात गुलाम पध्दतीचा अंत झाला.

२. **इस्टेट पध्दती :—**

मध्ययुगात युरोपियन समाजाची विभागणी १) धर्मोपदेशक २) सरदार किंवा सरंजामदार ३) व्यापारी व कारागीर वर्ग ४) सामान्य जन (प्रजा) असे चार स्तर निर्माण झाले होते. या विभाजनास कायदा व परंपरा यांची मान्यता होती. धर्मगुरु,

सरदार व सामान्य जन प्रत्येक भागास इस्टेट असे संबोधिले जात असे. (आजच्या युगात युरोपियन समाजात वर्गव्यवस्था निर्माण झाली आहे. यामुळे इस्टेट व्यवस्थेचे महत्व संपले.) असले तरीही तिची काही वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१) इस्टेट पध्दतीत धर्मगुरु, सरदार व सामान्यजन या तीनही गटांचे अधिकार, कर्तव्ये वा जबाबदारी यांना कायद्याची मान्यता होती. २) सर्वांच्या संरक्षणाची जबाबदारी सरदारांवर होती तर सर्वांसाठी प्रार्थना करण्याचे कार्य धर्मगुरु करीत असत. ३) धर्मगुरु हे सर्वश्रेष्ठ त्यानंतर सरदार व सर्वात कनिष्ठ सामान्यजन असा क्रम होता. शेवटी राजा व सरदार यांनी एकत्र येऊन धर्मगुरुविरुध्द संघर्ष केला. त्यानंतर राजाची सत्ता धर्मसत्तेपेक्षा श्रेष्ठ आहे असे मानले जाऊ लागले.

## ३. सत्ता आणि लिंगाधिष्ठित व्यवस्था :—

सत्ता म्हणजे इतरांच्या वर्तनांचे नियंत्रण करण्याची क्षमता होय. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतात विशेषत: २१ व्या शतकातील प्रारंभिच्या दशकांमध्ये औद्योगिकीकरण आणि नागरीकरण झपाटयाने घडून येत आहे. यामुळे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये संघटना व संस्थांचे प्राबल्य निर्माण झाले आहे. भारतात मानवी जीवनाच्या जवळपास सर्व क्षेत्रांमध्ये सत्ताधीश आणि सत्ताविरहित असे दोन वर्ग निर्माण झाले आहेत. तसेच त्यांचा वेगाने विस्तारही होत आहे. सत्ताधिष्ठित स्तरीकरण व्यवस्थेला खऱ्या अर्थाने भारतीय समाजात सार्वत्रिक स्वरुप प्राप्त झाल्याचे सर्वत्र दिसून येते.

**लिंगाधिष्ठित व्यवस्था** :— स्त्री किंवा पुरुष या दोनपैकी आपल्या वाटयास आलेला दर्जा हा अर्पित दर्जा आहे. स्त्री—पुरुष या अर्पित दर्जाबाबत सर्व समाजांमध्ये आणि सर्व काळात विषमता आहे असा लिंगाधिष्ठित व्यवस्थेचा आशय आहे. मूल जन्मल्यापासून वाढ होत असताना सामाजिकरणाच्या प्रक्रियेत समाजाला अपेक्षित असणारे 'बाईपणाचे' किंवा 'पुरुषपणाचे' गुण शिकते. भारतीय समाजात मुलींमध्ये लज्जाशिलतेचा गुण विकसित केला जातो. पायांचा आवाज न करता मुलीने चालणे शिकावे अशी समाजाची अपेक्षा असते. शरीर रचनेतील लिंगभाव दर्शविणारा जैविक फरक सोडला तर बौध्दिक, मानसिक, शारीरिक आणि क्षमतांबाबत स्त्री—पुरुष समान आहेत. पितृसत्ताक वा पुरुषप्रधान व्यवस्था हे स्त्री पुरुष असमानता निर्माण होण्याचे एक प्रमुख कारण आहे. कायदे हे सर्वत्र पुरुषप्रधान आहेत. पुरुषांएवढेच अधिकार वा हक्क आणि पुरुषांच्या बरोबरीचे स्थान आपल्याला प्राप्त व्हावे हेच स्त्रीवादी चळवळीचे मुख्य उद्दिष्ट आहे. सत्ता आणि लिंगाधिष्ठित व्यवस्था ही विषमतेवर आधारित अशी स्तरीकरण व्यवस्था आहे की जी प्रत्येक समाजाच्या संरचनेचा एक भाग बनते आणि

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केली जाते. स्तरीकरणाचा हा प्रकार समाजशास्त्रीय दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे असे म्हणता येईल.

**प्रश्न क्र. ४ :— जातीव्यवस्थेच्या व्याख्या लिहून वैशिष्टये, गुण—दोष किंवा प्रकार्ये—अपकार्य लिहा?**

उत्तर :— भारताबाहेर अन्य कोणत्याही समाजात जाती हा स्तर रचनेचा प्रकार अस्तित्वात नाही. भारतात हिंदू समाजाशी ज्यांचा ज्यांचा घनिष्ठ संबंध आला, त्या भारतीय मुसलमान व ख्रिश्चन समाजातही जातीय स्वरुपाचे गट आढळून येतात.

**व्याख्या** :—

१. **प्रा. सी.एच. कुले यांच्या मते** :—

‘‘आनुवंशिकतेच्या तत्वावर आधारलेल्या वर्गास जात असे म्हणतात.’’

२. **प्रा. मदन व मुजुमदार यांच्या मते** :—

‘‘जात म्हणजे साचेबंद वर्ग होय.’’

३. **डॉ. श्रीधर केतकर यांच्या मते** :—

‘‘जात या सामाजिक वर्गाचे सभासदत्व त्यात जन्म घेणाऱ्या लोकांनाच प्राप्त होऊ शकते. तसेच त्यांना गटाच्या बाहेर विवाह करण्यापासून परावृत्त केले जाते. ’’

वरील व्याख्या लक्षात घेता, १) अनेक कुटुंबे एकत्रित आल्यानंतरच प्रत्येक जातीचा गट निर्माण होतो. २) प्रत्येक जातीचा गट हा विशिष्ट नावाने ओळखला जातो. ३) जात या गटाचे सभासदत्व जन्मजात असते. ४) प्रत्येक जातीचा एक विशिष्ट असा वंशपरंपरागत व्यवसाय असतो. ५) अनेक जातींची नावे त्यांच्या व्यवसायावरुनच निश्चित होतात.

**जातीव्यवस्थेची वैशिष्टये**

१. **जन्मजात सभासदत्व** :— व्यक्तीची जात तिच्या जन्मावरुन ठरविण्यात येत असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला एका जातीतून दुसऱ्या जातीत प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य नाही. धर्म बदलविता येतो, परंतु जात मात्र बदलविता येत नाही.

२. **जात हा कुटुंब समुच्चय आहे** :— अनेक कुटुंबे एकत्रित आल्यानंतर प्रत्येक जातीचा गट निर्माण होतो. याचा अर्थ प्रत्येक जातीत अनेक कुटुंबे असतात.

३. **समाजाचे खंडात्मक विभाजन** :— विभिन्न जातीसमूहांमध्ये रोटी बेटी व्यवहार व सामाजिक संपर्क याबाबत अनेक बंधने आहेत. परस्परांशी फारसे सामाजिक संबंध नसणाऱ्या खंडांमध्ये समाजाचे विभाजन हे जातीव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्टये आहे.

४. **जातींचा श्रेष्ठ—कनिष्ठ क्रम** :— कार्याच्या महत्वानुसार जातीचे श्रेष्ठ व कनिष्ठ असे क्रम ठरविण्यात आले. विभिन्न जातीच्या क्रमाबाबत सर्व प्रांतामध्ये एकवाक्यता नाही. तथापि, ब्राम्हण जात ही सर्वात श्रेष्ठ व शूद्र जात सर्वात कनिष्ठ याबाबत संपूर्ण समाजात एकवाक्यता आहे.

५. **धर्माचा आधार** :— हिंदूच्या धार्मिक तत्वज्ञानातील कर्म व पुनर्जन्म या कल्पनांचा संबंध जातीव्यवस्थेशी जोडण्यात आला. जातीव्यवस्थेचा धर्माबरोबर संबंध जोडल्यामुळे ती शतकानुशतके अबाधित राहीली.

६. **सामाजिक व्यवहारांवरील बंधने** :— पवित्र कार्य करणाऱ्या जातीचा अपवित्र कार्य करणाऱ्या जातीशी संबंध येऊ नये म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या जातीतील स्त्रीशी विवाह करावा असे बंधन टाकण्यात आले. त्याप्रमाणेच सामाजिक संपर्कावरही बंधने टाकण्यात आली.

७. **धार्मिक व सामाजिक विशेषाधिकार व निर्योग्यता** :— संस्कृत भाषा शिकणे, अंगावर उत्तरीय वस्त्र घेणे, वैदिक विधी करणे याबाबतचे अधिकार श्रेष्ठ जातींना प्रापत झाले. सार्वजनिक ठिकाणी पाणी भरणे, मंदिरप्रवेश, सोन्याचे अलंकार वापरणे, दुमजली घरे बांधणे याबाबत अस्पृश्य जाती निर्योग्य आहेत असे समजले जात होते.

८. **जाती पंचायत** :— जाती पंचायती नियंत्रण ठेवण्याचे आणि भांडणामध्ये न्याय निवाडा करण्याचे कार्य करीत असत. काही जातीसमूहात जातपंचायत प्रभावी असल्याचे आजही अनुभवास येते.

९. **व्यवसाय निवडीवर बंधन** :— प्रत्येक जातीचा एक विशिष्ट व्यवसाय ठरवून देण्यात आला. एका जातीतील व्यक्तीने दुसऱ्या जातीतील व्यक्तीचा व्यवसाय करु नये. अशाप्रकारची बंधने लादण्यात आली. त्यामुळे व्यवसायाचा विस्तार झाला नाही.

**जातीव्यवस्थेचे गुण किंवा प्रकार्ये**

१. **सुरक्षिततेची भावना** :— जाती गटातील व्यक्ती परस्परांना सुखदु:खाच्या प्रसंगी मदत करीत असतात. त्यामुळे व्यक्तीच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

२. **गरजा भागविण्याची क्षमता** :— वंशपरंपरागत व्यवसाय पध्दतीनुसार समाजातील विविध लोकांच्या निरनिराळया प्रकारच्या गरजा पूर्ण करण्याची व्यवस्था निर्माण झाली.

३. **वर्तनाचे नियंत्रण** :— पूर्वी आपआपल्या जातीशी संबंधित नियम व निर्बंधानुसार व्यक्तीला वर्तन करावे लागत होते. जातीशी संबंधित नियमांचे उल्लंघन करण्याची दखल जातपंचायत घेत असे.

४. **सुस्पष्ट भूमिका** :— जन्मानुसार दर्जा प्राप्त झाल्यामुळे व्यक्तीने काय करावे व काय करु नये हे निश्चित झाल्यामुळे व्यक्तीची भूमिका स्पष्ट होती.

५. **स्पर्धेला आळा** :— वंशपरंपरागत व्यवसायामुळे व्यक्तीला व्यवसायाचे शिक्षण सहजरित्या घरीच मिळत असे. त्यामुळे व्यावसायिक स्पर्धेला आळा बसला होता.

**जातीव्यवस्थेचे दोष किंवा अपकार्ये :—**

१. **उच्च जातीसमूहांचा कनिष्ठ जातीसमूहांवर अन्याय** :— जातीव्यवस्थेत उच्च जातीसमूहातील लोकांना काही सामाजिक व धार्मिक स्वरुपाचे विशेष अधिकार असल्यामुळे ते कनिष्ठ जातींवर अन्याय करीत होते.

२. **बंद स्तरीकरण व्यवस्था** :— जन्मानुसार दर्जा निश्चित होत असल्यामुळे कनिष्ठ स्तरातून वरिष्ठ स्तरात जाण्याची संधी व्यक्तीला मिळत नाही. गुण, कौशल्य व ज्ञान संपादन करुनही जन्मानुसार प्राप्त झालेला दर्जा व्यक्तीला बदलविता येत नाही.

३. **व्यक्तीस्वातंत्र्याचा अभाव** :— कनिष्ठ जातीतील लोकांवर निर्बंध असल्यामुळे म्हणजेच काही बाबतीत त्यांना निर्योग्य ठरविल्यामुळे त्यांना व्यक्तीस्वतांत्र्यही नसते.

४. **एकात्मतेला धक्का** :— जातीव्यवस्थेत विविध जातींमध्ये रोटी—बेटी व्यवहारांवर बंधने असल्यामुळे लोकांचे परस्परांशी होणारे सामाजिक व्यवहार मर्यादित असतात. परिणामी समाजाच्या एकात्मतेला धक्का बसतो.

५. **ज्ञान व कौशल्याची उपेक्षा** :— ज्ञान व कौशल्य यांच्या आधारावर कनिष्ठ जातीतील व्यक्तींना उच्च दर्जा प्राप्त करता येत नसल्यामुळे समाजाला त्याचा फायदा होत नाही.

**प्रश्न क्र. ५ :— सामाजिक स्तरीकरणाची प्रकार्ये आणि अपकार्ये लिहा?**

**उत्तर :— स्तरीकरणाचे प्रकार्ये :—**

१. **समाजाला योग्य कार्यासाठी व्यक्ती उपलब्ध होतात** :— स्तरीकरणामुळे समाजात जबाबदारीच्या कार्यासाठी पात्र व्यक्ती प्राप्त होतात. कारण अशी कार्ये करण्यासाठी पुढे येणाऱ्या व्यक्तींना अधिक मान, प्रतिष्ठा व सोयी सवलती प्राप्त होतात.

२. **विशिष्ट गुण टिकवून ठेवण्याचा प्रयत्न** :— काही विशिष्ट गुणांमुळे कुटुंबाला मिळालेली प्रतिष्ठा, अधिकार व सोयी—सवलती आपल्या मुलांना मिळाव्यात यासाठी प्रयत्न केले जातात.

३. **लोकांच्या जीवनशैलीतील तफावत** :— समाजातील प्रत्येक स्तर आपली वैशिष्टयपूर्ण जीवनशैली टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे सामाजिक संबंध जतन करण्याच्या व ताण निवारण करण्याच्या दृष्टीने ही गोष्ट अनुकूल ठरते.

४. **स्पर्धा निर्माण होते** :— प्रत्येक समाजात विभिन्न सामाजिक स्थान व दर्जामध्ये अधिकार वेतन व सोयी सवलती यांचे विषम स्वरुपात वाटप झालेले असते. परिणामी उच्च स्थान व दर्जा प्राप्त करण्यासाठी विभिन्न व्यक्तींमध्ये स्पर्धा निर्माण होते.

५. **ऐक्य व समाज संघटन** :— प्रत्येक कुटुंब आपल्या स्तरातील अन्य कुटुंबाशी अधिक सलगीने वागते. यामुळे विभिन्न समूहात ऐक्य निर्माण होऊन समाज संघटित होण्यास मदत होते.

६. **सामाजिक नियंत्रण** :— सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीनेही संपत्ती या घटकाला महत्व दिले जाते. परंतु अशा समाजात सुध्दा अनैतिक मार्गाने मिळालेली संपत्ती व्यक्तीला प्रतिष्ठा मिळवून देण्यास असमर्थ ठरते.

७. **गतिशीलतेस प्रोत्साहन** :— मुक्त समाजात म्हणजे वर्गव्यवस्थेत स्वकर्तृत्वाच्या बळावर वकील, डॉक्टर, न्यायाधीश, नेता यासारखी स्थाने प्राप्त करणे व्यक्तीला शक्य असते.

## स्तरीकरणाची अप्रकार्य

१. **गुणी व कर्तृत्ववान व्यक्तींना संधी मिळत नाही** :— उच्च पदाचे लाभ आपल्या मुलाबाळांना मिळावे यासाठी वरच्या स्तरामधील लोक सातत्याने प्रयत्नशील असतात. यामुळे स्तरीकरणाचा कोणताही प्रकार असला तरी गुणी व कर्तृत्ववान व्यक्तींना संधी कमी मिळते.

२. **सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण** :— स्तरीकरणाच्या सर्व प्रकारांमध्ये वरच्या स्तरातील लोकांजवळ सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण होते, तसेच कनिष्ठ स्तरातील लोकांना सतत अन्याय सहन करावा लागतो.

३. **विषमतेत वाढ** :— स्तरीकरणाच्या सर्व प्रकारांमध्ये वरच्या स्तरातील लोकांचे व्यवसाय हे अधिक लाभ मिळवून देणारे असल्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होत जातात.

४. **कर्तृत्वशून्य लोकांना महत्व** :— कुटुंबातील एखाद्या कर्तुत्ववान व्यक्तीच्या बळावर त्याच कुटुंबातील कर्तृत्वशून्य व्यक्तीला प्रतिष्ठा, मानसन्मान व महत्व प्राप्त होते.

५. **वर्गीय समर्थनाची प्रवृत्ती** :— स्तरीकरणाच्या सर्वच प्रकारांमध्ये सर्वात वरच्या स्तराला काही विशेष अधिकार व सवलती प्राप्त होतात. त्या योग्य आहेत असे त्यांचे समर्थन करण्याची प्रवृत्ती वरच्या स्तरात निर्माण होत असते.

६. **पुरस्कारापासून वंचित** :— स्तरीकरण व्यवस्थेतील वरिष्ठ स्तर विभिन्न पुरस्कार फक्त आपल्याच स्तरातील लोकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतो. यामुळे

समाज जीवनात महत्वपूर्ण योगदान देऊनही इतर स्तरातील लोकांना पुरस्कारापासून वंचित राहावे लागते.

७. **वर्ग संघर्ष** :— उच्च व कनिष्ठ स्तरातील विषमता जसजशी वाढत जाते तसतसा वर्गसंघर्ष निर्माण होतो. वर्गसंघर्षातून समाजाच्या एकतेला बाधा निर्माण होते.

**प्रश्न क्र. ६ वा :— सामाजिक गतिशीलतेच्या व्याख्या लिहून गतिशीलतेचे प्रकार लिहा?**

उत्तर :— न्यायालयात बेलीफ या पदावर कार्य करणारी व्यक्ती कारकून, वकील, न्यायाधीश, मंत्री व मुख्यमंत्री या पदापर्यंत पोहचल्याची उदाहरणे आहेत. याउलट दारु, जुगार यासारखी अयोग्य व्यसने जडल्यामुळे काही श्रीमंत व्यक्ती दरिद्री होऊन रसातळाला पोहचल्याचीही उदाहरणे आपणास दिसून येतात. व्यक्तीने आपला सामाजिक स्तर बदलण्याच्या क्रियेला सामाजिक गतिशीलता असे म्हणतात.

१. **पी.ए. सोरोकिन यांच्या मते** :— ''सामाजिक गतीमत्व हे विशिष्ट सामाजिक स्थानातून दुसऱ्या सामाजिक स्थानात प्रवेश करण्याची प्रक्रिया होय.''

२. **हॉर्टन आणि हंट यांच्या मते** :— ''व्यक्तीची एका सामाजिक दर्जाकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे जाण्याची क्रिया म्हणजे सामाजिक गतिशीलता होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता सामाजिक गतिशीलता या संकल्पनेत मुळ सामाजिक स्थानात बदल होणे असा अर्थ अभिप्रेत आहे. हा बदल वरच्या अथवा खालच्या या दोनपैकी कोणत्याही दिशेकडे जाणारा असू शकतो.

**सामाजिक गतिशीलतेचे प्रकार :—**

१. **समस्तर गतिशीलता** :— सामाजिक स्तरातील व्यक्ती एका पदावरुन त्याच प्रकारची प्रतिष्ठा असणाऱ्या दुसऱ्या पदावर जाते तेव्हा त्या गतिशीलतेला समस्तर गतिशीलता असे म्हणतात. शाळेतील शिक्षकाची नोकरी सोडून शिकवणी वर्ग सुरु करणे. गतिशीलतेच्या या प्रकारात व्यक्तीचे स्थान बदलले तरी तिचा सामाजिक वर्ग मात्र बदलत नाही. म्हणून ही समस्तरीय गतिशीलता होय.

२. **उदग्र गतिशीलता** :— भंगारीत काढलेल्या लोखंडाचा व्यापार करणारी व्यक्ती अल्पावधीतच स्वत:च्या मालकीचा पोलाद निर्माण कारखाना काढते तेव्हा त्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेत, मानसन्मानात व संपत्तीत फार मोठया स्वरुपाचा बदल घडून येतो. उदग्र गतिशीलतेचे पुढील दोन उपप्रकार पडतात.

**अ) उर्ध्वगामी गतिशीलता** :— जेव्हा स्थानात वरची दिशा सुचित करणारा बदल घडून येतो तेव्हा त्या गतिशीलतेस उर्ध्वगामी गतिशीलता असे म्हणतात. लहानसा

व्यापार सोडून मोठा उद्योगपती होणे म्हणजे अर्पित दर्जापेक्षा अर्जित दर्जा उंचावला की उर्ध्वगामी गतिशीलता दिसून येते.

**ब) <u>अधोगामी गतिशीलता</u>** :— जेव्हा स्थानात खालची दिशा सुचित करणारा बदल घडून येतो तेव्हा त्या गतिशीलतेस अधोगामी गतिशीलता असे म्हणतात. व्यापारामध्ये दिवाळखोरी जाहीर केली की त्या व्यक्तीची प्रतिष्ठा पूर्वीपेक्षा अधिक कमी होते. या प्रकाराला अधोगामी गतिशीलता असे म्हणतात.

३. **<u>आंतरपिढी गतिशीलता</u>** :— प्रारंभीच्या काळात शेतमजूर वा चपराशी या पदावर असणारा मुलगा न्यायाधीश अथवा जिल्हाधिकारी होतो आणि त्याचे वडील शेतमजूर किंवा चपराशी याच पदावर असतात. हे आंतरपिढी उर्ध्वगामी गतिशीलतेचे उदाहरण आहे.

४. **<u>पिढी अंतर्गत गतिशीलता</u>** :— एखाद्या गर्भश्रीमंत व कर्तृत्ववान असणाऱ्या वडीलाचा मुलगा त्यांच्या पैशाची वाटेल तशी उधळपट्टी करुन गरिबीचे जीवन जगू लागला तर ही पिढी अंतर्गत गतिशीलता घडून आली असेच म्हणावे लागते.

**प्रश्न क्र. ७ :— गतिशीलतेला प्रोत्साहन देणारे घटक लिहा?**

उत्तर :— सामाजिक स्तरीकरणाचा प्रकार कोणताही असला तरीही प्रत्येक समाजात सामाजिक गतिशीलतेस प्रोत्साहन देणारे घटक आढळतात. ते पुढीलप्रमाणे,

१. **<u>शिक्षण</u>** :— आधुनिक समाजात वरचे स्थान प्राप्त करण्याचे शिक्षण हे महत्वाचे साधन झाले आहे. ज्ञान वा शिक्षणामुळे व्यक्तीच्या आचार—विचारात आमुलाग्र बदल घडून येतो. शिक्षण किंवा विशिष्ट प्रकारचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तीस समाजातील महत्वाची पदे मिळतात.

२. **<u>दळणवळण व संदेशवहनाची साधने</u>** :— दळणवळणाच्या साधनांचा अभाव असणाऱ्या समाजात गतिशीलतेला फारसा वाव नसतो. प्रगत दळणवळणाच्या साधनांमुळेच व्यक्तीला आपले गाव सोडून दुरवरच्या प्रदेशात जाणे शक्य होत असल्यामुळे हा गतिशीलतेला प्रोत्साहन देणारा घटक आहे.

३. **<u>औद्योगिकीकरण व शहरीकरण</u>** :— औद्योगिकीकरण वाढले की नगर आणि महानगरांच्या संख्येत वाढ होते. औद्योगिकीकरण व शहरीकरणातील वाढीबरोबरच प्रदत्त किंवा अर्पित दर्जाचे महत्व कमी होत जाते तर अर्जित दर्जाचे महत्व वाढू लागते.

४. **<u>लोकशाही</u>** :— स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांना लोकशाहीत सर्वोच्च्य महत्व दिले जाते. राजकीयच नव्हे तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रातही लोकशाही

पध्दतीचा आग्रह धरला जातो. त्यामुळेच स्वकर्तृत्वाच्या बळावर अधिक वरचे स्थान प्राप्त करणे शक्य होते.

५. **वैज्ञानिक प्रगती** :— नवीन वैज्ञानिक शोध आणि तंत्रज्ञानाचा विकास यांच्यामुळे समाजात आमुलाग्र बदल घडून येतात. त्यामुळे वरच्या स्थानावर जाण्याच्या संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध होतात.

६. **समाजाची मूल्यव्यवस्था** :— समाजात व्यक्तीस्वातंत्र्याला महत्व असेल आणि लोकशाही, समता, बंधुता ही मूल्ये समाजव्यवस्थेचा अविभाज्य भाग बनली असतील तर त्या समाजात स्वाभाविकपणे सामाजिक गतिशीलतेला अधिक वाव मिळतो.

७. **लोकसंख्या वाढीच्या दरातील फरक** :— सामान्यपणे श्रीमंत वर्गात जन्मदर कमी असतो तर गरीब वर्गात जास्त असतो. जेव्हा उच्च वर्गातील लोकांची संख्या कमी जन्मदरामुळे घटते तेव्हा खालच्या वर्गातील लोकांना अप्रत्यक्षपणे वरच्या वर्गात प्रवेश करण्याची संधी मिळते.

## युनिट क्र. ४ : समाजशास्त्रातील प्रमुख सैध्दांतीक दृष्टिकोन

## (Major Perspectives in Sociology)

**प्रश्न क्र. १ :— सामाजिक संरचनेच्या व्याख्या लिहून सामाजिक संरचनेचे घटक किंवा सामाजिक व्यवस्थेचे संरचनात्मक पैलू लिहा?**

उत्तर :— कुटुंबाची संरचना, खेडयाची संरचना, महानगराची रचना वेगवेगळी आहे. कुटुंब, धर्म, विवाह, राज्य, शिक्षण यासारख्या प्रत्येक संस्थेची रचना भिन्न आहे. त्यांचे अध्ययन करण्यासाठी संरचना व प्रकार्ये या संकल्पनेचा उपयोग करणे शक्य असल्यामुळे त्यांच्यातील संबंध समजून घेणे आवश्यक ठरते.

**व्याख्या** :—

१. **विल्यम डॉबिनर यांच्या मते** :— ‘‘सुव्यवस्थित स्थिर व पुन्हा पुन्हा निर्माण होणाऱ्या परस्परसंबंधांनी सामाजिक संरचना निर्माण होते.’’

२. **कार्ल मॅनहिम यांच्या मते** :— ‘‘सामाजिक संरचना आंतरक्रियात्मक, सामाजिक शक्तीचे जाळे होय.’’

वरील व्याख्या लक्षात घेता, १) सामाजिक संरचना ही एक अमूर्त संकल्पना आहे. २) समाज स्थिर अशा घटकांनी मिळून बनला आहे. ३) संरचनेचे घटक अमूर्त आहेत. ४) समाज ही पारस्परिक संबंधाची सापेक्षत: स्थिर अशी व्यवस्था आहे. ५) प्रत्येक समाजाची संरचना भिन्न असते. ६) समाज संरचना काळाच्या ओघात विविध कारणामुळे बदलत असते.

**सामाजिक संरचनेचे घटक**

कुटुंब, शाळा, कारखाना, राजकीय पक्ष यासारख्या कोणत्याही सामाजिक व्यवस्थेला संरचना असते. स्थिर स्वरुपाच्या परस्पर संबंधांनी संरचना अस्तित्वात येते. याचा अर्थ असा होतो की, **सामाजिक संरचनेचे जे घटक असतात तेच सामाजिक व्यवस्थेचे संरचनात्मक पैलू असतात.** हॅरि जॉन्सनने संरचनेचे पुढील चार घटक सांगितले आहे.

१. **भूमिका** :— समूहातील आपले स्थान व दर्जा यांना अनुसरुन असणारे कार्य ज्या रितीने व्यक्ती पार पाडते, त्यास भूमिका असे म्हणतात. शिक्षक—विद्यार्थी, पती—पत्नी, मालक—नोकर इत्यादी प्रकारचे सामाजिक संबंध हे व्यक्ती—व्यक्तीमधील संबंध नसून भूमिकाधारकांमधील संबंध आहेत. समूहाची संरचना अशा विविध भूमिका मिळून बनत असते.

२. **गट किंवा समूह—उपसमूह** :— समाजासारखा आकाराने प्रचंड मोठा असणारा समूहा हा कुटुंब, जाती, खेडे, महानगर यासारख्या असंख्य उपसमूहांमध्ये विभाजित

असतो. त्यापैकी कोणत्याही समूहाचे सदस्य असणाऱ्या व्यक्ती मृत्यू पावल्या तरीही त्या समूहाचे अस्तित्व कायम असते. या अर्थानेच गट हे संरचनेचे घटकतत्व होय.

३. **प्रमाणके** :— नियमने म्हणजे व्यक्तीच्या स्वैर वर्तनावर समाजाने घातलेले बंधन होय. व्यक्तीला आपल्या भूमिकेनुसार प्राप्त होणारे अधिकार आणि कर्तव्ये कोणती आहेत हे सांगणारे वर्तनाचे नियम म्हणजे प्रमाणक होय. भूमिका—भूमिकांमध्ये परस्परसंबंध निर्माण करण्याचे कार्य प्रमाणकांद्वारे होत असल्यामुळे प्रमाणक संरचनेचा आधारभूत घटक ठरतो.

४. **मूल्ये** :— चांगले—वाईट याबाबतचे मूल्यांकन करण्यासाठी मूल्य या मापदंडाचा आधार घेतला जातो. मूल्ये त्या—त्या समाजाच्या संस्कृतीद्वारेच निश्चित केली जातात. समाजपरत्वे मूल्ये वेगवेगळी असली तरी त्या—त्या समाजातील व्यक्ती आपआपल्या समाजाच्या त्या मूल्यांशी एकनिष्ठ राहतात. यामुळे आपोआपच वर्तनरीतींचे नियंत्रण व्यवस्थित पार पाडले जाते व समाज संरचना अबाधित राहते. अशाप्रकारे सामाजिक संरचना निर्माण करणारे घटक परस्परांशी संबंधित असल्यामुळे समूहाच्या रचनेला निश्चित असा आकार प्राप्त होतो.

**प्रश्न क्र. २ :— संघर्षवादी सिध्दांत आणि दृष्टिकोनाचा उदय व विकास लिहून मार्क्सच्या संघर्षवादी दृष्टिकोनाच्या विकासात अन्य विचारवंतांचे योगदान लिहा?**

उत्तर :— संघर्षवादी सिध्दांताची व्यवस्थित, सूत्रबध्द आणि शास्त्रशुध्द अशी मांडणी आधुनिक काळात सर्वप्रथम मार्क्सनेच केली. म्हणूनच कार्ल मार्क्स हा संघर्षवादी दृष्टिकोनाचा प्रणेता मानला जातो. २० व्या शतकात जॉर्ज सिमेल, राल्फ डऱ्हेनडॉर्फ, सी.डब्ल्यू.मिल्स, ओपेन होमर, रेन्ड्रॉल कॉलिन्स, लेविस कोजर आदी विचारवंतांनी संघर्षवादी सिध्दांतात नव्याने भर टाकली. यामुळे मार्क्सने प्रतिपादीत केलेल्या संघर्षवादी दृष्टिकोनास एक नवीन आणि वेगळे असे स्वरुप प्राप्त झाले.

मानवी सभ्यतेचा इतिहास पाहिला तर अगदी प्रारंभीच्या काळात म्हणजे आदीम अवस्थेत आर्थिक विषमता नव्हती. कारण आदीम मानवाजवळ कोणतीही अवजारे व शस्त्रे नव्हती. लोकसंख्या कमी होती. जीवनविषयक गरजा भागविण्यासाठीची संसाधने मुबलक होती. ही समानतेची स्थिती असण्याची अवस्था म्हणजे साम्यवादी अवस्था होय असे मार्क्स म्हणतो. काही काळानंतर मानवाने शस्त्रे—अवजारे निर्माण केली. उत्पादन साधनांवर काही लोकांची मालकी प्रस्थापित झाल्यामुळे मालकी नसणाऱ्या लोकांचे शोषण सुरु झाले. अशाप्रकारे समाजव्यवस्थेत संघर्षाची सुरुवात अतिप्राचीन काळात झालेली आहे. संघर्ष हा समाजाचा स्थायी भाव आहे. आजपर्यंतच्या मानवजातीचा इतिहास हा वर्गसंघर्षाचाच इतिहास आहे. मालक—गुलाम, जमीनदार—भूदास, भांडवलदार—कामगार असे समाजात दोन वर्ग निर्माण होण्याचे

कारण उत्पादन साधने व उत्पादन पध्दती यावर काही लोकांचे असणारे मालकी हक्क हेच आहे. उत्पादन साधनांवर मालकी हक्क असणारा वर्ग हा दुसऱ्या वर्गाचे शोषण करीत असल्यामुळे संघर्ष निर्माण होऊन एकच वर्ग राहील, तो म्हणजे कामगार वर्ग होय. या अवस्थेतील समाजाला वर्गविरहित व राज्यविरहित समाज असे मार्क्स संबोधतो.

आधुनिक काळातील संघर्षवादी विचारवंत मार्क्सप्रमाणे संघर्ष ही विघटनकारी शक्ती आहे असे मानत नाहीत. डऱ्हेनडॉफ आणि कोजर हयांनी आपल्या सिध्दांतात संघर्षाच्या प्रक्रियेचे एकात्मता साधण्याचे स्वरुप स्पष्ट केले आहे. संघर्षाच्या प्रक्रियेत रचनात्मक शक्ती कोणती, असा प्रश्न आपल्यासमोर निर्माण होतो. त्या प्रश्नाचे उत्तर देतांना कोजर म्हणतो, काही मिळविण्यासाठी वा आपल्याजवळ जे नाही ते मिळविण्यासाठी विभिन्न लोक एकत्र येतात. त्यांचे संघटन निर्माण होते. संघर्षामुळे समाजातील विषमतेच्या आणि असमानतेच्या स्थितीवर प्रकाश पडतो आणि विषमतेच्या स्थितीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न सुरु होतात. मार्क्स आपल्या सिध्दांतात संघर्षाच्या नकारात्मक पैलूंवर भर देतो तर आधुनिक काळातील विचारवंत त्यांच्या संघर्षवादी सिध्दांतात संघर्षाच्या सकारात्मक पैलूंवर अधिक भर देतात.

## संरचनात्मक कार्यवादी आणि संघर्षवादी दृष्टिकोन यातील फरक

| | |
|---|---|
| १) समाजात समतोलाची प्रवृत्ती असते. | १) समाजात नेहमी संघर्ष निर्माण होत असतो. |
| २) समाजात असंतोषाचे निराकरण करण्याची विकसीत झालेली असते. | २) समाज सतत परिवर्तनशील यंत्रणा असतो. |
| ३) समाजाचे घटक स्थैर्य प्रस्थापित करतात. परिवर्तन | ३) समाजात विघटन आणि सुरु असते. |
| ४) प्रमाणके, मूल्यातून समाज बांधला गेला बलामुळे आहे. | ४) समाज हा शक्ती वा एकसंघ राहतो. |
| ५) सामान्य सामाजिक मूल्यांमुळे समाजात एकात्मतेची आणि सुव्यवस्थेची निर्मिती होते. असते. | ५) समाजात व्यवस्था ठेवण्यात शक्तीची भूमिका महत्वाची |

**प्रश्न क्र. ३ :— स्त्रीवादाच्या व्याख्या लिहून स्त्रीवादी दृष्टिकोन आणि स्त्रीवादी चळवळींच्या अभ्यासाचे महत्व लिहा?**

उत्तर :— स्त्रीवादी दृष्टिकोन हा अगदी अलीकडच्या काळात म्हणजे २० व्या शतकात उदयास आलेला दृष्टिकोन होय. कुटुंबाला आनंद मिळवून देणे आणि बालसंगोपनाची कार्य करणे यामध्ये स्त्रियांचे उभे आयुष्य वाया जाऊ नये, त्यांनाही स्वत:चा व्यवसाय वा आर्थिक उत्पन्नाचे साधन असले पाहिजे असे मत मांडणारा जॉन स्टुअर्ट मिल हा सर्व उदारमतवादी विचारवंतामध्ये स्त्रियांच्या अधिकाराचा पाठीराखा असणारा एकमेव विचारवंत होय. जागतिक लोकसंख्येचा अर्धा भाग म्हणजे स्त्रीया. विकसित राष्ट्र असो की अविकसित राष्ट्र असो, कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेने आणि राज्यव्यवस्थेने स्त्रियांना त्यांचे रास्त स्थान अद्यापही दिलेले नाही असे म्हणता येते. स्त्रियांचा संघर्ष हा पुरुषांविरुध्दचा नसून स्त्रीला दुय्यमत्व बहाल करण्याच्या पुरुषीपणा विरुध्द त्यांचा संघर्ष आहे. समाजाचा घटक म्हणून पुरुषांच्या बरोबरीने स्थान व अधिकार प्राप्त करण्यासाठीचा हा संघर्ष आहे. स्त्री पुरुषांमधील विषमता निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे, असे स्त्री चळवळींच्या समर्थकांचे म्हणणे आहे. आपल्यावर झालेल्या अन्यायाला विरोध करण्यासाठी स्त्रियांकडून संघटित झालेला प्रयत्न म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय.

**व्याख्या :—**

१. **स्टॅनले लिझ** आणि **सेवाईज** यांच्या मते :— ''ज्या साहित्यामध्ये स्त्रियांची समानता आणि त्यांचा विकास यासंबंधी अभ्यास केला जातो त्यास स्त्रीवाद असे म्हटले जाते.''

२. **स्पेंडर** यांच्या मते :— ''स्वतंत्र जीव म्हणून उपेक्षित स्त्रियांविषयी विश्लेषण करणे म्हणजे स्त्रीवाद होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता स्त्रीमुक्ती चे तीन विचार प्रवाह आहेत. १) उदारमतवादी विचारप्रवाह २) समाजवादी विचारप्रवाह ३) जहालमतवादी विचारप्रवाह असे वेगवेगळे विचारप्रवाह असले तरीही त्यांच्या मागील मुख्य सूत्र एकच आहे, ते म्हणजे ''पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही त्यांचे आयुष्य त्यांच्या मर्जी आणि इच्छेनुसार घडविण्याचा अधिकार असावा'' हे होय. अशाप्रकारे स्त्रीवाद ही एक विचारप्रणाली आहे, 'लिंगाधिष्ठित समानतेचे तत्व' हा स्त्रीवादी, दृष्टिकोनाचा, स्त्रीवादी विचारसरणीचा आणि स्त्रीवादी चळवळींचा मुख्य आधार आहे. ''जैविक वा मानसिक कारणांमुळे नव्हे तर पुरुषप्रधान सभ्यतेनेच स्त्री नावाचा प्राणी आजच्या स्वरुपात निर्माण केला आहे. ''असे मत सिमॉन द बोआ या फ्रेंच स्त्रीवादी लेखिकेच्या 'दि सेकंड सेक्स' या ग्रंथात मांडण्यात आले आहे.

**स्त्रीवादी दृष्टिकोन आणि स्त्रीवादी चळवळींच्या अभ्यासाचे महत्व :—**

**१. सार्वजनिक जीवनातील स्त्रियांच्या सहभागात वाढ** :— स्त्रीया हा जागतिक लोकसंख्येचा अर्धा भाग आहे. सार्वजनिक जीवनात स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीनेही स्त्री मुक्ती विषयक प्रश्नांचे अध्ययन करण्याला महत्व प्राप्त झाले आहे.

**२. मानवी हक्क या संज्ञेच्या विकासात महत्वाचे योगदान** :— 'मानवी हक्क' या संकल्पनेच्या विकासात स्त्रीवादी विचारवंत व लेखक आणि स्त्री मुक्तीची आंदोलने यांचे महत्वपूर्ण असे योगदान आहे.

**३. सामाजिक न्याय या तत्वाची अंमलबजावणी** :— समाजामधील दुर्बल स्त्री घटकांना सामाजिक न्याय मिळवून दिल्याशिवाय विकासाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही.

**४. स्त्री अस्मितेची निर्मिती** :— स्त्री चळवळीने समस्त स्त्री वर्गात एक व्यक्ती म्हणून स्त्री अस्मितेची निर्मिती करण्याचा मार्ग या दृष्टीनेही चळवळींचे अध्ययन करण्याला महत्व प्राप्त झाले आहे.

**५. भूतकाळात घडलेल्या चुकांची दुरुस्ती करण्याचा मार्ग** :— सर्वच देशांमध्ये स्त्रियांना अन्याय व अत्याचाराला तोंड द्यावे लागते. म्हणून स्त्रियांचे हक्क मान्य करणे म्हणजे भूतकाळात घडलेल्या चुकांची दुरुस्ती करणे होय असे म्हणता येईल.


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २०२१ च्या नव्या अभ्यासक्रमानुसार

## B.A.SECOND YEAR- 3rd SEMESTER Major-1

# समाजशास्त्रीय विचारांचे अधिष्ठान

# FOUNDATION OF SOCIOLOGICAL THOUGHT





## *AUGUST COMTE (1798-1857)

## *HERBERT SPENCER (1820-1903)

## *CHARLES COOLEY (1864-1929)

## *EMILE DURKHEIM (1858-1917)

## *MAX WEBER (1834-1920)

## *KARL MARX (1818-1883)


**AUTHOR**

**DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR**

**DEPARTMENT OF SOCIOLOGY**

**LATE. VASANTRAO KOLHATKAR ART'S COLLEGE, ROHANA**

**TAH.ARVI DIST.WARDHA (M.S.)**

**ISBN-978-93-82962-14-4**

**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur**
**B.A.Second Year: Semester-III Major-1**
**Foundations of Sociological Thought**

**1. Emergence of Sociology as a Discipline:**

A) The intellectual and social forces

B) The social,economic and political forces

**2) Founders of Sociology: I**

A) August Comte: Views on positivism and law of three stages of society

B) Herbert Spencer: Organic analogy,theory of social evolution,military and industrial society

**3) Founders of Sociology: II**

A) Charles Horton Cooley: Looking-Glass Self,primary group-its characteristics and importance

B) Emile Durkheim: Types of Suicide,religion and its functions

**4) Founders of Sociological Thought: III**

A) Karl Marx: Capitalism and its criticism,class and class struggle

B) Max Weber: Types of social action,types of authority and bureaucracy.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## बी.ए. भाग २

## सेमीस्टर तृतीय

## समाजशास्त्रीय विचारांचे अधिष्ठान

## Foundation of Sociological Thought

## युनिट क्र. १ बौध्दिक व सामाजिक क्षेत्रांमधील घडामोडी

## (Emergence of Sociology as a Discipline)

==================================================

**प्रश्न क्र. १ :— एक विज्ञान म्हणून समाजशास्त्राचा उदय होण्यामधील बौध्दिक व सामाजिक घडामोडींचे योगदान स्पष्ट करा?**

उत्तर :— समाजशास्त्राचा उदय जरी एकोणविसाव्या शतकात झाला असला तरी त्याच्या उदयाचे बीजारोपण मात्र सतराव्या व अठराव्या शतकातील बौध्दिक व सामाजिक क्षेत्रांमधील विविध घडामोडींमध्ये झाले असल्याचे दिसून येते. यावरुन समाजशास्त्रासारख्या एका नवीन ज्ञानशाखेचा उदय होण्यास तत्कालीन परिस्थिती कारणीभूत झाली. तिथे ढोबळमानाने दोन भाग पाडता येतात ते पुढीलप्रमाणे,

१. **बौध्दिक क्षेत्रातील विकास** :— बौध्दिक क्षेत्रात लक्षणीय स्वरुपाचा बदल घडून आला तो कालखंड ‘बौध्दिक पुनरुज्जीवनाचा काळ’, ‘उद्‌बोधनाचा काळ’, ‘प्रबोधनाचा काळ’ अथवा ‘प्रबोधन चळवळीचा कालखंड’ अशा नावानी संबोधिला जातो. मध्ययुगात धर्मसत्तेचे म्हणजे पोपच्या सत्तचे वर्चस्व निर्माण झाले होते. राजाच्या सत्तेपेक्षाही पोपची सत्ता श्रेष्ठ आहे असे मानले जात असे. त्या काळात पोपच्या धर्मसत्तेविरुध्द विचार मांडणारा हॉब्ज हा पहिला विचारवंत मानला जातो. त्याने तर्कधिष्ठित विचारांवर भर दिला. परंपरागत मूल्य आणि संस्था अतार्किक म्हणून त्याज्य ठरविल्या. म्हणून प्रबोधन चळवळीच्या कालखंडाला ‘वैचारिक क्रांतीचे युग’ असे म्हटले जाते.

**व्याख्या :—**

१. **वसंत सिरसीकरांच्या मते :—** ‘‘युरोपला मध्ययुगीन निद्रेतून जागृत करणाऱ्या आणि नव्या प्रेरणा देणाऱ्या ऐतिहासिक घटनेला प्रबोधन असे म्हणतात.’’

२. **हरीहर ढोसर यांच्या मते :—** ‘‘मध्ययुगीन स्थितीप्रिय अवस्थेचा त्याग करुन मानवाने ज्या प्रेरणेमुळे गतिमानता धारण केली ती प्रेरणा म्हणजे प्रबोधन होय.’’

मध्ययुगाला मानवजातीच्या इतिहासात ‘अंधकाराचे युग’ असे संबोधिले जाते. धर्मसत्तेचे प्राबल्य, सरंजामशाही, सनातनी वृत्ती, अविवेकी अंधश्रध्दा या

सर्वांच्या वर्चस्वातून मध्ययुगातील सामाजिक व राजकीय जीवनात प्रगतीच्या सर्व वाटा बंद झाल्या होत्या. प्रबोधन चळवळीने ही परिस्थिती बदलण्यास सुरुवात केली. फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन स्वातंत्र्ययुध्द, रशियन राज्यक्रांती यांची मुळे प्रबोधन कालखंडात दडली असून या कालखंडातील प्रगतीच्या प्रमूख क्षेत्रांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**<u>प्रबोधन कालखंडातील प्रगतीची प्रमुख क्षेत्रे</u> :—**

१. **<u>विज्ञानातील नवीन शोध</u> :—** कोपरनिकसने ग्रहमालेचे मुख्य केंद्र सूर्य असल्याचे स्पष्ट केले. गॅलिलिओने दुर्बीणीचा शोध लावला. रॉजर बेकन, आयझॅक न्यूटनने संशोधन केले. या कालखंडातील वैज्ञानिक प्रगती ही मानवी विचारांना नवीन दिशा देणारी ठरली.

२. **<u>धर्मसत्तेच्या वर्चस्वाला ओहोटी</u> :—** प्रबोधन युगात पोपचे वर्चस्व संपूष्टात आले. मार्टिन ल्युथर हा युरोपमधील धर्मसुधारणेचा अग्रदूत म्हणून ओळखला जातो.

३. **<u>छापखान्याचा शोध</u> :—** गटेनबर्ग हा मुद्रण कलेचा जनक मानला जातो. असंख्य लेखक, विचारवंत, धर्मसुधारक यांचे विचार व ग्रंथ असंख्य लोकांपर्यत जाऊन पोहचले. मुद्रण कलेच्या शोधामुळे वैचारिक क्षेत्रातील क्रांतीला सुरुवात झाली.

४. **<u>नवीन जलमार्ग व प्रदेशांचा शोध</u> :—** बार्थोलोडासने 'केप ऑफ गुड होप' कोलंबसने अमेरिका आणि वास्को द गामा ने भारताच्या किनाऱ्याचा शोध लावला. उद्योगधंदे, व्यापार, धर्मप्रसार, ज्ञानाच्या कक्षा वाढविण्यासाठी या शोधाचे सहाय्य झाले.

५. **<u>कलेच्या अविष्काराला बहर</u> :—** चित्र, शिल्प, स्थापत्य आणि संगीताच्या क्षेत्रातही आमूलाग्र परिवर्तन घडून आले. समूहगीते, नाटयगीते, प्रेमगीते असे नविन प्रकार रुढ होऊन कलेला अधिक वाव मिळाला. याच कालखंडात पाश्चिमात्य शास्त्रीय संगीताची निर्मिती झाली.

६. **<u>साहित्याची निर्मिती</u> :—** ग्रीक आणि लॅटिन भाषेशिवाय फ्रेंच, स्पॅनिश, इंग्लिश आदि भाषांमध्ये साहित्याची निर्मिती झाली. बोकॅशिओ या साहित्यिकाने धर्मसंस्थेतील अनैतिकता, धर्मगुरुची नीतिभ्रष्टता व त्यांच्या उच्छृंखल वर्तनाचे चित्रण आपल्या गद्य साहित्यातून चव्हाटयावर आणले. त्यामुळे समाज सुधारणेची चळवळ सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचली.

७. **<u>राष्ट्र — राज्याचा उदय</u> :—** परकीयांचे शासन असणाऱ्या वसाहतींमध्ये राष्ट्रवादाची भावना प्रबळ होताच युरोपियन देशांना त्यांचा वसाहतवाद व साम्राज्यवाद संपूष्टात आणावा लागला.

८. **प्रबोधन प्रक्रिया :—** महाराष्ट्रातही समाजप्रबोधनाची परंपरा संत ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, गोविंद रानडे, रमाबाई, आगरकर, टिळक, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, शाहू महाराजापर्यंत प्रदिर्घ आहे. म्हणून प्रबोधनाच्या चर्चेत देशाचा संदर्भ महत्वाचा ठरतो.

९. **विचारवंताचे योगदान :—** हॉब्ज, लॉक व रुसो या तीन विचारवंतांनी 'सामाजिक कराराचा सिध्दांत' मांडून राज्य हे ईश्वराने निर्माण केले या विचाराला केवळ हादरा दिला असे नाही तर तो पक्का रुजलेला विचार पूर्णत: उखडून टाकण्याचे कार्य या सिध्दांताने केले.

२. **सामाजिक क्षेत्रांमधील घडामोडी :—**

१. **मध्ययुगातील सरंजामशाही समाजव्यवस्था** :— मध्ययुगाची समाप्ती आणि आधुनिक युगाचा प्रारंभ या दोहोंच्या मधल्या काळात समाजशास्त्राचा उदय झाला आहे. पुरोहित, धर्मगुरुंचे व सैनिकांचे वर्चस्व असणारी समाजव्यवस्था म्हणजे सरंजामशाही समाजव्यवस्था होय. सर्वसामान्य प्रजा, सामंत आणि धर्मगुरु व पुरोहित या दोघांच्या जाचाखाली अक्षरश: भरडली जात होती. मानवाने ऐहिक बाबतीत राजाज्ञेत व पारलौकिक बाबतीत धर्माज्ञेत म्हणजेच पोपच्या आज्ञेत असावयास हवे असे त्या काळातील परंपराभिमान्यांचे म्हणणे होते.

२. **सरंजामशाही समाजव्यवस्थेला हादरे देणाऱ्या घटना** :— पोपच्या सत्तावर्चस्वाला राजे कंटाळले होते. प्रजा आणि व्यापारी वर्गाने राजाला साथ दिली. या संघर्षात राजाने पोपचे सत्तावर्चस्व पूर्णत: झुगारुन दिले. शक्तीशाली झालेल्या राजाने सरदाराचा शासनकारभार चालविण्याचा व स्वत:चे सैन्य बाळगण्याचा अधिकार काढून घेतला. राजाने सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. राजाची निरंकुश सत्ता सुरु झाली. सामंतशाहीचा अंत झाला.

३. **संक्रमणावस्थेतील समाजव्यवस्था** :— यंत्रे आणि पशुबाहय उर्जा या दोहांच्या निर्मितीने औद्योगिक क्रांतीचा व औद्योगिक युगाचा प्रारंभ झाला. कुटीर उद्योग बंद पडल्यामुळे लोकांनी यंत्रोत्पादन केंद्राकडे धाव घेतली. राज्यकर्ते आणि भांडवलदार यांचा उच्च वर्ग आणि कामगार वर्ग अशी स्तरीकरण व्यवस्था निर्माण झाली. मध्ययुगीन सरंजामशाही व्यवस्था मोडकळीस येऊन नवीन समाजव्यवस्था उदयास येण्यास सुरुवात झाली. कॉम्तच्या मते धर्मशास्त्रीय विचारसरणी हे अस्तंगत समाजव्यवस्थेचे मुख्य लक्षण होते. तर उदयोन्मुख समाजव्यवस्था ही शास्त्रीय विचारसरणीच्या वा बुध्दिनिष्ठेच्या पायावर उभी राहणार आहे. आधुनिक समाजात शास्त्रज्ञांचे व उद्योगपतींचे वर्चस्व राहणार आहे हे संक्रमण काळात म्हणजे १९ व्या शतकाच्या प्रारंभ काळातच कॉम्त स्पष्ट करतो.

**प्रश्न क्र. २ :— फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम आणि समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभुमी स्पष्ट करा.**

उत्तर :— १७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती समाजाच्या बौध्दिक, सामाजिक, धार्मिक, नैतिक अशा सर्वच अंगाना स्पर्शून गेली. आठशे—नऊशे वर्षे टिकून राहिलेल्या आणि जीर्ण झालेल्या मध्ययुगीन समाजाची समाप्ती या क्रांतीने केली. उद्योग, समता, प्रगती ही नव्या समाजरचनेची ब्रीदवाक्ये झाली. १७८९ ते १७९९ हा दहा वर्षाचा काळ फ्रांसच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील महत्वाचा कालखंड आहे हे पुढील परिणामावरुन लक्षात येईल.

**फ्रेंच राज्यक्रांतीचे राजकीय परिणाम :—**

१. **विकेंद्रीकरणावर भर** :— केंद्रीकरण ही जुन्या राजेशाहीची देणगी होती. फ्रेंच राज्यक्रांतीचा भर विकेंद्रीकरणावर होता. युरोपात स्थानिक स्तरावरच्या कारभारावर मध्यवर्ती देखरेख आणि स्थानिक लोकांची कर्तव्य यांची सांगड घालण्याचा विचार क्रांतीने रुजविला.

२. **राज्याचे स्वरुप** :— राज्यशासनाचे स्वरुप राजेशाही, साम्राज्यशाही, उमरावशाही, लोकशाही असे कोणतेही असो, त्याला जनतेची संमती हवी हा विचार फ्रेंच राज्यक्रांतीने पक्का रुजविला.

३. **नव्या कायद्याची संहिता** :— क्रांतीमुळे दिवाणी आणि फौजदारी कायद्यात बदल करण्यात आले. कायद्याच्या नव्या संहितेत माणुसकी आली आणि सामान्य माणसाला कायदा समजण्यास मदत झाली.

४. **राज्यकारभारात सुव्यवस्था** :— सुव्यवस्था याचा अर्थ १) व्यक्तीचे हक्क निश्चित केले. २) स्थानिक स्तरावील कारभाराची जबाबदारी निश्चित केली. ३) कायद्यासमोरील समानता तत्वाचा स्विकार.

**फ्रेंच राज्यक्रांतीचे आर्थिक परिणाम :—**

१. **नवीन अर्थव्यवस्थेचा प्रारंभ** :— १७८९ च्या क्रांतीने राजा आणि सरदार यांनी सुरु केलेली देशाच्या तिजोरीची लुट एकदम पूर्णपणे थांबविली. यामुळे शास्त्रशुध्द आर्थिक तत्वांवर आधारलेली अर्थव्यवस्था निर्माण करणे फ्रांसला शक्य झाले.

२. **नवीन आर्थिक कल्पना व विचारांचा उदय** :— देशातील उत्पन्न आणि त्याचा व्यय देशकल्याणासाठीच झाला पाहिजे ही कल्पना या क्रांतीने पुढे आणली. राष्ट्राचे हित आर्थिक व्यवहारात जपण्याचे प्रयत्न फ्रान्स व युरोपद्वारे क्रांतीनंतरच्या काळात मोठया प्रमाणावर झाल्याचे दिसून येते.

**फ्रेंच राज्यक्रांतीचे सामाजिक व सांस्कृतिक परिणाम :—**

१. **राष्ट्रीय शिक्षण** :— प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे, एक हजार वस्तीला एक शाळा असावी असे आदेश क्रांतीनंतरच्या काळातील फ्रेंच सरकारने काढले होते. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाचे महत्व क्रांतीनेच अधोरेखांकित केले हे मात्र निश्चित.

२. **सामाजिक संस्थाचा उदय** :— क्रांतीनंतरच्या काळात सामाजिक संस्थांच्या विकासाची जबाबदारी सरकारने आपल्याकडे घेतली. रुग्णालये, आश्रयस्थाने, राष्ट्रीय स्मारके या सर्व बाबी क्रांतीनंतरच्या काळात नव्या कल्पनेतून निर्माण झाल्या आहेत.

३. **कॅथॉलिक चर्च संघटनेच्या कार्यात सुधारणा** :— १८ व्या शतकातील कॅथॉलिक चर्चची संघटना अन्याय, जुलूम करण्याबाबत कुप्रसिध्द होती. क्रांतीनंतरच्या काळात चर्च संघटनेकडून होणारा जुलूम पार गेला. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर नव्या युगातील आधुनिक राज्य जन्मास आले.

**प्रश्न क्र. ३ :— औद्योगिक क्रांतीचे परिणाम आणि समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी स्पष्ट करा.**

उत्तर :— औद्योगिक क्रांतीचा उदय झाल्यानंतर समाजव्यवस्थेची घडी पूर्णपणे बिघडली होती. विस्कळीत झाली होती असे चित्र जवळपास संपूर्ण पश्चिम युरोपमध्ये होते. म्हणूनच समाजाचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करण्याची गरज आहे हा ऑगस्ट कॉम्त यांनी मांडलेला विचार केवळ फ्रांसमध्येच नव्हे तर संपूर्ण पश्चिम युरोप व अमेरिकेतही रुजला या सर्व ठिकाणी विद्यापीठामध्ये समाजशास्त्राचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन कार्य सुरु झाले. समाजशास्त्राच्या उदयाच्या पार्श्वभूमीचा औद्योगिक क्रांतीशी असणारा संबंध समजून घेण्यासाठी परिणामांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ) औद्योगिक क्रांतीचे आर्थिक परिणाम :—**

कारखान्यात रोजगाराची संधी मिळावी यासाठी ग्रामीण भागातून कामगारांचे लोंढे येऊ लागले. कारखान्याच्या आजूबाजूच्या प्रदेशात राहणाऱ्यांची संख्या वाढली. बकाल वस्त्या निर्माण झाल्या. सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नसल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले. रोगराई वाढली. ग्रामीण भागातून येणाऱ्या मजुरांच्या लोंढयामुळे त्या परिसराला मोठी लोकसंख्या असणारे नगर असे स्वरुप प्राप्त झाले. औद्योगिकरणाच्या पाठोपाठ नागरीकरणाचीही प्रक्रिया सुरु झाली.

१. **राष्ट्रीय उत्पन्नात वाढ** :— औद्यागिकीकरणामुळे पाश्चिमात्य देशांची निर्यात वाढली. तुलनेत आयातीचा खर्च कमी झाल्यामुळे राष्ट्रांचे उत्पन्न वाढले.

२. **दळणवळण आणि प्रसार साधनांचा विकास** :— औद्योगिक क्रांतीमुळे जलद वाहतुकीची साधने निर्माण झाली. प्रसार साधनांचा विकास झाला. व्यापार आणि उद्योगांचा विकास झाला.

३. **राहणीमानाचा दर्जा उंचावला** :— सुखसोईच्या गरजा पूर्ण करणे शक्य झाले की राहणीमानाचा दर्जा उंचावतो आणि त्यात वाढही होत आहे.

४. **भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा उदय** :— औद्योगिक क्रांतीने कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचे युग संपुष्टात आले. त्याची जागा उद्योगप्रधान आणि भांडवलदारी अर्थव्यवस्थेने घेतली आहे.

५. **कृषी क्षेत्राचा विकास** :— रासायनिक खते, नवीन बी बियाणे, किटकनाशके इत्यादीचा वापर करुन शेतीचे उत्पादन वाढविण्यात आले.

६. **उपभोगात वाढ** :— औद्योगिकीकरणाने नव—नवीन वस्तुंच्या निर्मितीला चालना मिळाली. लोकांच्या आवडी—निवडी लक्षात घेऊन वस्तुंचे उत्पादन करण्यात येऊ लागले त्यामुळे लोकांच्या उपभोगात वाढ झाली.

७. **वस्तुच्या उत्पादनात वाढ** :— बाजारपेठेत असणाऱ्या मागणी पेक्षाही उत्पादन वाढल्यामुळे मंदीच्या लाटेचा सामना करण्याचीही पाळी मानवजातीवर आली.

**ब) औद्योगिक क्रांतीचे सामाजिक परिणाम :—**

१. **समाज जीवनावरील धर्माचा प्रभाव कमी झाला** :— लोक धर्मगुरुच्या आज्ञा निमूटपणे पाळीत असत. मध्ययुगातील सरंजामशाही समाजव्यवस्थेत पोप व चर्चचे महत्व अतोनात वाढले होते. धर्माच्या नावावर धर्मगुरु लोकांचे शोषण करीत असत. परंतू औद्योगिक क्रांतीनंतर लोकावरील धर्माचा प्रभाव कमी झाला.

२. **नवी समाजव्यवस्था** :— औद्योगिक क्रांतीमुळे सरंजामशाही व्यवस्था संपुष्टात येऊन तीन स्तरीय वर्गरचना असणारी भांडवलशाही समाजव्यवस्था अस्तित्वात आली.

३. **सामाजिक समस्या** :— औद्योगिकरणामुळे पर्यावरण व प्रदुषणाची समस्या, भ्रष्टाचाराची समस्या, अंमली पदार्थाच्या सेवनाची समस्या, काळया पैशाची समस्या इ. निर्माण झाल्या.

४. **सामाजिक प्रगती** :— औद्योगिक क्रांतीमुळे शिक्षणाचा प्रसार होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांचे महत्व वाढले. लोक वस्तूनिष्ठपणे विचार करु लागले.

५. **पायाभूत संस्थांची पुनर्रचना** :— कुटुंब, विवाह, धर्म, अर्थ, शिक्षण, राज्य या संस्थाची पुनर्रचना घडवून आणली. संयुक्त कुटुंबाची जागा विभक्त कुटुंबाने घेतली.

**क) औद्योगिक क्रांतीचे राजकीय परिणाम** :— औद्योगिक क्रांतीमुळे निरंकुश राजेशाहीचा अंत होऊन लोकशाही शासनपध्दती अस्तित्वात आली.

**प्रश्न क्र. ४ :— एक विज्ञान म्हणून समाजशास्त्राचा उदय होण्यामधील सामाजिक, आर्थिक व राजकीय शक्तीप्रवाह किंवा बले स्पष्ट करा?**

उत्तर :— **१) सामाजिक शक्तिप्रवाह किंवा बले** :— मध्ययुगात युरोपियन देशांमध्ये अनेक शतकांपासून सामंतशाही समाजव्यवस्था होती. धर्मगुरु व पुरोहितांचे वैचारिक क्षेत्रात प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. ऐहिक बाबतीत राजाज्ञेत व पारलौकिक बाबतीत धर्माज्ञेत असले पाहिजे अशी मानवी जीवनाची विभागणी त्यांनी केली. परंतु बौध्दिक विकासानंतर मानवाच्या वर्तनाबाबत करण्यात आलेली ही विभागणी तर्कसंगत नाही हे लोकांच्या लक्षात येऊ लागले. अनेक बाबतीत लोक शंका उपस्थित करु लागले. थॉमस व्हॉब्ज हा मध्ययुगात अत्यंत शक्तिशाली असणाऱ्या पोपच्या धार्मिक वर्चस्वाला आव्हान देणारा पहिला विचारवंत मानला जातो. मुद्रण कलेच्या शोधामुळे ग्रंथ सर्वसामान्य लाकांपर्यंत पोहोचले. त्याच्या वाचनाने विचारवंतांनी लावलेला अर्थ समजून घेण्याची क्षमता सर्वसामान्य माणसांमध्ये निर्माण झाली. यामुळे युरोपियन देशांमधील सामंतशाही समाजव्यवस्थेला हादरे बसू लागले. सामंतशाही समाजव्यवस्थेत उमराव व धर्मगुरुंचा मुठभर भाग सोडला तर अन्य सर्व लोक हे सामाजिक व आर्थिक विषमतेचे शिकार झाले होते. विशेषाधिकार प्राप्त झाल्यामुळे पुरोहित वर्ग उन्मत झाला होता. त्यांच्याविरुध्द दाद मागण्याची कोठे ही सोय नव्हती. त्यामुळे सामंतशाही समाज व्यवस्थेत सामाजिक व आर्थिक विषमतेविरुध्द असंतोष खदखदत होता. त्याला बाहेर पडण्यास जेव्हा वाट मिळाली तेव्हा सामंतशाही समाजव्यवस्था फारच अल्पकाळात कोसळून पडली. जनमानसात थैमान घालणाऱ्या व्यथांना सामंतशाहीच्या अखेरच्या पर्वात तोंड फुटले. तत्कालीन सामाजिक जीवनात बदल घडवून आणण्याच्या विचारांचा प्रवाह निर्माण झाला. हा विचारप्रवाह म्हणजेच सामाजिक शक्तिप्रवाह होय. त्यानेच समाजाचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करण्याची आणि विज्ञानवाद व बुध्दिप्रामाण्यावर आधारित समाजव्यव्स्थेची पुनर्रचना निर्माण करण्याची आवश्यकता प्रस्थापित केली.

२. **आर्थिक शक्तिप्रवाह** :— राजा आणि सामंत वा उमराव वर्ग यांनी सुरु केलेली देशाच्या तिजोरीची लूट थांबविण्याचे प्रयत्न युरोपियन देशांमध्ये सुरु झाले. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे राजाच्या निरंकूश सत्तेला विरोध करणाऱ्या चळवळी युरोपातील देशांमध्ये सुरु झाल्यामुळे अनेक युरोपियन देशांमधील राजांची सिंहासने गडगडली. केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रातही लोकशाही व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न युरोपियन देशांनी सुरु केले. देशाचे आर्थिक उत्पन्न आणि त्याचा व्यय (खर्च) हा देशकल्याणासाठीच असला पाहिजे असा विचार युरोपियन देशांमध्ये सामंतशाही व्यवस्थेच्या अखेरच्या पर्वात रुजला. औद्योगिक क्रांतीने कृषी व्यवस्थेवर आधारित असणारा समाज उद्योगप्रधान बनला. आधुनिकीकरणामुळे उद्योगप्रधान भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा व्याप वाढला. त्याकरीता नोकरशाहीसारखी

औपचारीक संघटना पुढे आली. बहुसंख्येने असणारे कामगार रात्रंदिवस काम करुनही अपुऱ्या वेतनावरच आपला उदरनिर्वाह करु लागले. औद्योगिक व्यवस्था आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेविरुध्द तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. त्याचे पर्यावसान कामगार चळवळीत झाले. बाल कामगार गलिच्छ वस्ती यासारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या. औद्योगिक क्रांतीने निर्माण केलेल्या नव्या बदलांशी कसे जुळवून घेता येईल यासंबंधी विचार करण्याची आवश्यकता विचारवंतांना वाटू लागली. आर्थिक—सामाजिक विचारप्रवाहाने समाजाचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

२. **राजकीय शक्तिप्रवाह** :— पोपच्या सत्तेचा प्रभाव कमी करण्यासाठीच्या संघर्षात व्यापारी वर्ग आणि प्रजा राजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. यातूनच पुढे निरंकुश राजसत्तेचा उदय झाला. माँटेस्क्यू, हॉब्ज, लॉक, रुसो आदी विचारवंतांनी मांडलेल्या विचारांनी राजकीय जीवनाला वेगळे वळण प्राप्त झाले. फ्रेंच राज्यक्रांतीने फ्रांसमधील शासनव्यवस्था संपुष्टात आणली. शासनाच्या निर्णयांना जनतेची संमती असली पाहिजे. हे राजकीय विचार फ्रेंच राज्यक्रांतीने जनमानसात पक्के रुजविले. पूर्वी केवळ कायदा—सुव्यवस्था व संरक्षण एवढीच कार्ये राज्याने करावी या विचाराला 'पोलीस राज्य' असे संबोधिले जाते. औद्योगिक क्रांतीनंतर मात्र विचारवंत कल्याणकारी राज्याची कल्पना मांडू लागले. औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या अनेकविध समस्यांनी राज्याच्या कार्यात वाढ केली. कामगारांच्या हिताचे कायदे करणे, बालकामगारांची कारखान्यात नियुक्ती करण्यावर बंधने आणणे, वेठबिगारांची सुटका करणे, राष्ट्रीय शिक्षणावर भर देऊन प्रशिक्षण देण्याच्या सोयी निर्माण करुन कुशल कामगारांची संख्या वाढविणे यासारखी अनेकविध कार्य राज्याला हाती घ्यावी लागली. हे सर्व लक्षात घेता समाजाचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करण्यामध्ये राजकीय शक्तीप्रवाहाचे महत्वपूर्ण योगदान आहे हे लक्षात येते.

## युनिट क्र. २ समाजशास्त्राचे प्रणेते — १ ऑगस्ट कॉम्त
## (Founders of Sociology-I) August Compte (1798-1857)

### प्रश्न क्र. १ :— ऑगस्ट कॉम्तचा प्रत्यक्षवादी दृष्टिकोण लिहा?

उत्तर :— कॉम्तचे प्रत्यक्षवादासंबंधीचे विचार म्हणजे समाजशास्त्राच्या अध्ययन पध्दती बाबतचे विचार होय. निरीक्षण, परीक्षण, प्रयोग व वर्गीकरण करण्याची एक सुव्यवस्थित कार्यप्रणाली म्हणजे प्रत्यक्षवाद अथवा वैज्ञानिक पध्दती होय असे कॉम्त म्हणतो. समाजजीवनासंबंधी वैज्ञानिक पध्दतीने प्राप्त झालेल्या सर्व तथ्यांचे विश्लेषण करण्याचा मार्ग म्हणजे प्रत्यक्षवाद होय असे कॉम्तचे म्हणणे आहे. कॉम्तच्या प्रत्यक्षवादाचे एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे त्यात धार्मिक आणि तात्विक विचार आणि दृष्टिकोणाला कोणतेच स्थान देण्यात आले नाही. धार्मिक व तात्विक दृष्टिकोनांचा अवलंब करुन असाधारण सामाजिक घटनांचे अध्ययन केले तर ते वैज्ञानिक राहणार नाही असे कॉम्त स्पष्ट करतो. कॉम्तच्या मते प्रत्यक्षवाद वस्तुस्थिती निदर्शक असून तो अध्यात्म विरोधी आहे. डॉ. ब्रिजच्या मते एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला की तो दैवी संकेत आहे असे धर्मवादी लोक मानतात. अफूच्या सेवनामुळे आलेल्या झोपेचे वर्णन धर्मवादी लोक ईश्वराचीच तशी इच्छा आहे असे करतात. तत्ववेत्ते लोक मृत्यूचे वर्णन करतांना उत्पत्ती, विकास आणि विनाश हा निसर्गनियम आहे असे म्हणतात. अफूमध्ये मनुष्याला गुंगी आणणारे द्रव्य असल्यामुळे झोप येणे हा नैसर्गिक प्रभाव आहे असे मृत तत्ववेत्ते व्यक्त करतात. वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करणारा प्रत्यक्षवादी मत व्यक्तीच्या शवाचे निरीक्षण करतो. त्यानंतर मृत्यू कोणत्या कारणामुळे आलेला आहे हे स्पष्ट करतो. अफू सेवनामुळे गुंगी येण्याचे कोणकोणते विपरीत परिणाम मानवाच्या शरीर आरोग्यावर होऊ शकतात हे देखील तो आपल्या विज्ञाननिष्ठ अध्ययनाच्या आधारे स्पष्ट करतो. अफू सेवनानंतर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत तो सूचना देऊन तो अंमली पदार्थाचे सेवन करण्याच्या आहारी गेलेल्या नशेबाजांना त्यापासून दूर करण्याचे उपाय देखील सांगतो. अशाप्रकारे डॉ. ब्रिज प्रत्यक्षवादी तत्वज्ञान हे पूर्णत: वैज्ञानिक पध्दतीवर आधारलेले आहे हे स्पष्ट करतात.

**कॉम्तच्या प्रत्यक्षवादाची वैशिष्टये**

१. कॉम्तचा प्रत्यक्षवाद हा ईश्वराचे अस्तित्व नाकारणारा नाही तसेच त्याचा ईश्वरी शक्तीशी कोणताही संबंध नाही.

२. कॉम्तचा प्रत्यक्षवाद हा काल्पनिकतेपेक्षा वास्तविकतेशी निगडीत आहे.

३. अंतिम सत्य शोधून काढण्याशी कॉम्तचा प्रत्यक्षवाद संबंधित नाही तर तो सतत परिवर्तनशील असणाऱ्या सेंद्रिय सत्याशी निगडीत आहे.

४. कॉम्तचा प्रत्यक्षवाद हा अस्पष्ट अथवा संदिग्ध विचारांशी निगडीत नसून तो असंदिग्ध विचारांशी निगडीत आहे.

५. कॉम्तचा प्रत्यक्षवाद हा निरपेक्षतेपेक्षा सापेक्षतेशी संबंधित आहे.

६. कॉम्तचा प्रत्यक्ष वाद हा सर्व ज्ञानापेक्षा उपयुक्त ज्ञानाशी संबंधित आहे.

७. कॉम्तचा प्रत्यक्षवाद हा तथ्यांशी निगडीत आहे. अशाप्रकारे चेम्बलिस यांनी १९५४ मध्ये लिहीलेल्या 'सामाजिक विचार' या ग्रंथात वरील वैशिष्टये स्पष्ट केली आहेत.

**कॉम्तच्या प्रत्यक्षवादी तत्वज्ञानाचा हेतू किंवा ध्येय**

**१. विज्ञानाचे तत्वज्ञान** :— आपल्या जीवनात किंवा परिस्थितीत सुधारणा किंवा प्रगती घडवून आणण्यासाठी मनुष्याने आपल्या प्रयत्नांवर विश्वास ठेवला पाहिजे अशी धारणा समाजात रुजविणे हेच प्रत्यक्षवादी तत्वज्ञानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**२. प्रत्यक्ष राजकारण** :— कॉम्त म्हणतो प्रेम हाच सिध्दांत आहे. सुव्यवस्था हा आधार आहे. आणि प्रगती हे ध्येय आहे. युरोपियन देशामधील कटूता व शत्रुत्वाचा भाव कमी होऊन मित्र राष्ट्र म्हणून त्यांनी एकत्र यावे असे कॉम्तचे मत होते. प्रत्यक्षवादाचा अवलंब केल्यामुळे हे साध्य होईल असे कॉम्तला वाटत होते.

**३. वैज्ञानिक धर्म** :— प्रत्यक्षवादाच्या आधारावर जे ज्ञान प्राप्त होईल ते वास्तविक ज्ञान असेल. त्यात धार्मिक व तात्विक विचारांचा व मतांचा थोडासाही लवलेश नसेल. याच खऱ्या ज्ञानाच्या आधारावर समाजाला एका सुत्रात बांधता येईल असे कॉम्त म्हणतो. प्रत्यक्षवाद हा मानव कल्याणासाठीचा एक आधारभूत घटक आहे. वैज्ञानिक धर्म म्हणून कार्य करणे आणि समाज सदस्यांसाठी नैतिक संहिता निर्माण करणे हे प्रत्यक्षवादाचे ध्येय आहे.

**कॉम्तच्या प्रत्यक्षवादाचे टीकात्मक परिक्षण :—**

१. कॉम्तचा प्रत्यक्षवाद एका बाजूला विज्ञान आहे तर दुसऱ्या बाजूला धर्म सुध्दा आहे. कॉम्तच्या प्रत्यक्षवादामध्ये झालेले परिवर्तन म्हणजे कॉम्तचे वैचारिक पतन होय. अशा प्रकारची टीका करण्यात आली.

२. कॉम्तच्या विक्षिप्त विचारांच्या मांडणीमुळे कॉम्त हा प्रत्यक्षवादी विचारवंत नसून अप्रत्यक्षवादी आहे अशी टिका **युजेन डयुएरिंग** यांनी केली.

३. जॉर्ज लेव्हिस च्या मते विश्वामधील दैवी काय आहे ते पाहण्याचे कार्य करणे हे मानवाचे कर्तव्य आहे असे कॉम्त म्हणतो. लॉकच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास अलौकिक गोष्टीच्या संदर्भात आपण अज्ञानी राहणे चांगले आहे. अशाप्रकारे काही उणीवा असल्या तरी प्रत्यक्षवादी सिध्दांताचे महत्व कमी होत नाही.

**प्रश्न क्र. २ :— ऑगस्ट कॉम्तचा समाजाच्या तीन अवस्थांचा नियम स्पष्ट करा?**

उत्तर :— ऑगस्ट कॉम्तने तीन अवस्थांचा नियम हा सिध्दांत १८२२ मध्ये म्हणजे त्याच्या वयाच्या २४ व्या वर्षी मांडला. आदिम अवस्थेच्या काळापासून औद्योगिक अवस्थेपर्यंतचा आढावा घेतांना मानवाच्या विचार करण्याच्या आणि घटनांचा अर्थ लावण्याच्या पध्दतीत काही उल्लेखनीय स्वरुपाचे बदल झाले आहेत असे कॉम्तला जाणवले. ते दर्शविण्यासाठी त्याने हा सिध्दांत मांडला.

१. **धर्मशास्त्रीय अथवा ईश्वर शास्त्रीय अवस्था** :— मानवी बुध्दीच्या विकासाची ही प्रारंभिक अवस्था होय असे कॉम्त म्हणतो. आदिम समाजात या अवस्थेचा प्रारंभ झाला. या अवस्थेत कोणत्याही घटना घडून येण्यासाठी अलौकिक शक्ती कारणीभूत आहे असा विचार करण्याची पध्दती होती. मानवी जीवनातील जन्म, मृत्यू या घटना आणि जीवन जगत असतांना येणारी लहान मोठी आजारपणे हया सर्व बाबी ईश्वराच्या कृपेने किंवा कोपामुळे घडून येतात अशी लोकांची समजूत होती. मानवाच्या शक्तीपेक्षा श्रेष्ठ अलौकीक शक्ती असणाऱ्या परमेश्वराची कल्पना मानवी बुध्दीला सुचली त्यामुळे सजीव प्राण्यांपेक्षा आपण वेगळे आहोत याची जाणीव मानवाला झाली ही अवस्था तीन उपविभागात विभाजित आहे असे कॉम्त म्हणतो.

१. **सर्ववस्तु चेतनावाद** :— अगदी प्रारंभी विश्वातील सर्व सजीव व निर्जीव वस्तूंच्या ठायी एक अदृश्य अशी शक्ती असते असा विचार मानवाने केला. त्यालाच सर्व वस्तू चेतनावाद म्हणतात. या अदृश्य शक्तीला काही काळानंतर आत्म्याचे स्वरुप प्राप्त झाले. सर्व सजीवांचे अस्तित्व हे **त्यालाच सर्ववस्तू चेतनावाद म्हणतात.** हे आत्म्यावर अवलंबून आहे असे मानण्यात येऊ लागले. त्यामुळे सर्व व्यवहार आत्म्याच्या साक्षीनेच होतात असे मानले जात होते.

२. **अनेकेश्वरवाद/बहुदेवतावाद** :— कॉम्तच्या मते, सर्ववस्तू चेतनावादाची अवस्था फार काळा टिकली नाही. कालांतराने मानवी मन हे अधिक विचारी बनले. निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक घटनेला कारणीभूत असणारे चेतनातत्व वा ईश्वर हा वेगवेगळा आहे असे मानण्यात येऊ लागले, वाटू लागले त्यातून अनेकेश्वरवाद अस्तित्वात आला.

३. **एकेश्वरवाद** :— कॉम्तच्या मते बहुदेवतावादाची अवस्था देखील फार काळ टिकली नाही. निसर्गातील सर्व घटनांच्या पाठीमागे एकच अलौकिक अशी शक्ती आहे असे मानवी बुध्दीला पटू लागले. त्यामुळे हा विचार तर्कसंगत असल्यामुळे दीर्घकाळ स्थिरावला.

२. **आध्यात्मिक अथवा तत्वशास्त्रीय अवस्था** :— आध्यात्मिक अवस्थेत मानवाने ईश्वराचे अस्तित्व अमान्य करुन एका अमूर्त अशा शक्तीचे वा तत्वाचे अस्तित्व मान्य केले. कॉम्तच्या मते आध्यात्मिक अवस्था ही धर्मशास्त्रीय आणि प्रत्यक्षवादी अवस्था

यांना साधणारा दुवा आहे. अमूर्त तत्वे ही निसर्गात घडणाऱ्या घटनांचे कारण मानने हीच आध्यात्मिक अवस्थेची प्रमुख विशेषता आहे असे कॉम्त म्हणतो.

३. **विज्ञानवादी किंवा प्रत्यक्षवादी अवस्था** :— जेव्हा व्यक्ती कोणत्याही तात्विक वा आध्यात्मिक विचारांचा आधार न घेता नैसर्गिक घटनांचे विवेचन केवळ 'निरीक्षण आणि तर्क' यांच्या आधारे करु लागते तेव्हा ती व्यक्ती प्रत्यक्षवादी किंवा विज्ञानवादी अवस्थेत प्रवेश करते. जेव्हा व्यक्ती घटनांचे निरीक्षण आणि त्या घटनेसाठी जबाबदार असणाऱ्या घटकांमधील कार्यकारण संबंध यांच्या आधारे विचार करीत असते तेव्हा बौध्दिक विकासाच्या या तिसऱ्या व अंतिम अवस्थेचा परिपाक म्हणून समाजात विज्ञानवादाची निर्मिती होते.

**कॉम्तच्या तीन अवस्थांच्या नियमाचे टिकात्मक परिक्षण :—**

१. पहिल्या अवस्थेत अलौकिक शक्तीच्या अस्तित्वाचे तर्कसंगत असे स्पष्टीकरण करण्याकडे कॉम्तने दुर्लक्ष केले कारण ईश्वरशास्त्रीय व आध्यात्मिक अवस्थेपेक्षा विज्ञानवादी अवस्था ही कशी चांगली आहे हे दर्शविण्याचा त्यांचा हेतू होता.

२. पहिल्या दोन अवस्थांमध्ये प्राप्त होणारे ज्ञान हे संदिग्ध असते. त्या ज्ञानाचा विज्ञान म्हणून उपयोग करावयाचा असेल तर ते निरीक्षण आणि परीक्षण या कसोटयांवर उतरले पाहिजे असे कॉम्त म्हणतो. टीकाकारांच्या मते कॉम्तचे हे विवेचन त्याचा आपल्याच सिध्दांतावर अविश्वास दर्शविणारे आहे.

३. कल्पना, भावना आणि विज्ञान अशा तिन्ही गोष्टी व्यक्तीच्या जीवनात आढळून येतात. स्वत: कॉम्त देखील त्याच्या संपूर्ण आयुष्यात विज्ञानवादी विचारांवर स्थिर राहीला नाही. बुध्दिनिष्ठेचे समर्थन करता करता कॉम्त मानवताधर्म प्रस्थापित करण्याकडे वळला असे टिकाकारांचे म्हणणे आहे.

४. सामाजिक पुनर्निमाणाच्या संकल्पनेत कॉम्त वैज्ञानिक दृष्टिकोन अखेरपर्यंत कायम ठेवू शकला नाही असे जॉन स्टुअर्ट मिलने कॉम्तच्या विचारांचे समीक्षण करतांना म्हटले आहे.

५. कॉम्तने आपल्या सिध्दांतात दर्शविलेल्या तीन अवस्था या बौध्दिक विकासाच्या अवस्था नाहीत तर या चिंतनाचा पृष्ठभाग दर्शविणाऱ्या तीन स्थिती आहेत अशी टिका हर्बट स्पेन्सरने केली आहे.

६. जॉन फिस्केंच्या मते बौध्दिक विकासाच्या या तीन अवस्था नसून त्या सामाजिक समस्यांपर्यंत पोहोचण्याच्या तीन पध्दती आहेत.

७. बोगार्डसच्या मते कॉम्तने मानवी चिंतनाच्या तीन प्रकारांचे विश्लेषण केले आहे परंतू सामाजिकृत अवस्था हा चौथा प्रकार आहे. शाश्वत विकासावर आणि पर्यावरणाचा समतोल कायम ठेवून पर्यावरण प्रदूषण टाळण्यावर सामाजिकृत अवस्थेत अधिक भर दिला जातो. परंतू या अवस्थेकडे कॉम्तने पूर्णत: दुर्लक्ष केले.

असे असले तरीही औद्योगिक समाजव्यवस्थेच्या लक्षणांचे परीक्षण करतांना कॉम्त या निष्कर्षास येऊन पोहोचला की आधूनिक समाजातील विसंगती व दोषांचे निराकरण करण्यासाठी बौध्दिक सुधारणांची खरी आवश्यकता आहे हेच कॉम्तने या सिध्दांताद्वारे प्रतिपादीत केले आहे.

## हर्बर्ट स्पेन्सर (Herbert Spencer . १८२०.१९०३)

### प्रश्न क्र. १ हर्बट स्पेन्सरचा समाजाचा सावयवी (शरीर संरचना) किंवा सेंद्रिय सिध्दांत स्पष्ट करा?

उत्तर :— इ.स. पूर्व काळातील ग्रीक समाजात राज्यकर्ते हे समाज पुरुषाचे शीर आहे. सैनिक हे समाज पुरुषाचे हातासहित धड म्हणजे हृदयस्थान आहे. शेतकरी व अन्य उत्पादक हे समाजपुरुषाचे  समाज पुरुषाचे पाय आहेत असे तीन समूह वा वर्ग आहेत. अशी प्लेटो व ॲरिस्टॉटलची धारणा होती. म्हणजे समाज हा एखाद्या सजीवासारखा आहे अशी कल्पना केली आहे. परंतु या सर्व विचारवंतापेक्षा स्पेन्सरचे विचार अधिक स्पष्ट व वेगळे आहेत. प्लेटो, ॲरिस्टॉटलसारख्या सेंद्रिय विचारांचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंताप्रमाणे हर्बर्ट स्पेन्सर 'समाज हा एक पुरुष आहे अथवा समाज हा एक सेंद्रिय जीव आहे' असे मानत नाही. ''मानवी समाज आणि मानवी शरीर यांच्यात केलेली तुलना म्हणजे स्पेन्सरचा समाजाचा सेंद्रिय सिध्दांत होय.'' असे प्रा. आर.एन. मुखर्जी यांनी स्पष्ट केले आहे.

**<u>समाज आणि शरीर यांच्यातील साम्य</u> :—**

१. समाज आणि शरीर हे दोन्ही घटक सजीव असून त्यांचा हळूहळू विकास होतो.

२. समाजाची सुरुवात व्यक्तीपासून तर मानवी शरीराची सुरुवात शुक्रबीजापासून होते. दोहोंच्याही आकारमानात जसजशी वाढ होते तसतशी त्यांच्या संरचनेतील जटिलतेमध्येही वाढ होत जाते.

३. समाज व शरीर या दोहोंमध्येही संरचनेच्या विकासासोबत प्रत्येक भागाचे अथवा अंगाचे कार्य वेगवेगळे होत जाते. म्हणजे त्यांच्या कार्यांचे सुध्दा विभाजन होते.

४. शरीराच्या विभिन्न भागात वा अवयवांमध्ये त्याचप्रमाणे कुटुंब, अन्य समूह, संस्था व संघटना यांच्या एकात्मता व परस्परावलंबन असते. याचा अर्थ विविध घटकांमध्ये अंत संबंध व अंतनिर्भरता आढळून येते.

५. शरीर आणि समाज यांच्यात वितरण व्यवस्था निर्माण होते. तोंडाद्वारे भोजन केल्यानंतर जठराद्वारे पचन होते. त्यापासून रक्त तयार होऊन हृदयाद्वारे संपूर्ण शरीराला रक्त पुरवठा केल्यामुळे शरीराचे अस्तित्व टिकून राहते. त्याप्रमाणे समाजात उत्पादनाचे वितरण करुन लोकांच्या गरजा पूर्ण झाल्यामुळे समाजाचे अस्तित्व टिकून राहते.

६. शरीर व समाज कार्यक्षम राहण्यासाठी त्यांच्यामध्ये कामाचे विभाजन झालेले असते.

७. मानवी शरीरामध्ये जून्या पेशींची जागा नवीन पेशी घेतात त्याप्रमाणे वृध्द व्यक्ती नष्ट होण्यामधून नवीन बालक त्यांची जागा भरुन काढतात.

८. मानवी शरीराप्रमाणेच समाजाची वाटचाल ही उदय, विकास, वाढ आणि ऱ्हास या मार्गाने होत असते.

९. शरीरामध्ये मेंदू तर समाजामध्ये सरकार विभिन्न कार्यावर नियंत्रण ठेवतात.

१०. शरीराचा अवयव व समाजाचा एखादा घटक वेगळा झाला तरी दोहोंचेही अस्तित्व धोक्यात येत नाही. याचा अर्थ शरीराशिवाय पेशींना वेगळे अस्तित्व नसते तसेच समाजाशिवाय व्यक्तीलाही वेगळे अस्तित्व राहत नाही.

११. शरीरातील आजाराचा परिणाम जसा संपूर्ण शरीरावर होतो तसा समाजाच्या एखाद्या भागात दोष निर्माण झाल्यास त्याचा संपूर्ण समाजव्यवस्थेवर प्रभाव पडतो. या प्रकारे शरीर व समाजाच्या स्वरुपाचे व कार्याचे चित्र स्पष्ट होते असे हर्बर्ट स्पेन्सर म्हणतो.

**समाज आणि शरीर यांच्यातील भेद**

१. समाजाची निर्मिती व्यक्तींमुळे होते परंतू समाजाशिवाय प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व असते. तर शरीराचे अवयव शरीरापासून वेगळे करता येत नाहीत.

२. शरीराचे अवयव स्थिर असतात परंतु समाजाचे विभिन्न अंग स्थिर नसतात. संयुक्त कुटुंबाचे विभक्त कुटुंबात झालेले रुपांतर होय.

३. शरीराचा विकास हा नैसर्गिकरित्या होत असतो. याउलट समाजाच्या विकासात नेते आणि व्यक्तींचे योगदान महत्वपूर्ण असते.

४. शरीराचे विभिन्न अंग वा अवयव हे शरीराकरीता आहेत. परंतु व्यक्ती समाजासाठी नाही तर समाज व्यक्ती करीता आहे.

५. शरीराच्या वेगवेगळया भागात स्वतंत्र अशी चेतनाशक्ती नसते. परंतू समाजाच्या वेगवेगळया भागात स्वतंत्र चेतना शक्ती असते.

**स्पेन्सरच्या सेंद्रिय अथवा सावयवी सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण :—**

१. शरीर आपण आपल्या डोळयांनी पाहू शकतो. याउलट समाज ही अमूर्त संकल्पना आहे. त्यामुळे त्यांची तुलना करणे योग्य ठरत नाही.

२. टीकाकारांच्या मते स्पेन्सरचा हा सिध्दांत मुळ सिध्दांत नाही. कारण यापूर्वी प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी त्यासंबंधी विचार मांडले होते.

३. टीकाकारांच्या मते हर्बर्ट स्पेन्सरने समाज व शरीर यांची केलेली तुलना एका मर्यादेपलीकडे ताणणे तर्कविसंगत होते. कारण व्यक्तीप्रमाणे पेशींना मन, भावना, इच्छा, आकांक्षा असू शकत नाही.

४. टीकाकारांच्या मते स्पेन्सरने 'समाजाशिवाय व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व नाही' हे केलेले विधान संयुक्तीक नाही.

५. सोरोकिनच्या मते शरीराच्या जीवशास्त्रीय परिपूर्णतेचे सूत्र समाजशास्त्रात लागू केले जाऊ शकत नाही. तसेच ते समाजाला देखील लागू केले जाऊ शकत नाही.

६. बार्न्स यांनी टीका करतांना म्हटले आहे की या सिध्दांताकडे सामाजिक प्रक्रियांच्या विश्लेषणाच्या दृष्टीने बघितल्यास या सिध्दांताला कोणतेचे महत्व राहत नाही. टीकाकारांच्या टीकेमध्ये सत्यांश असला तरीही त्यामुळे स्पेन्सरच्या सिध्दांताची उपयुक्तता पूर्णत: नष्ट होत नाही.

**प्रश्न क्र. २ :— हर्बर्ट स्पेन्सरचा सामाजिक उत्क्रांतीचा सिध्दांत स्पष्ट करा?**

उत्तर :— 'उत्क्रांती' हा शब्द उच्चारताच सर्वप्रथम आठवण येते ती चार्लस डार्विनची प्राणीशास्त्रीय उत्क्रांतीवादी सिध्दांत मांडून डार्विनने मानवासह विभिन्न प्राणी कसे उत्क्रांत झाले ते वैज्ञानिक पुराव्यासह स्पष्ट केले. डार्विनच्या सिध्दांतामुळे 'मनुष्यप्राणी हा ईश्वराने निर्माण केला आहे' हा विभिन्न धर्मग्रंथातील विचार खोटा ठरला. एकपेशीय आणि सरळ व साधी रचना असणाऱ्या ॲमिबापासून अनेक पेशीय आणि गुंतागुंतीची शरीर रचना असणारा मनुष्य प्राणी निर्माण किंवा उत्क्रांत झाला. उत्क्रांतीची प्रक्रिया स्पष्ट केल्यानंतर डार्विन पुढे असे म्हणतो की सर्व सजीव अथवा प्राणी हे आपआपले अस्तित्व टिकून राहावे यासाठी निरंतर संघर्ष करीत असतात. 'नैसर्गिक निवडीच्या नियमानुसार' दुर्बल किंवा कमकुवत प्राणी नष्ट होतात आणि असेच प्राणी जीवंत राहू शकतात की ज्यांच्या जवळ आपले अस्तित्व कायम ठेवण्याची शक्ती असते.

**उत्क्रांतीची व्याख्या :—**

**स्पेन्सरच्या मते** :— ''उत्क्रांती म्हणजे पदार्थाचा आपल्या गतीबरोबर झालेला समन्वय होय. हा समन्वय होत असतांना पदार्थ हा एका अनिश्चित व असंबंध्द समानतेकडून निश्चित संबध्द भिन्नतेकडे परिवर्तीत होत असतो.''

वरील व्याख्या लक्षात घेता कोणत्याही पदार्थाची वा घटकाची साधेपणाकडून गुंतागुंतीकडे होणारी वाटचाल म्हणजे उत्क्रांती होय. असा उत्क्रांतीचा सरळ व सोपा अर्थ हर्बर्ट स्पेन्सरला अभिप्रेत आहे. या दृष्टीने त्याने उत्क्रांतीचे तत्व मानवी समाजालाही लागू केले आहे. स्पेन्सरने उत्क्रांती ही एक सतत सुरु असलेली प्रक्रिया असल्याचे स्पष्ट करुन या प्रक्रियेची पुढील तत्वे प्रतिपादित केली आहेत.

१. **स्थायी शक्तीचे तत्व** :— प्रत्येक पदार्थ वा वस्तूमध्ये शक्ती असते आणि ही स्थायी स्वरुपाची म्हणजेच वस्तूमधील शक्ती शाश्वत असते.

२. **पदार्थांच्या अमरत्वाचे तत्व** :— कोणत्याही पदार्थाचा विनाश होत नाही. प्रत्येक पदार्थ किंवा वस्तू ही अविनाशी आहे. याला पदार्थाचे अमरत्वाचे तत्व असे म्हणतात.

३. **गतीच्या सातत्याचे तत्व** :— प्रत्येक वस्तूमध्ये गती असते. प्रत्येक पदार्थ हा कमीत कमी विरोध होईल तिकडे अथवा जास्तीत जास्त ओढ आहे तिकडे गतिमान होत असतो.

**स्पेन्सरच्या सामाजिक उत्क्रांतीवादी सिध्दांताचे तीन प्रमुख भाग**

१. **जगाच्या निर्मितीबाबतचे विचार** :— स्पेन्सरच्या मते विश्वाची निर्मिती होण्यापूर्वी सर्व पदार्थ हे आकारहीन अशा मातीच्या ढिगाऱ्यासारखे होते. त्या आकारहीन ढिगाऱ्यातही शक्ती असल्यामुळे तो ढिगारा भोवऱ्यासारखा फिरत होता. हे विश्वाचे मूळ रुप असावे असे स्पेन्सर म्हणतो. गतीच्या परिणामामुळे विभिन्न ग्रह, तारे, डोंगर, नद्या व पृथ्वीतलावर योग्य वातावरण लाभून वनस्पती व जीवजंतू निर्माण झाले. हिरवीगार सृष्टी निर्माण झाली. त्यानंतर वनस्पती जीवजंतू निर्माण होण्याची आणि नष्ट होण्याची प्रक्रिया अद्यापही सुरुच आहे असे स्पेन्सर म्हणतो.

२. **पृथ्वीवरील जीवाच्या निर्मितीबाबतचे विचार** :— जीवसृष्टीत प्रथम वनस्पती निर्माण झाल्या. कालांतराने आणि उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्राणीसृष्टी निर्माण झाली असावी असे स्पेन्सर म्हणतो. या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतूनच माकडाची उत्क्रांती मानव जातीमध्ये झाली आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' या तत्वानुसार प्रचंड आकाराच्या शक्तीमान प्राण्यांनी लहान आकाराच्या प्राण्यांना आपले भक्ष्य बनविले. काही प्राणी प्रारंभीच्या काळात मानवाचे शिकार बनल्या. काही प्राण्यांना सृष्टीतील बदलांशी म्हणजे ऋतुमानातील परिवर्तनाशी समायोजन साधता आले नाही असे सर्व प्राणी निसर्गत:च नष्ट झाले.

३. **पृथ्वीवरील पदार्थाच्या परस्परसंबंधाचा विचार** :— शक्तीचे उल्लेखनीय वैशिष्टये म्हणजे ती सदैव गतिमान असते. तिचा कधी विनाश होत नाही. शक्तीच्या स्वरुपामध्ये मात्र फरक पडू शकतो. उदा. पाण्याचे स्वरुप बदलले की त्याचे रुपांतर बर्फ किंवा वाफेत होते.

अशाप्रकारे स्पेन्सरच्या मते १) पदार्थ २) शक्ती ३) गती यांच्या परस्परसंबंधातून संपूर्ण विश्वाची जडणघडण झालेली आहे.

**स्पेन्सरच्या उत्क्रांतीवादी सिध्दांताचे सामाजिक स्वरुप :—**

स्पेन्सरच्या मते प्राथमिक अवस्थेत म्हणजे कंदफळे गोळा करणे व शिकारीच्या अवस्थेत समाज हा अतिशय साधा होता. सर्वांनी मिळून सहकार्याने एखादे काम करावे अशी जाणीवच त्यांच्यामध्ये नव्हती. अतिप्राचीन अवस्थेतील मानव हा अनिश्चित असंबंध्द समानतेचे जीवन जगत होता. अर्थात प्राचीन मानव हा अत्यंत अविकसित होता. कालांतराने मानवाच्या अनुभव, व्यवहार आणि ज्ञानामध्ये हळूहळू वाढ होत गेली. सामाजिक जीवन कसे जगावे हे त्यास समजू लागले. योग्य व्यक्तीस

योग्य काम म्हणजे गुणवत्ता विशेषित कौशल्य हे श्रमविभाजनाचे आधार झाले. अशाप्रकारे समाज गुंतागुंतीचा बनत गेला. याच स्थितीला स्पेन्सरने म्हटले आहे की समाज हा निश्चित संबंध भिन्नतेच्या अवस्थेत परिवर्तीत झाला. समाज हा विकासाच्या दिशेने वाटचाल करु लागला. यामुळे समाज हा विकसित अवस्थेपर्यंत येऊन पोहचला. त्याने संस्कृती निर्माण केली. अशाप्रकारे उत्क्रांतीच्या प्रक्रियेत पदार्थ वा समाज हा एक अनिश्चित, असंबंध्द समानतेकडून निश्चित संबंध भिन्नतेमध्ये परिवर्तीत होतो. समाजात केवळ प्रगतीच होते असे नाही तर अधोगतीही होते हे स्पेन्सरने आपल्या उत्तर आयुष्यात मान्य केले. त्यामुळे स्पेन्सर हा एकरेषीय उत्क्रांती वादापासून बहुरेषीय उत्क्रांती वादापर्यंत जाऊन पोहचला असे म्हणता येईल.

**स्पेन्सरच्या सामाजिक उत्क्रांतीच्या सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण :—**

१. संघर्ष हा मानव जातीचे अस्तित्व टिकविण्याकरीता होतो हे स्पेन्सरचे म्हणणे रास्त नाही, कारण संघर्षाची वेगवेगळी कारणे आहेत.

२. काही समाजामध्ये विकासाची गती का मंद असते याचे स्पष्टीकरण हा सिध्दांत देत नाही.

३. संघर्षासोबतच सहकार्य, दया, प्रेम, करुणा, त्याग इत्यादी अनेक भावना समाजामध्ये विद्यमान असतात याकडे स्पेन्सरने दुर्लक्ष केले आहे.

४. आदिवासी किंवा कट्टर धर्माभिमानी समाजाचे उदाहरण घेतल्यास विकासाची प्रक्रिया सर्वत्र सुरु असते असे म्हणता येत नाही म्हणून उत्क्रांतीवादाचा सिध्दांत संपूर्ण मानवी समाजाला लागू करणे योग्य ठरत नाही.

**प्रश्न क्र. ३ :— हर्बर्ट स्पेन्सरचे सैनिकी समाज आणि औद्योगिक समाज याबाबतचे विचार लिहा?**

उत्तर :— **१) सैनिकी समाज** :— स्पेन्सरच्या मते समाजांतर्गत नियंत्रण व्यवस्था या आधाराचा उपयोग समाजाचे प्रकार पाडण्यासाठी करता येतो. स्पेन्सरच्या मते समाज सभासदांवर काही गोष्टी करण्याची जबरदस्ती किंवा सक्ती करणे हे सैनिकी समाजाचे मुख्य लक्षण आहे. सैन्य दलात काम करणाऱ्या सैनिकाला नोकरीत असतांना एक व्यक्ती म्हणून स्वत:ची अशी इच्छा नसते. समाज हा व्यक्तीसाठी नसून व्यक्ती ही समाजासाठी आहे हा विचार सैनिकी समाजात प्रभावी असतो. यामुळे सैनिकी समाजाचे मुख्य लक्ष सैन्याचे दृढ संघटन उभारणे, युध्दात विजय मिळविणे आणि राज्याचा विस्तार करणे यावर केंद्रित असते. ज्याप्रमाणे व्यक्तींच्या विभिन्न अवयवांमध्ये असणारे सहकार्य हे मेंदूने दिलेल्या आदेशानुसार निर्माण होते. कट्टर धर्माभिमानी असणाऱ्या समाजात देखील आपआपल्या अनुयायांना सक्तीने आज्ञा पालन करावयास भाग पाडण्याची प्रवृत्ती असते असे स्पेन्सरने म्हटले आहे. एखाद्या समाजाचे वा राष्ट्राचे शेजारी असणाऱ्या समाजांशी वा राष्ट्रांशी असलेले संबंध तणावपूर्ण व

संघर्षाभिमुख असतील तर तो समाज सैनिकी समाज आहे असे आपणास म्हणता येते. सैनिकी स्वरुपाच्या समाजातील अंतर्गत संघटना दडपशाहीच्या पायावर आधारित असते. तसेच नियंत्रण व्यवस्थेचे केंद्रीकरण हा त्या समाजाचा स्थायी भावच असतो.

२. **औद्योगिक समाज** :— औद्योगिक समाजात लोकांना वैयक्तिक स्वातंत्र्य प्राप्त झाले असते. औद्योगिक समाजाचे लक्ष उद्योग व्यवसाय, व्यापार यांच्या विस्ताराकडे असते. ऐच्छिक संघटन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याला मुक्तद्वार हे औद्योगिक समाजाचे महत्वाचे अंग आहे वा मुख्य लक्षण आहे असे स्पेन्सर म्हणतो. लोकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी शासनाद्वारे प्रयत्न केले जातात. लोकांचे प्रश्न आणि समस्या विचारविनिमय करुन सामंजस्याने सोडविल्या जातात. औद्योगिक समाजात सत्तेच्या विकेंद्रीकरणावर विशेष भर दिला जातो. राष्ट्राचे त्याच्या शेजारी असणाऱ्या राष्ट्रांशी असलेले संबंध मैत्रीचे असतील तर तो समाज उद्योगप्रधान किंवा औद्योगिक आहे असे स्पेन्सर म्हणतो. व्यक्तीच्या जीवनात आणि कार्यात सरकारचा हस्तक्षेप कमीत कमी असावा अशी राजकीय विचारसरणी हर्बर्ट स्पेन्सरच्या काळात निर्माण झाली होती. स्पेन्सर याच विचारांचा कट्टर समर्थक होता. सरकारचे नियंत्रण हे व्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि व्यक्ती विकासाच्या मार्गातील अडथळा आहे असे स्पेन्सरचे मत होते. जेव्हा व्यक्तीचा पूर्ण विकास होतो आणि तिच्या आंतरिक नियंत्रणाची साधने पूर्णपणे विकसित होऊन ते रचनात्मक स्वरुपात विकसित होतात तेव्हा या बाहय नियंत्रणाची गरज राहणार नाही असे स्पेन्सर म्हणतो. मानव माकडापासून उत्क्रांत झाला असे डार्वीन म्हणतो. याचप्रमाणे जेव्हा मानव नैतिकदृष्टया पूर्ण विकसित होईल तेव्हा त्याच्यावर राजकीय स्वरुपाचे नियंत्रण ठेवण्याची गरज उरणार नाही इतकेच नव्हे तर राज्याचीही गरज उरणार नाही. हीच समाजाची आदर्श अवस्था आहे असेही स्पेन्सर म्हणतो. औद्योगिक आणि सैनिकी समाजव्यवस्थेचा उदय हा तत्कालीन राजकीय—सामाजिक परिस्थितीचा परिणाम होय असे स्पेन्सर स्पष्ट करतो.

**सैनिकी आणि औद्योगिक समाजातील फरक :—**

१. सैनिकी समाजात संरक्षणात्मक आणि आक्रमणात्मक क्रियांना महत्व वा सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. याउलट औद्योगिक समाजामध्ये शांततापूर्ण क्रिया, परस्पर सेवांचे आदान—प्रदान यांना महत्व दिले जाते वा सर्वोच्च प्राधान्य दिले जाते.

२. सैनिकी समाजामध्ये राज्य हीच एकमेव संघटना असते. याउलट औद्योगिक समाजात राज्याशिवाय अन्य खाजगी आणि ऐच्छिक संघटनाच्या विकासाला वाव दिला जातो.

३. सैनिकी समाजामध्ये व्यक्तीचे अस्तित्व हे राज्याच्या हितासाठी आहे असे गृहित धरले जाते. याउलट औद्योगिक समाजामध्ये व्यक्तीचे कल्याण साधण्याासाठी राज्याचे अस्तित्व आहे असे मानले जाते.

४. सैनिकी समाजात नेत्यांच्या आदेशांची अंमलबजावणी सक्तीने केली जाते. याउलट औद्योगिक समाजात सत्ताधारकांच्या आदेशांची अंमलबजावणी लोकशाही मार्गाने होते.

५. सैनिकी समाजामध्ये सत्तेचे केंद्रीकरण असणारी राज्याची रचना असते. याउलट औद्योगिक समाजामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण असणारी राज्याची रचना असते.

६. सैनिकी समाजात लोकांमध्ये जबरदस्तीने सहकार्य निर्माण केले जाते. याउलट औद्योगिक समाजात लोकांमध्ये ऐच्छिक स्वरुपाचे सहकार्य निर्माण केले जाते.

७. सैनिकी समाजात प्रदत्त दर्जाला महत्व दिले जाते. याउलट औद्योगिक समाजात व्यक्तीचा अर्जित दर्जा महत्वाचा मानला जातो.

८. सैनिकी समाजाचे इतर राष्ट्रांशी तणावपूर्ण व संघर्षमय संबंध असतात. याउलट औद्योगिक समाजाचे इतर राष्ट्रांशी मैत्रीचे व खेळीमेळीचे संबंध असतात.

**स्पेन्सरच्या समाजशास्त्रीय विचारांचे मूल्यांकन :—**

१. सामाजिक उत्क्रांतीचा सिध्दांत मांडून स्पेन्सरने अभ्यासक्रमामध्ये समाजाचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करण्याला जोरदार चालना दिली.

२. ऑगस्ट कॉम्तने समाजशास्त्राला विज्ञानाचा दर्जा मिळवून दिला. तर स्पेन्सरच्या ग्रंथामुळे समाजशास्त्राविषयी मोठया प्रमाणात जागरुकता निर्माण झाली असे चार्लस कुले यांनी नमूद केले आहे.

३. लोकांना व्यक्तीस्वातंत्र्याचा पूर्णपणे उपभोग घेता येईल असे वातावरण राज्याने निर्माण करावे यावर स्पेन्सरने भर दिला आहे.

४. स्पेन्सरने सैनिकी आणि औद्योगिक समाजाबाबत वस्तूनिष्ठ विचार मांडले आहेत.

५. समाजाची निर्मिती व्यक्तीसाठी झालेली आहे असे मत मांडून स्पेन्सरने समाजापेक्षा व्यक्तीला अग्रक्रम दिला आहे.

६. व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरुस्कर्ता, सामाजिक उत्क्रांती वादाचा जनक, सेंद्रिय सिध्दांताचा जनक आणि प्रतिभावंत लेखक म्हणून स्पेन्सरचे स्थान सामाजिक विचारवंतांमध्ये महत्वाचे मानले जाते.

# युनिट क्र. ३ समाजशास्त्राचे प्रणेते — २ (चार्लस् हॉर्टन कूले)
# (Founders of Sociology-II) Charles Horton Cooley (1864-1929)

========================================

**प्रश्न क्र. १ :— प्रा. कूलेंची प्रतिबिंबित 'स्व' ची संकल्पना स्पष्ट करुन तिचे महत्व लिहा.**

उत्तर :— 'स्व' संकल्पना ही जन्मदत्त बाब नाही. नुकत्याच जन्मलेल्या नवजात शिशुला स्वत:च्या अस्तित्वाची कोणतीच जाणीव नसते. 'स्व' ची निर्मिती ही एका दिवसात वा एका रात्रीत होत नाही. ती बालकाच्या वाढत्या वयानुसार हळूहळू निर्माण होते. सामाजीकरणाच्या प्रक्रियेतूनच 'स्व' संकल्पनेची निर्मिती होत असते हेच कूलेने आपल्या सिध्दांताद्वारे प्रतिपादीत केले आहे. स्वत: संबंधीच्या धारणांना किंवा विचारांना प्रा. कूले यांनी 'स्व' असे संबोधिले आहे. इतरांच्या म्हणजे समाजाच्या संपर्कात आल्याशिवाय 'स्व' ची निर्मिती होऊ शकत नाही असे कूलेंचे म्हणणे आहे. प्रा. कूलेंच्या मते दुसऱ्यांच्या दृष्टीने आपण कसे दिसतो? व इतराबद्दल 'आपणास' काय वाटते? याबद्दलचे प्रतिबिंब 'स्व' च्या संकल्पनेत पडलेले असते. तुला पांढऱ्या रंगाचे कपडे शोभून दिसतात हे दुसऱ्या कोणीतरी त्या व्यक्तीच्या मनावर बिंबविले असते. प्रा. कूलेच्या मते प्रत्येक व्यक्तीसाठी 'हे दुसरे कोणी तरी' म्हणजे समाज होय. समाज आणि 'स्व' हे एखाद्या जुळयाप्रमाणे असून एकाच वेळी त्यांचा जन्म झाला असावा असे प्रा. कूले नमूद करतात. त्यांच्या मते 'स्व' हा आरसारुपी आहे. आरश्यात ज्याप्रमाणे त्यापुढे येणाऱ्या व्यक्तीचे प्रतिबिंब पडते त्याप्रमाणे इतरांच्या आपल्या व्यक्तीत्वाविषयीच्या विचारांचे व कल्पनांचे प्रतिबिंबित रुप म्हणजे व्यक्तीचे 'स्व' होय. प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्यासाठी एक आरसाच असते. 'तू', 'तो' किंवा 'ते' या शब्दांचा संदर्भ घेतल्याशिवाय 'मी', 'माझे', 'स्वत:चे' या शब्दांना काही अर्थ उरत नाही. प्रा. कूलेंच्या मते 'स्व' चा इतर व्यक्तींवर आणि इतरांचा 'स्व' वर सतत परिणाम होत असतो. 'स्व' ची निर्मिती ही एक प्रक्रिया आहे. 'स्व' चा विकास म्हणजे मानवी स्वभावाचा विकास होय.

**<u>'स्व' च्या संकल्पनेतील तीन प्रमुख घटक</u> :—**

**१. <u>दुसऱ्या व्यक्तीने माझ्या संदर्भात केलेली कल्पना अथवा विचार</u>** :— या ठिकाणी प्रा. कूले स्पष्टपणे नमूद करतात की, जोपर्यंत व्यक्ती ही इतरांच्या संपर्कात येत नाही आणि त्यांचे विचार लक्षात घेत नाही, तोपर्यंत ती व्यक्ती स्वत:संबंधी कोणतेही अनुमान बांधू शकत नाही. एखाद्या व्यक्तीविषयी दुसरे लोक काय विचार करतात त्यावरुनच व्यक्तीचे स्वत्व आकाराला येत असते. आपल्या संदर्भात इतर व्यक्तींचा वर्तनव्यवहार, त्यांचे बोलणे, चेहऱ्यावरील हावभाव, शारीरिक हालचाली या

सर्व गोष्टी एखाद्या आरशासारख्या आहेत असे कूले स्पष्ट करतात. त्यावरुन आपल्या बाबतचा इतरांचा अंदाज लावणे व्यक्तीला शक्य आहे.

२. **दुसऱ्या व्यक्तीने माझ्या संदर्भात केलेल्या मूल्यांकनाची कल्पना करणे** :— जेव्हा व्यक्ती दुसऱ्याचे हावभाव, बोलणे, चेष्टा, मस्करी इत्यादींच्या आधारे स्वत: संबंधीचे विचार जाणून घेते तेव्हा इतरांनी आपल्या संबंधी कोणत्या प्रकारचे मूल्यांकन केले असेल ते देखील कल्पनेद्वारे जाणून घेणाचा प्रयत्न करते. दारुडया व्यक्तीबद्दल समाजाच्या कोणत्या धारणा असतात याची व्यक्तीला कल्पना असते. इतरांनी आपल्या बाबतीत केलेल्या मूल्यांकनामुळे संबंधित व्यक्तीच्या मनात न्युनगंडाची देखील भावना बळावू शकते हे कूलेंनी स्पष्ट केले आहे.

३. **दुसऱ्यांच्या माझ्याविषयी प्रतिक्रिया कळल्यानंतर माझी त्यावरील प्रतिक्रिया** :— तो सरळमार्गी आहे? 'कुणाच्या भानगडीत पडत नाही', ती एक आदर्श व्यक्ती आहे असे समजले की स्वाभाविकत:च आपला स्व सुखावतो. आपल्याला त्याविषयी बरे वाटते त्याच व्यक्तीला अभिमान वाटतो. त्यानंतर व्यक्ती प्रतिक्रिया देते.

**'स्व' च्या संकल्पनेचे महत्व :—**

कोणतीही व्यक्ती जेव्हा दुसऱ्या व्यक्तीच्या संपर्कात येते तेव्हा त्या व्यक्तीला विविध प्रकारचे अनुभव येतात. त्याच आधारावर व्यक्तीचा विकास होतो. अशा परिस्थितीत आपण मानवी स्वभावाला समाजापासून वेगळे करुन समजू शकत नाही. 'स्व' च्या कल्पनेचे विश्लेषण करतांना कूलेंनी आरशाचे उदाहरण दिले आहे. आपण आरशात आपले रुप पाहतो. तसेच 'स्व' साठी समाज हा आरसा असतो. त्यात व्यक्ती स्वत:चे प्रतिबिंब पाहते. त्यांना चांगले दिसण्याचा प्रयत्न करते. इतरांच्या आपल्या व्यक्तीमत्वाविषयीच्या कल्पनांचे प्रतिबिंबित रुप म्हणजे व्यक्तीचे 'स्व' होय असे कूले प्रतिपादन करतात. अशाप्रकारे व्यक्ती व समाज हया एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरतात. 'स्व' च्या जडणघडणीच्या प्रक्रियेचे विवेचन करताना कूलेंने मानसशास्त्रीय दृष्टिकोणाचा अतिरेक केला आहे असे टीकाकारांना वाटते. तसेच कुलेने देखील दुसऱ्यांच्या जागी स्वत:स कल्पून वर्तन जाणून घेण्याच्या पध्दतीचा पुरस्कार केला आहे. टीकाकारांचे आक्षेप असले तरीही कूलेने मांडलेल्या संकल्पनेचे मूल्य व महत्व कमी होत नाही.

**प्रश्न क्र. २ :— कूलेची प्राथमिक गटाची संकल्पना विशद करुन त्याची वैशिष्टये व महत्व लिहा?**

उत्तर :— ैवबपंस व्तहंदप्रंजपवदश या ग्रंथात कूलेंनी प्राथमिक गटाची संकल्पना मांडली आहे. व्यक्ती व्यक्तीमध्ये एकता आणि अभिन्नता कशी निर्माण होते

यासंबंधीचे चिंतन करण्यामधून प्राथमिक गटाची कल्पना सुचली असल्याचे कूलेंनी नमूद केले आहे. व्यक्ती—व्यक्तीमधील सामाजिक संबंध जितके घनिष्ठ तितके ते संबंध दीर्घकाळ टिकतात असा दावा प्रस्तुत ग्रंथात कूलेंनी केला आहे. पाणी हे ज्याप्रमाणे दोन वेगवेगळया पदार्थांना एकरुप करुन टाकते. त्याचप्रमाणे प्राथमिक गटांमुळेच समाज व व्यक्ती हे एकरुप होऊन जातात असे कूले म्हणतात. कुटुंब सदस्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद, ताणतणाव व संघर्ष नाही असे कुटुंब आढळून येणे जवळपास दुर्मिळ आहे म्हणून प्राथमिक गटात हया प्रवृत्ती विद्यमान असतात हे कूलेंनी देखील नाकारले नाही.

**व्याख्या** :—

**प्रा. कूले** यांच्या मते :— ज्या गटातील सभासदाचे परस्पर संबंध हे घनिष्ठ आणि समोरासमोरचे असतात त्या गटांनाच 'मी' प्राथमिक गट म्हणतो.

प्रा. कूलेंच्या मते पुढील तीन गटांनाच प्राथमिक गट असे संबोधता येते.

१. **कुटुंब** :— जन्माला आल्यानंतर एक हाडामासाचा गोळा असणारा 'जैविक प्राणी' असे लहान मुलाचे स्वरुप असते. मूल लहान असताना त्याचे मन कोऱ्या पाटीसारखे असते. कुणाशी कसे वागावे, बोलावे, कोणत्या वस्तू खाव्यात आणि कोणत्या खाऊ नये, समाजमान्य रुढी, परंपरा कोणकोणत्या आहेत यासारख्या कोणत्याही सामाजिक गोष्टीची माहिती वा ज्ञान मुलीला नसते. कुटुंब हे अन्य सर्व प्राथमिक गटाचे केंद्रस्थान आहे असे प्रा. लेव्हिस कोझर प्रतिपादन करतात. कुटुंबात जन्माला आलेले मूल 'आमचे' आहे म्हणजे आमच्या कुटुंबाचे आहे अशी कुटुंब सदस्यांची भावना असते. 'मी', 'माझे' यांच्याऐवजी 'आम्ही', 'आमचे' याची सुरुवात कुटुंबात होते. म्हणूनच कुटुंब हा अन्य सर्व गटांमध्ये केंद्रस्थानी असणारा समूह होय असे म्हटले जाते.

२. **मुलांचा क्रीडा अथवा खेळगडयांचा समूह** :— मूल थोडे मोठे झाले की आपल्याशी खेळणाऱ्या मुलांच्या समूहात अधिक रमू लागते. संपर्कात आलेली मुले त्यचे मित्र बनतात. तो आपल्या बरोबरीच्या मुलांशी स्पर्धा करणे, जुळवून घेणे किंवा समायोजन साधणे, त्यांच्याशी संघर्ष करणे किंवा सहकार्य करणे यासारख्या अनेक गोष्टी शिकतो. खेळगडयांच्या वर्तनाचा प्रभाव मुलाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होण्यावर पडत असतो.

३. **शेजार** :— कुटुंबानंतर विशाल आकाराच्या समाजाचा म्हणजे समाजामधील शेती—भाती, विविध प्रकारचे व्यवसाय, विभिन्न भाषा इत्यादी अनेक गोष्टींची ओळख मुलाला करुन देणारे माध्यम म्हणजे शेजार होय. मुलांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवर शेजार या समूहाचा प्रभाव पडत असतो हे कोणीही नाकारु शकत नाही असे प्रा. कूले म्हणतात. मुलांच्या जडणघडणीमध्ये या तीनही प्राथमिक गटांचे आपआपल्या परीने काहीना काही योगदान असणे हे स्वाभाविक आहे.

**प्राथमिक गटाची वैशिष्टये :—**

१. **लघू आकार** :— लहान आकार म्हणजे मर्यादित सदस्य संख्या असणारा समूह हे प्राथमिक गटाचे मुलभूत स्वरुपाचे वैशिष्टये आहे. या गटांचा आकार लहान आहे. यामुळेच या गटातील सदस्यामध्ये प्राथमिक स्वरुपाचे संबंध निर्माण होऊ शकतात.

२. **सार्वत्रिकता** :— आदिम काळापासून आधुनिक काळापर्यंत तसेच पुढच्या भविष्यकाळाचा विचार केला तरीही त्या काळात प्राथमिक गटाचे अस्तित्वच संपुष्टात येईल याची कोणतीही चिन्हे देखील आज कोठेही दिसत नाहीत. म्हणून सार्वत्रिकता हे प्राथमिक गटाचे वैशिष्टये आहे असे प्रा. कूले म्हणतात.

३. **वैयक्तिक स्वरुपाचे संबंध** :— मित्र समूहातील एखादा मित्र मरण पावला तर दुसरा कोणताही मित्र त्याची उणीव भरुन काढू शकत नाही. आईचे किंवा वडिलांचे स्थान नेहमीकरीता रिक्त राहते. म्हणून प्राथमिक गटातील सदस्यांचे परस्परसंबंध हे नेहमी वैयक्तिक स्वरुपाचे असतात.

४. **समान उद्देश** :— समान उद्दिष्टांमुळे प्राथमिक गटामध्ये ''एकाकरीता सर्व आणि सर्वांसाठी एक'' अशी भावना असते. कुटुंबातील मूल परीक्षेत पास झाले तर त्याचा आनंद सर्व कुटुंब सदस्यांना होतो. समान उद्दिष्टामुळेच ते एकमेकांच्या सुखदु:खात मनापासून सहभागी होऊ शकतात.

५. **समोरासमोरचे संबंध** :— कुटुंब सदस्य कितीही दूर अंतरावर गेला तरीही तो आपआपल्या कुटुंबाच्या संपर्कात असतोच. समोरासमोरच्या संबंधामुळेच त्यांच्यात आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, सहानुभूती, त्याग करण्याची वृत्ती निर्माण होत असते. म्हणूनच प्राथमिक गटातील सदस्यांचे संबंध समोरासमोरचे असतात असे म्हणता येते.

६. **उत्स्फूर्त संबंध** :— खरी मैत्री ठरवून होत नाही ती आपोआप होते असे म्हणणे योग्य ठरते. तसेच प्राथमिक गटातील सदस्यांचे परस्पर संबंध हे पूर्वनियोजीत नसतात. ते स्वयंप्रेरित व उत्स्फूर्त असतात. उत्स्फूर्त प्रेरणा हेच प्राथमिक गटांच्या निर्मितीचे मुख्य कारण असते.

७. **साध्य स्वरुपी संबंध** :— पती—पत्नी, माता—पुत्र, पिता—पुत्र, मित्र—मित्र, भाऊ—बहीण हे सर्व स्वयं साध्य स्वरुपी संबंध आहेत. हे सर्व संबंध हे कृत्रिमता, औपचारिकता आदिंपासून दूर असतात. एकमेकांच्या सहवासात व एकत्र राहिल्यामुळे व्यक्ती—व्यक्तींमधील आप—परभाव विलयास जातो. व्यक्ती गटांशी पूर्णत: एकरुप होतात.

८. **व्यक्तिमत्वाची जडणघडण** :— व्यक्तिमत्वाची जडणघडण ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया असून त्यात अनेक घटकांचे योगदान असते. त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामधील जडण—घडणीचा पाया प्राथमिक गटातच घातला जातो हे कोणीही अमान्य करु शकत नाही.

९. **प्रभावी नियंत्रण** :— व्यक्तीच्या वर्तनाला योग्य वळण लावण्यासाठी नियंत्रणाची गरज असते. मुद्दाम निर्माण केलेली कोणतीही नियंत्रण व्यवस्था नसतांनाही प्राथमिक गटाचे सदस्य मनापासून काही बंधने पाळतात व नियंत्रित वर्तन करतात.

**प्राथमिक गटाचे महत्व :—**

व्यक्तीला आपल्यामधील 'स्व' ची जाणीव सर्वप्रथम प्राथमिक गटाद्वारेच करुन दिली जाते. मुलांच्या मनामध्ये भाव—भावनांची निर्मिती करण्यामध्ये प्राथमिक गटाचा वाटा महत्वपूर्ण असतो. एकंदरीत व्यक्तीच्या मनाचा विकास घडवून आणण्यात प्राथमिक गटाचे योगदान महत्वपूर्ण असते. सामाजिक रीतीरिवाज, चालीरीती, प्रथा, परंपरा, भाषा, सणवार, धर्म इत्यादींची ओळख प्राथमिक गटाद्वारे बालकाला करुन दिली जाते. एकंदरीत प्राथमिक गट हे व्यक्ती आणि समाजजीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत.

१. **सामाजीकरणाच्या दृष्टीने महत्व** :— समाजामध्ये वावरण्याकरिता लागणाऱ्या सर्व बाबी लहान मुलाला शिकविल्या जातात. सामाजीकरण घडवून आणण्यामध्ये कुटुंब, शेजार, क्रिडासमूह या प्राथमिक गटांचा महत्वपूर्ण असा सहभाग असतो.

२. **व्यक्तिविकासाचे साधन** :— प्राथमिक सवयी, आत्मसम्मान, नैतिकता इत्यादी गोष्टींची ओळख व्यक्तीला प्राथमिक गटातूनच करुन दिली जाते. योग्य व संतुलित व्यक्तिमत्व कसे निर्माण होईल याची काळजीही कुटुंबातच घेतली जाते.

३. **मानसिक समाधान** :— कुणीतरी आपल्यावर प्रेम करावे, आपण केलेल्या कामाचे कौतूक करावे असे मुलाला वाटत असते. प्रेम, स्नेह, सहानुभूती या गोष्टी पैसे देऊन बाजारातून विकत आणता येत नाहीत. म्हणजेच व्यक्तीला मानसिक समाधान प्राथमिक गटामध्ये मिळते.

४. **कार्यक्षमतेत वाढ** :— प्रा. कूलेंच्या मते कोणत्याही व्यक्तीला तिच्या मनायोग्य काम करण्याची संधी मिळाल्यास तिचा उत्साह द्विगुणित होतो. मुलांच्या आवडीनिवडीनुसार त्यांना शिक्षण—प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होते.

५. **सामाजिक नियंत्रण** :— लहान मुलांना कधी प्रेमाने समजावून तर कधी त्यांना लहान—मोठया शिक्षा देऊन त्यांच्या वर्तनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्नही प्राथमिक गटाद्वारेच केला जातो. म्हणूनच प्रा. कूलेंनी प्राथमिक गटांना सामाजिक नियंत्रणाचे साधन मानले आहे. लोकांवर धर्म, जात, वंश, वर्ग, प्रचार इत्यादी घटकांचा प्रभाव पडतो. हे खरे असले तरीही हा प्रभाव प्राथमिक गटाच्या माध्यमातून पडत असतो हेही तितकेच खरे आहे. प्राथमिक गट वा संकल्पनेचा निर्माता म्हणून कूलेंचे समाजशास्त्रीय विचारांमधील स्थान अढळ आहे.

## एमिल दुरखिम ; (१८५८—१९१७)

**प्रश्न क्र. १ :— दुरखिमचा आत्महत्येचा सिध्दांत अथवा आत्महत्येचे दुरखिमने पाडलेले प्रकार लिहा,**

उत्तर :— आत्महत्येसारख्या व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत असणाऱ्या बाबीला एक सामाजिक घटना मानून तिचे समाजशास्त्रीय अध्ययन कसे करता येते याचा आदर्श वस्तूपाठ समाजशास्त्रात दुरखिमने घालून दिला. आत्महत्येकरीता मानसिक, जैवकीय, अनुवांशिक वा प्रजातीय, भौगोलिक तसेच दारिद्रय, अपयशी, प्रेमभंग यासारखी कारणे जबाबदार नाहीत असे दुरखिम प्रारंभीच स्पष्ट करतो.

**व्याख्या :—**

१. **दुरखिमच्या मते** :— ''व्यक्तीकडून घडणाऱ्या सकारात्मक वा नकारात्मक कृतींची परिणती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जर त्या व्यक्तीच्या मृत्यूत होत असेल तर असा मृत्यू म्हणजे आत्महत्या होय.''

दुरखिम म्हणतो की, ''व्यक्ती आपल्या समाजाप्रती असलेल्या कर्तव्यांचे उल्लंघन आत्महत्येद्वारे म्हणजे आत्महत्येची कृती करुन करते.'' या दृष्टीने आत्महत्या हे सामाजिक तथ्य आहे. मानसिक तथ्य नाही. आत्महत्या हा सामाजिक एकीकरणाच्या अभावाचा परिणाम आहे.

ज्या कुटुंबातील सभासद हे घनिष्ट संबंधाद्वारे एक दुसऱ्याशी बांधल्या गेले आहेत असे कुटुंब म्हणजे परस्पराबाबत प्रेम, जिव्हाळा, आपुलकी असणाऱ्या व्यक्तीचा समूह असते. हा समूह व्यक्तीला आत्महत्येच्या मार्गाकडे जाण्यापासून परावृत्त करतो. हा समूह आपल्या सदस्यांच्या जीवनातील एकाकीपणाला दूर ठेवतो. या कारणामुळेच धार्मिक विचार, धर्मविधी आणि श्रध्दा यांचे प्राबल्य असणाऱ्या समाजात आत्महत्येचे प्रमाण कमी असते. जीवनामध्ये एकाकीपणा वाटयास येणे या कारणामुळे विवाहितापेक्षा अविवाहीत व्यक्ती जास्त प्रमाणात आत्महत्या करतात. सर्व समाजांमध्ये व्यक्ती आपल्या बाहय परिस्थितीमुळे दु:खी किंवा निराश होते. आत्महत्या करणारी व्यक्ती ज्या समूह व समाजाची सदस्य असते तो समूह वा समाजच त्यासाठी जबाबदार असतो.

**आत्महत्येचे प्रकार :—**

१. **स्वकेंद्रीत आत्महत्या** :— दुरखिमच्या मते ''स्वहितास प्राधान्य देणारी व सांघिक उद्दिष्टांपासून दूर होत जाण्याची प्रवृत्ती म्हणजे आत्मकेंद्रितता होय.'' व्यक्तीचे गटाशी तादात्म्य पावण्याचे प्रमाण कमी—कमी होत जाते. त्यामुळे व्यक्तीचे जीवन अर्थशून्य होत चालले आहे असे वाटू लागते. अशा अर्थशून्यतेने ग्रस्त झालेल्या व्यक्तीच आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. सामाजिक निष्ठेचा अभाव हेच आत्महत्येचे कारण

ठरते. एकंदरीत आत्मकेंद्री प्रवृत्तीमधून जी आत्महत्या घडून येते त्याला आत्मकेंद्रीत आत्महत्या असे म्हणतात. व्यक्ती आपल्या सामाजिक जीवनात घडणाऱ्या गोष्टींचा विचार 'मी' च्या संदर्भात करु लागली आहे. व्यक्तीमधील 'आम्ही' च्या भावनेचा मंद गतीने लोप होऊ लागला आहे. अशी व्यक्ती केवळ स्वत:च्या संदर्भात विचार करुन आत्मकेंद्रीत होते. शेवटी हीच भावना किंवा परिस्थिती व्यक्तीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते. या परिस्थितीमुळे जी आत्महत्या घडून येते तिला स्वकेंद्रित आत्महत्या असे म्हणतात.

२. **परार्थवादी आत्महत्या** :— जेव्हा व्यक्ती ही आपल्या गटाशी अथवा समाजाशी पूर्णपणे एकरुप झालेली असते तेव्हा व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व जवळजवळ संपते वा संपुष्टात येते. कारण ती व्यक्ती समूहाच्या दृष्टीनेच विचार करते. समूहाच्या दृष्टीनेच बाहय जगाकडे बघते आणि समूहासाठीच कार्य करते. व्यक्तीमध्ये समूहाप्रती उत्तरदायित्वाच्या भावनांचा विकास होतो. भारतामधील 'सती प्रथा' आणि जपानमधील 'हराकिरी' ची प्रथा हे परार्थवादी आत्महत्येचे उदाहरण आहे. राष्ट्राकरीता रणांगणावर स्वत:च्या जीवाचे बलिदान करणारे सैनिक, जहाजाबरोबर जलसमाधी घेणारा जहाजाचा कप्तान आणि त्याचे सहकारी 'नौसैनिक' नक्षलवादी, दहशतवादी ही देखील परार्थवादी आत्महत्येची उदाहरणे आहेत. परार्थवादी भावना विकसीत झालेली व्यक्ती सामूहिक हितासाठी वैयक्तिक स्तरावर खालच्या पातळीचे मूल्यांकन राजीखुशीने स्वीकारते.

३. **प्रमाणकशून्य आत्महत्या** :— दुरखिमच्या मते सामाजिक प्रमाणकावरील निष्ठेचा अभाव, सामाजिक संतुलन, समाजाचे नैतिक संघटन किंवा समाजाची संरचना यांच्यामध्ये अचानक परिवर्तन घडून येते. व्यक्तीला अचानक फार मोठी संपत्ती मिळणे किंवा एखाद्या श्रीमंत व्यक्तीवर अचानक आर्थिक संकट कोसळणे, या दोन्ही गोष्टी आत्महत्येसाठी कारणीभूत होतात. कारण या दोन्ही कारणांमुळे अचानकपणे निर्माण झालेल्या नव्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास लोक असमर्थ असतात. अकस्मात आर्थिक सुबत्ता प्राप्त झाली तरीही त्याने सामाजिक नियमनांच्या मर्यादेतच जीवन जगले पाहिजे. नियमनांचा भंग करण्यामधूनच किंवा नियमनांवरील विश्वास व निष्ठा कमी होण्यामधूनच प्रमाणक शून्य आत्महत्या घडून येतात असे दुरखिम म्हणतो.

४. **टीकात्मक परीक्षण** :— सामाजिक घटकांना जास्त महत्व, विचारप्रणालीकडे दुर्लक्ष, एकाकीपणा वाटयास येऊन देखील अनेक लोक आत्महत्या करीत नाहीत म्हणून हा सिध्दांत वास्तववादी नाही असे टीकाकारांचे म्हणणे आहे.

**प्रश्न क्र. २ :— धर्माच्या उत्पत्तीबाबत दुरखिमचा सिध्दांत स्पष्ट करुन धर्माची कार्य लिहा.**

उत्तर :— दुरखिमने श्जीम मसमउमदजंतल वितउे वि तमसपहपवने सपमिश या ग्रंथात धर्मासंबंधीचे विचार व्यक्त केले आहेत. धर्माच्या उदयाचे स्पष्टीकरण करण्यास

टायलर, मॅक्समूलर आदींचे सर्व सिध्दांत अपुरे आहेत हे स्पष्ट केल्यानंतर धर्माचा उदय का व कसा झाला? प्रारंभीच्या काळात धर्माचे स्वरुप कसे होते? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी दुरखिमने ऑस्ट्रेलियातील अरुष्टा नावाच्या आदिवासी जमातीचे अध्ययन केले. अरुष्टा या आदिवासी जमातीतील धार्मिक विश्वास, धार्मिक विधी, पवित्रतेची संकल्पना या सर्वांचे दुरखिमने वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करुन अध्ययन केले. या अध्ययनाच्या आधारेच त्याने आपला धर्माचा समाजशास्त्रीय सिध्दांत मांडला आहे.

**व्याख्या :—**

**दुरखिमच्या** मते :— ''धर्म म्हणजे पवित्र वस्तुप्रती असलेला विश्वास आणि कृतीमधील परस्परावलंबित्वातून उत्पन्न होणारी व्यवस्था होय. अशा धार्मिक विश्वासांना अनुसरणाऱ्या आणि त्यासंबंधीच्या विभिन्न प्रथा पाळणाऱ्या व्यक्तींना धर्म संघटित करीत असतो.''

दुरखिमच्या मते धर्म अशा वस्तू, घटना आणि व्यवहारांशी संबंधित आहे की ज्यांना पवित्र मानले जाते. पवित्र वस्तु, प्राणी, विचार यांचे रक्षण ज्या सामाजिक श्रध्दा, विधी, विश्वास आणि संस्कार यांच्याद्वारे केले जाते त्यास धर्म असे म्हणतात. दुरखिमच्या मते धर्माची उत्पत्ती अशा विचार आणि विश्वातून होते की ज्यांना समाज पवित्र मानतो.

आदिवासी जमात आपल्या वंशाचा किंवा गोत्राचा संबंध कोणत्या तरी जीवंत अथवा निर्जीव वस्तूशी जोडत असते. त्या जीवंत अथवा निर्जीव वस्तूच्या चिन्हाला 'कुलचिन्ह' असे म्हणतात. कुलचिन्ह असलेल्या प्राण्याची हत्या करीत नाहीत. कुलचिन्हाची पूजा—प्रार्थना करतात. कुलचिन्हाशी संबंधित सर्व प्रथा, परंपरा, विधी, विचार या सर्वांचा समावेश कुलचिन्हवाद या संज्ञेत होतो. कुलचिन्ह हे समूहाच्या शक्तीचे प्रतीक आहे. वैयक्तिक शक्तीपेक्षा समूहाची शक्ती ही श्रेष्ठ आहे. तो समूहाच्या शक्तीला श्रेष्ठ, पवित्र असे मानू लागला. समूहाच्या शक्तीलाच ईश्वर समजू लागला. धर्म हे व्यक्तीच्या अनुभवातून साकार होणारे प्रतीक आहे असे दुरखिम म्हणतो. कुलचिन्ह आणि कुळ किंवा गोत्र हे वस्तूत: एकच आहे. त्यामुळे ईश्वर ही केवळ समाजाची प्रतिकात्मक अभिव्यक्ती आहे. याचा अर्थ धर्माचा स्त्रोत हा स्वत: समाज आहे. पवित्र वस्तू किंवा ईश्वर म्हणजे मूर्त रुपातील समाज होय. यामुळे धर्म हा सामूहिक प्रतिनिधीत्वातून अस्तित्वात आला असा दुरखिमचा दृढ विश्वास होता. व्यक्तीच्या अनुभवातून साकार झालेले समाजाचे प्रतीक असे धर्माचे स्वरुप आहे. कुलचिन्हवाद हाच सर्व धर्माचा आधार आहे. म्हणजे टोटम पासूनच धर्माची उत्पत्ती झाली आहे.

**धर्माची कार्ये :—**

१. **मानवी जीवनाला अर्थपूर्णता प्रदान करण्याचे कार्ये** :— मानवी जीवनाचा उद्देश कोणता? ध्येय कोणती, या प्रकारच्या शिकवणुकीचा प्रारंभ धर्मामधूनच झाला आहे. म्हणून सभ्यता व संस्कृतीच्या विकासात धर्माची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे दुरखिमने म्हटले आहे.

२. **धर्माची स्वयंशिस्तीबाबतची कार्ये** :— पाप—पुण्य यासारख्या धर्माशी निगडित असणाऱ्या, कल्पना, पवित्र—अपवित्र संबंधीच्या विचारांवरील विश्वास व श्रध्दा हेच सदाचाराचे नियम निर्माण होण्याचे मूळ स्थान वा उगमस्थान आहे असे दुरखिम मानतो. व्यक्तीला सदाचाराचे पालन करण्यास धर्म प्रोत्साहित करतो. समाजात स्वयंशिस्तीने वागण्याची वृत्ती निर्माण करणे व तिची जोपासना करणे हे धर्माचे सामाजिक कार्य महत्वपूर्ण आहे असे दुरखिम स्पष्ट करतो.

३. **समाजाला संघटित व नियंत्रित करण्याचे कार्य** :— धार्मिक विधी, धार्मिक समारंभ, धार्मिक प्रार्थना आदीच्या निमित्याने एकत्र आलेल्या अरुंण्टा जमातीचे दृढ संघटन निर्माण करण्यात धर्माची भूमिका महत्वपूर्ण आहे. एकाच धर्माचे अनुयायी वेगवेगळया ठिकाणी आणि वेगवेगळया देशांमध्ये राहत असले तरीही त्याचे संघटन असण्याचा अनुभव आपणास येतो. नियंत्रणाशिवाय दृढ संघटनच निर्माण होऊ शकत नाही.

४. **धर्माची मानसिक कार्ये** :— कुटुंबातील अथवा कुटुंबाबाहेरील प्रिय व्यक्तीच्या मृत्यूप्रसंगी दु:खाला तोंड देण्याची पाळी प्रत्येक व्यक्तीवर येते. प्रियजनाच्या मृत्यूच्या प्रसंगाला तोंड देण्याचे सामर्थ्य धार्मिक शिकवणुकीद्वारे होते. सामाजिक मूल्य आणि नियमने समाजव्यवस्थेत रुजविण्यात धर्माची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे दुरखिमने म्हटले आहे.

५. **बंधुभावाची निर्मिती करण्याचे कार्ये** :— अरुण्टा आदिवासी जमातीमधील लोक धार्मिक समारंभाच्या निमित्याने एकत्र आले तेव्हा त्यांच्यामध्ये निर्माण झालेल्या विद्युतशक्तीचे निरीक्षण दुरखिमने केले होते. त्या अनुभवावरुन विशाल आकाराच्या समाजामध्ये बंधुभावाची निर्मिती करण्यामध्ये धर्माचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे दुरखिमने म्हटले आहे.

**दुरखिमच्या धर्माच्या सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण :—**

१. कुलचिन्हवाद हाच सर्व धर्माचा आधार आहे असे दुरखिम म्हणतो तर टिकाकारांच्या मते सर्व धर्माचा टोटमवाद हा आधार असू शकत नाही.

२. अरुण्टा जमात सर्वात प्राचीन आहे या विचाराशी टीकाकार सहमत नाहीत.

३. कोणत्याही धर्माची व्यक्ती कधीही समाजाला ईश्वर मानत नाही व समाजाची पूजाही करीत नाही. त्यामुळे दुरखिम व्यक्तीच्या धर्मनिष्ठ भावनेवर आघात करतो.

४. समाज व ईश्वर एकच मानणे योग्य ठरत नाही असे टीकाकारांना वाटते.

५. धार्मिक समारंभ धार्मिक भावनांना प्रगट करतात हे दुरखिमचे मत अभ्यासकांना योग्य वाटत नाही.

## युनिट क्र. ४ समाजशास्त्रीय विचारांचे प्रणेते — ३ (कार्ल मार्क्स)
## (Founders of Sociology-III) Karl Marx (1818-1883)

========================================

**प्रश्न क्र. १ :— भांडवलशाहीचा विकास आणि विनाश याबाबत मार्क्सचे विचार लिहा?**

उत्तर :— भांडवलशाही व्यवस्थेत जे उत्पादन होते त्याचा संबंध मानवी गरजांशी नसतो तर बाजारपेठेशी असतो. म्हणून भांडवलशाही अर्थव्यवस्थेला बाजारपेठीय अर्थव्यवस्था असेही म्हणतात. नफा आणि जास्तीत जास्त नफा ज्यामध्ये मिळेल त्याच वस्तूंचे उत्पादन भांडवलदार करतात. या व्यवस्थेत कामगारांचे शोषण होते. वेतन कमी देण्याप्रमाणेच कामगार कपात करणे, तोटा कमी करण्यासाठी कारखाना काही दिवसांसाठी बंद करणे म्हणजे टाळेबंदी करणे हे सर्व अनिष्ट प्रकार भांडवलशाही व्यवस्थेत घडतात. या सर्व कारणामुळे मार्क्स भांडवलशाहीवर टीका करतात. अगदी सुरुवातीला टोळया करुन भटकणारा मनुष्यप्राणी स्थिर झाल्यावरही संपत्ती सार्वजनिक असल्यामुळे या अवस्थेला मार्क्सने प्राथमिक साम्यवाद असे नाव दिले आहे. कारण या काळात वर्गविरहित व समताप्रधान अशी समाजव्यवस्था रुढ होती. जेव्हा लोक शेतजमिनीवर आपला मालकी हक्क सांगू लागले तेव्हा शेतीचे मालक सत्ताधीश झाले. गावेच्या गावे जमीनदारांच्या मालकीची झाली. गावात एक मालक बाकी सर्व शेतमजूर असे चित्र सर्वत्र दिसू लागले. व्यापारी वर्ग निर्माण झाला. विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासातून यंत्रयुग आले. त्यामुळे मुठभर लोकांच्या हाती संपत्तीचा संचय झाला. श्रमिक वर्ग निर्माण झाला. ही स्थिती भांडवलशाहीच्या उदयास कारणीभूत झाली. भांडवलदाराचा मुख्य उद्देश नफा कमविणे हा असल्यामुळे तो कामगारांकडून जेवढे श्रम करवून घेतो त्या श्रमाचा त्याला पूर्ण मोबदला देत नाही. कामगार आठ तास काम करीत असेल तर त्याला केवळ तीन तासांच्या कामाचे मूल्य मिळते. उर्वरित पाच तास कामगार भांडवलदारासाठी फुकट राबत असतो. याला मार्क्सने अतिरिक्त मूल्य असे नाव दिले आहे. उपजिवीकेसाठी कामगारांना आपले श्रम अत्यल्प किमतीत विकण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय नसतो. कामगारांच्या या असहाय्यतेचा गैरफायदा भांडवलदार घेतो. अशाप्रकारे भांडवलशाही व्यवस्थेतील शोषण प्रक्रिया स्पष्ट करणारा सिध्दांत म्हणजे अतिरीक्त मूल्याचा सिध्दांत होय.

**भांडवलशाहीच्या विकासातच तिच्या विनाशाची बीजे असतात.**

१. **आर्थिक विषमतेत वाढ** :— भांडवलशाहीत श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत जातात. आर्थिक विषमता जेवढी वाढते तेवढी भांडवलशाही

व्यवस्थेत क्रांती होण्याची शक्यता अधिक असते. श्रीमंत—गरीब यामधील अंतर वाढणे म्हणजे भांडवलशाहीचा नाश ओढविणे होय.

२. **समाजाच्या मागणीकडे दुर्लक्ष** :— भांडवलशाही व्यवस्थेत जीवनावश्यक वस्तूंपेक्षा चैनीच्या वस्तूंची अधिक रेलचेल असते. त्या वस्तू लोकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त की घातक आहेत यासंबंधीची कोणतीही चिंता भांडवलदाराच्या डोक्यात नसल्यामुळे ते समाजाचा रोष ओढवून घेतात. याचा परिणाम भांडवलशाही नष्ट होण्यात होतो.

३. **भांडवलदार कामगारांना अप्रत्यक्षपणे संघटित करतात** :— भांडवलशाहीत कामगारांचे शोषण होते. सर्व कामगार वर्गाची सुखदु:खे समान स्वरुपाची असल्यामुळे त्यांच्यात एकजूट होते. कामगारांचे दृढ संघटन भांडवलशाही व्यवस्थेला हादरे देते.

४. **आंतरराष्ट्रीय श्रमिक आंदोलनाचा उदय** :— शोषण, पिळवणूक हेच भांडवलशाही व्यवस्थेचे आधारभूत तत्व असते. जगातील सर्व कामगारांचे प्रश्न सारखे असल्यामुळे त्यांना एकतेच्या सुत्रात बांधणे शक्य आहे अशी मार्क्स व एंजल्सची धारणा होती. त्यामुळे भांडवलशाही व्यवस्था ही आंतरराष्ट्रीय श्रमिक आंदोलनास जन्म देते.

५. **अतिरीक्त मूल्य भांडवलदारांच्या हाती** :— भांडवलशाही व्यवस्थेत कामगारांनी केलेल्या श्रमाचे मूल्य भांडवलदाराच्या वाटयास जाते. कामगारांच्या शोषणामुळे त्यांचा मानसिक स्तरावरील असंतोष त्यांना क्रांतीच्या वाटेकडे घेऊन जातो.

६. **भांडवलशाही व्यवस्था फक्त कामगारच नष्ट करु शकतात** :— भांडवलशाही विरोधात केलेल्या क्रांतीनंतर भांडवलदार वर्ग नष्ट होईल. उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी प्रस्थापित होईल. कामगार हा एकच वर्ग शिल्लक राहील. वर्गविरहित आणि राज्य विरहित साम्यवादी समाज अस्तित्वात येईल असे भाकित मार्क्स व्यक्त करतो. अशाप्रकारे आर्थिक कारणांमुळे भांडवलशाहीचा विनाश अपरिहार्य आहे असे मार्क्स तर्कसंगतरित्या पटवून देतो. त्याचप्रमाणे कामगारांची गरीबी, बेकारी, वंचितता त्याला भांडवलशाही व्यवस्थेविरुध्द क्रांती करण्यासाठी उभे करेलच पण त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे भांडवलशाही व्यवस्थेने त्यांच्यावर लादलेले परात्म जीवन त्याला त्या व्यवस्थेविरुध्द संघटित होण्याची प्रेरणा देईल असे मार्क्स नमूद करतो. परात्मता ही समाजशास्त्रीय संकल्पना विकसित करण्यात मार्क्सचे महत्वाचे योगदान आहे.

**भांडवलशाही बाबतच्या मार्क्सच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण** :—

१. मार्क्सने इतिहासाचा संदर्भ घेतांना त्याला आवश्यक बाबींचाच संदर्भ घेतल्यामुळे मार्क्सवादी विचारांमध्ये अनेक उणीवा निर्माण झाल्या आहेत.

२. भांडवलशाहीच्या उदयाचे स्पष्टीकरण करतांना मार्क्सने गैर आर्थिक घटकांचा अजिबात विचार केला नाही.

३. श्रमाला दिलेल्या आत्यंतिक महत्वामुळे मार्क्सच्या विचारांमध्ये साम्यवादी अर्थव्यवस्थेचा प्रचार करण्याला महत्व प्राप्त झाले आहे. असे असले तरीही मार्क्सने भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष स्पष्ट केल्यामुळेच कामगार कल्याणाच्या योजना हाती घेणे राज्यकर्त्यांना आणि उद्योगपतींना भाग पाडले असेही म्हणता येईल.

**प्रश्न क्र. २ :— वर्ग आणि वर्गसंघर्षाबाबत मार्क्सचे विचार लिहून वर्गसंघर्षाची कारणे लिहा?**

उत्तर :— 'वर्गसंघर्षाचा समाजशास्त्रज्ञ' म्हणून मार्क्स यांना संपूर्ण जग ओळखते. ''आजपर्यंतचा मानवी समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे'' असे विधान मार्क्स यांनी केले आहे.

**व्याख्या** :—

**मार्क्सच्या** मते :— ''जोपर्यंत समान जीवनस्थिती असणाऱ्या कुटुंबामध्ये एकत्वाची किंवा सामुदायिकतेची भावना निर्माण होत नाही आणि ते स्वत:ला राजकीय दृष्टया संघटित करीत नाही तोपर्यंत त्यांचा वर्ग बनत नाही.''

मार्क्स यांनी वर्ग ही संज्ञा 'इतिहास घडविणारे वर्ग' या अर्थाने वापरली आहे. समान जीवनपध्दती व आर्थिक स्थिती, एकत्वाची भावना म्हणजे वर्गजाणिव आणि स्वत:हून राजकीय दृष्टया संघटित होणे या तीनही बाबी मार्क्स यांना वर्ग या संज्ञेच्या अर्थामध्ये अभिप्रेत आहे. मार्क्सला अभिप्रेत आहेत असे वर्ग तयार स्वरुपात कधीच व कुठेही नसतात. तर समाजातील उत्पादन साधनांच्या विकासातून हळूहळू वर्गजाणीव जागृत होते व क्रांती करण्यास प्रवृत्त होते आणि त्यातून वर्ग निष्पन्न होतात. भांडवलशाही व्यवस्थेत वर्गसंघर्ष यापूर्वी कधीही नव्हता एवढा स्पष्ट व तीव्र झाला आहे असे मार्क्स म्हणतो. मार्क्सच्या मते सुरुवातीपासून समाजात दोन वर्ग होते. या दोन वर्गापैकी एका वर्गाची उत्पादनाच्या साधनांवर मालकी असते. दुसरा वर्ग मात्र अशा लोकांचा की ज्यांच्याजवळ उत्पादनाच्या साधनांची मालकी नसते. पहिल्या वर्गाला 'आहे रे' आणि दुसऱ्या वर्गाला 'नाहीरे' वर्ग असे संबोधिले जाते. यांना अनुक्रमे शोषक आणि शोषित वर्ग असेही संबोधिले जाते. मालक—गुलाम, सरंजामदार—भूदास, भांडवलदार—कामगार यांच्यामधील कलह असे वर्गसंघर्षाचे स्वरुप मार्क्सने स्पष्ट केले आहे. कितीही वेतनवाढ वा सुखसोई कामगारांच्या पदरात पडल्या तरीही कामगारांची शोषणमुक्ती होऊ शकत नाही. कारण कामगारांचे शोषण केल्याशिवाय भांडवलदारांच्या पदरात अधिकाधिक नफा पडू शकत नाही. भांडवलदार विरुध्द कामगार हा संघर्ष पायाभूत संघर्ष आहे असे मार्क्स म्हणतो. भांडवलदार व

कामगार या दोन्ही वर्गाचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत. फक्त भांडवलशाहीच्या विनाशातूनच कामगारांची शोषणमुक्ती घडून येते.

**वर्गसंघर्षाची कारणे :—**

१. **दोन्ही वर्गात संघर्ष होतो** :— भांडवलदार वर्गाशिवाय श्रमिक जगू शकत नाही आणि श्रमिकाशिवाय भांडवलदार वस्तूंचे उत्पादन करु शकत नाही. हे दोन्ही वर्ग परस्परपूरक असून देखील त्यांच्यामध्ये संघर्ष होतो. भांडवलदारांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील सत्तेवर नियंत्रण असल्यामुळे शोषण वा पिळवणूक सहन करण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय कामगार वर्गाजवळ नसतो.

२. **आर्थिक विषमता** :— वर्ग संघर्ष हा इतिहासाचा स्थायी भाव आहे. आर्थिक विषमता हे वर्गसंघर्षाचे मूळ कारण आहे. साधनविहीन असणारा वर्ग आपले अस्तित्व टिकून राहावे यासाठी साधन संपन्न वर्गाशी लढतो. असा वर्गकलह सुरुच असतो.

३. **सरंजामशाहीच्या अंताप्रमाणेच भांडवलशाहीचाही अंत होईल** :— भांडवलशाहीच्या विनाशाची बिजे भांडवलशाहीत दडलेली आहेत. भांडवलदार व कामगार यांच्या संघर्षात कामगारांचाच विजय होईल असे मार्क्स म्हणतो. कारण ज्या पध्दतीने सरंजामशाहीचा अंत झाला त्याचप्रमाणे भांडवलशाहीचा देखील अंत होणार आहे.

४. **श्रमिकांचे अस्तित्व श्रमाच्या मागणीवर अवलंबून असते** :— भांडवलदार श्रमिकांचे श्रम अत्यल्प मोबदला देवून विकत घेतो कारण श्रमिकाचे अस्तित्व त्याच्या श्रमाच्या विक्रीवर अवलंबून असते. त्यामुळे भांडवलदार ठरवेल तेवढी मजूरी घेणे कामगाराला भाग पडते.

५. **व्यक्तिमहात्म्य भांडवलशाही व्यवस्थेच्या विनाशास कारणीभूत ठरते** :— जोपर्यंत साधनविहिन अथवा साधनसंपन्न वर्ग स्वत:ला स्वत:हून राजकीयदृष्टया संघटित करीत नाही तोपर्यंत वर्गच निर्माण होत नाही. म्हणून वर्गाच्या निर्मितीबरोबर व्यक्तिमहात्म्य कमी होते. म्हणजे व्यक्तिमहात्म्य कमी होत नाही तोपर्यंत वर्गसंघर्ष सुरु राहणे अपरिहार्य ठरते असे मार्क्स म्हणतो.

६. **भांडवलशाहीचे स्थितीशील स्वरुप** :— राजकीय व सामाजिक क्षेत्रातील सत्ताधारक भांडवलदार वर्गाच्या हितसंबंधांना बाधा निर्माण होऊ शकेल अशा प्रकारच्या परिवर्तनाला विरोध करतात. कारण सत्ताधारकाचे पद टिकवून ठेवण्यासाठी त्यांना तसे करणे भाग असते. यामुळे भांडवलशाही व्यवस्थेत कोणतेही महत्वपूर्ण असे परिवर्तन घडून येऊ शकत नाही. भांडवलशाही व्यवस्थेचे स्थितीशील स्वरुपच अंतिमत: भांडवलशाहीच्या विनाशास कारणीभूत ठरते असे मार्क्स म्हणतो.

## मार्क्सच्या वर्ग आणि वर्गसंघर्ष सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण

१. वर्गसंघर्ष हा सिध्दांत समाजव्यवस्थेतील केवळ संघर्षाच्या तत्वालाच अधिक महत्व देतो. यामुळे हा सिध्दांत एकांगी आणि दोषपूर्ण आहे असे टीकाकारांना वाटते.

२. समाजात केवळ दोनच वर्ग असतात असे मार्क्स म्हणतो परंतु आकाराने अधिक मोठया असणाऱ्या मध्यम वर्गाकडे मात्र पूर्ण दुर्लक्ष करतो असे टीकाकारांना वाटते.

३. मानव समाजाचा इतिहास हा केवळ वर्ग संघर्षाचा इतिहास आहे हे मार्क्सचे विधान अतिशयोक्ती पूर्ण वाटते.

४. साम्यवादी समाज निर्माण करण्याचा आणि आर्थिक विषमता कमी करण्याचा वर्गसंघर्ष हा एकमेव मार्ग आहे हे मार्क्सचे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण आहे असे टीकाकारांचे म्हणणे आहे.

५. भांडवलशाहीच्या विनाशाबाबतची मार्क्सची भविष्यवाणी ही खोटी ठरली आहे. मार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या सिध्दांतावर टीका करण्यात आलेली असली तरीही त्यामुळे त्याच्या सिध्दांताचे महत्व कमी होत नाही. मार्क्सच्या समाजवादी विचाराने संपूर्ण जगाला प्रभावित केले. मार्क्सच्या वैयक्तिक व सामाजिक कृतीच्या पाठीशी बव्हंशी आर्थिक घटकच असतात हे कार्ल मार्क्स यांनी ठामपणे सांगितले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील लोकशाही ही भ्रामक समतेचा पुरस्कार करते आणि प्रत्यक्षात मात्र अनिर्बंध स्पर्धेतून विषमतेला खतपाणी घालते. या विदारक वस्तुस्थितीकडे लक्ष वेधून मार्क्सने त्या कथित लोकशाहीचा पर्दाफाश केला. वर्गसंघर्षाची धार आता बोथट झाली आहे. ही टीका मान्य केली तरी त्यामुळे वर्गसंघर्षाचा सिध्दांत खोटा ठरत नाही.

## मॅक्स वेबर (१८६४—१९२०)

**प्रश्न क्र. १ :— मॅक्स वेबरचा सामाजिक क्रियेचा सिध्दांत स्पष्ट करुन सामाजिक क्रियेचे प्रकार लिहा?**

उत्तर :— 'सामाजिक क्रिया' हाच समाजशास्त्राचा अध्ययन विषय असून सामाजिक क्रिया आणि त्याचे अर्थपूर्ण आकलन या दोन्ही गोष्टी समाजशास्त्रीय अध्ययनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहेत असे वेबर म्हणतो. या दोन्ही गोष्टींचे स्पष्टीकरण करण्यासाठीच वेबरने सामाजिक क्रियेचा सिध्दांत मांडला. ज्या वर्तनाचा वर्तन करणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीने काही निश्चित अर्थ असतो अशा वर्तनास वेबर क्रिया म्हणतो. तर व्यक्तीच्या ज्या क्रिया अन्य दुसऱ्या व्यक्तीच्या व्यवहाराने प्रभावित होत असतील अशाच क्रियांना वेबरने सामाजिक क्रिया असे म्हटले आहे.

**व्याख्या :—**

**वेबरच्या** मते :— ''कर्त्याने आपल्या क्रियेस दिलेल्या अर्थानुसार जी क्रिया दुसऱ्यांच्या अभिवृत्ती व क्रियांप्रती अभिमूख झालेली आहे ती क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता, व्यक्तीकडून घडणारी क्रिया अर्थपूर्ण असावयास हवी, म्हणजे वर्तनाचा अर्थ व्यक्तीस माहित असावयास हवा. तसेच व्यक्तीचे असे अर्थपूर्ण वर्तन दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तनाशी अभिमुख झालेले असावयास हवे.

**सामाजिक क्रियेची लक्षणे :—**

१. **सामाजिक क्रिया ही कोणत्याही काळातील क्रियेने प्रभावित असावी लागते** :— वर्गात बसून विद्यार्थी शिक्षकाने शिकविलेल्या गोष्टी स्वत:च्या वहीत लिहीत असेल तर विद्यार्थ्यांची ही क्रिया वर्तमान काळातील सामाजिक क्रिया आहे. तसेच जेव्हा एखादा विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेची तयारी करतो ती देखील भविष्यकाळातील सामाजिक क्रिया होय.

२. **अनेक व्यक्तींद्वारे एकसारख्या होणाऱ्या क्रिया सामाजिक क्रिया नाही** :— पाऊस सुरु झाल्यानंतर व्यक्ती आपआपल्या छत्र्या उघडतात. परंतू या क्रियेला सामाजिक क्रिया म्हणता येत नाहीत परंतु शिक्षकांच्या आज्ञेनुसार योगासने करीत असतील तर त्या मुलांच्या क्रियेचा समावेश सामाजिक क्रियेमध्ये होतो.

३. **प्रत्येक प्रकारची क्रिया सामाजिक क्रिया नाही** :— एखादी व्यक्ती एकटीच बसून तास दोन तास देवाची प्रार्थना करत असेल तर त्या व्यक्तीची ही क्रिया सामाजिक क्रिया नाही. जी क्रिया निर्जीव वस्तुशी संबंधित असेल किंवा जी क्रिया इतर व्यक्तीच्या क्रियेने प्रभावित नसेल तर ती क्रिया सामाजिक क्रिया नाही. इतर व्यक्तींच्या वर्तनाद्वारे प्रभावित असणाऱ्या क्रियांनाच सामाजिक क्रिया म्हणतात.

४. **व्यक्तीचा प्रत्येक सामाजिक संपर्क म्हणजे सामाजिक क्रिया नाही** :— दोन मुलांची सायकलशी टक्कर झाल्यानंतर जर त्या व्यक्ती कोणतीही प्रतिक्रिया न करता घरी जात असतील तर ती क्रिया सामाजिक क्रिया नाही. परंतु दोघांपैकी एकाने क्षमा याचना केली तर ती सामाजिक क्रिया आहे. अशाप्रकारे दोन व्यक्तींमध्ये क्रिया, प्रतिक्रिया व आंतरक्रिया घडल्या तरच त्यांचा समावेश सामाजिक क्रियेमध्ये होतो असे वेबर स्पष्ट करतो.

**सामाजिक क्रियेचे प्रकार :—**

१. **भावनात्मक क्रिया** :— काम, क्रोध, मोह, प्रेम, शत्रूता इत्यादी भावनांनी प्रेरित होऊन जी क्रिया केली जाते त्या क्रियेला भावनात्मक क्रिया असे म्हणतात. बऱ्याच

वेळा रागाच्या भरात केलेल्या क्रियेनंतर एकतर व्यक्तीला पश्चाताप होतो नाही तर त्या कृत्याबद्दल व्यक्तीला लाजीरवाणे वाटू लागते.

२. **तर्कसंगत किंवा उद्दिष्टाभिमुख क्रिया** :— व्यक्ती जेव्हा आपली उद्दिष्टये साध्य करण्यासाठी उपलब्ध साधनांचा योग्य मेळ घालते तेव्हा त्या क्रियेला तर्कसंगत किंवा उद्दिष्टाभिमूख क्रिया असे म्हणतात. केवळ तर्कसंगत सामाजिक क्रियांचेच अध्ययन समाजशास्त्रात केले जावे असा वेबरचा आग्रह आहे.

३. **परंपरागत क्रिया** :— रुढी, चालीरीती, परंपरा यासारख्या आधारावर ज्या क्रिया केल्या जातात अशा क्रियांना परंपरागत क्रिया म्हणतात. अशा क्रिया करण्यासाठी समाजाचा दबाव असतो.

४. **मूल्यात्मक क्रिया** :— धार्मिक, नैतिक अथवा सौंदर्यात्मक आधारावरील वर्तनाला किंवा क्रियांना मूल्यात्मक क्रिया असे संबोधिले जाते. जसे पूजा—अर्चा करणे ही मूल्यात्मक क्रिया होय. ही क्रिया करीत असतांना आपल्याला फायदा होईल कि नाही याचा विचार केल्या जात नाही.

सामाजिक क्रियांचे अर्थपूर्ण आकलन करुन घेणे आणि त्या आकलनाच्या आधारावर सामाजिक कारणांचा शोध घेणे हा समाजशास्त्रीय अध्ययन पध्दतीचा मुख्य उद्देश आहे. मॅक्स वेबरच्या सामाजिक क्रियेच्या सिध्दांताचे वेगळेपण हे आहे की हा सिध्दांत अध्ययनकर्त्याने सामाजिक क्रियांचे वैज्ञानिक पध्दतीने आकलन कसे करुन घ्यावे याचेही स्पष्टीकरण करतो.

**वेबरच्या सामाजिक क्रिया सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण** :—

१. वेबरने कोणती क्रिया सामाजिक क्रिया नाही याचे स्पष्टीकरण केले असले तरी कोणत्या क्रिया सामाजिक क्रिया आहेत याचे स्पष्टीकरण केले नाही.

२. मूल्यात्मक क्रिया हा प्रकार अयोग्य आहे कारण त्याचे प्रेरणास्त्रोत कोणते हे स्पष्ट होत नाही.

३. एकाच घटनेचा अनेक कर्ते आपआपल्या मतानुसार अर्थ काढतात. म्हणून वेबरचा हा सिध्दांत वस्तूनिष्ठ नसून आत्मनिष्ठ आहे असे टीकाकारांना वाटते.

## प्रश्न क्र. २ :— वेबरची अधिसत्तेची संकल्पना स्पष्ट करुन अधिसत्तेचे किंवा प्रभुत्वाचे प्रकार लिहा?

उत्तर :— वेबरने अधिसत्तेबाबत मांडलेल्या विचारांचा अभ्यास आजही राज्यशास्त्रातील आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या अध्ययनात केला जातो. यावरुन वेबरने मांडलेली अधिसत्तेची संकल्पना किती महत्वपूर्ण आहे याची कल्पना येते. जेव्हा सत्ताधारक आपल्या आज्ञांचे पालन प्रेम, सक्ती, प्रचार, बलप्रयोग यासारख्या अमिषांच्या बळावर

लोकांकडून करवून घेतो तेव्हा सत्ता अस्तित्वात येते. तर सत्ताधारकाच्या आज्ञांचे पालन दंडशक्तीच्या भीतीमुळे केले जात नाही तर त्या आज्ञा योग्य आणि न्यायोचित आहेत अशा विश्वासातून केले जाते तेव्हा अधिसत्ता अस्तित्वात येते.

**अधिसत्तेची व्याख्या :—**

१. **युनेस्को नुसार** :— ''जिला लोकांची स्वीकृती असते, सर्व लोक तिचा आदर करतात आणि सर्वांनी तिला मान्यता दिलेली असते अशी सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

२. **मेरिटनच्या मते** :— ''आज्ञा देणे आणि त्या आज्ञांचे इतरांनी आपणहून पालन करणे या दोहोंमधील संबंधांना अधिसत्ता असे म्हणतात.

वरील व्याख्या लक्षात घेता अधिसत्तेचे स्वरुप स्पष्ट करणारी वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१. **अधिमान्यता** :— अधिसत्तेला लोकांच्या संमतीचा म्हणजेच अधिमान्यतेचा आधार असतो. बहुसंख्य लोक आपणहून अधिसत्तेच्या आज्ञा पाळीत असतात. सत्तेच्या तुलनेत अधिसत्ता ही दीर्घकाळ टिकते. याचे कारण तिला जनतेची संमती म्हणजेच अधिमान्यता असते हे होय.

२. **अधिसत्तेची काही प्रतीके असतात** :— सिंहासन, राजवस्त्रे, मुकूट, ध्वज, बोधचिन्हे, राजदंड यासारखी असंख्य राजचिन्हे ही अधिसत्तेची प्रतीके असतात. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना सभागृहातील सभापतीच्या मेजवर ठेवली जाणारी चांदीची गदा, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राजमुद्रा ही सर्व प्रतीके अधिसत्तेचा बोध करुन देतात. प्रतिकाविषयी लोकांच्या मनामध्ये आदरभाव असतो.

३. **विवेकनिष्ठ स्वरुप** :— अधिसत्ता ही समाजाला मान्य असलेली उद्दिष्टये आणि मूल्ये यांच्याशी सुसंगत असते. यामुळेच तिच्या आज्ञा पाळणे हे सर्वांच्याच हिताचे आहे अशी बहुसंख्य लोकांची धारणा असते. याचाच अर्थ असा की ती तर्कबुध्दीवर आधारित असते. म्हणूनच लोक तिचा स्वीकार करतात व तिला संमती देत असतात.

४. **अधिसत्ता कमखर्चिक व सोयीस्कर असते** :— प्रामुख्याने सकारात्मक अधिबलनासाठी सत्तेला अधिक खर्च येतो. सत्तेच्या तुलनेत अधिसत्ता ही कमखर्चिक असते. कारण अधिसत्तेला लोकांकडून आपोआप आज्ञापालन मिळत असते.

५. **संस्थात्मक किंवा संघटनात्मक स्वरुप** :— तळापासून वरपर्यंत संपर्काची कार्यक्षम व्यवस्था असणे आणि अधिसत्तेच्या संरचनेचे स्वरुप समाजातील बहुविधतेचे प्रतिनिधिक असणे ही दोन वैशिष्टये असली तरच अधिसत्ता आपली कार्ये प्रभावीपणे करु शकते. थोडक्यात आजच्या काळात अधिसत्तेचे स्वरुप संस्थात्मक वा संघटनात्मक आहे.

६. **आज्ञार्थी स्वरुप** :— राजा हा प्रजेशी वाटाघाटी किंवा युक्तीवाद करीत नसतो तो नेहमी प्रजेला आज्ञा देत असतो. लोकशाहीतील कायद्याची भाषाही आज्ञार्थीच असते. याचा अर्थ आज्ञा देण्याचा आणि त्या आज्ञांचे लोकांकडून पालन करवून घेण्याचा अधिकार अधिसत्तेला असतो. त्यामुळे अधिसत्ता नेहमी आज्ञार्थीच बोलते.

**अधिसत्तेचे किंवा प्रभुत्वाचे प्रकार :—**

१. **पारंपारिक अधिसत्ता** :— राजकीय सत्तेला लोकांकडून मिळणारी मान्यता जेव्हा प्रथा, परंपरा किंवा पिढयानुपिढयांच्या वहिवाटीवर आधारलेली असेल तेव्हा पारंपारिक अधिसत्ता हा प्रकार निर्माण होतो, असे मॅक्स वेबरने म्हटले आहे. प्राचीन काळात टोळीच्या प्रमुखाची अधिसत्ता ही परंपरेवर आधारित असायची. परंपरा या अलिखित असल्यामुळे विधिजन्य अधिसत्ताधारकापेक्षा पारंपारिक अधिसत्ताधारकाला बरेच जास्त स्वातंत्र्य असते. आजच्या लोकशाहीच्या युगात पारंपारिक अधिसत्ता हा प्रकार जवळजवळ संपुष्टात आला आहे. इंग्लंड सारख्या काही देशामध्ये राजेशाही हा शासनप्रकार असला तरीही तेथे राजाचे स्थान हे नाममात्र शासनप्रमुखाचे आहे.

२. **विधिजन्य म्हणजेच कायदाधिष्ठित अधिसत्ता** :— राज्यकर्ते जेव्हा शौर्य, कार्यक्षमता, नेतृत्व, गुण, लोकप्रियता, जनसेवा, उदारमतवादी विचार यासारख्या बुध्दिला पटणाऱ्या आधारावर जनतेद्वारे निवडलेले असतात तेव्हा विवेकी विधिजन्य अधिसत्ता हा प्रकार निर्माण होतो. अधिसत्तेच्या या प्रकारात पदाला अधिमान्यता असते. प्रत्येक पदाची कर्तव्ये कोणती? आणि त्यासाठीचे अधिकार कोणते, हे हेतुपुरस्पर तयार केलेल्या नियमांच्या आधारे निश्चित झालेले असते. तसेच त्यांच्या आज्ञा कायदेशीर असतील तरच त्यांचे पालन होते. प्रभुत्व प्रकारांच्या या विवेचनात वेबर या निष्कर्षास येऊन पोहचला की, ''सर्व आधुनिक समाजांचे कायदाधिष्ठित प्रभुत्व हे व्यवच्छेदक लक्षण होत चालले आहे.

३. **दिव्यबलयी अधिसत्ता** :— हिटलर, मुसोलिनी, चर्चिल, लेनिन, महात्मा गांधी, पंडित नेहरु, माओ—त्से—तुंग, केनेडी, चे गुव्हेरा, इंदिरा गांधी, नासेर या सर्व नेत्यांची सत्ता म्हणजे दिव्यवलयी अधिसत्ता होय. वरीलप्रमाणे काही व्यक्ती सर्वसामान्यांपेक्षा वेगळया असून त्यांच्याजवळ काही दिव्यशक्ती किंवा अलौकिक गुण आहेत अशी लोकांची श्रध्दा असते. अशा प्रकारे सत्ताधारकाच्या अलौकिकावर संपूर्ण विश्वास ठेवून अनेक लोक त्यांच्या आज्ञांचे पालन निमुटपणे करतात तेव्हा दिव्यवलयी अधिसत्ता अस्तित्वात येते. यातूनच नेतृत्वाच्या विभूतिपूजनाचा प्रकार सुरु होतो. अशा प्रकारच्या अलौकिक शक्तीवरचा हा प्रकार अन्य प्रकारांच्या तुलनेत अस्थिर असतो असे मॅक्स वेबरने म्हटले आहे. प्रत्यक्षात असलेल्या अधिसत्तेमध्ये या तीनही प्रारुपांची लक्षणे मिश्र स्वरुपात आढळतील हे वेबरनेही मान्य केले होते. उद्योगप्रधान आणि विकसित देशामध्ये मात्र दिव्यवलयी आणि पारंपारिक अधिसत्तांना फारसा वाव नसतो.

**प्रश्न क्र. ३ :— वेबरची नोकरशाहीची संकल्पना स्पष्ट करुन नोकरशाहीची वैशिष्टये आणि नोकरशाहीमध्ये अधिकाऱ्यांची स्थिती स्पष्ट करा?**

उत्तर :— 'आधुनिक नोकरशाही' हाच अध्ययनाचा विषय असणारी एक ज्ञानशाखा म्हणजे लोकप्रशासनशास्त्र होय. नोकरशाहीबाबत वेबरने मांडलेल्या विचारांना समाजशास्त्राप्रमाणेच राजकीय समाजशास्त्रातही महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. राज्य व शासनव्यवस्थेच्या कारभाराची यंत्रणा या दृष्टीने नोकरशाही ही राज्याएवढीच प्राचीन आहे असे म्हणता येते. इसवीसन पूर्व काळातील ग्रीक आणि रोमन राज्यामध्ये सुव्यवस्थित नोकरशाही यंत्रणा असल्याचे दाखले इतिहासात मिळतात. वेबरने नोकरशाहीचा विचार समाजशास्त्रीय दृष्टया एक औपचारिक संघटनाच्या दृष्टीनेच केला आहे.

**व्याख्या** :—

१. **वेबरच्या** मते, ''नोकरशाही ही प्रशासकीय नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठीची अशी संघटना आहे की ज्यात मूलत: बुध्दीच्या सहाय्याने नियंत्रण प्रस्थापित केले जाते. ''

२. **कोझरच्या** मते, ''नोकरशाही हे एक असे श्रेणीबध्द संघटन आहे की ज्याचा उद्देश प्रशासकीय कार्य पार पाडण्याच्या व्यक्तीच्या कामाला तर्कसंगत रुपात समान्वित करण्याचा असतो.''

**नोकरशाहीची वैशिष्टये :—**

१. **नियमांवर आधारित** :— नोकरशाही संघटनेत पदधारकाची नियुक्ती, बढती, बदली आदी सर्व बाबी नियमांनुसार केल्या जातात. नियमबाहय वर्तन करणाऱ्या पदधारकांवर शिस्तीच्या उल्लंघनाचे आरोप ठेवून शिक्षाही केली जाते. म्हणूनच वेबर नोकरशाहीचा विचार विवेकी विधिजन्य अधिसत्ता या दृष्टीने करतो.

२. **लिखीत दस्ताऐवज** :— २१ व्या शतकात संगणकामधील लिखित दस्तऐवजामुळे एखादा पदधारक सेवानिवृत्त झाला तरीही त्याने त्याच्या कार्यकाळात केलेल्या कार्याची चौकशी करणे आणि त्या कार्याची जबाबदारी निश्चित करणे नोकरशाही संघटनेला शक्य होते. याचा अर्थ नोकरशाहीमध्ये होणाऱ्या सर्व कामकाजांच्या नोंदी लिखित स्वरुपात ठेवल्या जातात.

३. **श्रेणीबध्द रचना** :— भारतीय नोकरशाहीमध्ये प्रथम श्रेणी ते चतुर्थ श्रेणी अशा एकूण चार श्रेण्या आहेत. श्रेणीमधील प्रत्येक पदाचे अधिकार, कर्तव्ये व कार्य हे सर्व नियमांद्वारे निश्चित झालेले असते. नोकरशाही संघटनेत विभिन्न श्रेणी व पदे यांची रचना पिरॅमिड सदृष्य असते. सर्वोच्च पदधारकाने दिलेल्या सर्व आदेशांचे व कर्तव्यांचे

पालन करणे हे सर्व पदधारकांचे कर्तव्य होय असे मानले जाते. त्यामुळे विशाल आकार असूनही नोकरशाही संघटनेत कोणताही गोंधळ होत नाही.

४. **कार्याचे विशेषीकरण** :— विशेष ज्ञान व कौशल्ये विकसित करण्यासाठी पदधारकाला प्रशिक्षण देण्याची व्यवस्था नोकरशाही संघटनेत केली जाते. तशी पात्रता वा योग्यता असणाऱ्या व्यक्तीचीच त्या पदावर नियुक्ती केली जाते.

५. **नियमांद्वारे नियंत्रण** :— ज्यांच्यामध्ये कार्ये करण्याची क्षमता व पात्रता आहे अशाच लोकांना नोकरशाही संघटनेत नियुक्त केले जाते. उच्चस्तरीय अधिकारी आपल्यापेक्षा कनिष्ठ पदधारकाच्या कार्यावर नियंत्रण ठेवीत असतात. याचा अर्थ नोकरशाहीत होणाऱ्या सर्व कार्यांवर नियमांनुसार नियंत्रण ठेवले जाते.

६. **उद्देशपूर्वक अवैयक्तिक स्वरुप** :— नोकरशाही संघटनेतील सर्व पदधारक व्यक्तींशी समान स्वरुपाचा व्यवहार करता यावा या हेतूने नोकरशाही संघटनेचे अवैयक्तिक स्वरुप निर्माण करण्यात आले असे वेबरने स्पष्ट केले आहे.

**नोकरशाहीमध्ये अधिकाऱ्यांची स्थिती :—**

१. **निश्चित वेतन** :— पदधारकाला त्याच्या श्रमाचा मोबदला म्हणून नोकरशाहीत निश्चित स्वरुपाचे वेतन दिले जाते.

२. **नोकरीची सुरक्षितता** :— पदधारकाने जर शिस्तीचे उल्लंघन केले असेल तर त्याला पदावरुन काढण्याचा अधिकार उच्चाधिकाऱ्याला असतो. नोकरशाही संघटनेत पदधारकाला पदाशी निगडित असणारी कर्तव्ये निष्पक्षपणे व प्रामाणिकपणे पूर्ण करता यावी यासाठी त्याला नोकरीची सुरक्षितता दिली जाते.

३. **सामाजिक दर्जा** :— दैनंदिन समाज जीवनात नोकरशाहीतील पदधारकाला सर्वसामान्यांपेक्षा अधिक मान सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त होते. या अर्थाने नोकरशाही संघटनेतील पदधारकाचा दर्जा श्रेष्ठ असतो असे वेबरने म्हटले आहे.

४. **मालमत्तेवर मालकी नाही** :— नोकरशाही संघटनेसाठी दिलेल्या सेवेसाठी प्रत्येक पदधारकाला वेतनाच्या स्वरुपात आर्थिक मोबदला दिला जातो. नोकरशाहीमधील पदधारकाची संघटनेच्या मालमत्तेवर मालकी नसते.

५. **कर्तव्य पालन** :— प्रत्येक पदधारकाला आपल्यापेक्षा वरिष्ठ पदधारकांच्या सर्व आज्ञा व आदेशांचे पालन करावे लागते. यामुळे संपूर्ण नोकरशाहीमध्ये जबाबदारीची भावना निर्माण होते.

६. **नोकरशाहीतील काम एक व्यवसाय** :— वेबरच्या मते नोकरशाही संघटनेतील उच्च पदधारक व्यक्तीच्या प्रती प्रामाणिक न राहता आपल्या पदाच्या कर्तव्यांची पूर्ती करण्याबाबत प्रामाणिक असणे असा नोकरशाही अंतर्गत काम करण्याचा अर्थ आहे.

दैनंदिन कामकाजाचा पगाराच्या रुपात आर्थिक मोबदला मिळत असल्यामुळे कार्यालयीन कामकाज एक व्यवसाय झाला आहे.

**वेबरच्या विचारांचे मूल्यांकन :—**

नोकरशाहीच्या प्रकार्याबरोबरच अपकार्याचाही विचार वेबरने केला आहे. नोकरशाही व अलौकिक वा दिव्यवलयी नेतृत्व कशा प्रकारे एकमेकांशी संबंधित आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि संयुक्तीकरण यांचा काय संबंध आहे, ज्ञान व श्रध्दा यांच्यात काय संबंध आहे. याच प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नात त्याने जगाचा इतिहास पालथा घातला. त्यामुळे ॲरॉनने म्हटल्याप्रमाणे वेबर हा गतकाळाचाच नव्हे तर भविष्यकाळाचाही समाजशास्त्रज्ञ ठरतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २०२१ च्या नव्या अभ्यासक्रमानुसार

# B.A.SECOND YEAR 4th SEMESTER Major-1

# भारतातील समाजशास्त्रीय परंपरा

# INDIAN SOCIOLOGICAL TRADITION











***Dr.B.R.AMBEDKAR (1891-1956)**

***Dr.G.S.GHURYE (1893-1983)**

***Dr.M.N.SHRINIWAS (1916-1999)**

***Dr.D.P.MUKHERJEE (1894-1962)**

***Dr.R.K.MUKHERJEE (1889-1968)**

***Dr.S.C.DUBEY (1922-1996)**

***TARABAI SHINDE (1850-1910)**

***JYOTIBA PHULE (1827-1890)**

***SAVITRIBAI PHULE (1831-1897)**

AUTHOR
DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR
DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE. VASANTRAO KOLHATKAR ART'S COLLEGE, ROHANA
TAH.ARVI DIST.WARDHA (M.S.) ISBN-978-93-82962-14-4

**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur**
**B.A.Second Year: Semester-IV Major-1**
**Indian Sociological Tradition**

**1) Theoretical Roots of Caste in India:**

A) B.R.Ambedkar: Origin of Caste and its Criticism.

B) G.S.Ghurye: Characteristics of Caste and the emergence of Sub-castes.

**2) Social Change from Indian Perspective:**

A) M.N.Shriniwas: Dominant Caste-Meaning and Implication.Sanskritization-As a Factor of Social Change,Mobility and Development.

B) D.P.Mukherjee: Historical Dialecticism,Indian Tradition and Social change.

**3) Indian Society and Contemporary Change:**

A) R.K.Mukherjee: Vaiues,Symbols,Persnality and Change.

B) S.C.Dubey : Values in Modernity,Indian Society and Social change.

**4) Gender and Society in India:**

A) Tarabai Shinde: Women and Patriarchy in Indian Society.

B) Jyotibha Phule and Savitribai Phule: Women’s Education and Women’s Rights.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

## बी.ए.सेमिस्टर-चवथे

## भारतातील समाजशास्त्रीय परंपरा

## (INDIAN SOCIOLOGICAL TRADITION)

## युनिट क्रमांक: ०१

## भारतातील जातीच्या कुळांचे सैद्धांतिक विवेचन

## (Theoretical Roots of Caste in India)

जातीव्यवस्थेसारखा बंद स्तरीकरणाचा प्रकार जगात अन्यत्र कोठेही नाही.यामुळे स्तरीकरणाचा एक प्रकार म्हणून भारतीय समाजातील जातीव्यस्थेच्या अभ्यासाला विशेष महत्व आहे.डॉ.बी.आर.आंबेडकर,डॉ.एस.व्ही.केतकर आणि डॉ.घुर्ये ही त्रयी भारतातील समाजशास्त्रज्ञांची पहिली पिढी होय.चार वर्ण,पुरोहितांचे वर्चस्व,विटाळाच्या कल्पना,जातीमध्ये विवाह करण्याचा कटाक्ष इत्यादि अनेक गोष्टी जातिव्यवस्थेशी निगडीत आहेत.त्यापैकी प्रत्येक गोष्टीचा उगम कसा झाला हे सांगणे शक्य आहे.परंतु जातिव्यवस्थेचा उगम कसा झाला हे सांगणे शक्य नाही.डॉ.आंबेडकर आणि डॉ.घुर्ये यांचे जातीव्येव्स्थेविषयीचे समाजशास्त्रीय विवेचन पुढीलप्रमाणे.

## डॉ.बी.आर.आंबेडकर

## (1891-1956)

---

### प्रश्न क्रमांक:-१ जातीव्यस्थेच्या स्वरूपाविषयी डॉ.आंबेडकरांचे विचार लिहा?

उत्तर:-जातीव्यस्थेच्या स्वरूपाचे विवेचन करतांना डॉ.आंबेडकरांनी श्रेष्ठ-कानिष्ठ्तेवर आधारित जातीची रचना कशी अस्तित्वात आली ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.म्हणून या संदर्भात त्यांनी मांडलेल्या विचारांना जातीच्या रचनेसंबंधीचा सिद्धांत असेही म्हटले जाते.मनूच्या योजनेत सर्वात उच्चस्थानी ब्राह्मण हा वर्ण असून त्यानंतर क्षेत्रीय,वैश्य व शूद्र हे वर्ण आहेत.शुद्रांच्याही खालच्या स्थानी अस्पृश्य आहेत.चातुर्वर्ण पद्धतीवर आधारित असलेली हिंदू समाजव्यवस्था समान आवश्यकता ,समान कार्य आणि समान क्षमतेचे श्रमिक यांना आधार मानीत नाही.डॉ.आंबेडकरांच्या मते,भारतीय समाजातील वर्ण व्यवस्था,जातीप्रथा आणि अस्पृश्यता अशा तीनही प्रकारच्या सामाजिक भेदांचे मूळ हिंदू धर्मग्रंथ हेच आहे.भारतीय समाजव्यवस्था ही पूर्णतः चातुर्वर्ण्य आणि जातीव्यवस्थेवर आधारलेली आहे.हिंदू समाजातील एका जातीने दुसऱ्या जातीशी कसे वागावे याची नियमावली कायद्याच्या स्वरुपात धर्मग्रंथात ग्रंथित केली आहे.महाकाय शक्तीच्या ब्रह्मंची कल्पना करून ब्रह्माच्या मुखातून ब्राह्मण,बाहुतून क्षत्रिय,मांड्यातून वैश्य आणि पायातून शुद्र जन्मास आले.या चार वर्णाच्या उत्पत्तीवरून त्यांचे व्यवसाय निर्माण झाले ते पुढीलप्रमाणे-

१)ब्राह्मण:- हा पुरोहितांचा वर्ग.अध्ययन व अध्यापन हे त्यांचे कार्य

२)क्षत्रिय:-हा सैनिकांचा वर्ग.समाजाचे रक्षण करणे हे त्यांचे कार्ये

३)वैश्य:-हा उत्पादक वा व्यापारी वर्ग.उत्पादन व व्यापार हे त्यांचे कार्य

४)शूद्र:-वरील तीनही वर्गाची सेवाचाकरी करणारा वर्ग

यानुसार प्रारंभिच्या काळात भारतीय समाजव्यवस्थेत चार वर्ण होते.परंतु काळाच्या ओघात त्या चार जाती बनल्या परंतु हे मत डॉ.आंबेडकरांना मान्य नाही.जातीव्यवस्था टिकून राहण्यासाठी पुढील चार गोष्टी जबाबदार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

१) विशिष्ट नियमांनी बद्ध असलेली हिंदूची धर्मश्रध्दा.
२) विवाहविषयक बंधने
३) खान-पान अथवा भोजनविषयक बंधने
४) व्यवसाय निवडीवर निर्बंध

जातीव्यवस्थेत काही जाती दुसऱ्या जातीपेक्षया श्रेष्ठ वा सर्वोच्च आहेत असे का मानले जाते? असा प्रश्न उपस्थित करूनही सर्वोच्चता पुढील दोन नियमांद्वारे निश्चित केली जाते असे स्पष्ट करतात.

अ)धार्मिकतेशी निगडीत सर्वोच्चता:-जातीचा जन्मच धर्मातून झाला असून धर्माचे तीन मार्ग त्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

१)धार्मिक विधी:-सर्व धार्मिक व उपनयन विधी करण्याचा अधिकार ज्या जातीला ती जात सर्वश्रेष्ट होय असे मानले जाते.

२)मंत्र:-वेदोक्त विधी आणि मंत्र म्हणण्याचा अधिकार ज्या जातीला ती जात श्रेष्ट मानली जाते.

३)पुरोहिताचा दर्जा:-ब्राह्मण ज्या जातीचे धार्मिक विधीसाठी करण्याचे निमंत्रण स्वीकारतात त्या जाती श्रेष्ठ आणि ज्यांचे आमंत्रण नाकारले जाते त्या कनिष्ठ मानल्या जातात.

ब)रूढी-परंपरेशी निगडीत सर्वोच्चता:-ब्राह्मण ज्या जातीचे अन्न घेतो त्या जाती श्रेष्ठ.ज्या जातीकडचे फक्त पक्के अन्नघेतो आणि ज्या जातीकडचे केवळ न शिजवलेले अन्न म्हणजे शिधाआटा घेतो त्या जाती अनुक्रमे कनिष्ठ मानल्या जातात.

सवर्ण हिंदू जातीचे दोन वर्ग आहेत.

१)द्विज जाती:-उपनयन विधी करण्याचा अधिकार असणाऱ्या जाती म्हणजे द्विज जाती होत.ब्राह्मण,क्षेत्रीय आणि वैश्य या द्विज जाती आहेत.

**प्रश्न क्रमांक ०२:-डॉ.आंबेडकरांचा अस्पृश्यतेच्या उत्पत्तीचा सिद्धांत लिहून अस्पृश्यतेच्या उत्पत्तीची करणे लिहा?**

उत्तर:- अस्पृश्य मुळचे कोण आहेत?आणि ते अस्पृश्य का बनले ?या दोन प्रश्नांशी सबंधित आजवर झालेल्या एतिहासिक संशोधन अहवालांचा परामर्श घेऊन डॉ.आंबेडकरांनी आपल्या सिद्धांताची मांडणी केली.आदिम समाजातून आधुनिक समाजाची उत्क्रांती होत असतांना दोन गट निर्माण झाले.

१)पहिला समूह म्हणजे एकाच ठिकाणी स्थायी झालेल्या लोकांचा समूह होय.या स्थायी समूहाला भटक्या लोकांच्या हल्ल्यापासून रक्षण करण्यासाठी काही माणसांची आवश्यकता होती.

२)दुसरा समूह म्हणजे पराभूत-वाताहत झालेल्या लोकांचा समूह .या समूहासमोर आपल्या जीवननिर्वाहाच्या गरजा कशा भागवाव्या आणि निवाऱ्यासाठी आश्रय कोठे घ्यावा अशी समस्या होती.

डॉ.आंबेडकरांच्या मते या दोन समूहात वाताहत झालेल्या लोकांनी स्थायी लोकांच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारली तर स्थायी समूहांनी वाताहत झालेल्या लोकांना अन्नधान्य व आश्रय देण्याचे मान्य केले.त्यानंतर स्थायी लोकांनी गावे वसविली तर वाताहत झालेले लोक गावाबाहेर वस्त्यांमध्ये राहू लागले.डॉ.आंबेडकरांनी"वाताहत झालेले लोक म्हणजेच अस्पृश्य असा सिद्धांत मांडला.

त्यांच्या मते:-

१)प्रत्येक गावात महार लोक आढळतात.

२)त्यांची वस्ती ही गावकुसाबाहेर असते.

३) त्या गावाची निगराणी करण्याचे काम आळीपाळीने महार करतात.

४) हिंदू गावकऱ्यांकडून या महारांना ५२ प्रकारचे हक्क मिळाले होते. यामध्ये धान्य व शिळे अन्न गोळा करणे तसेच मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावण्याचा हक्क इत्यादी.

वरील गोष्टीवरून अस्पृश्य हे वाताहत झालेले लोक आहेत हे सिद्ध होते,असे डॉ.आंबेडकर म्हणतात. त्यांच्या मते-
१)अस्पृश्य हे सुरवातीपासून गावाच्या बाहेर राहत होते कारण ते वाताहत झालेले लोक असून ते स्थायी झालेल्या लोकांपेक्षा वेगळ्या टोळ्यांमधील होते.२)अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या सध्याच्या अस्पृश्यांचे पूर्वज हे अस्पृश्य नव्हते तर ते स्थायी गावकऱ्यांच्या बरोबरीचे होते.त्यांच्यात आणि गावकऱ्यांमध्ये केवळ"भिन्न टोळीतील लोक"असाच भेद होता.

ब) अस्पृश्यतेच्या उत्पत्तीची कारणे:-

वंशभेद आणि व्यावसायिक भेद या दोन आधारावर अस्पृश्यतेची निर्मिती झाली असा सिद्धांत स्टॅनले राईस ने मांडला होता परंतु हा सिद्धांत डॉ.आंबेडकर पूर्णपणे अमान्य करतात.त्यांच्या मते अस्पृश्य म्हणजे वाताहत झालेले लोक असून अस्पृश्यतेच्या निर्मितीची दोन करणे सांगतात.

१)वाताहत झालेल्या लोकांविषयी घृणा व तिरस्काराची भावना हे अस्पृतेच्या निर्मितीचे पहिले कारण आहे.

२)ब्राह्मणांनी गोमांस भक्षणावर बंदी आणल्यानंतरही वाताहत झालेल्या समूहाने गोमांस भक्षण सुरूच ठेवले,म्हणून त्यांना अस्पृश्य ठरविण्यात आले.

**प्रश्न क्रमांक ०३:-डॉ.आंबेडकरांचे जातीव्यवस्थेचे निर्मुलनविषयक विचार लिहून जातीव्यवस्थेचे काही ठळक दुष्परिणाम लिहा?**

उत्तर:-जातीव्यवस्थेचे निर्मुलन कोणत्या पद्धतीने करावे,यासंबंधी डॉ.आंबेडकरांनी मांडलेले विचार पुढीलप्रमाणे-

१)आंतरजातीय विवाह:-या संदर्भात ते म्हणतात की,"रक्तसंबंधातूनच आपुलकीची भावना निर्माण होणे आवश्यक आहे.या नातेसंबंधाच्या भावनेशिवाय जातीने निर्माण केलेली विभक्तपणाची आणि परकेपणाची भावना कधीच नष्ट होणार नाही".म्हणून आंतरजातीय विवाह हाच जाती मोडून काढण्याचा खरा उपायआहे.

२)जातीवाद नष्ट करण्यासाठी प्रथम पोटजाती नष्ट कराव्यात:-पोटजाती नष्ट केल्यामुळे मोठ्याआकाराच्या जातीगटातील एक्यभावात वाढ होईल.असा एक्यभाव निर्माण झाल्यामुळे केवळ मोठा आकार असणारे जातिगत राहतील.

३)आंतरजातीय सहभोजन:-सहभोजनाच्या निमित्याने विभिन्न जातींचे गट एकमेकांच्या मांडीला-मांडी लाऊन बसतील त्यामुळे त्यांच्या मधील श्रेष्ठ-कनिष्ठ भावना कमी होऊन सहकार्य वाढेल.परंतु सहभोजनाने स्वजातीची वृत्ती नष्ट होईल असे डॉ.आंबेडकरांना वाटत नव्हते.

जातीव्यवस्थेचे
काही ठळक दुष्परिणाम:-

१)मानवी मूल्यांच्या विरोधी:-डॉ.आंबेडकरांच्या मते,जातीव्यवस्था ही सामाजिक समता,बंधुता आणि स्वातंत्र्याला घातक असून ती मानवी मूल्याच्या विरोधी आहे.

२)हिंदू समाजात संघटनांचा अभाव:-डॉ.आंबेडकर म्हणतात,"जोपर्यंत जाती जिवंत राहतील तोपर्यंत हिंदूमध्ये संघटनेची आशा नाही आणि जोपर्यंत संघटन नाही तोपर्यंत हिंदू हे दुर्बल व लाचार राहतील."

३)वैरभावाची जोपासना:-पूर्वीच्या काळी एका जातीच्या लोकांनी दुसऱ्या जातीच्या लोकांवर केलेला अन्याय त्या जातीमधील नंतरची पिढी विसरत नसल्याने पिढ्यानपिढ्या संघर्ष टिकून राहतो.

४)पृथकतेची भावना:-जाती-जातीतील श्रेष्ठ-कनिष्ठतेमुळे एक जात दुसऱ्या जातीपासून स्वतःला पृथक ठेवण्याचा प्रयत्न करते.एक जात दुसऱ्या जातीचा द्वेष करीत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेले शत्रुत्व हा जातीपद्धतीचा दुष्परिणाम आहे.

५)एकात्मतेच्या निर्मितीमधील अडसर:-प्रत्येक हिंदूला जी काही एकत्वाची जाणीव आहे ती केवळ स्वतःच्या जातीसंबंधी आहे,संपूर्ण समाजासंबंधी नाही.

६)श्रमिकांचे विभाजन:-श्रमाच्या विभाजनाबरोबर श्रमिकांचेही विभाजन जातीसंस्थेत केल्यामुळे सर्व श्रमिक सारखे नाहीत.त्यांच्यात श्रेष्ठ –कानिष्ठत्वाची भावना जातीसंस्थेने निर्माण केली आहे.

७)परिवर्तनाच्या प्रक्रियेतील अडसर:-डॉ.आंबेडकर म्हणतात,"तुमच्या आवडीप्रमाणे कोणत्याही दिशेने पळा,हा जातीचा राक्षस रस्ता रोखून बसला आहे.त्याला ठार मारल्याशिवाय तुम्हाला आर्थिक अथवा राजकीय सुधारणा कधीही प्राप्त होऊ शकणार नाहीत आणि हेच परिवर्तनाची गती मंद असण्याचे मुलभूत कारण आहे.

डॉ.आंबेडकरांनी जातिव्यवस्थेसारख्या गुंतागुंतीच्या व्यवस्थेचे अत्यंत तर्कशुद्ध,मुद्देसूदपणे व पुराव्यांचा आधार घेऊन त्यांनी विश्लेषण केले आहे.बुद्धीप्रामान्यता,नितीमत्ता तसेच स्वान्त्र्य,समता आणि बंधुता यांच्या विसंगत असे धर्मात काहीही असता कामा नये हा त्यांचा कटाक्ष त्यांनी कधीच सोडला नाही..

# डॉ.जी.एस.घुर्ये

**(1893-1983)**

**प्रश्न क्रमांक-०१:-डॉ.जी.एस.घुर्ये यांनी सांगितलेली जातीव्यस्थेची वैशिष्ट्ये लिहा?**

उत्तर:-जातीसामुहांतर्गत विवाह आणि जातीनुसार पारंपरिक व्यवसाय ही जातीव्यवस्थेची ठळक लक्षणे असल्याचे सुमारे २३०० वर्षापूर्वी लिहिलेल्या'इंडिका'या ग्रंथात मेगॅस्थनिसने नमूद केले आहे.डॉ.घुर्ये यांनी जातीची पुढील वैशिष्ट्ये सांगितले आहेत.

१)श्रेष्ठ-कनिष्ठतेवर आधारित श्रेणीरचना:-व्यक्तीला तिच्या जन्मापासून चिकटणारी जात ही त्या व्यक्तीचा मृत्यू होईपर्यंत कायम असते.ब्राह्मण,राजपूत,सोनार,मराठा या चार जातींचा श्रेष्ठ वा उच्च जातींच्या श्रेणीमधील क्रम कोणता?हे निश्चित करण्याचे संपूर्ण भारतासाठी आणि सर्वांना मान्य असणारे एक समान स्वरूपाचे तत्व वा सूत्र नाही.कनिष्ठ जातींना वरीष्ठ जातींच्या शेजारी बसण्याची अनुमती नसल्यामुळे त्यांच्यात सामाजिक दुरत्वाची अथवा परात्मतेची भावना विकसित झाली.म्हणूनच श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या जातीय स्तररचनेत सामाजिक ताठरता,दुय्यम वागणूक देण्याची पद्धती,सामाजिक दूरत्व,अलगीकरण इत्यादी अनेक घटकांचा समावेश होतो असे डॉ.घुर्ये स्पष्ट करतात.

२)विवाहावरील निर्बंध:-जातीअंतर्गत विवाहाचा नियम हा जातीव्यवस्थेचा मूळ गाभा आहे असे डॉ.घुर्ये मानतात.जातीअंतर्गत विवाहाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याची दखल गावपंचायतही घेत असे.या नियमांचे उल्लंघन करण्यामधून 'अनुलोम'व'प्रतिलोम'हे विवाहाचे प्रकार निर्माण झाले.त्यातून काही नवीन जाती व उपजाती निर्माण झाल्या आहेत.

३)सामाजिक व्यवहार आणि रोटी व्यवहारावरील निर्बंध:-वरिष्ठ जातीच्या लोकांनी कनिष्ठ जातीतील लोकांच्या घरी कच्चे अन्न खाऊ नये या बंधना बरोबरच न शिजवलेले अन्नपदार्थ म्हणजे तांदूळ,डाळी,तेल,तूप,साखर,गहू किंवा कणिक आदी पदार्थ कनिष्ठ जातीच्या लोकांकडून स्वीकारण्याची अनुमती ब्राह्मण जातीला देण्यात आली.रोटी व्यवहार आणि सामाजिक व्यवहार यावर निर्बंध घालण्यामागचे मूळ कारण विटाळाची कल्पना,पवित्र-अपवित्र वा शुद्ध-अशुद्धतेचे तत्व आहे.अस्पृश्य मानल्या जातीबरोबर उच्च मानल्या जातींनी संबंध ठेऊ नये अशी बंधने घालण्यात आली.

४)व्यवसाय निवडीवरील निर्बंध:-ज्या जातीत व्यक्तीचा जन्म झाला असेल त्या जातीचा परंपरेनुसार निश्चित झालेला व्यवसायच तिला सक्तीने करावा लागत असे.तसेच व्यवसायानुसार जातींचे श्रेष्ठ व कनिष्ठ जातींमध्ये विभाजन झाले.पुरोहिताचा व्यवसाय व अध्यापनाची कार्ये ही फक्त ब्राह्मण जातीच्या लोकांनीच करावीत,अन्य कोणत्याही जातीच्या लोकांनी करू नये अशी धारणा समाजात विकसित झाली.हस्तव्यवसाय हे विभिन्न जातींसाठीचे आनुवंशिक उद्योग मानण्यात आले.व्यवसाय भिन्नतेतून अनेक उपजाती निर्माण झाल्या.

५)भारतीय समाजाचे खंडात्मक विभाजन:-सदस्यांची एकून संख्या या दृष्टिने कुटुंब,कुळ,गोत्र,उपजात आणि त्यानंतर जात असा चढता क्रम आहे.कुळ किंवा गोत्र म्हणजे आपला मूळपुरुष एकच असून आपण त्यांचा वंशविस्तार आहोत असे मानणाऱ्यालोकांचा समूह होय.एका गोत्रातील स्त्री-पुरुष भाऊ-बहिण असल्यामुळे विवाहसंबंध निषिद्ध मानले जातात.भारतीय समाजामध्ये लहान-लहान गटामध्ये विभाजित झालेल्या अशा जातीगटांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे भारतीय समाजाचे खंडात्मक विभाजन झाले आहे.

६)नागरी व धार्मिक हक्कांची विषम वाटणी:-काही जातींना अधिकार नाकारण्यात आले तर काही जातींना विशेष अधिकार देण्यात आले.स्त्रियांनी लुगडे कसे नेसावे आणि पुरुषांनी धोतर कसे नेसावे याबाबतही उच्च आणि कनिष्ठ जातींबाबतचे नियम वेगवेगळे होते.गावात कनिष्ठ जातीच्या लोकांची घरे वरिष्ठ जातींच्या निवासस्थानापासून वेगळी व दूर ठेवण्यात आली.

**प्रश्न क्रमांक ०२:-डॉ.घुर्येंचे उपजातीच्या उदयाबाबतचे विचार लिहून जाती व उपजाती निर्मितीस कारणीभूत असणारे घटक लिहा?**

उत्तर:-एका जातीसमुहंतर्गत असणाऱ्या सर्व उपजातीसमुहांमध्ये विवाह व खानपान याबाबतच्या नियमांचे कठोरपणे पालन केले जातेच असे नाही.दुसरे म्हणजे एक प्रमुख जात व तिच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व उपजाती या दोन्ही समूहांमध्ये समान स्वरूपाच्या प्रथा,परंपरा,चालीरीती आढळून येतात.जन्म,मृत्यू व विवाह या मानवी जीवनातील तीन महत्वपूर्ण प्रसंगी पाळले जाणारे धार्मिक-सांस्कृतिक रीतीरिवाज जाती व उप्जातींमध्ये समान असतात.स्वतंत्र जातीच्या दर्जा प्राप्तीसाठी पहिली गोष्ट म्हणजे उपजाती समूहाचा आकार पुरेसा मोठा असल्याशिवाय तो गट अंतर्विवाही गट होऊ शकत नाही .दुसरी गोष्ट म्हणजे उपजाती समूहाचीअन्य उपजाती समूहांपेक्षा वेगळी असणारी आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक वैशिष्ट्ये महत्वपूर्ण असली पाहिजेत.महाराष्ट्रात माळी या जातीअंतर्गत फुलमाळी,फुले,लिंगायत माळी,वनमाळी,बागवान,सावता माळी,हळदे,कडू,जिरे इत्यादी उपजातीचा व्यवसायानुसार उदय झाला आहे.

जाती व उपजातीच्या निर्मितीस कारणीभूत असणारे घटक:-

१)मिश्र विवाह:-डॉ.घुर्ये यांनी भारतीय लोक हे(१)भारतीय आर्य,(२)पुर्वद्रविड,(३ )द्रविड,(४)पश्चिमी,(५)मुंडा (६)मंगोल अशा सहा वांशिक गटात विभाजित केले आहेत.डॉ .घुर्येंच्या मते ,वंश आणि अनुलोम विवाहाची पद्धती हे मुख्यत्वे जातीच्या उत्पत्तीचे कारण आहे.वेगवेगळ्या वांशिक समुदायातील वधू-वरांमध्ये वैवाहिक संबंध प्रस्थापित केल्यास प्रजननशास्त्राच्या आधारानुसार संमिश्र स्वरुपाची शारीरिक गुणवैशिष्ट्ये पुढील संततीत उतरत असतात.अशा संमिश्र स्वरुपाच्या शारीरिक गुणवैशिष्ट्यांच्या आधारावर अनेक उपजाती व पोटजाती निर्माण झाल्या आहेत असे डॉ.घुर्ये म्हणतात.अनुलोम-प्रतिलोम विवाहातून निर्माण झालेल्या अपत्यांची एक उपजात निर्माण होते असे घुर्ये म्हणतात.

२)व्यावसायिक भिन्नता:-प्रत्येक जातीचा एक विशिष्ट असा परंपरागत व्यवसाय होता .एकाच व्यावसायिक समुदायात विशिष्ट साधनांचा अवलंब करण्यामधून एकाच जातीच्या अनेक पोटजाती निर्माण झाल्या .उदा .तेलाची घाणी चालविण्यासाठी किती बैलांचा उपयोग केला जातो यावरून एक बैल तेली ,दोन बैल तेली अशा उपजाती निर्माण झाल्या .यानुसार श्रमविभाजनाच्या तत्त्वांपेक्षा व्यावसायिक भिन्नता व व्यवसायाचे विशेषीकरण हे पोटजाती निर्माण होण्याचे प्रमुख कारण आहे असे डॉ.घुर्ये म्हणतात .

३)धार्मिक चळवळी :-उत्तर भारतात वैष्णव पंथीयांच्या चळवळीतून'बिष्णोई 'ही जात उदयास आली .शिव पंथीयांच्या चळवळीतून 'लिंगायत 'ही जात उदयास आली .

४)आहारविषयक संकल्पना व रीतीरिवाज :-बेरड समाजात डुक्कर ,बैल व म्हैस यांचे मांस खाणाऱ्यांना 'काळे बेरड 'आणि ते न खाणाऱ्यांना 'पांढरे बेरड 'या नावाने ओळखले जाते .गाई –बैल' यांचे मांस न खाणारा जातीसामूह 'कातकरी' या नावाने ओळखला जातो तर गाई –बैलांचे मांस खाणारा जातीसामुह 'ढोर 'या नावाने ओळखला जातो .यानुसार आहार विषयक संकल्पना अनेक पोटजाती वा उपजाती निर्माण होण्यास कारणीभूत ठरली आहे असे घुर्ये म्हणतात .

५)प्रादेशिक अलगता व भिन्नता :;-ब्राह्मण या जातीत कोकणस्थ ,देशस्थ ,कऱ्हाडे ,कनौजी या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या उपजाती वा पोटजाती निर्माण झाल्या आहेत .भारतात प्रादेशिक तत्वावर आधारलेल्या पोटजाती व उपजातींची संख्या प्रत्येक मोठ्या जातीसमुहात आढळून येते डॉ .घुर्ये स्पष्ट करतात.

६)धार्मिक पंथ व उपपंथ :-मुस्लीम धर्मात शिया व सुन्नी हे दोन पंथ निर्माण झाले .जैन धर्मात श्वेतांबर व दिगंबर आणि बौद्ध धर्मात हीनयान व महायान असे दोन पंथ निर्माण झाले .हिंदू धर्मात शैव व वैष्णव असे दोन प्रमुख संप्रदाय उदयास आले .याशिवाय साधुसंतांच्या प्रभावातून वारकरी पंथ ,रामदासी पंथ ,कबीर पंथ असे विभिन्न धर्मपंथ निर्माण झाले .

**प्रश्न क्रमांक ०३ :-डॉ .घुर्ये यांचा जातिव्यवस्थेच्या उत्पत्ती संबंधीचा प्रजातीय सिद्धांत लिहा ?**

उत्तर :-डॉ .घुर्ये यांच्या मते ,इ .स .पूर्व २००० च्या सुमारास भारतात आलेल्या आर्यांमधील ब्राह्मण वर्गाचे लोक हे अत्यंत बुद्धिमान आणि साहसी होते .त्यांनी गटांतर्गत विवाहाचे नियम विकसित केले .शूद्रांना म्हणजे अनार्यांना इतर वर्णापासून पूर्णतः वेगळे केले . ब्राह्मण हे संपूर्ण समाजाचे पालक बनले.जातिव्यवस्थेच्या निर्मितीमध्ये व्यवसाय भिन्नता आणि चातुर्वर्ण्य व्यवस्था या दोन घटकांच्या योगदानाचे वर्णन आपल्या सिद्धांतात डॉ .घुर्ये करतात .ब्राह्मण,क्षत्रिय ,वैश्य आणि शुद्र हे चारही वांशिक घटक वर्ण व्यवस्थेच्या निर्मितीला जबाबदार आहेत .अनुलोम

विवाहाला दिलेल्या माण्यतेतून वर्णसंकर निर्माण झाले .त्यांचा समावेश कोणत्या वर्णात करावा यामुळे देखील नवनवीन जातीगटांचा उदय होण्यास हातभार लागला असे डॉ .घुर्ये म्हणतात .याचा अर्थ वंश,जन्म व अनुलोम विवाहाची निर्मिती मुख्यत्वे जातीच्या उत्पत्तीचे कारण आहे .ब्राह्मणांनी वांशिक शुद्धता राखण्याकरिता जे प्रयत्न केले ,त्यातून जातीची उत्पत्ती झाली .भारतातील जातीसंस्था हे इंडो –आर्यन संस्कृतीचे ब्राह्मणांकडून उत्पन्न झालेले अपत्य आहे आणि ते गंगेच्या व यमुनेच्या भूमीत वाढले व तेथून भारताच्या इतर प्रदेशात नेण्यात आले .यातून अनेक जातीनिर्मितीला प्रोत्साहन मिळाले .भारतीय समाजाचे पारंपरिक व सांस्कृतिक स्वरूप अभ्यासल्याशिवाय त्यातील सामाजिक वास्तवता लक्षात येत नाही .भारतीय तत्वज्ञान हे व्यक्तिप्रधान नसून ते समूह प्रधान आहे .ते धार्मिक मूल्यांना अग्रक्रम देते .डॉ .घुर्ये यांनी भारतीय समाजातील सामाजिक संस्थांचे अध्ययन भारतीय इतिहास ,पुराने ,धर्मग्रंथ व सामाजिक शास्त्रांच्या आधारे केले .त्यांच्या लिखाणात इतिहास ,मानवशास्त्र व समाज शास्त्रीय परंपरा विद्यमान आहेत .

# युनिट क्रमांक ०२
# भारतीय दृष्टीकोनातून सामाजिक परिवर्तन
# (Social change from Indian Perspective)

सामाजिक परिवर्तनाचे सांस्कृतिक दृष्टिकोनातून अध्ययन करणाऱ्यांमध्ये डॉ .एम.एन.श्रीनिवास आणि योगेंद्रसिंग हे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे ख्यातीप्राप्त अभ्यासक आहेत .एम.एन.श्रीनिवास यांनी भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाचे सांस्कृतिक दृष्टिकोनातून अध्ययन करण्यासाठी संस्कृतीकरण ,पाश्चीमात्यीकरण ,धर्मनिरपेक्षीकरण या संकल्पना विकसित केल्या याशिवाय त्यांनी संरचनात्मक –प्रकार्यवादी दृष्टिकोनातून रामपुरा या खेड्याचे अध्ययन केले .या अध्ययनाच्या आधारे त्यांनी प्रबळ वा प्रभावशाली जात ही संकल्पना मांडली .योगेंद्र सिंग यांनी भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाचे अध्ययन करण्यासाठी लघु परंपरा व बृहत परंपरा या संकल्पना विकसित केल्या .भारतातील समाजशास्त्रीय परंपरेत सामाजिक परिवर्तनाचे मार्क्सवादी विचारसरणी नुसार समाजशास्त्रीय अध्ययनाचा प्रारंभ करणाऱ्यांपैकी डी .पी.मुखर्जी हे एक आहेत .

## डॉ .एम.एन.श्रीनिवास
## (१९१६ ते १९९९ )

================================================================================

**प्रश्न क्रमांक ०१:-प्रभावशाली जात संकल्पना स्पष्ट करून तिच्या निर्मिती बाबतचे घटक व परिणाम लिहा.**

उत्तर:-डॉ .एम.एन.श्रीनिवास यांनी रामपुरा या गावात जवळ-जवळ एक वर्ष राहून संशोधन –अध्ययनाचे कार्य केले .''जात हा एक आनुवंशिक ,आंतर्विवाही आणि पारंपरिक मूल्यांचे जतन करणारा समूह आहे .''अशी जातीची व्याख्या त्यांनी केली आहे .डॉ . खेड्यामधील अन्य जातीगटांच्या तुलनेत ज्या जातिगटाला सामाजिक ,आर्थिक ,राजकीय इत्यादी क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करणे शक्य होते ,त्या जातीगटाला संबोधण्यासाठी डॉ .एम.एन.श्रीनिवास यांनी प्रभावशाली जात ही संज्ञा वापरली आहे .कोणती जात प्रभावशाली आहे हे त्या खेड्यामधील परिस्थितीवर अवलंबून असते .सोप्या शब्दात ,जवळपासच्या दोन खेड्यांमध्ये दोन वेगवेगळ्या जातीगटांना प्रभावशाली जात असे स्थान मिळालेले असू शकते .१९७४ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'या शोध निबंधात प्रभावशाली जात या संकल्पनेची सुव्यवस्थित मांडणी केली आहे .

अ ) प्रभावशाली जातीच्या निर्मितीबाबतचे घटक :-

१)जातींच्या श्रेणी परंपरेत उच्च स्थान :-महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मराठा ,कुणबी ,माळी यासारख्या जातीगटातील काही घराण्यांची सत्ता आजही कायम असल्याचे दिसून येते.दुसरीकडे मागासवर्गीय जातीच्या कुटुंबावर विभिन्न प्रकारचे अन्याय होत असल्याचेही दिसून येते .याचा अर्थ काही खेड्यांमध्ये पारंपरिक दृष्ट्या उच्च जातीच्या कुळांची सत्ता आहे.

२)शिक्षण :-भारतात आजही खेड्यामध्ये काही जातीसामूह हे शिक्षणाबाबत माघारलेले आहेत .शिक्षणामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात व राहणीमानाच्या दर्जातही वाढ होते .उच्चविद्याविभूषित व्यक्तीला खेड्यामध्ये सन्मान दिला जातो .

३)राजकारणातील सक्रियता :-राजकीय दृष्ट्या उदासीन असणाऱ्या व्यक्तींची संख्या नागरी आणि ग्रामीण समुदायात बरीच मोठी आहे .काही जातीसमुह राजकीय पक्षापेक्षा स्वजातीचा सदस्य या आधारावर उमेदवारांना ,नेत्यांना ,राजकीय पक्षांना पाठींबा देतात .राजकारणातील सक्रियता एखाद्या जातीला प्रभावशाली जात असा दर्जा मिळून देऊ शकतात .

४)नोकरी आणि आर्थिक स्त्रोत:-खेड्यामधील जातीगटामध्ये शेतकरी किंवा इतर जातीगटांच्या तुलनेत सरकारी नोकरी करणारा गट अधिक प्रभावी असतो .दूध ,अंडी ,फळे ,भाजीपाला यासारख्या कृषी मालाची शहरामध्ये विक्री करून उत्पन्न मिळविणारे लोक शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर गुजराण करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत असतात .

५)शेतजमिनीची मालकी :-आज अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या वाढली आहे .भूमिहीन शेतमजुरापेक्षा अल्पभूधारक शेतकऱ्याला गावामध्ये अधिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते .एका खेड्यामध्ये विविध जातींचे लोक राहत असले तरी गावातील लागवडी योग्य जमिनीवर एखाद्या जाति गटाचा प्रभाव असू शकतो .

६)लोकसंख्यात्मक आधिक्य :-मोठ्या आकाराच्या जातिगटाजवळ राजकीय ,आर्थिक ,सामाजिक अशा सर्व क्षेत्रांमधील सत्तांचे केंद्रीकरण झालेले असते .कारण संख्याबळाच्या आधारावर ग्रामपंचायत ,पंचायत समिती ,सहकारी संस्था व संघटनांची सत्तासूत्रे त्या जातिगटाच्या हातात केंद्रित होतात .तर काही खेडी ही त्या जाती गटाच्या नावावर ओळखली जातात.

७)संपूर्ण गावाचे कल्याण करण्याचे कार्य:-प्रभावशाली जातीला गावातील काही गोरगरीबांसाठी कल्याणकारी कार्य करावी लागतात .सर्वसामान्य गावकऱ्यांच्या मनात त्यांच्यावर अन्याय होत आहे अशी भावना निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी लागते त्यामुळे त्या जातीचा प्रभाव कायम राहतो .

ब ) प्रभावशाली जातीचे परिणाम :-

१)आर्थिक क्षेत्र :-एकाच जातीच्या संचालकांची सर्वाधिक संख्या असणाऱ्या नागरी बँका ,सहकारी संस्था ,उद्योग –व्यापारी संघटना निर्माण झाल्या आहेत .काही कामगार संघटनांमध्ये ही प्रभावशाली जात या समूहाने शिरकाव करून त्या कामगार संघटनेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले असल्याचेही दिसून येते .

२)राजकीय क्षेत्र :-स्वातंत्र्योत्तर काळात देखील जात हा राजकीय नेतृत्वाचा एक प्रमुख आधार आहे .काही जातीसमूहाने ग्रामपंचायतीत सरपंच ,उपसरपंच ,जिल्हा परिषदेतील अध्यक्ष ,उपाध्यक्ष अशी पदे वर्षानुवर्ष आपल्या ताब्यात ठेवली .आजही काही पदे ही फक्त नाममात्र दिल्या गेलेली दिसून येतात .

३)सामाजिक –सांस्कृतिक क्षेत्र :-तालुका ,जिल्हा ,प्रदेश या स्तरावर एका जातीचे सर्व लोक एकमेकांना ओळखत नाहीत .म्हणूनच जाती –जातीची संघटने किंवा संस्था वा संघटना निर्माण झाल्या असल्याचे दिसून येते .वधू –वर परिचय मेळावे ,लग्न कार्यालये ही काही जातींची निर्माण झाली आहेत .

ग्रामीण नेतृत्व समजून घेण्यासाठी समाजशास्त्राच्या अभ्यासकांचा कल प्रभावशाली जातीच्या अध्ययनाकडे सतत वाढत आहे .ग्रामीण भागात प्रभावशाली जात मतदानाची दिशा निर्धारित करण्यात समर्थ असल्यामुळे राजकीय पक्ष प्रभावशाली जातीवर लक्ष ठेवून असतात.

**प्रश्न क्रमांक ०२:-संस्कृतीकरणाची संकल्पना स्पष्ट करून संस्कृतीकरणाची वैशिष्ट्ये लिहा ?**

उत्तर:-संस्कृतीकरण,पाश्चीमात्यीकरण,धर्मनिरपेक्षीकरण या संकल्पनांच्या सहाय्याने भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचे समाजशास्त्रीय स्वरूप एम.एन.श्रीनिवास यांनी स्पष्ट केले आहे .दक्षिण भारतातील डोंगराळ भागात राहणाऱ्या ‘कूर्ग ‘समाजाच्या धार्मिक व सामाजिक जीवन पद्धतीचे अध्ययन केल्यानंतर १९५५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका शोधनिबंधात त्यांनी संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेचे सविस्तर प्रतिपादन केले आहे .कनिष्ठ सामाजिक दर्जा असणारा जातीसमूह आपल्यापेक्षा वरिष्ठ जातीच्या काही आचरण व्यवहारांचे ,कृतीचे ,विश्वासाचे अनुकरण करतो .तसेच वरिष्ठ जातीचा दर्जा प्राप्त करण्यासाठी स्वतः मध्ये काही बदल करतो तेव्हा त्यास संस्कृतीकरण असे म्हणतात .

व्याख्या :-‘संस्कृतीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्यात कनिष्ठ समूह वरिष्ठ सामाजिक दर्जा असणाऱ्या जातीला संदर्भ समूह मानून आपल्या प्रथा ,परंपरा ,विश्वास ,श्रद्धा आणि जीवनरीतीमध्ये परिवर्तन करतात’.

दक्षिण भारतात शुद्र लोक मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण जातीची नावे ठेवतात ,असे आंद्रे बेते यांनी म्हटले आहे .योगेंद्र सिंग हे संस्कृतीकरणाला ‘विचार प्रणाली ग्रहण करणारी प्रक्रिया असे मानतात .

**संस्कृतीकरणाची वैशिष्ट्ये :-**

१)संस्कृतीकरण केवळ हिंदू जातीपुरते मर्यादित नाही :-पश्चिम भारतातील भिल्ल ,मध्य भारतातील गोंड ,ओरांव आणि आणि हिमालयातील पहाडी लोकांनी हिंदूंच्या जीवनपद्धतीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे आणि स्वतःला हिंदू मानु लागले आहेत .

२)आर्थिक सुधारणा ही अट नाही :-ज्यां ना राजकीय व आर्थिक शक्ती प्राप्त होती ,परंतु धार्मिक दृष्ट्या ज्या जातींना श्रेष्ठ दर्जा प्राप्त झाला नव्हता अशा जातीतच संस्कृतीकरण झाले आहे .

३)संस्कृतीकरणाचा संबंध निम्न जातींशी आहे :-निम्न जाती उच्च जातींच्या प्रथांचे ,शिष्टाचारांचे ,राहणीमानाचे ,आदर्शांचे ,मूल्यांचे ,परंपरांचे अनुकरण करून आपले स्थान उंचावण्याचा प्रयत्न करतात आणि ही प्रवृत्ती निम्न जातींची असते .

४)सार्वभौमिक प्रक्रिया :-डॉ.योगेंद्र सिंह हे संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेला अग्रीम सामाजीकरण म्हणतात .अर्थात यामध्ये एक खालची जात एखाद्या उच्च जातीच्या संस्कृतीला या आशेने स्वीकारते की तिला त्या विशिष्ट जातीत सामावून घेतले जाईल .

५)प्रभावशाली जातीची भूमिका :-जी जात जेथे प्रभावशाली असते ,त्या जातीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न इतर जाती करू लागतात .या प्रभावशाली जातीचा दबदबा ,महत्व ,धाक ,रुबाब यामुळे इतर जातींचे लोकही प्रभावित होतात .अन्य जाती प्रभावशाली जातीला 'संदर्भ समूह'या रुपात पाहतात व स्वतः त्या प्रमाणे बदलण्याचा प्रयत्न करतात .

६)संस्कृतीचा स्वीकार :-जेव्हा एखाद्या जातीचे संस्कृतीकरण होते तेव्हा तो एखाद्या उच्च जातीच्या प्रथा ,परंपरा ,जीवनपद्धतीलाच स्वीकारत नाहीत तर संस्कृत साहित्यात उपलब्ध काही नवीन विचार आणि मुल्यांचा देखील स्वीकार करतो .उदा .पाप-पुण्य,स्वर्ग –नरक ,माया ,संसार ,मोक्ष इत्यादी.

७)द्विमार्गी प्रक्रिया :-श्रीनिवास म्हणतात ,संस्कृतीकरणाची प्रक्रिया ही द्विमार्गी प्रक्रिया आहे.अर्थात यामध्ये नेहमीच निम्न जाती उच्च जातीची संस्कृती स्वीकारते असे नाही ,तर कधी –कधी उच्च जाती देखील निम्न जातींची संस्कृती किंवा त्यातील काही तत्वांचा स्वीकार करतात.

**प्रश्न क्रमांक ०३;-पाश्चीमात्यीकरण व आधुनिकीकरण संकल्पना स्पष्ट करा ?**

उत्तर :-१) पाश्चीमात्यीकरण:- स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटीशांच्या वसाहतवादामुळे भारतीय जीवनातील सर्व घटकांमध्ये परिवर्तन घडून आले.१५० वर्षांच्या वसाहतवादाच्या समाप्तीनंतरही पाश्चीमात्यीकरणाचा प्रभाव चालू राहिला .परिणामस्वरूप भारतीय समाज आणि भारतीय संस्कृती यात जातीव्यवस्था ,कौटुंबिक संरचना ,विवाह ,धार्मिक कर्मकांड ,संगीत ,साहित्य ,विचार ,आदर्श .उद्देश ,मुल्ये ,उत्पादन पद्धती तसेच भारताच्या राजकीय ,प्रशासनिक ,धार्मिक व आर्थिक क्षेत्रात परिवर्तन झाले .कुटुंब ,विवाह ,आप्तसंबंध ,बलुतेदार पद्धती आणि सामाजिक संस्थां मध्ये परिवर्तन झाले .शिक्षणाच्या क्षेत्रात व सामाजिक स्तरीकरणात परिवर्तन झाले .मानवतावादी मुल्यांची स्थापना झाली .श्रीनिवास यांच्या मते ,पाश्चीमात्यीकरणाने हिंदूंच्या जीवनात संस्कृती करणाला गती मिळाली .

२)आधुनिकीकरण :-ब्रिटीशांच्या शासनकाळात आपल्या देशात जी आधुनिकता आली ,त्यामध्ये विवेक आणि मानवतावाद पर्याप्त मात्रेत होते .कोणत्याही पाश्चात्य देशाच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्कामुळे एखाद्या गैरपाश्चात्य देशात होणाऱ्या परिवर्तनाला आधुनिकीकरण असे म्हटले जाते .स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाहीची स्थापना,संविधानाने नागरिकांना दिलेले मुलभूत अधिकार ,प्रौढ मताधिकार ,नवीन कायदे ,धर्मनिरपेक्षीकरणय यांनी आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला गतिशील केले .श्रीनिवास यांनी आधुनिकतेत पुढील बाबींचा समावेश केला आहे .१)वाढत्या प्रमाणावरील शहरीकरण २)साक्षरतेचा प्रसार ३)दरडोई उत्पन्नात वाढ ४)प्रौढ मताधिकार ५)तर्काचा विकास .

# धूर्जटी प्रसाद मुखर्जी(डी.पी.मुखर्जी )
## (१८९४-१९६२)

================================================================================

**प्रश्न क्रमांक ०१:-ऐतिहासिक भौतिकवाद स्पष्ट करून मार्क्सवाद आणि डी .पी .मुखर्जी यांच्या विचारतील फरक स्पष्ट करा ?**

उत्तर:-ऐतिहासिक दृष्टीकोन हा देखील समाज व संस्कृतीचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्याचा एक दृष्टीकोन आहे .समाजशास्त्रात ऐतिहासिक दृष्टीकोन हा 'ऐतिहासिक समाजशास्त्र 'या नावाने देखील संबोधिला जातो .ऐतिहासिक द्वंद्ववाद हे डी.पी.मुखर्जीचे भारतीय समाजशास्त्रातील महत्वाचे योगदान आहे .त्यांनी भारतीय संस्कृतीचे आणि भारतीय समाज जीवनातील वास्तवाचे ऐतिहासिक द्वंद्वात्मक पद्धतीने विश्लेषणात्मक अध्ययन केले .भारतीय समाजशास्त्रात ऐतिहासिक दृष्टीकोन हा द्वंद्वात्मक दृष्टीकोन या नावानेच ओळखला जातो .तसेच हा दृष्टीकोन मार्क्सवादी दृष्टीकोन या नावानेही ओळखला जातो .यानुसार भौतिकवादी दृष्टिकोनातून इतिहासातील विकासक्रम समजून घेणे ही एकमेव शास्त्रीय अभ्यास पद्धती आहे असे मार्क्स म्हणतो .द्वंद्व म्हणजे संघर्ष .परिवर्तन दोन कारणामुळे होत असते .एक बाह्य प्रेरणेमुळे व दुसरे अंत:प्रेरणेने .भौतिक म्हणजे जड वस्तू .जड म्हणजे ज्याचे ज्ञान ज्ञानेंद्रियाने होते ते .आत्मा ही जड वा भौतिक वस्तू नाही .कारण आत्म्यासंबंधीचे ज्ञान ज्ञानेंद्रियाने होत नाही .श्रद्धा ,विश्वास ,विचार आदींद्वारे आत्म्यासंबंधीचे ज्ञान मिळते .आत्मा व त्यासंबंधीची कल्पना आणि विचार म्हणजे अध्यात्मवाद आणि जड वस्तूसंबंधीचे विचार म्हणजे भौतिकवाद होय .'भौतिक घडामोडींसाठी भौतिक कारणेच जबाबदार असतात 'या गृहीतांवर आधारित असणारा विचार म्हणजे भौतिकवाद होय .उदा.महापूर का येतात ?भूकंप का होतात ?

या संबंधीच्या भौतिक घडामोडींमध्ये जो संघर्ष असतो त्याला मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवाद असे म्हटले आहे उत्पादन तंत्रे बदलली की त्यानुरूप व्यक्ती –व्यक्तींमधील संबंधही बदलणेही भाग पडते .तसे न झाल्यास समाजात ताणतणाव व संघर्ष उभे राहतात .अखेर नवे उत्पादन संबंध येतात व निर्माण होतात व त्याचबरोबर माणसा –माणसातले सामाजिक व राजकीय संबंधीही बदलतात ,असा इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ मार्क्सने विशद केला आहे .

मार्क्सवाद व डी .पी .मुखर्जी :-हेगेलने विचारांमधील द्वद्वांचे तर मार्क्सने भौतिक घटकांमधील (भांडवलदार – कामगार या दोन वर्गांमधील )द्वंद्वाचे विश्लेषण केले .डी.पी.मुखर्जींनी मार्क्सवादी पद्धतीने परंपरांमधील द्वंद्वाचे ,उदा .हिंदू परंपरा आणि मुस्लीम परंपरा ,उच्च परंपरा आणि स्थानिक परंपरा ,परंपरा आणि आधुनिकता यांच्यामधील द्वंद्वाचे विश्लेषण केले .म्हणूनच ते स्वतःला मार्क्सवादी असे संबोधून घेत असत .भारताच्या इतिहास विश्लेषणासाठी मार्क्सवाद लागू करणे योग्य नाही .कारण भारतीय समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास नाही .भारतात काही वर्ग नव्हते .त्यामुळे वर्गांमध्ये संघर्षही नव्हता .ते भारताकडे 'समन्वयवादी समाज'या दृष्टिने पाहतात .

**प्रश्न क्रमांक ०२ :-भारतीय परंपरा आणि सामाजिक परिवर्तन स्पष्ट करून परंपरेचे प्रकार लिहा ?**

उत्तर:-डी.पी.मुखर्जींच्या समाजशास्त्रीय चिंतनामध्ये परंपरा आणि परिवर्तन या दोन्ही संकल्पना समाविष्ट आहेत .परंपरा ही भौतिकतेचे प्रतिक आहे .त्यांनी तथ्ये ,संदर्भ ,आर्थिक आकडेवारी ,उत्पादनाची साधने आणि सामाजिक वास्तवता यांच्या आधारावर परंपरा आणि सामाजिक परिवर्तन यांच्यामधील संबंधाचे विश्लेषण केले आहे .भारतीय परंपरांच्या उगमाचा स्त्रोत धर्म आणि तत्वज्ञानाशी संबंधित असणाऱ्या ग्रंथामध्ये आहे .भारतात ब्रिटीश शासकांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर एक नवीन मध्यम वर्ग उदयास आला .या नवीन वर्गाच्या आचरणात परंपरा आणि आधुनिकता या दोहोंचा समन्वय आहे .त्यांच्या मते ,परंपरेत (अ) श्रुती (मौखिक ),(ब) स्मृती (आठवणी) व (३) अनुभव (प्रत्यक्ष ज्ञान ) या तीन कारणांमुळे परिवर्तन येते .विभिन्न परंपरांमधील आणि परंपरां व आधुनिकता यांच्यामधील द्वंद्वात्मक संबंधांचा अंतिम परिणाम समन्वय आहे .भारतीय परंपरा ही काही स्वच्छ वा शुद्ध नाही .ती दलितविरोधी आहे .त्यामुळे भारतात नवीन परंपरा निर्माण केली पाहिजे ,ज्यात मार्क्सवाद ,वेद आणि लोकशाही तत्व यामध्ये समन्वय असेल .समूहाच्या वर्तनाला परंपरा ही निर्देशित व संचालित करते .भारतीय संदर्भात बुद्धिवादी विचार हे परिवर्तनासाठी शक्ती नसून ऐतिहासिक रूपातून अनुभव आणि प्रेम हे परिवर्तनाचे महत्वपूर्ण कारक आहेत .

अ)परंपरेचे प्रकार :-

१)प्राथमिक परंपरा:-मृत्यूनंतर शरीराला अग्निसंस्काराद्वारे पंचमहाभूतात विलीन करणे हा एक प्राथमिक संस्कार असून बहुतांश हिंदू या प्राथमिक परंपरेचे पालन करतात.याचा अर्थ ज्या परंपरांचे पालन करणे हे प्रत्येक हिंदुसाठी आवश्यक असते,अशा परंपरांना प्राथमिक परंपरा असे म्हणतात .जन्म ,विवाह व मृत्यू या तीनही घटनांच्या निमित्याने कोणती कर्मकांडे व विधी करावेत यासंबंधीच्या परंपरा हिंदू ,मुस्लीम ,ख्रिश्चन अशा सर्व धर्म समुदायांमध्ये आहेत .भारतात भाषा ,सणवार ,उत्सव ,कला यामध्ये विविधता असल्यामुळे प्राथमिक परंपरा कोणत्या याची यादी करणे अवघड होते .

२)द्वितीय व तृतीय परंपरा :-२१व्या शतकात आधुनिकतेचा प्रसार झाल्यामुळे कुलदेवतेचे उत्सव वा सणावाराच्या प्रसंगी उपस्थिती अनिवार्य आहे असे मानणारी प्राथमिक परंपरा आता द्वितीय झाली आहे असे म्हणता येते .जातीचा पारंपरिक व्यवसाय करणे हे अनिवार्य आहे असे न मानणारी अनेक कुटुंबे आहेत .अशा कुटुंबासाठी जी परंपरा पूर्वी प्राथमिक आहे असे मानले जात होते तिच परंपरा आता द्वितीय वा तृतीय परंपरा आहे असे काही कुटुंबात मानले जाऊ लागले आहे .

ब)भारतीय परंपरांमधील संघर्ष :-

१)लघु व बृहत परंपरांमधील संघर्ष :-बृहत परंपरा ही लिखित असून वेद,उपनिषद ,रामायण ,महाभारत यासारख्या ग्रंथात बृहत परंपरेचे स्वरूप स्पष्ट झालेले आहे .बृहत परंपरांमधील संघर्षातून लघु परंपरेचा उदय होतो.उदा .भारतात ब्राह्मण परंपरेच्या विरोधातून नानक ,नामदेव ,तुकाराम ,कबीर ,चैतन्य संप्रदाय निर्माण झाले आहेत .डॉ .आंबेडकरांनी सामाजिक दास्यत्वाला आणि जातिव्यवस्थेच्या नियमांवर आधारित परंपरेला विरोध केला .व्यक्तिगत अनुभव आणि सामाजिक अनुभव हे परंपरेत परिवर्तन घडवून आणण्यासाठीचे क्रांतिकारी सिद्धांत आहेत असे डी.पी.मुखर्जी म्हणतात .

२)परंपरा आणि आधुनिकता यामधील संघर्ष :-भारतीय परंपरेतील रूढी ,सांस्कृतिक स्थिरत्व व यथा स्थितीला नाकारून चिकित्सक दृष्टीकोनाच्या आधारावर परिवर्तनाच्या विविध पैलुंशी संबंधित विचार व्यक्त केले आहेत .परंपरा आणि आधुनिकता यांच्या मध्ये संघर्षाच्या स्थितीतून वाद ,विसंवाद आणि सुसंवादाची स्थिती निर्माण होते .

३)उच्च व निम्न परंपारामधील संघर्ष :-काही वेळा उच्च परंपरा ही परिवर्तनाच्या काळात निम्न होते तसेच निम्न परंपरा उच्च शिखरावर जाते .याचा अर्थ परंपरांमधील संघार्षातून समन्वयाची प्रक्रिया घडून येते .यामुळे परंपरेत परिवर्तन होते .

४)अंतर्गत व बहिर्गत परंपरेतील संघर्ष :-भारतीय समाजात आक्रमणाच्या माध्यमातून शक ,हून ,कुशाण ,मंगोल ,मुसलमान व ब्रिटीश आले .पाश्चात्यांच्या संपर्कातून भारतीय समाजात स्वांतंत्र्य ,समानता ,व्यक्तिवाद ,राष्ट्रवाद या मुल्यांची निर्मिती होऊन समाजात विविध क्षेत्रात सुधारणा घडून येण्याची प्रक्रिरया गतिमान झाली आहे .

भारतीय परंपरा आणि सामाजिक परिवर्तन याबद्दलचे विवेचन हे डी.पी.मुखर्जी यांचे भारतीय समाजशास्त्रीय महत्वपूर्ण योगदान आहे .

# युनिट क्रमांक-०३
# भारतीय समाज आणि समकालीन परिवर्तन
## (Indian Society and Contemporary Change)

भारतीय समाजातील कुटुंब ,विवाह ,शिक्षण ,जाती यासारख्या पायाभूत संस्थांच्या संरचनेत व कार्यात बदल झाले आहेत .भूमिकाधारकांमधील संबंधांमध्ये बदल झाले आहेत .यामुळे ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही क्षेत्रांमधील परिवर्तनाच्या समाजशास्त्रीय अध्ययनाचे क्षेत्र भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासकांना उपलब्ध झाले आहे ,डॉ .एस.सी.दुबे ,आर .के.मुखर्जी आणि काही अन्य भारतीय समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजातील समकालीन परिवर्तनाचे अध्ययन करून आपल्या संशोधन अहवालाला राष्ट्रीय नव्हेतर आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत प्रसिद्धी मिळवून दिली आहे .

## डॉ.राधा कमल मुखर्जी
## (१८८९-१९६८)

**प्रश्न क्रमांक ०१:-डॉ.आर.के.मुखर्जी यांचे मुल्यांसंबंधीचे विचार स्पष्ट करा ?**

उत्तर :-आर .के.मुखर्जींनी त्यांच्या 'Social Structure of Values'या पुस्तकात मूल्यांचे व्यापक स्तरावर विश्लेषण केले आहे .एकमेकांशी केलेल्या सहकार्यातूनच मुल्यांचा उदय होतो .मुल्ये ही मानवाने निर्माण केलेली अशी शक्ती आहे की ज्याद्वारे मानवी प्रवृत्ती आणि मानवाच्या इच्छा यांचे नियंत्रण करण्याचे कार्ये होते .उदा.भारतीय समाजात स्त्रियांचे विवाहबाह्य आणि विवाहपूर्व संबंध अयोग्य आहेत असे मानले जाते .म्हणून 'पातिव्रत्य' या मुल्याद्वारे भारतीय समाजातील स्त्रियांचे लैंगिक वर्तन नियंत्रित होते .समाजव्यवस्थेत चांगले काय ?वाईट काय ?योग्य व अयोग्य काय ?यासंबंधी समाजाच्या विचारांना मुल्ये असे म्हणतात .

व्याख्या:-आर .के.मुखर्जी यांच्या मते :-"मुल्ये ही समाजाद्वारा मान्यताप्राप्त इच्छा आणि उद्दिष्ट्ये होत .त्यांचे अंतरीकरण हे शिक्षण आणि सामाजीकरणाच्या माध्यमातून होत असते ."

अ) मुलभत मुल्ये आणि सदगुण यांचे चक्र आर .के .मुखर्जी यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे .

### मुलभूत मूल्यांचे चक्र

| मानवी जीवनाचे चक्र | अनुकुलनाची परिमाणे | सर्वसामान्य मुल्ये | नैतिक मुल्ये | मुख्य गुण |
|---|---|---|---|---|
| बाल्यावस्था | जैव-शारीरिक | स्वयं –नियंत्रण | विवेक | आशा ,अपेक्षा .,स्वत:ची क्षमता ,चारित्र्य ,शिक्षण |
| पौगंडा वा युवावस्था | मानसिक – सामाजिक | स्वयं – वास्तविकीकरण | निष्ठा | प्रेम ,समता ,न्याय |
| वृद्धावस्था | आदर्श ,श्रेष्ठ किंवा वैश्विक | स्वयं –श्रेष्टता | ------ | दान,अनुकंपा ,ओळख |

मुल्ये,प्रमाणके ,कला ,नैतिकता , धर्म ,सत्य ,सौंदर्य ,सदभाव ,प्रेम ,न्याय ,स्वातंत्र्य,सुसंस्कृतवाद ,अनुकंपा ,शांतता ही विश्वव्यापी मुल्ये विभिन्न प्रकारच्या ज्ञानातूनच प्रतिबिंबित होतात .निसर्गाने निर्माण केलेल्या संतुलनाचा भंग करू नये ,नैसर्गिक संतुलन मोडण्याचा अधिकार कोणालाही नाही असे आर .के.मुखर्जी म्हणतात .

ब) मुल्ये आणि सामाजिक संघटना :-

सामाजिक संघटनांच्या म्हणजेच समाजिक एकीकरण्याच्या चार स्तरांमधील मुल्यांची उदाहरणे आर .के .मुखर्जी यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत .

१)गर्दी वा जमाव :-क्रूरपणे पाशवी मूल्य अभिव्यक्ती ,उदा.व्यक्ती वा संस्था विरुद्ध नैतिक आक्रोश .,
२)हितसंबंध गट:-देवाणघेवाण ,सचोटी ,प्रामाणिकपणाचा स्तर यासारख्या मुल्यांची अभिव्यक्ती या अवस्थेत होते .
३)समाज :-या अवस्थेत समता व न्याय यासारख्या मुल्यांची अभिव्यक्ती होते .
४)सामुहिक्तता :-या अवस्थेत उत्स्फूर्त प्रेम ,समानता ,प्रेम ,सहकारी स्वातंत्र्य यासारखी जगाच्या पुनर्रचनेसाठी संबंधित मुल्ये अभिव्यक्त होतात .
क)मुल्यांची श्रेणीरचना :-
१)आध्यात्मिक मुल्ये :-सत्य ,सौंदर्य ,सुसंवाद ,पावित्र्य .
२)सामाजिक मुल्ये :-आरोग्य ,धडधाकटपणा ,कार्यक्षमता ,सुरक्षा .
ड)मुल्यहीनता:-दारू वा अंमली पदार्थांचे अतिप्रमाणातील सेवन ,लैंगिक सबंधांमधील अतिरेकी स्वरूपाचे वर्तन .काही विशिष्ट अन्नपदार्थांचे गरजेपेक्षा अतिप्रमाणात सेवन यापैकी कोणत्याही प्रकारचे वर्तन करणाऱ्या व्यक्तीला मानसिक व शारीरिक दृष्टिने भंग पावलेली व्यक्ती असे संबोधिले जाते .व्यक्तीच्या अशा वर्तनाला संबोधण्यासाठी आर .के.मुखर्जींनी मूल्यहीन ही संज्ञा वापरली आहे .याबरोबरच विमुल्य,उपेक्षित मुल्ये,आणि विरुद्ध मुल्ये या तीनही संज्ञा समान स्वरूपाचा अर्थ व्यक्त करणाऱ्या आहेत असे आर .के .मुखर्जी म्हणतात .आर .के .मुखर्जींनी मूल्यांचे अभ्यासपूर्ण विवेचन केल्यामुळे त्यांना भारतीय समाजशास्त्रीय परंपरेत 'मूल्यांच्या समाजशास्त्राचा जनक'असे संबोधिले जाते .

**प्रश्न क्रमांक ०२:-डॉ .आर .के .मुखर्जींचे व्यक्तिमत्व आणि परिवर्तन यासंबंधीचे विचार लिहा** .
उत्तर:-'समायोजनाच्याम्हणजे जुळवून घेणे या लक्षणांच्या संरचनांची एकूण गोळाबेरीज म्हणजे व्यक्तीचे व्यक्तिमत्व होय 'अशी व्यक्तिमत्वाची व्याख्या आर .के .मुखर्जींनी केली आहे .त्यानुसार
१)व्यक्तिमत्व हे व्यक्तिगत गुणांचे संघटन होय .
२)व्यक्तिमत्वामुळे प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व समजते .
३)प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्व हे तिच्या वर्तनक्रिया ,विचार ,हावभाव व्यक्त करण्याच्या पद्धती ,भाषा व सवयी यातून व्यक्त होते .
४)व्यक्तिमत्व हे जन्मताच प्राप्त होत नसून व्यक्तिमत्वाची निर्मिती व विकास ही एक प्रक्रिया आहे
६)शास्त्रीय दृष्टिकोनातून व्यक्तिमत्वाचा विचार चार बाजूंनी केला जातो .त्या म्हणजे शारीरिक बाजू ,मानसिक बाजू ,सामाजिक बाजू आणि सांस्कृतिक बाजू होय .
अ)परिवर्तन:- व्यक्तीला तिच्या जीवनात विभिन्न स्तरांमधून जावे लागते .या ठिकाणी स्तर ही संज्ञा व्यक्तीच्या जीवनात घडून येणाऱ्या परिवर्तनाच्या संदर्भात आर .के .मुखर्जींनी वापरली आहे . व्यक्ती विभिन्न स्तरांमधून मार्गक्रमण करीत असताना व्यक्तीच्या सामाजिक संबंधात बदल होतो .व्यक्तीच्या नैतिक जीवनाचा विकास होतो ,त्याचबरोबर व्यक्ती मुल्यांची वृद्धी करण्यांमध्ये योगदान करते .अशा प्रकारे आर .के.मुखर्जींनी मानव व्यवहाराचे तीन स्तर केले आहेत .
१)जैविक स्तर :-मनुष्याशिवाय इतर प्राण्यांचे वर्तन हे मुल्याधिष्टीत नसते.हाच मनुष्यप्राण्यांचे वर्तन आणि अन्य सजीवप्राण्यांचे वर्तन यामध्ये फरक आहे .एखादी व्यक्ती आपल्या तहान ,भूक ,मैथुन यांची पूर्तता नियमांचे उल्लंघन करून करत असेल तर त्याचे सामाजिक संबंध निर्माण होणार नाहीत .तो मुल्यानुसार गरजांची पूर्ती करीत असल्यामुळे सामाजिक प्राण्यांमध्ये त्याची गणना होते .
२)मानसिक स्तर :-व्यक्ती आपल्या गरजांची पूर्ती इतरांसोबत मिळून –मिसळून करते .त्यातून सामाजिक संबंधाची व नैतिक मुल्यांची निर्मिती होते .या स्थितीतील व्यक्तीच्या मनोभावनेचे वर्णन करण्यासाठी आर .के.मुखर्जी यांनी 'परमआदराची भावना 'वा 'पूज्यबुद्धी 'या संज्ञेचा उपयोग केला आहे .
३)आध्यात्मिक स्तर :-आर .के .मुखर्जींच्या मते ,आध्यात्मिक स्तर ही व्यक्तिमत्व विकासाची अंतिम अवस्था आहे .या अवस्थेला 'सत्यं ,शिवं ,सुंदरम' ची अवस्था असे संबोधिले जाते .या अवस्थेत व्यक्ती अशा उदात्त मूल्यांचा स्वीकार करते की त्यातून 'विश्व एकता 'प्रस्थापित होते .आर .के.मुखर्जींच्या मते ,समाज आणि व्यक्ती या दोहोंनाही आपले अस्तित्व कायम ठेवावयाचे असेल तर समाजाच्या सर्वोच्च मुल्यांचा विकास होणे आवश्यक आहे .जर आपण समाजात मूल्यांचे संरक्षण केले नाहीतर मानवीय एकता ,सौंदर्य ,सत्य ,प्रेम यांचे रक्षण करणे अशक्य होईल .

# एस.सी.दुबे
## (१९२२-१९९६)

**प्रश्न क्रमांक ०१:-डॉ.दुबेंचे आधुनिकते बाबतचे विचार लिहून ,त्याचे घटक व लक्षणे लिहा .?**

उत्तर:-आधुनिकतेमध्ये असंख्य प्रकारचे आणि मोठ्या संख्येतील बदल ,तेही परस्परसंबंधित असणारे समाविष्ट आहेत .उदा.जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्याचा संबंध आधुनिक शिक्षणाच्या प्रसाराशी आहे .आधुनिक शिक्षणासाठी धर्मनिरपेक्षीकरण ही एक आवश्यक अशी अट आहे .आधुनिक शिक्षण घेणे आणि देणे या दोहोंचा संबंध आर्थिक स्थितीशी आहे .म्हणूनच आधुनिकता ही अत्यंत जटील घटना आहे असे दुबे म्हणतात .त्यांच्या मते :-काही बदल हे संरचनांमधील बदलांचा परिणाम आहे तर काही बदल हे प्रक्रियांमधील बदलांचा परिणाम आहे .'सद्यकालीन भारत आणि त्याचे आधुनिकीकरण' या आपल्या पुस्तकात त्यांनी नोकरशाही ,नेतृत्व ,शिक्षण ,नियोजन आणि धर्मनिरपेक्षीकरण या पाच घटकांना महत्व दिले आहे .

अ)आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत सहाय्यभूत ठरणारे घटक :-

१)सामाजिक बंध :-समाजसद्स्यांना एकमेकांशी जोडणारे सामाजिक बंध अधिक मजबूत केले पाहिजे .त्यामुळे लोकांचे परस्परावलंबीत्व वाढले की बंध मजबूत होण्यास सहाय्य होते .परानुभूती वाढविण्यासाठी लोकांना राजकीय व आर्थिक कार्यामध्ये सहभागी होण्याची संधी दिली पाहिजे .

२)सामाजिक संयम आणि शिस्त :-डॉ.दुबेंच्या मते समाजव्यवस्तेत वरीष्ठापासून कनिष्ठापर्यंत सर्वांनी सामाजिक संयमाशी आणि शिस्ताशी निगडीत असणाऱ्या नियमांचे पालन केले पाहिजे .नियमांचे पालन करण्याबाबत कोणालाही सूट दिली तर त्याचा प्रतिकूल परिणाम संयम व शिस्तीवर होतो .

३)अंमलबजावणी:-समाजव्यवस्थेत धोरण ठरविणे आणि त्या बाबतचे निर्णय घेऊन त्यांची अंमल बजावणी करणे हे विशेषज्ञांचे कार्य आहे ,हे जरी खरे असले तरही केवळ विशेशाज्ञांवर अत्याधिक भर देणे घातक ठरते.

४) प्रोत्साहन देण्याची पद्धत :-उत्कृष्ट कार्य आणि तेही कार्यक्षमतेने करणाऱ्यांना प्रोत्साहित करण्याची पद्धती असेल तर त्या प्रकारच्या कार्याला उत्तेजन प्राप्त होते आणि भ्रष्ट्राचाराला प्रतिबंध बसतो .

ब)आधुनिकतेची लक्षणे :-डॉ.दुबेंनी आधुनिकतेची १२लक्षणे सांगतली आहेत .

१)सामाजिक गतीशिलतेला वाव असणे .
२)परानुभूती –दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनानुभवांशी एकरूपता साधने .
३)सामाजिक गतीशिलातेला वाव असणे
४)हितसंबंधांचे संयुक्तीकरण
५)हितसंबंधांचे एकत्रीकरण
६)संस्थांगर्त राजकीय स्पर्धा
७)अर्जित दर्जाला महत्व
८)साध्य व साधन यांच्या शुचितेला महत्व
९)कार्य करणे ,स्वकष्टातून धन मिळविणे ,बचत करणे या प्रवृत्तीचा विकास
१०)परिवर्तन घडवून आणण्याची इच्छा
११)सामाजिक ,आर्थिक व राजकीय क्षेत्रात संयम व शिस्त
१२)मानवी जीवनाच्या विभिन्न क्षेत्रात समाधान मानण्याची प्रवृत्ती

**प्रश्न क्रमांक ०२:-डॉ.दुबेंच्या विचारानुसार आधुनिकीकरणातील अडचणी लिहा .?**

उत्तर :- १) प्रेरणात्मक अडचणी :-आफ्रो –आशियन देशांमधील सर्वसामान्य जनता परिवर्तनासाठी मानसिक दुर्बलतेतून बाहेर पडू शकली नाही . लोकांची परिवर्तनाची इच्छाच गोठून गेली होती .आधुनिकीकरणाच्या प्रयत्नांमध्ये भाग घेण्याची इच्छा त्यांच्यामध्ये प्रसार पावली नाही .गरिबी उन्मुलनाच्या कार्यक्रमात गरिबांची कुठलीच भूमिका नव्हती .

२)वैचारिक अडचणी :-काही देशांमध्ये एका गटाला आदर्शासाठी गतकालीन समाजाकडे वळणे योग्य आहे असे वाटत होते तर दुसऱ्या गटाला शीघ्र गतीने आधुनिकीकरण घडून यावे असे वाटत होते .अशा प्रकारच्या वैचारिक स्तरावरच्या दुफळीतून आधुनिकीकरणाचे साध्य त्या देशांमधील सर्व लोकांपर्यंत पोहचले नाहीत .कमकुवत स्वरूपातील राष्ट्रवादाची भावना आणि वैचारिक स्तरावरची दुफळी हे आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडसर ठरतात .

३)संस्थांगत अडचणी :-तिसऱ्या जगातील समाजाची संस्थात्मक संरचना परिवर्तनासाठी जे प्रयत्न झाले ते निम्न स्तरावरचे व सदोष होते .स्वार्थी लोकांच्या प्रयत्नांवर नियंत्रण ठेवण्यात तसेच परिवर्तनाच्या मार्गातील अडसर दूर कण्यात संस्था अपयशी ठरल्या .त्यामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला काही गतीच प्राप्त झाली नाही .

४)केवळ विज्ञान व तंत्रज्ञानावर अनावश्यक भर :-विज्ञान आणि तंत्रज्ञानावर भर दिल्यामुळे समाजव्यवस्थेतील वरच्या स्तरातील लोकांची जेवढी पोहोच असते तेवढी खालच्या स्तरातील लोकांची नसते .यामुळे त्यांना काही लाभांपासून सतत वंचित रहावे लागते .परिणामी त्यांचा जीवनस्तर अधिकाधिक घसरत जातो .

५)भौतिकवादी विकासाकडे धाव :-विभिन्न प्रकारच्या भौतिक वस्तूंचा अभाव असेल तर व्यक्ती आपल्या मुलभूत गरजाही योग्य प्रकारे पूर्ण करू शकत नाही .आध्यात्मिक सुखाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून केवळ भौतीकवादाची कात धरली तर चंगळवादाकडे वळण्याची शक्यता निर्माण होते .नवश्रीमंतांच्या चंगळवादात माणुसकी ,मानवता ,सामाजिक न्याय आदी तत्वांकडे दुर्लक्ष केले जाते .

६)संघटनात्मक अडचणी :-स्थानिक आणि प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावरील काही नेत्यांच्या स्वार्थी आणि संकुचित वृत्तीवर मात करणे संघटनांचा अभाव असल्यामुळे शक्य झाले नाही .

७)सामाजिक अनुशासनाची कमी :-काही लोकांच्या संकुचित मनोवृत्तीना पायबंद घालण्यास राष्ट्रीय स्तरावरील लोकमताचा दबाव कमी पडला .दुर्लभ राष्ट्रीय संसाधनांचा दुरुपयोग काही लोकांच्या हितसंबंधांची पूर्ती करण्यासाठी होत होता .शासन हतबलासारखे मूकदर्शक बनून पाहत होते .

८)अस्पष्टता :-विकासात्मक सिद्धांताप्रमाणेच आधुनिकतेची संकल्पना देखील काही महत्वपूर्ण प्रश्नांची उत्तरे देण्यात अपयशी ठरली आहे .बाजारपेठीय अर्थव्यवस्था गरिबी व दारिद्र्य दूर करण्याच्या संदर्भात जादूचे काम करीत नाही आणि विकासाच्या सिद्धांतातील 'झिरपण्याचे तत्व'प्रत्यक्ष व्यवहारात यशस्वी ठरत नाही .कारण झिरपण्यासाठीचा प्रवाह खाली पोहचेपर्यंत अत्यंत कमजोर झालेला असतो .दुर्बल व गरीब घटकांपर्यंत काही लाभ पोहचतच नाही असे प्रत्यक्ष व्यवहारात आढळून येते.

९)सामाजिक न्यायाचा अभाव:-आधुनिकीकरणात सर्वांना समान लेखून सर्वांच्या विकासासाठी व कल्याणासाठीचे उपाय या संकल्पनेत सुचविले जात नाही .पाश्चात्य जीवनपद्धतीच्या विकासाव्यतिरिक्त अन्य कोणत्याच गोष्टींवर या संकल्पनेत भर देण्यात आलेला नाही .

**प्रश्न क्रमांक ०३:-भारतीय समाजातील परंपरा आणि आधुनिकते बाबत डॉ .दुबेंचे विचार लिहा ?**

उत्तर:-हिंदू धर्मातील कर्म सिद्धांत ,जीवनचक्राचा सिद्धांत ,जातीची स्तरीकरण पद्धती ,पवित्र –अपवित्रतेची कल्पना ,पुरुषी वर्चस्वाची कल्पना या सर्वांचा जवळचा संबंध परंपरांशी आहे .समानता ,कर्तव्यनिष्ठा ,अनुशासन या सर्वांचा संबंध आधुनिकतेशी आहे .भारतीय समाजात आधुनिकता आणावयाची असेल तर त्या मार्गात अडसर असणाऱ्या गोष्टींचा त्याग करावा लागेल ,असे डॉ .दुबे म्हणतात .भारतीय खेडी ही आता पूर्वीप्रमाणे रूढीवादाचे गड राहिलेले नाहीत .खेड्यांना आणि ग्रामवासीयांना देखील परिवर्तनाची हवा लागली आहे .नवीन शिक्षणव्यवस्था ,अर्थव्यवस्था ,प्रशासनव्यवस्था ,सामुदायिक विकास योजना ,शहरीकरण ,जनसंसुचन साधने ,धार्मिक –सामाजिक आंदोलने आदींनी परिवर्तनाला खतपाणी घातले आहे .डॉ .दुबेंच्या मते ,सध्यकालीन भारतीय खेडी परंपरा आणि आधुनिकता या दोन परस्परविरुद्ध टोकांमध्ये गोंधळाच्या स्थितीत आहेत .जुन्याचे आकर्षण आणि आधुनिकता या दोहोंमधील संबंधांबाबत केवळ ग्राम नव्हे तर संपूर्ण भारतीय समाज संभ्रमात सापडला आहे .ठोस निर्णयावर तो अजूनपावेतो पोहचला नाही ,असे डॉ .दुबेंचे म्हणने आहे .

**प्रश्न क्रमांक ०४:-मूल्य :समानता आणि विकास याबाबत डॉ .दुबेंचे विचार लिहा ?**

उत्तर:- सामाजिक –सांस्कृतिक उद्धीष्ट्ये साध्य कण्यासाठी आणि सामाजिक धोरण अमलात आणण्यासाठी एक साधन असे आर्थिक विकासाचे स्वरूप आहे .डॉ.दुबेंच्या मते ,आर्थिक विकास आणि शीघ्र गतीने होणारे तांत्रिक बदल हा सध्यस्थितीत मानवजातीसाठी एक चिंतनाचा प्रमुख विषय झाला आहे .आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू मनुष्य आहे .न्यायासह आर्थिक वाढ हा जवळपास सर्वच विकसनशील देशांनी आदर्श मानला आहे .पाश्चिमात्य देशांच्या प्रभावातून उपभोग प्रवृत्तीचा वा ग्राहकवादाचा जोर शीघ्र गतीने वाढत आहे ,याची डॉ दुबेंना चिंता वाटत होती .राहणीमानाचा दर्जा हा आर्थिक विकासाचा एक निकष आहे ,हा विचारच डॉ.दुबे यांना मान्य नाही .जातीवाद आणि श्रेष्ठ –कनिष्ठता अशा प्रतिकूल स्थितीत समतेचे मुल्ये अमलात आणणे किती अवघड ठरते याची कल्पना आपण करू शकतो .ज्यात व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्व आणि सर्व व्यक्ती समान आहेत हे समानतेचे मुलभूत तत्व या दोन्ही तत्वांचा परस्परांशी सुसंगत स्वरूपाचा मेळ असेल अशी नवीन सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यात यावी असे डॉ .दुबे म्हणतात .

**प्रश्न क्रमांक ०५ :-मुल्ये :विज्ञान आणि तंत्रज्ञान याबाबत डॉ .दुबेंचे विचार लिहा ?**

उत्तर :-विज्ञान हे मानवाची सेवा करण्यासाठी म्हणजे त्याच्या अडी-अडचणी दूर करण्यासाठी आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे .विज्ञान व तंत्रज्ञानाचा स्वीकार केला तरीही त्यातून मानवजातीला धोकादायक ठरतील अशा समस्या निर्माण होणार नाहीत याचीही काळजी आपण घेतली पाहिजे .तार्किक ,वैज्ञानिक आणि समतावादी आणि त्यात अमानवियतेचा पूर्णतः ऱ्हास झाला असेल असा समाज निर्माण होईल अशी कल्पना आपण केली पाहिजे . सुरक्षा ,स्नेहभाव सौंदर्य यांच्या तृप्तीचे समाधान मिळणे ही देखील मनुष्याची गरज आहे .या दोन्ही गोष्टींना प्रतिसाद देणारी समाजव्यवस्था निर्माण करणे हिच भविष्यकाळाची गरज आहे .भारतासारख्या देशात विज्ञान व तंत्रज्ञान या मूल्यांना महत्व आहे ,हे डॉ .दुबेंनी प्रतिपादित केले .

**प्रश्न क्रमांक ०६:-भारतीय समाज आणि सामाजिक परिवर्तन याबाबत डॉ .दुबेंचे विचार लिहा ?**

उत्तर :-'भारतीय समाज' या पुस्तकात 'भारतीय समाज आणि सामाजिक परिवर्तन' याबाबत डॉ . दुबेंनी पुढीलप्रमाणे विवेचन करता येईल .

१)वर्ण आणि जाती :-चातुर्वर्ण्याच्या आधारे हजारोंच्या संख्येत असणाऱ्या जातींचे प्रकार पाडणे वा त्यांचे वर्गीकरण करणे हे अत्यंत चुकीचे ठरते .हिंदू समाजव्यवस्थेत 'वर्ण' ही संज्ञा सध्यस्थितीत केवळ संदर्भ श्रेणी दर्शविणारी ठरली आहे असे डॉ .दुबे म्हणतात. त्यांच्या मते ,जातींच्या उत्पतीचे स्पष्टीकरणासाठी मांडण्यात आलेले तीनही सिद्धांत हे वस्तुतः वर्णाच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण करणारे आहेत .भारतीय समाजातील जाती व्यवस्थेतील परिवर्तनाचे अध्ययन हे जातीच्या लक्षणांच्या संदर्भात करणे हे अधिक योग्य ठरते .व्यवसाय ,सामाजिक संपर्क आणि रोटी व्यवहारावरील बंधने याबाबत आढावा घेतला तर जातीसमूह अपरिवर्तनीय नाहीत हे स्पष्ट होते .सध्यस्थितीत जातिव्यवस्थेतील परिवर्तनाचा आढावा घेतला तर व्यक्तीच्या सामाजिक जीवनावरील वा सामाजिक संबंधावरील जातीव्यवस्थेची पकड आता मोठ्या प्रमाणावर सैल झालेली नाही असे खात्रीने म्हणता येते .

२) ग्रामीण व नागरी संबंध :-भारतीय खेडी ही स्वयंपूर्ण आहेत परंतु वस्तुस्थिती तशी नाही .एवढेच नव्हे तर जजमानी पद्धतीच्या काळातही खेडी स्वयंपूर्ण नव्हती .आठवडी बाजाराचा दिवस व .यात्रांचा दिवस यांचे ग्राम वासीयांच्या सामाजिक जीवनात एक विशेष स्थान आहे .डॉ.दुबेंनी शमिरपेठ या खेड्याचे उदाहरण दिले आहे .शमिरपेठमध्ये मोठा तलाव आहे .तलावात मासे आहेत .त्या गावात मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या कोळी जातीचे एकही घर नाही .शमिरपेठमध्ये आजूबाजूच्या गावांमधील कोळी जातीचे लोक येतात .मासेमारी करतात .ग्रामस्थांना विकतात .नंतर आपापल्या गावी निघून जातात .म्हणून ग्रामीण संदर्भ लक्षात घेऊनच

समाज संरचनेच्या कोणत्याही एककाचे अध्ययन केले पाहिजे असे डॉ .दुबे 'भारतीय समाज' या पुस्तकात नमूद करतात .

३)भारतीय समाजाची व संस्कृतीची जडणघडण :-२१ व्या शतकात भारतात 'फिरती शेती' करणाऱ्या आदिवासी जमाती आहेत .कंदफळे गोळा करून तसेच पारंपरिक पद्धतीने शिकार करून त्यावर गुजराण करणाऱ्या जमाती आहेत .भटके जीवन जगणारे पशुपालक आहेत.हिंदू ,मुस्लीम ,ख्रिश्चन ,बौद्ध ,शीख ,जैन याप्रमाणे जगातील जवळपास सर्व

प्रमुख धर्मपंथाचे अनुयायी आहेत .आधुनिक कालानुरूप उधोगपती ,नोकरशहा ,वैज्ञानिक वा शास्त्रज्ञ ,विद्वान असे सर्व प्रकारचे लोक भारतीय समाजात आहेत .वंश ,भाषा ,धर्म ,प्रादेशिक संस्कृती इत्यादी बाबतीत भारतीय समजाएवढी समृद्ध विविधता असणारा अन्य कोणताही समाज नाही असे मानले जाते .सिंधू नदीच्या खोऱ्यात आर्यांच्या आगमनानंतर भारतीय सभ्यतेच्या उदय व विकासाला प्रारंभ झाला .भारतात इस्लामचे आगमन तत्कालीन शासकांच्या संमतीने झाले .ख्रिश्चन ,इस्लामधर्मियांप्रमाणेच पोर्तुगीज ,फ्रेंच ,ब्रिटीश यांचेही भारतीय समाज व संस्कृतीच्या जडणघडणीत कोणते योगदान आहे हे त्यांनी 'भारतीय समाज' या पुस्तकात स्पष्ट केले आहे .

४)जीवन साथीदारांची संख्या :-कुटुंबाची निर्मिती विवाहामधून होते .म्हणून विवाहपद्धतीचे अध्ययन केल्या शिवाय भारतीय कुटुंब आणि समाज संरचनेचे व परिवर्तनाचे अध्ययन पूर्ण होऊ शकत नाही .कुटुंब सदस्यांमधील परस्पर संबंधांच्या संदर्भात भाऊ-बहिण ,आई –वडील ,पती –पत्नी ,पिता –पुत्र अशा संबंधांबाबतची प्रमाणके भारतीय समाजात निर्माण झाली आहेत .

५)लिंग संबंध :-कुटुंबातील कामांची स्त्री-पुरुषांमधील विभागणी ही स्त्रियांवर अन्याय करणारी आहे .शिक्षणाची संधी देण्याबाबत कुटुंबामध्ये मुले –मुली यांच्यात भेदभाव केला जातो .अनेक बाबतीत वंचिततेच्या स्थितीत जीवन जगण्याची पाळी स्त्रियांवर येते .भारतीय समाजसुधारकांनी व संविधानानेही स्त्री-पुरुष समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे .परंतु भारतात स्त्री –पुरुष समता हा आदर्श अद्यापही प्रस्थापित झालेला नाही.तो केवळ भारतीय संविधानाच्या पुस्तकातच आहे ,अशा प्रकारचे विवेचन डॉ.दुबेंनी लिंगसंबंधाबाबत केले आहे .

६)कुटुंब आणि आप्तसंबंध :-ईशान्य भारतात गारो ,खासी आणि पनार या जमाती मध्ये आणि दक्षिण भारतात नायर ,मप्पिल्ला आणि अनेक आदिवासी समूहांमध्ये मातृवंशीय कुटुंब पद्धती आहे .याकुटुंबात विवाह नंतर पतीला आपले घर सोडून पत्नीच्या घरी निवास करण्यासाठी जावे लागते .तर विवाहानंतर पत्नीने स्वतःचे घर सोडून पतीच्या घरात निवास करण्यासाठी जाणे या परंपरेचे पालन करणारांची संख्या जास्त आहे .भारतात संयुक्त कुटुंब .केंद्र कुटुंब ,विस्तारित कुटुंब असे कुटुंबाचे सर्व प्रकार आहेत .

७)विविधता आणि एकता :-

अ)वांशिक गट :-भारतात सहा वांशिक गट असून ईशान्य भारत आणि दक्षिण भारत या दोन्ही भागातील लोकांच्या त्वचेचा रंग ,नाक ,कान,डोळे आणि उंची मधील फरक लोकांच्या चटकन लक्षात येतो .

ब)धार्मिक गट :-जगातील जवळपास सर्व धर्माचे लोक भारतात राहतात .भारतात हिंदू ,मुस्लीम ,ख्रिश्चन ,बौद्ध ,जैन ,शिख ,पारशी आणि यहुदी अशा आठ धर्माचे लोक आहेत .त्यामुळे सणवार ,रीतीरिवाज ,विवाह करण्याची पद्धती आदींबाबत भारतात विविधता निर्माण झाली आहे .

क)भाषिक गट :-भारतीय संघ राज्यात घटक राज्यांनी ३१ भाषांना तर भारतीय संविधानाने २२ भाषांना मान्यता दिली आहे .जनगणना अहवालातील नोंदणीनुसार भारतात १२२ बोलीभाषा आहेत .ईशान्य भारतातील 'कोहिमा' नभोवाणी केंद्रावरून २५ भाषांमध्ये वार्तापत्र सादर केले जाते.

ड)सांस्कृतिक ओळख :-एतिहासिक वारसा ,भौगोलिक परिसर व पर्यावरण ,भाषा ,आदी घटकांच्या आधारावर भारतात प्रदेशांना व समुदायांना स्वतःची वेगळी अशी सांस्कृतिक ओळख निर्माण झालेली आहे .

इ)एकता:-राम ,कृष्ण ,शिव ,देवी या देवतांना अखिल भारतीय स्तरावरच्या देवता असे स्वरूप प्राप्त झाले असून एकता निर्माण करण्यात सहाय्य झाले आहे .भारताच्या चार दिशांना असणारे चार धाम ,त्यांची यात्रा करण्याची रूढी वा परंपरा ,धार्मिक स्थानांमध्ये असणारी कीर्तन परंपरा ,तीर्थक्षेत्रे आणि नद्यांचे महात्म्य आदी कारणांमुळे ही हिंदूधर्मीय एकता निर्माण होण्यास मोलाचे सहाय्य झाले आहे ,असे डॉ .दुबे आपल्या पुस्तकात
नमूद करतात..

८)भारतीय समाजातील परिवर्तनाचे किंवा बदलाचे कल:-

१)संस्कृती :-संपूर्ण देशातील हिंदू वा मुस्लिमांमध्ये सर्वसामान्य व्यक्तीला ओळखू येईल अशी समानता अत्यंत कमी आहे .प्रादेशिक घटकाच्या आधारे निर्माण होणारी ओळख ही खरी ओळख आहे .उदा.बंगालमधील हिंदू आणि मुस्लीम अशा दोन्ही समुदायांना बंगाली भाषेचा अभिमान आहे .नागा जमातीत १२ पेक्षाही अधिक वांशिक गट व सांस्कृतिक भिन्नता आहे .टी.व्ही.व प्रसारमाध्यमातील वेशभूषा ,केशभूषा ,काही वर्तन प्रकार आदींचे युवक वर्गाकडून अनुकरण केले जाते .हे लोकप्रिय संस्कृतीचे उदाहरण आहे

२)तीव्र मतभेद आणि सुधारणा :-डॉ.दुबेंनी आपल्या पुस्तकात संत कबीर ,रविदास ,चोखामेळा ,नरहरी सोनार ,गोरा कुंभार ,सावता माळी ,मुक्ताबाई ,सखुबाई ,जनाबाई यासारख्या संतांच्या कार्याचा आणि दयानंद सरस्वती ,ब्राह्मो समाज ,प्रार्थना समाज ,आर्य समाज ,सत्यशोधक समाज अशा समाजसुधारकांचा आणि त्यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.ज्यामुळे भारतात एकता निर्माण झाली आहे .

३)अर्थव्यवस्था :- समाजवादी व संमिश्र अर्थव्यवस्थेची जागा मुक्त व बाजारपेठीय अर्थव्यवस्थेने घेतली सर्वाधिक वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था अशी २१व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेने झेप घेतली आहे .भारतीय संघराज्यातील 'बिमारू'राज्यांची संख्या झपाट्याने कमी होऊ होऊ लागली आहे .दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येत घट होण्याची गती अत्यंत मंद असणे ,बेरोजगारांच्या संखयेत पुरेशा प्रमाणात घट न होणे ,कामगार व प्रदषणाचे प्रश्न यासारख्या प्रश्नांची उकल कशी व केव्हा होते यावर भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाटचालीची गती आणि दिशा अवलंबून आहे ,असे डॉ .दुबेंचे म्हणणे आहे .

४)समाज-सातत्य आणि परिवर्तन :-जातीव्यवस्थेवरील झालेल्या आघातामुळे ती पूर्णतः मोडली नाही तसेच हजारो वर्षापूर्वी जशी होती तशी कायमही नाही .प्रत्येक समाजव्यवस्थेत सातत्य टिकून असले तरीही परिवर्तन घडून येणे सुरूच असते .आधुनिक शिक्षन्न,नवीन व्यवसाय ,भौगोलिक गतिशीलता ,माध्यमांचा प्रभाव यासारखे अनेक कुटुंब ,खेडी ,जाती आदींमध्ये संरचनात्मक आणि प्रकार्यात्मक बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरले आहे .जातीचा दर्जा ,प्रभावशाली जात ,युवकांची संस्कृती यांचे विश्लेषण करून त्यामधील सातत्य आणि परिवर्तनाचे विवेचन केले आहे .

५)राज्यव्यवस्था :-भाषावाद ,प्रांतवाद ,संप्रदायवाद,हिंदू –मुस्लीम ,जातीयवाद ,आरक्षण विषयक मागण्या अनेक राजकीय समस्या ही भारतीय राज्यव्यस्थेसमोरील प्रमुख आव्हाने आहेत .तसेच राजकीय पक्ष आणि नेत्यांनी राजकीय नैतिकतेच्या संदर्भात आत्मपरीक्षण करणे ही आजच्या काळाची गरज झाली आहे .

या सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्यावर भारतीय राज्यव्यवस्थेचे स्थैर्य अवलंबून आहे ,असे डॉ .दुबे म्हणतात.

# युनिट क्रमांक ०४
# लिंगभाव आणि भारतातील समाज

पुरुषीपणा आणि बायकीपणाठरविण्याचे निकष सर्वच समाजांमध्ये काळाच्या ओघात निर्माण झाले .या निकषांच्या आधारेच व्यक्तीच्या वर्तनक्रिया तपासून पहिल्या जातात .थोडक्यात ,सामाजीकरणाच्या प्रक्रियेत लहान मुलांच्या वर्तन क्रियांना 'पुरुष'पणा आणि लहान मुलींच्या वर्तन क्रियांना 'बायकी'पणाच्या रूढ साच्यात बसविण्याचा प्रयत्न सर्वच समाजांद्वारे केला जातो .लिंग या संज्ञेचा हा सामाजिक आशय आहे .तो व्यक्त करण्यासाठीच इंग्रजी भाषेत जेंडर हा शब्द वापरला जातो.भारतीय समाजातील पुरुषसत्ताक पद्धतीवर आपल्या लेखनाद्वारे कठोर प्रहार करणाऱ्या ताराबाई शिंदे आणि स्त्री शिक्षण व स्त्रियांचे हक्क यासाठी लढा देणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा परिचय पुढीलप्रमाणे करून घेता येईल .

## ताराबाई शिंदे
## (१८५० ते १९१० )

**प्रश्न क्रमांक ०१:-ताराबाई शिंदेंचे स्त्रिया आणि भारतीय समाजातील पुरुषसत्ताक पद्धती यावरील विचार स्पष्ट करा ?**

उत्तर :-भारताच्या इतिहासात एकोणिसावे शतक महत्वाचे मानले जाते .कारण 'तत्पूर्वीच्या एक हजार वर्षात जे घडले नाही ,ते या शतकात घडले'या शतकात भारतीय समाजशास्त्राला जे अनमोल सामाजिक विचारवंत दिले ,त्यापैकी एक म्हणजे ताराबाई शिंदे होय .त्यांचे 'स्त्री –पुरुष तुलना'हे पुस्तक मराठीतील एक अनमोल रत्न मानले जाते .'ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली ,त्यानेच स्त्री –पुरुष निर्माण केले ,तरी सर्व प्रकारचे साहस दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रीयांच्ये अंगी आहेत तेच पुरुषात आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने'ताराबाईनी हा निबंध लिहिला आहे .विशेषतःमुठभर सुधारकांचा अपवाद वगळता त्या काळात तुच्छतेने स्त्रियांकडे पहिले जात होते .त्या काळात या विषयाला हात घालणे हे त्यांच्या विचार श्रेष्ठत्वाचे लक्षण आहे .पुरुषांना सर्व श्रेष्ट्त्व,देवतुल्यत्व बहाल करणाऱ्या परंपरेला आव्हान देऊन स्त्री –पुरुष समानता निर्माण करण्याची मागणी करतात .पुरुष प्राधान्य ,पुरुष वर्चस्व ही केवळ दमनकारी यंत्रणा आहे .स्त्रीच्या अध:पतनाला पुरुषच कारण आहे .त्यांच्या मते ,लग्न ही घटना स्त्रीच्या जीवनाला सर्वस्वी भिन्न वळण लावणारी असते .लग्नामुळे पुरुषावर कोणतेही दुष्परिणाम होत नाही .याउलट त्याच्या मर्जीनुसार बायको वागली नाही तर एकीच्या जागी दुसरीला आणण्याचे त्याचे स्वांतंत्र्य अबाधित राहते .'तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही त्यांच्या बरोबर का सती जाऊ नये बरे ?असा प्रश्न त्या पुरुषांना विचारतात .विधवेला पुनर्विवाह करण्यास मनाई आणि पुरुषांना मात्र 'एकीपासून पाचशे बायका करण्याची परवानगी'या विरोधाभासाचा त्यांनी जबरदस्त उपहास केला आहे .स्त्री ही पुरुषांपेक्षा अधिक सोशिक ,अल्पसंतुष्ट ,पुरुषप्रेमाची भुकेली ,प्रेमपूर्तीसाठी जीवन ओवाळून टाकण्यास तत्पर अशी आहे तरीही व्यवहारात मात्र तिच्या वाट्याला शोषण ,यातना आणि दुर्दशा यांचेवाचून दुसरे काहीच येत नाही .पुरुषांच्या दुर्वर्तनाचा बळी शेवटी स्त्रियाच ठरतात .ही स्थिती निर्माण होण्याचे मूळ कारण त्यांच्या मते ,हिंदू धर्मास नियंत्रित करणारी सर्व शास्त्रे ही नुसती पुरुषानुकुल आहेत असे नाही ,तर ती सरळ सरळ स्त्रीविरोधी आहेत असा त्यांचा आक्षेप आहे .शास्त्राधारे चालत आलेल्या आपल्या साऱ्या परंपरा व प्रघात अखेर स्त्री जातीच्या दु:खास कारणीभूत होतात असा इतिहास आहे ,असे त्यांचे म्हणणे आहे.हा इतिहास पालटणे आणि स्त्रीला सन्मान व प्रतिष्ठा लाभावी यासाठी प्रयत्न करणे यामधूनच ताराबाईच्या विचारांची श्रेष्टता लक्षात येते .

**प्रश्न क्रमांक ०२:-स्त्रियांबाबत ताराबाई शिंदेचे विचार लिहा ?**

उत्तर :-त्यांनी आपल्या पुस्तकात सुरुवातीलाच स्त्रीधर्माची व्याख्या केली आहे .पतीची निरंतर आज्ञा पाळणे ,त्याचे मर्जीप्रमाणे वागणे ,त्यांनी लाथा मारल्या ,शिव्या दिल्या ,रांडा ठेवल्या ,चोरी चहाडी ,फितुरी करून किंवा खजिना लुटून वा लाच घेऊन घरी आले तरी स्त्रियांनी आपले हे कोणी कृष्ण महाराजच आलेत असे समजून मोठ्या हसतमुखाने

देवासारखी त्यांची पूजा करावी'.आदर्श पत्नीत्व ,पतिनिष्ठा,आज्ञापालन .सेवापरायणता,पतीच्या शरीरसुखाची पूर्तता या गुणांचा परमोत्कर्ष साधने यात स्त्री जीवनाचे साफल्य साठविले आहे ,असे त्या काळात स्त्रियांच्या मनावर बिंबविले जात असे . स्त्रीवर सत्ता प्रस्तापित करण्यासाठी पातिव्रत्य कल्पनेची विचारप्रणाली सर्वाधिक उपयुक्त ठरली .विधवांना पुनर्विवाहास परवानगी न दिल्यामुळे होणाऱ्या अनेक दुष्परिणामांची यादी त्यांनी पुढीलप्रमाणे नमूद केली आहे .

१)विधवेच्या माथ्यावर कायम अशुभाचा शिक्का बसतो

२)वाट्याला येणाऱ्या विद्रूपतेचा मूकपणा स्वीकार करावा लागतो.

३)तारुण्यसुलभ कामनांची सक्तीने गोठवणूक केली जाते

४)निरंतर कष्टप्रद व अवमानयुक्त आयुष्याची सजा भोगावी लागते .

५)पुरुषी विषयवासनेस बळी पडण्याचे भय अखंड राहते .

पती –पत्नीच्या नातेसंबंधातील शोषणाकडे ताराबाईनी सर्वांचे लक्ष वेधले आहे .ताराबाई म्हणतात ,'तुम्हाला जशी वाईट ,कुरूप ,दुर्गुणी ,गावंढळ बायको आवडत नाही तसा बायकोला तरी असा नवरा आवडेल का ?येते देखील त्यांनी स्त्री – पुरुष नात्यातील असमतोलाकडे लक्ष वेधले आहे .ज्या काळात पुरुष सुधारक स्त्रियांच्या दु:स्थितीकडे केवळ सहानुभूतीने पाहत होते ,त्या काळात एका स्त्रीने पुरुषांच्या वर्चस्वाला आव्हान देणे ही केवढी क्रांतिकारक घटना म्हणावी लागेल .

**प्रश्न क्रमांक ०३ :-ताराबाई शिंदेनी केलेल्या पुरुषांच्या दुर्गुणांची मीमांसा स्पष्ट करा ?**

उत्तर:-'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकातील निम्म्याहून अधिक भाग पुरुषांच्या ठायी असणाऱ्या दुर्गुणांची मीमांसा करण्यात खर्ची पडला आहे .याचे कारण जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत आहेत किंवा नाही हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने हा निबंध लिहिला आहे असे त्या प्रारंभीच नमूद करतात .पुरुषांच्या अपरिमित विषय लालसेमुळे स्त्रियांची अवस्था दयनीय व करुणास्पद होते ,त्यांना वस्तुवत वागविले जाते असा रास्त आक्षेप ताराबाईनी वारंवार घेतला आहे .याची नोंद त्यांनी आपल्या पुस्तकात पुढीलप्रमाणे केली आहे

१)व्यक्तिगत जीवन :-प्रेमिक म्हणून नाना प्रकारची प्रशंक्षा करून प्रेमाचे खोटे नाटक करायचे ,तिचा उपभोग घ्यायचा व अपत्यसंभवामुळे स्त्री अडचणीत आली की झटकून मोकळे व्हायचे .

२)धार्मिक जीवन :-देव या पातळीवर सारे देव पुरुषांचे पक्षपाती ,त्यांचे सहय्यकर्ते आणि म्हणून सत्ता संबंधातही पुरुषांच्या बाजूचे .

३)कुटुंबजीवन ;-

अ)वडील म्हणून :-मुलीचे विवाह सोयीने व स्वार्थाने लावून देणारे पुरुष (कसाबाला गाई विकाव्या त्याप्रमाणे.

ब)सासरा –दीर म्हणून :-विधवेच्या केशवपनास कारण,विधवेला निर्दयी वागणूक देणारे

क)पती म्हणून :-बायकोला वस्तुवत म्हणून गुलामाप्रमाणे वागविणारा,वृद्धापकाळातही पुनर्विवाहाची तयारी ठेवणारा,मालकी हक्क दाखवून मारहाण करणे व जेणेकरून स्वत:ची सत्ता अबाधित राखणारा .

४)सार्वजनिक जीवन :-सुखलोलुपता,नामर्दपणा,कृतघ्नता,स्वभिमानशुन्यता,दगाबाजी,स्त्रीला अज्ञानात ठेवून ती सतत आपल्या अंकित राहील अशा प्रकारे वर्तन .

पुरुषांचे दुर्गुण स्पष्ट करून झाल्यानंतर आणि त्याबद्दल त्यांची भरपूर हजेरी घेतल्यानंतर त्या त्यांना सदाचाराचा सल्ला देतात आपली वागणूक जर त्यांनी विवेकवान ठेवली आणि आपल्या अमर्याद कामविकारावर जर त्यांनी नियंत्रण मिळविले तर घरोघरी असणाऱ्या स्त्रिया आपोआपच पातीव्रत्याचे आनंदाने आचरण करतील व सर्व घरे सुखी होतील ,असा आशावाद त्या व्यक्त करतात .

# जोतीबा फुले (महात्मा जोतीराव फुले)
# (१८२७ ते १८९० )

**प्रश्न क्रमांक ०१ ;-महात्मा फुलेंचे स्त्री शिक्षण विषयक विचार आणि कार्ये लिहा . ?**

उत्तर:-आधुनिक शिक्षण पद्धतीचा प्रारंभ ब्रिटीश राजवटीत झाला.त्यात उच्चवर्णीयांच्या मुलांचा भरणा अधिक होता.शिक्षण ही ब्राह्मण जातीची मिरासदारी झाली होती .अशा प्रतिकूल परिस्थितीत जोतीबा स्वतः शिकले .त्यांनी आधुनिक शिक्षणाचे महत्व ओळखले .सर्वसामान्य जनतेला विशेषत:शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अतोनात कष्ट केले . समाजपरिवर्तन व विकासाच्या दृष्टिने शिक्षणाला फार महत्व आहे असे जोतीरावांचे मत होते.शिक्षणाचे महत्व सांगतांना ते म्हणतात ,'विद्येविना मती गेली,मतीविना नीती गेली ,नीतीविना गती गेली ,गतीविना वित्त गेले ,वित्ताविना शुद्र खचले,इतके अनर्थ एका अविद्येने केले.'स्त्रिया आणि शूद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नसल्यामुळे त्यांची अधोगती झाली आहे .स्त्रीयांमुळे समाजाचा व राष्ट्राचा विकास होतो ,अशी त्यांची धारणा होती .ते म्हणतात ,'जिच्या हाती पाळण्याची दोरी ,ती जगा उद्धारी.'म्हणून त्यांनी सर्वप्रथम स्त्रियांच्या शिक्षणाला महत्व दिले .जोतीरावांनी सामाजिक रूढी,परंपरांविरुद्ध बंड पुकारले आणि ऑगस्ट १८४८ मध्ये पुणे येथे बुधवारपेठेतील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली .या शाळेत शुद्रातीशुद्रातील स्त्रियांना शिक्षण देण्यात येऊ लागले .या दृष्टिने फुले यांनी सुरु केलेली ही शाळा देशातील पहिली मुलींची शाळा ठरली .त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल १६ नोव्हेंबर १८८२ रोजी'स्त्रीशिक्षणाचे आद्यजनक'म्हणून ब्रिटीश सरकारने त्यांचा गौरव केला .

प्रौढ स्त्री –पुरुषांच्या शिकक्षणाची सोय व्हावी म्हणून महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी इ.स.१८७५ मध्ये रात्रीची शाळा सुरु केली .ही शाळा त्यांनी आपल्याच घरी चालविली .या शाळेत जोतीराव आणि सावित्रीबाई दररोज दोन तास प्रौढ स्त्री –पुरुषांना शिकवित असत.समाजातील प्रत्येकाला शिक्षण घेता यावे,हाच रात्रीची शाळा स्थापन करण्याच्या पाठीमागचा त्यांचा उद्देश होता .याच दृष्टिकोनातून पुढे भारत सरकारने प्रौढ स्त्री –पुरुषांना साक्षर करण्यासाटी प्रौढ शिक्षणपद्धतीच्या अंतर्गत रात्रीच्या शाळा सुरु केल्या .यावरून महात्मा फुलेंच्या शिक्षणाबाबतच्या दूरदृष्टीत्वाची आपण कल्पना करू शकतो .

**प्रश्न क्रमांक ०२ :-महात्मा फुलेंचे स्त्री अधिकारविषयक विचार आणि कार्य लिहा ?**

उत्तर :-त्या काळात स्त्री ही पुरुषांपेक्षा कनिष्ठ आहे ,तीचे कार्य चूल आणि मुल एवढ्यापुरतेच मर्यादित आहे असे मानले जात होते .स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता .जरठ विवाह प्रचलित असल्यामुळे बालाविधवांची संख्या वाढत होती .विधवांवर केशवपनाची सक्ती होती .विधवांना अत्यंत असहाय्य स्थितीत जीवन जगावे लागत असे .विधवांवर पुन्हा विवाह न करण्याबाबतची बंधने हा हिंदू धर्मास एक मोठा कलंक आहे असे ते म्हणत असत . ८ मार्च १८६४ रोजी त्यांच्या प्रयत्नाने एका अठरा वर्ष वयाच्या विधवेचा त्याच जातीतील विधुराबरोबर पुनर्विवाह लावून देण्यात आला .हा पहिला पुनर्विवाह होता .त्यानंतर जोतीरावांनी समाजातील विधवा विवाहास उत्तेजन देण्याच्या कार्यास स्वत:ला वाहून घेतला .दुर्दैवी विधवा स्त्रियांची समाजाच्या जाचापासून सुटका करण्यासाठी महात्मा फुल्यांनी १८३३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले .अनैतिक संबंधातून प्रसूत झालेल्या मुलांच्या संगोपनाची व पालनपोषणाची जबाबदारी फुले दांपत्याने घेतली. काही लोभी पुरुष आपल्या कामवासना पूर्ण करण्यासाठी दोन तीन लग्नाच्या बायका करून नांदवितात .स्त्रियांनी जर दोन –तीन नवरे केल्यास तुम्हाला आवडेल का असा प्रतिप्रश्न ते पुरुषांना करतात .आणि स्वतः पुन्हा दुसरा विवाह करण्यास नाकारतात .विवाहाच्या वेळी मुलीचे वय ८ आणि मुलाचे वय १२ वर्ष होते .यामुळे वयाच्या ९ किंवा १० व्या वर्षी कुमारी असतानाच वैधव्य आलेल्या बालिका विधवांची स्थिती अत्यंत वाईट होती .त्यामुळे जोतीरावांनी बालविवाहाच्या प्रथेला विरोध केला .त्याकाळात वधू ८-९ वर्षाची आणि वर ८० -८५ वर्षाचा असे .यामुळे जरठ विवाहाचा ,बालविवाहाचा आणि बहुपत्नीत्वाचा विरोध केला आहे .तसेच केशवपन प्रथेविरुद्ध जनजागृती केली .जोतीराव हे केवळ नवीन विचार मांडणारे विचारवंत नव्हते तर नवीन विचारांना कृतीची जोड देणारे कृतीशील सुधारक होते.सतीप्रथेच्या बाबतीत जोतिबांनी तर्कशुद्ध

विचार मांडला.तो म्हणजे पतीच्या निधनानंतर त्याच्या पत्नीला सती जाण्यास भाग पाडले जाते .मग पत्नीच्या निधनानंतर पतीनेही सती गेले पाहिजे असा प्रतिप्रश्न ते करतात .याचा अर्थ त्यांनी सतीप्रथेबद्दल जनजागृती केली .महाराष्ट्रात २४५ ठिकाणी खंडोबाची स्थाने आहेत .आपल्याला पुत्रप्राप्तीसाठीखंडोबाला नवस बोलला जातो अशा वेळी खंडोबाला सोडलेल्या मुलाला 'वाघ्या' व मुलीला 'मुरळी' असे म्हणत असत .त्याप्रमाणेच त्यांना देवदासी असे म्हणत .उच्च वर्ग त्यांचे शारीरिक शोषण करीत असत .या अनिष्ट प्रथेत सुधारणा घडवून आणण्यासाठी जोतीरावांनी प्रयत्न केला .त्यामुळेच त्यांना स्त्रियांचे पहिले उद्धारक व कैवारी समजले जाते .त्यांनी ईश्वराला निर्मिक संबोधिले व सत्यशोधक समाज या संघटनेची स्थापना केली .ही संघटना बुद्धिप्रामाण्यवाद व व्यक्ती स्वातंत्र्य या प्रमुख तत्वांवर आधारित होती .

# सावित्रीबाई फुले
## (१८३१ ते १८९७)

**प्रश्न क्रमांक ०१ :-सावित्रीबाई फुलेंचे स्त्री शिक्षणविषयक विचार व कार्ये लिहा ?**

उत्तर :-सावित्रीबाई या देशातील पहिल्या स्त्री शिक्षिका होय .त्यांनी केवळ वर्गात मुलींना शिकविण्याचे कार्य केले नाही,तर त्यांनी आपल्या सेवा कार्यकाळात शिक्षणाच्या बाबतीत काही महत्वाचे प्रयोगही राबविले .शैक्षणिक सिद्धांत मांडले .याशिवाय तळागाळातील लोकांचे प्रबोधन करण्यासाठी त्यांनी संपूर्ण जीवनच अर्पण केले .

१)मुलींच्या शाळेची स्थापना :-०१ जानेवारी १८४८ रोजी फुले दांपत्यांनी पुण्यात मुलींची शाळा सुरु केली .सर्व अडी – अडचणीवर मात करून त्यांनी अवघ्या ०४ वर्षात १६ शाळांची स्थापना केली .शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक अत्यंत प्रभावी तंत्र वा साधन होय असे सांगणारे फुले दांपत्य हे भारतातील पहिले शिक्षणतज्ज्ञ होय .मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी घरोघरी हिंडून भीक मागितली.स्त्री –शुद्रातिशुद्रांचे काजळलेले,मागासलेले जीवन प्रकाशमान व्हावे यासाठी त्यांनी तन –मन –धनाने सर्व काही केले.एका स्त्रीने स्वबळावर व जिद्दीवर एक शाळा चालविणे ही भारतीय इतिहासातील पहिली घटना होय.विनावेतन व त्याग बुद्धीने काम करणारे सावित्रीबाईसारख्या शिक्षिका मिळणे दुर्मिळच .२)शिक्षण हा स्त्री –शुद्रातीशुद्रांचा हक्क :-फुले दांपत्याने शिक्षण प्रसाराचे कार्य आयुष्यभर केले .स्त्रिया आणि शुद्रातीशुद्रांना शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी फुले दांपत्याने जो संघर्ष केला म्हणूनच आचार्य दादा धर्माधिकारी यांनी फुले दांपत्याला 'क्रांतीचे अग्रदूत' असे संबोधून त्यांच्या कार्याचा गौरव केला .

३)शिक्षण मंडळाची स्थापना :-समविचारी मंडळींना सोबत घेऊन शाळा चांगल्या प्रकारे चालविण्यासाठी त्यांनी एक संस्था –मंडळ स्थापन केले .भारतामध्ये जे संस्थात्मक कामाचे जाळे उभारले गेले व त्यातून देशात जी कामे झाली ते जोतीराव व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे फलित मानावे लागते .शिक्षणसंस्थेसाठी मंडळ स्थापन करणे ही फुले दांपत्यांनी केलेली आधुनिक भारतातील शिक्षण व्यवस्थेची पायाभरणी होय .

४)शैक्षणिक सिद्धांत :-गरीब स्तरातील मुलांना शाळेत आणून त्यांना शिक्षणाची गोडी लागावी यावर सर्व बाबींचे चिंतन –मनन केल्यानंतर त्यांना ज्या गोष्टी महत्वपूर्ण वाटल्या ,त्यांची मांडणी आपल्या सिद्धांतात केली .

अ)शिक्षणाचे मूळ संस्कारात आहे .

ब)गर्भाव्यवस्थेच्या काळात गर्भवती स्त्रीची जी मानसिक स्थिती असते ,त्याचा परिणाम पुढील पिढीवर होतो.

क)स्त्रीला एक व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाल्या शिवाय समाजाची अधोगती थांबणार नाही .

ड)नवीन पिढी निरोगी व्हावयाची असेल तर समाजाचे नैतिक स्वास्थ्य निरोगी व सुसंपन्न असायला हवे .

शैक्ष णिक प्रयोग :-

१)जातीनिहाय शिक्षक :-ब्राह्मण शिक्षक ब्राह्मणेत्तर विद्यार्थ्यांना शिकविण्यास तयार नसत .म्हणून त्यांनी शूद्रातिशूद्र मुलींसाठी स्वतः शिक्षिका म्हणून कार्य केले.परीक्षेच्या निकालात शुद्र मुली मागे असल्यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला की ,विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर त्यांच्या घरची परंपरा व सामाजिक स्थिती यांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव असतो .

२)आनंददायी शिक्षण :-आनंददायी शिक्षणाच्या प्रयोगात सावित्रीबाईनी स्वतः कविता शिकवितांना अभिनव पद्धतीचा वापर केला .त्यामुळे मुला-मुलींमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण झाली .शुद्र मुला –मुलींचे शिक्षणाविषयीचे नैराश्य घालविण्याच्या दृष्टिने त्यांचा हा प्रयोग अलौकिक होता .

३)रात्रशाळा व प्रौढ शिक्षण :-शुद्र व बहुजन समाजातील सर्व वयोगटातील स्त्री –पुरुषांना शिक्षण देण्यासाठी रात्रशाळा सुरु केली .रात्रशाळेत शिकून काहीजण ज्ञानी झाल्यामुळे या प्रयोगाला मोठे यश प्राप्त झाले .

४)स्वयंरोजगारात्मक शिक्षण :- प्रौढ,कष्टकरी शेतकऱ्यांना पाटाचे पाणी कसे वापरावे ,भाजीपाला व फळबागेसाठी कोणत्या प्रकारची मशागत करावी इत्यादी व्यावसायिक व व्यवहारोपयोगी शिक्षण दिले .यामुळे आपण शिक्षण घेतलेच पाहिजे ,अशी जाणीव प्रौढांमध्ये विकसित झाली .त्यामुळे सावित्रीबाई अन्य शिक्षणतज्ज्ञांपेक्षा वेगळ्या ठरतात .त्यामुळे 'विद्येची देवता' असे स्त्रीशिक्षण कार्याचे प्रसारक अभिमानाने म्हणतात .

**प्रश्न क्रमांक ०२:-सावित्रीबाई फुलेंचे स्त्रिअधिकार विषयक विचार आणि कार्ये लिहा.**

उत्तर :-स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायामुळे त्यांच्या सबलीकरणासाठी काहीतरी करण्याची आवश्यकता आहे म्हणून समाजप्रबोधनाचा मार्ग तर अवलंबिलाच ,याशिवाय त्यांनी काही उपाय योजलेत.

१)बालविवाहास विरोध :-सत्यशोधक समाजाअंतर्गत पुरोहिताने विवाह लावून देण्यास नकार दिलेले विवाह हुंड्या शिवाय कमी खर्चात लावून देण्याचा कार्यक्रम हाती घेतला.या विवाहाचा खर्च स्वतःसावित्रीबाई करीत असत .फुले दांपत्याने आणि सत्यशोधक समाजाने बालविवाह प्रथेविरुद्ध लोकमत तयार करून बालविवाह पद्धतीला उघडपणे विरोध केला.

२)अस्पृश्यता निवारण :-अस्पृश्यांकरिता फुले दांपत्यांनी स्वतःच्या मालकीची विहीर १८६८ साली खुली केली.कुणीही अस्पृश्य बालक,वयोवृद्ध,बंधूभगिनी यांनी येवून पाणी भरून न्यावे अशी दवंडी दिली .विहिरीजवळ तशी पाटीही लावली .पुढे डॉ .आंबेडकरांनी जे चवदार तळ्याचे आंदोलन केले,त्या आंदोलनाची दिशा आणि पार्श्वभूमी सावित्रीबाईनी तयार करून ठेवली .'आधी केले मग सांगितले'अशी सावित्रीबाईची वृत्ती होती .

३)बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना ;-विधवेच्या पोटी जन्माला येणाऱ्या बाळाचा आपण सांभाळ करू,असे फुले दांपत्याने जाहीर केले .या गृहाची संपूर्ण भिस्त सावित्रीबाईवर होती .१८८४पर्यंत या गृहात ३५ ब्राह्मण विधवांची बाळंतपणे सावित्रीबाईनी केली .पुढे याच गृहात आलेल्या काशीबाई नावाच्या विधवेचे यशवंत हे मुल फुले दांपत्याने दत्तक घेतले .

४)जातीभेद निर्मुलन :-हळदी-कुंकू आणि प्रौढ शिक्षण या दोन कार्यक्रमातून सावित्रीबाईनी देशात समाजक्रांतीची सुरवात केली .भजन,भोजन,पाणवटे,एकमेकांचा निकटचा सहवास या सर्वांद्वारे त्यांनी शिवा –शिव प्रथेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला.हळदी-कुंकवासारख्या कार्यक्रमातून मानवजातीला एकत्र आणण्याचे स्तुत्य कार्य त्यांनी केले .

५)केशवपन पद्धतीस विरोध :-२३ मार्च १८९० रोजी खुल्या मैदानात न्हाव्यांच्या सभेला ५०० न्हावी उपस्थित होते. या सभेत 'केस हा स्त्रियांचा अनमोल असा दागिना असून केवळ व्यावसायिक दृष्टिने आपण तो हिरावून घेऊ नये' असा ठराव मंजूर करण्यात आला.पेशवेकाळापासून सुरु असलेल्या या अमानवी व क्रूर प्रथेला लगाम लावण्याचे धाडस सावित्रीबाईनी केले.६)महिला सेवा मंडळ :-सावित्रीबाईनी वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली.या मंडळाने विधवा पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी हळदी –कुंकू,प्रौढ स्त्रियांचे शिक्षण ,रसपान ,व्यसनाच्या अधीन गेलेल्या पुरुषांच्या जाचातून स्त्रीमुक्ती करणे ,या मंडळामार्फत त्या महिलांकडून सूतकताई करून,
त्यांच्या रजया शिवून त्यांची विक्री करीत असत .महिला सबलीकरणाच्या दृष्टिने त्यांचे हे कार्य अत्यंत महत्वपूर्ण होते .त्यांच्या सेवाकार्यातून आणि विचारांमधून सामाजिक जाणीवा,लोकाभिमुखता,युगप्रवर्तक असे कार्ये करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला होय .


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २०२१ च्या नव्या अभ्यासक्रमानुसार


# B.A.THIRD YEAR 5th SEMESTER

# भारतीय समाज संरचनात्मक आव्हाने

# INDIAN SOCIETY:THE STRUCTURAL ISSUES














1) Problems of Caste system
2) Domestic Violence
3) Old age People Home
4) Tribal Problems
5) Un-employment
6) Farmers Suicide

AUTHOR
DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR
DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE. VASANTRAO KOLHATKAR ART'S COLLEGE, ROHANA
TAH.ARVI DIST.WARDHA (M.S.)

**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur**
**B.A.Third Year: Semester-V**
**Indian Society:The Structural Issue**

**1) Indian Society,Structure and Inequality**

A) Caste as Structure of Ineqality and Discrimination.
B) Problems of Scheduled Caste and Other Backward Castes.
C) Constitutional Provisions for Scheduled Castes.
D) Mandal Commission for Other Backward Castes.

**2) Family in Contemporary India:**

A) Intra and Inter Generational Conflict:Meaning,Causes and Measures to Check them.
B) Dowry,Divorce and Domestic Violence.
C) Problems of Elderly People.

**3) Tribal Issues and Problems in India:**

A) Tribal Problemes:Education,Development and Agrarian Problem.
B) Social Mobility and Change:Hinduisation.
C) Reservation Among the Tribals,Provision of Schedule V,PESA & Forest Act.

**4) Rural Community in India:**

A) Migration: Causes & Consequences.
B) Un-employment:Causes & Consequences.
C) Farmers Suicide & its Impact on Family.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

**बी.ए. भाग ३**

**सेमीस्टर पाचवे**

**भारतीय समाज : संरचनात्मक आव्हाने (समस्या)**

# (Indian Society : The structural Issue)

## युनिट क्र. १ भारतीय समाज : संरचना आणि विषमता

## (Indian Society : Structure and Inequality)

================================================

**प्रश्न क्र. १ :— जाती विषमतेचा अर्थ स्पष्ट करुन भारतीय समाजातील जाती विषमता व भेदभाव दर्शविणारे प्रमुख घटक लिहा?**

उत्तर :— भारतीय समाज संरचना जातीवर आधारीत आहे. जाती हेच सामाजिक व आर्थिक विषमतेचे एक कारण आहे. जाती हा भारतीय समाजातील स्तरीकरण व्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ आहे. भारतातील जातीव्यवस्थेला सुमारे ३००० वर्षाचा ऐतिहासिक वारसा आहे. या प्रदीर्घ कालखंडात जातीव्यवस्थेत अनेक बदल झालेत. वर्गव्यवस्था निर्माण होवून मागील ५०—६० वर्षात चांगलीच स्थिरावली आहे असे असले तरी जातीव्यवस्था अद्यापही आपले अस्तित्व टिकवून आहे.

**जाती विषमतेचा अर्थ :—** समानतेचा अभाव किंवा समान नसण्याची स्थिती असा असमानता या संज्ञेचा अर्थ आहे. सर्व व्यक्तींचा सामाजिक दर्जा एकसारखा नसतो हे सामाजिक विषमता निर्माण होण्याचे मुळ कारण आहे. व्यक्तीचा सामाजिक दर्जा निर्धारीत करण्याचे दोन प्रमुख आधार आहेत ते म्हणजे १) जन्मानुसार मिळालेली वैशिष्टये २) जन्मानंतर मिळवलेली वैशिष्टये अनुवंशिकता ही जन्मानुसार प्राप्त होते तर व्यक्ती जी वैशिष्टये स्वत: संपादित करतो त्याला मिळवलेली वैशिष्टये असे म्हणतात. जसे शिक्षण, संपत्ती इ. परंतु काही समाजात मात्र जन्मानुसार मिळालेल्या वैशिष्टयांवर अधिक भर दिला जातो. अशा समाजात विषमता अधिक असते तसेच सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे मार्गही कमी असतात. जाती असमानतेची स्थिती

ही व्यक्तीच्या वाटयास तिच्या जन्मापासून येते आणि ती व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत कायम असते.

जातीच्या व्याख्या :—

१. प्रा.सी.एच. कुले यांच्या मते :— ''अनुवंशिकतच्या तत्वावर आधारलेल्या वर्गास जात असे म्हणतात.''

२. प्रा. मुजुमदार यांच्या मते :— ''जात म्हणजे साचेबंद वर्ग होय.''

उच्च—नीच भेद हे जाती व्यवस्थेचे आज सर्वात जास्त खटकणारे वैशिष्टय आहे. ते या व्यवस्थेवरुन स्पष्ट होत नाही म्हणून जातीच्या लक्षणांचे अध्ययन करण्यावर अधिक भर दिला जातो. डॉ. धुर्येंच्या मते, १) समाजाचे खंडात्मक विभाजन २) उच्च—नीच श्रेणी ३) विवाहावर निर्बंधने ४) सामाजिक—धार्मिक निर्योग्यता व विशेषाधिकार ५) सामाजिक व्यवहारांवर निर्बंधने ६) व्यवसायावर प्रतिबंध ही प्रमुख लक्षणे आहेत.

भारतीय समाजातील जाती विषमता व भेदभाव दर्शविणारे प्रमुख घटक :—

**१. <u>अस्पृश्यता</u> :—** ज्याला स्पर्श करणे योग्य नाही ते अस्पृश्य. भारतीय समाज व्यवस्थेत खोटया कल्पनांच्या आहारी जावून कोटयवधी लोकांना अस्पृश्य म्हणजे अपवित्र ठरविण्यात आले. त्याचा स्पर्शच काय सावली देखील निषिध्द मानली जावू लागली. थोडक्यात अस्पृश्यांच्या वाटयास पशुंपेक्षाही वाईट अशी जीवनस्थिती आली.

**<u>व्याख्या</u>** :— मुजुमदार यांच्या मते ''ज्यांच्यावर सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय निर्योग्यता लादण्यात आला अशा जाती म्हणजे अस्पृश्य जाती होय.''

भारतात शूद्र, अस्पृश्य, अवर्ण, हरिजन, दलित, पाचवा वर्ण, पददलित इत्यादी विविध नावांनी अस्पृश्यांना संबोधिले जात होते. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत 'अनुसूचित जाती' याच शब्दाचा स्वीकार केला आहे. एखाद्या जातीचा समावेश अनुसूचित जातींच्या यादीमध्ये करावा की करु नये हे निश्चित करण्यासाठी पुढील चार कसोटया सुचविल्या आहेत. १) हिंदू समाजातील अस्पृश्य जातींचे गट २) जातीमधील लोकांची शैक्षणिक क्षेत्रात फारशी प्रगती नसणे. ३) त्यांचा सरकारी नोकरीत फारसा

प्रवेश झालेला नसणे. ४) व्यापार, उद्योग, व्यवसाय या क्षेत्रात त्यांची प्रगती नसणे. सद्य:स्थितीत या यादीमध्ये एखाद्या मागासवर्गीय जातीचा समावेश करणे हे अत्यंत अवघड झाले आहे.

**अस्पृश्यांच्या निर्योग्यता** :—

१) **धार्मिक निर्योग्यता** :— अस्पृश्यांना मंदिरामध्ये प्रवेश करण्यास बंदी होती. अस्पृश्यांना वेदमंत्र म्हणण्याचा व ऐकण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता. विवाहाप्रसंगी धार्मिक विधी करण्याचा अधिकार नव्हता. अस्पृश्यांसाठी स्मशानभूमी देखील वेगळी होती.

२) **आर्थिक निर्योग्यता** :— अस्पृश्यांना व्यवसाय निवडीची संधी नाकारल्यामुळे त्यांना सेवाकार्य करावी लागत होती. आर्थिकदृष्टया गरीबी असल्यामुळे सवर्णाच्या दयेवरच त्यांना अवलंबून रहावे लागत असे.

३) **सामाजिक निर्योग्यता** :— शिक्षण घेण्याचा व संस्कृत भाषा शिकण्याचा अधिकार अस्पृश्य जातीसमूहांना नव्हता. सवर्ण जातीच्या समवेत सार्वजनिक विहीर, तलाव आदी ठिकाणी पाण्याचा उपयोग करता येत नसे. गावाबाहेर अस्पृश्यांची वेगळी वस्ती असे. त्यामुळे श्रेणीरचनेत अस्पृश्य जातीचे स्थान सर्वात शेवटचे आहे असे मानले जात असे.

४) **राजकीय निर्योग्यता** :— शिक्षण घेण्याच्या अधिकारांपासून आणि मतदान करण्याच्या अधिकारापासून अस्पृश्यांना वंचित करण्यात आले होते. कायदेशीर तरतूद केल्यामुळे निर्योग्यता नष्ट झाल्या तरीही अस्पृश्यतेचे पूर्णत: उच्चाटन झालेले नाही.

**अस्पृश्यावर लादलेल्या निर्योग्यतांचे परिणाम** :—

१) **आर्थिक विषमता** :— अस्पृश्य जातींच्या वाटयास अत्यंत अल्प उत्पन्न देणारे रोजगार असल्यामुळे अस्पृश्यांना दारिद्रयाच्या समस्येने ग्रासले. त्यांचा परिणाम म्हणून आर्थिक विषमतेत वाढ झाली. २) **ऐक्यभावाचा अभाव** :— एकीकडे सवर्ण अस्पृश्यांना आपल्यापेक्षा कनिष्ठ व तुच्छ मानीत होते तर दुसरीकडे अस्पृश्य सवर्णांपेक्षा स्वत:ला वेगळे मानू लागले. त्यामुळे भारतीय समाजात सामाजिक

ऐक्यभाव निर्माण होवू शकला नाही. **३) <u>धार्मिक परिणाम</u>** :— अस्पृश्यांना धार्मिक अधिकार नाकारल्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मोठया संख्येतील अस्पृश्यांनी बौध्द धर्मात प्रवेश केला. **४) <u>निरक्षरतेत वाढ</u> :—** अस्पृश्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारल्यामुळे अस्पृश्य जातीसमूह अन्य जातीसमूहांच्या तुलनेत शिक्षणात माघारलेला राहिला. **५) <u>आरोग्यावर परिणाम</u> :—** घृणित व अस्वचछ व्यवसाय करणाध्या अस्पृश्य जातीच्या लोकांना गावकऱ्यांनी गावाबाहेर रहावयास भाग पाडले. त्यामुळे अस्पृश्य जातीच्या आरोग्याचा स्तर खालावला. **६) <u>राजकीय फूट</u> :—** अस्पृश्यांनी स्वत:साठी हिंदूपेक्षा वेगळया अशा मतदार संघाची केलेली मागणी गांधीच्या उपोषणामुळे डॉ. आंबेडकरांनी मागे घेतली.

२. मागासवर्गीय जाती :— कुंभार, माळी, गुरव, साळी, वाडी, लोहार, कोल्हाटी, सुतार वा शिंपी यासारख्या अनेक जातींचा समावेश अन्य मागासवर्गीय जातींमध्ये होतो. बलुतेदारी पध्दतीमुळे हे सर्व जातीसमूह परंपरेनुसार निश्चित झालेल्या व्यवसायाला घट्ट चिकटून राहीले. आधुनिक शिक्षणाची संधी त्यांच्या वाटयास न आल्यामुळे आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेले राहीले. तसेच अन्य मागासवर्गीय जातीसमूह हे जातीसंरचनेच्या विषमतेचे शिकार ठरले आहेत.

३. जातीवाद :— समाजाचे व देशाचे हित ध्यानात न घेता आपल्याच जातीबांधवांचे कल्याण करण्यासाठी विकसित झालेली प्रवृत्ती म्हणजे जातीवाद होय.

व्याख्या :— १) डॉ. जी.एस. घुर्ये यांच्या मते :— ''आजकाल जातीय एकतेची भावना इतकी दृढ झालेली आहे की ती खऱ्या अर्थाने जातीभक्तीच मानता येईल.''

२) डॉ. प्रसाद यांच्या मते :— ''जातिवाद म्हणजे राजकारणात रुपांतरीत झालेली जातीवरील निष्ठा होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता स्वत:च्या जातीपुरत्याच निष्ठा मर्यादित होणे हाच जातीवादाचा अर्थ आहे. यामुळे इतरांना दुखविणे, त्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण करणे असे वर्तनप्रकार वाढले आहेत. आपल्याच जातीगटाविषयीचा हा अतिरेकी प्रेमभाव घातक आहे. समाजविघातक आहे. म्हणून जातीवाद ही देशासमोर असणारी एक गंभीर समस्या मानली जाते.

**प्रश्न क्र. २ :— अनुसूचित जाती आणि अन्य मागासवर्गीय जातींच्या समस्या लिहा?**

उत्तर :— ग्रामीण भागात भारताच्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जातींची संख्या सुमारे २०.१ कोटी आहे. एकूण लोकसंख्येत त्यांचे शकडा प्रमाण १८.४२ टक्के आहे. त्यांची सर्वात जास्त लोकसंख्या उत्तरप्रदेशात आहे. ग्रामीण भागात ते अल्पभूधारक, बटाईदार कार्ये करतात. कातडी उद्योग आणि साफसफाईचे काम करणारे जवळ—जवळ सर्व कामगार अनुसूचित जातीतील आहेत. पिढयानूपिढया वंचिततेच्या स्थितीत राहिल्यामुळे त्यांच्या काही समस्या निर्माण झाल्या आहेत.

**१) सामाजिक समस्या** :— महार, मांग, चांभार, खाटिक, भंगी या सर्व अनुसूचित जातींमध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ या आधारावर क्रम लावला जातो. महारापेक्षा मांग समूह हा कनिष्ठ दर्जा असणारा आहे असे समजले जाते. परिणामी या संपूर्ण जातीसमूहात न्युनगंडाची भावना निर्माण झाली असून त्यामुळे त्यांच्यात गतिशीलतेचा अभाव निर्माण झाला आहे. गरिबी, कर्जबाजारीपणा, सामाजीक अन्याय, सामाजिक शोषण, उपेक्षा आदींमुळे या जातीसमूहांमधील लोकांचे सामाजिक जीवन अतिशय दयनीय झाले आहे.

**२) आर्थिक समस्या** :— मेलेली जनावरे उचलणे, त्यांची चामडी काढून विकणे या व्यवसायांमध्ये आर्थिक प्राप्तीचे प्रमाण फारच कमी होते. काही जातींना परंपरेने ठरलेला कोणताही व्यवसाय नसल्यामुळे तसेच शेतमजूर म्हणून काम सुरु करु देण्यास उच्च जातीचे लोक तयार नाहीत. त्यामुळे व्यवसाय निवडीच्या स्वातंत्र्याचा अभाव, परंपरेने प्राप्त झालेले घृणित व्यवसाय, वेठबिगारी, कर्जबाजारीपणा यामुळे या जातीसमूहाचे आर्थिक जीवन कमालीचे खालावले.

३) शैक्षणिक समस्या :— ग्रामीण भगात अनुसूचित जातींच्या मुला—मुलींचे शिक्षणामधील गळतीचे प्रमाण स्वातंत्र्योत्तर काळातही अधिक आहे. ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण मिळण्याची सोय नाही. यामुळे ग्रामीण भागातील अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचे स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होण्यामध्ये फार कमी प्रमाण आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या अभावामुळे ग्रामीण भागातील अनुसूचित जातींच्या युवकांना कुशल कामगार म्हणून रोजगाराच्या संधी मिळत नाही.

४. आरोग्य विषयक समस्या :— स्वच्छ पाण्याचा अभाव, गलिच्छ वस्त्यांमध्ये वास्तव्य, सकस आहाराचा अभाव, कुपोषण, निवासविषयक अपुऱ्या सोयी यातून त्यांचे आरोग्यविषयक प्रश्न निर्माण झाले आहेत.

५. कल्याणविषयक समस्या :— शिक्षण संस्थात प्रवेशासाठी आणि नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जातींसाठी आरक्षणाची तरतूद केलेली असली तरीही त्याचे लाभ गरीब वर्गापर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कल्याणासाठी नव्याने कार्यक्रम तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

६. सांस्कृतिक समस्या :— जन्म, विवाह व मृत्यू यासारख्या प्रसंगी धार्मिक विधी करावयास पुरोहित वर्ग तयार नसल्यामुळे अनुसूचित जातींमध्ये फारशा उच्च सांस्कृतिक परंपराच निर्माण झाल्या नाहीत. त्यांची दारिद्र्यजन्य संस्कृती त्यांच्या प्रगतीच्या मार्गात बाधक ठरली आहे.

७. विकाासाच्या समस्या :— पुरेसे उत्पन्न मिळवून देणारा पारंपारिक व्यवसाय नसल्यामुळे त्यांना सेवाकार्य करण्याची सक्ती करण्यात आली. व्यवसायाची कौशल्ये नाहीत, भांडवलाचा अभाव आहे, शिक्षण नाही, शेती नाही म्हणून भूमिहीन शेतमजूर म्हणून जीवन जगण्याची पाळी त्यांच्यावर आली. त्यामुळे ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही क्षेत्रात त्यांचा विकास कसा घडवून आणावा हिच समस्या निर्माण झाली आहे.

**अन्य मागासवर्गीय जातींच्या समस्या :—**

तेली, कुणबी, माळी, सोनार, सुतार यासारख्या महाराष्ट्रातील ३०३ जातींचा इतर मागासवर्गात म्हणजे ओ.बी.सी. मध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यांच्या समस्या पुढीलप्रमाणे,

१. सामाजिक व सांस्कृतिक समस्या :— दारिद्र्यरेषेखालील जीवन, कमी विवाह वय, जाती परंपरांचे पालन, गतिशीलतेचा अभाव, जातीशी निगडीत प्रथा, परंपरांचा प्रभाव यामुळे त्यांच्या सामाजिक संबंधाचे वर्तुळ जातीसमूहाच्या बाहेर फारसे विस्तारित झाले नाही.

२. आरोग्यविषयक समस्या :— शहरी भागामध्ये गलिच्छ वस्त्यांमध्ये निवास, शारीरिक स्वच्छतेचा अभाव, दारिद्रय रेषेखालील जीवन यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत.

३. शिक्षणविषयक समस्या :— ओबीसींमध्ये स्त्री शिक्षणाचे अल्प प्रमाण, मुलींचे गळतीचे जास्त प्रमाण, उच्च शिक्षणासाठी पैशाचा अभाव, शिक्षणापेक्षा रोजगार प्राप्तीला महत्व, शिक्षणाबद्दल आस्था नसणे आणि शैक्षणिक प्रेरणांचा अभाव ही त्यांची मुख्य शैक्षणिक समस्या आहे.

४. विकास व कल्याणविषयक समस्या :— ओ.बी.सी. मध्ये सधन, मध्यम आणि गरीब असे तीन गट असून ४ लाख रुपये उत्पन्न असणाऱ्या क्रिमीलेयरच्या हातात राजकीय सत्तास्थाने केंद्रित झालेली आहेत. त्यामुळे ओबीसींमधील आर्थिक विषमता फारशी कमी होत नसल्याचे दिसून येते.

५. आर्थिक समस्या :— शारीरिक श्रम हेच उपजिवीकेचे साधन, उत्पन्न न देणारे परंपरागत व्यवसाय, गतिशीलतेचा अभाव यामुळे परंपरागत व्यवसायाला चिकटून आहेत.

**प्रश्न क्र. ३ :— अनुसूचित जातीच्या घटनात्मक तरतूदी स्पष्ट करुन त्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठीचे शासकीय उपाय लिहा?**

उत्तर :— १) न्याय्य कारणांसाठी केलेला भेदभाव :— अनुसूचित जाती, जमाती व अन्य मागासवर्ग जातींसाठी ज्या सवलती दिल्या आहेत त्या सवलतींमुळे समानतेच्या तत्वाला बाधा पोहचत नाही असे संविधानात नमूद केले आहे. २) सुरक्षित अथवा राखीव मतदार संघ :— लोकसभा व विधानसभेत राखीव जागा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व नगर परिषद मध्ये राखीव मतदार संघ ठेवण्याची तरतूद विविध घटक राज्यांनी केली आहे. ३) आदेश देण्याबाबत केंद्र सरकारला अधिकार :— जाती—जमातींसाठी विकास योजना तयार करणे व अंमलबजावणीसाठी आदेश देण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. ४) शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधाचे रक्षण :— राज्यघटनेतील ४६ व्या कलमानुसार या जातीसमूहांसाठी आर्थिक व

शैक्षणिक सोयी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनसंस्थेची आहे. ५) अंमलबजावणीची प्रशासकीय व्यवस्था :— ३३८ व्या कलमानुसार राष्ट्रपती आयुक्ताची नियुक्ती करतात. आयुक्त त्या प्रकारचा अहवाल राष्ट्रपतींना देतो आणि तो अहवाल संसदेत विचारार्थ ठेवण्याची व्यवस्था राष्ट्रपती करतात.

**अनुसूचित जातींच्या समस्यांच्या निराकरणासाठीचे शासकीय उपाय :—**

१) आरक्षणाचे धोरण :— अनुसूचित जातींमधील उमेदवारांसाठी गुणवत्ता, वयोमर्यादा यासारख्या पात्रताविषयक अटी शिथील केल्या असून मुलाखत व स्पर्धापरीक्षांसाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रेल्वे प्रवास भाडयात सवलत देण्याचे शासनाने मान्य केले आहे. २) आर्थिक विकासाच्या उपाययोजना :— सिलिंग कायदा, दोर वळणे, चटया, पादत्राणे तयार करण्यासाठी भांडवल पुरवठा व प्रशिक्षण, खरेदी—विक्री संस्था, घरकूल, युवकांना बॅक द्वारा कर्ज देण्याचे आदेश दिले आहेत. ३) शैक्षणिक विकासाच्या योजना :— आयएएस, आयपीएस यासारख्या स्पर्धा परीक्षांसाठी कोचिंग सेंटर, पदवी करीता शिष्यवृत्ती, वस्तीगृहे, शैक्षणिक संस्थांना आर्थिक सहाय्य, पुस्तकांकरीता आर्थिक मदत व उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य इ. ४) राजकीय उपाययोजना :— मंत्रिमंडळात अनुसूचित जातींना प्रतिनिधीत्व, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका मध्ये प्रतिनिधीत्व दिले जाते. ५) कायदेशीर उपाययोजना :— अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा असल्यामुळे दोषी व्यक्तीला जामिनावर सोडू नये अशी तरतूद असणारा कायदा शासनाने केला आहे.

कोटयवधी रुपये खर्च झालेले असूनही या जातीसमूहांचा पूरेशा प्रमाणात आर्थिक विकास झालेला नाही कारण त्या योजनांचा लाभ दलालांचा वर्ग घेत असल्यामुळे लाखो गोरगरिबांना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागते.

**प्रश्न क्र. ४ :— मंडळ आयोगाचे मागासवर्गीय जाती ठरविण्याचे निकष स्पष्ट करुन त्यांच्या शिफारशी व टीकात्मक परीक्षण करा?**

उत्तर :— सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या जाती कोणत्या हे निश्चित करण्यासाठी एका आयोगाची नियुक्ती करण्याचा केंद्र सरकारला अधिकार देण्याची तरतूद भारतीय संविधानात केली. या तरतुदीनुसार भारत सरकारने प्रथम आचार्य काका कालेलकर आयोग आणि नंतर मंडळ आयोग नियुक्त केला. गॅझेटनुसार या आयोगाची १ जानेवारी १९७९ रोजी नियुक्ती मंडल आयोगाने ११ निकष निश्चित केले ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) आर्थिक निकष :— १) अर्धा किलोमीटरपेक्षा जास्त लांब अंतरावरुन पिण्याचे पाणी आणण्याबाबत राज्याच्या शेकडा प्रमाणापेक्षा ५० टक्के शेकडा प्रमाण अधिक आहेत अशा जाती २) कच्च्या घरात राहण्याबाबत राज्याच्या शेकडा प्रमाणापेक्षा २५ टक्के अधिक लोक ज्या जातीमधील आहेत अशा जाती. ३) कुटुंब मालमत्तेच्या सरासरी किमतीबाबत राज्याचा शेकडा प्रमाणापेक्षा २५ टक्के कमी प्रमाण असणाऱ्या जाती ४) उपभोग कर्ज घेण्याबाबत राज्याच्या शेकडा प्रमाणापेक्षा २५ टक्के शेकडा प्रमाण अधिक आहेत अशा जाती.

२) शैक्षणिक निकष :— १) ५ ते १५ वर्षे या वयोगटातील शालेय शिक्षणातून गळणारी मुले—मुली राज्याच्या सरासरीपेक्षा ज्या जातींमध्ये २५ टक्के अधिक आहेत अशा जाती २) ५ ते १५ वर्शे या वयोगटातील मुले—मुली शाळेत न जाणे याबाबत २५ टक्के अधिक आहेत अशा जाती ३) राज्यात मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या आकडेवारीपेक्षा ज्या जातीत २५ टक्के प्रमाण कमी आहेत अशा जाती.

३) सामाजिक निकष :— १) उपजिवीकेसाठी प्रामुख्याने शारीरिक कष्टावरच विसंबून असणाऱ्या जाती २) मागासवर्गीय जाती असे अन्य जातीसमूहांकडून संबोधल्या जाणाऱ्या जाती ३) १७ वर्षांपेक्षा कमी वयात विवाह सरासरीपेक्षा ग्रामीण भागात २५ टक्के स्त्रिया व १० टक्के पुरुष तर नागरी भागात १० टक्के स्त्रिया आणि ५ टक्के पुरुष अधिक आहेत अशा जाती. ४) मजुरीची कार्ये करण्यात राज्याच्या सरासरीपेक्षा

२५ टक्के अधिक स्त्रिया सहभागी होतात अशा जातींचा ओबीसी या प्रकारात समाविष्ट करण्याची पध्दती मंडळ आयोगाने निश्चित केली.

मंडल आयोगाच्या शिफारशी :— मंडल आयोगाच्या अहवालानुसार भारतीय लोकसंख्येत ५२ टक्के लोक मागासवर्गीय जातींचे आहेत त्यामुळे २७ टक्के शासकीय पदे आणि शैक्षणिक सवलती त्यांच्यासाठी राखून ठेवण्याची शिफारस केली ती पुढीलप्रमाणे, १) अनुसूचित जाती प्रमाणेच वयोमर्यादेचा नियम शिथील करावा. २) शासकीय नोकऱ्यांत २७ टक्के जागा राखीव असाव्यात. ३) अनुसूचित जातीप्रमाणेच रोष्टर पध्दती ओबीसींसाठी लागू करावी. ४) बढतीमध्ये २७ टक्के जागा राखीव असाव्यात. ५) सरकारी व निमसरकारी संस्थांमध्ये आरक्षणाची तरतूद करावी. ६) ओबीसी साठी राखीव जागा तीन वर्षे पूर्ण होईपर्यंत इतरांसाठी खुल्या होवू नयेत. ७) या करीता शासनाचे वैधानिक/कायदेविषयक तरतूदी कराव्यात.

टीकात्मक समीक्षण :— विभिन्न राज्यांमध्ये ज्या जातीगटाचे ओबीसी गटात प्रवेश करण्याचे प्रयत्न सुरु आहेत ते प्रबळ आहेत. संख्यात्मकदृष्टया मोठया आकाराचे आहेत. तसेच राजकीय आणि आर्थिक दृष्टीने शक्तीशाली आहेत. महाराष्ट्रात मराठा जातीचा गट, गुजरातमध्ये पाटीदार जातीचा गट, राजस्थानमध्ये गुजर जातीचा गट इत्यादी संद्यस्थितीत ओबीसींना १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

# युनिट क्र. २ भारतीय समाजातील समकालीन कुटुंब

# (Family in contemporary Indian society)

**प्रश्न क्र. १ :— पिढीअंतर्गत आणि आंतरपिढी संघर्षाचा अर्थ सांगून त्याची कारणे, परिणाम व उपाय लिहा?**

उत्तर :— आई वडील आणि त्यांची अपत्ये यांच्यामध्ये आवडी निवडी, विचार, दृष्टिकोन, जीवनादर्श वा मूल्ये इत्यादी बाबतीत कमी—अधिक प्रमाणात फरक असतो. याच दृष्टीने एक पिढी दुसऱ्या पिढीपेक्षा वेगळी असते. एकाच पिढीतील लोकांची विचार करण्याची पध्दती समान असते असे असले तरी एका पिढीच्या युवकांमध्ये आपआपसात संघर्ष आढळतो. तो एकाच पिढीच्या लोकांमधील असल्यामुळे त्याला पिढीअंतर्गत संघर्ष असे म्हणतात तर जेव्हा दोन पिढयांमध्ये असा संघर्ष दिसून येतो तेव्हा त्यास आंतरपिढी संघर्ष म्हणतात.

पिढीअंतर्गत संघर्षाची कारणे :— १) दोषपूर्ण सामाजीकरण :— एकाच कुटुंबात मुलींच्या वर्तनावर कठोर स्वरुपाची बंधने लादणे आणि मुलांच्या नियमबाहय वर्तनक्रिया पोटात घालणे म्हणजे दोघांमधील पक्षपात हे संघर्षाचे कारण आहेत. २) मनोधारणेतील फरक :— दोन व्यक्तींच्या बौध्दिक क्षमतांमध्ये असणाऱ्या तुलनात्मक फरकाचे कारण देखील त्यांच्या मानसिक जडणघडणीमधील भिन्नता हेच असते. त्यामुळे मनोधारणेतील फरक हे पिढीअंतर्गत संघर्षाचे कारण आहे. ३) साध्य व साधने यांच्यातील असंतुलन :— संस्कृतीद्वारे निर्धारित ध्येय (लक्ष्ये) गाठण्यासाठीच्या परिस्थितीत केवळ संस्थागत आणि समाजमान्य साधनांचाच अवलंब करणाऱ्या व्यक्ती समाजात असतात तर विचलनात्मक व्यवहार करणाऱ्या व्यक्तीदेखील समाजात असतात. याचा अर्थ समाजात एकच पिढीतील लोकांचे दोन भिन्न प्रकारचे वर्तनव्यवहार निर्माण होतात म्हणून ते संघर्षाचे कारण आहे. ४) परिवर्तनाच्या प्रक्रियेचा असमान प्रभाव :— पाश्चिमात्यांमधील प्रचलित फॅशन नुसार आपल्या वेश—केशभूषेत बदल करणारे तरुण वा युवक आढळतात. त्याप्रमाणेच त्यापासून स्वत:ला अलिप्त ठेवणारे युवकही आढळतात. याचा अर्थ परिवर्तनाचा असमान प्रभाव पडतो.

आंतरपिढी संघर्षाची कारणे :— १) व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना :— नविन पिढीच्या व्यक्तिस्वातंत्र्याबाबतच्या कल्पना घातक आहेत असे जुन्या पिढीचे म्हणणे असते तर जूनी पिढी आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर आघात करीत आहे अशी नवी पिढीची ओरड असते. २) धार्मिक श्रध्दांच्या बाबतीत फरक :— दोन पिढयांमध्ये धार्मिक आचरण, चालीरिती व श्रध्दा यांचे पालन करण्याबाबतच्या तफावतीतून मानसिक दुरावा व संघर्ष निर्माण होतो. ३) भूमिका अपेक्षांमधील फरक :— स्वत: सासुरवासाचा जाच सहन केलेल्या काही सासूची आपल्या सुनेकडून थोडाफार सासुरवास मुकाटयाने सहन करावा अशी अपेक्षा असते. तसे न झाल्यास सासू—सून संघर्ष समोर येतो. ४) कुटुंब संरचनेत परिवर्तन आणि विघटन :— आधुनिक काळात औद्योगिकीकरण, नागरीकरण, पाश्चिमात्यीकरण, आधुनिकीकरण इत्यादी प्रक्रियांमुळे कुटुंब संरचनेत परिवर्तन घडून येत आहे. भारतातील संयुक्त कुटुंबात कुटुंब प्रमुखाची निरंकुश सत्ता मानावयास त्याच कुटुंबातील नविन पिढी तयार नाही त्यामुळे आंतरपिढी संघर्ष निर्माण होतो. ५) आवडी निवडीमधील फरक :— आपल्या आवडीनिवडी, दृष्टिकोन यांचा तरुण पिढीने स्वीकार करावा अशी जुन्या पिढीची अपेक्षा असते. तसे न झाल्यास संघर्ष निर्माण होतो. ६) शीघ्र परिवर्तन :— ग्रामीण समाजापेक्षा शहरी समाजात शीर्घ परिवर्तन होते ते तरुण पिढी आणि त्यांचे आई—वडील यांच्यामधील संघर्षाला वाव देणारे असते. ७) शिस्त :— तरुणांचा मित्रांच्या घरातील नियमापेक्षा आपल्या घरातील नियम अधिक जाचक स्वरुपाचे आहेत असा त्यांचा ग्रह झाल्यामुळे संघर्ष सुरु होतो. ८) परंपरावादी आणि सुधारणावादी यांच्यामधील संघर्ष :— जूनी पिढी जुनं ते सोनं मानणारी आहे तर तरुण मुला—मुलींमध्ये आपण आपल्या पालकांपेक्षा अधिक प्रगतिशील आहेत अशी भावना वाढीस लागली आहे. ९) शिक्षणाबाबतची तफावत :— आपल्याजवळ जीवनानुभवाचे प्रचंड भंडार आहे त्यामुळे नविन पिढीने आपले सर्व ऐकावे अशी जून्या पिढीची अपेक्षा असते तर शिक्षणाच्या आधारावर जून्या पिढीने आपले ऐकावे अशी तरुण पिढीची अपेक्षा असते त्यातून संघर्ष निर्माण होतो. १०) मूल्यांमधील संघर्ष :— पारंपारिक आदर्श वा मूल्य आणि नविन आदर्श वा मूल्ये यांच्यामध्ये अंतर निर्माण झाल्यामुळे आंतरपिढी संघर्ष निर्माण होतो.

## पिढीअंतर्गत आणि आंतरपिढी संघर्षाचे परिणाम :—

१) कुटुंब विघटन :— पिढयांमधील संघर्षामुळे व्यक्तीमध्ये परात्मतेची भावना निर्माण होते. त्याचा कुटुंबाच्या स्थैर्यावर परिणाम होऊन ताण—तणावामुळे कुटुंब विघटन होते. २) मानवीय गुणांचा ऱ्हास :— संघर्षामुळे वातावरण कलुषित होऊन पक्षपात, भ्रामक कल्पना, घृणा, अविश्वास आदी वाईट प्रवृत्तींचा विकास होऊन प्रेम, सहानुभूती, सहकार्य आदी मानवीय गुणांचा ऱ्हास होतो. ३) आदर्श हिनतेची स्थिती :— संघर्षातून सामाजिक विघटनाबरोबरच सहकार्य, परस्पराबाबतची सद्‌भावना या सर्वांना आहोटी लागते. त्यामुळे आदर्श हिनतेची स्थिती निर्माण होते. ४) प्रगतीवर वाईट प्रभाव :— पिढयांमध्ये निर्माण झालेला अविश्वासाचा सामाजिक प्रगतीवर वाईट प्रभाव पडतो. संघर्षामुळे समाजाच्या प्रगतीची गती धिमी होते. ५) नियंत्रणात शिथिलता :— संघर्षामुळे कुटुंबातील सामाजीकरणाची प्रक्रिया तर प्रभावित होतेच. याशिवाय कुटुंबातील सामाजिक नियंत्रणाच्या प्रक्रियेतही शिथिलता येते.

पिढीअंतर्गत आणि आंतरपिढयांमधील संघर्ष कमी करण्याचे उपाय :—

१) विचारांशी समायोजन :— मुलगा रात्री उशिरा येण्याचे कारण कोणते? तो नेमके काय करीत होता? हे त्याच्याशी बोलून पालकांनी समजून घेतले तर त्यांच्यामधील संघर्ष कमी होऊ शकतो. २) दृष्टिकोनात समायोजन :— मुला—मुलीने कोणते करियर निवडावे यासंबंधी पालकाचे काही दृष्टिकोन वा विचार अत्यंत पक्के असतात त्यामुळे संघर्ष निर्माण होतो. दृष्टिकोनाबाबत जुळवून घेतले तर संघर्ष कमी होतो. ३) मूल्य शिक्षण :— शिक्षणाचा वाढता प्रसार, आधुनिकीकरणाची आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया, आधुनिक सूचनांच्या साधनांचा प्रभाव इत्यादी कारणांमुळे जीवनमूल्यांचे महत्व वाटेनासे झाले असून मुल्यांचा शिक्षणात समावेश केल्यास संघर्ष होऊ शकतो. ४) बदलत्या भूमिकेशी समायोजन :— मुलगा व मुलगी बाल्यावस्थेतून किशोर झाले हे पालकांनी लक्षात घ्यावे त्याप्रमाणेच किशोरांनी पालकांशी जुळवून घेतले पाहिजे. ५) जाणीवपूर्वक सामाजीकरण :— नविन पिढीच्या मनात आदरभाव तसेच समतेच्या मूल्यांबाबत त्यांचा विश्वास बळावेल याची काळजी सामाजीकरण घडवून आणतांना जुन्या पिढीने घेतली पाहिजे. ६) रुचीमध्ये समायोजन :— नविन पिढीला कपडयांवर

खर्च करण्यामध्ये रुची असते तर जुन्या पिढीला कपडयांपेक्षा पुस्तकांची खरेदी करण्यावर रुची असू शकते. त्याच्यामध्ये समायोजन साधल्या गेले पाहिजे. ७) कुटुंब समुपदेशकाचे मार्गदर्शन :— पिढयांमधील ताणतणाव आणि मानसिक दुरावा कमी करण्याकरीता कुटुंब समुपदेशकाचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते.

**प्रश्न क्र. २ :— हुंडयाची व्याख्या लिहून हुंडयाची कारणे, परिणाम व उपाय लिहा?**

उत्तर :— जातिप्रथेप्रमाणे हुंडा प्रथेने हिंदूधर्मीय समाजाचा उंबरठा ओलांडून भारतातील मुस्लीम, खिश्चन, शीख, बौध्द, जैन आदी धर्मीय समाजात आपला शिरकाव करुन घेतला आहे. भौतिकवादी तत्वज्ञानाच्या प्रभावात झालेल्या वाढीमुळे हुंडा पध्दतीत सक्ती आणि शोषणाचे आधिक्य पूर्वी कधीही नव्हते एवढे वाढले आहे. त्यामुळे हुंडा पध्दतीने एक गंभीर स्वरुपाची समस्या असे स्वरुप धारण केले आहे.

व्याख्यार :— १) मॅक्स रेडिन यांच्या मते :— ''विवाहप्रसंगी वर किंवा वधूला तिच्या आई—वडिलांकडून प्राप्त होणारी संपत्ती म्हणजे हुंडा होय.''

२) वेबस्टरच्या शब्दकोशानुसार :— ''विवाहाच्या वेळी स्त्री आपल्या सोबत जी संपत्ती मौल्यवान वस्तू किंवा इस्टेट आणते, त्याला हुंडा असे म्हणतात.''

वरील व्याख्या लक्षात घेता संपत्तीची दोन पक्षांमध्ये झालेली देवाण—घेवाण म्हणजे हुंडा होय.

**हुंडयाची कारणे**

१) सामाजिक प्रथा :— हुंडा देणे—घेणे ही सामाजिक प्रथा असल्यामुळे बहुतांश व्यक्तींचे वर्तन हे प्रथेनुरुप असते. प्रथा मोडण्यास सर्वसामान्य व्यक्ती तयार नसतात. २) कुलीन विवाह प्रथा :— आपल्या मुलीचा विवाह जातीसमूहाबाहेर करण्याची कोणाची इच्छा नसते. उच्च कुळे किंवा घराणी कमी, त्यात पून्हा विवाहयोग्य मुलांची संख्या कमी आणि मुलींची संख्या जास्त अशी विषम स्थिती निर्माण झाल्यामुळे चांगला वर आपल्या मुलीला मिळावा या अपेक्षेमधून हुंडा देण्याची प्रथा सुरु झाली. ३) दुष्टचक्र :— मुलीचा विवाह जुळवितांना हुंडा दिला की मुलाचे लग्न जुळवितांना तो वसूल व्हावा अशी इच्छा बाळगल्यामुळे एकदा मनुष्य या दुष्टचक्रात अडकला की

त्यातून बाहेर पडणे अत्यंत अवघड असते. ४) बालविवाह प्रथा :— बालविवाह हे आई—वडील ठरवित असल्यामुळे विवाह वयाची मर्यादा आपल्या मुलीने ओलांडली तर तिचा विवाहच होणार नाही अशी धास्ती पालकांच्या मनात निर्माण झाल्यामुळे हुंडा प्रथेचा उदय झाला असावा. ५) प्रतिष्ठेचे प्रदर्शन :— श्रीमंत व्यक्तींना आपल्या आर्थिक सुबत्तेचे प्रदर्शन करण्याची मोठी हौस असल्यामुळे हुंडा पध्दतीचा उदय झाला असावा. ६) संपत्तीचे महत्व :— सोन्याची साखळी, टि.व्ही., फ्रिज, स्वयंचलित वाहने, दागदागिने यासारख्या गोष्टीमुळे प्रतिष्ठा वाढते या धारणेतून हुंडा पध्दतीचा उदय झाला असावा. ७) शिक्षण :— उच्चशिक्षीत मुलाला अधिक चांगली नोकरी आणि पैसा मिळविण्याची शक्यता असल्यामुळे असे स्थळ प्राप्त करण्यासाठी हुंडा पध्दती अस्तित्वात आली असावी. ८) औद्योगिकरणाचा प्रभाव :— औद्योगिकरण आणि शहरीकरणामुळे आपल्या जातीसमूहातील मुलगा शोधून काढणे हे वधुपित्यासाठी फारच अवघड असे काम झाले, हे देखील हुंडा पध्दतीचा विस्तार होण्याचे कारण असावे.

**हुंडयाचे परिणाम**

१) स्त्रियांचा निम्न दर्जा :— हुंडयामुळे स्त्रियांना दुय्यम दर्जा प्राप्त होतो. वधुपक्षापेक्षा आपण वरचढ आहोत असे वरपक्ष समजू लागतो, याचे मूळ कारण स्त्रियांना दुय्यम लेखणे आणि पुरुषी अहंकार बाळगणे हेच असते. २) कर्जबाजारीपणा :— हुंडयाची रक्कम देण्यासाठी मुलीचे वडील कर्ज काढतात. कर्ज वेळेवर न फेडल्यामुळे अनेकदा वधुपित्यावर आपली संपूर्ण मालमत्ता गमविण्याची पाळी येते. ३) कुटुंब विघटन :— वधुपक्ष हुंडा म्हणून कबूल केलेली रक्कम देऊ न शकल्यास नववधूचा तिच्या सासरी छळ सुरु होतो. त्यामुळे कुटुंबात कुटुंब विघटनाची प्रक्रिया सुरु होते. ४) प्रौढ कुमारिकांची समस्या :— हुंडा देण्याची ऐपत नसल्यामुळे त्या कुटुंबातील मुलींवर अविवाहीत राहण्याची पाळी येते. ठरलेले लग्न मोडल्याचे दुष्परिणाम मुलीला जन्मभर भोगावे लागतात. तिचे लग्न बदनामीमुळे पुन्हा जुळू शकत नाही. ५) हुंडाबळी :— हुंडयाची पूर्ती न झाल्याची परिणती शेवटी नववधूच्या मृत्यूमध्ये होते. आत्महत्या केल्याचा किंवा अपघात घडाळयाचा केवळ देखावा निर्माण केला जातो. हुंडयापोटी केलेला तो खून असतो. ६) गुन्हेगारीस प्रोत्साहन :— हुंडयाची रक्कम देण्यासाठी

भ्रष्टाचार, काळा बाजार, अनैतिक व्यवसाय यासारख्या गैरमार्गाचा अवलंब केला जातो. हुंडा वसुलीसाठी स्त्रीविरोधी गुन्हे केले जातात. ७) विजोड विवाह :— हुंडा देण्याची आर्थिक कुवत नसणाऱ्या पालकांवर आपल्या मुलीला मिळेल त्या मुलाशी विवाह लावून देण्याची पाळी येते. ८) मानसिक असंतुलन :— हुंडयापोटी होणाऱ्या जाचामुळे तसेच सासरी त्यांना सतत अपमानास्पद स्थितीत जगावे लागत असल्यामुळे त्या वैफल्यग्रस्त होतात. त्यांची जीवन जगण्यामधील उमेदच संपून जाते.

**हुंडा पध्दती समाप्त करण्यासाठीचे उपाय :—**

१) स्त्री शिक्षणाचा प्रसार :— स्त्री शिक्षणामुळे हुंडा पध्दती ही स्त्री जातीवरचा अन्याय आहे आणि त्याचा प्रतिकार केला पाहिजे ही जाणीव स्त्रीमध्ये निर्माण होते. २) आंतरजातीय विवाहाला मान्यता :— कोणताही हुंडा न देता आणि विवाह समारंभाच्या खर्चाचा पूर्ण भार न उचलता आंतरजातीय विवाहाला मान्यता हा हुंडा पध्दती समाप्त करण्याचा एक उपाय आहे. ३) हुंडा प्रतिबंधक कायदा :— हुंडा प्रतिबंधक कायद्यामुळे हुंडा मागण्याची प्रथा बंद झाली आहे असे म्हणणे तर सोडा, कमी झाली आहे असे देखील म्हणता येत नाही. हुंडा हा सर्व राजीखुशीने केलेला देवाणघेवाणीचा प्रकार आहे असे वधू—वर या दोन्ही बाजूचे लोक भासवितात. यामुळे हुंडा प्रतिबंधक कायदा मोडल्याचा गुन्हा सिध्द होत नाही. ४) मुलींना आत्मनिर्भर बनविणे :— मुलींना आर्थिकदृष्टया आत्मनिर्भर बनविणे हा हुंडा समाप्त करण्याचा एक उपाय आहे. ५) जीवनसाथीची निवड करण्याची स्वातंत्र्य :— जीवनसाथीची निवड करण्याबाबत स्वातंत्र्य मिळाले आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारे हुंडा न घेण्याची प्रतिज्ञा त्यांनी पूर्ण केली तर हुंडा पध्दतीचे अस्तित्व समाप्त होवू शकते. ६) हुंडाविरोधी जनमत व चळवळ :— हुंडाविरोधी जनमत करण्यासाठी विवाह समारंभावरील खर्च कमी करण्यापासून सुरुवात केली पाहिजे. विवाह समारंभाचा एकूण खर्च वर आणि वधू अशा दोन्ही पक्षांनी समान रुपात वाटून घेणे हा देखील हुंडा समाप्त करण्याचा मार्ग आहे. त्याचबरोबर 'हुंडामुक्त खेडे' जनचळवळ सुरु करणे आवश्यक आहे. ७) प्रेमविवाहाला मान्यता :— हुंडा घेणार नाही किंवा देणार नाही या

एकाच अटीवर होणाऱ्या प्रेमविवाहांना मान्यता देणे हा देखील हुंडा पध्दती समाप्त करण्याचा एक मार्ग आहे.

**प्रश्न क्र. ३ :— घरगुती किंवा कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या लिहून त्याचे स्वरुप, कारणे, परिणाम व उपाय लिहा?**

उत्तर :— घराच्या चार भिंतीत होणारा अत्याचार, हिंसाचार आणि अन्याय याला 'डोमेस्टिक व्हायोलन्स' म्हणजेच घरगुती हिंसाचार असे म्हटले जाते. सत्ता, बळ यासारख्या आधारे आपणास हवी असणारी गोष्ट दुसऱ्याची इच्छा नसतांना तिच्याजवळून बळजबरीने हिसकावून घेण्यासाठी केलेले कृत्य म्हणजे हिंसाचार होय. त्यामुळे शारीरिक इजा व मानसिक आघात दोन्हीही सहन करावे लागतात.

व्याख्या :—

१. २००५ च्या कायद्यानुसार :— ''पिडीत व्यक्तीच्या शरीराचा लैंगिक, मौखिक, भावनात्मक आणि आर्थिक कारणांसाठी दुरुपयोग करण्याची प्रवृत्ती म्हणजे हिंसाचार होय.''

''संपत्ती, मौल्यवान वस्तू किंवा हुंडा यांच्या पूर्तीसाठी मानसिक उत्पीडन करणारे आचरण किंवा कृत्य म्हणजे घरगुती हिंसाचार होय.''

घरगुती हिंसाचाराचे प्रकार :— अ) शारीरिक हिंसाचार ब) लैंगिक हिंसाचार क) शाब्दीक किंवा भावनिक हिंसाचार ड) आर्थिक हिंसाचार

घरगुती हिंसाचाराचे स्वरुप :— १) लहान वयाच्या मुलींवरील लैंगिक हल्ले :— कुटुंबीय, नातेवाईक आणि घरातील नोकरचाकर मंडळी यांच्याद्वारे लहान वयातील मुलींवर लैंगिक अत्याचार केले जातात त्यामुळे त्याची वाच्यता न करता आई वडील ती गोष्ट लपवून ठेवतात. मुलींवर त्याचे दुरगामी परिणाम होऊन त्या मनाने खचून जातात. २) आत्महत्या :— विवाहासाठी द्यावा लागणाऱ्या हुंडयाचा भार आपल्या गरीबीच्या स्थितीत जीवन जगणाऱ्या आई वडिलांवर पडू नये म्हणून मुलींनी आत्महत्या केल्या आहेत. तर काही आत्महत्या घडवून आणलेल्या आहेत. ३) सासरी व माहेरी होणारी मारहाण :— विवाह होण्यापूर्वी उध्दटपणा, परपुरुषांशी बोलणे, घरी

उशिरा येणे व वळण नीट नसल्याच्या कारणासाठी माहेरी मारहाण केली जाते. स्वयंपाक बिघडणे, परपुरुषांशी संबंध असल्याचा संशय, लैंगिक संबंधांना नकार इस्टेटीमधील वाटा देण्यास नकार यासारख्या कारणाने पतीकडून मारहाण करण्याची बाब सर्वत्र आढळते. ४) स्त्रीलिंगी गर्भहत्या आणि बालिकाहत्या :— गर्भ मुलीचा असल्यास ताबडतोब गर्भपात केला जातो. उत्तर व पश्चिम भारतातील मध्यम जातींमध्ये मुलींना जन्मत:च मारुन टाकण्याची प्रथा होती. त्यासाठी न वजात बालिकेला दुधाच्या भांडयात बुडविणे, खाटेच्या पायाखाली चिरडणे, विषारी फळांचा रस पाजणे अशा क्रुर पध्दतींचा अवलंब केला जात असे. ५) हुंडाबळी :— हुंडाबळी हा हुंडयाच्या नावावर सासरच्या लोकांनी केलेला खून असतो. नवविवाहीत तरुणीला झालेला अपघात किंवा तिने केलेली आत्महत्या असा रंग त्याला दिला जातो.

घरगुती हिंसाचाराची भारतातील स्थिती :— हिंसाचाराच्या गुन्हयांचे प्रमाण तुलनात्मक दृष्टया बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र या राज्यात अधिक आहे. भारतात पालीस स्टेशनमध्ये नोंद झालेल्या गुन्हयांपेक्षा नोंद न झालेल्या गुन्हयांची संख्या जास्त आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा गिरीजा व्यास यांनी ३७ टक्के भारतीय महिला घरगुती हिंसाचाराच्या शिकार ठरतात असे मान्य केले आहे. मुकाटयाने त्रास सहन करणाऱ्या महिलांची संख्या फार मोठी आहे.

घरगुती हिंसाचाराची कारणे :— आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय समाजव्यवस्थेत परिवर्तन घडून आलेले असतांनाही घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये काहीही बदल झालेला नाही. याउलट कौटुंबिक हिसांचाराचे प्रकार समोर येत आहेत.

१) मद्यसेवनाच्या प्रमाणात वाढ :— गरीबी किंवा दारिद्रय, कामाचा ताण, आजारपण यासारखे कोणतेही निमित्य मद्यपान करण्यासाठी पुरेसे असते. घरगुती हिंसाचाराच्या अनेक घटना नशेच्या अवस्थेत घडत असल्याचे सहजपणे कोणाच्याही अनुभवास येते. २) सदोष सामाजीकरण :— लहानपणापासून मुलींना घरामधील पुरुषांच्या इच्छा—आकांक्षानुसार वागण्यास शिकविले जाते. अधिकार मागण्यापेक्षा कर्तव्याची पूर्ती करणे हेच स्त्रीजीवनाचे मुख्य प्रयोजन असल्याचे त्यांच्या मनावर सतत बिंबविले जाते. ३) स्त्रियांचे आर्थिक परावलंबित्व :— आर्थिक परावलंबित्वामुळे अपमानाचा प्रतिकार

करण्यासाठी लागणारे मनोधैर्य स्त्रियांमध्ये निर्माण होत नाही. त्यांच्या आर्थिक परावलंबित्वाचा फायदा पुरुषवर्गाद्वारे घेतला जातो. ४) पितृसत्ताक संस्कृतीचा वारसा :— कनिष्ठ गरीब वर्गात नवरा—बायकोच्या शारीरिक मारपिटीतून पितृसत्ताक विचारपध्दती व्यक्त होते, तर श्रीमंत आणि मध्यमवर्गात नवऱ्याकडून बायकोच्या संदर्भात वापरली जाणारी अपमानजनक भाषा आणि मानसिक प्रतारणा या रुपात पितृसत्ताक विचारपध्दती व्यक्त होते. ५) स्त्री शिक्षणाचे अल्प प्रमाण :— निरक्षर आणि अल्पशिक्षीत स्त्रियांना आपल्या अधिकारांबाबत काही जाणीवच नसते. नवऱ्याने मारणे किंवा शिवीगाळ करणे यात काही गैर आहे असे त्यांना वाटत नाही. तो नवऱ्याचा अधिकार आहे असेच मानले जाते. भारतात पुरुषांपेक्षा स्त्रियांमधील साक्षरता दर अद्यापही कमी आहे.

घरगुती हिंसाचाराचे परिणाम :—

१) नैराश्य :— घरगुती हिंसाचाराचा परिणाम म्हणून स्त्रियांच्या वाटयास येणाऱ्या नैराश्यातून त्या मनोरुग्ण होतात. घरगुती हिंसाचाराने स्त्रियांची जीवन जगण्याची उमेदच कमी होते. २) स्त्री—पुरुष प्रमाणात घट :— स्त्रीलिंगी गर्भाची हत्या आणि बालिका हत्यामुळे भारतीय लोकसंख्येत दरहजारी पुरुषांमागे स्त्रियांच्या प्रमाणात घट झाली असल्याचेही दिसून येते. ३) परित्यक्त्या स्त्रियांच्या संख्येत वाढ :— लग्नानंतर नवऱ्याने टाकून दिलेल्या किंवा पतीबरोबर संसार करण्यास तयार नसलेल्या स्त्रियांच्या म्हणजेच परित्यक्त्या स्त्रियांच्या संख्येत वाढ होत आहे. ४) स्त्रियांचे आरोग्य :— पुरुषांनी केलेल्या घरगुती हिंसाचाराचे परिणाम स्त्रियांना भोगावे लागतात. काही वेळा भयंकर प्रमाणातील शारीरिक मारपिटीतून निर्माण झालेले अपंगत्व जन्मभर उराशी बाळगत त्यांना जगावे लागते. ५) वधूला जाळण्याची समस्या :— गॅसचा किंवा स्टोव्हचा भडका उठून अपघात झाला असा भास निर्माण केला जातो. परंतु वधूला धरुन, बांधून जाळून टाकण्यात आले असते. पैशाच्या लोभासाठी अशा घटना घडत आहेत. ६) वैवाहिक जीवनातील समस्या :— मुलींच्या बालवयात झालेल्या लैंगिक अत्याचारातून त्यांच्या मनामध्ये लैंगिक संबंधाबाबतची घृणा व भिती दडून बसते. ती विवाहानंतर प्रगट होते. लहान वयातील लैंगिक अत्याचारामुळे त्यांचा कोणत्याच

नातेसंबंधावर विश्वास राहत नाही. ७) आत्महत्या :— घरगुती हिंसाचाराचा अतिरेक झाल्याने किंवा अपमानास्पद वागणुकीमुळे स्त्रियांनी आत्महत्या केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**कौटुंबिक हिंसाचार कमी करण्यासाठीचे उपाय :—**

१) आर्थिकदृष्टया आत्मनिर्भरता :— प्रत्येक स्त्रीला नोकरी मिळणे अशक्य आहे हे लक्षात घेऊनच प्रत्येक स्त्रीने आर्थिकदृष्टया आत्मनिर्भर होण्यासाठीचे मार्ग शोधून काढले पाहिजे. २) कायदेविषयक उपाययोजना :— २००५ मधील घरगुती हिंसाचाराच्या कायद्यानुसार फक्त बायकोच नव्हे तर घरातील आई, बहिण, मुलगी, कामवाली मोलकरीण अशी कुठलीही स्त्री तक्रार दाखल करु शकते या फायद्यामुळे आता घरगुती हिंसाचाराच्या केसेस नोंदविल्या तरी जाऊ लागल्या आहेत. ३) स्त्री साक्षरता :— महिलांमध्ये त्यांच्या अधिकारांबाबतची जाणीव जागृती ही केवळ शिक्षणातूनच निर्माण होऊ शकते. ४) महिला संघटना :— महिलांच्या संघटित शक्तीमुळे अपराधी हिंसक कृत्य करण्यापासून परावृत्त होवू शकतो. ५) व्यक्तिमत्व विकास :— आत्मसन्मान किंवा आत्मप्रतिष्ठा याबाबत जागृत असणारी स्त्री आपल्या अधिकारांचे रक्षण करण्याबाबत दक्ष असते तसेच ती आपल्या कर्तव्यांची पूर्ती करण्याबाबतही दक्ष असते. ६) पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करणे :— २००५ च्या कायद्यानुसार कोणत्याही पिडीत व्यक्तीला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे पोलीस संरक्षण देखील मिळू शकते. ७) घरगुती हिंसेला विरोध करावा :— पिडीत व्यक्तीने मुकाटयाने त्रास सहन न करता त्याला विरोध करावा. ८) नातेवाईकांनी हस्तक्षेप करावा :— घरात हिंसाचार कोण करतो, पिडीत व्यक्ती कोण आहे याची जाणीव नातेवाईकांना असल्यामुळे त्यांनी हस्तक्षेप करावा.

**प्रश्न क्र. ४ :— १९५५ चा हिंदू विवाह कायदा स्पष्ट करुन घटस्फोटाची व्याख्या, कारणे व परिणाम लिहा?**

उत्तर :— स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार असावा अशा तऱ्हेचे जनमत तयार झाले होते. या जनमताला अनुसरुन १९५५ मध्ये हिंदू विवाह कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्यात काही अटींवर पती—पत्नी या दोघांपैकी कोणालाही घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज दाखल करता येतो. १९५५ चा हिंदू विवाह कायदा हिंदू, बौध्द, जैन आणि शीख याच धर्मसमूहांना लागू आहे. मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मसमूहांसाठी वेगळे विवाह कायदे आहेत. पुढील कारणांसाठी अर्ज दाखल करता येतो. १) विवाह संपन्न झाल्यानंतर पती—पत्नी या दोघांपैकी कोणत्याही एका पक्षाच्या विवाहबाहय लैंगिक संबंधाबाबत निश्चित पुरावा असल्यास २) क्रूरतापूर्ण व्यवहार केल्यास ३) दोन वर्षापासून दोघांनीही एकमेकांचा परित्याग केल्यास ४) हिंदू धर्म सोडून अन्य धर्म स्वीकारला असल्यास ५) असाध्य स्वरुपाचा मनोरुग्ण असल्यास ६) संसाराचा त्याग करुन संन्याशी झाल्यास ७) लैंगिक स्वरुपाच्या रोगाचा आजार असल्यास ८) मागील सात वर्षापासून बेपत्ता असल्यास ९) मागील एक वर्षापासून दोघेही विभक्त राहत असल्यास १०) न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे मागील एक वर्षापासून पालन होत नसल्यास

२०१० मध्ये स्थावर मालमत्तेत समान हक्क देण्याची तरतूद या दुरुस्ती विधेयकात करण्यात आली. २०१६ मध्येचा दुरुस्ती विधेयकाला लोकसभेने संमती दिली आहे.

व्याख्या :— ‘‘पती—पत्नी यांनी विवाहसंबंध समाजमान्य पध्दतीने समाप्त करण्याची पध्दत म्हणजे घटस्फोट होय.’’

वरील व्याख्या लक्षात घेता स्त्री—पुरुषांमधील लैंगिक संबंधांना विवाहानंतरच पती—पत्नी म्हणून समाजाची मान्यता प्राप्त होते. त्यांना परस्परांच्या विवाहसंबंधाची समाप्ती करावयाची असेल तर त्यासाठी देखील समाजाची मान्यता पाहिजे असा घटस्फोट या संज्ञेचा अर्थ आहे.

घटस्फोटाची कारणे :—

१) विकृत व्यक्तीमत्व :— अतिचंचलता किंवा अस्थिरता, क्रुरता व दुसऱ्याला शारीरिक इजा होईपर्यंत मारझोड करण्याची वृत्ती यासारखी काही लक्षणे व्यक्तीच्या वर्तनातून प्रगट होत असतील तर त्या व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे मानसिकदृष्टया विकृत आहे असे म्हटले जाते. २) विवाह वयामधील अंतर :— पती—पत्नी यांच्या विवाह वयामध्ये वयाचे अंतर जास्त असेल तर त्यांच्या अभिरुची आवडी—निवडी, पोशाखाच्या सवयी आदींमधील तफावत प्रकर्षाने समोर येते. हे कारण परस्परांशी जुळवून घेण्याच्या मार्गात अडसर ठरल्याचे आढळले आहे. ३) प्रेमासंबंधीचा भ्रम :— वधू—वरांनी स्वत:च निर्णय घेऊन केलेल्या विवाहाला 'प्रेमविवाह' असे आपण संबोधतो. आरंभीच्या काही दिवसानंतर पती—पत्नीमधील प्रेमाचे आकर्षण संपते. परिणामी विवाहानंतर हा भ्रम दूर झाल्यामुळे तणाव निर्माण होऊन कुटुंब विघटीत होते. ४) सांस्कृतिक पार्श्वभूमीतील तफावत :— पती—पत्नी या दोघांपैकी एकावर साधी राहणी व उच्च विचारसरणी या तत्वाचा प्रभाव असू शकतो. याउलट दुसऱ्यावर खाणे—पिणे—मजा करणे या चंगळवादी विचारांचा प्रभाव असू शकतो. या दोन्ही विचारपध्दती परस्पर विरोधी असल्यामुळे ताण—तणाव वाढत जातो. त्याचा शेवट घटस्फोटात होतो. ५) वैयक्तीक वर्तनव्यवहार :— चारित्र्य, सवयी, शारीरिक व्यंग किंवा दोष इत्यादी बाबींचा समावेश वैयक्तीक वर्तनव्यवहारात होतो. 'झोपेमध्ये घोरण्याची सवय' हे घटस्फोट घेण्यासाठीचे एक कारण असल्याचे अमेरिकेत आढळून येते. वैयक्तीक सवयीतून परस्परांमध्ये घृणा व द्वेष निर्माण होऊन ताणतणाव व कुटुंब विघटन घडून येते. ६) व्यवसायातील ताणतणाव :— नोकरी—व्यवसायामध्ये उच्च स्थान प्राप्त झाले की ते टिकवून ठेवण्यासाठी पूर्वीपेक्षाही अधिक जास्त वेळ व शक्ती खर्च करावी लागते. यामुळे पती—पत्नी संबंधात ताणतणाव निर्माण होऊन तो वाढीस लागतो असे बर्जेस व कॉर्टलचे म्हणणे आहे. ७) परस्पर विरोधी स्वभाव :— संयमी व उतावीळ आणि शांत व शीघ्रकोपी असे परस्परविरोधी स्वभाव पती—पत्नीचे असतील तर त्यांच्यात बेबनाव निर्माण होणे स्वाभाविक ठरते. त्यामुळे पती—पत्नीचे स्वभाव परस्परपूरक असतील, तरच त्यांच्यात संवाद निर्माण होतो.

घटस्फोटाच्या कायद्याचे सामाजिक परिणाम :—

१) कुटुंब न्यायालयांची निर्मिती :— स्त्रियांना जलद न्याय मिळावा तसेच घटस्फोटांशी संबंधित खटल्यास स्त्रियांना त्यांची बाजू संकोचाविना मांडता यावी यासाठी शासनाने जिल्हा स्तरावर कुटुंब न्यायालये निर्माण केली. २) स्त्रियांच्या सबलीकरणाच्या कार्याचा प्रारंभ :— २१ व्या शताकतील भारतीय महिलांना विभिन्न प्रकारचे अधिकार कायद्याद्वारे प्राप्त झाले आहेत. यामुळे यापुर्वी तिला स्त्री समजल्या जात असल्यामुळे त्या आता 'अबला' राहिल्या नसून 'सबला' झाल्या आहेत. स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रारंभ घटस्फोटाच्या अधिकारापासून झाला असे म्हणता येते. ३) जाचक रुढींच्या वर्चस्वातून हिंदू स्त्रियांची मुक्तता :— बहुविवाह पध्दती पुरुषसत्ताक पध्दतीची जोपासना करणारी आणि विवाहीत स्त्रियांना त्यांच्या पतीच्या गुलामगिरीत ढकलणारी ही प्रथा होती. घटस्फोटाच्या अधिकाराने विवाहीत स्त्रीची तिच्या मनाविरुध्द नवऱ्याने लादलेल्या गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे फार मोठे सामाजिक कार्य केले. ४) परंपरावाद्यांचा वैचारिक स्तरावर पराभव :— घटस्फोटासंबंधीच्या वैधानिक तरतुदीत केवळ गंभीर स्वरुपाची कारणे असतील तरच पती वा पत्नी यापैकी कोणालाही घटस्फोट मागण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे देशाच्या एकूण लोकसंख्येच्या संदर्भात घटस्फोटीतांचे प्रमाण पाश्चिमात्य देशांपेक्षा भारतात अद्यापही कमी आहे. म्हणून परंपरावाद्यांचा पराभव झाला आहे. ५) स्त्री—पुरुष समानतेची निर्मिती :— १९५५ च्या हिंदू विवाह कायद्यातील घटस्फोटाच्या अधिकाराने स्त्री—पुरुष समतेच्या मूलभुत अधिकाराला व्यवहार्य स्वरुप प्राप्त करुन देण्याच्या महत्वपूर्ण सामाजिक कार्याचा पाया घातला. ६) स्त्रीवादी कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था व संघटनांच्या संख्येत वाढ :— घटस्फोटासाठीची न्यायालयीन प्रक्रिया आर्थिकदृष्टया खर्चिक आहे तसेच ती पूर्ण होण्यासाठी वेळही खूप लागतो. घटस्फोटासाठी गरजू महिलांना सहाय्य करण्यासाठी समाजघटकांच्या संख्येत वाढ होणे हा घटस्फोटासाठीच्या कायद्याचा एक सामाजिक परिणाम आहे असे म्हणता येईल. ७) पुरुषसत्ताक पध्दतीच्या वर्चस्वाला पायबंद :— चळवळी आणि संघर्ष यातून स्त्रियांना जसजसे अधिकार मिळत गेले तसतसे पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व कमी होत गेले हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही.

**घटस्फोटाचे स्त्रियांवरील परिणाम :—**

**१) घटस्फोट आणि अपत्यांचे प्रश्न** :— कुटुंब विघटीत होण्यापूर्वी आई—वडिलांमधील भांडणे आणि कुटुंब विघटीत झाल्यानंतर संगोपनात होणारी आबाळ यामुळे बालवयातील सुखद स्मृतींपेक्षा कडू आठवणींचे ओझे जन्मभर बाळगण्याची पाळी त्यांच्यावर येते. **२) आर्थिक परिणाम :—** घटस्फोटीत व्यक्तीचे कौटुंबिक जीवन उध्वस्त तर होतेच, याशिवाय घटस्फोटानंतर विभिन्न प्रश्नांचा सामना करण्याची पाळी आल्यामुळे त्याच्या किंवा तिच्या आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम होतात. **३) लैंगिक समस्या** :— घटस्फोटीत व्यक्ती तरुण वयोगटातील असतील आणि विवाहानंतर त्यांचा फार अल्पकाळात घटस्फौअ झाला असेल तर लैंगिक संबंधाबाबत भावनिक कोंडमारा सहन करण्याची पाळी त्यांच्यावर येते. **४) वैयक्तीक विघटन** :— घटस्फोट घेणाऱ्या व्यक्तीस नैराश्य हिनतेची भावना, एकाकीपण, आर्थिक अडचणी, आरोग्य विषयक काही प्रश्न इत्यादींचा त्यांच्या जीवनावर वाईट परिणाम होऊन वैयक्तीक विघटन घडून येते. **५) दु:खी अहंभाव** :— दोघांपैकी एकाची इच्छा नसतांनाही घटस्फोट घ्यावा लागत असल्यामुळे ती व्यक्ती दुखावली जाते. आपल्यामध्ये काही कमतरता अथवा उणिवा आहेत म्हणून घटस्फोट घेण्याची पाळी आपल्यावर आली अशी न्युनगंडाची भावना तिच्यामध्ये निर्माण होण्याची शक्यता असते.

**प्रश्न क्र. ५ :— घटस्फोटाशी संबंधित प्रकरणाच्या निपटाऱ्यात कुटुंब न्यायालयाची भुमिका स्पष्ट करा.**

उत्तर :— **अ) कुटुंब न्यायालयाची स्थापना** :— कुटुंब न्यायालयाची स्थापना १९८४ मध्ये झाली. कुटुंब न्यायालयाची स्थापना होण्यामध्ये नियमित न्यायालयात दाखल झालेल्या खटल्यांच्या संख्येतील वाढ, विधी आयोगाच्या शिफारशी, विवाह विषयक कायद्याशी संबंधित असणारे सर्व खटले एकाच न्यायालयाच्या कक्षेत आणणे इत्यादी अनेक कारणे आहेत. कुटुंब न्यायालये म्हणजे घटस्फोटांच्या दुष्परिणामांवरील उपचारात्मक उपाय होय असे म्हणता येईल. **ब) कुटुंब न्यायालयाची निर्मिती** :— घटस्फोटासंबंधीचे खटले योग्य प्रकारे हाताळून पती—पत्नी संबंधातील कटुता कमी करण्याचा प्रयत्न करणे, त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणणे, स्त्रियांना न्याय मिळवून

देणे हे सर्व नियमित न्यायालयांना होत नाही म्हणून महिला संघटनांच्या मागणी नुसार कुटुंब न्यायालयांची निर्मिती झालेली आहे. घटस्फोटासाठी अर्ज करणाऱ्या महिलेला आपल्या भावना आणि अनुभव मोकळया मनाने सांगता यावा या उद्देशाने स्त्री न्यायाधिशाची नियुक्ती केली जाते. कुटुंब सल्लागाराची व समुपदेशकाची मदत घेण्याची तरतूद कुटुंब न्यायालय अधिनियमात आहे. घटस्फोट, अर्जदार महिलेला वकिलाचे सहाय्य न घेता स्वत:ची बाजू मांडण्याची संधी देखील कुटुंब न्यायालयामध्ये दिली जाते. घटस्फोट प्रकरणामध्ये न्यायदानासोबतच महिला कल्याणालाही महत्व देणे व ते साध्य करण्याचा प्रयत्न करणे हा कुटुंब न्यायालयांच्या निर्मितीमागे असणारा एक प्रमुख हेतू आहे.

**प्रश्न क्र. ६ :— वृध्दत्वाच्या व्याख्या लिहून त्यांच्या समस्या, समस्यांची कारणे व उपाय लिहा.**

उत्तर :— वृध्दापकाळात आई—वडिलांचा सांभाळ करणे हे त्यांच्या मुला—मुलींचे नैतिक कर्तव्य आहे. भारतात सामान्य वृध्दांचा सांभाळ करण्याच्या परंपरेचे पालन केले जाते. तरीही विभक्त कुटुंबपध्दती, व्यक्तिवाद, शहरीकरण, उद्योग—व्यवसायांमधील गतिमानता, आधुनिकीकरण इत्यादी कारणांमुळे वृध्दांचा सांभाळ करण्याच्या आदर्शांचे पालन करण्यामधील ताणतणावांचे प्रमाण बरेच वाढले आहे. 'वृध्दापकाळाचे शास्त्र' मध्ये दिलेल्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे,

**व्याख्या** :— **१) एलिझाबेथ हरलॉकच्या मते,** ''वृध्दावस्था म्हणजे मानवी जीवनातील शेवटचा चरण होय.'

**२) सामाजिक कार्य ज्ञानकोशानुसार** :— ''व्यक्तिच्या जीवनचक्रातील शेवटचा कालखंड म्हणजे वृध्दावस्था होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता प्रौढ व्यक्तिच्या जीवनातील अंतिम कालखंड असा वृध्दावस्थेचा अर्थ व्यक्त होतो. आजच्या काळात 'निवृत्त म्हणजे वृध्दत्वाची सुरुवात होय असे समीकरण निवृत्ती व्यक्तीच्या मनात रुढ होते. सेवानिवृत्तीमुळे व्यक्तींच्या वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून येतात.

भारतात ६० वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या वृध्दांची एकूण संख्या सुमारे ९.६ कोटी झाली असून त्यांचे लोकसंख्येतील शेकडा प्रमाण ८ टक्के झाले आहे. भारतातील एकूण वृध्दांपैकी सुमारे ९० टक्के वृध्द हे असंघटित असून त्यांना सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी यासारखे कोणतेही आर्थिक लाभ प्राप्त झालेले नाहीत.

**वयस्कांच्या प्रमुख समस्या :—**

**१) शारीरिक समस्या :—** वृध्दावस्थेत व्यक्तीच्या शरीररचनेत अंतर्गत आणि बाहय असे दोन्ही प्रकारचे बदल घडून येतात. उदा. दात पडणे, शरीरावर सुरकुत्या पडणे, डोक्यावरचे केस कमी होणे, पांढरे होणे, हातापायाला कंप सुटणे, रक्तदाब कमी किंवा जास्त होणे, विशेषत: मूत्र विसर्जनाचा त्रास होणे, पचनसंस्थेने संतुलित कार्य न करणे, श्रवणशक्ती कमी होणे इत्यादी बदलांमुळे शारीरिक समस्या निर्माण होतात. शरीर साथ देत नसल्यामुळे वृध्द व्यक्तींवर अंथरुणाला खिळून राहण्याची पाळी येते. **२) आर्थिक समस्या** :— वृध्दावस्थेत आरोगयाचे रक्षण करण्यासाठी बराच पैसा खर्च करण्याची पाळी येते. यामुळे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी आर्थिक ओढाताणीची समस्या त्यांच्यासमोर निर्माण होते. सेवानिवृत्त होतांना एकरकमी मिळालेला पैसा मुलामुलींचे विवाह, घरदुरुस्ती, मुलाला उद्योग व्यवसायासाठी भांडवल म्हणून देणे यासारख्या कारणांसाठी खर्च होतो. यामुळे त्यांचेवर आर्थिक अडीअडचणींना तोंड देण्याची पाळी येते. काही वेळा कनिष्ठ वर्गातील मुला—मुलींनी त्यांच्या घरात आई—वडिलांना आश्रय दिला नाही तर रस्त्यात बसून भीक मागण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय त्यांच्यासमोर नसतो. ३) मानसिक समस्या :— आता आपण घरात कोणतेच काम करु शकत नाही, आपल्याला जिवंत राहण्याचा काहीही उपयोग नाही, आपल्याकडे घरातील व्यक्ती लक्ष देत नाही, आपल्याला घरामध्ये कोणी विचारत नाही, आपण घरामध्ये अडगळ झालो आहोत अशी भावना निर्माण झाल्यामुळे चिडखोरपणा आणि कागावेखोरपणा वाढीस लागतो. त्यामुळे वृध्द व्यक्ती आणि अन्य कुटुंब सदस्य यांच्या परस्परसंबंधात ताणतणाव आणि संघर्ष निर्माण होतो. ४) सामाजिक समस्या :— वृध्द शारीरिक, मानसिक आणि आर्थिक अशा तीनही बाबतीत परावलंबी झालेले असतात. वृध्द सासू—सासऱ्यांना आर्थिक किंवा अन्य कोणत्याही

प्रकारची मदत करण्याची काही सुनांची मानसिक तयारी नसते. वृध्दापकाळात आपल्या मुलांना भेटण्याची, त्यांना वारंवार पाहण्याची किंवा त्यांच्या समवेत राहण्याची त्यांना तीव्र इच्छा असते. परंतु सुनेचा विरोध, स्वत:चा अहंभाव, आर्थिक भार यासारख्या कारणांमुळे ते शक्य होत नाही. असे असले तरीही भारतीय संस्कृतीत कर्तव्य भावनेमुळे आर्थिक दृष्टया फारसे स्वयंपूर्ण नसतांनाही अनेक कुटुंबातील मुले आपल्या वृध्द आईवडिलांचा सांभाळ व्यवस्थितपणे करीत असल्याचे आढळून येते. ५) वृध्दावस्थेतील जुळवणूक, सामाजिक जुळवणूक म्हणजे इतर जनांच्या समवेत जास्तीत जास्त सुख व समाधानाने जगण्यासाठी केलेले सर्व प्रकारचे प्रयत्न होय. वृध्द व्यक्तीची मानसिक अवस्था लक्षात घेवून अन्य कुटुंब सदस्यांनी वृध्दांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाश्चिमात्य समाजात वृध्दावस्थेशी कसे जुळवून घ्यावे याचे शिक्षण आणि प्रशिक्षण देणारी केंद्रे आहे. वृध्दांच्या समस्या निर्माण होण्याचे मुळ कारण जुळवून घेता येण्यामधील अपयश हेच असते.

वृध्दांच्या समस्यांची कारणे :—

**१) नवीन सामाजिक मूल्ये** :— व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक सुबत्ता, कोणत्याही क्षेत्रातील विशेषित ज्ञान व कौशल्ये, विज्ञाननिष्ठा यासारख्या मूल्यांना आधुनिक समाजात स्थान प्रापत झाल्यामुळे वृध्दांजवळ असणारे जीवनपध्दती संबंधीचे ज्ञान तसेच अनुभव आजच्या परिस्थितीत उपयुक्त नाहीत असे नविन पिढीला वाटू लागले आहे. प्रदत्त दर्जापेक्षा संपादित दर्जाला महत्व प्राप्त झाले आहे. **२) संयुक्त कुटुंब पध्दतीचे विघटन :—** संयुक्त कुटुंबात तरुण व बालसभासदांना आपल्या कुटुंबातील वृध्दांविषयी प्रेम, आत्मीयता, सहानुभूती वाटत होती. भारतात आता तीन पिढया एकाच ठिकाणी राहणाऱ्या कुटुंबाची संख्या फार कमी झालेली आहे. विवाहानंतर अल्पकाळातच मुलगा आणि सून स्वतंत्र बिऱ्हाड करुन राहू लागले आहेत. शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही क्षेत्रात कमी—अधिक प्रमाणात हीच स्थिती आहे. ३) उद्योगप्रधान अर्थव्यवस्था व शहरीकरण :— उद्योगप्रधान समाजात कुटुंबातील सदस्य परस्परांसाठी पूर्वीएवढा रिकामा वेळ देऊ शकत नाही कारण शिक्षण, नोकरी, आर्थिक व्यवसाय यासारख्या कारणांसाठी सदस्यांचा बहुतांश वेळ कुटुंबाबाहेर खर्च होतो. शहरीकरणामुळे जागेच्या

टंचाईमुळे मध्यम व कनिष्ठ वर्गामधील कुटुंबात वृध्दांची स्थिती फारच दयनीय होते. ४) ग्रामीण समुदायातील परिवर्तन :— आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रातील वृध्दांजवळचे परंपरागत स्वरुपाचे ज्ञान व त्यांचेजवळ असणारा अनुभव यांचे महत्व कमी झाले आहे. आम्हाला कुणीही विचारत नाही, कुटुंबात पूर्वीप्रमाणे मानमान्यता राहीली नाही. या शब्दात ग्रामीण वृध्द व्यक्ती त्यांच्या मनोवेदना व्यक्त करु लागले आहेत. ५) जातिप्रथेचा ऱ्हास :— वृध्द आई—वडिलांनी आबाळ करणाऱ्या व्यक्तीला जातपंचायतीकडून कठोर शिक्षा केली जात असे. आजच्या काळात जातपंचायत नामशेष झाल्यामुळे व्यक्तीच्या वर्तनावर पूर्वीएवढे नियंत्रण राहिले नाही.

## वयस्कांच्या समस्या कमी करण्यासाठीचे उपाय :—

१) वृध्दाश्रम आणि वृध्दांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अर्थसहाय्य :— वृध्द कल्याण कार्यक्रमात 'वृध्दाश्रम' ही अभिनव संस्था आहे. विदर्भात मातृसेवा संघ या संस्थेने 'पंचवटी' हा वृध्दाश्रम १९६१ मध्ये सुरु केला आहे. वरोरा येथील आनंदवनात समाजसेवक श्री बाबा आमटे यांनी 'उत्तरायण' या नावाने वृध्दाश्रमाची स्थापना केली आहे. कौटुंबिक तणावामुळे कुटुंबात होणारा वृध्दांचा कोंडमारा व वृध्दांची एकाकी अवस्था समाप्त करण्याचा योग्य उपाय म्हणजे वृध्दाश्रम होय असे म्हणता येईल. स्वयंसेवी संस्थांनी सुरु केलेल्या वृध्दाश्रमाला केंद्र व घटकराज्य शासनाकडून अनुदान दिले जाते. वृध्दांसाठी मनोरंजनासह सर्व प्रकारची सोय केल्यामुळे वृध्दांचे एक नवीन सामाजिक विश्व तयार होते. २) वृध्दांसाठीची दिनकेंद्रे :— वृध्दाश्रम हे वृध्दांचे सर्व प्रश्न सोडवण्याचे एकमेव साधन नाही. वृध्दाश्रमात राहणारे वृध्द 'कौटुंबिक' वातावरणाला पारखे होतात. दिनकेंद्रामध्ये वृध्द आपला संपूर्ण दिवस घालवितात. वृध्द सायंकाळनंतर पुन्हा आपल्या मुळ कुटुंबात परत येतात. वृध्दांना निवासस्थानातून दिनकेंद्रापर्यंत नेण्याची व आणण्याची व्यवस्था केली जाते. पाश्चिमात्य समाजात एकाकी अवस्थेत जीवन जगणाऱ्या वृध्दांना सहाय्य करण्यासाठी 'गृहसेवा व्यवस्था' ही अभिनव संस्था निर्माण झाली आहे. वाचनालयातून पुस्तक आणून देणे, औषधे व अन्य वस्तुंची खरेदी करुन ती वृध्दांच्या घरी पोहचती करणे, २ तास रिकामा वेळ

वृध्दांसोबत घालविणे यासारखी कार्ये या अभिनव संस्थेद्वारे केली जातात. ३) ज्येष्ठ नागरिकांसाठी निवृत्ती वेतन योजना :— एकाकी अवस्थेत जीवन जगणाऱ्या निराधार आणि दारिद्रयरेषेखाली गरिबीत जीवन जगणाऱ्या वृध्दांना दरमहा आर्थिक मदत देण्याची योजना 'संजय गांधी निराधार योजना' या नावाने सुरु आहे. उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाना यासारख्या राज्य सरकारांनीही कोणतेही आर्थिक उत्पन्न नसणाऱ्या वृध्दांसाठी पेंशन योजना राबविणे सुरु केले आहे. ४) वृध्द कल्याण कार्यक्रम :— संकटकाळात किंवा गरज पडेल तेव्हा वृध्दांना मदत करणे व त्यांच्या अडचणी आणि जीवनस्थितीत सुधारणा घडवून आणणे हेच वृध्द कल्याण कार्यक्रम व सामाजिक सुरक्षा पध्दतीचे उद्दिष्ट आहे. रेल्वे आणि प्रवास भाडयात सवलत, आयकरामध्ये सवलत, वृध्दाश्रमांना अर्थसहाय्य या सर्वांचा समावेश वृध्द कल्याण कार्यक्रमामध्ये होतो. ५) आरोग्यविषयक सोयी सवलती :— मोफत रोगनिदान शिबीर, नेत्र शिबिरात डोळे तपासणे, मोफत चष्मे देणे, डोळयांवरील शस्त्रक्रिया करणे यासारख्या शिबीरांचा मोठा फायदा ग्रामीण भागातील जेष्ठ नागरिकांना होतो. ६) विमा योजना :— विमा कंपन्यांनी जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा योजना, अपघातग्रस्तांसाठी अर्थसहाय्य विमा योजना तसेच इतर योजना सर्व वृध्दांसाठी सुरु करण्याचा सरकारचा इरादा आहे. ७) कायदेविषयक उपाययोजना :— कमावत्या मुला—मुलींनी आपापल्या वृध्द आई—वडिलांचा सांभाळ करण्यासाठी लागणारा आर्थिक भार उचलला पाहिजे, हे कर्तव्य पूर्ण न केल्यास आर्थिक दंड आणि तीन महिने तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद २००७ च्या कायद्यात केली आहे.

## युनिट ३ भारतीय आदिवासी समाजातील आव्हाने व समस्या

## (Tribal Issues and Problems in India)

**अ) युवागृहे :—क्र. १ :— भारतीय आदिवासींच्या शिक्षणविषयक समस्येचे टिकात्मक परिक्षण करा?**

उत्तर :— शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक अशी विविध कार्ये युवागृहे करीत असल्यामुळे आदिवासींच्या नवीन पिढीमध्ये सामाजिक जाणिवांची निर्मिती होते. तरूणांना त्यांच्या जमाती मधील संपूर्ण जीवन पध्दतीची व कर्तव्यांची ओळख युवागृहे करून देतात. युवक आणि युवती आपला सायंकाळनंतरचा वेळ एकत्रितपणे ज्या संघटनेत घालवितात त्याला युवागृहे असे म्हणतात. माडिया गोंड जमातीत गोटूल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संमिश्र युवागृहात युवक व युवतींना प्रवेश दिला जातो. आसाममधील कोन्यॅक नागा या जमातीत पुरूषांच्या स्वतंत्र युवागृहाला मोरूग व स्त्रियांच्या युवागृहाला यो असे संबोधिले जाते. आदिवासी जमातीत ४—५ वर्षाचे वय असल्यापासूनच मुला—मुलींना युवागृहात दाखल केले जाते. एकदा प्रवेश घेतल्यानंतर ते त्यांचा विवाह होईपर्यंत युवागृहाचे सदस्य आहेत असे मानले जाते. युवागृहात त्यांना जमातीच्या प्रथा, परंपरा, विश्वास आदींची ओळख करून दिली जाते. जीवन जगण्यासाठी सामाजिक गुणांची निर्मिती नविन पिढीमध्ये करण्याचे कार्य युवागृहाद्वारे केले जाते.

प्राथमिक शाळा, आश्रमशाळा यामधून मिळणाऱ्या आधुनिक शिक्षणामुळे आदिवासी जमातींना युवागृहांचे महत्व वाटेनासे झाले आहे. युवागृहे युवक—युवतींना जमातीची लोकगीते गाण्याचे आणि वाद्ये वाजविण्याचे तसेच सामुहिक नृत्याचे प्रशिक्षक देत असत परंतु आता युवागृहे अस्तंगत झाली आहेत. त्यामुळे आदिवासी युवक—युवतींना त्यांच्या लोककलांचे शिक्षण देणारी कोणतीही पर्यायी व्यवस्था निर्माण झालेली नाही. म्हणून आदिवासी जमातींच्या हजारो वर्षापासूनच्या लोककला नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

**ब) आधुनिक शिक्षण व्यवस्था** :— २१ व्या शतकात ग्रामीण व नागरी लोकांपेक्षा आदिवासी लोकांचे शैक्षणिक माघारलेपण प्रकर्षाने जाणवते. एकीकडे अनेक आदिवासी

जमातींची सांस्कृतिक वैशिष्टये नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत तर दुसरीकडे आदिवासींनी ग्रामीण व नागरी जीवन पध्दतीचे पुर्णपणे अनुकरणही केलेले नाही. यामुळे त्यांची अवस्था त्रिशंकूसारखी झालेली आहे. प्राथमिक शिक्षणात आदिवासी मुलामुलींना त्यांच्या मातृभाषेतूनच शिक्षण देण्याची व्यवस्था नाही. यामुळे गैरआदिवासी मुलांच्या तुलनेत शैक्षणिक माघारलेपण व गळतीचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भगात पदवी शिक्षण पूर्ण करणाऱ्यांची संख्या २ पेक्षाही कमी आहे. तर नागरी भागात १३ पेक्षा कमी आहे.

**क) <u>आश्रमशाळा</u>** :— आदिवासींची वस्ती असणाऱ्या भागात आदिवासी मुला—मुलींसाठीच्या निवासी शाळांना आश्रमशाळा असे म्हणतात. आदिवासी मुला—मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे, वसतीगृहे निर्माण करणे या उपायाबरोबरच १९७० मध्ये आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. आश्रमशाळेच्या संचालक मंडळ व कर्मचारी वर्गात जमातीतील लोकांच्या नियुक्तीला प्राधान्य दिल्यामुळे युवागृह अवस्थेला 'आश्रमशाळा' हा आधुनिक काळाशी सुसंगत असा पर्याय उपलब्ध होईल असा आश्रमशाळा सुरू करण्यामागे उद्देश होता. परंतु या शाळांच्या कारभारात आर्थिक भ्रष्टाचार व कार्यक्षम कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे काही आश्रमशाळेच्या मॅट्रिकचा निकाल शून्य टक्के लागला. आश्रमशाळा सुरू करणे मागचे व शैक्षणिक माघारलेपण दुर करणे हे दोन्ही उद्देश पूर्ण होऊ शकले नाहीत.

**<u>प्र.क्र. २ :— भारतातील आदिवासींच्या शेतीविषयक समस्या लिहा?</u>**

**उत्तर :— अ) <u>फिरती शेती हा व्यवसाय करणारे आदिवासी</u>** :— आदिवासींचे शेतीविषयक प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या आदिवासी कल्याण कार्यक्रम आणि विकास योजनांची माहिती त्याच्यापर्यंत न पोहचण्याचे एक महत्वपूर्ण कारण त्यांच्यामध्ये निरक्षरता दर अधिक असणे हेच आहे. भांडवलाच्या अभावामुळेही ते त्यांच्या शेतीमध्ये काही सुधारणा करू शकत नाहीत. थोडक्यात आदिवासींच्या शेतीविषयक प्रश्नांशी त्यांच्या जीवनशैलीशी आर्थिक व सामाजिक — सांस्कृतिक बाजू निगडित आहे. फिरती शेती ही त्यांची एक प्रमूख समस्या आहे.

१. **अनेक देशांची समस्या** :— फिरती शेती ही केवळ भारतातील समस्या नाही. ती जगातील विशेषत: उष्ण कटिबंधीय प्रदेशाच्या पट्टयात येणाऱ्या अनेक देशांची समस्या आहे. जागतिक स्तरावर सुमारे २ कोटी आदिवासी या व्यवसायात गुंतले आहेत. भारत, बंगलादेश, म्यानमार, भुतान या दक्षिण—पूर्व आशियातील देशांमध्ये फिरती शेती हा शेतीचा व्यवसाय अस्तित्वात आहे.

२. **भारतात विविध भागात शेती** :— भारतात अरूणाचल प्रदेश, मणिपूर, मिझोराम, नागालॅंड, त्रिपूरा, मेघालय, आसाम या भागात शेती केली जाते. याशिवाय ओरिसा, मध्यप्रदेश, आंध्र, कर्नाटक राज्यांमध्येही फिरती शेती केली जाते. ओरिसामध्ये फिरती शेती करणाऱ्या आदिवासींची संख्या संपूर्ण भारतात सर्वात जास्त आहे. भारतात ४९,२०० आदिवासी कुटुंबे फिरती शेती या व्यवसायात गुंतलेली आहेत असे राष्ट्रीय कृषी आयोगाच्या अहवालात नमूद आहे.

३. **विविध जमातींचा समावेश** :— ईशान्य भारतात सेमा नागा, कोन्याक नागा, कुकी, मिकिर, मोडो, मध्य भारतात बैगा, कोरवा, खारिया गोंड, खोंड, जंग या नावाच्या जमातीचे लोक फिरती शेती करतात. फिरती शेती हा प्रामुख्याने ईशान्य भारतातील लहान आकार असणाऱ्या राज्यांच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वपूर्ण भाग आहे. एकूण १२ घटकराज्यांच्या अर्थव्यवस्थेत फिरत्या शेतीचे योगदान आहे.

४. **विभिन्न नावाने ओळख** :— फिरत्या शेतीला आदिवासी जमातींमध्ये आणि देशाच्या विभिन्न भागात वेगवेगळया नावाने संबोधिले जाते. बैगा जमातीत बेवटा, नागा जमातीत शूभ शेती, गोंड जमातीत पेंडा, भिल्ल जमातीत दध किंवा जीमटा अशी फिरत्या अथवा स्थानांतरीत शेतीची नावे आहेत.

५. **फिरत्या शेतीची निवड** :— साधारणत: डिसेंबर—जानेवारी महिन्यात फिरत्या शेतीसाठी डोंगरमाथ्यापासून पायथ्यापर्यंत उतार असणाऱ्या जागेची निवड करून त्या जागेवरील जंगल साफ केले जाते. फेब्रूवारी—मार्च महिन्यात वृक्ष व वेली जाळून टाकले जातात. राख जमिनीवर पसरवून काठीच्या सहाय्याने छिद्रे तयार करून बी—बियाणे टाकण्यात येते. कमी अवधीत येणारी पिके प्रथम घेतली जातात. यानंतर दुसरे पीक म्हणून भाताचे पीक घेतले जाते. साधारणत: तिसऱ्या वर्षी त्या मुरमाड

जमिनीत काठीच्या सहाय्याने छिद्रे पाडणे अशक्य झाल्यामुळे शेतीसाठी नवीन जागा निवडली जाते. आठ—दहा वर्षानंतर पुन्हा शेती करण्यासाठी तीच जागा निवडली जाते. अशाप्रकारे शेतीची जागा सतत बदलत असते. म्हणून शेतीच्या या प्रकाराला फिरती शेती किंवा स्थानांतरीत शेती असे संबोधिले जाते.

६. **व्याख्या :— कॉनक्विन यांच्या मते** :— ''फिरती शेती म्हणजे शेती करण्याची कोणतीही अशी पध्दती की जिच्यामध्ये जमिनीवरील वृक्ष जाळून पिकांसाठी जागा तयार केली जाते आणि काही ठराविक कालावधीनंतर पुन्हा तीच जागा पिकांच्या लागवडीसाठी उपयोगात आणली जाते.''

७. **पर्यावरणाच्या दृष्टिकोणातून घातक** :— डोंगराच्या उतरणीवरील जंगले व जैवविविधताही नष्ट होते. पशु—पक्ष्यांचे आश्रयस्थान नष्ट होते. पर्यावरणाचे संतुलन बिघडते. जमिनीमध्ये असणाऱ्या रासायनिक द्रव्यांच्या ऱ्हासाला सुरूवात होते. जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण कमी होऊ लागते.

८. **अतिशय कमी उत्पन्न** :— भूमिहीन आदिवासी मजूर आणि आदिवासी शेतकरी हयांच्या आर्थिक स्थितीत वा उत्पन्नात अद्यापही तफावत निर्माण झालेली नाही. याचे मुख्य कारण शेतकरी आदिवासींचे उत्पन्नही भूमिहीन आदिवासी शेतमजूरांच्या उत्पन्नासारखे तुटपुंजे आहे. यामुळे फिरती शेती या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्यांची दारिद्रयजन्य परिस्थितीतून सुटका होत नाही.

९. **धार्मिक विश्वास** :— आपल्या जमातीच्या मुळ पुरूषाला पृथ्वी देवतेने स्वप्नामध्ये येऊन 'अन्य लोकांप्रमाणे नांगरटी करून तू मला त्रास देऊ नको असा दृष्टांत दिला' असा त्यांचा धार्मिक विश्वास आहे. अशा स्थितीत सक्तीच्या मार्गाचा अवलंब करून फिरती शेती या शेतीच्या प्रकाराचे उच्चाटन करणे अशक्य आहे याची जाणीव तज्ञ अभ्यासकांना होऊ लागली आहे.

१०. **सकारात्मक बाजू** :— मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी अन्नपिके डोंगराळ भागात घेण्याच्या दृष्टीने फिरती शेती अयोग्य आहे असे म्हणता येत नाही. त्या काळात फिरती शेती ही जंगलांची वाढ व संरक्षण या दृष्टीनेही नुकसानदायक ठरत नव्हती. फिरत्या शेतीसंबंधीचे शेकडो वर्षांच्या अनुभवातून प्राप्त झालेले पारंपारिक

ज्ञान आणि डोंगराळ भागातील आदिवासींना गरिबी असूनही फिरत्या शेतीतून मिळणारी आर्थिक सुरक्षितता यांचे जतन होणे ही देखील आजच्या काळाची गरज आहे.

**ब) स्थायी शेतीचा व्यवसाय करणारे अल्पभूधारक आदिवासी** :— स्थायी शेती हा शेतीचा प्रकार आता बहुतांश आदिवासींसाठी नवीन राहीला नाही. भिल्ल, मुंडा, संथाल, गोंड, नागा, मिझो, कोरकू, कोलाम, ठाकूर अशा अनेक जमातींचा स्थायी शेती हा परंपरागत स्वरूपाचा व्यवसाय झाला आहे. थारू जमातीचे लोक नवीन बी—बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके आदींचा उपयोग करण्यास शिकले आहेत. संमिश्र वस्ती असणाऱ्या खेडयांमधील आदिवासी गैर आदिवासी लोकांप्रमाणेच बैल व ट्रॅक्टर यांचा शेतीमध्ये उपयोग करण्यास म्हणजे प्रगत पध्दतीने शेती करण्यास शिकले आहेत. दुर्गम भागात फिरती शेती करणाऱ्या आदिवासी जमातींपेक्षा स्थायी स्वरूपाची शेती करण्याची पध्दती स्विकारलेल्या आदिवासी जमातींचे व लोकांचे राहणीमान आणि एकूण सामाजिक जीवन तुलनात्मकदृष्टया अधिक स्थिर व समृध्द आहे असच म्हणावे लागते असे असले तरी कनिष्ठ प्रतीची शेतजमीन पिकांच्या मशागतीसाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाचा अभाव, निसर्गाची अवकृपा यासारख्या कारणांमुळे स्थायी शेती करणाऱ्या आदिवासींची दारिद्रयातून मुक्तता झाली नसल्याचे दिसून येते.

**क) भूमिहीन शेतमजूर आदिवासी** :— भूमिहीन शेतमजूर आदिवासींची एकूण संख्या अल्पभूधारक आदिवासी शेतकऱ्यांपेक्षा अधिक आहे. गैरआदिवासी लोकांनी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन आदिवासींच्या शेतजमीनी आपल्या नावावर करून घेतल्या. त्यामुळे आदिवासी भूमिहीन झाले. स्वातंत्र्योत्तर काळातही अल्पभूधारक आदिवासी भूमिहीन शेतमजूर होण्याच्या प्रक्रियेत अधिक वाढ झाली. आदिवासींची शेतजमीन गैरआदिवासी लोकांनी विकत घेण्यावर बंदी असणारा कायदा करण्यात उशीर झाल्यामफळे असंख्य अल्पभूधारक आदिवासी शेतकरी आर्थिक फसवणूकींच्या व्यवहारात नाउले गेल्यामुळे भूमिहीन झाले आहेत. कनिष्ठ प्रतीची शेतजमीन, पिकांच्या मशागतीसाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाचा अभाव, निसर्गाची अवकृपा यासारख्या कारणांमुळे आदिवासी शेतकरी आणि भूमिहीन आदिवासी शेतमजूर यांच्या आर्थिक स्थितीत फारशी तफावत नाही असा निष्कर्ष निघतो.

**प्र.क्र. ३ :— आदिवासी कल्याण कार्यक्रमांचे स्वरूप स्पष्ट करून आदिवासी कल्याण कार्यक्रमांचे टीकात्मक परीक्षण करा?**

उत्तर :— आदिवासी कल्याणासाठीच्या काही योजना केंद्र सरकारकडून तर काही योजना घटकराज्य सरकारकडून तयार केल्या जातात. त्यासाठी आर्थिक निधीची तरतूद करावी लागते. तसेच स्थानिक संस्थांना अनुदान द्यावे लागते. स्वातंत्र्यपूर्व काळात कै. ठक्करबाप्पा व श्रीमती गोदुताई परूळेकर यांचे कार्य देखील उल्लेखनिय आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सत्तारूढ राजकीय पक्षाचे धोरण, दुर्बल घटक म्हणून आदिवासी बद्दलची कणव, नेत्यांची दुरदृष्टी या कारणांमुळे आदिवासी कल्याण कार्यक्रम तयार केले जात नाही, तर ते संविधानिक जबाबदारी पूर्ण करण्यासाठी तयार केले जातात व अंमलात आणले जातात.

**शासनाच्या आदिवासी कल्याण कार्यक्रमाचे स्वरूप :— (स्वातंत्र्योत्तर काळातील)**

**अ) आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न** :— आदिवासींची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी शेती, कुटीर उद्योग, सहकारी संस्था, गृहनिर्माण योजना इत्यादींचा समावेश आदिवासी कल्याण कार्यक्रमात होतो.

१. **शेतीला प्राधान्य** :— आदिवासी कल्याण कार्यक्रमात शेतीला अग्रस्थान देण्यात आले आहे. आदिवासींना स्थिर शेतीचा लाभ व्हावा म्हणून शेतजमीन उपलब्ध करून दिली जात आहे. शेतजमिनीचा कमाल धारणा कायदा म्हणजे सिलिंग मधून शासनाला प्राप्त झालेल्या शेत जमिनीचे वाटप करतांना आदिवासी व्यक्तींना अग्रक्रम दिला जातो.

२. **शेतीविषयक कायदा** :— आदिवासींच्या शेतजमिनीची हस्तांतरण टाळण्यासाठी शासनाने एक विधिनियम मंजुर केला आहे. या विधिनियमानुसार आदिवासींच्या ताब्यातील जमिनीची विक्री, देणगी, गहाण, ठेका याबाबतचे व्यवहार बिगर आदिवासींना करता येणार नाहीत.

३. **शेती करण्यासाठी प्रोत्साहन** :— आदिवासींच्या शेती करण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा व्हाव्या म्हणून पंचायत समितीमार्फत आधुनिक पध्दतीने शेती करण्याबाबत प्रोत्साहित केले जात आहे. यासाठी रासायनिक खते, बी—बियाणे, कृषीसाठी लागणारी

लहानमोठी अवजारे कमी किमतीत आदिवासी शेतकऱ्यांना उलपब्ध करून देण्यात येत आहेत.

४. **कुटीर उद्योगावर भर** :— कुटीर उद्योग हे शेतीला पूरक असे उद्योग आहे. विणकाम, शिवणकाम, टोपला तयार करणे, दोर वळणे इत्यादींचे शिक्षण त्यांना दिले जात आहे.

५. **कर्ज पुरवठयाची सुविधा** :— पशुपालन, कुक्कुटपालन, डुक्कर पालन हे व्यवसाय आदिवासींनी करावेत यासाठी सहकारी पतपेढया निर्माण करण्यावर भर दिला जात ओह. अल्प व्याजदर असणारे कर्ज आदिवासींना शेतीसाठी तसेच लघु उद्योगासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

६. **सहकारी संस्थांची निर्मिती** :— आदिवासींचे विविध तऱ्हेने होणारे शोषण, कायद्यातील तरतुदींचे अज्ञान व जंगल कायद्याने आदिवासींवर घातलेले निर्बंध यामुळे आदिवासींच्या सहकारी संस्थांची निर्मिती महाराष्ट्रासह अनेक घटकराज्यांमध्ये झालेली आहे. यासाठी सरकारने १४ कोटी रूपयांची तरतूद केली असून आदिवासींसाठी १,००० पेक्षा जास्त सहकारी संस्था कार्यरत आहेत.

७. **वैद्यकीय मदत व आरोग्य संरक्षण** :— अपुरा व व निकृष्ट आहार तसेच रोगांवर उपचार करण्यासंबंधी आदिवासींमध्ये असणारी अनास्था यामुळे आदिवासींच्या स्वास्थ्य रक्षणासाठी विशेष तरतूद आदिवासी कल्याण कार्यक्रमात करण्यात आली आहे. आदिवासींसाठी कुष्ठरोग निवारण केंद्रे, आरोग्य केंद्रे, प्रसुतिगृहे, बालसंगोपण गृहे यांची आदिवासी क्षेत्रातील संख्या वाढविण्यावर भर दिला जातो.

८. **सांस्कृतिक केंद्राची निर्मिती** :— आदिवासी समाजातील रंगकाम, संगीत, नृत्य, शिल्पकला इत्यादी आदिवासी कुलांचा विकास व्हावा या दृष्टीने आदिवासी विभागात शासन संस्थेने सांस्कृतिक केंद्राची निर्मिती केली आहे.

**ब) आदिवासी कल्याण कार्यक्रमांची टीकात्मक चिकीत्सा/परीक्षण** :—

१. **सेवाभावाचा अभाव** :— आदिवासी कल्याण योजना राबविणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये सेवा मनोवृत्तीचा अभाव असतो. आदिवासींना समजून—उमजून व

अनुनय पध्दतीचा अवलंब करून अत्यंत चिकाटीने या योजना राबविल्याशिवाय त्या यशस्वी होणे शक्य नाही.

२. **विश्वासाचा अभाव** :— आदिवासींना प्रगत समाजाबद्दल नेहमीच भिती वाटते. परक्या लोकांना बुजणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. यामुळे कल्याण कार्यक्रमात त्यांना विश्वासात घेऊन सहभागी करून घेतले पाहिजे. परंतू अद्यापही प्रगत समाजाबाबत आत्मविश्वास निर्माण करण्यात यश प्राप्त न झाल्यामुळे आदिवासी लोकांकडून कल्याण कार्यक्रमाला योग्य तो प्रतिसाद मिळाला न ाही.

३. **अंमलबजावणीची चुकीची पध्दत** :— आदिवासींच्या जून्या वर्तनपध्दतीत परिवर्तन करतांना त्यांच्यामध्ये भावनिक ताण व वैफल्य निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक ठरते. दारूबंदीसारख्या कार्यक्रमाचा आदिवासींच्या जीवनावर आघात होत असेल तर असे कार्यक्रम यशस्वी होणे शक्य नाही.

४. **गैर आदिवासींचे हितसंबंध** :— आदिवासी जमातींचे शोषण करून स्वत:चा स्वार्थ साधणारी माणसे स्वत:चे अधिकार व हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी या कल्याण कार्यक्रमाला विरोध करतात.

५. **कार्यक्रमाविषयी अलिप्तता** :— आदिवासींना आपले आचार विचार, प्रथा, परंपरा या योग्य आहेत असे वाटत असल्यामुळे स्वत: आदिवासी लोकच त्यांच्या कल्याण कार्यक्रमांशी एकरूप होत नाहीत.

६. **कार्यक्रमाविषयी उदासिनता** :— आदिवासी कल्याण कार्यक्रमाच्या योजनांचे सरकारीकरण झाल्यामुळे जोपर्यंत आदिवासी लोक स्वेच्छेने पुढे येत नाहीत तोपर्यंत या कल्याण योजना यशस्वी होऊ शकत नाहीत. आदिवासी कल्याणाच्या योजना आखून त्यांच्या समस्या सुटतील किंवा आदिवासी समाज पूर्णत: बदलेल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे.

**प्र.क्र. ४ :— आदिवासी कल्याण कार्यक्रमात गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांची भूमिका स्पष्ट करा?**

उत्तर :— स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच आदिवासी कल्याण कार्यक्रमात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग महत्वपूर्ण मानला जातो. 'आदिम जाती सेवक संघ', 'वनवासी कल्याण

आश्रम', 'भिल्ल सेवा मंडळ', 'वनवासी सेवा मंडळ' या सर्व गैरसरकारी संस्था आदिवासी कल्याणाची कार्ये करीत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात अशा संस्थांच्या संख्येत इतकी वाढ झाली. साक्षरतेचे शिक्षण आणि अनिष्ट समाजघातक अशा प्रथा व परंपरांच्या विरोधी जनजागृती करणे असे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या सेवाकार्याचे स्वरूप होते. यामागे धर्मप्रसार हा त्यांचा सुप्त हेतू होता. हे सत्य असले तरी भारतीय समाजात सेवाकार्य करण्याची प्रेरणा ख्रिश्चन मिशनऱ्यांनी निर्माण केली हे मान्य करावे लागते. स्वयंसेवी संस्थांमध्ये सेवाकार्य करणारे कार्यकर्ते हे सरकारी नोकरशाहीपेक्षा आपल्या कामाशी अधिक एकनिष्ठ असतात. सेवाकार्य करण्याच्या ध्येयामुळे भारावलेले कार्यकर्ते विनावेतन किंवा अर्धवेतन घेऊन आपल्या ध्येयासाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करावयास तयार असतात. स्वयंसेवी संस्थेच्या निर्मितीसाठी अल्प किमतीने भूखंड उपलब्ध करून देणे, स्वयंसेवी संस्थांना 'देणगी' या रूपात अर्थसहाय्य करणाऱ्या व्यक्तींना करविषयक सवलती देणे, स्वयंसेवी संस्थांना अनुदान या स्वरूपात अर्थसहाय्य देण्याची भूमिका शासनाची असते. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींना प्रामुख्याने आरोग्य व शिक्षण या क्षेत्रात सेवाकार्ये उपलब्ध करून देणे ही गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांची भूमिका आहे. सेवाकार्ये करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांमुळे शासनावरील कार्याचा भार कमी होतो.

**टीकात्मक परीक्षण** :— आदिवासींसाठी सेवाकार्य करणाऱ्या काही स्वयंसेवी संस्था केवळ 'कागदोपत्री' आहेत. याउलट शासनाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यावर विसंबून न राहता मनोभावे आदिवासींसाठी सेवाकार्ये करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आहेत. तसेच शासकीय यंत्रणेशी संधान बांधून किंवा स्वयंसेवी संस्थांना अर्थसहाय्य करण्यासंबंधीच्या नियमावलीतील बारकावे हेरून शासनाचे अधिकाधिक अर्थसहाय्य आपल्या पदरात पाडून घेणाऱ्याही स्वयंसेवी संस्था आहेत. त्यामुळे कधीतरी हे गैरव्यवहार उजेडात येऊन त्यांना प्रसिध्दी मिळते. यामुळे सर्वसामान्य व्यक्तींचा स्वयंसेवी संस्थांच्या कार्यावरील विश्वास उडतो. परिणामी मनोभावे सेवाकार्य करणाऱ्या संस्थांना लोक अर्थसहाय्य करीत नाहीत. शासनाद्वारे स्वयंसेवी संस्थांना अनुदान दिले जाते. आदिवासी कल्याण कार्यक्रमावर करोडो रूपये खर्च होऊनही विकास झाल्याचे दिसत नाही.

# युनिट क्रमांक ०४
# भारतातील ग्रामीण समुदाय
## (Rural Community in India)

**प्रश्न क्रमांक ०१:-ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये लिहून ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप स्पष्ट करा ?**

उत्तर:- सर्व खेड्यांमधील ग्रामीण समूह म्हणजे ग्रामीण समुदाय होय.वैदिक वाङ्मयात खेड्यांचा उल्लेख 'ग्राम' असा करण्यात आला आहे .ग्राम या शब्दाचा मूळ अर्थ 'घरांचा समूह' असा आहे.सर्व ग्रामांचे मिळून भारत हे राष्ट्र बनले .भारताचा इतिहास म्हणजे पर्यायाने ग्रामीण जनतेच्या सामाजिक उत्क्रांतीचा इतिहास होय असे म्हणावे लागते .कारण भारतातील ग्रामीण समुदायाला पाच हजार वर्षाच्या प्रदीर्घ परंपरेचा वारसा लाभला आहे .

अ)ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये :-

१)साधी राहणी :-साधी राहणी हे ग्रामवासीयांच्या जीवनपद्धतीचे एक प्रमुख वैशिष्ट्ये आहे .त्यांच्या आचारविचारांमध्ये कृत्रिमतेचा अभाव असतो .ते एकमेकांना पूर्णपणे ओळखत असल्यामुळे परस्परांना प्रभावित करण्यासाठी कृत्रिम पद्धतींचा उपयोग करीत नाहीत .

२)शेती प्रमुख व्यवसाय :-अन्य देशांपेक्षा भारतीय समाजात कृषीवर लोकसंख्येचा अधिक भार असल्याचे दिसून येते .ग्रामीण भागात अन्य व्यवसायांचे प्रमाण कमी आहे .

३)जाती प्रथांचे प्राबल्य :-ग्रामीण समुदायातील बहुतांश सदस्यांचे व्यवसाय जातींच्या पारंपरिक व्यवसायाशी मिळतेजुळते असतात .सदस्यांचा सामाजिक दर्जा त्यांची जात कोणती यानुसार निश्चित होतो .थोडक्यात जातीप्रथांचे प्राबल्य आहे .जातवार प्रथा ,घराण्याच्या परंपरा ,उत्पादन पद्धती इत्यादिबाबतीत जाती प्रथांचे प्राबल्य आहे .

४) विवाह पद्धती:-नागरी समुदायाच्या तुलनेत विवाह समारंभ साधेपणाने पार पाडले जातात .विवाह संबंध जुळविताना कुटुंबाचा प्रभाव अधिक असतो .ग्रामीण समुदायात मुलींचे विवाह वय नागरी समुदायापेक्षा कमी आहे .

५)संयुक्त कुटुंब पद्धती :-आई,वडील ,त्यांची मुले असे दोन वा तीन पिढ्यांचे सदस्य एकाच घरात राहतात .एकाच सामायिक मालमत्तेवर आपली उपजीविका करतांना दिसतात .कुटुंबातील वृद्ध व्यक्ती कुटुंबाचा कर्ता म्हणून ओळखली जाते .शेती या व्यवसायाच्या गरजांना अनुकूल अशी ही संयुक्त कुटुंब पद्धती आहे .

६)धर्माचे महत्व :-श्रद्धा ,परंपरागत धार्मिक विश्वास ,विधी यांच्याद्वारे ग्रामवासीयांचे जीवन अधिक प्रभावित असते .'पाऊस पडावा'यासाठी बेडकाचे लग्न लावणारे ग्रामवासी आजही भारतात आहेत .खेड्यांमध्ये धर्म हाच सर्व सामाजिक ,आर्थिक व कौटुंबिक क्रियांचा मुख्य असतो .उपास ,प्रार्थना ,शुभाशुभ ,मुहूर्त इत्यादिबाबतीत ते धर्म श्रद्धांचे पालन करतात .

७)ग्रामीण अर्थव्यवस्था :-कोरडवाहू शेतकरी आणि बागायतदार शेतकरी यांच्या उत्पन्नामधील तफावतीत दिवसेंदिवसआर्थिक वाढ होत आहे .परिणामी ग्रामीण क्षेत्रात सामाजिक विषमतेसोबत आर्थिक विषमतेत वाढ होत असल्याचे दिसून येते .

८)समुदायाचा लहान आकार :-परस्परांच्या कुटुंबातील सदस्यांची संख्या ,त्यांची प्रथम नावे ,त्यांचे वय ,शिक्षण ,विवाहासंबंधीची स्थिती ,आर्थिक स्थिती इत्यादी बाबीसंबंधीची तपशीलवार माहिती असते .

९)बलुतेदारी पद्धती ;-स्वातंत्र्योत्तर काळात बलुतेदारी पद्धती जवळपास नामशेष झाली.तथापि शेकडो वर्ष अस्तित्वात असणाऱ्या या पद्धतीचे काही अवशेष ग्रामीण जीवनात अद्यापही कायम आहेत .उदा.ग्रामीण समुदायात विवाह समारंभात धोबी व न्हावी जातींची पारंपरिक सेवाकार्ये आवश्यक आहेत असे आजही समजले जाते .

१०)विशेषीकरणाचा अभाव :-बी –बियाणे पेरणे ,पिकांची मशागत करणे ,कापणी करणे या सर्व क्रियांमध्ये सर्वच ग्रामवासी तसेच स्त्रियादेखील मुलांचे पालनपोषण व गृहकार्ये करून शेतीच्या विविध क्रियांमध्ये सहभागी होतात .ज्ञान व कौशल्ये हा ग्रामवासीयांमधील श्रमविभाजानाचा आधार नसून वय व लिंग हेच ग्रामीण समुदायातील श्रमविभाजनाचे प्रमुख आधार आहेत .

ब)ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप :-

१)विवाहसंस्थेतील बदल:-विवाहासंबंधित वधू-वरांच्या निवडीत बदल झाला असून विधवा पुनर्विवाहासंबंधी ग्रामीण जनतेच्या प्रवृतीत थोडाफार बदल झालेला आहे .हुंडापद्धतीचे प्रस्त पूर्वीपेक्षा अधिक वाढले असून ग्रामीण लोक विवाह समारंभावर पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात खर्च करीत असल्याचे दिसून येते .

२)जातिव्यवस्थेतील बदल :-रोटीबेटी व्यवहार ,व्यवसायाची निवड ,खाणेपिणे व सामाजिक संबध याबाबतीत जातीप्रथांचा प्रभाव पूर्वीपेक्षा कमकुवत झाला आहे .तसेच ग्रामीण समुदायात जातीवाद मात्र दिवसेंदिवस अधिक प्रमाणात वाढत आहे .

3)धार्मिक जीवनात परिवर्तन :-ग्रामीण क्षेत्रातून धर्माचे तसेच अंधश्रद्धेचे पूर्ण उच्चाटन झाले असे म्हणता येत नाही .औद्योगिक प्रगती व विज्ञानाच्या प्रसारामुळे ग्रामीण जीवनावरील धर्माचा प्रभाव दिवसेंदिवस कमी होत असल्याचे दिसून येते .धर्माचे महत्व कमी झाल्यामुळे सामाजिक नियंत्रण आणि नैतिकतेच्या बाबतीत काही प्रश्न ग्रामीण समाजासमोर निर्माण झाले आहेत .

४)आर्थिक जीवनात परिवर्तन :-दरिद्री अवस्थेत जगणाऱ्याच्या संख्येत वाढ होत आहे .मिळेल तो व्यवसाय करणे भाग पडत असल्यामुळे शेती व्यवसायावर अवलंबून राहणाऱ्या सदस्यांची संख्या ग्रामीण कुटुंबात कमी होत असल्याचे दिसून येते .शेतीचे आधुनिक तंत्र ,निरनिराळी यांत्रिक साधने ,नवीन शोध ,दळणवळणाची साधने या सर्व बाबींमुळे ग्रामीण समुदायांच्या आर्थिक जीवनात बरेच परिवर्तन झालेले आहे.

५)कुटुंबरचनेतील बदल:-ग्रामीण समुदायात विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढले आहे .तीन पिढ्यांचे एकत्र कुटुंब हे ग्रामीण समुदायात दुर्मिळ झाले आहे .व्यक्तिवाद ,वैयक्तिक स्वार्थ ,आधुनिक शिक्षणाचा सदोष प्रभाव इत्यादी कारणांमुळे कुटुंबाचा अभिमान पूर्वीपेक्षा कमी झाला आहे .

६)शिक्षण क्षेत्रातील परिवर्तन:-ग्रामीण क्षेत्रातील सर्व जातीगटांमध्ये शिक्षणाचे प्रमाण ,शिक्षणाची संधी प्राप्त करण्याबाबतची आकांक्षा व पदवीप्राप्त लोकांची संख्या यामध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येते.दारिद्र्यजन्य स्थितीत राहणाऱ्या लोकांच्या संख्येतील वाढ ,शिक्षणानंतर रोजगार मिळण्याची दुर्मिळ संधी यासारखी कारणे ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रातील गळतीसाठी जबाबदार आहेत .

## *स्थलांतर

**प्रश्न क्रमांक ०२:-स्थलांतराचे प्रकार लिहा?**

उत्तर:-मूळ निवासस्थान सोडून म्हणजेच राजकीय सीमा ओलांडून व्यक्तींची नवीन वस्ती ,प्रदेश किंवा समुदायामध्ये जाण्याची प्रक्रिया म्हणजे स्थलांतर होय .समाजशास्त्रीय शब्दकोषात 'देशाच्या राजकीय सीमेअंतर्गत एक निवासस्थान कायमचे सोडून दुसऱ्या क्षेत्रात जाणे म्हणजे स्थलांतर होय' असे म्हटले आहे .

अ)देशांतर्गत स्थलांतर:-

१)ग्रामीण –नागरी स्थलांतर:-रोजगाराची संधी ,दर्जेदार उच्च शिक्षण व प्रशिक्षण मिळण्याची संधी ,शहरी जीवन पद्धतीची आवड ,कला –गुणांना अधिक प्रमाणात वाव मिळण्याची संधी यासारख्या कारणांमुळे ग्रामीण व्यक्ती शहरी भागात स्थलांतरित होतात .नगरपरिषद व महानगरपालिका यांची संख्या संपूर्ण देशातच झपाट्याने वाढत आहे .उद्योग –व्यापाराच्या दृष्टीने विकसित नगर व महानगरांमध्ये रोजगाराच्या संधी अधिक प्रमाणात असल्यामुळे महानगरांमध्ये स्थलांतराचे प्रमाण अधिक असते .

२)ग्रामीण ते ग्रामीण स्थलांतर :-धरण ,खाणी ,उद्योगधंदे यासारख्या विकास योजनांमुळे वा प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या ग्रामवासीयांचे पुनर्वसन दुसऱ्या खेड्यामध्ये केले जाते .हे देखील एकप्रकारचे सक्तीचे स्थलांतर असते .

३)नागरी - ग्रामीण स्थलांतर:-सेवानिवृत्ती नंतर महानगरातून मूळ गावी परत जाण्याची प्रवृत्ती देखील अत्यंत क्षीण झालेली आहे .महानगरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या उत्तम व उच्च दर्जाच्या वैद्यकीय सोयी हे त्यामागे असणारे कारण आहे .बदली व बढती हे एकप्रकारचे सक्तीचे स्थलांतर असते .

४)नगर ते नगर स्थलांतर :-नोकरी ,व्यवसाय ,उद्योगधंदे यासारख्या कारणांमुळे या प्रकारच्या स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे .जनगणना अहवालात गेल्या १० वर्षात आपले मूळ निवासस्थान बदलले असणाऱ्या लोकांची संख्या ४१.४ कोटी असल्याची नोंद आहे .

**प्रश्न क्रमांक ०३:-स्थलांतराची कारणे व परिणाम लिहा ?**

उत्तर:-अ)स्थलांतराची कारणे:-

१) शिक्षण:-सद्यस्थितीत इंग्लंड व अमेरिकेतील अनेक विद्यापीठांनी सर्वोत्कृष्ट असा जागतिक दर्जा प्राप्त केला आहे .त्यामुळे भारतासह अनेक देशांच्या विद्यार्थ्यांनी या देशांमध्ये शिक्षणासाठी स्थलांतर केले असल्याचे दिसून येते .Brain Drain म्हणजे चांगल्या जीवन पद्धतीसाठी सुशिक्षित लोकांचे स्थलांतर एक प्रमुख कारण मानले जाते.

२)विवाह :-ग्रामीण भागातील अनेक कुटुंब विवाह संबंधातून निर्माण झालेल्या सगे –सोयऱ्यांच्या सहाय्याने नागरी –भागात स्थलांतरित झाली असल्याची अनेक उदाहरणे आहेत .विवाहामुळे दोन भिन्न स्थितीत असणारी कुटुंब एकमेकांशी घट्ट संबंधामुळे स्थलांतर सुरु असते .

३)जागतिकीकरण :-जागतिकीकरण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थलांतराला प्रोत्साहित करते .नोकरी ,व्यवसाय ,उद्योग क्षेत्रात पुढे जाण्यासाठी लहान गावातून मोठ्या गावांकडे ,नगरातून महानगरांकडे आणि देशातून परदेशांकडे धाव घेणे भाग पडत आहे .म्हणूनच जागतिकीकरण हा २१ व्या शतकात स्थलांतराला प्रोत्साहित करणारा प्रमुख घटक झाला आहे .

४)रोजगाराच्या संधी :-शीख ,गुजराथी ,राजस्थानी हे भारताच्या विभिन्न भागात व्यापार –व्यवसायाच्या निमित्याने गेले असल्याचे आढळून येते .एवढेच नव्हे तर डॉक्टर ,इंजिनियर ,कलाकार ,विज्ञान प्रेमी ,संशोधक विभिन्न प्रगत देशांमध्ये कार्यरत असल्याचे आजही आढळून येते .

५)स्थलांतर प्रक्रियेत ढकलणारे व ओढणारे घटक :-स्थलांतर करण्यासाठी काही घटक ढकलतात तर काही घटक ओढतात ते पुढीलप्रमाणे :-

| अनु. क्रमांक | ढकलणारे घटक | ओढणारे घटक |
|---|---|---|
| १) | बेरोजगारी | संभाव्य रोजगारी |
| २) | विभिन्न सेवा सुविधांचा अभाव | उत्कृष्ट सेवा –सुविधांची उपलब्धता |
| ३) | दुबळी व कमकुवत सुरक्षा | सुरक्षित वातावरण |
| ४) | गुन्हेगारीचे अधिक प्रमाण | गुन्हेगारीचे कमी प्रमाण |
| ५) | शेतीत पीक अयशस्वी होणे | सुपीक जमीन |
| ६) | दुष्काळ | अन्न सुरक्षा |
| ७) | महापूर | नैसर्गिक हानीची शक्यता कमी |
| ८) | दारिद्रय | सुबत्ता |
| ९) | युद्ध | राजकीय सुरक्षा |

६)अन्य कारणे :-राजकीय कारणे ,वैद्यकीय कारणे म्हणजे एखाद्या स्थळाचे वा प्रदेशाचे हवामान सहन न होणे ,नैसर्गिक आपत्ती वा संकटे यासारख्या कारणांचा समावेश अन्य कारणांमध्ये होतो .

ब)स्थलांतराचे परिणाम

*लोकसंख्या शास्त्रीय परिणाम:-

अ)सकारात्मक परिणाम :-

१)नगर व महानगरांची लोकसंख्या वाढण्यामध्ये ग्रामीण –नागरी स्थलांतर हा एक प्रमुख घटक असतो .

२)स्थलांतराच्या प्रक्रियेतून 'विरळ' लोकवस्ती असणाऱ्या देशाच्या भागात लोकवस्ती वाढते .

३)स्थलांतराच्या प्रक्रियेतून संपूर्ण देशात लोकसंख्येचे पुनर्वितरण होते .

ब)नकारात्मक परिणाम :-

१)स्थलांतरातून महानगरांमधील पुरुषांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ होते .

२)कौशल्यधारक कारागिरांना खेड्यांमध्ये आणण्यासाठी पैसा आणि वेळ अधिक प्रमाणात खर्च करावा लागतो .

*सामाजिक परिणाम :-

अ)सकारात्मक परिणाम :-

१)नागरी भागातील लोकांच्या आचार –विचारांच्या अनुकरणातून ग्रामवासियांमध्ये सामाजिक परिवर्तन घडून येते .

२)ग्रामवासी शहरात आल्यामुळे संमिश्र संस्कृतीच्या निर्मितीचा प्रारंभ होतो .

३)ग्रामवासियांमध्ये हळूहळू नगरसीयांच्या दृष्टिकोनातील संकुचितता कमी होऊन त्यांचा दृष्टिकोन व्यापक होत जातो .

ब)नकारात्मक परिणाम:-

१)ग्रामवासी शहरांमध्ये आले की ते स्वतःची मूळ ओळख गमावून बसतात .

२)ओळख नसल्यामुळे अशा व्यक्ती समाजविरोधी कृतींमध्ये सहभागी होण्याची शक्यता असते .

३)स्थलांतराचे दुष्परिणाम स्थलांतरित होणाऱ्या पुरुषांच्या कुटुंबातील स्त्रियांना भोगावे लागतात .

*पर्यावरणशास्त्रीय परिणाम :-

अ)नकारात्मक परिणाम:-

१)ग्रामवासी नगरात गेल्यामुळे रस्ते ,पाणी पुरवठा,मोकळी जागा यासारख्या गोष्टींवर ताण पडतो .

२)ग्रामीण –नागरी स्थलांतरातून बेकायदेशीर झोपडपट्टया आणि कॉलन्यामध्ये वाढ होते .

३) महानगरांमधील लोकसंख्येचा आकार वाढला की वायू प्रदूषण ,ध्वनी प्रदूषण वाहनांचे अपघात अशा समस्या निर्माण होतात .

*आर्थिक परिणाम :-
अ)सकारात्मक परिणाम :-
१)कुशल व अकुशल कामगार काम करण्यासाठी नगरात येतात व घरात राहणाऱ्या कुटुंब सदस्यांना पैसे पाठवितात .
२)नगरमध्ये येण्यासाठी कर्ज ,विवाह ,घर बांधणे यासारखे उद्दिष्ट असते .
३)केरळ ,पंजाब,तामिळनाडू ,आंध्र मधील कामगारांनी परदेशात जावून घरादारासोबातच राज्याला समृद्ध केले .
४)भारत व चीनची अर्थव्यवस्था मजबूत होण्यामध्ये स्थलांतरित भारतीयांचे फार मोठे योगदान आहे.
ब)नकारात्मक परिणाम :-
१)स्थलांतरितांमुळे शहरांना विकसित करण्याचा आर्थिक ताण देशाच्या अर्थव्यवस्थेला सहन करावा लागतो .
२) स्थलांतरितांमुळे पाणी ,वीज ,नाल्या ,शौचालये यासारख्या सुविधा झोपडपट्ट्यांमध्ये देण्याचा ताण नगरांवर पडतो.
३)कामगार शहरात आल्यामुळे ग्रामीण भागात त्यांचा तुटवडा निर्माण होतो .

## *बेरोजगारी

प्रश्न क्रमांक ०१:-बेरोजगारीचे प्रकार लिहा ?
उत्तर:-१)तात्पुरती बेरोजगारी :-शिक्षण पूर्ण केल्यानंतर कामाचा अनुभव नसल्यामुळे बेरोजगार रहावे लागते याचा अंतर्भाव तात्पुरती बेरोजगारी या सदरात होतो .
२)औद्योगिक बेरोजगारी :-औद्योगिकरणामुळे ग्रामकामगार कामासाठी नगरात स्थलांतरित होणे,मंद गतीने औद्योगिक विकास ,सदोष औद्योगिक धोरण ,उद्योगधंद्यामधील टाळेबंदी,संपामुळे उद्योगधंदे बंद पडणे ,बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर स्पर्धा ,अनियोजित औद्योगिक विकास इत्यादी कारणांमुळे औद्योगिक क्षेत्रात बेरोजगारी निर्माण होते
३)ऐच्छिक बेरोजगारी :-नोकरी उपलब्ध असतांना काही कारणांमुळे नोकरी न स्वीकारणाऱ्या व्यक्तींचा समावेश ऐच्छिक बेरोजगारी या प्रकारामध्ये होतो .
४)तांत्रिक बेरोजगारी :-१०० माणसांचे काम एक तंत्र करतो त्यामुळे उत्पादन प्रक्रियेतील मनुष्यबळाचे प्रमाण कमी होते त्यामुळे बेरोजगारांच्या संख्येत भर पडते याला तांत्रिक बेरोजगारी असे संबोधिले जाते..
५)चक्राकार स्वरुपाची बेरोजगारी :-वस्तूंच्या किमती वाढल्या की व्यापाऱ्यांच्या नफ्यामध्ये वाढ होते .यामुळे रोजगारीत वाढ होते .परंतु जेव्हा नफा कमी होतो तेव्हा कामगारांची संख्या कमी केली जाते .तेजीमंदी प्रमाणे बेरोजगारीच्या संधीतही चढ –उतार होतात .यालाच चक्राकार बेरोजगारी असे म्हटले जाते .
६)अनै च्छिक बेरोजगारी :-काही वेळा व्यक्तीला तिच्या कुवतीपेक्षा कमी कुवतीचे काम गरजेपोटी करावे लागते किंवा अधिक वेतन मिळण्याची पात्रता असूनही गरजेपोटी कमी वेतनावर काम करणे भाग पडते अशा प्रकारच्या बेरोजगारीला अनै च्छिक बेरोजगारी म्हणतात.
७)हंगामी बेरोजगारी :-हंगामाच्या काळात साखर कारखाने ,बर्फ कारखाने ,कोरडवाहू शेती यांच्या मध्ये कामगारांना भरपूर काम मिळते .हंगाम नसल्यास ही कामे जवळ –जवळ बंधच असतात .यालाच हंगामी बेरोजगारी म्हणतात .

प्रश्न क्रमांक ०२:-बेरोजगारीची कारणे ,परिणाम व उपाय लिहा ?
उत्तर:-*बेरोजगारीची कारणे:-
**अ)सामाजिक कारणे:-**
१)लोकसंख्या वाढ :-आज शिक्षित व्यक्तीवर आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवून मिळेल ती नोकरी मिळविणे हे पूर्वी कधीही नव्हते एवढे आज दुर्लभ झाले आहे .म्हणून बेरोजगारीची अवस्था निर्माण होण्याचे महत्वपूर्ण कारण लोकसंख्या वाढ हेच आहे .
२)सदोष शिक्षण पद्धती :-प्रचलित शिक्षण पद्धतीत 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य जोपासले जात नाही .प्रत्येकाला 'नोकरी' करण्याची संधी मिळणे अशक्य आहे ,हे समजत असूनही त्यांचा कष्ट करण्याकडे कल झुकत नाही.त्यामुळे प्रचलित शिक्षण पद्धतीमधील दोष बेरोजगारीची अवस्था निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो .
३)भौगोलिक गतीशिलतेचा अभाव :-रोजगार प्राप्तीसाठी आपले गाव,जिल्हा ,प्रदेश सोडून न जाण्याची मनोवृत्ती असा भौगोलिक गतीशिलतेचा अर्थ आहे .आणि हेच बेरोजगारीची स्थिती निर्माण होण्याचे एक कारण आहे .
४)जातींचे पारंपरिक व्यवसाय :-आजच्या काळातही न्हावी ,धोबी,चांभार ,माळी आदी व्यवसायांमध्ये त्याच जातींच्या लोकांचे प्राबल्य आहे .अन्य जातींचे सदस्य त्या व्यवसायांमध्ये शिरतच नाहीत ,हे अनेक समाजशास्त्रीय अध्ययनात स्पष्ट झाले आहे .परंतु

जात आणि तिचा पारंपरिक व्यवसाय हे अनेक शतकांपासूनचे समीकरण लोकांच्या डोक्यातून अद्यापही पूर्णतः बाहेर पडण्यास तयार नाही .

५)व्यवसायाबद्दलची मानसिकता :-आजही काही व्यवसाय करणे अप्रतिष्ठेचे आहे असे लोक मानतात .उदा .नर्स ,फिरता विक्रेता आणि अनेक प्रकारचे कनिष्ठ व्यवसाय .त्यामुळे बेरोजगारीकारिता कामासंबंधीच्या प्रतिष्ठेच्या कल्पना कारणीभूत ठरतात .

**ब)आर्थिक कारणे:-**

१)बचत व गुंतवणूक कमी :-भांडवल हे बचीतीतून निर्माण होते .भांडवलाची गुंतवणूक केल्याशिवाय औद्योगिक व कृषी क्षेत्राचा विकास होऊ शकत नाही .

२)आर्थिक वृद्धीची मंद गती :-आर्थिक विकासातूनच रोजगारीची निर्मिती होत असते .म्हणून आर्थिक वृद्धीची मंद गती हे बेरोजगारी निर्माण होण्याचे एक कारण ठरते .

३)कृषी विकासाकडे दुर्लक्ष :-स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या नादात कृषी विकासाकडे दुर्लक्ष झाले .कोरडवाहू जमिनीपेक्षा ओलिताच्या सोयी निर्माण झाल्या तर अधिक रोजगार निर्माण होतो .प्रतिकूल निसर्गाचा सतत फटका बसत गेल्यावर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले .त्यामुळे कृषी विकासाकडे झालेले दुर्लक्ष हे बेरोजगारांच्या संख्येत वाढ होण्याचे एक महत्वाचे कारण आहे .

४)कृषी माल प्रक्रिया उद्योगांचा अभाव :-कृषी माल प्रक्रिया उद्योगातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होते .त्यामुळे नाशवंत कृषी माल वाया जात नाही .

५)लघु व कुटीर उद्योगांचे माघारलेपण :-लघु व कुटीर उद्योगांची निर्मिती करण्यासाठी वेळ कमी लागतो .भांडवलही कमी लागते.परंतु शासनाने शेतीच्या विकासाकडे पुरेसे लक्ष न दिल्यामुळे बेरोजगारीची निर्मिती झाली .

**क)वैयक्तिक कारणे:-**

१)स्वयं –रोजगार:- आधुनिकीकरण ,जागतिकीकरण ,उदारीकरण ,खाजगीकरण या चार प्रक्रियांमुळे 'नोकरी' देण्याच्या उद्योग –व्यवसायांच्या क्षमतेत घट होत आहे .म्हणून नोकरी करणे ही मानसिकता बदविल्याशिवाय शिक्षित व कुशल तसेच अकुशल तरुणांना रोजगार मिळू शकत नाही व बेरोजगारीची समस्या दूर होऊ शकत नाही .

२)गुणकौशल्ये:-सशक्त ,निरोगी ,निर्व्यसनी ,कष्ट करण्याची तयारी ,संवाद वा संभाषण कौशल्य आदी गुणांची नोकरी वा उद्योग –व्यवसायात गरज असते .केवळ पुस्तकी शिक्षण वा प्रमाणपत्रे असली म्हणजे नोकरी मिळतेच असे नाही .केवळ भांडवल आहे म्हणून उद्योग –व्यवसाय यशस्वी होईलच असे नाही .

३)नवीन शिकण्याची इच्छा:-नोकरी मिळविण्यासाठी अथवा स्वतःच्या बळावर उद्योग –व्यवसाय करण्यासाठी काही नवीन शिकण्याच्या इच्छाचा आणि त्यासाठी कष्ट करण्याच्या प्रयत्नांचा अभाव आहे ,असे अनेक तज्ञ अभ्यासकांचे म्हणणे आहे .

४)रोजगार प्राप्तीची नवीन क्षेत्रे :-सागरी मत्स्य शेती ,वाढत्या प्रमाणावरील दुग्ध व्यवसायातून निर्माण झालेली पशु –खाद्य निर्माण करण्याची गरज ,मधमाशापालन,वन औषधी शेती यासारखी रोजगाराची संधी असणारी नवीन क्षेत्रे आता भारतात उदयास आली आहेत .अशाप्रकारची संधी प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षण घेऊन स्वतःमधील कौशल्य विकसित करावे लागते .

***बेरोजगारीचे परिणाम:-**

१)दारिद्रयात आणि आर्थिक विषमतेत वाढ होते :-भारतात दारिद्रयरेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांची संख्या कोटीमध्ये आहे ,असे शासनाची आकडेवारी सांगते .बेरोजगारी ही समाजात श्रीमंत व गरीब यांच्या मध्ये असणारी आर्थिक विषमतेची दरी अधिक रुंद करते .ही आर्थिक विषमता कमी करणे हे व्यक्ती ,शासन व समाज यांच्यासाठी अत्यंत अवघड असे काम ठरते .

२)कामगारांचे शोषण :-बेरोजगारीच्या जाचातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी व्यक्ती बाजार भावापेक्षा कमी मजुरीत काम करावयास तयार होते .त्यामुळे कुशल आणि अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांचे आर्थिक शोषण करण्याची संधी व्यापारी ,उद्योगपती ,कंत्राटदार म्हणजेच भांडवलदारांना प्राप्त होते .

३)जागतिक स्पर्धेत माघार :-सरकारने कराचे दर वाढविले की उत्पादित वस्तू महाग होतात .महाग वस्तू विकत घेण्याकडे कोणत्याही राष्ट्राचा कल नसतो .चोरट्या मालाच्या व्यापारात आपला जम बसविण्यासाठी या संघटीत गुन्हेगारांच्या टोळ्या भ्रष्टाचार करणे,खून करणे यासारख्या मार्गाचा अवलंब करतात .

४)मानवी संसाधनांची हानी :-बेरोजगारीची समस्या नसणारी राष्ट्रे आर्थिक दृष्ट्या समृद्ध असतात .धरणे ,रस्ते ,विमानतळ ,रेल्वे मार्ग ,औद्योगिक प्रकल्प यासारखी राष्ट्राची संपत्ती ही श्रमातूनच निर्माण होते . बेरोजगार असणे म्हणजे राष्ट्राच्या दृष्टिने मनुष्यबळाची हानी आहे .

५)राहणीमानाचा दर्जा कमी होतो :-अन्न ,वस्त्र ,निवारा या मुलभूत गरजा पूर्ण झाल्या तरी शिक्षण घेणे ,आरोग्याचे रक्षण करणे ,खेळ ,साहित्य ,चित्रपट यासारख्या सुखाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बेरोजगार व्यक्ती पैसा खर्च करू शकत नाही .बेरोजगारीमुळे त्या व्यक्तीच्या राहणीमानाचा दर्जा कमी होतो .

६)वैयक्तिक ,कुटुंब आणि सामाजिक विघटन :-चोरी करणे ,मादक वा अंमली पदार्थांचे सेवन करणे ,सतत मद्यपान करणे यासारख्या कारणांमुळे वैयक्तिक ,कौटुंबिक व सामाजिक विघटन घडून येते .

७)अर्थसहाय्य :-बाजारभावापेक्षा कमी किमतीत अन्नधान्य ,साखर ,रॅकेल ,मोफत गॅस कनेक्शन देणे ,मोफत वीज कनेक्शन देणे यासाख्या अर्थसहाय्यामुळे महागाई वाढते .त्यामुळे बेरोजगारीची समस्या ही देशाची अर्थव्यवस्था कमकुवत करण्याचे कार्य करते

*बेरोजगारी निर्मूलनाचे उपाय :-

१)कृषी क्षेत्राचा विकास :-औद्योगिक बेरोजगारी कमी करण्यासाठी कृषी क्षेत्राचा जलद गतीने विकास घडवून आणणे आवश्यक आहे .ग्रामीण क्षेत्रात शेतीमध्ये जलसिंचनाच्या सोयी जितक्या जास्त प्रमाणात निर्माण होतील ,तितक्या जास्त प्रमाणात कृषी क्षेत्राचा विकास होऊन रोजगाराच्या संधी निर्माण होतील .

२) शिक्षणपद्धतीत सुधारणा:-उद्योगधंद्याची गरज लक्षात घेऊन विशिष्ट गुणकौशल्ये असणारे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी शिक्षण पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक आहे .श्रमप्रतीष्टेवर आधारित सुधारणा शिक्षणपद्धतीत घडवून आणल्यास शिक्षित बेरोजगारांच्या संख्येमध्ये बऱ्याच प्रमाणात घट होऊ शकते .

३)कुटीर व ग्रामोद्योगांना प्रोत्साहन :-कमी प्रमाणात भांडवल गुंतवणूक करून अधिक रोजगार देण्याची क्षमता कुटीर व ग्रामोद्योगांमध्ये आहे .म्हणून अशा उपाय योजना शासनाने करणे योग्य ठरते .

४)लोकसंख्या वाढीचे नियंत्रण :-जन्मदरात घट होण्यासाठी सातत्याने आणि अधिक तीव्र गतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे .लोकसंख्येची वाढ थांबविल्याशिवाय बेरोजगारीच्या समस्येचे निर्मुलन करणे शक्य नाही .

५)कृषी माल प्रक्रिया उद्योगांचा विकास :-फळांवर ,भाज्यांवर प्रक्रिया करणारे कारखाने अधिक प्रमाणात निघाल्यास रोजगाराच्या संधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते .कृषी माल प्रक्रिया उद्योगांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारीचे बऱ्याच प्रमाणात निर्मुलन करणे शक्य आहे .

## *शेतकरी आत्महत्या

प्रश्न क्रमांक ०१:- शेतकरी आत्महत्येच्या क्रियेची वैशिष्ट्ये लिहून शेतकरी आत्महत्येबाबातची स्थिती लिहा ?

उत्तर:-व्याख्या :-ब्रिटानिका ज्ञानकोशानुसार,

“आत्महत्या ही व्यक्तीने समजून –उमजून आणि स्वेच्छेने केलेली आत्महननाची क्रिया आहे .”

आत्महत्येच्या क्रियेची वैशिष्ट्ये :-

१)क्रियेच्या परिणामाचे ज्ञान :-आत्महत्येच्या क्रियेचे एक वैशिष्ट्य म्हणजे तिचा शेवट किंवा परिणाम काय होणार यासंबंधी व्यक्तीला पूर्ण माहिती असून देखील व्यक्ती ती क्रिया करते .

२)तार्किक क्रिया :-आत्महत्या ही व्यक्तीने स्वेच्छेने आणि समजून –उमजून केलेली असते .आपण केलेल्या क्रियेचा परिणाम काय होणार याची संबंधित व्यक्तीला माहिती असते म्हणून आत्महत्त्या ही तार्किक क्रिया आहे .

३)सकारात्मक अथवा नकारात्मक क्रिया :-स्पष्ट स्वरुपात मृत्यूचे कारण असणारी क्रिया म्हणजे सकारात्मक क्रिया होय .नकारात्मक क्रियेमध्ये मृत्यूचे कारण अस्पष्ट असते .उदा.देशहितासाठी शत्रूसमोर आत्मबलिदान करण्याची क्रिया ही सकारात्मक आहे तर आजारी व्यक्तीने जीवनाचा अंत करण्यासाठी केलेली क्रिया ही नकारात्मक आहे .

४)सामाजिक तथ्य :-दुर्खीमच्या मते ,आत्महत्या हे सामाजिक तथ्य आहे ते व्यक्तिगत तथ्य नाही कारण व्यक्तीचे मत वगळले तरीही आत्महत्या या तथ्याला स्वतःचे स्वंतंत्र अस्तित्व आहे .म्हणून तथ्याचे स्वरूप सामाजिक आहे असे दुर्खीम म्हणतो .

५)क्रियेचा परिणाम :-अशा मृत्यूला आत्महत्या असे म्हटले जाते की जो मरणाऱ्या व्यक्तीने केलेल्या क्रियेचा परिणाम असतो .

***शेतकरी आत्महत्येबाबातची स्थिती:-**

“नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो”या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार भारतात सर्वात जास्त म्हणजे १८,२४१ शेतकरी आत्महत्या २००४ मध्ये झाल्या .२२०१० मध्ये १५,९६४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या ,२०१५ मध्ये १२,६०२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या अशी नोंद आहे .२०१२ मध्ये संपूर्ण देशात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपैकी २३.५० टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या एकटया महाराष्ट्र राज्यात झाल्या .महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा दर ३.३ (दर लाख लोकसंख्ये मध्ये )म्हणजे भारतात सर्वात जास्त आहे ,अशीही नोंद शासकीय आकडेवारीमध्ये आहे

.अर्थात जगातील अन्य देशांपेक्षा भारतात शेतकरी आत्महत्येचा दर सर्वाधिक आहे .१९९७ पासून आजपर्यंतच्या काळात एक लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत असे अभ्यासकांचे म्हणणे आहे .

प्रश्न क्रमांक ०२:-शेतकरी आत्महत्येची कारणे व परिणाम लिहा ?

उत्तर:-१) कर्जाचा भार यासारख्या आर्थिक करणातून निर्माण होणारा ताणतणाव.

२)मानसिक ताणतणाव,नैराश्य ,विफलता यातून व्यक्तीला बाहेर काढण्यासाठीच्या मानसोपचाराच्या सुविधांचा अभाव .

३)कृषी धोरण शासन ठरविणार व ते शेतकऱ्यांच्या निर्णय स्वातंत्र्याची गळचेपी करून त्यांच्यावर लादणार .

४)शेतात खर्च जास्त व उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण झाली आहे .भारतात कापूस उत्पादनाच्या पट्ट्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे .राज्याच्या सेवानिवृत्त मुख्य सचिवांनी आम्ही शेतकऱ्यांच्या हाती GM बी-बियाणे देऊन फार मोठी चूक केली ,अशी जाहीर कबुली एका मुलाखतीत दिली .

५)हायब्रीड बी –बियाणे ,कीटकनाशके,रासायनिक खते आदींचा मारा करून अन्नधान्याचे उत्पादन वाढविले परंतु त्यामुळे शेतजमिनीची सुपीकता घटली .लागवडीचा खर्च वाढत गेला .शेती हा आतबट्ट्याचा व्यवहार ठरला .

***शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे त्यांच्या कुटुंबावरील परिणाम :-**

१)मुले –मुली :-वडिलासोबत आईनेही आत्महत्या केली तर मुले आई-वडील या दोघांच्याही प्रेमास पारखी होतात .आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबात शालेय शिक्षणात गळतीचे प्रमाण अधिक आहे .आई मजुरीची कामे करावयास गेली की घर सांभाळण्याची जबाबदारी घ्यावी लागल्यामुळे मुलींचे बालपण संपून जाते .दारिद्र्यजन्य परिस्थितीत आपल्या मुला –मुलींचे होणारे हाल उघड्या डोळ्यांनी पाहत त्यांची आई शरीरात जीव आहे म्हणून जीवन जगत असते .

२)विधवा पत्नी :-‘कर्जापोटीच पतीने आत्महत्या केली आहे’यासंबंधीचा लेखी पुरावा सादर करता आला तरच शासनाकडून काही अर्थसहाय्य तिच्या पदरात पडण्याची शक्यता असते .निसर्गाने पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या पदरात सहनशीलतेचा गुण अधिक प्रमाणात टाकला आहे याची प्रचीती शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीशिवाय अन्य कोणाकडून मिळू शकत नाही असे खात्रीने म्हणता येते .अशुभ स्त्री ,पतीच्या आत्महत्येसाठी जबाबदार असणारी अपराधी स्त्री यासारखे शिक्के तिच्या कपाळावर बसल्यामुळे ती सगेसोयरे आणि शेजारीपाजारी यांच्या गोतावळ्यात एकाकी पडते .

३)कुटुंबातील वयाने ज्येष्ठ सदस्य :-वयाने जेष्ठ सदस्य वा कुटुंबात सासू –सासरे असल्यास संबंधामध्ये दुरावा आलेला असूनही त्यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी तिलाच स्वीकारावी लागते .त्यांनी मारलेले टोमणे सतत ऐकावे लागतात .त्यांनी दिलेली अपमानास्पद वागणूक सहन करावी लागते .

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २०२१ च्या नव्या अभ्यासक्रमानुसार


## B.A.THIRD YEAR 6th SEMESTER

# भारतातील सद्यकालीन सामाजिक समस्या

# CURRENT SOCIAL PROBLEMS IN INDIA















1) Education Problems in India
2) Gender bais in Education in India
3) Displacement
4) Rehabilitation
5) Communal Riots
6) Crime
7) Corruption

AUTHOR
DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR
DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE. VASANTRAO KOLHATKAR ART'S COLLEGE, ROHANA
TAH.ARVI DIST.WARDHA (M.S.)

**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur**
**B.A.Third Year: Semester-VI**
**Current Social Problems in India**

**1) Education in Contemporary India:**

A) Educational Status Among Different Communities in India.
B) Gender bais in Education in India:Obstacles to Women’s Education.
C) Problems of Education Among SCs,STs and Other Backward Castes and the Measures to Resolve it.

**2) Displacement and Rehabilitation:**

A) Displacement:Meaning,Causes and Consequences.
B) Rehabilitation: Concept,Problems and Plans.

**3) Intolerance,Riot and Crime:**

A) Caste,Religious and Cultural Intolerance.
B) Communal Riots,Caste and Ethnic Conflict.
C) Violence and Crime Against Women and the Marginalized.
D) Measures to Check Intolerance,Riots and Crime.

**4) Corruption:**

A) Meaning,Definition and Types of Corruption.
B) Factors Inducing Corruotion.
C) Measures to Check Corruption.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
## बी.ए. भाग-३
## सेमीस्टर सहावे
## भारतातील सद्यकालीन सामाजिक समस्या
## (Current Social Problems in India)

## युनिट क्र. १ समकालीन भारतातील शिक्षण
## (Education in Contemporary India)

==========================================

**प्रश्न क्र. १ :— शिक्षणाचा अर्थ व व्याख्या लिहून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणपध्दतीचा आढावा घ्या?**

उत्तर :— शिक्षण हा शब्द 'शिक्ष' या संस्कृत धातूपासून बनला असून त्याचा अर्थ शिकणे अथवा ज्ञान मिळविणे असा होतो. म्हणून 'साक्षर' म्हणजे शिक्षित असे समीकरण समाज जीवनात रूढ झालेले आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ यासारख्या औपचारीक संस्थातून जे ज्ञान मिळते ते शिक्षण होय असेही दैनंदिन व्यवहारात समजले जाते. वैदिक कालीन भारतीय समाजात गुरूकुल, ऋषींचे आश्रय, बौध्द काळात मठ आणि विहार, मुस्लीम काळात मक्ताब व मदरसे असे शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप होते. शिकारी अवस्थेपासून औद्योगिक अवस्थेपर्यंत समाज जसजसा विकासाच्या पुढच्या अवस्थेत गेला तसतसे व्यक्तींच्या आणि पर्यायाने समाजाच्याही गरजांचे स्वरूप बदलले तसेच त्या गरजांमध्येही फार मोठी अशी वाढ झाली आहे. या बदला बरोबरच शिक्षण व्यवस्थेचे स्वरूपही बदलले.

**व्याख्या :—**

१. जॉन रूसोच्या मते, ''शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या अंतर्गत शक्तीचा विकास होय. '

२. हर्बर्ट स्पेन्सरच्या मते,''सर्वांगसुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण होय. ''

३. जॉन लॉकच्या मते :— ''सुदृढ शरीरात सुदृढ मन असणारी माणसे निर्माण करणे हे शिक्षणानेच साध्य होते.''

४. म. ज्योतीबा फुले यांच्या मते :— ''समाज परिवर्तनाचे हुकमी हत्यार म्हणजे शिक्षण होय.''

वरील व्याख्या लक्षात घेता शिक्षण ही व्यापक अर्थ असणारी आहे तसेच शिक्षण ही सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे. व्यक्ती व समाजाच्या गरजा पूर्ण करण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते. कुटुंब, विवाह, धर्म यांच्या प्रमाणेच शिक्षण ही समाजाची पायाभूत संस्था आहे.'' विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्टये आहे.

**अ) स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय शिक्षणपध्दतीचा आढावा** :— भारतात अतिप्राचीन काळात गुरूकूल शिक्षण पध्दती होती. बौध्द काळात तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, मिथिला, वल्लभ शिक्षण केंद्रे निर्माण झाली होती. बौध्दकालीन शिक्षण हे सर्व वर्ण जाती व धर्मातील विद्यार्थ्यांसाठी खुले होते. पुढे मोगल शासनकाळात मुस्लीम वस्त्यांमध्ये मदरसे सुरू झाले. राजे, संस्थानिक, श्रीमंत सावकार, मालगुजार, व्यापारी पेढीचे मालक यांना कारकुनी काम करणारे लोक हवे असत. देऊळ किंवा राजवाडयांमध्ये भरणाऱ्या शाळेतून ही गरज पूर्ण होत होती. बलूतेदारी व जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या पारंपारिक व्यवसायांचे शिक्षण—प्रशिक्षण कुटुंबातच मिळत होते. सैनिकी शिक्षण देण्याचे कार्य तत्कालीन आखाडे करीत असत. वैद्यकीय क्षेत्रात आयुर्वेदाचे शिक्षण वडिलोपार्जीत वारसातून मिळत होते. स्त्री शिक्षण जवळपास पूर्णपणे ठप्प झाले होते. ब्रिटिश शासकांना राज्यकारभार इंग्रजी भाषेतून चालविण्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान असणाऱ्या मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे मेकॉलेने इंग्रजीला शिक्षणाचे माध्यम बनविले. परंतु भारतीय संस्कृती व सभ्यतेची मुळे फार खोलपर्यंत पसरलेली असल्यामुळे भारतीयांवर सांस्कृतिक विजय मिळविणे इंग्रजांना कधीच शक्य झाले नाही.

**ब) स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणाची प्रमुख वैशिष्टये :—**

**१. शिक्षण ही सरकारची जबाबदारी :—** भारतात शिक्षणाची व्यवस्था निर्माण करणे हे शासनाचे उत्तरदायित्व आहे हे ईस्ट इंडिया कंपनीच्या शासनकाळात प्रस्तावित झाल्यामुळे शासनाला आधुनिक काळात देखील यातून सुटका करून घेता आली नाही.

२. **धर्मनिरपेक्ष शिक्षण** :— ईस्ट इंडिया कंपनीने प्रारंभापासूनच धर्मनिरपेक्ष शिक्षणाचा पुरस्कार केला. आधुनिक शिक्षण हे धर्मनिरपेक्ष शिक्षण आहे ही कल्पना भारतासारख्या परंपरावादी समाजात रूजविणे ही वसाहतकालीन शिक्षण व्यवस्थेची फार मोठी देणगी आहे.

३. **स्त्री शिक्षण** :— स्त्रीशिक्षण, मुस्लीम, शिक्षण, मागासवर्गीय जाती—जमातींसाठी शिक्षण, व्यावसायिक शिक्षण देणे हे शासनाचे कार्य असल्यामुळे मुलींच्या शिक्षणात व्यवहारोपयोगी माहिती आणि ज्ञान देणारे शिक्षण मिळेल अशी शिफारस हंटर आयोगाने सुमारे १३० वर्षापूर्वी केली आहे.

४. **विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे** :— वसतिगृहांमध्ये उच्चवर्णीय जातींमधील मुलांना प्रवेश मिळतो तसा मागासवर्गीय जातींच्या विद्यार्थ्यांना मिळत नाही. हे कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांच्या कक्षात आल्यावर त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये जातीनिहाय वसतीृहे बांधल्यामुळे मागासवर्गीय जातींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले त्यामुळे वसतीगृहे ही वसाहतकालीन शिक्षण व्यवस्थेची देण होय.

५. **शिक्षणावर शासनांचे नियंत्रण** :— लोकांनी शाळा काढल्या तरीही त्यापुढे सुव्यवस्थित सुरू राहण्यासाठी त्यांना आर्थिक अनुदान देण्याची पध्दती आणि त्याबाबत स्पष्ट स्वरूपातील नियमांची निर्मिती हा वसाहतकालीन शिक्षणव्यवस्थेचा महत्वपूर्ण असा वारसा आहे.

६. **सर्वसामान्य लोकांना शिक्षण** :— अस्पृश्य आणि शूद्रातिशूद्र शिक्षणाच्या अधिकारांपासून वंचित झाले होते. अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर कोणत्याही प्रकारची बंधने नसावीत असे आदेश ब्रिटीशांच्या शासनाने काढले. सर्व जाती—जमातींना शिक्षण खुले करणे हा वसाहतकालीन शिक्षणाचा वारसा आहे.

७. **शिक्षणाचा प्रसार** :— खिश्चन मिशनरीनंतर ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार त्यानंतर वसाहतीचे ब्रिटीश सरकार यांनी भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीमुळे नवयुग विद्यालय, न्यु ईरा स्कूल, न्यु इंग्लिश हायस्कूल या शाळांची निर्मिती झाली. डॉ. धोंडे केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणाच्या

प्रसारासाठी स्वत:ला वाहून घेतले होते. वसाहतकालीन भारतीय शिक्षणाने स्वातंत्र्यपूर्व काळात शैक्षणिक श्रेष्ठीजन वर्गाची निर्मिती केली.

८. **शिक्षणाचे संघटन** :— शासन व्यवस्थेत शिक्षण खाते सुरू करणे, प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण अशी सुप्रबध्द व्यवस्था निर्माण करणे ही सर्व वसाहतकालीन शिक्षण व्यवस्थेची देण आहे.

९. **शिक्षण ही समाजाची जबाबदारी** :— राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीत शाळा, कॉलेज व विद्यापीठे यांची देखील स्थापना सरकारची आर्थिक मदत न घेता टिळक, आगरकर व चिपळूणकर या भारतीय लोकांनी करून दाखविली.

१०. **लोकशाहीवादी मूल्ये** :— स्वातंत्र्य, समता, बंधुता ही सर्व लोकशाहीवादी मूल्ये शिक्षणाद्वारेच नवीन पिढीच्या मनावर बिंबवायची असतात. हा आदर्श वसाहतकालीन शिक्षण व्यवस्थेनेच निर्माण केला.

**क) स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाचा आढावा** :—

१९४७ नंतर भारताचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांच्या शिक्षणाचे पुनर्गठन करणे आवश्यक होते. यासाठी भारत सरकारने डॉ. राधाकृष्णन आयोग, मुदलियार कमिशन, कोठारी आयोग गठित केले.

१. **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** :— कोठारी आयोगाने सुचविलेले राष्ट्रीय, शैक्षणिक धोरण अद्यापही सुरू आहे. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचे संघटन, शैक्षणिक क्षेत्र अभ्यासक्रम, मूल्यमापन, कार्यपध्दतीचे व्यवस्थापन अशा अनेकविध विचारांनी, नावीण्यपूर्ण बाबींनी हे धोरण युक्त असले तरीही त्यावर काही अभ्यासकांनी टीका देखील केली आहे.

२. **शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा** :— १४ वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या सर्व मुला—मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था सरकारने करावी असे संविधानातील तत्व आहे. १ ऑगस्ट २०१२ पासून मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण घेण्याचा अधिकार अंमलात आणला आहे.

३. <u>जनगणना अहवाल आणि भारतातील शिक्षणाची स्थिती</u> :— शासनाद्वारे जनगणना करण्याचे कार्य दर दहा वर्षांनी केले जाते. त्याद्वारे ग्रामीण व नागरी समुदायामधील साक्षसादर तसेच देशभरातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अन्य मागासवर्ग जातींचे समुदाय मुस्लीम समुदायांच्या शिक्षणाच्या स्थितीबाबतचा बोध होतो. मंत्रालयाचे अहवाल, शिक्षणाचे सर्वेक्षण करणाऱ्या संस्था, संशोधकांचे प्रकाशित ग्रंथ याद्वारे शेक्षणिक स्थितीचे विवेचन केले जाते.

**<u>प्रश्न क्र. २ रा :—</u> भारतीय समाजातील ग्रामीण व नागरी समुदाय, अनुसूचित जाती, जमाती अन्य मागासवर्ग, उच्चभ्रू जाती आणि धार्मिक अल्पसंख्यांक समुहाच्या शैक्षणिक स्थितीचे विश्लेषण करा?**

उत्तर :— १) ग्रामीण व नागरी समुदाय :— स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण समुदायात आधुनिक शिक्षणाची सुरूवात नागरी समुदायाच्या तुलनेत उशिरा झाली. यामुळे साक्षरता दर, स्त्री शिक्षणाचे प्रमाण, प्राथमिक शिक्षणापासून पदवी व पदव्युत्तर शिक्षणापर्यंत अनेक बाबतीत नागरी समुदायाने ग्रामीण समुदायावर आघाडी घेतली. ती अद्यापही कायम आहे. सर्व स्तरांवरील शिक्षणामध्ये गळतीचे प्रमाण नागरी समुदायापेक्षा ग्रामीण समुदायात अधिक आहे. जिल्हा, तालूका एवढेच नव्हे तर १५—२० हजारांची वस्ती असणाऱ्या मोठया आकाराच्या खेडयांमध्ये महाविद्यालये निर्माण झाली. परंतु नगरांच्या तुलनेत शिक्षण संस्थाचा दर्जा आणि शिक्षणाची गुणवत्ता या दोहोंबाबत ग्रामीण समुदायाचे माघारलेपण अद्यापही संपले नाही. एकंदरीत ग्रामीण व नागरी समुदायात शिक्षणाबाबतची असमानतेची स्थिती अद्यापही कायम आहे.

२) <u>अनुसूचित जातींचा समुदाय</u> :— भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ झाल्यानंतर दलित मुलांना शाळेत प्रवेश मिळत नव्हता. ब्रिटीश शासनाने अस्पृश्य जातींच्या मुलांना शाळेत प्रवेश देण्यासंबंधीचे फर्मान काढल्यानंतरच त्यांच्या आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तर काळात शिष्यवृत्ती आणि आरक्षण हया दोन सुविधांमुळे अनुसूचित जाती आणि अन्य जातींमध्ये असलेली दरी कमी झाली. परंतु ग्रामीण भागात दारिद्रयजन्य परिस्थितीमुळे शिष्यवृत्ती व आरक्षण हे उपाय देखील प्रभावी वा

कार्यक्षम ठरत नसल्याचे अभ्यासकांना आढळून आले आहे. अन्य जातींप्रमाणे अनुसूचित जातीतही स्त्री—पुरूष शिक्षणामध्ये असमानतेची स्थिती आजही कायम आहे.

३) **अनुसूचित जमातींचा समुदाय** :— दुर्गम भागात शिक्षणाच्या सोयी कमी असल्यामुळे अनुसूचित जमातींची शैक्षणिक स्थिती अधिक वाईट आहे. दुर्गम भागातील आदिवासी आधुनिक शिक्षण घेण्याकडे फारसे वळले नसल्यमुळे शासकीय नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवलेली अनेक पदे रिक्त आहेत. आदिवासी जमातींच्या मातृभाषेला लिपी नसल्यामुळे आदिवासींना मातृभाषेतून शिक्षण देणे शक्य नाही. याप्रमाणेच आधुनिक शिक्षण घेण्यात अनेक अडसर असल्यामुळे तुलनात्मकदृष्टया आदिवासी जमाती शिक्षणाबाबत माघारलेल्या आहेत.

४) **अन्य मागासवर्गीय जातींचा समुदाय** :— आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्टया सुस्थितीत असणारे महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, हरियाणा आदि राज्यातील जातीसमूह ओबीसी जातीसमूहासारखे आरक्षणाचे लाभ आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यामुळे ओबीसी जाती समुदाय आणि सधन व उच्चभ्रू मानल्या जाणाऱ्या जाती हयांच्यात ताणतणाव निर्माण झाला आहे. ओबीसी समुदायात काही अतिमागास जाती आणि कमी मागास जाती असे विभाजन व्होट बँकेसाठी केले जात असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

५) **उच्चभ्रू जातींचा समुदाय** :— शिक्षणाच्या बाबतीत कोणताही लाभ न मिळणाऱ्या जातींना उच्चभ्रू जातींचा समुदाय असे म्हटले जाते. आधुनिक शिक्षण घेण्याची संधी सर्वप्रथम उच्चभ्रू जाती गटांनी घेतल्यामुळे अन्य सर्व जातींच्या समुदायांपेक्षा उच्चभ्रू जातींचा समुदाय हा शैक्षणिक स्थितीबाबत तुलनात्मकदृष्टया सुस्थितीत आहे. आधुनिक शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असले तरी उच्चभ्रू जातींसाठी घरातील शैक्षणिक वातावरण हे शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण ठरल्यामुळे या समुदायांमधील विद्यार्थी गुणवत्ता यादीत मोठया संख्येने असतात. त्यापुर्वी नसलेली वर्गव्यवस्था उच्चभ्रू जाती समुदायातील शैक्षणिक स्थिती निर्धारित करू लागली आहे. मतपेढीचे व निवडणुकीचे राजकारण लक्षात घेऊन शासनाने सवर्ण जातींसाठी १० टक्के आरक्षण दिले आहे.

६) धार्मिक अल्पसंख्यांक समूह :— भारतात धर्म या आधारावर बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि मुस्लीम असे धार्मिक अल्पसंख्यांक समुदाय आहेत. मदरसा ही मुस्लीमधर्मीय समुदायातील शिक्षणसंस्था असून या समुदायाची शैक्षणिक स्थिती अत्यंत वाईट आहे. २१ व्या शतकाच्या गरजेनुसार शिक्षणात धर्माचे स्थान, शिकविण्याची पध्दती व शिक्षणाचे माध्यम हयामध्ये बदल होणे गरजेचे आहे. सर्व स्तरांवर गळतीचे प्रमाण अधिक असून पुरूषांपेक्षा स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण अल्प आहे. विवाहानंतर मुलीचे शिक्षण पूर्ण बंद केले जाते. मुस्लीमधर्मीय समुदायात स्वयंरोजगाराचे प्रमाण अधिक आहे. यामुळे त्यांना कौशल्य शिक्षण आणि व्यवसाय प्रशिक्षण हयांची नितांत गरज आहे. मुस्लीमधर्मीय समुदाय हा सर्वात जास्त वाईट स्वरूपाची शैक्षणिक स्थिती असणारा समुदाय आहे असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे.

**प्रश्न क्र. ३ :— लिंगभेदभावाचा अर्थ स्पष्ट करून तसेच भारतीय शिक्षणातील लिंगभेदभावाचा आढावा घेऊन लिंगभेदभाव असमानतेचे परिणाम स्पष्ट करा?**

उत्तर :— व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकारांचे समर्थन करणारा लॉक हा स्त्रियांना स्वतंत्र आणि समान व्यक्ती हा दर्जा देण्यास तयार नाही. निसर्गानेच स्त्रियांना पुरूषांच्या निर्णयाधीन राहण्याची आज्ञा केली आहे असे रूसो म्हणतो. लिंगभाव असमानता हा इतिहासाचा वारसा आहे व तो सर्वच समाजांना लाभला आहे. जैविक दृष्टीने नर आणि मादी यांच्यामधील फरक सेक्स म्हणजे लिंग या शब्दाद्वारे व्यक्त केला जातो. लिंग हा गुणविशेष निसर्गदत्त आहे. मुलींना दुबळया, सहनशील होण्यास शिकविले जाते. मुलांना आक्रमक व अधिकार गाजवणारा होण्यासाठी उत्तेजन दिले जाते. पुरूषीपणा व बायकीपणा ठरविण्याचे निकष सर्वच समाजांमध्ये काळाच्या ओघात उत्क्रांत झाले. संविधानाने स्त्री व पुरूष या दोघांनाही समान असा दर्जा दिला आहे. परंतू नक्याचा मार सहन करणाऱ्या स्त्रियांची संख्या देखील भारतीय समाजात फारशी कमी झालेली नाही. भारतात सात प्रकारची लिंगभाव असमानता असल्याचे डॉ. अमर्त्य सेन यांनी म्हटले आहे. १) बालिका मृत्यू २) गर्भजल चाचणी ३)

समतेसंबंधीच्या मुलभूत सुविधा ४) व्यवसायांमधील असमानता ५) मालकी हक्क ६) विशेष संधीची असमानता ७) गृहकार्यामधील असमानता

'मुलगी ही परक्याचे धन आहे', 'एक ना एक दिवस तिला तिच्या पतीच्या घरी जावयाचे आहे हा विचार पितृसत्ताक व्यवस्थेची देणगी होय. बालवयात आई—वडील, तरूणवयात पती आणि वृध्दावस्थेत पुत्र हा स्त्रीचे संरक्षण व देखभाल करण्याचे कार्य करतो. अशा विचारांची निर्मिती पितृसत्ताक व्यवस्थेतूनच झाली. स्त्रियांचे मूल्य त्यांच्या पुनरूत्पादन क्षमतेवर आणि पुरूषांशी असणाऱ्या नात्यावरून ठरविले जाते. विधवा स्त्रिया आणि मुलेबाळे नसणाऱ्या स्त्रिया अशा दोघींनाही अशूभ मानले जाणाऱ्या परंपरेचे पालन करणारे काही लोक आजही आपणास आढळून येतात. रजस्वला या कारणामुळे स्त्रिया या अशुध्द वा प्रदूषित असतात असे विचार अत्यंत प्रभावी असल्याचे सर्वच समाजात दिसून येते.

शिक्षण घेण्याची संधी मुलांना देणे आणि मुलींना मात्र नाकारणे असा शिक्षणातील लिंगभेदभावाचा अर्थ आहे. परंतु शिक्षण, उत्पन्न, मालमत्ता विषयक अधिकार, जीवनसाथीदाराची निवड करण्याचे स्वातंत्र्य यासारख्या अनेक बाबतीत पुरूषांच्या तुलनेत स्त्रिया माघारलेल्या आहेत. अशी स्थिती निर्माण होण्याचे कारण शिक्षणातील लिंगभेदभावाचे तत्व होय.

स्त्रीला एक व्यक्ती म्हणून पुरूषांइतकेच आपली भूमिका ठरविण्याचे स्वातंत्र्य असावे. त्यांना पुरूषांएवढेच समान हक्क प्राप्त व्हावे असे स्त्रियांच्या भूमिकेबाबतच्या उदारमतवादी दृष्टिकोनाचे म्हणणे आहे. लिंगभेदभावाची समस्या समाप्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्त्रियांनी आधुनिक शिक्षण घेणे होय.

**अ) भारतीय शिक्षणातील लिंगभेदभावाचा ऐतिहासिक आढावा :—**

भारतात पूर्व वैदिक कालखंडात शिक्षण हे केवळ पुरूषांनी घ्यावे असा कोणताही दंडक नव्हता. ऋग्वेद काळात शिक्षण हे स्त्रियांना मुक्त असल्यामुळे गार्गी, मैत्रेयी यासारख्या स्त्रिया 'विदुषी' असा स्व कर्तृत्वावर मिळवू शकल्या. भारताच्या इतिहासातील स्त्री शिक्षणाचा तो सुवर्णकाळ होता.

बौध्द भिक्षु झाल्यानंतरही स्त्री बौध्द भिक्षु आणि पुरूष बौध्द भिक्षु यांच्या शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याचा दंडक पाळला न गेल्यामुळे बौध्दकालीन शिक्षण व्यवस्था कोसळून पडली. त्यानंतर स्त्री—पुरूष शिक्षणाबाबत सामाजिक विषमतेचे युग सुरू झाले. मुस्लीम शासनकाळात सुरक्षिततेच्या कारणासाठी परपुरूषाला आपला चेहराच दिसू नये यासाठी पडदा घेण्याचा रितीरिवाज सुरू झाला. मुस्लीम धर्मात स्त्री शिक्षणावर बंदी नसली तरी मुस्लीम राज्यकर्त्यांना उच्च शिक्षण देण्यासाठीची व्यवस्था निर्माण करता आली नाही. त्या काळात निर्माण झालेल्या बालविवाह प्रथेने स्त्रियांचा शिक्षणाशी संबंधच तोडला. मध्ययुगातील ५००० वर्षाचा कालखंड हा शिक्षणाबाबत स्त्री—पुरूषामध्ये विषमता निर्माण करणारा कालखंड आहे. ख्रिश्चन मिशनऱ्याच्या धर्मप्रसाराच्या भितीने नागपूरात हिंदू मुलींची शाळा सुरू करण्यात आली. महात्मा ज्योतीबा फुलेंनी सावित्रीबाईंना शिकवून स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. रमाबाई रानडे, डॉ. आनंदी गोपाळ, डॉ. धोंडो केशव कर्वे यांच्या प्रयत्नांमधून स्त्री शिक्षणाच्या कार्याला गती प्राप्त झाली.

**ब) भारतीय शिक्षणातील लिंगाधिष्ठित भेदभावाबाबत सद्य:स्थिती :—**

१९५१ पासून २०११ पर्यंतच्या ६० वर्षाच्या कालखंडात भारताने साक्षरतेबाबत बरीच प्रगती केली आहे. संपूर्ण भारतात पुरूष साक्षरता ९६.१ टक्के तर ९२.१ टक्के एवढा स्त्री साक्षरता दर असणारे केरळ हे एकमेव राज्य आहे. साक्षरतेप्रमाणे दर हजारी स्त्री—पुरूष प्रमाणाबाबतही आपली स्थिती समाधानकारक नाही. फक्त १९५१ पासून २०११ पर्यंतच्या सर्व जनगणना अहवालात केरळमध्ये स्त्री—पुरूष प्रमाण १००० पेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. अन्य कोणत्याही घटकराज्याला आजपर्यंत ही स्थिती टिकवून ठेवणे शक्य झाले नाही. केरळप्रमाणे पाँडेचरी मध्ये ९१.३ टक्के पुरूष साक्षरता आणि ८०.७ टक्के स्त्री साक्षरता दर असल्यामुळे भारतीय शिक्षणातील लिंगभेदभावाची स्थिती समजून घेण्याच्या दृष्टीने ही दोन आदर्श राज्य होत असे म्हणता येईल.

**क) स्त्री शिक्षण विषयक संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका :—**

संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवा—मानवात भेदभाव निर्माण करणाऱ्या सर्व विचार, धोरण व कार्यक्रमांचा विरोध करणारे धोरण स्वीकारले आहे. १) स्त्री—पुरूषांना समान अधिकार दिले आहेत. २) स्त्रीविरोधी प्रथांचे उच्चाटन करण्याचे धोरण स्विकारले आहे. ३) स्त्री—पुरूष समानतेविरोधी कायद्यांचे उच्चाटन केले आहे. ४) अभ्यासक्रम ठरवितांना, परीक्षा घेताना, शिष्यवृत्तीचा लाभ देतांना, शैक्षणिक दर्जा ठरविताना, सहशिक्षण या सर्वाबाबत स्त्रियांना हक्क देण्यात आले आहेत. ५) संयुक्त राष्ट्र संघटनेनुसार पुरूषांचे स्त्रियांवरील श्रेष्ठत्व मान्य करणारा, त्यांचे स्वातंत्र व अधिकार हिरावून घेण्याचा कोणालाही अधिकार नाही.

**लिंगभेदभाव असमानतेचे परिणाम :—**

**१) शिक्षणाबाबत स्त्रियांचे माघारलेपण** :— पदवी व पदव्युत्तर या स्तरांवर मुलांच्या तुलनेत मुलींची टक्केवारी अद्यापही कमीच आहे. डॉक्टर, इंजिनियर यासारख्या व्यावसायिक शिक्षणातही स्त्रियांचा अनुशेष आहेच. साक्षरतेबाबतच्या आकडेवारीवरून पुरूषांच्या तुलनेत स्त्रिया पिछाडीवर असल्याचे आजही दिसून येते.

**२) राजकीय आणि प्रशाासकीय क्षेत्रातील सहभाग :—** भारतात पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री यासारखी उच्च पदे महिलांनी भुषविली आहेत, हे मान्य केले. तरीही संसद सदस्यांमध्ये महिलांचे प्रमाण अद्यापही ३३ टक्के तर सोडा, दोन अंकी म्हणजे १० टक्के देखील झालेले नाही हे वास्तव ओ. न्यायालयांमध्ये देखील हिच वस्तूस्थिती पहायला मिळते.

**३) मालमत्तेतील हक्क :—** वडिलोपार्जित संपत्तीत मुला—मुलींना समान हक्क असला तरी शहरी आणि ग्रामीण भागात अद्यापही घरे आणि शेती यावर केवळ पुरूषांचाच मालकी हक्क दर्शविणाऱ्या नोंदी शासकीय कार्यालयांमध्ये आजही उलपब्ध आहेत.

**४) स्त्री—पुरूष प्रमाण :—** २०११ च्या जनगणनेनुसार भारतात एक हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ आहे. जन्मानंतर मुलीला ठार मारण्याच्या अत्यंत क्रूर प्रथेमुळे

स्त्रियांचे प्रमाण घटले आहे. मुलांपेक्षा मुलीच्या पालनपोषणाकडे दुर्लक्ष करणारी अनेक कुटुंबे भारतात असल्यामुळे मुलींच्या मृत्यूचे प्रमाण अधिक आहे.

५) **आरोग्यविषयक स्थिती :—** शारीरिक आणि बौध्दिक कष्टाची कामे पुरूषांनी केल्यामुळे त्यांना सकस अहार दिल्या जातो तर स्त्रिया आजही शिळे अन्न खाणे हे आपले कर्तव्य समजतात. स्त्रिया लहान मोठया आजावर दुर्लक्ष करीत असल्यामुळे आरोग्य विषयक खर्चामध्ये स्त्रियांपेक्षा पुरूषांचा वाटा अनेक पटीने जास्त असतो हे भारतातील वास्तव आहे.

६) **आर्थिक क्षेत्रातील सहभाग :—** आर्थिक सहभागाची संधी आणि आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग या दृष्टीने स्त्रियांच्या परावलंबित्वाचे प्रमाण भारतात अधिक आहे.

७) **उद्योग व्यवसाय क्षेत्रामधील स्थिती** :— भारतात पुरूषांप्रमाणेच काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या खूप आहे. परंतु ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही भागातील असंघटित क्षेत्रात समान काम समान वेतनाचे तत्व अद्यापही लागू झालेले नाही हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही.

**प्रश्न क्र.४ :— स्त्रियांच्या शिक्षणातील अडसर स्पष्ट करा.**

१) **जात** :— आंतर्विवाहाच्या नियमांचे पालन करण्याला प्राधान्य दिल्यामुळे काही जाती समूह अद्यापही शिक्षणाबाबत माघारलेल्या स्थितीतच आहेत. मुलींनी उच्चशिक्षण घेतले तर आपल्या जातीसमुहात सुयोग्य वर मिळणे कठीण होईल या भितीने त्यांना शिक्षणाची संधी नाकारण्यात येत आहे.

२) **स्त्रियांचे स्थान** :— कुटुंबात चुल आणि मुल या पलीकडे स्वत:चे असे वेगळे जग स्त्रियांना नसते. केवळ पुरूषच नव्हे तर स्त्रिया देखील या दृष्टिकोनाच्या प्रभावाखाली असल्याचे दिसून येते.

३) **कुटुंब** :— कुटुंबातील कुटुंब प्रमुखाची स्त्री शिक्षणाबाबत आणि स्त्रियांच्या भूमिकेबाबत मनोधारणा कोणत्या प्रकारची आहे यावर स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळणे

अवलंबून असते. विवाहानंतर शिकण्याची अनुमती घ्यायची की नाही हे प्रामुख्याने तिच्या पतीच्या इच्छेवर अवलंबून असते.

४) **दारिद्रय** :— घरामधील आणि घराबाहेरील आईच्या कामांमध्ये मुली त्यांच्या आईची मदतनीस म्हणून भुमिका पार पाडीत असतात. कुटुंबामधील दारीद्रयामुळे तसेच म्हातारपणातील काठी, वंशाचा दिवा या दृष्टीनेच मुलांकडे पाहिल्यामुळे पुरूष साक्षरतेपेक्षा स्त्री साक्षरतेचे दर कमी आहेत.

५) **स्त्रित्वाची चाहूल** :— मासिक पाळी येणे हा स्त्रियांच्या जीवनातील एक शारीरिक व नैसर्गिक असा गुणधर्म आहे. परंतु काही कुटुंबामध्ये मासिक पाळी आली की त्यांचे बालपणाचे दिवस संपले असे समजून त्यांच्यावर स्वयंपाक, भांडे—धुणी, घरकाम यासारख्या गोष्टी लादल्या जातात. तसेच तिला विवाहयोग्य झाली असे मानले जाते.

६) **विवाह** :— भारतीय समाजव्यवस्थेत विवाह हा आवश्यक संस्कार मानल्या गेल्यामुळे विशिष्ट वयात मुलींचा विवाह झालाच पाहिजे. हया भितीमुळे आजही मुलींचे उच्चशिक्षण पूर्ण झालेले नसतांनाही विवाह लाऊन दिला जातो.

७) **आत्मविश्वासाचा अभाव** :— काही मुलींमध्ये विज्ञान, गणित, इंग्रजी यासारखे विषय शिकण्यासाठी लागणाऱ्या बौध्दिक क्षमतेबाबत आत्मविश्वास नसल्यामुळे त्या शिक्षणात माघारतात आणि अल्पावधीतच शैक्षणिक गळतीमध्ये सामील होतात.

८) **मुलींची कर्तव्य** :— ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबातील स्त्रियांना दैनंदिन गरजांसाठी इंधन, पाणी, चारा मिळविण्यासाठी अतिशय काबाडकष्ट करावे लागतात. पाणी भरणे, भांडी धूणे, स्वयंपाक करणे, फरशी पूसणे, कपडे धुणे, भावंडांचा सांभाळ करणे, स्वयंपाक करणे, कोणताही मोबदला न घेता कौटुंबिक कार्य करावे लागते याची नोंद महिला आयोगाने घेतली आहे.

९) **शिक्षणाच्या उपयुक्तेबाबत संभ्रम** :— मुलींना शिक्षणाची गरज काय? या प्रश्नामुळे पालकांना मुलांना उच्चशिक्षण देण्याची आजही आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे आधुनिक शिक्षण ते आपल्या मुलींना देत नाहीत.

१०) **स्वतंत्र शाळांचा अभाव** :— शाळेतील पुरूष शिक्षक, अन्य कर्मचारी यांची भाषा, हावभाव आणि एकूण प्रवृत्ती यामुळे मुलींच्या मनात लिंगभेदभावाची भावना निर्माण होते. त्याकरीता स्वतंत्र शाळांची आवश्यकता लक्षात येते.

११) **शाळेतील सुविधांचा अभाव** :— शाळेत विशेषत: मासिक पाळी सुरू झालेल्या मुलींची अत्यंत गैरसोय होत असल्यामुळे मुलींना शाळैत न पाठविणे बरे अशी पालकांची मनोधारणा होते.

**प्रश्न क्र. ५ :— अनुसूचित जाती, जमाती आणि अन्य मागासवर्गीय जातींमधील शिक्षणाच्या समस्या स्पष्ट करा?**

**उत्तर :— अ) अनुसूचित जातीमधील शिक्षणाच्या समस्या :—**

१) **कुटुंबाची शैक्षणिक पार्श्वभूमी** :— विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या सवयी लावणे, त्यांच्यामध्ये स्पर्धात्मकतेला तोंड देण्याची क्षमता विकसित करणे, अभ्यासातील अडी—अडचणी दूर करणे यासारख्या कारणामुळे शिक्षीत पालकांची मुले अशिक्षीत पालकांच्या मुलांपेक्षा शिक्षणात गुणवत्तेबाबत अधिक सरस असण्याची शक्यता असते. त्यामुळे या मुलांच्या गळतीचे प्रमाण अधिक असते.

२) **आर्थिक अडसर** :— अनुसूचित जातीमध्ये आर्थिक उत्पन्न कमी असणारा गट मोठया आकाराचा असल्यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करणे परवडत नाही. शिष्यवृत्तीची रक्कम अतिशय कमी असल्यामुळे पदरचे पैसे खर्च करण्याची कुवत या वर्गामध्ये नाही.

३) **शिक्षणाचे माध्यम** :— आजही भारतातील उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्यामुळे अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतल्यानंतरही दलित वर्गातील विद्यार्थी पुरेशी प्रगती करू शकत नाहीत. त्यामुळे अशा अभ्यासक्रमांच्या शिक्षणातून दलित विद्यार्थ्यांनी माघार घेतल्याची अनेक उदाहरणे आजही आढळून येतात.

४) **सामाजिक अडसर** :— विवाहयोग्य वर प्राप्त झाला तर मुलींचा विवाह लावून दिला जातो त्यामुळे तिच्या शिक्षणात खंड पडतो. तसेच आजही विवाहानंतर मुलींना शिक्षणाची अनुमती दिली जात नाही.

५) **गळतीचे प्रमाण** :— आजही अन्य जातीच्या तुलनेत अनुसूचित जातींच्या कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांचे सर्व स्तरावरील शिक्षणात गळतीचे प्रमाण अधिक आहे.

६) शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागातील विद्यार्थी गुणवत्तेबाबत वा दर्जाबाबत माघारलेले असतात. त्यामुळे आजही पदवी वा पदव्युत्तर शिक्षणामध्ये प्रवेश घेण्यामध्ये ग्रामीण भागातील दलितांची संख्या बरीच कमी असते.

**ब) अनुसूचित जमातीमधील शिक्षणाच्या समस्या** :—

१) **निरक्षरता** :— संपूर्ण देशातील ४१८ आदिवासी जिल्हयांपैकी १७४ जिल्हयांमधील आदिवासी लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा कमी म्हणजे सरासरी २९.६ टक्के आहे. १७ जिल्हयांमध्ये हा दर खूपच कमी म्हणजे सरासरी १० टक्केच आहे.

२) **आदिवासी शिक्षणाकरीता योजनेचा अभाव** :— १९७० पर्यंतच्या काळात शासनाजवळ आदिवासींच्या शिक्षणासाठीचा प्रत्यक्ष असा कोणताही कार्यक्रम नव्हता. ग्रामीण व नागरी समाजापेक्षा आदिवासी समाजात साक्षरता दरात वृध्दी करण्याचा आणि शिक्षणाचे प्रमाण वाढविण्याचा कार्यक्रम सुमारे २५ वर्षे विलंबाने सुरू झाल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

३) **शिक्षणाची आवश्यकता** :— शिक्षण ही देखील व्यक्तीची मुलभूत गरज आहे. याकडे आजही आदिवासी समाज लक्ष द्यावयास तयार नाही. तसेच औपचारीक शिक्षणाचा स्वीकार करण्यामध्ये त्यांच्या काही अंधश्रध्दा आणि मिथके अडसर ठरत आहेत.

४) **शिक्षणात बोलीभाषेचा अभाव** :— आदिवासींना त्यांच्या मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था देखील आपण आतापर्यंत करू शकलो नाही. दारिद्रयजन्य परिस्थितीमुळे औपचारीक शिक्षणाची संधी मिळण्याचा अभाव आणि निरक्षर म्हणून उत्पन्न कमी या दृष्टचक्रातून आदिवासी समाजातील पिढयांची वाटचाल सुरू आहे.

५) **कमी वयात जबाबदारी** :— मुले पाच—सहा वर्षांची झाली की त्यांच्यावर लहान भावंडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी, इंधनासाठी लाकुडफाटा गोळा करणे, पाणी भरणे यामधील इतर कामे करणे आणि मजदूर म्हणून बाहेर ठिकाणी गेल्यास

तांडयासोबत जीवन जगणे, तसेच कमी वयात अर्थाजन करण्याकडे वळल्यामुळे आदिवासी मुलामुलींचे बालपण वा शिक्षण घेण्याचे वय संपते. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण न करताच ते मध्येच सोडून देण्याचे प्रमाण आदिवासी समाजात सर्वात जास्त आहे.

६) **गळतीचे प्रमाण जास्त** :— शिष्यवृत्ती, निवासी शाळा व आश्रम शाळा यासारख्या उपाययोजना राबवून देखील आदिवासी विद्यार्थ्यांच्या संख्येत फारशी वाढ झालेली नाही. प्राथमिक शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी मॅट्रिकपर्यंत अथवा पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ग्रामीण व नागरी भागापेक्षा फारच कमी आहे.

७) **युवागृहांचा अस्त** :— बहुतांश आदिवासी जमातींमधील युवागृह व्यवस्था आजच्या काळात विघटित झालेली आहे. युवागृहे ही आदिवासी जमातींची पारंपारिक शिक्षण केंद्रे होती. अजूनही आधुनिक शिक्षणाबद्दल त्यांच्या मनात आस्था निर्माण झालेली नाही.

८) **तर्कसंगत विचारांचा अभाव** :— निरक्षरतेचे अल्पाधिक प्रमाण असल्यामुळे आदिवासींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आणि तर्कसंगत विचाराचा अभाव असभ्यामुळे ते विविध प्रकारच्या शोषणाचे शिकार ठरतात. तसेच अज्ञानामुळे दारिद्रयाच्या दृष्टचक्रातून त्यांची सुटका करणे अवघड झाले आहे.

क) अन्य मागासवर्गीय जातींमधील शिक्षणाच्या समस्या :—

१) **शूद्रामध्ये समावेश** :— तेली, कुणबी, माळी, सोनार, सुतार इत्यादी जातींचा समावेश शूद्र या चौथ्या वर्णात केला जात असे. भारताच्या एकूण लोकसंख्येत ४१.१ टक्के लोक अन्य मागासवर्गीय जातींचे आहेत. भारतीय संविधानातील तरतुदीनुसार आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या जाती कोणत्या हे ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या कालेलकर आयोगाने २३९९ जातींचा समावेश इतर मागासवर्गीयांमध्ये करावा अशी शिफारस १९८० मध्ये मंडळ आयोगाने राष्ट्रपतींना केली. महाराष्ट्रात ३०३ जातींचा ओ.बी.सी. मध्ये समावेश करण्यात आला ओ तसेच २३ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

२) **<u>शिक्षणाविषयी आस्था नाही</u>** :— ओबीसींमधील गोरगरीब वर्गाची शिक्षणासाठी पैसा खर्च करण्याची ऐपत नाही. शिक्षणासाठी वेळ खर्च, करण्यापेक्षा रोजगार प्राप्ती ही गरज महत्वपूर्ण वाटल्यामुळे शिक्षण घेण्यासंबंधीच्या प्रेरणांचा अभाव त्यांच्यात दिसून येतो.

३) **<u>दारिद्रयरेषेखालील जीवन</u>** :— ओबीसींमधील गरीबीत जीवन जगणाऱ्या लोकांच्या जीवनपध्दतीवर जातीशी निगडित प्रथा, परंपरांचा प्रभाव आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक संबंधाचे वर्तुळ जातीसमूहाच्या बाहेर फारसे विस्तारीत झाले नाही.

४) **<u>शारीरिक श्रम हेच उपजीविकेचे साधन</u>** :— व्यवसायांमधून फारसे उत्पन्न मिळत नसतांनाही ते परंपरेने निश्चित झालेल्या व्यवसायाला चिटकून आहेत त्यामुळे त्यांच्यात व्यावसायिक गतिशीलतेचा अभाव आहे.

५) **<u>गलिच्छ वस्त्यांमध्ये निवास</u>** :— शारीरिक स्वच्छतेच्या सवयींचा अभाव हे दारिद्रय रेषेखालील ओबीसींच्या जीवनाचे एक वैशिष्टये आहे. शहरी भागात गलिच्छ वस्त्यांमध्ये आरोग्यास प्रतिकूल असणाऱ्या वातावरणात ते राहतात.

६) **<u>क्रिमीलेअर मध्ये समावेश</u>** :— वार्षिक ४ लाख रूपये उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचा समावेश क्रिमीलेअरमध्ये होतो. राजकीय सत्तास्थाने यांच्या हातात असल्यामुळे आरक्षणाचे फायदे यांच्या पदरात पडतात. यामुळे ओबीसींमधील आर्थिक विषमता फारशी कमी होत असल्याचे दिसून येते.

**<u>प्रश्न क्र. ६ :— अनुसूचित जाती, जमाती आणि अन्य मागासवर्गीय जातींमधील शिक्षणविषयक समस्यांच्या निराकरणासाठीचे उपाय लिहा?</u>**

उत्तर :— १८८२ मध्ये महात्मा ज्योतीबा फुले यांनी सर्व शूद्र आणि अतिशूद्र समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या आवश्यकतेबरोबरच नोकऱ्यांमध्ये ब्राह्मणेत्तर समाजास स्थान देण्याची मागणी केली.

१) **<u>आरक्षण</u>** :— छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांच्या नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी काही जागा राखून ठेवण्याचा निर्णय २६ जुलै १९०२ रोजी घेतल्यामुळे ते आधुनिक भारतातील आरक्षण धोरणाचे आद्य निर्माते आहेत. त्या काळातील विधीमंडळात अस्पृश्यांना प्रतिनिधीत्व द्यावे अशी मागणी पेरियार रामस्वामी

आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. संविधानाच्या तरतूदीनुसार केंद्र सरकारद्वारे चालविण्यात येणाऱ्या सर्व सरकारी शैक्षणिक संस्थांमध्ये अनुसूचित जातींसाठी १५ टक्के, अनुसूचित जमातींसाठी ७.५ टक्के आणि इतर मागासवर्गीय जातींसाठी २७ टक्के असे एकूण ४९.५ टक्के आरक्षणाचे नियम अंमलात आणले. परंतू राज्य सरकारांना आरक्षण देण्याबाबत स्वातंत्र्य देण्यात आले.

२) **विषमता कमी करण्याचा प्रयत्न** :— भारतातील अनुसूचित जाती, जमाती आणि अन्य मागासवर्ग हयांना शैक्षणिकदृष्टया इतर उच्च जातीच्या पातळीवर नेण्याकरीता जातीव्यवस्थेत स्वत:ला उच्चस्थानी मानणाऱ्या जातींएवढेच मुलभूत अधिकार दिले. एवढेच नाही तर सर्व भारतीयांना समान स्वरूपाचे हक्क देऊन संविधान निर्मात्यांनी हजारो वर्षापासूनच्या जातीव्यवस्थेतून निर्माण झालेली सामाजिक विषमता कायमची नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

३) **समान संधी** :— भारतीय संविधानाच्या १६ व १९ व्या कलमानुसार कोणत्याही शिक्षण संस्थेत प्रवेश आणि नोकरीसाठी जात, धर्म, रंग, वंश इत्यादींपैकी कोणत्याही आधारावर कोणालाही अपात्र ठरविले जाणार नाही अशी तरतूद करण्यात आली.

४) **अस्पृश्यतेचा अंत** :— पुणे करारानंतर कायदेमंडळात प्रतिनिधीत्व देण्यासाठी आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये अस्पृश्यांचा समावेश करण्यासाठीच्या आरक्षणाचा प्रारंभ १९४२ मध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातच झाला. भारतीय संविधानातील १७ व्या कलमाने जातीव्यवस्थेतून उदयास आलेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. अस्पृश्यांवर कोणतीही निर्योग्यता लादली जाणार नाही, तसे करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरेल.

५) **शिक्षणविषयक सोयी सवलती** :— भारतीय संविधानाच्या ४६ व्या कलमात अनुसूचित जाती, जमाती आणि दुर्बल घटक हयांना राज्याकडून आर्थिक व शिक्षणविषयक सोयी उपलब्ध करून दिल्या जातील, त्यांना पूर्ण संरक्षण दिले जाईल की ज्यामुळे ते आपली अधिक प्रगती करून घेऊ शकतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

६) **मागासवर्गीयांसाठी तरतूद** :— संविधानाच्या ३४० व्या कलमानुसार इतर मागासवर्ग (ओबीसी) कोणता हे एकदा निश्चित झाले की त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक

हितसंबंधाचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची राहील अशी घटनात्मक तरतूद करण्यात आली आहे. तसेच इतर मागासवर्गीय जाती आयोगाने केलेल्या शिफारशींवर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार भारत सरकारला आहे असे भारतीय संविधानात नमूद केले आहे.

**७) महाराष्ट्र शासनाची तरतूद** :— महाराष्ट्रात अतिमागस जमातींसाठी शिक्षण संस्थांमध्ये २ टक्के आरक्षण ठेवले आहे. महाराष्ट्रातील महानगरांमध्ये असणाऱ्या नामवंत शिक्षण संस्थांमध्ये आरक्षणाचे धोरण लागू केल्यामुळे या संस्थांमध्ये मागावर्गातील विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणावर प्रवेश मिळविणे शक्य झाले आहे.

**८) घटना दुरूस्तीची तरतूद** :— २००६ मध्ये ९३ वी घटना दुरूस्ती करण्यात आली. या घटना दुरूस्तीअन्वये विना अनुदान तत्वावर चालणाऱ्या सर्व व्यावसायिक शिक्षण संस्थांवर केंद्र व राज्य शासनाचे आरक्षणाचे नियम पाळणे वैधानिक दृष्टीने बंधनकारक करण्यात आले. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय जातींच्या शिक्षणासाठीच्या घटनात्मक तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी प्रथम ७६ वी आणि नंतर ९३ वी घटना दुरूस्ती करण्यात आली आहे.

# युनिट २ — विस्थापन आणि पुनर्वसन
# (Displacement & Rehabilitation)

## प्रश्न क्र. १ :— विस्थापनाचा अर्थ व व्याख्या लिहून त्याची कारणे व परिणाम लिहा?

उत्तर :— २१ व्या शतकात यापूर्वी कधीही नव्हती एवढी विकासाची प्रक्रिया गतिमान झालेली आहे. जगाच्या आणि देशाच्या विभिन्न भागात औद्योगिक प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. भुगर्भातील कोळसा, मँगनीज, लोखंड आदि खनिज संपत्ती काढण्यासाठी खाणी, नद्यांवर मोठमोठया धरणांची निर्मिती, औद्योगिक प्रकल्प आणि वसाहतींची निर्मिती, विजेच्या निर्मितीत वाढ, कार्गोहब विमानतळ, दंगली लुटमार व हिंसाचार, असंख्य लोक विस्थापित होतात. आधुनिक काळात विस्थापनाचा प्रश्न हा विकासामुळे निर्माण झाला आहे. याचा अर्थ विकास हा विस्थापनाला प्रेरीत करतो असा होतो.

मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित अशा दोन कारणांमुळे विस्थापन होते. म्हणून मानवनिर्मित विस्थापन आणि निसर्गनिर्मित विस्थापन असे दोन प्रकार पाडले जातात. पिढयान्‌पिढयांपासून निर्माण झालेली सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संरचना विस्थापनामुळे नष्ट होते. विस्थापन ही संपूर्ण गावकऱ्यांना जबरदस्त दु:ख धक्का देणारी प्रक्रिया आहे. विस्थापनामुळे लोकांना त्या परिसरातील नैसर्गिक संसाधनांचा उपयोग घेण्यापासून वंचित केले जाते.

**व्याख्या :—** १) कोलीन्स कोबाईल्डच्या शब्दकोषानुसार, ‘‘विस्थापन म्हणजे लोक ज्या क्षेत्रात राहतात तेथून त्यांना जबरदस्तीने दूर पाठविणे होय.’’

२) जॉर्जच्या मते :— ‘‘विस्थापन ही अशी संकल्पना आहे की ज्यात विकासाच्या प्रकल्पाकरिता लोकांना त्यांच्या मूळच्या स्थानावरून उठविले जाते.’’

३) सत्यनारायण यांच्या मते :— ‘‘विस्थापन म्हणजे नवीन परिसरात नविन जीवन आणि पर्यावरणाशी समायोजन साधणे होय.’’

एखाद्या गावात घराच्या परिसरातील जागेवर असणारे बेलाचे झाड हे त्या गावातील व्यक्तीसाठी उत्पन्नाचे स्त्रोत असते. बेल, फुले, तुळशीपत्रे तोडून जवळपासच्या मंदिरात विकणे हा त्या कुटुंबाचा व्यवसाय होतो. सणवार, उत्सव आदी

प्रसंगी त्या गावातील लोक काही प्रथा व परंपरांचे पालन करतात. परंतु विस्थापित झाल्यामुळे नविन परिसरात या कुटुंबावर बेरोजगार होण्याची वेळ येते आणि त्यांचे जीवन उध्वस्त होते. जागतिक आयोगाने आपल्या अहवालात नमूद केले आहे की, ‘‘विस्थापितांबाबत सहानुभूती वाटत असूनही हे नमूद करावेसे वाटते की, पुनर्वसनानंतर त्यांच्या जीवनपध्दतीत कमालीचे दारिद्रय आणि लाचारीचा मोठया प्रमाणावर शिरकाव झाला असल्याचे दिसून येते. विस्थापितांना नव्या जागी मानसिक दृष्टया असुरक्षित वाटू लागते. विस्थापितांना पुनर्वसनानंतर विविध समस्यांना सामोरे जावे लागते.

**अ) विस्थापनास जबाबदार असणारी कारणे** :—

१. **आर्थिक विकास** :— विकासाचा केंद्रबिंदू सर्वसामान्य माणूस आहे. त्याच्या कल्याणासाठी विभिन्न क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता आहे. तसेच विकासाचे व सुधारणांचे फायदे संपूर्ण समाजाला मिळण्याचीही आवश्यकता आहे. विकास कार्यक्रमातून सरासरी आयुर्मानात वाढ, बालमृत्यूच्या प्रमाणात घट आणि स्त्रियांच्या साक्षरतेत वाढ झाली की, समाजात संरचनात्मक बदल घडून येणारच हे निश्चित आहे. विकासाच्या या सामाजिक बाजुचे अध्ययन करण्यावर समाजशास्त्रात प्रमुख भर दिला जातो. परंतु जेव्हा विकास करण्यासाठी विस्थापित होणाऱ्या सर्व गावकऱ्यांचे दुसरीकडे पुनर्वसन करावे लागते. तेव्हा ही विकासात्मक समस्या ठरते.

२. **नवनवीन प्रकल्प** :— औद्योगिक प्रकल्प, मोठमोठी धरणे, खाणी आदींसाठी त्या परिसरातील गावे उठविली जातात. त्यामुळे लोक आपल्या मूळ गावातून विस्थापित होतात. याचा अर्थ विकास हा विस्थापनाला प्रेरीत करतो.

३. **नैसर्गिक आपत्ती** :— व्यक्तीवर गाव सोडण्याची पाळी अनेक कारणांमुळे येते. भूकंप, महापूर, दरडी कोसळणे आदी कारणांमुळे काही गावच्या गावे उध्वस्त होतात. असंख्य लोक विस्थापित होतात. लोक घरादारावर तुळशीपत्रे ठेऊन दुसरीकडे राहण्यासाठी जातात.

४. **विकासाची प्रक्रिया** :— लोकसंख्येत होणारी वाढ हा विकासाच्या प्रक्रियेसाठी जबाबदार असणाऱ्या अनेक घटकांपैकी एक घटक आहे. खरे म्हणजे औद्योगिकरणाच्या प्रभावातून नैसर्गिक संसाधनांचा अधिकाधिक प्रमाणात उपभोग घेऊन चैन करणे या

बाजूकडे झुकणाऱ्या समृध्द अशा राहणीमानाचे आकर्षण संपूर्ण मानवजातीला वाटत आहे. यामुळे आता कोणत्याही देशाला विकासाच्या प्रक्रियेपासून दूर राहणे किंवा माघार घेणे शक्य नाही.

५. **पैशाच्या स्वरूपात मोबदला** :— मानव जातीला नेहमीच पैशाचे आकर्षण राहिले आहे. विस्थापितांना त्यांच्या शेती व घरदार या मालमत्तेचे मूल्यांकन करून आर्थिक मोबदला दिला जातो. परंतू पुनर्वसनानंतर त्यांना शेतीच्या बदल्यात शेती व घरदार मिळाले तरीही मिळालेल्या पैशाचे नियोजन न करता आल्यामुळे तो चैनीच्या वस्तुंवर खर्च केला जातो. काही काळानंतर त्यांच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येते. दुसऱ्या अर्थाने त्यांचे जीवन उध्वस्त होते.

६. **अन्य कारणे** :— पुर्वीच्या काळी दुष्काळ, महापूर, भुकंप, रोगराई, युध्दे या कारणांमुळे लोक आपला जीव वाचविण्यासाठी घरदार, गाव सोडून निघून जात असत. परंतू आता विज्ञान आणि तंत्रविज्ञानातील प्रगतीमुळे दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करणे शक्य झाले आहे. त्याचप्रमाणे साथीच्या रोगावरची प्रतिबंधात्मक औषधे निर्माण झाल्यामुळे गाव सोडण्याची पाळी आता लोकांवर येत नाही.

**विस्थापनाचे परिणाम** :—

१. **विस्थापितांचे जीवन उद्ध्वस्त होते** :— जमीन जुमल्याबाबत मिळालेला आर्थिक मोबदला लवकर संपतो. यामुळे पुर्वीपेक्षाही अधिक दारिद्रय त्यांच्या वाट्यास येते. परंपरागत व्यवसाय, शेतजमिनी, घरदार यांच्यापासून विन्मुख व्हावे लागल्यामुळे ते उदास होऊन आपले उर्वरित जीवन जगत असतात. परिणामी विस्थापनामुळे तेथील लोकांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन उद्ध्वस्त होते.

२. **सामाजिक संबंधाचा अस्त** :— ग्रामीण भागातील लोकांनी घरदार व गाव सोडून शहरामध्ये स्थलांतर केले तरीही मूळ घर, गाव, गावकरी, परिसर हया सर्वांशी त्या व्यक्तीचे संबंध कायम असतात. विस्थापनामध्ये अशा प्रकारच्या संबंधांना व्यक्ती मुकते. विस्थापन हे सक्तीचे स्थलांतर आहे. म्हणून विस्थापन म्हणजे व्यक्तीची तिचे घरदार, गाव, परिसर हयांच्याशी नाळ तुटणे होय.

३. **राजकीय परिणाम** :– गावामधील दारूचे दुकान बंद करण्यासाठी महिलांनी केलेले आंदोलन व ग्रामसभेने एकमताने मंजूर केलेला ठराव ही त्या गावातील सर्वात महत्वपूर्ण राजकीय घटना असते. त्या घटनेच्या स्मृती त्यांच्या राजकीय जीवनाचा अविभाज्य भाग झालेल्या असतात. घरदार, गाव सोडून जाण्याची वेळ गावकऱ्यांवर आली की त्यांच्या जीवनपध्दतीचा अविभाज्य भाग झालेल्या हया सर्व गोष्टी नष्ट होतात. रेणूका धरण प्रकल्पाला विरोध असणाऱ्या लोकांनी २००९ मधील लोकसभेच्या निवडणूकीत सुमारे ६००० मतदारांनी मतदानावर बहिष्कार टाकून विकास प्रकल्पामुळे होणाऱ्या विस्थापितांचे गाऱ्हाणे संपूर्ण भारतवासियांसमोर आणि अप्रत्यक्षपणे संपूर्ण जगासमोर मांडले.

४. **दारिद्रयता** :– विस्थापितांच्या मूळ निवासस्थानी असणाऱ्या पर्यावरणातून आर्थिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या रोजगाराच्या संधी मिळत असतात. पुनर्वसनानंतरच्या त्यांच्या परिसरात नदी किंवा जंगले नसतात यामुळे त्यांच्या रोजगाराच्या संधीच मारल्या जातात. त्यांना विस्थापित म्हणून आर्थिक मोबदला देताना त्यांच्या या कार्याचे मूल्यांकन होत नाही. पुनर्वसनानंतर त्यांच्या जीवन पध्दतीत कमालीचे दारिद्रय आणि लाचारीचा मोठया प्रमाणावर शिरकाव झाला असल्याचे अनेक अभ्यासकांना दिसून आले आहे.

५. **मानसिकदृष्टया असुरक्षितता** :– विस्थापितांच्या पुनर्वसनामुळे त्या ठिकाणच्या रहिवाशांसाठी जनावरांसाठी चारा कसा मिळवायचा असा प्रश्न निर्माण झाल्यामुळे विस्थापित त्यांना शत्रुवत वा परकीय वाटू लागतात. याशिवाय विस्थापितांमुळे त्या गावात कुशल आणि अकुशल कामे करणाऱ्यांची संख्या वाढते. यामुळे मजुरीचे दर कमी होतात. स्थानिक लोकांना बेरोजगारी आणि वाढत्या प्रमाणावरील दारिद्रयाचा सामना करावा लागतो. दोन समुहाच्या संघर्षामुळे विस्थापितांना नव्या जागी मानसिकदृष्टया असुरक्षित वाटू लागते.

६. **पूनर्वसनाच्या समस्येकडे दुर्लक्ष** :– विस्थापितांना त्यांच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी धरणे, उपोषण, बहिष्कार यासारख्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. एकदा विकास प्रकल्प सुरू झाला की विस्थापितांना अक्षरश: वाऱ्यावर सोडून

दिले जाते. १०—१५ वर्षे उलटून गेली तरीही विस्थापितांचे योग्य पुनर्वसन न झाल्याची अनेक उदाहरणे अभ्यासकांनी त्यांच्या अध्ययन अहवालात नमूद केली आहेत.

७. **पर्यावरणाचे नुकसान** :— गोव्यामध्ये खाणीपासून गावावर पडणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा लोकांची राहण्याची घरे होती. ट्रकच्या जाण्या—येण्यासोबत ट्रकमधील मँगनीज, खनिजद्रव्य असणाऱ्या मातीचे कण त्या रस्त्यावरील लोकांच्या घरात, नाकातोंडात जाऊ लागले. तरीही विकासाच्या नावाखाली आपला खाण उद्योग सुरू ठेवण्याचा मालकाने प्रयत्न केला. शेवटी सरकारने हस्तक्षेप करून तो खाण उद्योग बंद करावयास मालकाला भाग पाडले. हे विस्थापनाला प्रेरीत करणाऱ्या विकासाचे उदाहरण ओ. अशाप्रकारच्या उद्योगातून बाहेर पडणारे दुषित पाणी नदीमध्ये सोडल्यामुळे नदया प्रदुषित झाल्या. वायुमुळे व ध्वनीमुळे प्रदुषण होऊन पर्यावरणाचे नुकसान होते.

८. **बालक व वृध्दांचा बळी** :— नवीन ठिकाणच्या वातावरणाशी समायोजन साधता न आल्याने बालके आणि वृध्द यांच्या शरीर आरोग्यावर विपरीत परिणाम झाल्यामुळे ते मृत्युमुखी पडतात. विस्थापित परिसरात उत्पादन साधने नसल्यामुळे आर्थिक उत्पन्न पुर्वीपेक्षाही खूप कमी होते. तुटपुंज्या उत्पन्नात आहार व आरोग्याची योग्य ती काळजी घेता येत नाही हेच त्यांच्या मृत्युचे कारण ठरते.

९. **पुनर्वसनाबाबत मतभेद** :— सरकारद्वारे विस्थापितांना पुनर्वसनाच्या जागेबाबत पर्याय दिले जात नाहीत. त्यामुळे विस्थापितांचे पुनर्वसन सरकार ठरवेल त्याच जागेत वा गावी केले जाते. गाव मुख्य रस्त्यापासून दुर असल्यामुळे विकासाची प्रक्रिया मंदावते. तसेच त्या भागात त्या जातीचे लोक नाहीत अशी तक्रार विस्थापित करतात.

**प्रश्न क्र. २ :— पुनर्वसनाची समस्या स्पष्ट करून पुनर्वसनाच्या योजना स्पष्ट करा?**

उत्तर :— एका विशिष्टय क्षेत्रात राहत असलेलया कुटुंबाचे स्थलांतरण करून दुसऱ्या नियोजित क्षेत्रात त्यांची वसाहत निर्माण करणे तसेच नियोजन करून त्या लोकांच्या आवश्यक गरजा सामाजिक व आर्थिक गरजा आणि इतर सेवांची पुर्ती करणे म्हणजे पुनर्वसन होय. पुनर्वसनाचा संबंध विस्थापित लोकांच्या जीवनाची घडी कमी—अधिक प्रमाणात पूर्वीप्रमाणे घालण्याशी आहे.

व्याख्या :— १) जहागिरदार यांच्या मते :— ''पुनर्वसन म्हणजे लोकसंख्येची एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात नियोजनाच्या आधारावर बदली करणे होय.''

२) ब्लूम यांच्या मते :— ''पुनर्वसन ही सर्व प्रकारच्या संधी पूर्ववत प्राप्त करून देण्याच्या संदर्भावर अवलंबून आहे.''

३) रॉबर्ट यांच्या मते :— ''पुनर्वसन ही संज्ञा व्यापक असलेल्या सेवांशी निगडित ओ. ''

वरील व्याख्या लक्षात घेता पुनर्वसन ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. सरकार जवळ कितीही शक्ती वा पाशवी बळ असले तरीही गावच्या गावे उठविणे कोणत्याही सरकारला शक्य नसते. गाव उठविण्यापुर्वी त्या गावातील लोकांच्या काहीतरी आमीष दाखवावे लागते. ते दाखविल्यानंतर लोकांचा विरोध थोडया फार प्रमाणात कमी होतो. त्यानंतर सक्तीचे स्थलांतर घडवून आणणे शक्य होते. या अर्थाने विस्थापन आणि पुनर्वसन या दोन्ही संज्ञा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणता येते.

अनेक विकासाच्या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने आदिवासी लोक विस्थापित झाले आहेत. युनेस्कोने आदिवासी क्षेत्रातील औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास केला तेव्हा त्यांना असे निदर्शनास आले की, 'आदिवासींच्या जीवनावर विस्थापनाचा विपरीत परिणाम झाला आहे. त्यांना त्यांच्या जमिनीचा थोडाफार मोबदला मिळाला असला तरी ते त्यांचे परंपरागत व्यवसाय, जमीन, घर आणि जीवन शैलीपासून विन्मुख झालेत. अनेक आदिवासी हे औद्योगिक क्षेत्रात अकुशल मजुर म्हणून काम करतात. पुनर्वसनाच्या संदर्भात अनेक योजना आखल्या जातात, परंतु त्या योजना कधीच राबविल्या जात नाहीत. त्यामुळे अनेक पैलू असलेल्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

**पुनर्वसनाच्या उपाययोजना :—**

१. **शेतीसाठी जमीन** :— शेतीची निगडीत विविध क्रियांमध्ये विस्थापितांचे आजवरचे आयुष्य गेले असते. त्यामुळे शेती सोडून अन्य कोणताही व्यवसाय करण्याकडे वळणे हे त्यांच्यासाठी अत्यंत अवघड होते. ज्या लोकांची शेती विकास प्रकल्पात जाते, त्यांना पुनर्वसनात शेतजमीन देण्याची व्यवस्था केली पाहीजे.

२. **पुनर्वसनाचे काटेकोर नियोजन** :— पुनर्वसनाच्या कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी केली नाही तर विस्थापितांचे अतोनात हाल होतात. म्हणून विकास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जसे काटेकोर नियोजन केले जाते तसेच विस्थापितांच्या पुनर्वसन कार्यक्रमाबाबतही केले पाहीजे.

३. **पुनर्वसित गावामध्ये सोयी सुविधा निर्माण करणे** :— घराकरीता मोफत जागा, पुनर्वसन वसाहतीत रस्ते, नाल्या, प्राथमिक शाळा, दवाखाने, खेळाची मैदाने यासारख्या सुविधा प्राप्त झाल्यास विस्थापितांना सुकरतेने जीवन जगणे शक्य होते.

४. **पुनर्वसनापूर्वी नुकसान भरपाई** :— नुकसान भरपाई देण्यास शासकीय यंत्रणेला उशीर होतो. त्यामुळे विस्थापितांचे अत्यंत हाल होतात. स्वमालकीचे पैसे नसल्यामुळे ते अन्य कोणतेही व्यवसाय करू शकत नाहीत. उशिराने मिळालेल्या पैशाचे मूल्य कमी झाल्यामुळे त्यांच्या दारिद्र्यात वाढ होत जाते.

५. **भांडवलाची उपलब्धता** :— नुकसान भरपाई पोटी मिळालेले पैसे घरबांधणी व प्रपंच चालविण्यासाठी खर्च होऊन जातात. म्हणून त्यांना अत्यल्प दराने शेती अथवा अन्य व्यवसाय करण्यासाठी भांडवल उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते.

६. **विस्थापितांना मार्गदर्शन** :— विकास प्रकल्पासाठी जागा प्राप्त करतांना मार्गदर्शन करण्यीच आवश्यकता असे त्यामुळेच सकारात्मक मानसिकता निर्माण होते. नवीन परिसरात नवीन व्यवसाय करणे, शेती करणे, मिळालेला पैसा जपून ठेवणे इत्यादींबाबत योग्य प्रकारचे मार्गदर्शन मिळाले तर त्यांचे पुनर्वसन योग्य प्रकारे होऊ शकते.

७. **संपूर्ण गावाचे पुनर्वसन** :— पुनर्वसनात व्यक्ती किंवा कुटुंब हे एकक न मानता संपूर्ण गाव हे एकक मानावे. संपूर्ण गावाचे एकाच ठिकाणी पुनर्वसन झाले तर विस्थापितांना होणारा मानसिक त्रास बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकतो.

८. **मानवतावादी दृष्टिकोन** :— पुनर्वसनानंतरही लोक समाधानी नसतील तर त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न होणे आवश्यक असते. पुनर्वसित झालेल्या लोकांचे समाधान करण्यासाठी समुपदेशकाचे सहाय्य घेणे देखील आवश्यक असते. हे कार्य पूर्ण करण्यासाठी आर्थिक बळ आणि मानवतावादी दृष्टिकोन' असावा लागतो.

या दोहोंचाही नोकरशाही यंत्रणेत अभाव असल्यामुळे ही समस्या कशी दूर करावी हया प्रश्नाचे समाधानकारक उत्तर अद्यापही शासनाला शोधून काढता आले नाही.

**९. <u>अन्य सोयी</u>** :— विस्थापितांच्या कुटुंबातील किमान एका सदस्याला तरी विकास प्रकल्पामध्ये नोकरी देण्याची तरतूद करणे आवश्यक ठरते. विस्थापितांना सामाजिक न्याय मिळवून देणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात धरण प्रकल्प औद्योगिक प्रकल्प वीजनिर्मिती प्रकल्प, नवीन रेल्वेमार्ग प्रकल्प, संरक्षित जंगले आणि प्राण्यांसाठीचे पावर्स, अलीकडच्या काळात सुरू झालेले सेझ या सर्व विकासासाठीच्या प्रकल्पांमुळे विस्थापितांच्या एकूण संख्येत प्रचंड वाढ झालेली आहे हे अमान्य करता येत नाही. त्यामुळे विस्थापितांना सुरक्षा मिळवून देणे आवश्यक ठरते.

# युनिट ३ — असहिष्णूता, दंगली आणि गुन्हे

# (Intolerance, Riot and Crime)

## प्रश्न क्र. १ :— असहिष्णूतेचा अर्थ स्पष्ट करून जाती असमानतेच्या अर्थाची व परिणामाची चर्चा करा?

उत्तर :— असहिष्णूता ही संज्ञा सहिष्णूता या संज्ञेच्या विरूध्द अर्थभाव व्यक्त करणारी आहे. 'दुसऱ्याने काहीतरी सहन करण्याची क्षमता किंवा मानसिक तयारी' असा अर्थभाव सहिष्णूता या संज्ञेचा आहे. सहमती वा पूर्ण असहमती हाच महत्वपूर्ण फरक सहिष्णूता आणि असहिष्णूता या संज्ञांच्या अर्थामध्ये आहे. सहिष्णूता हा समाजजीवनातील एक आदर्श आहे. ते एक मूल्य आहे. जात, धर्म, वंश आदी सामाजिक घटक समाजव्यवस्थेत असहिष्णूता निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. असहिष्णुता ही समाजरचनेचा स्थायीभाव आहे. तो समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणतो तर सहिष्णूता हे मूल्य समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यास सहाय्य करते.

**जाती असमानता आणि सहिष्णूता** :— पैसा—अडका, मालमत्ता किंवा इस्टेट यांचा अभाव, प्रतिष्ठा, क्षमता, वंश, लिंग या कारणांप्रमाणेच जाती हे देखील असमानतेची स्थिती निर्माण होण्याचे एक कारण आहे. जर सर्व जातींना समान अधिकार असते तर जाती—जातींमध्ये उच्चनीच असे भेदभाव निर्माण झाले नसते. अस्पृश्यताही निर्माण झाली नसती. म्हणून जाती असमानता हेच असहिष्णूतेचे कारण ठरते. दोन भिन्न जातीसमूह आणि त्यांचे सदस्य असणाऱ्या सर्व व्यक्ती यांच्यामध्ये प्रतिष्ठा, भोजनसंबंध, विवाहसंबंध, सामाजिक संपर्क इत्यादींबाबत समानतेची स्थिती नसणे असा जाती असमानता या संज्ञेचा अर्थ आहे. ही स्थिती पिढयान्पिढयांपासून टिकवून ठेवली जाते.

**जाती असमानतेचे परिणाम** :—

१. **कनिष्ठ जातींचे शोषण** :— कनिष्ठ जातीच्या स्थितीचा लाभ उच्च मानल्या जाणाऱ्या जातींनी घेतला. त्यांनी कनिष्ठ जातीच्या केलेल्या शोषणामुळे अस्पृश्यता निर्माण झाली. त्यांचे मागासलेपण हे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांमध्ये आहेत. उच्च वण वा जातींच्या हितांचे रक्षण करणे ही मनुवादी प्रवृत्ती

आहे. मनुवादी दृष्टिकोनानुसार, वेदांचे अध्ययन करण्याचा आपला एकाधिकार कायम टिकून रहावा म्हणून रामाने वेदांचे अध्ययन करणाऱ्या शांबुका चा वध केला. अस्पृश्यता निर्माण होण्याचे मुळ हया घटनेत देखील आहे.

२. **<u>जात पंचायतीचे महत्व</u>** :— स्वातंत्र्यपूर्व काळात प्रत्येक जातीची एक जातपंचायत असे ती न्यायनिवाडा करण्याचे कार्य करीत असे. ब्रिटीशांनी केलेले कायदे आणि स्थापन केलेली न्यायालये यांच्यामुळे जातपंचायतीचे प्रस्थ बरेच कमी झाले. परंतु आजही कोणीही आपल्या जातीगटाच्या बाहेर विवाह करीत नाहीत याचा अर्थ जातीव्यवस्थेचा प्रभाव कायम आहे.

३. **<u>गतिशीलतेस बाधक</u>** :— जन्मतत्वानुसार प्राप्त होणाऱ्या प्रदत्त दर्जामध्ये कोणताही बदल घडवून आणण्याची कोणालाही मुभा नव्हती. शिक्षण, कर्तृत्व, कष्ट व प्रामाणिकपणा यासारख्या गुणांच्या आधारावर आपल्या जीवनस्थितीत बदल घडवून आणण्याची संधी न मिळाल्यामुळे जाती असमानतेची ही स्थिती गतीशीलतेच्या मार्गात अडसर ठरली.

४. **<u>समाजाचे खंडात्मक विभाजन</u>** :— जातीचे दोन भिन्न समूह आणि त्यांचे सदस्य यांच्यामध्ये आहार—विहार, आचार—विचार, कुलदेवता, विवाह—पुनर्विवाहाच्या नियमांमुळे मानसिक स्तरावरचे दूरत्व वाढत गेले. त्यामुळे भारतीय समाजाचे खंडामध्ये विभाजन होऊन भारतीयांच्या ऐक्यभावनेवर विपरीत परिणाम झाला आहे.

५. **<u>प्रबळ जातिनिष्ठेची निर्मिती</u>** :— व्यक्तीला संकटकाळातील मदतीसाठी आपआपल्या जातीबांधवांवर अवलंबून राहण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नव्हता. त्याचा परिणाम म्हणून जातीनिष्ठा प्रबळ झाली. जातीय भेदभाव आणि राजकीय जीवनांमधील जातीवादी दृष्टीकोन भारतीय राष्ट्रवादाच्या विकासात फार मोठी अडचण असल्याचा अनुभव आपला सर्वजन आजही घेत आहोत.

६. **व्यावसायिक बंधनाचा परिणाम** :— परंपरेने निश्चित केलेला व्यवसाय करण्याचे बंधन असल्यामुळे स्पर्धेची व असुरक्षिततेची भिती उरली नाही. याउलट निष्क्रियतेची निर्मिती होऊन उद्योग—व्यवसायांमध्ये आपण जगाच्या मानाने खूपच मागे आहोत याची

जाणीव ब्रिटीश राजवटीमध्ये भारतीयांना झाली. या बाबतीत भारताचे माघारलेपण आजही संपले नाही.

७. **प्रगतीमध्ये बाधक** :— जाती असमानतेच्या स्थितीमुळे भारतीय समाजाला स्वत:ची प्रगती घडवून आणण्यासाठी फारसा वावच मिळाला नाही. त्यामुळे जाती असमानता ही सामाजिक प्रगतीमध्ये बाधक ठरली.

८. **उच्च—निच भेद** :— सर्व जातींना समान अधिकार असते तर जाती—जातींमध्ये उच्च—निच असे भेदभाव निर्माण झाले नसते. जाती असमानतेतून उच्च व नीच अशी जातींची श्रेणी तयार होण्यास वाव मिळाला.

९. **अस्पृश्यतेची निर्मिती** :— नीच श्रेणीतील जातींवर काही सामाजिक बंधने लादल्यामुळे अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जाती निर्माण झाल्या. त्या जातींना एक माणूस म्हणून असणाऱ्या मानवी हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांची जीवनस्थिती पशुपेक्षाही हीन दर्जाची झाल्यामुळे अस्पृश्यता हा भारतीय समाजावरील कलंक आहे.

**प्रश्न क्र. २ :— धार्मिक असहिष्णूतेचा अर्थ सांगून धार्मिक असहिष्णूतेची कारणे व परिणाम लिहा.**

उत्तर :— भारतात विविध धर्म आहेत. संख्यात्मक दृष्टया ते लहान मोठया आकाराचे आहेत. त्यांना स्वत:ची अशी स्वतंत्र ओळख आहे. हे धर्म जेव्हा स्वत:च्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करतात तेव्हा संघर्ष निर्माण होतो. त्याची परिणती दंगली, हिंसाचार जाळपोळ, खून, लूटमार आदींमध्ये होते. परिणामी जेव्हा असहिष्णूता वाढते तेव्हा विघटनात्मक प्रवृत्ती प्रबळ होतात. बहुतांशवेळा विभिन्न गटांमधील असहिष्णूता एखाद्या प्रदेशापुरती मर्यादित असते. भारतीय समाजात विघटनात्मक आणि संघटनात्मक अशा दोन्ही प्रक्रिया सुरू असतात. तसेच असहिष्णूता आणि सहिष्णूता या दोन्ही परस्परविरोधी प्रवृत्ती किंवा प्रक्रिया देखील सुरू असतात. राजकीय लाभ प्राप्त करण्यासाठी जेव्हा धर्माचा उपयोग केला जातो तेव्हा समाजव्यवस्थेतील धार्मिक असहिष्णूतेत वाढ होते. आपल्या धर्माबद्दल जेव्हा अहंभाव

निर्माण होतो आणि अन्य धर्मीय समुहांबाबत घृणेची व तिरस्काराची भावना निर्माण होते तेव्हा त्याला धार्मिक असहिष्णूता असे म्हणतात.

**अ) धार्मिक असहिष्णूता निर्माण होण्याची कारणे** :—

१. **धार्मिक संघटन** :— आज प्रसारमाध्यमांमुळे देशव्यापी स्वरूपाची संघटना उभारणे विभिन्न धर्मीय समूहांना शक्य झाले आहे. धार्मिक समूहसदस्यांना मानसिक सुरक्षितता मिळवून देण्याचे कार्य संघटना करीत असतात तर दुसरीकडे अन्य धर्मीय समूहांविरूध्द भडकविण्यामध्ये धार्मिक संघटनांचा सहभाग असतो.

२. **राजकीय हेतू** :— भारतात स्वातंत्र्योत्तर काळात व्होट बँकेच्या राजकारणासाठी धर्माचा आधार घेतला जातो. सत्तेसाठी धार्मिक पाठराख्यांना खुष करून धार्मिक असहिष्णूतेत वाढ होते.

३. **सांस्कृतिक भिन्नता** :— भारतीय समाजात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन यांच्यात वेशभूषा, प्रार्थना व उपासना पध्दतीमध्ये भिन्नता आहे. प्रत्येक धार्मि समूहाला विवाह, घटस्फोट, दत्तक वारसा आदींबाबत आपापल्या धर्मातील नियम व तत्वे अधिक चांगली आहेत असे वाटत असल्यामुळे धार्मिक असहिष्णूता निर्माण होते.

४. **ऐतिहासिक कारण** :— भारतावर झालेल्या अनेक आक्रमणांमध्ये 'फूट पाडा आणि राज्य करा' या धोरणाचा अवलंब ब्रिटीशांनी केलयामुळे हिंदू—मुस्लीम समुदायात धार्मिक असामंजस्य वाढतच गेले. परिणामी १९४७ मध्ये देशाचे विभाजन झाले. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू—मुस्लीम समुदायामधील असामंजस्याबरोबरच शिया—सून्नी, अकाली निरंकारी, हिंदू—ख्रिश्चन या धार्मिक समूहांपर्यंत असहिष्णूतेचे .. ......... पोहचले आहे.

५. **स्व—स्वार्थीकरीता** :— दोन भिन्न धर्माच्या व्यक्तींना भडकविणे आणि त्यामधून चोऱ्या, शस्त्रास्त्रांची विक्री, महिलांवर बलात्कार यासारख्या गोष्टी साध्य करण्यामध्ये काही लोकांचा स्वार्थ असतो. अशा व्यक्ती संकुचित स्वार्थाच्या पूर्तीसाठी धार्मिक असहिष्णूता वाढविण्यात नेहमीच प्रयत्न करीत असतात.

६. **मानसिक कारण** :— अल्पसंख्यांकांच्या मनात नेहमीच भितीची आणि असुरक्षिततेची भावना असते. बहुसंख्यांक अल्पसंख्यांकाचे मानसिक शोषण करीत आहेत असे आरोप करून अल्पसंख्यांकांचे नेते आपली पोळी भाजून घेतात.

७. **भौगोलिक गतिशीलतेचा अभाव** :— भारतात धार्मिक समूह देशामधील काही प्रदेश, गावे आणि गावामधील काही भागात केंद्रीत झालेले आहेत. म्हणजे ते आपली वस्ती, गांव, प्रदेश सोडून अन्यत्र निवास करण्यात तयार नसतात. त्यामुळे धार्मिक—भौगोलिक संकुचिततेचे रूपांतर धार्मिक असहिष्णूतेमध्ये होते.

**ब) धार्मिक असहिष्णूतेचे परिणाम** :—

१. **अराजकतेत वृध्दी** :— शांतता आणि सुव्यवस्थेपेक्षा ताणतणाव आणि संघर्षाची स्थिती असणे हे असामाजिक तत्वांसाठी नेहमीच फायद्याचे असते. त्याचा परिणाम म्हणून अराजकतेत वाढ होते.

२. **विकास कार्यात अडथळा** :— धार्मिक असहिष्णूता असणाऱ्या भागात नविन कारखाने वा उद्योग व्यवसाय सुरू करण्यास कोणीही तयार नसतो. धार्मिक ताणतणावग्रस्थ भागातून उद्योग—व्यवसाय दुसरीकडे हलविल्यामुळे या प्रदेशाला आर्थिक—औद्योगिक विकासाबाबत माघारलेल्या अवस्थेतच राहावे लागते.

३. **असुरक्षितेत वाढ** :— ज्या भागातील धार्मिक समूहांमध्ये ताणतणाव असतो त्या भागात जाण्याचे उद्योग—व्यवसायामधील लोकही टाळतात. धार्मिक तणावग्रस्त भागातील व्यापार—उद्योगाला असुरक्षिततेतील वाढीमुळे नेहमीसाठी झळ पोहचत असते.

४. **राष्ट्र निर्माणात बाधक** :— राष्ट्र आणि राष्ट्रीय एकात्मता ही व्यक्तीच्या मनातील एक निष्ठा आहे. ती अत्यंत संथ गतीने आणि क्रमाक्रमाने निर्माण होत असते. आजच्या काळात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारीत असणारी समाजरचना निर्माण करणे म्हणजे राष्ट्रबांधणी होय. धार्मिक असहिष्णूतेला बढावा देणारे लोक हे धर्माचा आधार घेऊन एकमेकांशी उणी—दुणी काढत असल्यामुळे राष्ट्रनिर्माणात अडथळा निर्माण होतो.

५. **सामाजिक व राजकीय अस्थैर्याची निर्मिती** :— धार्मिक संघर्षातून झालेल्या हिंसाचाराची जबाबदारी निश्चित करण्यासाठी दोषी अधिकाऱ्यांवर खटले दाखल करून

राजकीय सत्ताधारकांना सत्तेच्या पदांवरून दूर केले जाते. याचा अर्थ धार्मिक असहिष्णूतेमुळे सामाजिक व राजकीय अस्थैर्यात वाढ होते.

६. **एकात्मतेत अडथळा** :— समान भाषा, वंश, धर्म आदींना राष्ट्रीय एकात्मतेचे आधार असे अनेक शतकांपासून मानले जाते. तरीही वर्तमान युगात धर्म, वंश, जात—जमात, प्रदेश या सर्वांबाबतच्या टोकाच्या निष्ठा एकात्मतेच्या मार्गात अडसर ठरतात.

७. **सुव्यवस्थेचा प्रश्न** :— धार्मिक संघर्षातून होणाऱ्या दंगलीमध्ये लूटमार, जाळपोळ, हिंसा, महिलांवर अत्याचार यासारख्या घटना नियंत्रणात आणून पुन्हा शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी शासनास प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करावा लागतो. याचा भार शेवटी देशवासीयांवरच पडत असतो.

**प्रश्न क्र. ३ :— धार्मिक मूलतत्ववादाचा अर्थ स्पष्ट करून धार्मिक मूलतत्ववादाला प्रोत्साहित करणारे घटक लिहून मूलतत्ववादाचा प्रभाव कमी करण्यासाठीचे उपाय सांगा?**

उत्तर :— धार्मिक मूलतत्ववाद ही विचारसरणी ओ. धर्मग्रंथात मांडण्यात आलेली तत्वे जशीच्या तशी लोकांनी आचरणात आणावी, त्यात कोणताही आणि काडीचाही बदल करू नये असा धार्मिक मूलतत्ववादाचा अर्थ आहे. धार्मिक असहिष्णूतेचे अंतिम टोक म्हणजे धार्मिक मूलतत्ववाद आहे. काही अभ्यासक धार्मिक, मूलतत्ववाद या संज्ञेऐवजी धार्मिक दहशतवाद अशी संज्ञा वापरतात. पुरूषांपेक्षा स्त्रियांचे अधिकार स्वातंत्र्य, धार्मिक मूलतत्ववादामुळे संकुचित झाल्याने स्त्रियांचा सर्वप्रथम धार्मिक मूलतत्ववादाच्या शिकार होतात.

**अ) धार्मिक मूलतत्ववादाला प्रोत्साहित करणारे घटक** :—

१. **धर्मशिक्षण देणाऱ्या संस्था** :— पाठशाला, मदरसे यासारख्या धर्मशिक्षण देणाऱ्या संस्था सर्व धर्मामध्ये आहेत. आधुनिक शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालयांपेक्षा त्यांची संख्या जास्त वाढली की धर्ममूलतत्ववादाचा प्रसार होण्यासाठीचे नेटवर्क तयार होते. हे नेटवर्क मूलतत्ववादाचा विस्तार करते.

२. **मानसशास्त्रीय घटक** :— दुसऱ्यावर वर्चस्व गाजविणे, इतरांचा तिरस्कार करणे ही व्यक्तीमध्ये असणारी मनोवृत्ती आहे. आपला धर्म सर्वश्रेष्ठ वा सर्वतोपरी आहे, ही भावनाच धार्मिक मूलतत्ववादाच्या निर्मितीचे आणि विकासाचे एक महत्वाचे कारण आहे.

३. **राजकीय घटक** :— धर्म, व्होट बँकेचे राजकारण, राजकीय अस्थैर्य या आधारावर सोयी—सवलती देण्याचे राज्याचे किंवा राजकीय पक्षाचे धोरण धार्मिक मूलतत्ववादाला बढावा देण्याचे कार्य करीत असतात.

४. **धर्मसमूहांचे संघटन** :— प्रसारमाध्यमांमुळे गाव, जिल्हा, प्रदेश, राष्ट्र आणि त्याच्याही पुढे आंतरराष्ट्रीय धर्मसमूहांचे संघटन हे अधिक व्यापक आणि मजबूत झाले असल्याचे दिसून येते. हे संघटन धार्मिक मूलतत्ववादाचा शीघ्र गतीने प्रसार करण्यास सहाय्यभूत ठरत आहे.

५. **धर्मप्रसारक** :— पुरोहित, मंदीरांचे पुजारी, पुरोहित, मुल्ला—मौलवी, धर्मप्रसाराचे कार्य करणारे साधुसंत, धार्मिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते या सर्वांचा प्रत्यक्ष जनतेशी संबंध असल्यामुळे धार्मिक मूलतत्ववादाचा विस्तार घडवून आणण्यात त्यांची भूमिका महत्वपूर्ण असते.

६. **धर्मांतर** :— काही प्रलोभने देऊन किंवा सक्तीच्या मार्गाचा अवलंब करून धर्मांतर केले जाते. आपापल्या धर्माच्या अनुयायांची संख्या वाढावी अशी सर्व धर्मसमूहांची इच्छा असते. असे प्रयत्न झाले की धार्मिक मूलतत्ववादाचा प्रसार होतो.

**ब) धार्मिक मूलतत्ववादाचा प्रभाव कमी करण्यासाठीचे उपाय** :—

१. **कठोर शिक्षा** :— सांप्रदायिक दंगलीमध्ये सहभागी गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळाल्यास धार्मिक कट्टरतावादाला आळा बसू शकतो. सांप्रदायिकतेचा प्रसार करणाऱ्यांवर शासनाने न्यायालयीन कार्यवाही पूर्ण करून त्यांना कठोर शिक्षा देण्याची व्यवस्था करावी.

२. **समान नागरी कायदा** :— विभिन्न धर्मीय समूहांनी एकमेकांच्या धर्माचा आदर केला तर धार्मिक कट्टरतावादाला प्रतिबंध बसू शकतो. हिंदू, मुस्लीम व ख्रिश्चन

धर्मीयांसाठी वेगवेगळे कायदे आहेत. सर्वधर्मसमभावाचे तत्व आचरणात आणण्यासाठी समान नागरी कायदा लागू करणे आवश्यक आहे.

३. **शिक्षण** :— निरक्षर आणि अल्पशिक्षीत लोक धार्मिक मूलतत्ववादाच्या जाळयामध्ये लवकर अडकतात. म्हणून सर्व स्तरावरच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविले पाहीजे.

४. **धार्मिक संस्थांवर बंधने** :— धार्मिक संस्था अप्रत्यक्ष स्वरूपात धार्मिक भेदभावाला उत्तेजन देऊन लोकांची मने अन्य धर्मीयांबाबत कलुषित करतात. वरकरणी पाहता त्या संस्था देशासाठी, कार्य करीत असल्याचे दाखवून अन्य धर्मीयांबाबत घृणा, तिरस्कार निर्माण करून लोकांची मने भडकवितात.

५. **आर्थिक व्यवहारांवर बंधने** :— आजच्या काळात विभिन्न धार्मिक संघटनांना परदेशातील निवासी भारतीयांकडून मोठया प्रमाणावर अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. प्राप्त होणारी रक्कम वाईट कार्याकरीता वापरल्या गेल्यास शासनाने अशाप्रकारचे अर्थसहाय्य कायद्याने बंद करावे.

६. **प्रार्थनास्थळांवर शासनाचा हस्तक्षेप** :— धार्मिक प्रार्थनास्थळांवर सांप्रदायिक दंगली आणि हिंसाचार यामध्ये सहभागी असणाऱ्या गुन्हेगारांना आश्रय दिला जातो. तसेच त्यांचा शस्त्रास्त्रांचा साठा करण्यासाठी उपयोग केला जातो. त्यामुळे शासनाने हस्तक्षेप करावा.

७. **आर्थिक विकास** :— युवकांना रोजगार दिल्यास बेरोजगार युवक हे धार्मिक कट्टरतावादाच्या प्रसारासाठी सहजतेने उपलब्ध होणार नाहीत. आर्थिक विकास झाल्यास मूलतत्ववादाचा प्रभाव कमी होतो.

**प्रश्न क्र. ४ :— सांप्रदायिक दंगल या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करून भारतात सांप्रदायिकतेच्या वृध्दीसाठी जबाबदार असलेले प्रमुख घटक लिहा?**

उत्तर :— धार्मिक गटांमधील संघर्षाला सांप्रदायिक दंगली असे संबोधले जाते. सांप्रदायिक दंगलीत सहभागी झालेल्या दोन्ही गटांमध्ये एकीची वा ऐक्याची भावना प्रबळ असते. सांप्रदायिक दंगलीत सहभागी झालेले दोन पक्ष आपला गट सोडून दुसऱ्या गटातील व्यक्तींचा बळी घेण्याचा प्रयत्न करीत असतात. याचा अर्थ वंश,

धर्म, धार्मिक पंथ वा संप्रदाय या आधारावर निर्माण झालेल्या हिंसाचाराला आणि अत्याचाराला सांप्रदायिक दंगली म्हणतात.

भारतात सांप्रदायिकतेच्या वृध्दीसाठी जबाबदार असलेले प्रमुख घटक :—

१. राजकीय संघटना :— भारतात स्वातंत्र्योत्तर काळात अन्य धर्मीयांबाबत तिरस्काराच्या, द्वेषाच्या भावनेला उत्तेजन देणाऱ्या राजकीय संघटना निर्माण झाल्या आहेत. हया संघटना सांप्रदायिकतेची भावना विकसित करण्यामध्ये सहाय्यभूत ठरतात.

२. ब्रिटीशांचे धोरण :— भारतात धर्म, जात व वंश हया आधारावर निर्माण झालेले अनेक समूह आहेत. हया समुदायांमध्ये परस्परांबाबत अविश्वासाची भावना निर्माण करून सांप्रदायिकतेची बीजे रोवली. त्यासाठी भारतात आपल्या राजवटीची पाळेमुळे पक्की रूजविण्यासाठी ब्रिटीशांनी फोडा आणि राज्य करा या धोरणाचा पुरस्कार केला.

३. शासनाचे उदासिनतेचे धोरण :— सांप्रदायिकता ही मनोवृत्ती आहे. तिचा समाजामध्ये विकास होऊ नये, म्हणून शासनाला काही कठोर निर्णय घ्यावे लागतात. परंतु सांप्रदायिकतेला पायबंद घालण्याबाबत शासनाचे उदासिनतेचे धोरण सांप्रदायिकतेच्या विकासाला बळ देते.

४. वीर पुरूषांच्या कथा :— सर्व महापुरूषांनी मोगल सत्तेविरूध्द संघर्ष केला. पराक्रमी महापुरूषांच्या कथांमुळे मोगल हे परकीय शासनकर्ते आहेत, ही भावना बळावली. कारण पराक्रमी महापुरूष मोगल शासकांविरूध्द लढत होते. हया सर्व प्रयत्नांमधून सांप्रदायिकतेच्या विकासाला बळ मिळाले.

५. व्होट बँकेचे राजकारण :— सांप्रदायिक दंगलीमध्ये भरडल्या गेलेल्यांच्या मनात अन्यधर्मीय समूहाबाबत तिरस्काराची भावना नसल्याचे अनेकदा आढळून आले आहे. व्होट बँकेचे राजकारण सांप्रदायिक दंगली घडून येण्याला कारणीभूत असल्याचे दिसून आले आहे.

६. भारतीय इतिहासाचा दुरूपयोग :— युध्दामध्ये सतत पराभव हा भारतीय इतिहास आहे. भारतीय समाज एकसंघ नाही, तो भारतीयांवर परक्यांना शासन करण्याची संधी मिळवून देतो, ब्रिटीशांचा या अशास्त्रीय आणि ऐतिहासिक दृष्टिकोनामुळे 'राज्यकर्ता समुदाय' ही भावना मुस्लीम समुदायात बळावली. हिंदू आणि मुस्लीम अशा दोन्ही

समुदायात सांप्रदायिक भावनेच्या निर्मिती साठी आणि तिच्या वृध्दीला ब्रिटीशांनी उत्तेजन दिले. हे करण्यासाठी त्यांनी भारतीय इतिहासाचा दुरूपयोग केला.

७. नवीन धर्माचा उदय :— हिंदु धर्म हा तुलनात्मकदृष्टया सर्वात प्राचीन आहे. हिंदू धर्माच्या उदयानंतर भारतात जैन, बौध्द व शीख धर्म निर्माण झाले. न वीन धर्माच्या उदयास आणि विस्ताराला विरोध झाल्याच्या नोंदी भारतीय इतिहासात नाही. परंतु एखाद्या गावात वा भूप्रदेशात दोन धार्मिक गटांमध्ये संघर्ष निर्माण झाला तर त्याचा संपूर्ण देशात विस्तार होण्याची शक्यता असते. त्यामुळे धार्मिक गटातील संघर्ष थांबविण्यासाठी शासनाला मोठया प्रमाणावर पाशवी बळाचा वापर करावा लागतो. धार्मिक गटांमधील संघर्षाला सांप्रदायिक दंगली असे संबोधले जाते.

**प्रश्न क्र. ५ :— अस्पृश्यतेचा अर्थ स्पष्ट करून अस्पृश्यांच्या निर्योग्यता लिहा?**

उत्तर :— भारतात शूद्र, अस्पृश्य, अवर्ण, हरीजन, दलित पाचवा वर्ण इत्यादी विविध नावांनी अस्पृश्यांना संबोधले जात होते. भारतीय समाजव्यवस्था ही जातीवर आधारलेली आहे. जन्मावरून माणसाची जात व दर्जा ठरतो. जातीसंस्थेचा संबंध व्यवसायांशीही जोडल्या जात असे. अंधश्रध्दा, रूढी व खोटया कल्पनांच्या आहारी जाऊन कोटयावधी लोकांना अस्पृश्य ठरविण्यात आले. त्यांना एक व्यक्ती म्हणून असणारे मानवी हक्कही नाकारण्यात आले. त्यांचा स्पर्शच काय, सावली देखील निषिध्द मानली जाऊ लागली. थोडक्यात जातींच्या संरचनेतील तळाच्या जातींमध्ये जन्म झाल्यामुळे कोटयावधी लोकांच्या वाटयास अधिकारहीन जीवनस्थिती आली. संविधानानुसार अनुसूचित जातीमध्ये प्रवेश करण्यासाठीच्या चार कसोटया सांगितल्या आहेत.

१) हिंदू समाजातील अस्पृश्य जातींचे गट २) जातींमधील लोकांची शैक्षणिक क्षेत्रात फारशी प्रगती नसणे ३) त्यांचा सरकारी नोकरीत फारसा प्रवेश झालेला नसणे ४) व्यापार उद्योग—व्यवसाय या क्षेत्रात त्यांची फारशी प्रगती नसणे.

**अस्पृश्यांच्या निर्योग्यता** :—

**१. धार्मिक निर्योग्यता** :— अस्पृश्यांना मंदीरामध्ये प्रवेश करण्यास बंदी होती. एवढेच नव्हे तर काही वर्षापूर्वी काही ठिकाणी अस्पृश्यांसाठी वेगळी स्मशानभूमी

असल्याचे आढळले आहे. अस्पृश्यांना वेदमंत्र म्हणण्याचा व ऐकण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता. ज्या विवाह पध्दती व विवाह प्रकारांमध्ये कोणतेही धार्मिक विधी नाहीत, अशा विवाह प्रकारांचे पालन करणे अस्पृश्यांवर बंधनकारक होते.

२. **आर्थिक निर्योग्यता** :— अस्पृश्य व्यक्तीला शेतमजूर म्हणून शेतीच्या व्यवसायात कामे करता येत होती. परंतु यासाठी त्याला शेतमालक असणाऱ्या सवर्णाच्या दयेवरच अवलंबून रहावे लागत असे. या जातीसमूहाला सेवाकार्य करावी लागत होती. भारतीय समाजात अस्पृश्य कनिष्ठ प्रतीचा असण्याचे एक महत्वपूर्ण कारण त्यांना व्यवसाय निवडण्याची संधी नाकारण्यात आली होती. अस्पृश्य जातीसमूहांनी नेहमीकरिता आर्थिकदृष्टया गरिबीतच रहावे, अशी आर्थिक शोषण करण्याची पध्दती निर्माण करण्यात आली होती.

३. **सामाजिक निर्योग्यता** :— सवर्ण जातीच्या समवेत सार्वजनिक विहिर, तलाव आदी ठिकाणी पाण्याचा उपयोग करता येत नसे. गावामधील सर्वसाधारण वस्तीत अस्पृश्यांना राहू दिले जात नसे. गावाबाहेर अस्पृश्यांची वेगळी वस्ती असे. शिक्षण घेण्याचा व संस्कृत भाषा शिकण्याचा अधिकार परंपरात अस्पृश्य जातीसमूहांना नव्हता. सवर्ण जाती आणि अस्पृश्य व्यक्तींमध्ये सर्व प्रकारचा सामाजिक भेदभाव केला जात असे. अस्पृश्य जातीसमूहांना नागरी अधिकारांपासून वंचित ठेवले जात होते. स्वतंत्र भारतात देखील सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रातून अस्पृश्यतेचे पूर्णत: उच्चाटन झालेले नाही. उत्तरप्रदेश आणि बिहार या दोन राज्यांमध्ये अनुसूचित जातीच्या लोकांवरील अत्याचाराचे प्रमाण आजही अधिक ओ.

**प्रश्न क्र.६ :— अनुसूचित जातीच्या प्रमुख समस्या लिहा?**

उत्तर :— अपुऱ्या सुविधा

१. **आरोग्यविषयक समस्या** :— ग्रामीण आणि शहरी भागात मोलमजुरी करून गुजराण करणाऱ्या कुटुंबात सकस आहाराचा अभाव असतो. पिण्यासाठी स्वच्छ पाण्याचा अभाव, गलिच्छ वस्त्यांमध्ये निवास, कुपोषण, निवासविषयक अपुऱ्या सोयी यातून त्यांचे आरोग्यविषयक प्रश्न निर्माण झाले आहेत.

२. **आर्थिक समस्या (व्यावसायिक बंधने)** :— खेडयांमध्ये परंपरेने ठरलेला कोणताही व्यवसाय नाही, तसेच शेतमजूर म्हणून काम करू देण्यात उच्च जातीचे लोक तयार नाहीत. मेलेली जनावरे उचलने, त्यांची चामडे काढून विकणे या व्यवसायात आर्थिक प्राप्ती नव्हती. नवीन व्यवसाय करण्यावर बंदी होती. यामुळे आर्थिक दृष्टया त्यांची पिछेहाट झाली. व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव, परंपरेने प्राप्त झालेले घृणित व्यवसाय, वेठबिगारी, कर्जबाजारीपणा यामुळे या जातिसमूहाचे आर्थिक जीवन कमालीचे खालावले.

३. **कल्याणविषयक समस्या** :— आरक्षणाचे लाभ हे अनुसूचित जातींमधील साधन आणि मध्यम वर्गापर्यंत पोहचतात. ते गरीब वर्गापर्यंत पोहचत नाहीत. हे लाभ त्याच जातीतील गोरगरीब वर्गापर्यंत शेतमजुरांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे त्यांच्या कल्याणासाठी नव्याने कल्याण कार्यक्रम निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

४. **शिक्षणविषयक समस्या** :— शिक्षण संस्थांमधील प्रवेशामध्ये आरक्षण, शिष्यवृत्ती, विद्यार्थ्यांसाठीची वसतीगृहे यासारख्या उपायांमुळे अनुसूचित जातींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे, हे मान्य केले तरी त्यांच्या शैक्षणिक समस्या संपल्या असे म्हणता येत नाही. कारण गरिबी, शिक्षणामधील गळतीचे प्रमाण अधिक, दर्जेदार शिक्षणाचा अभाव, स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होण्याचे अतिशय कमी प्रमाण, व्यावसायिक शिक्षणाच्या सोयींचा अभाव, रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे, विवाह वय कमी असणे, गळतीमध्ये मुलींची संख्या अधिक असणे, दारिद्रय रेषेखालील जीवन जगणे साक्षरता दर कमी असणे. शैक्षणिक प्रेरणेचा अभाव असणे इ. शैक्षणिक समस्या आहेत.

५. **विकासविषयक समस्या** :— अनुसूचित जातींना पुरेसे उत्पन्न मिळवून देणारा पारंपारिक असा व्यवसाय नसल्याने त्यांच्यात कोणत्याही व्यवसायांची कौशल्य विकसित झाली नाहीत. यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नसल्यामुळे भूमिहीन शेतमजूर म्हणून जीवन जगण्याची पाळी त्यांच्यावर आली. आज स्थलांतरीत होऊन शहरामध्ये आलेल्या अनुसूचित जाती मोलमजुरी करून जीवन जगत आहेत.

६. **दारिद्रजन्य संस्कृती** :— जन्म, विवाह व मृत्यू यासारख्या प्रसंगी विधी करावयास भटजी व पुरोहितवर्ग तयार नसे. त्यांनी आपल्या जातीच्या सांस्कृतिक परंपरांच्या मर्यादिपर्यंतच जीवन जगावे अशी अन्य जातींची अपेक्षा होती. अनुसूचित जातींना उच्चवर्णीयांच्या दयेवरच विसंबून रहावे लागत होते. त्यामुळे अनुसूचित जातींमध्ये फारशा उच्च सांस्कृतिक परंपराच निर्माण झाल्या नाहीत. त्यांची दारिद्रयजन्य संस्कृती त्यांच्या प्रगतीच्या मार्गात बाधक ठरली आहे.

७. **सामाजिक समस्या** :— महार, मांग, चांभार, भंगी या सर्व अनुसूचित जातींमध्येही श्रेष्ठ व कनिष्ठ या आधारावर क्रम लावला जातो. श्रेष्ठता व कनिष्ठता यांना मान्यता देण्याच्या समाजवृत्तीतून या जातीसमूहांमध्ये न्यूनगंड निर्माण झाला आहे. अंधश्रध्दा आणि प्रथा व परंपरा यांचे अनुकरण करण्याच्या प्रवृत्तीमुळे या जातीसमूहाला अनेक सामाजिक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. गरिबी, कर्जबाजारीपणा, सामाजिक अन्याय, सामाजिक शोषण, उपेक्षा आदींमुळे या जातीसमूहांमधील लोकांचे सामाजिक जीवन अतिशय दयनीय झाले आहे.

**प्रश्न क्र. ७ :— जातीवादाचा अर्थ व व्याख्या लिहून भारतात जातीवादाच्या विकासाची कारणे परिणाम व उपाय लिहा?**

उत्तर :— भारतातील सामाजिक स्तरीकरणाचा आधार म्हणून उदयास आलेल्या जातीसंस्थेचे जातीवाद हे एक अपत्य आहे. जातीवाद हे जाती—जातींमधील असमानता किंवा विषमता टिकवून ठेवण्याचे ते एक तंत्र आहे किंवा तो एक मार्ग आहे. आधुनिक भारतीय समाजात समाजकारण, राजकारण, प्रशासन, सेवा क्षेत्र अशा सर्वच ठिकाणी प्रत्यक्ष—अप्रत्यक्षरित्या आढळून येणारी जातीभक्ती, जातीनिष्ठा, स्वयंसमूह, श्रेष्ठतावाद म्हणजे जातीवाद होय. समाजाचे व देशाचे हित ध्यानात न घेता आपल्याच जातीबांधवांचे आणि जातीगटाचे कल्याण करण्यासाठी विकसीत झालेली मनोवृत्ती म्हणजे जातीवाद होय.

**व्याख्या** :— **१) डॉ. जी.एस. घुर्ये** :— ''आजकाल जातीय एकतेची भावना इतकी दृढ झालेली आहे की, ती खऱ्या अर्थाने जातीभक्तीच मानता येईल.''

**२) डॉ. प्रसाद** :— ''जातीवाद म्हणजे राजकारणात रूपांतरीत झालेली जातीवरील निष्ठा होय.''

**३) कालेलकर** :— ''जातीवाद म्हणजे एक आंधळी निष्ठा असून त्यामुळे सामाजिक न्यायाची भावना, समानता व बंधुत्व या आदेशांना तिलांजली मिळते.''

वरील व्याख्या लक्षात घेता स्वतःच्या जातीपुरत्याच निष्ठा मर्यादित होणे हाच जातीवादाचा अर्थ आहे. आपल्याच जातीगटाविषयीचा हा अतिरेकी प्रेमभाव घातक आहे. म्हणून जातीवाद ही देशासमोर असणारी एक गंभीर समस्या आहे.

**अ) भारतात जातीवादाच्या विकासाची कारणे :—**

**१) संचार साधनांचा विकास** :— वधुवर परिचय मेळावे, विवाहविषयक जाहिराती, वृत्तपत्रे, एवढेच नव्हे तर विभिन्न जातीगट वधूवर संशोधन या एकाच विषयाला वाहिलेली मासिके, वार्तापत्रे देखील प्रकाशित होत आहेत. आंतर्विवाहाच्या नियमांचे बंधन जातीगटातील लोकांनी पाळावे यासाठी आटोकाट प्रयत्न करणे सुरू आहे. मोबाईल, इंटरनेट व इतर संचार सुविधांमुळे या प्रयत्नांना अधिक गती प्राप्त झाली आहे.

**२) व्होट बँकेचे राजकारण** :— लोकशाही व्यवस्थेतील निवडणुकांमध्ये संख्याबळाला महत्व असते. लहान—मोठया आकाराच्या प्रभावशाली जातीगटाच्या नेत्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा सुरू आहे. मतपेढीचे राजकारण हा सर्व घडामोडींचा दृश्य स्वरूपातील परिणाम होय.

**३) जाती अंतर्विवाह** :— जातीगटांबाहेर विवाहसंबंध जोडले तर गावामधील आपली प्रतिष्ठा कमी होईल, गावकरी आणि जातीबांधव आपल्याशी पुर्वीसारखे सहकार्य करणार नाहीत अशी भिती व्यक्तीला वाटते. जातीगटांतर्गत विवाह करण्याला प्राधान्य दिल्यामुळे व्यक्तीच्या मनातील जातीनिष्ठा दृढ होत आहेत.

**४) नागरीकरण** :— औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेपेक्षा ही नागरीकरणाची प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. ग्रामीण भागातून प्रत्येक जातीचे लोक नगरात येऊ

लागले आहेत. नागरीकरणामुळे नागरी समाजात मोठया प्रमाणात जातीय संघटना अस्तित्वात आल्या आहे. त्यामुळे जातीवादाच्या विकासाला चालना मिळाली आहे.

५. **रितीरिवाज व व्यवसाय** :— सुखदु:खाच्या प्रसंगी ज्ञातीबांधवांनी एकमेकांना मदत करण्याच्या रितीरिवाजांचे पालन आजही मोठया प्रमाणावर केल्यामुळे व्यक्तीच्या मनातील जातीएकतेची भावना दृढ होते. अजूनही विभिन्न जातीगटांमधील परेपरेनुसार निश्चित झालेल्या व्यवसाय करणाऱ्यांची संख्या फारशी कमी झालेली नाही. समान व्यवसायामुळे जातीसंबंधाचे रक्षण केले गेले.

६. **जलद वाहतुकीची साधने** :— तालुका, जिल्हा, प्रांत, राष्ट्र अशा एकापेक्षा एक मोठया स्तरावर जातींचे मेळावे, सभा—संमेलने आयोजित करणे शक्य झाले आहे. जलद वाहतुकीची साधने आल्यामुळे जातीसंस्था विघटीत झाली परंतु त्यामुळे जाती—जातीचे संघटन घडविण्यामध्ये सहाय्य देखील झाले आहे हे विसरता येत नाही.

**ब) जातीवादाचे परिणाम :—**

१. **लोकशाही विरोधी** :— समता व बंधुता हा लोकशाही व्यवस्थेचा आधारस्तंभ आहे तर जातीवाद हा श्रेष्ठ—कनिष्ठतेच्या भावनेवर आधारीत आहे. जातीवादात जातीय भावना भडकविलेल्या जातात. त्यामुळे विषमता वाढीस लागते. जातीवादामुळे लोकशाहीचे मुलभूत तत्व डावलले जाते.

२. **विकासामध्ये बाधक** :— कौशल्य व गुणवत्ता हे औद्योगिक विकासाचे आधारस्तंभ खिळखिळे करून टाकण्याचे काम जातीवाद करतो. कमी किंवा फारशी गुणवत्ता नसणाऱ्यांना शासकीय किंवा खाजगी संघटनेत प्रवेश मिळाला की या संघटनांची कार्यक्षमता तर कमी होते त्याबरोबरच संघटनांची प्रगती देखील मंदावते.

३. **राष्ट्रविकासात बाधा** :— प्रत्येक जातीगटाच्या संकुचित व स्वार्थी भावनेमुळे राष्ट्रविकासात बाधा निर्माण होते. जातीवादामुळे जातीद्वेष, जातीय स्पर्धा वाढीस लागतात. जातीभेद विसरून राष्ट्रविकासासाठी एकत्रित येणे आवश्यक असते. परंतु जातीप्रेम हे राष्ट्रीय विकासाच्या मार्गात बाधा ठरते.

४. **नितिमत्ता ढासळते** :— जातीप्रेम, स्वजातीगटाची शक्ती यामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्याच जातीची प्रगती व्हावी यासाठी चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही मार्गाचा

अवलंब करीत असते. अन्य जातीय गटांबाबतच्या द्वेष भावनेमुळे व्यक्तीचे नैतिक अध:पतन होते.

**क) जातीवादावरील उपाययोजना** :—

१. **वैज्ञानिक दृष्टिकोन** :— मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होईल. ते राष्ट्रीयतेची भावना स्वीकारतील, बुध्दिप्रामाण्यवादाला महत्व देतील अशी शिक्षणप्रणाली निर्माण केल्यास योग्य वयात मुलांच्या मनातून जातीगटाबाबतच्या अभिमानाच्या भावना गळून पडतील.

२. **कायदेशीर उपाययोजना** :— कायदेशीर उपाययोजना प्रभावी आणि यशस्वी होण्यासाठी लोकमत निर्माण केल्यास जातीवादाचे उच्चाटन शक्य आहे. अशावेळी जातीवादाचा प्रसार करणाऱ्यांवर दंडात्मक स्वरूपाची कार्यवाही सरकार करू शकते.

३. **आंतरजातीय विवाह** :— भारतात केंद्र व राज्य सरकारकडून आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना विशेष प्रकारचे आर्थिक सहाय्य केले जाते. परंतू अद्यापही आंतरजातीय विवाहाच्या संख्येत वाढ झाली नाही.

४. **आर्थिक विषमता कमी करणे** :— समान आर्थिक स्तरावर असणाऱ्या कुटुंबामध्ये आणि समूहामध्ये आंतरक्रियांचे प्रमाण अधिक असते. म्हणून कनिष्ठ जातींच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करणे हा जातीय विषमता कमी करण्याचा एक प्रभावी उपाय आहे.

५. **मिळून—मिसळून काम करणे** :— विभिन्न जातीगटाच्या सदस्यांनी मिळून—मिसळून कामे केल्यास त्यांच्या मनातील जातीवादाच्या भावनेची तिव्रता कमी होऊ शकते. संकुचितपणाच्या भावना गळून पडू शकतात. औद्योगिक विकास हा विभिन्न जातीगटांमधील सामाजिक दुरत्व कमी करण्यास सहाय्यभूत ठरू शकतो.

६. **अनुदानात कपात** :— जातीवादांवर आधारीत शिक्षण संस्थाच्या अनुदानात कपात केल्यास जातीवादाला ओहोटी लागण्यास फारसा वेळ लागणार नाही.

**प्र.क्र.८ :— वांशिक संघर्ष या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करून आसाम व ईशान्य भारतातील वांशिक चळवळ आणि आदिवासी राज्याच्या निर्मीतीचे विश्लेषण करा?**

उत्तर :— जगातील सर्व प्रमुख वांशिक गटाचे लोक भारतात असल्यामुळे भिन्न वंशियांचे मिश्रण झाले आहे. नाक, कान, डोळयांचा आकार, चेहऱ्याची ठेवण ादी

शारीरिक लक्षणांच्या आधारे आसाम आणि ईशान्येकडील राज्ये हया भागात मंगोलाइड वंशाचे लोक राहतात. देवदेवता, उपासना, पध्दती, सणवार, पोषाख पध्दती, बोलीभाषा, नृत्यपध्दती आणि शारीरिक लक्षणे आदींबाबत, विविधता असणारे वांशिक गट आसाम व ईशान्य भारतात आहेत. त्या परिसरातील आर्थिक संसाधने, राजकीय सत्तापदे व भूप्रदेशावर स्वामित्व आदी कारणांसाठी विभिन्न वांशिक गटामध्ये संघर्ष निर्माण होतो. यालाच वांशिक संघर्ष असे म्हणतात. आसाम आणि ईशान्य भारतातील वांशिक संघर्ष ही राजकीय, आर्थिक, सामाजिक अशी बहुस्तरीय समस्या आहे. तिचा राजकीय संबंध हा प्रमुख्याने आदिवासी राज्याचा निर्मितीशी आहे.

**अ) आसाम व ईशान्य भारतातील वांशिक चळवळ आणि आदिवासी राज्याची निर्मिती** :—

ईशान्य भारतात एकूण ७ राज्ये आहेत. आसाम, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, मिझोरम, नागालॅंड आणि अरूणाचल प्रदेश, मध्य व उत्तर भारतातील झारखंड आणि उत्तराखंड या तीनही घटकराज्यांच्या निर्मितीसाठी संस्था व संघटना स्थापन झाल्या. बंद, घेराव, मोर्चे, आंदोलने हे सर्व प्रकार झाले. राजकीय मतभेद विसरून आणि पक्षनिष्ठा बाजूला ठेवून लोक एकत्र आले. 'सर्व राजकीय पक्षांची मागणी' अशा सर्वपक्षीय स्वरूपामुळेच तीन घटकराज्ये निर्माण होऊ शकली.

**ब) ईशान्य भारतात राज्य निर्मितीच्या चळवळीचे केंद्र आदिवासी होण्याची कारणे** :—

१. **बोलीभाषेकडे दुर्लक्ष** :— ईशान्य भारतात महाभारतातील 'किराट' हे मंगोलाइड वांशिक गटाचे मूळ कुळ होय असे मानले जाते. भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आल्यानंतर वृत्तपत्रे, मासिके, ग्रंथ, साहित्य आदींच्या निर्मितीमुळे प्रादेशिक स्तरावरच्या भाषा समृध्द झाल्या. परंतु आदिवासींच्या बोलीभाषांची जपणूक न केल्यामुळे आदिवासी लोक व त्यांचे नेते दुखावल्या गेले. त्यामुळे त्यांच्यामध्ये राजकीय स्वायत्ततेची आकांक्षा पूर्वीपेक्षाही अधिक तीव्र झाली.

२. **आर्थिक विकासाची मंदगती** :— भारताच्या अन्य भागांप्रमाणेच आसाम राज्यातही विकासाची प्रक्रिया सुरू झाली. परंतु विकास कार्यक्रमावर करोडो रूपये खर्च होऊनही त्याचे लाभ आदिवासींपर्यंत पोहचले नाहीत. तेथील विकास योजना आजही पूर्णत:

केंद्राकडून मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यावर अवलंबून असतात. त्यामुळे राजकीय स्वायत्तेची मागणी तीव्र झाली.

३. **असंतोषाची निर्मिती** :— ब्रिटिशांच्या नियंत्रणामुळे असंतोष वाढलेल्या आदिवासींनी १८७८ मध्ये ब्रिटीश सत्तेविरूध्द केलेल्या उठावात अपयश आले. लष्करी विजय मिळविला असतांनाही ब्रिटीशांनी नागा आदिवासी टोळींच्या प्रमुखाशी वाटाघाटी केल्या. व्यापारी वर्ग सोडून अन्य लोकांना देण्यात यावी, असे त्या वाटाघाटीत ठरले.

४. **ब्रिटीश शासनाचे धोरण** :— गव्हर्नर सोडून अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला ईशान्य भारताच्या पर्वतीय प्रदेशातील कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे या प्रदेशात राहणाऱ्या आदिवासींना स्थानिक कारभारांबाबत जवळ जवळ स्वायत्तता प्राप्त झाली. आदिवासी प्रदेशात आहे ती परिस्थिती जशीच्या तशी कायम ठेवणे आपल्या शासनाचे धोरण असल्याचे ब्रिटीशांनी स्पष्ट केले होते.

५. **मिशनऱ्यांचा हस्तक्षेप** :— शिक्षण व आरोग्याच्या सोयी पुरविल्यामुळे ईशान्य भारतातील धर्मांतरीत झालेल्या ख्रिश्चन आदिवासींमध्ये ते इतरांपेक्षा वेगळे असल्याची भावनाही ख्रिश्चन मिशनऱ्यांनी वाढीस लावली. भारतीय संविधानाच्या सहाव्या परिशिष्टात आदिवासी प्रदेशाच्या कारभारासंबंधी काही विशेष तरतुदी करण्यात आल्या. असे असूनही ईशान्य भारतातील आदिवासींची आदिवासी राज्य निर्माण करण्यासंबंधीची राजकीय आकांक्षा थोडीही कमी झाली नाही.

६. **घटकराज्याच्या दर्जाची मागणी** :— १९६३ मध्ये केंद्रशासित प्रदेश असा दर्जा असणाऱ्या मणिपुर व त्रिपुरांमधील आदिवासींनी घटक राज्याचा दर्जा मिळावा अशी मागणी केल्यामुळे १९७२ आणि १९८६ मध्ये मिझोराम हे दोन नविन घटकराज्य निर्माण झाले. अशाप्रकारे १९४७ नंतर विशाल भूप्रदेश असणाऱ्या आसाम राज्याचे वारंवार विभाजन होऊन त्या भागात आसामसह एकूण सात घटकराज्ये अस्तित्वात आली.

**प्र.क्र. ९ :— भारतीय समाज जीवनात स्त्री पुरूष समानता तपासून पाहण्याचे निकष स्पष्ट करा? भारतीय समाजात स्त्रीचे स्थान व अधिकार.**

उत्तर :— **अ) शिक्षण :—**

१. **साक्षरतेबाबत अद्यापही स्त्रीया माघारलेल्या** :— प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन अशा सर्व स्तरांवरील शिक्षणात मुलांपेक्षा मुलींच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे. १०० पदवीधारकांमध्ये मुलींची संख्या १८ पेक्षा अद्यापही जास्त झालेली नाही. याचा अर्थ स्त्री पुरूष समानतेची स्थिती अद्यापही निर्माण झाली नाही.

२. **पितृसत्ताक कुटुंब पध्दती** :— पितृसत्ताक समाजात कन्या हे परक्याचे धन आहे. मुलींचे शिक्षण हा अनावश्यक खर्च समजला जातो. कन्या भारभूत समजल्या जातात. मुलींना जास्त विद्याविभूषित होण्याची मुभा दिली जात नाही कारण तेवढयाच पात्रतेचा वर शोधण्याचे कार्य पालकांसाठी अवघड असते. त्यामुळे पितृसत्ताक समाजात मुलींपेक्षा मुलांना अधिक महत्व दिले जाते. म्हणून मुलांसारखी शिक्षण घेण्याची समान संधी मिळत नाही.

३. **दारिद्रेरेषेखालील जीवन** :— ग्रामीण भागात स्त्रिया शेतावर कामाला जातात, तेव्हा त्यांच्या मुलींनी आपल्या लहान भावंडांना सांभाळावे, पाणी भरावे, इंधन व चारा आणावा अशी अपेक्षा असते. त्यामुळे शाळांमधील त्यांच्या गळतीचे प्रमाणही वाढते. दारिद्रेरेषेखाली राहणाऱ्या लोकांमध्ये मुलींच्या शिक्षणाचे महत्व निर्माण न झाल्यामुळे त्यांचे बालपण फार लवकर संपते.

**ब) आर्थिक क्रियांमधील स्त्रियांचा सहभाग** :—

१. **आदिवासी स्त्रियांचा सहभाग** :— आदिवासी कुटुंबामधील स्त्रिया मोठया प्रमाणावर आर्थिक क्रियांमध्ये सहभागी होतात. त्या आर्थिक दृष्टीने आत्मनिर्भर किंवा स्वावलंबी असतात. पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र यासारख्या आर्थिक सुबत्ता असणाऱ्या भागात महिला कामगारांची संख्या बरीच आहे.

२. **संघटित किंवा असंघटित क्षेत्रामधील स्त्रियांचा सहभाग** :— रेल्वे महामंडळ, बँका, व्यापारी उद्योग—प्रतिष्ठान यासारख्या संघटित क्षेत्रात नोकरी करणाऱ्या महिलांना पुरूषांच्या बरोबरीने सर्व लाभ समान स्वरूपात मिळतात. पुरूष कामगारांपेक्षा महिला कामगार कमी मजुरीवर काम करावयास तयार असल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये रोजंदारीच्या तत्वावर स्त्री कामगारांची संख्या वाढत असल्याचे दिसून येते. असंघटित

क्षेत्रात दलालांचे प्रस्थ असल्यामुळे लैंगिक व आर्थिक शोषणांचा जाच स्त्री कामगारांना सहन करावा लागतो, हे भारतीय समाजामधील वास्तव आहे.

**३. <u>बालिका कामगार</u>** :— ५ ते ८ वर्षांच्या मुली आपापल्या कुटुंबात लहान सहान कामे करीत असतात. हे दृश्य मुख्यत्वे ग्रामीण आणि नागरी क्षेत्रातील गोरगरीबांच्या वस्त्यांमध्ये आढळून येते. अनेक उद्योगांमध्ये बाल कामगारांना पाठीचा कणा मोडेल असे काम १० ते १२ तास करावे लागते. बालिका कामगार वयात येताच त्या लैंगिक शोषणाच्या अत्याचाराला बळी पडतात.

**४. <u>व्यवसायांमधील स्त्रियांचा सहभाग</u>** :— ६० वर्षानंतरही सर्व व्यवसायांमध्ये स्त्री पुरूषांच्या संख्येबाबत विषम स्थिती असल्याचे आढळून येते. स्वातंत्र्योत्तर काळात विभिन्न व्यवसायांमध्ये महिलांची संख्या हळूहळू वाढत आहे. तथापि कोणत्याही व्यवसायात स्त्री पुरूषांची संख्या जवळपास सारखी किंवा बरोबरीची नाही म्हणून कायद्याने दिला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रियांना पुरूषांचा दर्जा प्राप्त झालेला नाही असा निष्कर्ष काढावा लागतो.

**<u>क) स्त्रियांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी</u>** :—

भारतात स्त्रियांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार कायद्याने दिला असला तरीही सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याबाबत अद्यापही स्त्री—पुरूष समतेची स्थिती निर्माण झालेली नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ७० वर्षांच्या कालखंडात स्त्री—पुरूष समानतेचे तत्व शासकीय कागदोपत्री आहे. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात वा दैनंदिन समाज जीवनात ते अद्यापही खऱ्या अर्थाने रूजू झाले नाही. स्त्री पुरूष समानता निर्माण करण्याचे स्वप्न अद्यापही साकार व्हायचे आहे.

**<u>प्र.क्र. १० :— घरगुती हिंसाचाराचा अर्थ सांगून घरगुती हिंसाचाराची कारणे, परिणाम व उपाय लिहा? स्त्रिया घरगुती हिंसाचाराच्या शिकार.</u>**

उत्तर :— प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मार्गाचा अवलंब करून आपणास हवी असणारी गोष्ट दुसऱ्याची इच्छा नसतांना तिच्याजवळून बळजबरीने हिसकावून घेण्यासाठी केलेले कृत्य म्हणजे हिंसाचार होय. तर कुटुंबातील व्यक्तीशी निगडीत शारीरिक, मानसिक आणि आर्थिक गैरवागणुकीस कौटुंबिक हिंसाचार म्हणतात. कुटुंब सदस्यांच्या हालचालींवर

निर्बंध घालणे किंवा त्याला वाळीत टाकणे, प्रत्यक्ष शारीरिक मारहाण करणे, लैंगिकदृष्टया अवहेलनात्मक वर्तन, कुटुंब सदस्याला आर्थिक दृष्टया वंचित ठेवणे तसेच बेकायदेशीर हुंडयाच्या मागणीसाठी केलेला छळ म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय.

**अ) घरगुती हिंसाचाराची कारणे :— (अन्याय सहन करण्याची मानसिकता)**

१. **पितृसत्ताक संस्कृतिचा वारसा** :— पितृसत्ताक कुटुंब पध्दतीत घरातला हिंसाचार चव्हाटयावर आणू नये म्हणून मुकाटयाने सहन करणाऱ्या महिलांची संख्या फार मोठी आहे. पावसानं मारलं अन् नवऱ्यानं झोडलं तर तक्रार कोणाकडं करायची. नवरा—बायकोच्या भांडणात ब्रम्हदेवानेही पडू नये. कनिष्ठ गरीब वर्गात नवरा—बायकोच्या शारीरिक मारपिटीतून पितृसत्ताक विचारपध्दती व्यक्त होते, तर श्रीमंत आणि मध्यमवर्गात नवऱ्याकडून बायकोच्या संदर्भात काही वेळा वापरली जाणारी अपमानजनक भाषा आणि मानसिक प्रतारणा या रूपात पितृसत्ताक विचारपध्दती व्यक्त होते.

२. **अधिकारांबाबत जाणीव नसणे** :— निरक्षर आणि अल्पशिक्षीत स्त्रियांना आपल्या अधिकारांबाबत काही जाणीवच नसते. नवऱ्याने मारणे किंवा शिवीगाळ करणे यात काही गैर आहे असे देखील त्यांना वाटत नाही. तो नवऱ्याचा अधिकार आहे असेच मानले जाते. भारतात पुरूषांपेक्षा स्त्रियांमधील साक्षरता दर अद्यापही कमी आहे.

३. **मद्यपानाचे निमित्त** :— गरीबी किंवा दारिद्रय, कामाचा ताण, आजारपण यासारखे कोणतेही निमित्य मद्यपान करण्यासाठी पुरूषांना पुरेसे असते. घरगुती हिंसाचाराच्या अनेक घटना नशेच्या अवस्थेत घडत असल्याचे सहजपणे कोणाच्याही अनुभवास येते.

४. **आर्थिकदृष्टया आत्मनिर्भरतेचा अभाव** :— आर्थिक परावलंबित्वामुळे अपमानाचा प्रतिकार करण्यासाठी लागणारे मनोधैर्य स्त्रियांमध्ये निर्माण होत नाही. त्यांच्या आर्थिक परावलंबित्वाचा फायदा पुरूष वर्गाद्वारे घेतला जातो. आजही आर्थिकदृष्टया आत्मनिर्भर विवाहीत स्त्रियांची संख्या भारतात फारच कमी आहे.

५. **कर्तव्याची पूर्ती हेच स्त्रीजीवनाचे प्रयोजन** :— अधिकार मागण्यापेक्षा कर्तव्याची पूर्ती करणे हेच स्त्रीजीवनाचे मुख्य प्रयोजन असल्याचे त्यांच्या मनावर सतत बिंबविले जाते. स्त्रियांमध्ये हक्कासंबंधी फारशी जागृती निर्माण न होण्याचे एक मुख्य कारण सदोष समाजीकरण हे आहे.

६. **स्त्रीहिताच्या विरोधी प्रथा** :— हुंडा पध्दती, विवाहीत स्त्रीने डोक्यावर पदर घेण्याची पध्दती, बालविवाह पध्दती, विधवांच्या पूनर्विवाहावर बंदी या सर्व प्रथा—परंपरांचा जनमानसावर प्रचंड पगडा असून हे घरगुती हिंसाचाराचे एक प्रमुख कारण आहे.

**ब) घरगुती हिंसाचाराचे परिणाम :—**

१. **स्त्रीयांच्या आत्महत्या** :— विवाहासाठी द्याव्या लागणाऱ्या हुंडयाचा भार आपल्या गरीबीच्या स्थितीत जीवन जगणाऱ्या आई—वडिलांवर पडू नये या कारणासाठी तरूण मुलींनी आत्महत्या केल्या आहेत. घरगुती हिंसाचाराचा अतिरेक झाल्याने किंवा अपमानास्पद वागणूक मिळाल्याने स्त्रियांनी आत्महत्या केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

२. **स्त्रीलिंगी गर्भाची हत्या** :— गर्भजल परीक्षणात गर्भ स्त्रीलिंगी म्हणजे मुलीचा असल्यास ताबडतोब गर्भपात केला जातो. दरवर्षी लाखो बालिकांचा जन्म होण्यापूर्वीच त्यांना मारून टाकले जाते. त्यामुळे दरहजारी पुरूषांमागे स्त्रियांच्या प्रमाणात घट झाली असल्याचेही दिसून येते.

३. **बलात्काराचे वाढते प्रमाण** :— पतीबरोबर संसार करण्यास तयार नसलेल्या स्त्रियांच्या संख्येत वाढ होत आहे. ही सर्वांनीच चिंता करण्यासारखी बाब आहे. विधवांवरील बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. स्त्रीवादी संघटना आणि अभ्यासकांच्या मते, ५० ते ७० टक्के महिला घरगुती हिंसाचाराच्या शिकार होत आहेत.

४. **वधुला होणारी मारहाण** :— परपुरूषांशी बोलणे, घरी उशिरा येणे, स्वयंपाक बिघडणे, अन्य पुरूषांशी संबंध असल्याचा संशय, लैंगिक संबंधांना नकार, पैसे किंवा इस्टेटीतील वाटा देण्यास नकार, घराबाहेर झालेल्या अपमानाचा राग काढणे यासारख्या कारणांमुळे पती, सासू, सासरे, दिर, नणंद यांच्याद्वारे वधूला मारहाण केली जाते.

५. **डिप्रेशन** :— स्त्रियांचा पदोपदी होणारा अपमान, त्यांनी केलेल्या कोणत्याही कामाचे जाणूनबुजून चीज न करणे, त्यांना कोणत्याही प्रकारच्या विकासाच्या आणि मनोरंजनाच्या संधी मिळू न देणे यासारख्या कारणांमुळे स्त्रियांची जीवन जगण्याची उमेदच कमी होते. यामुळे स्त्रियांच्या वाटयास येणाऱ्या नैराश्येतून त्या मनोरूग्ण होतात.

६. **विश्वासाला तडा जातो** :— बालवयात झालेल्या लैंगिक अत्याचारातून त्यांच्या मनामध्ये लैंगिक संबंधाबाबतची घृणा व भिती दडून बसते. कुटुंबीय, नातेवाईक आणि घरातील नोकरचाकर यांच्याकडून झालेल्या अत्याचाराची वाच्यता मुली करीत नाही. काही वेळा मुलींच्या चारित्र्याला कलंक लागू नये या उद्‌देशाने आई—वडील ती गोष्ट लपवून ठेवतात. त्यामुळे त्या मनाने खचून जातात. त्यांचा कोणत्याच नातेसंबंधावर विश्वास राहत नाही.

७. **अपंगत्व** :— महिलेवर केलेल्या बळजबरीमुळे तिला शारीरिक इजा व मानसिक आघात दोन्हीही सहन करावे लागतात. काही वेळा भयंकर प्रमाणातील शारीरिक मारपिटीतून निर्माण झालेले अपंगत्व जन्मभर उराशी बाळगत त्यांना जगावे लागते.

**क) घरगुती हिंसा कमी करण्यासाठीचे उपाय** :—

१. **महिलांनी संघटित व्हावे** :— घरगुती हिंसा कमी करण्यासाठीचा एक उपाय म्हणून महिलांनी संघटित होणे आणि त्यांच्या संघटनेचा दबदबा निर्माण होणे आवश्यक आहे. या दबावामुळे घरगुती हिंसेचे कृत्य करणाऱ्याच्या मनावर दडपण येऊन त्यामुळे तो अपराधी कृत्य करण्यापासून परावृत्त होवू शकतो.

२. **आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण** :— बांगला देशासारख्या अतिदारिद्रय असणाऱ्या देशात बचत गटासारख्या कार्यातूनही स्त्रियांमध्ये आर्थिक दृष्टीने आत्मनिर्भरता निर्माण होऊ शकते हे सिध्द झाले आहे. हे लक्षात घेऊनच प्रत्येक स्त्रीने आर्थिकदृष्टया आत्मनिर्भर झाले पाहीजे.

३. **स्त्री शिक्षणाला प्राधान्य** :— भारतात पुरूषांपेक्षा स्त्रियांमधील साक्षरता दर अद्यापही कमी आहे. महिलांमध्ये त्यांच्या अधिकारांबाबतची जाणीव—जागृती ही केवळ शिक्षणातूनच निर्माण होऊ शकते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष गिरीजा व्यास

यांनी ३७ टक्के भारतीय महिला घरगुती हिंसाचाराच्या शिकार ठरतात असे मान्य केले आहे. म्हणून सर्व स्तरांवरील स्त्री शिक्षणात वाढ किंवा स्त्री शिक्षणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

४. **कायद्याची कडक अंमलबजावणी** :— घरगुती हिंसाचारापासून संरक्षण देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी २००६ पासून संपूर्ण देशात सुरू झालेली आहे. या कायद्यानुसार फक्त बायकोच नव्हे तर घरातील आई, बहिण, मुलगी, कामवाली मोलकरीण अशी कुठलीही स्त्री किंवा त्यांच्या वतीने अन्य कोणालाही घरगुती हिंसेच्या विरोधात तक्रार दाखल करता येते. या अधिनियमामुळे घरातला हिंसाचार मुकाटयाने सहन करण्याचे दिवस आता संपले आहेत.

५. **योग्य सामाजीकरण** :— आत्मसन्मानाबाबत जागृत असणारी स्त्री आपल्या अधिकारांचे जतन वा रक्षण करण्याबाबत दक्ष असते तसेच ती आपल्या कर्तव्यांची पूर्ती करण्याबाबतही दक्ष असते. त्याकरीता सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून मुलींचा संतुलित व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे आवश्यक आहे.

६. **हिंसेच्या विरोधात कुटुंबाचा हस्तक्षेप** :— हिंसाचार कोण करतो, पिडीत व्यक्ती कोण आहे याची पूर्ण कल्पना कुटुंबातील व्यक्तींना असते. त्यांनी कुटुंबात घडणाऱ्या हिंसेच्या विरोधात हस्तक्षेप करावा. जेणेकरून पिडीत व्यक्ती घरगुती हिंसाचारापासून सुरक्षित राहू शकेल.

७. **स्वत: पिडीत व्यक्तीने विरोध करावा** :— पिडीत व्यक्तीने घरगुती हिंसेला विरोध केलाच पाहिजे. कारण पिडीत व्यक्तीने मुकाटयाने सहन केल्यास त्याच्याकडून होणारा अत्याचार वाढतच जातो.

**प्र.क्र. ११ :— अधिकारहीन लोक या संज्ञेचा अर्थ सांगून अधिकारहीन समूह निर्माण होण्याची कारणे लिहून दुर्लक्षित समूह म्हणून मुस्लिम धर्मीय समूहाचे विश्लेषण करा?**

उत्तर :— दुर्लक्षित किंवा अधिकारहीन लोक या संज्ञेचा अर्थ समाजात काहीही महत्व व अधिकार नसलेला समूह असा होतो. यासाठी तळागाळाचे लोक असाही शब्दप्रयोग मराठी भाषेत केला जातो. तसेच काठावरचे वा किनाऱ्यावरचे लोक असेही संबोधिले जाते. स्त्रिया, जाती व वंश या आधारावरील अल्पसंख्यांक, शारीरिक, मानसिक व

बौध्दीक दृष्टीने विकलांग असणाऱ्या दिव्यांग व्यक्ती, वृध्द किंवा बेरोजगार असणाऱ्या तरूण व्यक्ती धार्मिक दृष्टया अल्पसंख्याकांचा समूह, समलिंगी व्यक्ती, राजकारणात विरोधी असणारी व्यक्ती इत्यादींचा समावेश दुर्लक्षित लोकांच्या समूहात करता येतो.

**अ) अधिकारहीन वा दुर्लक्षित समूह निर्माण होण्याची कारणे :— समूह निर्माण होणे ही एक प्रक्रिया आहे.**

१. **अलिप्तता** :— ही प्रक्रिया दुर्लक्षित लोकांना मानवी हक्क प्राप्त होण्यापासून वंचित ठेवते. तसेच मानवी प्रतिष्ठा, समानतेचे तत्व, अन्य समाजघटकाप्रमाणे प्रभावीपणे जीवन जगण्याची संधी मिळण्यापासून दुर्लक्षित लोकांना दूर ठेवते. अल्पसंख्यांक समूहाला बहुसंख्याकांचा समूह त्यांच्या सामाजिक कार्यक्रमात सहभागी होण्याची संधीच देत नसेल तर अल्पसंख्यांकांचा समूह हा एकाकी पडतो. परिणामी त्यांना दुर्लक्षित लोकांचा समूह असे संबोधले जाते.

२. **संकटे** :— महानगरामधील इमारती कोसळून पडणे, महानगरांमध्ये दंगली, आतंकवाद्यांची कृत्ये, आग लागण्याची घटना, महापूर, ढगफुटी, भुकंप यासारख्या विविध प्रकारच्या संकटांमुळे असंख्य लोकांचे जीवन उद्ध्वस्त होते. अनेक व्यक्तींचा मृत्यू होतो. लहान वयातील मुले निराधार होतात. काही व्यक्ती अपंग होतात म्हणून नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे हे देखील अधिकारहीन व्यक्ती व समूह निर्माण होण्याचे एक कारण आहे.

३. **जागतिकीकरण** :— ही प्रक्रिया श्रीमंताला अधिकाधिक श्रीमंत बनविते आणि गरीबाला अधिकाधिक गरीब वा दारिद्र्यात ढकलते. जागतिकीकरण ही प्रक्रिया ‘आहे रे’ आणि ‘नाही रे’ हया दोन गटांतील अंतर वाढविणारी प्रक्रिया आहे. बाजार पेठीय अर्थव्यवस्थेत कोणत्याही प्रकारच्या रोजगार वा आर्थिक उत्पन्न नसणारी व्यक्ती ही तिच्या कुटुंबात दुर्लक्षितच असते.

४. **विकासाची प्रक्रिया** :— खाणी, अवजड उद्योगधंदे, नदयांवरील धरणे, पायाभूत उद्योग व्यवसाय हयांच्या निर्मितीच्या प्रक्रियेला आर्थिक विकासाची प्रक्रिया असे संबोधिले जाते. विस्थापितांचे योग्यप्रकारे पुनर्वसन न झाल्यामुळे त्यांच्यावर अधिकारहीन अवस्थेत जीवन जगण्याची पाळी येते.

**<u>ब) भारतात दुर्लक्षित लोकांचे समूह</u>** :— अनुसूचित जाती, आदिवासी वा अनुसूचित जमाती आणि अन्य मागासवर्गीह हे समूह देखील संख्यात्मकदृष्टया मोठा आकार असणारे दुर्लक्षित लोकांचे समूह आहेत. संख्यात्मक दृष्टया विचार केला, तर स्त्रियांचा समूह हा भारतीय समाजातील सर्वात जास्त मोठा आकार असणाऱ्या दुर्लक्षित लोकांचा समूह आहे. धार्मिक अल्पसंख्यांक समूहांमध्ये संख्यात्मकदृष्टया मोठा आकार असणारा समूह म्हणजे मुस्लीम धर्मियांचा समूह होय. औपचारिक शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षण संस्थांच्या संख्येत वाढ करणे, मदरसांचे औपचारिक आधुनिकीकरण करणे, व्यवसायांचे प्रशिक्षण व कौशल्य, शिक्षणाच्या सोयी निर्माण करणे. मुस्लीम बहुल वस्त्यांमध्ये नागरी सुविधा वाढविण्यावर भर देणे यासारख्या शिफारशी सच्चर समितीने केल्या आहेत. मुस्लीम व्यक्तीला मानवी हक्क मिळवून देणे आणि सामाजिक व आर्थिक व्यवस्थेत सहभागी होण्याच्या संधी मिळवून दिल्याने मुस्लिमधर्मीय समूह अधिकारहीन लोकसमूहातून बाहेर पडू शकतील, असा निष्कर्ष सच्चर समितीच्या शिफारशींच्या आधारे काढता येतो. अमिताभ कुंडू हया समितीने केलेल्या अध्ययनाचे निष्कर्ष मुस्लीमधर्मीय समुदाय अद्यापही वंचिततेने जीवन जगण्याच्या स्थितीतून बाहेर पडला नाही असेच सूचित करतात.

**<u>प्र.क्र. १२ :— असहिष्णूता, दंगली आणि गुन्हयांच्या नियंत्रणासाठीचे उपाय लिहा?</u>**

उत्तर :— दंगली आणि गुन्हयाचा विचार आपण संप्रदाय, जात, वांशिक घटक, स्त्रिया आणि दुर्लक्षित लोक या घटकांच्या संदर्भात केला आहे. भारतीय समाजातील असहिष्णूतेचे अध्ययन आपण जात, धर्म व सांस्कृतिक, वांशिक अशा तीन घटकाच्या संदर्भात केले. या ठिकाणी आपण संपूर्ण भारतीय समाजाच्या संदर्भात असहिष्णूता, दंगली आणि गुन्हयांच्या नियंत्रणासाठीच्या उपायांचा विचार करीत आहोत.

**१) अ) <u>भारताची राष्ट्रीय एकात्मता</u>** :— विनोबा भावे यांच्या मते, ''भारताची महान भूमी हे अनेक सामाजिक समूहांच्या संगमाचे स्थळ आहे.

भिन्न भाषा बोलणारे, भिन्न धर्माचे उपासक, भिन्न जाती—जमातींचे लोक एकत्रित राहत असल्याचे भारतासारखे दृश्य अन्य कोणत्याही देशात दिसत नाही. विविधतेतील एकता हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. विविधता अबाधित ठेवून एकात्मतेचा शोध घेणे

हाच भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचा मार्ग आहे. भारतीय समाज व संस्कृतीच्या जडणघडणीचा पाच हजार वर्षाचा समृध्द असा वारसा आहे. विविधतेतील एकता हे या ऐतिहासिक वारशातील सर्व भारतीयांसाठी समान असे गौरव केंद्र आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय ही चार आधुनिक तत्वे म्हणजे भारतीय लोकांच्या वर्तमानकालीन इच्छा—आकांक्षा होय. या दिशेने राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. तरीही त्यात अपेक्षित असे पूर्ण यश मिळू शकले नाही, हे सत्य मान्य करावे लागते.

**२) ब) राष्ट्रबांधणी** :— राष्ट्र व राष्ट्रीय एकात्मता ही व्यक्तीच्या मनातील निष्ठा आहे. त्याप्रमाणेच राष्ट्रबांधणी ही एक दीर्घसूत्री प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जुन्या अंधश्रध्दांच्या जागी नव्या लोकशाही श्रध्दांची पायाभरणी करण्यावर भर दिला जातो. आजच्या काळात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या आदेशांवर वा मूल्यांवर आधारित असणारी समाजरचना निर्माण करणे म्हणजे राष्ट्रबांधणी होय. १) **सामाजिक पैलू** :— समाजहितासाठी कालविसंगत व अयोग्य अशा रूढी, प्रथा व परंपरांचे उच्चाटन होणे हे सामाजिक ऐक्यभाव निर्माण होण्याच्या दृष्टीने आवश्यक ठरते. तसेच संकटकाळात सोयी—सवलती उपलब्ध असणे आवश्यक ठरते. २) **शैक्षणिक पैलू** :— शिक्षण आणि विभिन्न स्तरावरील प्रबोधनातूनच लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, उदारमतवाद व बुध्दिप्रामाण्यवाद यांचा विकास होत असतो. अधिकारांच्या मागणी सोबतच कर्तव्यपूर्तीसाठी तत्पर असणारा जबाबदार नागरिक शिक्षणातूनच घडू शकतो. म्हणूनच राष्ट्रबांधणीच्या प्रक्रियेची शैक्षणिक बाजू महत्वपूर्ण ठरते. ३) **आर्थिक पैलू** :— किमान जीवनावश्यक गरजा पूर्ण करता येतील अशी उत्पन्नाची साधने सर्वांसाठी उपलब्ध झाली की, दारिद्रयाच्या समस्येचे मोठया प्रमाणात निवारण होते, कोणत्याही समाजात श्रीमंत व गरीब असे दोन वर्ग राहणारच त्यामुळे आर्थिक विकासाबाबतचे प्रादेशिक असंतुलन हे राष्ट्रबांधणीच्या प्रक्रियेत अडसर ठरते. ४) **राजकीय पैलू** :— राष्ट्रबांधणीसाठी भ्रष्टाचाराच्या समस्येचे निराकरण होणे तसेच कार्यक्षम व जबाबदार प्रशासकीय यंत्रणा निर्माण होणे आवश्यक ठरते. विचार, वर्तनकृती व आचरणातून

सर्वसामान्य लोकांना प्रेरीत करण्याची क्षमता असणारे नेतृत्व हेच राष्ट्रबांधणीच्या प्रक्रियेला सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त करून देऊ शकते.

**३) क) राष्ट्रीय अस्मिता** :– भारतीय समाजात भाषा, धर्म, वंश, जात आदींबाबत विविधता आहे. त्यामुळे भारतीय नागरिकांमध्ये राष्ट्रीय अस्मिता कधी व कोणत्या मार्गाने निर्माण करावी, या आव्हानाचा सामना स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजाला करावा लागत आहे. धर्म, भाषा, वंश वा जाती या निष्ठा जेव्हा राष्ट्रनिष्ठेपेक्षा वरचढ होतात तेव्हा त्या निष्ठा राष्ट्रीय ऐक्याला बाधक ठरतात. धर्म, भाषा, प्रदेश, वंश किंवा जात यासंबंधीच्या निष्ठांपैकी राष्ट्रनिष्ठेबाबत सर्वांच्या मनात सारखेपणा किंवा एकरूपता निर्माण करणे, असा राष्ट्रीय अस्मिता या संज्ञेचा अर्थ आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या चार मूल्यांबाबत नागरिकांमध्ये निष्ठा निर्माण झाल्या पाहिजे. भारताच्या नागरिकांमध्ये अन्य निष्ठांपेक्षा राष्ट्रनिष्ठा प्रबळ होण्यास किती कालावधी लागेल हे सांगता येत नाही. म्हणून सर्व स्तरावरील सातत्यपूर्ण प्रयत्नांतून नागरिकांमध्ये राष्ट्रीय अस्मितेची निर्मिती होऊ शकते असे म्हणता येईल

# युनिट ४ भ्रष्टाचार

# (Corruption)

**प्र.क्र. १ :— भ्रष्टाचाराचा अर्थ व व्याख्या लिहून भ्रष्टाचाराचे प्रकार व भ्रष्टाचाराच्या पध्दती लिहा?.**

उत्तर :— समाजाच्या दृष्टीने अनैतिक आणि मूल्ये व प्रमाणविरोधी वर्तनव्यवहार म्हणजे भ्रष्टाचार होय. लाचलूचपतीचे कृत्य म्हणजे भ्रष्टाचार होय. लाच घेण्याप्रमाणेच लाच देणे हा देखील कायद्याच्या दृष्टीने गुन्हा आहे. व्यक्तिगत स्वरूपाचे लाभ मिळविण्याच्या हेतून पदधारकाने केलेला आपल्या सत्तेचा दुरूपयोग म्हणजे भ्रष्टाचार होय.

**व्याख्या** :— १) संथानम यांच्या मते :— ''एखाद्या शासकीय पदाचा आणि सत्तेचा दुरूपयोग स्वार्थ साधण्यासाठी करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

२) ''औपचारीक कायदे व नियमांना डावलून स्वार्थ साधण्याच्या हेतूने सत्तेचा उपयोग करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

म्हणून समाजशास्त्रीय दृष्टीने भ्रष्टाचार म्हणजे सामाजिक मूल्ये व प्रमाणकांनी निश्चित केलेल्या मर्यादांचे उल्लंघन करणारे विपथगामी वर्तन होय.

**अ) भ्रष्टाचाराचे प्रकार** :—

१. **शासकीय भ्रष्टाचार** :— गृह खाते, अर्थ खाते, शिक्षण खाते अशा विभिन्न खात्यांची रचना म्हणजे देशातील प्रशासनासाठीची रचना होय. जिल्हा, तालुका व गाव तसेच संपूर्ण देशभर पसरलेल्या प्रशासकीय संघटनेतील भ्रष्टाचाराला प्रशासकीय भ्रष्टाचार असे संबोधिले जाते. लाचलुचपत व वशिलेबाजी चा समावेश या प्रकारात होतो.

२. **राजकीय भ्रष्टाचार** :— लाचलुचपत, पक्षपात, वशिलेबाजी, फसवणूक, लबाडी, खंडणी, आश्रय, अफरातफर या सर्व प्रकारांचा समावेश या प्रकारात केला जातो. जगातील सर्व देशांमध्ये राजकीय भ्रष्टाचार हा प्रकार आढळून येतो. सत्तेचा उपयोग वा दुरूपयोग म्हणजे राजकीय भ्रष्टाचार होय.

३. **विभिन्न व्यवसायामधील भ्रष्टाचार** :— नकली औषधे तयार करणे, तुपामध्ये जनावराच्या चरबीचे मिश्रण करणे, धान्यामध्ये माती, रेती, दगड यांचे मिश्रण करणे, दुध व अन्य विविध उपयोगी वस्तुंमध्ये भेसळ करणे म्हणजे व्यावसायिक भ्रष्टाचार होय.

प्रमाणाच्या आधारावर भ्रष्टाचाराचे चार प्रकार पाडले जातात.

**अ—१) मोठया स्वरूपाचे भ्रष्टाचार** :— २ जी घोटाळा, कोळशाच्या खाणींशी निगडीत घोटाळा यासारख्या अनेक घोटाळयांचा संबंध हजारो कोटी रूपयांशी आहे. शासन व्यवस्थेतील उच्च पदधारकांचा संबंध धोरण व निर्णय निर्मितीशी असतो. उच्च पदधारकांच्या धोरण निर्मितीतून निर्माण होणाऱ्या भ्रष्टाचाराला मोठया स्वरूपाचे भ्रष्टाचार असे म्हटले जाते.

**अ—२) दैनंदिन व्यवहारातील भ्रष्टाचार** :— नोकरशाही संघटनेतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपासून शिपायापर्यंत सर्व सनदी सेवकांनी केलेल्या तसेच धोरणाच्या अंमलबजावणीशी संबंधित असणाऱ्या राजकीय नेत्यांकडून घडणाऱ्या भ्रष्टाचारांना दैनंदिन किंवा किरकोळ भ्रष्टाचार असेच संबोधिले जाते. देशामधील दैनंदिन व्यवहारात घडणारे आणि उजेडात येणारे भ्रष्टाचार म्हणजे किरकोळ भ्रष्टाचार होय.

**अ—३) अधूनमधून घडणारे भ्रष्टाचार** :— हे भ्रष्टाचार अधूनमधून घडणारे असल्यामुळे नोकरशाही संघटना व अन्य संस्था तसेच अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करणाऱ्या यंत्रणेस धोका नसणे, असा क्वचित घडणारे भ्रष्टाचार या संज्ञेचा सैध्दांतिक अर्थ आहे.

**अ—४) पध्दतीतून निर्माण झालेले भ्रष्टाचार** :— संस्था वा संघटनेच्या रचनेतील दुबळेपणात निर्माण होणाऱ्या भ्रष्टाचाराला पध्दतशीर भ्रष्टाचार असे म्हणतात. प्रत्येक देशामध्ये राजकीय, आर्थिक व सामाजिक व्यवस्थांमध्ये काही भ्रष्ट व्यक्ती व भ्रष्ट व्यक्तींची मंडळे कार्यरत असतात. काही लोक आपली कामे करून घेण्यासाठी त्यांनी केलेल्या मागणीनुसार लाचलूचपत देतात. त्याला पध्दतीतून निर्माण झालेले भ्रष्टाचार असे संबोधिले जाते.

**ब) भ्रष्टाचाराच्या पध्दती** :—

१. **वशिलेबाजी** :— योग्य व न्यायपूर्ण बाजू असणाऱ्याला डावलून गैर किंवा अयोग्य बाजू असणाऱ्याचा फायदा करून देणे असा वशिलेबाजी या भ्रष्टाचाराच्या प्रकाराचा अर्थ आहे. आपल्या पक्षाचे प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या व पक्षनिष्ठा असणाऱ्या कार्यकर्त्यांची न्यायपूर्ण बाजू न घेता काही नेते आपल्या चेल्याचपाटयांना पक्षाची अधिकृत उमेदवारी मिळवून देतात. वशिलेबाजीच्या या प्रकारातून योग्य व लायक व्यक्तीवर अन्याय होतो.

२. **अफरातफर** :— शिक्षण संस्था, सार्वजनिक वाचनालय, धार्मिक संस्था यासारख्या सार्वजनिक संस्थांच्या खजिन्यातील पैशाचा किंवा त्यांच्या मालमत्तेचा अपहार करणे हा देखील भ्रष्टाचाराचा एक प्रकार आहे. दुसऱ्याचा पैसा आपल्या उपयोगासाठी वापरणे असा अफरातफर या शब्दाचा अर्थ आहे.

३. **आश्रय** :— निवडणूक कार्यात मदत करणाऱ्या पक्ष कार्यकर्त्यांना रेशनचे किंवा दारूचे दुकान चालविण्यासाठीचे लायसन्स मिळवून देणे राजकीय नेत्यांना सहज शक्य असते. पक्षाची संघटना मजबूत करण्यासाठी किंवा पक्षाचे हजारो कार्यकर्ते सांभाळून ठेवण्यासाठी राजकीय आश्रय हा प्रकार आवश्यक आहे असे म्हटले जाते. राजकीय आश्रय मिळवून देण्याचे प्रकार लोकशाही व्यवस्थेत सर्वत्र सुरू असतात. चुकीची बाजू असणाऱ्याला आधार देणे किंवा उत्तेजन देण्याचा आश्रय हा भ्रष्टाचाराचाच एक प्रकार आहे.

४. **घोटाळे** :— अलीकडच्या काळात तर प्रामाणिक राजकारणी फारच दुर्मिळ झाले आहेत. भारतातच नव्हे तर जगातील सर्व देशांमध्ये भ्रष्ट राजकारणी लोकांची संख्या प्रचंड आहे. माजी केंद्रीय मंत्री सुखराम, तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जयललिता यांनी जमविलेल्या प्रचंड संपत्तीची प्रकरणे उजेडात आलीत. परंतु कोणत्याही बडया राजकारणी व्यक्तीला भ्रष्टाचाराबद्दल शिक्षा झाल्याचे उदाहरण अपवादाने देखील आढळत नाही. यामुळे घोटाळयात गुंतलेले राजकारणी उजळमाथ्याने मिरवू लागतात.

५. **अधिकारांचा दुरूपयोग** :— विवेकाधीन अधिकाराचा उपयोग स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी केला जात असेल तर तो भ्रष्टाचार ठरतो. कुटुंब सदस्य नाते गोत्यातील

सदस्य, मित्रमंडळाचे सदस्य आदींना फायदा मिळवून देण्यासाठी पदधारकाने अधिकाराचा दुरूपयोग केल्याची अनेक उदाहरणे आजवर घडली आहेत. विवेकाधीन अधिकारांचा दुरूपयोग हे भ्रष्टाचाराचे रूप सर्वच देशांमध्ये आढळून येते.

६. **पक्षपात** :— प्रशासनातील अनेक वरिष्ठ अधिकारी आपल्या पदाचा किंवा सत्तेचा उपयोग नातेवाईकांना लाभ मिळवून देण्यासाठी करीत असल्याचा अनुभव सर्वसामान्यांना येतो. धर्म, जात व प्रामुख्याने नातेसंबंध या आधारावर लाभ मिळवून देण्यासाठी पदाचा किंवा सत्तेचा उपयोग केला जात असेल तर त्यातून पक्षपात हा भ्रष्टाचाराचा प्रकार निर्माण होतो.

७. **खंडणी** :— आधुनिक काळात मोबाईल फोनवर फोटो काढणे, व्हिडीयो तयार करणे, फेसबुक, ट्विटर यासारख्या सोशल मिडीयावर दुसऱ्याची बदनामी होईल म्हणून पैसे उकळण्याचे प्रकार अधिक प्रमाणात वाढले आहे. भ्रष्टाचाराचे हे रूप देखील सर्वच देशांमध्ये आढळून येते.

८. **लाचलुचपत** :— बंगला, मोटार यासारख्या वस्तुच्या खरेदीसाठी कर्ज घेतले जाते. परंतु ते फेडले जात नाही कारण कर्ज देणाऱ्याचे काम कर्ज उचलणाऱ्याने केले असते. सोप्या शब्दात कर्ज बुडविण्याची सोय दोघांच्या परस्पर संमतीने ठरली असते. हा देखील लाचलुचपतीचा प्रकार आहे.

**प्र.क्र. २ :— भ्रष्टाचाराची कारणे लिहून भ्रष्टाचाराचे परिणाम व उपाय लिहा?**

उत्तर :— **१. चौकशी आयोगाचे अपयश** :— भ्रष्टाचार प्रकरणांची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग सरकारने नियुक्त केले. सी.आय.डी., सी.बी.आय., लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यासारख्या यंत्रणांची निर्मिती होऊन ७० वर्षे झाले तरी भ्रष्टाचार विरोधी यंत्रणेला आपले कार्य प्रभावीपणे करता आले नाही. हेच भ्रष्टाचाराच्या समस्येची तीव्रता वाढविण्याचे कारण ठरते.

२. **लोकमताचा अभाव** :— सरपंच, नगरसेवक, आमदार, खासदार यांच्या बाबत 'तळ राखतो तो पाणी चाखतो' अशी जनतेची समजूत झाली आहे. भ्रष्टाचार दूर करणेच अशक्य आहे, अशी जनतेची भावना झाली आहे. त्यामुळे जागृत लोकमताचा अभाव दिसून येतो.

३. **दुबळी लोकशाही शासन व्यवस्था** :— लोकशाही व्यवस्थेत सरकार टिकवून ठेवण्यासाठी अनेक तडजोडी केल्यामुळे भ्रष्टाचाराचा आरोप असणारे नेते वर्षानुवर्षे निवडून येतात आणि सत्ता उपभागतात.

४. **प्रभावी नैतृत्वांचा अभाव** :— २०१७ मधील भ्रष्टाचारासंबंधीच्या जागतिक सूचीतील १८० देशांमध्ये भारत ८१ व्या स्थानावर आहे. भ्रष्टाचारासंबंधी जागतिक सूचीचे अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांच्या मते, कार्यक्षम व प्रभावी नेतृत्वाची उणीव असणे तसेच प्रबळ राष्ट्रवादाच्या भावनेचा अभाव असणे हे भ्रष्टाचाराची समस्या निर्माण होण्याचे एक कारण आहे.

५. **खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण** :— हया प्रक्रियांमुळे जगातील विभिन्न देश पूर्वीपेक्षा अधिक जवळ आले असून आपल्या देशाच्या सीमेबाहेर शिक्षण, कामधंदा, व्यापार करण्याची संधी सर्वसामान्य व्यक्तीला पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात मिळत आहे. त्याचबरोबर या प्रक्रियांमुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण सर्व देशांमध्ये पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे हे देखील कोणीही अमान्य करू शकत नाही.

६. **चंगळवादाला महत्व** :— बहुतांश लोकांना उपजतच ऐष आरामाची आवड असते परंतू विवेकाचा अभाव असणाऱ्या व्यक्ती भ्रष्टाचाराच्या विभिन्न प्रकाराला बळी पडतात. व्यक्तीच्या हया उपजत प्रवृत्तीतूनच पैशाला आणि चंगळवादाला महत्व देण्याची स्थिती आधूनिज समाजात निर्माण झाली आहे.

७. **सेवाभावी वृत्तीचा अभाव** :— जेव्हा सनदी सेवकांमध्ये जनतेची सेवा करणे ही कर्तव्य भावनाच कमी होते, तेव्हा कामे करवून घेण्यासाठी त्यांचे हात ओले करण्याची पाळी सर्वसामान्य नागरिकांवर येते. भ्रष्टाचार केल्याशिवाय आपली कामे होऊच शकत नाहीत, अशी लोकांची धारणा होते तेव्हा भ्रष्टाचार निर्माण होतो.

८. **भ्रष्टाचारी प्रशासन यंत्रणा** :— शासकीय प्रशासनातील अकार्यक्षमता, दप्तर, दिरंगाई, विलंब या सर्व बाबी भ्रष्टाचार घडून येण्यासाठी पोषक ठरतात. प्रशासन यंत्रणेत जेव्हा अनेक त्रुटी किंवा विसंगती असतात तेव्हा भ्रष्टाचाराला वाव मिळतो.

९. **काळा बाजार** :— आपल्या देशात गेल्या अनेक वर्षात सिमेंट, साखर, रासायनिक खते, स्टील यासारख्या वस्तूंचे मूल्य नियंत्रीत ठेवण्याचे सरकारचे धोरण

होते. त्यामुळे त्या काळात या वस्तुंच्या काळा बाजारामुळे करोडो रूपयांचे काळे धन निर्माण झाले. याचा अर्थ शासनाचे मूल्य नियंत्रणाचे धोरण भ्रष्टाचाराला सहाय्यभूत ठरले.

१०. **स्वार्थी मूल्यनिष्ठा** :— आधुनिक समाजात वैयक्तिक इच्छा, आकांक्षा, स्वार्थी प्रवृत्तीला जेव्हा व्यक्ती महत्व देते तेव्हा भ्रष्टाचार घडून येतो. आदर्श किंवा मूल्यांबाबत स्वार्थी निष्ठा हेच भ्रष्टाचाराचे मुळ कारण आहे.

**ब) भ्रष्टाचाराचे परिणाम :—**

१) अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम २) आर्थिक विषमतेत वाढ ३) श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब ४) दुर्बल घटकांचे शोषण ५) शासन व्यवस्थेवरील विश्वास उडतो ६) कायद्यावर विश्वास राहत नाही ७) उद्योग—व्यवसायाच्या विकासाला प्रतिकूल ८) परकीय गुंतवणूकीवर परिणाम ९) बेरोजगारीत वाढ १०) विकासाचा दर मंदावतो ११) काळया पैशामध्ये वाढ १२) मादक द्रव्य सेवनामध्ये वाढ १३) महागाईत वाढ १४) अराजकता वाढते १५) अशांतता वाढीस कारणीभूत

**क) भ्रष्टाचार नियंत्रित करण्यासाठीचे उपाय :—**

१. **लोकप्रशासनात सुधारणा** :— नियमितपणे आणि प्रभावीपणे हिशेब तपासणीचे कार्य करणे हा त्यावरील एक उपाय आहे. या उपायाचा अवलंब केलेल्या देशांना भ्रष्टाचार नियंत्रित करण्यात यश प्राप्त झाले आहे. म्हणून लोकप्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापनात सुधारणा करणे हा भ्रष्टाचार नियंत्रित करण्यासाठीचा एक प्रभावी मार्ग मानला जातो.

२. **कायद्यांची कडक अंमलबजावणी** :— भ्रष्टाचाराचे कृत्य करणाऱ्याला शिक्षा देण्यासाठी भ्रष्टाचार विरोधी कायद्यांची कडक अंमलबजावणी करणे तसेच कायद्याच्या मजबूत चौकटी निर्माण करणे आवश्यक आहे. कारण भ्रष्टाचाराचे कृत्य केले तरीही शिक्षा होत नाही असा अनुभव असल्यामुळे भ्रष्टाचार नियंत्रित करणे शक्य होत नाही.

३. **तंत्रज्ञानाचा उपयोग** :— शासकीय कार्यालयांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे, शासनाच्या सेवा इंटरनेटवर ऑनलाईन उपलब्ध करून देणे, कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून संपत्तीबाबतचे विवरणपत्र दरवर्षी भरून घेणे, कागदविरहीत कामकाज

करणे यासारख्या मार्गाचा उपयोग करून भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी करण्यात काही देशांना यश प्राप्त झाले आहे.

४. **उत्तरदायित्वाची भावना** :— राज्यकर्त्यांमध्ये आपण कारभाराबाबत देशाला वा समाजाला जबाबदार आहेत या भावनेचा विकास होणे होय. ही उत्तरदायित्वाची भावना राज्यकर्त्यांकडून शासन कारभारात भ्रष्टाचारीच कृत्ये घडण्यास प्रतिबंध करते म्हणून शासन कारभारात पारदर्शकता निर्माण करण्याला आणि शासन कारभारासंबंधी माहिती प्राप्त करण्याला उत्तेजन देणे हा भ्रष्टाचार नियंत्रित करण्यासाठीचा एक प्रभावी मार्ग आहे.

५. **शासन कारभारात जनतेचा सहभाग** :— नागरिकांनी पुढाकार घेवून भ्रष्टाचार निर्मूलन संबंधीचा उपक्रम राबविला तर नेमका भ्रष्टाचार कोठे घडतो व का घडतो या प्रश्नांची उत्तरे मिळतात. असा अनेक युरोपियन देशांचा अनुभव आहे. शासन कारभारात जनतेचे सहभागित्व वाढले की सरकारच्या पैशांची चोरी करण्याचे वा लूट करण्याचे प्रकार थांबतात.

६. **अन्य कारणे** :— १) भ्रष्टाचाराशी संबंधित खटल्यांच्या सुनावणीसाठी शीघ्रगती न्यायालयांची स्थापना करणे २) दोषी आढळणाऱ्यांना कठोर स्वरूपाची शिक्षा करणे. ३) दप्तर दिरंगाईचा दोष दूर करणे ४) लाचलूचपत निर्मुलनाबाबत उपाय करणे ५) भाषण व लेखन स्वातंत्र्य देणे इत्यादी अनेक उपाय आहेत.

**ड) भ्रष्टाचार नियंत्रित करण्यासाठीचे घटक** :—

१. लोकपालाची नियुक्ती :— काही घटक राज्यांमध्ये लोकपालांची नियुक्ती झाली आहे. परंतु त्यांना भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे काम जमलेले नाही. राष्ट्रीय स्तरावर तर अद्यापही लोकपालाच्या नियुक्तीसंबंधीचे विधेयकच मंजूर व्हायचे आहे. राजकीय क्षेत्रातील उच्च पदस्थांमुळे सी.आय.डी., सी.बी.आय. या विभागांना आपले कार्य व्यवस्थितपणे व निष्पक्षतेने करता येत नाही. म्हणून या विभागांना स्वायत्तता देणे आवश्यक आहे.

२. **आचारसंहितेची निर्मिती** :— कोणतेही महत्वपूर्ण पद धारण करतांना प्रत्येकाने आपल्या स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशिल सादर केला पाहीजे. नातेवाईक सोडून

अन्य कोणत्याही व्यक्तीकडून भेटवस्तू न स्विकारण्याचे त्यांनी पालन केले पाहीजे. अशा प्रकारची आचारसंहिता निर्माण करून तिचे काटेकोरपणे प्रत्येकाने पालन केले तर भ्रष्टाचाराच्या समस्येची तीव्रता कमी होईल.

**३.** <u>**सामान्य घटक**</u> :— १) प्रशासकीय यंत्रणेची कार्यक्षमता वाढविणे २) शासकीय कार्यपध्दतीच्या नियमांमध्ये सुलभता आणणे ३) शासकीय यंत्रणेच्या आर्थिक व्यवहारामध्ये पारदर्शकता निर्माण करणे ४) चारित्र्यनिर्मितीवर भर देणारे शिक्षण देणे ५) संघटितपणे भ्रष्टाचाराचा विरोध करणे.



**DR.DEOMAN SHRIKRUSHNA UMBARKAR**
**DEPARTMENT OF SOCIOLOGY**
**LATE. VASANTRAO KOLHATKAR ART'S COLLEGE, ROHANA**
**TAH. ARVI DIST. WARDHA (M.S.)**
Email-deomanumbrkar2014@gmail.com